मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मा. ३०८

मासिकाचे नांव — आर्य भिषक्

29 संपादक — वैद्य शंकर दाजी शास्त्री 2

मासिक क्रमांक — सन — १९०२ १९०३

अंक — ७·८·९·१०·११·१२ = १९०२


(महिने) १·२·३·४·५·६ = १९०३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.


जुनी मासिके (संदर्भ)



[illegible]



कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक



पुस्तक १४ वें.

# आर्यभिषक्

अंक १ ला.




सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥—श्रीवाग्भटः ।

कर्कसंक्रांति,—शके १८२४ आषाढ शु. ११ बुधवार. ता. १६ जुलै १९०२.

# वैद्यक वृत्तसार.

——वैद्यसभा—मुंबईची शाखा इंदुरासही स्थापन झाली आहे. जागजागीं शाखा होऊन संगनमतानें काम चालल्यास ठीक पडेल. 'वैद्यमहासभा' कधीं होणार?

— मुंबई आयुर्वेदविद्यालयाच्या शेवटल्या परीक्षेचा निकाल लागून, तींत १० विद्यार्थ्यांपैकीं पुढील ३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले:—जमनाधर लीलाधर, रामभट्ट पीतांबर, केशवलाल झिणाराम. आणखी एकाबद्दल तपास चालू आहे.

—पुण्यासही एक वैद्यशाला सुरू झाली आहे. "आरंभशूराः खलु दाक्षिणात्याः" असें न होवो. त्यापेक्षां सर्वांनीं मिळून एकच विद्यालय चांगलें चालविलें तर ठीक नाहीं काय?

——कलकत्त्यास एक मोठें वैद्यविद्यालय व वनस्पत्युद्यान करण्याबद्दल जारीनें प्रयत्न चालला आहे. आमच्याकडे अशा प्रयत्नास सहाय्य मिळत नाहीं असा अनुभव आहे.

—श्री. सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं आपल्या राज्यांतील दवाखान्यांत देशी औषधें वापरण्याबद्दल विशेष सवड दिली आहे असें कळतें. महाराजांची इच्छा सफल करणें अधिकाऱ्यांच्या स्वाधीन आहे. इतर संस्थानिकांनीं या गोष्टीचें अवश्य अनुकरण करावें.

---


## सिद्ध बाळकृष्ण प्रासादिक नूतन शोधक शास्त्री भगवंत गोविंद तोंडेवाला.

हे गृहस्थ मोंगलाईंत पैठणास आहेत. एखाद्यास समक्ष पाहतांच त्याचें भूतभविष्य व त्याचप्रमाणें पांच पिढीतील सर्व आप्तवर्गाची स्थिति व चेहरे वगैरे बरोबर सांगतात. पत्रिका नूतन पद्धतीनें निवळ मराठींत तयार करतात. यांचीं भविष्यें पूर्ण जुळल्याचे बरेच लोकांस अनुभव आले आहेत. रेणुराव बीडकर वकील, पाथरी.

# सार्थ श्रीचरकसंहिता-सूत्रस्थान उत्तरार्ध.

## भाग १ ला.

### अनुक्रमणिका.


विषय. पृष्ठ.

**अध्याय १२ वा-वातकलाकलीय.**

वायूच्या गुणांविषयीं प्रश्नोत्तर ... १
वायूच्या प्रकोपाचीं कारणें ... ३
वायूचा प्रभाव व शरीरांतील हिताहित कर्में ... ... ... ५
त्याच्या सृष्टींतील प्रकृत क्रिया ... ६
" " विकृत क्रिया ... ७
पित्तान्तर्गत अग्नीचीं शुभाशुभ कर्में ८
कफान्तर्गत सोमाचीं ... ... ९
दोषांचें गुणदोष वर्णन ... ...
अध्यायाची संक्षिप्त अनुक्रमणिका १०

**अध्याय १३ वा-स्नेहाध्याय.**

स्नेहविषयक प्रश्नावली ... ... ११
स्नेहाचे प्रकार वगैरे ... ... १२
कोणत्या कार्यास कोणतें तेल उत्तम. १३
स्नेह कोणते उत्तम. ... ... "
तुपाचे गुण. ... ... ... "
तेलाचे " ... ... ... १४
चरबीचे " ... ... ... "
मज्जेचे " ... ... ... "
कोणता स्नेह कोणत्या ऋतूंत घ्यावा. "
निरनिराळ्या ऋतूंत दोषपरत्वें स्नेह घेण्याचे निरनिराळे काळ... "

विषय. पृष्ठ.

त्याच्या उलट घेतल्यानें होणारे विकार ... ... ... १५
निरनिराळ्या स्नेहांवर अनुपानें ... "
स्नेह घेण्याचे प्रकार. ... ... १६
रसांबरोबर मिश्रित केल्यानें होणारे स्नेहाचे प्रकार. ... ... "
स्नेहाचीं प्रमाणें व तीं पचण्यास लागणारा काळ. ... ... १७
कोणतें प्रमाण कोणास द्यावें त्याविषयीं. ... ... ... "
कोणत्या रोग्यांनीं तुप प्यावें. " ... १९
" " तेल " ... २०
" " वसा प्यावी " ... "
" " मज्जा " " ... २१
आणखी कोणास स्नेहन द्यावें. ... "
स्नेहपान कोणास वर्ज्य आहे. ... २२
स्नेहपान बरोबर न झाल्याचीं लक्षणें. ... ... ... "
" " झाल्याचीं " ... "
" फाजील " " ... २३
स्नेहपानाचा पूर्वविधि ... ... "
स्नेह घेतलेल्यांचें पथ्य. ... ... "
स्नेहाचा मिथ्योपचार. ... ... २४
स्नेहन किती वेळानें लागू पडतें.... "

| विषय | पृष्ठ. |
|---|---|
| मृदु कोठयाच्या मनुष्याची विरेचक द्रव्यें. ... ... ... | २४ |
| पित्ताधिक ग्रहणीच्या रोग्यास दिलेल्या स्नेहाचा परिणाम. ... | २५ |
| स्नेह केव्हां ओकवून पाडावा. ... | ,, |
| केवळ तूप केव्हां घेऊं नये व कां ? | ,, |
| अयोग्य स्नेहाचे विकार व त्यावर उपचार. ... ... ... | २६ |
| स्नेहानांवर वमन विरेचन केव्हां घ्यावें. | ,, |
| स्नेहकारक भक्ष्य पदार्थ ... ... | २७ |
| अति किंवा वारंवार स्नेहपानाचा निषेध ... ... ... | २९ |
| लवणयुक्त स्नेहपानाची प्रशंसा. .. | ३० |

**अध्याय १४ वा-स्वेदाध्याय.**

| | |
|---|---|
| स्वेदाची प्रशंसा ... ... ... | ३१ |
| कोणत्या विकारांत कोणत्या प्रकारचा स्वेद द्यावा. ... ... | ३२ |
| स्वेदनास निषिद्ध अवयव. ... | ,, |
| स्वेदन करितांना रक्षणीय अवयव. | ३३ |
| योग्य व फाजील स्वेदाची लक्षणें. | ,, |
| स्वेदन कोणास हितकारक व कोणास निषिद्ध आहे त्याविषयीं. | ३६ |
| स्वेदाचे निरनिराळे प्रकार व तत्तद्योग्य रोगी. ... ... | ,, |
| स्वेदन विधींचें निरूपण ... ... | ४० |
| अनाग्निक स्वेद. ... ... ... | ४९ |
| स्वेदन क्रियेवर पथ्य. ... ... | ५० |

**अध्याय १५वा-उपकल्पनीयाध्याय**

| | |
|---|---|
| संशोधनापूर्वी साहित्य जमविण्याची आवश्यकता ... ... | ५१ |

| विषय. | पृष्ठ. |
|---|---|
| संशोधनास जागा कशी असावी.... | ५४ |
| त्याठिकाणीं जमवावयाचें साहित्य | ५६ |
| स्नेहनस्वेदनपूर्वक संशोधनविधि ... | ५७ |
| वमनाचा योगायोग व अतियोगाचीं लक्षणें ... ... ... | ६१ |
| वमनानंतर पाळावयाचा पथ्यविधि... | ६३ |
| संशोधनाचे गुण ... ... ... | ६८ |

**अध्याय १६वा-चिकित्साप्राभृतीय**

| | |
|---|---|
| संशोधन देणारा वैद्य कसा असावा | ७० |
| विरेचनाच्या सम्यक् योगाचें लक्षण | ७२ |
| ,, अयोगाचें ,, ... | ,, |
| ,, अतियोगाचें ,, ... | ,, |
| उभयमार्गी संशोधन कोणत्या रोगास द्यावें ... ... ... | ७३ |
| संशोधनाचे गुण ... ... ... | ७४ |
| लंघनपाचन व संशोधनांतील अंतर. | ७५ |
| संशोधनानें कृश झालेल्याचें बृंहण | ,, |
| अयोग व अतियोगाचे उपचार ... | ७६ |
| क्षणभंगभावपक्षमूलक चिकित्सेच्या उपयुक्ततेविषयीं शंकासमाधान. | ७७ |

**अध्याय १७वा-कियन्तःशिरसीय.**

| | |
|---|---|
| शिरोरोगाचीं सामान्य कारणें ... | ८१ |
| वातज मस्तकरोगाचीं कारणें व लक्षणें. | |
| पित्तज ,, ,, ,, ... | ८५ |
| कफज ,, ,, ,, ... | ८६ |
| सान्निपातिक ,, ,, ,, ... | ८७ |
| कृमिजन्य ,, ,, ,, ... | ८८ |
| वात-पित्त व कफजन्य हृद्रोगाचीं कारणें व लक्षणें ... ... | ८९ |
| दोषांचे संसर्ग व सन्निपात ... | ९० |

विषय. पृष्ठ.

वाढलेल्या व क्षीण दोषांची क्रिया ९७
अठरा प्रकारचे क्षय व त्यांचीं लक्षणें. ९८
प्रमेहाचें कारण ... ... ...१०२
सात प्रकारच्या पिडका व त्यांचीं लक्षणें ... ... ...१०४
दोषांच्या प्रकोपप्रशमनाचे ऋतु ...११०


**अध्याय १८ वा-त्रिशोथीयाध्याय.**


शोथांचीं सर्वसामान्य कारणें ...११३
निज व आगन्तु शोथ ... ...११४
त्यांचीं दोषभेदेंकरून खुलासेवार कारणें व लक्षणें ... ...११६
शोथाचे उपद्रव ... ... ...१२१
उपजिव्हिका व गलशुण्डिकेचीं लक्षणें ... ... ... ,,
गलगंड, गलग्रह व विसर्पाचीं ,,...१२२
गुल्म, अधिमांस, अर्बुदादिकांचीं,,...१२४
रोहिणीचें लक्षण ... ... ...१२५
वातादि दोषांची प्रकृत व विकृत लक्षणें ... ... ...१२८


**अध्याय १९ वा-अष्टादेरीय.**


रोगांचीं ४८ प्रकरणें ... ...१३१
प्रत्येकाचें स्पष्टीकरण... ... ...१३२
आगंतु व दोषज विकारांचें मिश्रण...१४०


**अध्याय २० वा-महारोगाध्याय.**


रोगांचे प्रकार ... ... ...१४२
त्यांचीं निरनिराळीं कारणें... ...१४३
दोषांचीं शरीरांतील स्थानें... ...१४४
सामान्यज-नानात्मजरोग ... ...१४५
वात, पित्त व कफजन्य विकार, त्यांचीं लक्षणें व संक्षिप्त चिकित्सा ...१४६
रोगांच्या चिकित्सेपूर्वी त्याच्या निदानाचें महत्व ... ...१५५


**अध्याय २१ वा-अष्टौनिन्दितीय.**


अठरा प्रकारचे निंदित मनुष्य ...१५७
अतिस्थूल व अतिकृश मनुष्याचे दोष ... ... ...१५८
अतिस्थूलाचें लक्षण... ... ...१६०
अतिकृशतेचीं कारणें व लक्षणें ...१६१
प्रशस्त शरीराचें लक्षण ... ...१६२
अतिस्थूलचिकित्सा ... ...१६३
अतिकृश चिकित्सा ... ...१६४
निद्रेचें महत्व व तिचे गुणदोषनिरूपण ... ... ...१६८
झोंप आणण्याचे व घालविण्याचे उपाय ... ... ...१७०
झोंपेचे प्रकार ... ... ...१७१


**अध्याय २२ वा-लंघनबृंहणीय.**


लंघन, बृंहण, रूक्षण, स्नेहन, स्वेदन व स्तंभनाचें निर्वचन ...१७४
तत्तद्गुणविशिष्ट पदार्थांचें स्वरूपवर्णन ... ... ...१७५
लंघनाचे निराळे दहा प्रकार व तद्योग्यरोगी ... ...१७७
बृंहणविषयक निरूपण ... ...१७८
रूक्षण व स्तम्भन कोणाचें करावें...१७९
लंघनबृंहणादिकांच्या योग, अयोग व अतियोगाचीं लक्षणें ...१८०
यावच्चिकित्सेचा उक्त सहा प्रकारांत समावेश ... ... ... ,,

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पद्ये यांचें स्मारक.

पु० १४ ] **आर्यभिषक्.** [अं० १ ला.

ARYABHISHAK OR DOCTOR OF ARYANS.

A Monthly Journal Containing Medical news and articles.

शके १८२४ आषाढ शु. ११ बुधवार (कर्कसंक्रांति) ता. १६ जुलै १९०२

# चौदाव्या वर्षाचा प्रवेश.

श्रीशंकराच्या कृपेनें आर्यभिषकाचीं १३ वर्षें पूर्ण झालीं. नवीन व्यवस्था ठरविल्याप्रमाणें चौदाव्या वर्षाचा आज पहिला अंक निघत आहे आर्यवैद्यकाचा उत्कर्ष करण्याकरितां यथाशक्ति प्रयत्न करण्याकरितां 'आर्यभिषका' चें आवाहन करण्यांत आलें होतें. अद्याप करण्याचें काम पुष्कळच उरलें आहे. "आकाश–अंत न कळोनिहि अंतरिक्षीं। आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी" या न्यायानें आमचा हा प्रयत्न चालू आहे. चालू वर्षापासून आह्मीं पुढील फेरफार करण्याचें ठरविलें आहे.—

( १ ) ज्यांच्या आधारावर आर्यभिषकास आपलें काम करण्यास शक्ति आली; जे एक पुण्यमूर्ति; जे आह्मांस परमपूज्य व ज्यांच्या कृपेनेंच पुढेंही आह्मीं कांहीं करूं शकूं; त्यांच्या स्मारकार्थ आजपासून 'आर्यभिषक्' निघत जाईल. आणि तत्प्रीत्यर्थ, ज्या कोणास पुस्तक घेण्याची बिलकूल शक्ति नसेल, परंतु पुस्तकाची विशेष जरूर असेल; अशांनीं, त्याबद्दल खात्रीपत्रक रुजू केल्यास त्यांस आर्यभिषक् एक वर्ष फुकट देण्यांत येईल. रवानगी खर्च मात्र त्यांनीं सह्य आणे दिला पाहिजे.

( २ ) वैद्यकसंबंधीं चालू विषयावर लेख, बातम्या, इतर उपयुक्त माहिती–कीं जी वर्तमानकालीं उपयोगीं पडेल, अशांचा संग्रह यांत करण्यांत येईल.

( ३ ) चरकसूत्रस्थानाचा उत्तरार्ध संपविल्यावर दुसरा विषय चालू करण्यांत येईल. चिकित्सास्थान व शारीरस्थान हीं दोन रहातील तीं, आर्यभिषकांत न येतां, स्वतंत्र पुस्तकरूपानें निघतील. हारीतसंहिता व आरोग्यविषयक नियमपुस्तक हे दोन विषय अपुरे राहिले आहेत ते नंतर पूर्ण करण्यांत येतील. वनौषधीगुणादर्शाचा सातवा भागही सुरू करणें आहेच; तोही सवडीप्रमाणें देण्यांत येईल. पण हें सर्व चरक–सूत्रस्थान –उत्तरार्ध पूर्ण झाल्यावर होईल.

( ४ ) 'श्रीसयाजीऔषधशाला' मुंबई–कावसजी पटेल तळावाजवळ–आर्यभिषक्कार्यालयद्वाराच सुरू करण्यांत आली आहे, तींतून लौकरच नवीन औषधांची यादी तयार होऊन प्रसिद्ध होईल.

आणखी बऱ्याच गोष्टी कळविणें आहेत; पण त्या अंमलांत आणण्याची व्यवस्था झाली ह्मणजे कळविण्यास ठीक पडेल. परमेश्वरकृपेनें या संपूर्ण बाबती पूर्णतेस येवोत इतकीच प्रार्थना करून, हा प्रवेशलेख पुरा करतों.

---

**औषधांचे अनुभव कळविण्यास व इतर वैद्यकचर्चा करण्याची सूचना.**

संक्षेपांत सुवाच्य बालबोध अक्षरांनीं, कागदाच्या एका बाजूस लिहून मजकूर यावा. उत्तरें देणें तीं एकदम दरमहा अंकांत दिलीं जातील. विशेष प्रसंगीं पत्रानें उत्तर मिळेल.

---

**या अंकांतील विषय**––नवीन वर्षासंबंधानें विचार वगैरे. श्रीचरक सूत्रस्थान पृष्ठें ~~३२—४०~~ व ~~विमानस्थान मुखपृष्ठ~~ वगैरे.

# श्रीसयाजी-औषधशाला.

यथाशास्त्र औषधें तयार करणें व नवीन अनुभूत औषधांचा प्रसार करणें यासाठीं ही स्थापन केली आहे. बऱ्याच तदनुषंगिक गोष्टी या शालेकडून व्हावयाच्या आहेत; परंतु सर्वसाधनसम्पन्नता झाल्यावर खुलासा प्रसिद्ध करणें बरें ह्मणून तूर्त विशेष न लिहितां, तूर्त जीं औषधें तयार आहेत त्यांची यादी याखालीं देत आहों:—

**दीपनार्क**—आम्लपित्तावर, घेतल्याबरोबर गुण वाटून, पुष्कळ दिवस चालू ठेवल्यानें उत्तम गुण येतो. बाटलीची किंमत १ रुपया.

**कफघ्न अर्क.**—कफ पातळ करून त्याचा नाश करण्यास हें औषध फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत १॥ रुपया.

**बस्तिशोधनार्क.**—मूत्र स्वच्छ होऊन, बस्तींतील वायु तोडून अन्न पचन करण्यास हा फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत १ रु०

**पाचनार्क.**—अन्न पचन होण्यास याचा फारच उपयोग आहे. बाटलीची किंमत १२ आणे.

**रक्त शोधक गोळ्या.**—यापासून पचनक्रिया सुधरते, वायूचा बिघाड दूर होतो, रक्त शुद्ध होतें, वीर्यदोष नाहींसे होतात, व हमेषे घेणारांचें आरोग्य उत्तम रीतीनें रक्षण होतें. डबीची किंमत १॥ रु.

**अभ्रकभस्म.**— कफ, क्षय वगैऱ्यांवर. किं. १५ रु. तोळा.

**कपर्दिकभस्म.**—खोकला, जीर्णज्वर वगैऱ्यांवर किं. ८ आ. तो.

**प्रवाळभस्म.**—( अग्निपुटी. )कडकी, उष्णवात इत्यादिकांवर. किं. ८ आणे तोळा.

**मंडूरभस्म.**—पांडुरोग, जीर्णज्वर, संग्रहणी वगैऱ्यांवर. १॥ रु. तो.

**वंगभस्म.**—पौष्टिक, शामक वगैरे, किं. २॥ रु. तो.

**सुवर्णमाक्षिकभस्म.**—उष्णता, वातरोग इत्यादिकांवर. किं. २॥ रु.

**गंधकरसायन.**—रक्त व त्वचेच्या सर्व रोगांवर याचा फारच उपयोग होतो. योगरत्नाकरांतील पाठाप्रमाणें हें उत्तम रीतीनें तयार केलें आहे. किं. १ रु. तोळा.

**सूतशेखर.**—त्रिदोषांवर उपयोग होऊन पौष्टिक आहे. किंमत १ रु. तोळा.

**हेमगर्भ.**—सन्निपातावर याचा फार चांगला उपयोग होतो. किंमत २० रुपये तोळा.

**चंद्रप्रभागुटिका.**—रक्त व वीर्य यासंबंधीं वात व उष्णतेचे सर्व विकार यानें बरे होतात. यांत खऱ्या शिलाजिताचाच उपयोग केला आहे. किंमत २॥ रु. तोळा.

**कर्पूरादि गुटिका.**—**वीर्यस्तंभकाचा** गुण या गोळ्यांत फारच उत्कृष्ठ रीतीनें आणला आहे. प्रकृतीस कोणत्याही रीतीनें बिघाड न होतां उत्तम गुण येतो अशाबद्दल **सरदार, श्रीमंत, विद्वान्** वगैरे सर्व प्रकारच्या लोकांनीं याचा अनुभव घेतला आहे. किं. १० रु. तोळा.

### श्रीसयाजीऔषधशाला व आर्यभिषक्कार्यालयाशीं
### व्यवहार करणारांस
## विशेष अगत्याची सूचना.

**मुंबईंत** ज्यांस प्रत्यक्ष पुस्तकें किंवा औषधें घेणें असतील, त्यांनीं " मुंबई, कावसजी पटेल तलावाजवळ श्रीसयाजी औषधशालें " त यावें. व **बाहेरगांवीं मागविणें असतील त्यांनीं** " आ. म. शंकर दाजी शास्त्री पदे, मुंबई नवानागपाडा, आर्यभिषक्कार्यालय " या पत्त्यावर सर्व व्यवहार करावा.

के. रामराव, व्यवस्थापक आ. का.

स्वेदन क्रिया करितांनां, रोग्याच्या हृदयास, थंड अशा मोत्यांच्या सरांनीं, धातूंच्या थंड भांड्यांनीं, किंवा कमळें पाण्यांत भिजवून त्यांनीं अथवा पाण्यांत हात ओले करून त्यांनीं, स्पर्श करीत असावें.

**शीतशूलव्युपरमे स्तंभगौरवनिग्रहे।**
**संजाते मार्दवे स्वेदे स्वेदनाद्विरतिर्मता ॥ ११ ॥**

स्वेदन क्रिया करतां करतां शरीरांतील शैत्य व तत्संबंधीं होणारा शूल हीं नाहींशीं होऊन आणि अंगांतील ताठा व जडपणा हींही जाऊन शरीर मृदु झालें ह्मणजे ती क्रिया बरोबर व पूर्ण झाली असें समजून बंद करावी.

**पित्तप्रकोपो मूर्च्छा च शरीरसदनं तृषा।**
**दाहस्वेदांगदौर्बल्यमतिस्विन्नस्य लक्षणम् ॥ १२ ॥**

पित्तप्रकोप, मूर्च्छा, शरीर सुस्त होणें, तहान लागणें, अंगाचा दाह, घाम सुटणें व शरीराची दुर्बलता हीं स्वेदाचा फाजील उपयोग झाल्याचीं लक्षणें होत.

**उक्तस्तस्याशितीये यो ग्रैष्मिकः सर्वशो विधिः।**
**सोऽतिस्विन्नस्य कर्तव्यो मधुरः स्निग्धशीतलैः ॥ १३ ॥**

---

१ येथपर्यंतच्या तीन श्लोकांचा हेतु, स्वेदनक्रिया करितांना रोग्याचें हृदय, नेत्र व वृषण यांच्या रक्षणाची आवश्यकता प्रतिपादन करण्याचा आहे. त्यांत हृदय व डोळे यांची रक्षा मुख्य आहे.

२ यावरून स्वेदनक्रियेच्या सम्यक्योग व अयोगाचें लक्षण निष्पन्न होतें. शीतशूलादिकांचें नाहींसे होणें हें सम्यक् योगाचें लक्षण व त्याच्या उलट अयोगाचें लक्षण.

३ या ठिकाणीं 'ग्रैष्मिकविधि' असें सांगून पुन्हां मधुर शीतल इत्यादि वचनांचा प्रयोग कां केला अशी शंका उत्पन्न होते. त्याचें समाधान असें आहे कीं 'ग्रैष्मिकविधींत " मद्यमल्पं न वा पेयम्' या वचनांत सांगितलेल्या अल्प मद्यपानाचाही निषेध करून मधुर शीतादिकांचें विशेष विधान करण्याकरितां तें स्पष्टीकरण केलें आहे.

या स्थानाच्या 'तस्याशितीय' नांवाच्या सहाव्या अध्यायांत ग्रीष्म ऋतुसंबंधीं जे मधुर, स्निग्ध व शीतल प्रकार सांगितलेले आहेत, ते सर्व, फार स्वेद झालेल्या रोग्याच्या उपचारांत आणावे.

कषायमद्यनित्यानां गर्भिण्या रक्तपित्तिनाम् ।
पित्तिनां सातिसाराणां रूक्षाणां मधुमेहिनाम् ॥ १४ ॥

विदग्धभ्रष्टब्रध्नानां विषमद्यविकारिणाम् ।
श्रांतानां नष्टसंज्ञानां स्थूलानां पित्तमेहिनाम् ॥ १५ ॥

तृष्यतां क्षुधितानां च क्रुद्धानां शोचतामपि ।
कामल्युदरिणां चैव क्षतानामाढ्यरोगिणाम् ॥ १६ ॥

दुर्बलातिविशुष्काणामुपक्षीणौजसां तथा ।
भिषक्तैमिरिकाणां च न स्वेदमवतारयेत् ॥ १७ ॥

पुढील प्रकारच्या मनुष्यांनां स्वेदन करूं नये.–

नेहमीं कषाय द्रव्यांचें मद्य सेवन करणारे[1], गर्भिणी स्त्रिया, रक्तपित्त[2] रोगी, पित्तातिसार रोगी, रूक्ष शरीराचे, मधमेह[3] झालेले, ज्यांचें गुदद्वार विदग्ध झालें असेल किंवा बाहेर पडलें असेल असे, विष किंवा मद्या-

---

१ यावर कदाचित् अशी शंका उद्भवेल कीं, नेहमीं कषाय पदार्थ सेवन करणाराची प्रकृति वातप्रधान असते. कारण कषाय वातकारक आहे हें प्रसिद्ध आहे. वातावर स्वेदक्रिया विहित आहे. तर या ठिकाणीं निषेध कां केला? ह्मणून या ठिकाणीं कषाय शब्दाचा अर्थ 'अमधुर' केला असतां समंजस दिसेल.

२ मुळांतच पित्तावर स्वेदाचें विधान नसतां, विशेषें करून रक्तपित्तरोग्यास त्याचा निषेध करण्याचा हेतु, त्यास जरी दुसरा एखादा स्वेदसाध्य वातविकार किंवा कफविकार झाला तरी त्यावरही स्वेदक्रिया निषिद्ध आहे, हें दाखविण्याचा आहे. याच प्रमाणें पित्तप्रमेही किंवा कावीळ झालेल्या रोग्याविषयींही समजावें.

३ मधुमेह शब्दानें या ठिकाणीं सर्वप्रकारच्या मेहांचें ग्रहण करावें. याविषयीं प्रतिपादन याच स्थानाच्या 'कियन्तःशिरसीय' अध्यायांत केलें आहे. सर्व प्रकारच्या मेहांत शरीर शिथिल होतें ह्मणून स्वेदन करणें योग्य नाहीं.

पासून विकार झालेले, श्रमलेले, मूर्च्छित झालेले, स्थूल शरीराचे, पित्त-प्रमेही, तान्हेलले, भुकेलेले, रागावलेले, शोकग्रस्त झालेले, [illegible] किंवा उदर झालेले, क्षत पडलेले, वातरक्ताचे रोगी, दुर्बल, अतिशय कृश झालेले, ज्यांच्या शरीरांतील ओज धातु ( Vitality ) क्षीण झाली असेल असे आणि ज्यांस नेत्ररोग (काचबिंदु) झाला आहे असे. *

प्रतिश्याये च कासे च हिक्काश्वासेष्वलाघवे ।
कर्णमन्याशिरःशूले स्वरभेदे गलग्रहे ॥ १८ ॥
अर्दितैकांगसर्वांगपक्षाघाते विनामके ।
कोष्ठानाहविबंधेषु शुक्राघाते विजृंभके ॥ १९ ॥

पार्श्वपृष्ठकटीकुक्षिसंग्रहे गृध्रसीषु च ।
मूत्रकृच्छ्रे महत्वेच मुष्कयोरंगमर्दके ॥ २० ॥
पादजानूरुजंघार्तिसंग्रहे श्वयथावपि ।
खल्लीष्वामेषु शीते च वेपथौ वातकंटके ॥ २१ ॥

संकोचायामशूलेषु स्तंभगौरवसुप्तिषु ।
सर्वांगेषु विकारेषु स्वेदनं हितमुच्यते ॥+२२ ॥

---

१ मद्यपी मनुष्यास 'वातकफा' पासून मदात्यय झाल्यास, सामान्यतः वात-कफकृत् रोगांवर स्वेद विहित आहे म्हणून, त्याच्यावर त्याचा प्रयोग कदाचित् कोणी करील म्हणून त्याचा निषेध केला आहे.

* वर दर्शविलेल्या रोग्यांस स्वेद देऊं नये असें सांगितलें परंतु त्यापैकीं एखाद्यास जर कदाचित् 'संन्यासा' (मूर्च्छाभेद) सारखा केवळ स्वेदानेंच बरा होणारा रोग झाला तर 'भूयो विरोधे स्वल्पमन्याय्यम्' या न्यायाप्रमाणें मोठा प्रत्यवाय टाळण्याकरितां धाकट्या प्रत्यवायाची उपेक्षा करून स्वेदन करावें. परंतु तें देण्यापूर्वी हा रोग केवळ स्वेदसाध्यच आहे हें मात्र वैद्यानें निश्चयात्मक ठरविलें पाहिजे.

\+ यांत आलेले अलाघव व गौरव शब्द समानार्थक दिसतात. परंतु त्यांचा प्रयोग अशा भेदानें केला आहे कीं अलाघव पदानें केवल हलकेपणाचा निषेध केला व गौरव शब्दानें शरीराचा विशेष जडपणा साक्षात् प्रतिपादन केला. कारण 'नञ्'

पडसें, खोकला, उचकी, दमा, अवयवजडता, कर्णशूळ, मानेची शीर दुखणें, डोकें दुखणें, घसा बसणें, गळा धरणें, एकांग, सर्वांग किंवा अर्धांग वायु, विनामक[1], मळमूत्र बंद होणें, शुक्राघात, विजृम्भक[2], पाठ, बाजू, कंबर किंवा पाट दुखणें, गृध्रसी ( Sciatica सायाटिका ), मूत्रकृच्छ्र, वृषण मोठें होणें, अंग वळणें, पाय, गुडघे, मांड्या व पिंड्या दुखणें, ताठणें व सुजणें, हातपाय आखडणें, आमरोग थंडी किंवा अंगाचा कंप होणें, वातकण्टक[3], वायुच्या प्रकोपानें शरीराचा संकोच होणें, शरीर ताठणें, शूळ, अवयव जखडणें, जड होणें किंवा बधिर होणें, अथवा सर्वांगास विकार असणें इतक्या विकारांवर स्वेदन हितकारक आहे.

तिलमाषकुलत्थाम्लघृततैलामिषौदनैः ।
पायसैः कृशरैर्मांसैः पिंडस्वेदं प्रयोजयेत् ॥ २३ ॥

तीळ, उडीद, कुळीथ, चुकांची भाजी, तूप, तेल, मांस, भात, हीं किंवा क्षीर, कृशर[4] व मांस हीं वाटून त्यांचा गोळा करून त्यानें स्वेदनक्रिया करावी. यास पिंडस्वेद ह्मणतात.

गोखरोष्ट्रवराहाश्वशकृद्भिः सतुषैर्यवैः ।
सिकतापांशुपाषाणकरीषाऽऽयसपुटकैः ।
श्लैष्मिकान्स्वेदयेत्पूर्वैर्वातिकान्समुपाचरेत् ॥ २४ ॥

गाय, गाढव, उंट, डुकर, घोडा यांची विष्ठा, सालासकट जव, वाळू, धूळ, दगडाचा चूर, शेणीचा चूर, लोखंडाची भुकटी, हीं एकत्र करून

---

प्रत्ययानें सर्वत्र विरुद्धार्थ बोध होत नाहीं. जसें " अरुक्षमनभिष्यन्दित्वासीन-प्रचलायितम् " या ठिकाणीं अरुक्ष शब्दानें स्निग्धत्व ग्रहण केलें जात नाहीं तर केवल रुक्षतेचा प्रतिषेध होतो.

१ शरीरास वांकवणारा वायु.

२ फार जांभया येणें.

३ गुल्फ ( पायाचा घोटा ) आश्रितवायु.

४ तीळ तांदूळ व दुध एकत्र शिजवून करितात तें पक्वान्न.

वस्त्रांत घालून ती पोटली गरम करून त्यानें कफप्रकृतीच्या माणसास स्वेदन द्यावें. याच्या मागच्या श्लोकांत सांगितलेला स्वेद वातप्रकृतीच्या माणसास द्यावा.

द्रव्याण्येतानि शस्यंते यथास्वं प्रस्तरेष्वपि ॥ २५ ॥

हींच द्रव्यें प्रस्तरस्वेदासही[1] वरील क्रमानें[2] उपयोगी पडतात.

भूगृहेषु च जेन्ताकेपूष्णगर्भगृहेषु च ।
विधूमांगारतप्तेष्वभ्यक्तः स्विद्यति ना सुखम् ॥ २६ ॥

जमिनीच्या खालचें तळघर, जेन्ताक[3] व उष्णगर्भगृह यांस बिनधुराच्या निखाऱ्यांनीं खूब तापवून, त्यांत, रोग्याच्या अंगास तेलाचें चांगलें मर्दन करून, त्यास बसवावें ह्मणजे सुखानें स्वेदन होतें.

ग्राम्यानूपौदकं मांसं पयो बस्तशिरस्तथा ।
वराहमध्यपित्तासृक् स्नेहवत्तिलतंडुलान् ॥ २७ ॥

---

१ मागें पिंड स्वेद सांगितला. म्हणजे–श्लोकांत सांगितलेल्या द्रव्यांचें शिजवून वाटून पिंड ( गोळे ) करून त्यानें शेक द्यावयाचा. आतां प्रस्तर स्वेद सांगितला आहे त्यांत वरील द्रव्यांचा गोळा न करितां तीं द्रव्यें सुकीं वाटून त्यांची पोतांडी करून त्यानें शेक द्यावयाचा.

२ यथाक्रम ह्मणजे तीळ उडीद वगैरे वातरोग्यास व गाय गाढवादिकांची विष्ठा कफविकारावर योग्यप्रमाणें.

३ कृत्रिम रीतीनें उष्ण केलेलें घर ४ बिन खिडक्यांचें घर. मुसलमान लोकांत 'हमाम' नांवाच्या ( विशेषें करून शीतकालांत ) स्नानाकरितां ज्या स्वतंत्र जागा बनविलेल्या असतात त्यांच्यासारखी या घरांची रचना असावी. 'हमामा'स वायु संचरणार्थ एकच द्वार असतें व तेंही अगदीं लहान असून दूर एका बाजूस असतें खिडक्या किंवा इतर छिद्रें मुळींच नसतात. वरच्या भागास छपरा ऐवजीं घुमट असतो. या घरांच्या मध्यभागीं पाण्याचे हौद भरलेले असतात व त्याच्याखालीं भिंतीच्या बाहेरून अग्नि पेटविलेला असतो. त्याच्या योगानें पाणी नेहमीं कढत राहून ती सर्व जागाही इतकी तापलेली असते कीं आंत शिरल्याबरोबर आंगांतून घामाच्या धारा सुरू होतात.

इत्येतानि समुत्क्वाथ्य नाडीस्वेदं प्रयोजयेत् ॥
देशकालविभागज्ञो युक्त्यपेक्षो भिषक्तमः ॥ २८ ॥

ग्राम्य (शेळी मेंढी) जनावरांचें मांस, ह्मैस वगैरे चिखलांत लोळणाऱ्यांचें मांस, मत्स्यादि जलचरांचें मांस, दूध, बोकडाचें मुंडकें, डुकराचें मध्य, पित्त व रक्त, एरंड्या वगैरे तेलाचीं धान्यें, तीळ, व तांदूळ हीं उत्तम रीतीनें कढवून त्या काढ्यानें, देशकालज्ञ व युक्तिवान् वैद्यानें नाडीस्वेद (वातविकारी रोग्यास) द्यावा.

वारुणामृतकैरंडशिग्रुमूलकसर्षपैः ।
वासावंशकरंजार्कपत्रैरश्मान्तकस्य च ॥ २९ ॥
शोभांजनकशैरीयमालतीसुरसार्जकैः ।
पत्रैरुत्क्वाथ्य सलिलं नाडीस्वेदं प्रयोजयेत् ॥ ३० ॥

वायवरणा, गुळवेल, तांबडा एरंड, शेवगा, मुळे, शिरसा, अडुळसा वेळू, करंज, रुई, व आपटा यांचीं; तसेंच शोभांजन (पांढरा शेवगा) पांढरा कोरांटा, चमेली. आणि पांढरा व काळा अनवळा यांचीं पानें एकत्र करून त्यांचा काढा करून त्यानें नाडीस्वेदाचा प्रयोग करावा. हा कफविकार दूर करितो.

भूतीकंपचमूलाभ्यां सुरया दधिमस्तुना ।
मूत्रैरम्लैश्च सस्नेहैर्नाडीस्वेदं प्रयोजयेत् ॥ ३१ ॥

ओंवा, पंचमूळ, मद्य, दह्यांवरील निवळ, मूत्रें, अम्लें व स्नेह यांचा काढा करून त्यानें स्वेदनक्रिया करावी. यापासून वातकफाचे मिश्रित विकार दूर होतात

---

१ हत्ती, ह्मैस, उंट, गाय, बकरी, मेंढी, घोडा, गाई व, पुरुष व स्त्री यांची
२ अम्लवर्गांतील, ओटीचें झाड, अम्लवेतस, चुका, ईडनिंबु, चिंच, महाळुंगादि सर्व द्रव्यें.

**एत एव च निर्यूहाः प्रयोज्या जलकोष्ठके ॥ ३२ ॥**

हेच काढे एका मोठ्या घगाळांत किंवा पिंपांत घालून त्यांत रोग्यास बसवून स्वेदन द्यावें.

**स्वेदनार्थं घृतक्षीरतैलकोष्ठाँश्च कारयेत् ॥ ३३ ॥**

तसेंच तूप, दूध, तेल, याकरितांही मोठालीं भांडीं तयार करावीं.

**गोधूमशकलैश्चूर्णैर्यवानामम्लसंयुतैः ।**
**सस्नेहकिण्वलवणैरुपनाहः प्रशस्यते ॥ ३४ ॥**

गव्हांची कणीक, जवांचें पीठ, कांजी, तेल, तूप, दारू उत्पन्न करणारी तण्डुलादि बीजें व मीठ यांचें उपनाह (पोटीस) उत्तम गुणकारी आहे.

**गंधैः सुरायाः किण्वेन जीवंत्या शतपुष्पया ।**
**उमया कुष्ठतैलाभ्यां युक्तया चोपनाहयेत् ॥ ३५ ॥**

किंवा उत्तम सुवासिक द्रव्यें, ज्यांपासून दारू तयार करतात तीं धान्यें, हरणवेल, बडीशोप, जवस, कोष्ठ, तेल व रास्ना यांचें पोटीस बांधावें

**चर्मभिश्चोपनद्धव्यः सलोमभिरपूतिभिः ।**
**उष्णवीर्यैरलाभे तु कौशेयाविकशाकटैः ॥ ३६ ॥**

पोटीस लावल्यानंतर त्यावर वास येत नसलेलें, केसांनीं युक्त व उष्णता ठेवणारें ह्मणजे आनूपादि प्राण्यांचें कातडें घेऊन त्याची पट्टी बांधावी. तें न मिळेल तर त्याऐवजीं रेशमी कापड किंवा कांबळ, फ्लनेल किंवा अशाच दुसऱ्या उबदार कापडाचा उपयोग करावा.

**रात्रौ बद्धं दिवा मुंचेत् मुंचेद्रात्रौ दिवा कृतम् ।**
**विदाहपरिहारार्थं स्यात्प्रकर्षस्तु शीतले ॥ ३७ ॥**

रात्रीं बांधलेली पट्टी दुसरे दिवशीं सकाळीं सोडावी व दिवसा बांधलेली रात्रीं सोडावी. याप्रमाणें केल्यानें, पट्टी बांधल्यापासून उष्णता उत्पन्न होऊन रक्तादिकांचा जो विदाह होतो तो शांत होतो. शीत कालांत, पट्टी, वर सांगितल्यापेक्षां जास्त वेळ राहिली तरी चालेल.

संकरः प्रस्तरो नाडी परिषेकोऽवगाहनम् ।
जेंताकोऽश्मघनः कर्षुः कुटी भूः कुंभिकैव च ॥ ३८ ॥
कूपो होलाक इत्येते स्वेदयंति त्रयोदश ।
तान् यथावत् प्रवक्ष्यामि सर्वानेवानुपूर्वशः ॥ ३९ ॥

स्वेदाचे एकंदर, १ संकर, २ प्रस्तर, ३ नाडी, ४ परिषेक ५ अवगाहन. ६ जेंताक, ७ अश्मघन, ८ कर्षु, ९ कुटी, १० भू, ११ कुंभिक, १२ कूप व १३ होलाक असे तेरा प्रकार आहेत. त्या सर्वांचें क्रमानें वर्णन करितों.

तत्र वस्त्रांतरितैरवस्त्रांतरितैर्वा पिंडैर्यथोक्तैरूपस्वेदनं संकरस्वेद इति विद्यात् ॥ ४० ॥

औषधें वाटून त्यांचे गोळे (पिंड) तयार करून ते फडक्यांत गुंडाळून, अग्नीवर ऊन करून त्यानें रुग्ण अंगास शेकून घाम आणणें यास संकरस्वेद ह्मणतात. औषधांचे पिंड करून ते फडक्यांत न गुंडाळतां त्यांनीं तसेंच शेकलें तरी त्याचा याच लक्षणांत समावेश होतो.

शूकशमीधान्यपुलाकानां वेशवारपायसकृशरोत्कारिकादीनां वा प्रस्तरे कौशेयाविकोत्तरप्रच्छदे पञ्चाङ्गुलोरुबुकार्कपत्रप्रच्छदे वा स्वभ्यक्तसर्वगात्रस्य शयानस्योपरिस्वेदनं प्रस्तरस्वेद इति विद्यात् ॥ ४१ ॥

---

१ प्रायः पोटीस तयार केलें ह्मणजे तें फडक्यांत न गुंडाळतां ऊन ऊन आहे तोंवर त्यानें पीडित भागास वरवर शेकून तें जरा निवलें ह्मणजे मग बांधण्याचा प्रघात आहे.

तीळ, उडीद, मूग वगैरे शेंगांत होणारीं धान्यें; तांदूळ, गहूं, वगैरे कणसांत होणारीं धान्यें व तुच्छ धान्यें हीं, किंवा वेशवार[1], पायस[2], कृशर, उत्कारिका[3] वगैरे पूर्वीं सांगितलेल्या कृतीप्रमाणें तयार करून बिछान्यासारखीं पसरून त्यावर रेशमी किंवा लोंकरीचें वस्त्र अथवा पांढरा एरंड, तांबडा एरंड व रुईचीं पानें अंथरून त्यावर रोग्यास त्याच्या सर्वांगास खूप तेल लावून निजविलें असतां जो स्वेदक्रिया होते तीस प्रस्तरस्वेद असें ह्मणतात.

स्वेदनद्रव्यानां पुनर्मूलफलपत्रभंगादीनां मृगशकुनपिशितशिरःपदादीनामुष्णस्वभावानां वा यथार्हमम्ललवणस्नेहापसंहितानां मूत्रक्षीरादीनां वा कुंभ्यां बाष्पमनुद्वमन्त्यामुत्क्कथितानां नाड्या शरेषिकावंशदलकरंजार्कपत्रान्यतमकृतया गजाग्रहस्तसंस्थानया व्यामदीर्घया व्यामार्धदीर्घया वा व्यामचतुर्भागाष्टभागमूलाग्रपरिणाहस्रोतसा सर्वतो वातहरपत्रसंवृतछिद्रया द्विस्त्रिर्वा विनामितया वातहरसिद्धस्नेहाभ्यक्तगात्रो बाष्पमुपहरेत् बाष्पो ह्यनूर्ध्वगामी विहितचंडवेगस्त्वचमविदहन् सुखं स्वेदयतीति नाडीस्वेदः ॥ ४२ ॥

स्वेदकारक द्रव्यांचीं मुळें, फळें, पानें व कोंब अथवा मृग, गीध वगैरे उष्ण प्राण्यांचें मांस, मुंडकी वगैरे किंवा योग्य प्रकारचीं अम्लें, लवणें, स्निग्ध द्रव्यें, मागें सांगितलेलीं मूत्रें व दुध वगैरे द्रव्यें, हीं एका भांड्यांत घालून (कढतांना) वाफ न जाईल अशा रीतीनें कढवावींत. नंतर तिरकांडें, बांबू, करंज व रुई यांचीं पानें यापैकीं कशाची तरी एक नळी करावी. तिची जाडी हत्तीच्या सोंडेबरोबर असून लांबी एक

1 शिजलेलें पीठ, मांस, गूळ, तूप, सुंठ, मिरीं व पिंपळी यांचें मिश्रण.
2 पायस व कृशर यांचा खुलासा मागें पहा.
3 उडीद वगैरेचें पीठ शिजवून त्याच्या चपात्यासारख्या करतात त्या.

किंवा अर्धी वांव असावी. तिच्या खालच्या टोंकाचा घेर एक हात असावा व दुसऱ्या वरच्या टोंकाचा घेर एक किंवा अर्धा हात असावा. त्या नळीचीं सर्व छिद्रें वातनाशक औषधींच्या पानांनीं बंद करून टाकावीं. नळी दोन तीन ठिकाणीं बांकदार असावी. नंतर रोग्याच्या अंगास वातनाशक औषधांनीं सिद्ध केलेलें तेल चोळून, वरील नळीचें एक टोंक भांड्यास लावावें व दुसरें टोंक रोग्याच्या अंगास लावून त्यांतून त्यास त्या काढ्याचा वाफारा लागूं द्यावा. नळी लांब व दोन तीन ठिकाणीं बांकदार असल्यामुळें वाफ एकदम जोरानें वर न येतां त्या ठिकाणीं थांबून थांबून येईल. त्यायोगानें तिचा तीव्र वेग कमी होऊन अंगाची चामडी जळण्याचें भय रहात नाहीं व स्वेदन सुखानें होतें.

वातिकोत्तरवातिकानां पूनर्मूलादीनामुत्क्वथैः सुखोष्णैः कुंभीर्वार्षिलिकाः प्रणाडीर्वा पूरयित्वा यथार्हसिद्धस्नेहाभ्यक्तगात्रं वस्त्रावच्छन्नं परिषेचयेदिति परिषेकः ॥ ४३ ॥

वातनाशक व वातप्रधान वातकफ द्विदोषनाशक वनस्पतींचीं मुळें, फळें वगैरे घेउन त्यांचा पाण्यांत काढा करावा, व तो एका कळशींत किंवा ज्यास कारंज्यासारखीं पुष्कळ बारीक बारीक छिद्रें असतील अशा भांड्यांत अगर बांबूच्या नळ्या वगैरेंत भरून ठेवावा. नंतर वातहारक तेल रोग्याच्या सर्वांगास चोळून त्याच्या अंगावर वस्त्र पांघरूं घालावें. आणि मग वरून, भांड्यांत ठेविलेला काढा रोग्यास सहज सोसण्याजोगा उष्ण राहिला असें पाहून, त्यानें हळूहळू स्नान घालावें. याचें नांव परिषेकस्वेद आहे.

वातहरोत्क्वाथक्षीरतैलघृतपिशितरसोष्णसलिलकोष्ठकावगाहस्तु यथोक्त एवावगाहः ॥ ४४ ॥

वातहारक द्रव्यांचा काढा करून त्यांत दूध, तेल, तूप, व मांसाचा

१ चार हात. २ जशी हुक्क्याची नळी असते तद्वत्.

रस घालून तें सर्व मिश्रण ऊन पाण्यानें भरलेल्या मोठ्या भांड्यांत घालावें व रोग्यास त्या भांड्यांत बसून अंघोळ करण्यास लावावें. अशा प्रकारचे स्वेदास अवगाहस्वेद ह्मणतात.

अथ जेंताकं चिकीर्षुर्भूमिं परीक्षेत्–तत्र पूर्वस्यां दिश्युत्तरस्यां वा गुणवति प्रशस्ते भूमिभागे कृष्णमृत्तिके सुवर्णमृत्तिके वा परीवापपुष्करिण्यादीनां जलाशयानामन्यतमस्य कूले दक्षिणे पश्चिमे वा सूपतीर्थे समसुविभक्तभूमिभागे सप्ताष्टौ वाऽरत्नीरुपक्रम्योदकात् प्राङ्मुखमुदङ्मुखं वाऽभिमुखतीर्थं कूटागारं कारयेत् उत्सेधविस्तारतः परमरत्नीः षोडश समन्तात्सुवृत्तं मृत्कर्मसंपन्नमनेकवातायनम् अस्य कूटागारस्यान्तः समन्ततो भित्तिमरत्नीविस्तारोत्सेधां पिण्डिकां कारयेदाकपाटात् । मध्ये चास्य कूटागारस्य चतुष्किष्कुमात्रपुरुषप्रमाणं मृण्मयं कुन्दसंस्थानं बहुसूक्ष्मछिद्रमङ्गारकोष्ठकस्तंभं सपिधानं कारयेत् । तच्च खादिराणामाश्वकर्णादीनां वा काष्ठानां पूरयित्वा प्रदीपयेत् । स यदा जानीयाः साधु दग्धानि काष्ठानि गतधूमानि अवतप्तं च केवलमग्निना तदग्निगृहं स्वेदयोग्येन चोष्मणा युक्तमिति तत्रैनं पुरुषं वातहराभ्यक्तगात्रं वस्त्रावच्छन्नं प्रवेशयेत् । प्रवेशयंश्चैनमनुशिष्यात्–"सौम्य! प्रविश कल्याणायारोग्याय चेति । प्रविश्य चैनां पिण्डिकामधिरुह्य पार्श्वाभ्यां यथासुखं शयीथाः । न च त्वया स्वेदमूर्च्छापरीतेनापि पिण्डिकैषा विमोक्तव्याऽऽप्राणोच्छ्वासात् । भ्रश्यमानो ह्यतः पिंडिकावकाशात् द्वारमनधिगच्छन् स्वेदमूर्च्छापरीततया सद्यः प्राणान् जह्याः तस्मात्पिण्डिकामेनां न

कथंचन मुंचेथाः । त्वं यदा जानीयाः–विगताभिष्यंद-
मात्मानं सम्यक्प्रस्नुतस्वेदपिच्छं सर्वस्रोतोविमुक्तं लघु-
भूतमपगतविबंधस्तंभसुप्तिवेदनमिति ततस्तां पिण्डिकाम-
नुसरन् द्वारं प्रपद्येथाः निष्क्रम्य च न सहसा चक्षुषोः
परिपालनार्थं शीतोदकमुपस्पृशेथाः अपगतसन्तापक्लम-
स्तु मुहूर्तात् सुखोष्णेन वारिणा यथान्यायं परिषिक्तो-
ऽश्नीयाः " इति जेन्ताकः स्वेदः ॥ ४५ ॥

जेंताक तयार करण्यापूर्वी जागेची परीक्षा करावी. जेंताकाकरितां जागा पहाणें ती गांवाच्या पूर्व किंवा उत्तर दिशेस असावी. तिचा रंग काळा किंवा सुवर्णासारखा असावा. ती तलांव, नदी किंवा पुष्करणी वगैरे जलाशयाच्या[१] दक्षिण किंवा पश्चिम बाजूस, सपाट, गुणयुक्त[२] व प्रशस्त[३] असून तिच्या जवळच एखादें तीर्थ असावें. अशा जागेंत पाण्यापासून सात किंवा आठ हातांच्या अंतरावर पूर्वाभिमुख, उत्तराभिमुख किंवा तीर्थाभिमुख अशी एक वर्तुलाकार खोली करावी. तिची उंची व घेर सोळा हात असावीं. तीस वायुसंचारार्थ बरींच छिद्रें (खिडक्या) ठेवावीं व इच्या भिंती वगैरेस मातीचा चांगला गिलावा करावा. खोलीच्या आंत सभोंवार दरवाज्याची जागा सोडून एक हात रुंद व एक हात उंच असा ओटा बांधावा. खोलीच्या मध्यभागीं चार हात रुंद व एक पुरुष उंच असें खांबाच्या आकाराचें मातीचें कुंड ( भट्टी ) बनवावें. त्यास पुष्कळशीं बारीक बारीक छिद्रें असून तोंडावर झांकण असावें. त्यांत

---

१ जेंताक जलाशयाच्या जवळ बनविण्यांत दोन तीन हेतु आहेत. प्रथम घामानें व उष्णतेनें व्याकुळ झालेल्या रोग्यास जवळ पाणी आहे हें पाहून एक प्रकारचें समाधान वाटेल. दुसरा हेत हा आहे कीं, जर कदाचित् स्वेदाचा अतियोग झाला तर त्याचा प्रतीकार करावयासही सुगम होईल. तसाच तिसरा हेतु असा कीं जेंताक बनविण्यास पाणी जवळ असल्यानें सोयस्कर पडेल.

२ प्ररोहादियुक्त ३ क्षार, अंगारादिरहित

खैर किंवा साग वगैरेचीं लांकडें भरून तीं पेटवावीं. सर्व लांकडें चांगलीं जळून गेलीं. त्यांतून धूर नाहींसा झाला व तो खांब स्वेदनक्रियेस पाहिजे तसा उष्ण झाला ह्मणजे रोग्याच्या अंगास वातहारक तेलांचें मर्दन करून, वस्त्रानें आच्छादन करून खोलींत सोडावा. व आंत प्रवेश करीत असतां त्यास येणेंप्रमाणें उपदेश करावा. "हे सौम्य! तूं या खोलींत प्रवेश कर ह्मणजे तुला आरोग्य प्राप्त होऊन तुझें कल्याण होईल. आंत जातांच या ओट्यावर चढून तेथें तुझ्या सुखास येईल त्या कुशीवर नीज. तुला घामानें मूर्च्छा आली तरी श्वासोच्छ्वास चालू असे तोंपर्यंत हा ओटा तूं सोडूं नको. तूं ओट्यावरून उतरून बाहेर येऊं लागलास व जर कदाचित् तुला दरवाजा सांपडला नाहीं तर घामानें मूर्च्छा येऊन तूं प्राणास अंतरशील. करितां कांहीं झालें तरी हा ओटा तूं सोडूं नको. ज्यावेळीं तुला असें वाटेल कीं, आतां शरीरांतील सर्व दोष निघून गेले आहेत, सर्वांगांतून दरदरून घाम येऊन निथरून गेला आहे, सर्व शिरा मोकळ्या झाल्या आहेत, शरीर हलकें झालें आहे, मलावरोध दूर झाला आहे, अंगांतील जडपणा व बधिरता नाहींशी झाली आहे व वेदनाही बंद झाल्या आहेत, त्यावेळीं, त्या ओट्यावरून हळू हळू दाराकडे येऊन बाहेर पडावें. बाहेर पडल्या बरोबर लागलेच थंड पाण्यांत प्रवेश करूं नये. तसें सहसा केल्यानें शरीरांतील उष्णता थंड पाण्यानें एकदम परिहत होऊन डोळ्यांस इजा पोंचवील. दोन घटका थांबून अंगाचा ताप व थकवा दूर झाला ह्मणजे अंगास तेल वगैरे लावून कोमट पाण्यानें स्नान करून जेवावें. हा जेन्ताकस्वेदाचा विधि सांगितला.

शयानस्य प्रमाणेन घनामश्ममयीं शिलाम् ।
तापयित्वा मारुतघ्नैर्दारुभिः संप्रदीपितैः ॥ ४६ ॥
व्यपोह्य सर्वानंगारान् प्रोक्ष्य चैवोष्णवारिणा ।
तां शिलामथ कुर्वीत कौषेयाविकसंस्तराम् ॥ ४७ ॥

तस्यां स्वभ्यक्तसर्वांगः स्वपन् स्विद्यति ना सुखम् ।
कौरवाजिनकौशेयप्रावाराद्यैः सुसंवृतः ।
इत्युक्तोऽश्मघनस्वेदः कर्षूस्वेदः प्रवक्ष्यते ॥ ४८ ॥

रोग्याच्या बरोबरीच्या लांबीची एक दगडाची जाड शिळा घेऊन ती वातनाशक सर्पण जळून तापवावी. सर्व लांकडें जळून निखारे झाल्यावर ते काढून ती शिळा ऊन पाण्यानें धुवावी. मग त्यावर रेशमी अगर लोंकरीचें वस्त्र घालून रोग्याचे सर्वांगास खूप तेल लावून त्यास निजवावें व वरून हरणाचें कातडें, किंवा कापसाची अगर लोकरीची दुलई पांघरूण घालावी म्हणजे फार सुखानें घाम येतो. याप्रमाणें अश्मघनस्वेद सांगितला. आतां पुढें कर्षूस्वेदाचें वर्णन करितों.

खानयेच्छयनस्याधः कर्षूं स्थानविभागवित् ।
दीप्तैरधूमैरंगारैस्तां कर्षूं पूरयेत्ततः
तस्यामुपरि शय्यायां स्वपन् स्विद्यति ना सुखम् ॥ ४९ ॥

स्थानविभाग जाणणाऱ्या वैद्यानें अथवा अन्य मनुष्यानें जमिनींत असा एक खळगा खणावा कीं, जो तळीं विस्तृत असून तोंडाशीं अगदीं लहान असेल व तो धूर निघून गेलेल्या रसरशीत निखाऱ्यांनीं भरावा. नंतर त्यावर बिछाना टाकून रोग्यास निजवावें म्हणजे सुखानें स्वेदन होतें.

अनत्युत्सेधविस्तारां वृत्ताकारामलोचनाम् ।
घनभित्तिं कुटीं कृत्वा कुष्ठाद्यैः संप्रलेपयेत् ॥ ५० ॥
कुटीमध्ये भिषक् शय्यां स्वास्तीर्णां चोपकल्पयेत् ।
प्रावाराजिनकौशेयकुथकंबलगोलकैः ॥ ५१ ॥
हसन्तिकाभिरंगारपूर्णाभिस्तां च सर्वशः ।
परिवार्य तामारोहेदभ्यक्तः स्विद्यते सुखम् ॥ ५२ ॥

फार उंच किंवा विस्तीर्ण नसलेली, वर्तुलाकृति, खिडकी, जाळी, किंवा अन्य छिद्रें नसलेली, जाड भिंतीची, अशी एक खोली करून ती कुष्ठ वगैरे उष्ण सुगंधि द्रव्यांनीं लिपवावी. नंतर वैद्यानें खोलीच्या मध्य भागीं व्याघ्रचर्म, मृगचर्म, रेशमीवस्त्र, चित्रविचित्र पृष्ठास्तरणें, कांबळीं व अशाच प्रकारच्या इतर ऊबदार वस्त्रांचा बिछाना घालवावा. खोलीच्या आंत चोंहोंकडे निखाऱ्यांनीं भरलेल्या शेगड्या ठेवाव्या आणि रोग्याच्या सर्वांगास वातहारक तेल लावून त्यास उक्त बिछान्यावर निजवावें. ह्मणजे सुखानें स्वेदन होतें. यास कुटीस्वेद ह्मणतात.

य एवाश्मघनस्वेदविधिर्भूमौ स एव तु ।
प्रशस्तायां निवातायां समायामुपदिश्यते ॥ ५३ ॥

जो विधि मागें अश्मघनस्वेदाचा सांगितला तोच विधि भूस्वेदाचाही आहे. भेद इतकाच कीं, भूस्वेदांत शिळेच्या ऐवजीं प्रशस्त, निवात व सपाट अशी जमिन लागते.

कुम्भीं वातहरक्वाथपूर्णां भूमौ निखानयेत् ।
अर्द्धभागं त्रिभागं वा शयनं तत्र चोपरि ॥ ५४ ॥
स्थापयेदासनं वापि नातिसान्द्रपरिच्छदम् ।
अथ कुंभ्यां सुसंतप्तान्प्रक्षिपेदयसो गुडान् ॥ ५५ ॥
पाषाणांश्चोष्मणा तेन तत्स्थः स्विद्यति ना सुखम् ।
सुसंवृताङ्गः स्वभ्यक्तः स्नेहैरनिलनाशनैः ॥ ५६ ॥

वातनाशक द्रव्यांचा काढा करून तो एका गंगाळासारख्या रुंद तोंडाच्या भांड्यांत भरून तें भांडें अर्धे किंवा तिसरा हिस्सा जमिनींत पुरावें. त्यावर बेताच्या जाडीचा बिछाना[1] किंवा आसन टाकून त्यावर,

---

१ एकंदर विधिवरून पाहिलें असतां हा बिछाना लहानशा बाजेवर असला पाहिजे. कारण जमिनीवर घातला असतां काढ्याच्या भांड्यांत लोखंडाचे तुकडे वरचेवर टाकतां येणार नाहींत.

रोग्याच्या अंगास वातनाशक तेलांचें मर्दन करून सर्वांगावर चांगलें पांघरूण घालून, त्यास बसवावें. नंतर काळ्याच्या भांड्यांत लोखंडाचे किंवा दगडाचे गोळे, अग्नींत लाल होईपर्यंत तापवून वरचेवर टाकीत असावें. त्यायोगानें वाफ निघून त्यापासून रोग्याचें स्वेदन होईल. याचें नांव कुंभिक स्वेद असें आहे.

कूपं शयनविस्तारं द्विगुणाश्चापि वेधतः।
देशे निवाते शस्ते च कुर्यादन्तः सुमार्जितम् ॥ ५७॥
हस्त्यश्वगोखरोष्ट्राणां करीषैर्दग्धपूरिते।
स्ववच्छन्नः सुसंस्तीर्णेऽभ्यक्तः स्विद्यति ना सुखम् ॥ ५८॥

रोग्यास निजतां येईल इतक्या रुंदीचा व रुंदीच्या दुप्पट खोल असा एक खळगा, चांगल्या निवांत जागीं खणून तो आंतून सारवून व लिपून स्वच्छ करावा. नंतर त्यांत हत्ती, घोडा, गाय, गाढव व उंट यांच्या गोवऱ्या भरून त्या पेटवून द्याव्या. त्या जळून खळगा तप्त झाला ह्मणजे त्यावर बिछाना टाकून अंगास तेल चोळून व वस्त्रानें चांगलें झांकून रोग्यास बसवावें. ह्मणजे सुखपूर्वक स्वेदन होतें. यास कूपस्वेद ह्मणतात.

धीतीकान्तु करीषाणां यथोक्तानां प्रदीपयेत्।
शयनान्तःप्रमाणेन शय्यामुपरि तत्र च ॥ ५९ ॥
सुदग्धायां विधूमायां यथोक्तामुपकल्पयेत्।
स्ववच्छन्नः स्वपंस्तत्राभ्यक्तः स्विद्यति ना सुखम् ॥ ६०॥
होलाकस्वेद इत्येष सुखः प्रोक्तो महर्षिणा।
इति त्रयोदशविधः स्वेदोऽग्निगुणसंश्रयः ॥ ६१ ॥

हत्ती, घोडा, गाय, गाढव व उंट यांच्या गोवऱ्या रोग्यांच्या बिछान्याच्या लांबीबरोबर ओट्यासारख्या रचून त्यांस आग लावून द्यावी. त्या चांगल्या जळून त्यांतील धूर नाहींसा झाला ह्मणजे त्या जागेवर

१ हा डॉक्टरांच्या स्टीम बाथबरोबर ( Steam Bath ) जुळतो.

एक लहानशी बाज टाकून त्यावर पातळसा बिछाना घालावा आणि रोग्याच्या सर्वांगास वातहारक तेलाचें मर्दन करून, वस्त्रानें आंग झांकून, त्यावर निजवावें ह्मणजे सुखानें स्वेदन होतें. हा होलाकस्वेद होय. हा फार सुखाचा असतो. याप्रमाणें अग्नीच्या उष्णतेपासून होणाऱ्या स्वेदनक्रियेचे तेरा प्रकार सांगितले.

व्यायाम उष्णसदनं गुरुप्रावरणं क्षुधा ।
बहुपानं भयक्रोधावुपनाहाहवातपाः ।
स्वेदयन्ति दशैतानि नरमग्निगुणादृते ॥ ६२ ॥

व्यायाम ह्मणजे दण्ड, जोडी, कसरत वगैरे श्रमाचीं कामें करणें, बिनवाऱ्याच्या किंवा कोंडलेल्या जागेंत रहाणें, जाड व ऊबदार वस्त्रें घालणें, भूक लागणें, फार मद्यपान करणें, भय, क्रोध, पोटीस[1], युद्ध ( भांडण ) व उन्ह या दहा प्रकारांनीं अग्नीच्या उष्णतेवांचून स्वेदन होतें.[2]

इत्युक्तो द्विविधः स्वेदः संयुक्तोऽग्निगुणैर्न च ।
एकाङ्गसर्वाङ्गगतः स्निग्धो रूक्षस्तथैव च ।
इत्येतद्द्विविधं द्वन्द्वं स्वेदमुद्दिश्य कीर्तितम् ॥ ६३ ॥

याप्रमाणें अग्निसंबंधाचे व अनग्निक; सङ्करनाड्यादि एकाङ्गाचे व प्रस्तरजेन्ताकादि सर्वाङ्गाचे आणि वातावर स्निग्ध व कफावर रुक्ष असे स्वेदाचे परस्परविरुद्ध दोन दोन भेद दाखविले आहेत.

स्निग्धस्वेदैरुपक्रम्यः स्विन्नः पथ्याशनो भवेत् ।
तदहः स्विन्नगात्रस्तु व्यायामं वर्जयेन्नरः ॥ ६४ ॥

---

१ पोटीस दोन प्रकारचें सांगितलें आहे. साग्निक व निरग्निक. साग्निक पोटिस मागें संकरस्वेद सांगितला तेंच होय. 'कोलंकुलत्थाःसुरदारुरास्नाः' इत्यादिक अरग्वधीयांत सांगतलेंच आहे. या ठिकाणा निरग्निक पोटीस ग्रहण करावयाचें. २ या प्रकारांत अग्नीचा साक्षात् संबंध नसतो हा याचा भावार्थ आहे.

ज्या दिवशीं स्निग्ध स्वेद द्यावयाचा असेल त्या दिवशीं रोग्यानें पथ्यानें भोजन करावें आणि स्वेदनक्रिया झाल्यावर त्या दिवशीं व्यायाम अगदीं वर्ज करावा.

स्वेदो यथा कार्यकारो हितो येभ्यश्च यद्विधः ।
यत्र देशे यथायोग्यो देशो रक्ष्यश्च यो यथा ॥ ६५ ॥
स्विन्नातिस्विन्नरूपाणि तथाऽतिस्विन्नभेषजम् ।
अस्वेद्याः स्वेदयोग्याश्च स्वेदद्रव्याणि कल्पना ॥ ६६ ॥
त्रयोदशविधः स्वेदो विना दशविधोऽग्निना ।
संग्रहेण च षट् स्वेदाः स्वेदाध्याये निदर्शिताः ॥ ६७ ॥
स्वेदाधिकारे यद्वाच्यमुक्तमेतन्महर्षिणा ।
शिष्यैस्तु प्रतिपत्तव्यमुपदेष्टा पुनर्वसुरिति ॥ ६८ ॥

इत्यग्निवेशकृते तन्त्रे चरकप्रतिसंस्कृते स्वेदाध्यायो

नाम चतुर्दशोऽध्यायः ।

कशा प्रकारें स्वेदन केलें असतां तें हितकारक होतें, कोणत्या विकारावर कोणत्या प्रकारचें स्वेदन करावें, शरीराच्या कोणत्या भागाचें कशा रीतीनें स्वेदन करावें, स्वेदनकालीं कोणत्या भागाची कशी रक्षा करावी, योग्यस्वेद व स्वेदातियोगांचीं लक्षणें, अतियोगावर उपचार, स्वेदनास योग्य व अयोग्य रोगी, स्वेदकारक द्रव्यें व त्यांचे निरनिराळे कल्प, अग्निसंबंधी स्वेदाचे तेरा प्रकार, अनग्निक स्वेदाचे दहा प्रकार आणि स्वेदाचे मुख्य सहा भेद, इतक्या विषयांचें निरूपण या स्वेदाध्यायांत केलें आहे. या अध्यायांत महर्षि पुनर्वसूंनीं जें प्रतिपादन केलें आहे तें शिष्यांनीं ( वैद्यांनीं ) यथावत् समजून घेऊन त्याप्रमाणें वागावें.

चतुर्दशोऽध्यायः समाप्तः



# अथ पचदशोऽध्यायः

अथात उपकल्पनीयमध्यायं व्याख्यास्यामः । इति
ह स्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण उपकल्पनीय अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

इह खलु राजानं राजमात्रमन्यं वा विपुलद्रव्यं सम्भृ-
तसम्भारं वमनं विरेचनं वा पाययितुकामेन भिषजा
प्रागेवौषधपानात्सम्भारा उपकल्पनीया भवन्ति सम्य-
क्चैव हि गच्छत्यौषधे प्रतिभोगार्थाः व्यापन्ने चौषधे
व्यापदः परिसंख्याय प्रतीकारार्थाः । न हि सन्निकृष्टे
काले प्रादुर्भूतायामापदि सत्यपि क्रयाक्रये सुकरमा-
शुसम्भरणमौषधानां यथावत् ॥ २ ॥

राजास अथवा जहागीरदार वगैरे तशाच प्रकारच्या योग्यतेच्या, इतर गृहस्थांस किंवा शेटसावकारादि श्रीमान् मनुष्यांस, सारांश सर्व-साधनसंपन्न अशा कोणत्याही रोग्यास वमन किंवा विरेचन द्यावयाचें असल्यास, वैद्यानें, औषध देण्यापूर्वीं, संशोधनसंबंधी उपयोगी पडणारें ( पुढें वर्णन केलें जाणारें ) सर्व प्रकारचें साहित्य—मुख्यत्वें करून औ-

१ 'स्नेहस्वेदोपपन्नस्य संशोधनमनन्तरम्' या पूर्वोक्तसंबंधाप्रमाणें पूर्वीच्या दोन अध्यायांत स्नेहन स्वेदनाविषयीं निरूपण केलें असल्यामुळें ही उपकल्पना शोधनां-विषयीं समजावी.

षधादिक--जमा करून त्यांची व्यवस्था लावून ठेवावी. ह्मणजे दिलेलें औषध जर चांगलें लागू पडलें व पुन्हां द्यावयाचें असले तर देतां यावें. तसेंच त्यापासून कांहीं अपाय झाल्यास तोही समजून घेऊन दूर करितां यावा. अकस्मात् एखादा व्याधि उत्पन्न झाल्यास, जवळ विकत घेण्यास द्रव्य असूनही सर्व आवश्यक औषधें तत्काल एकत्र होणें फार दुर्घट असतें.

इत्येवं वादिनं भगवन्तमात्रेयमाग्निवेश उवाच-"ननु भगवन्नादावेव ज्ञानवता तथा प्रतिविधातव्यं यथा प्रतिविहिते सिद्धेदेवौषधमेकान्तेन। सम्यक्प्रयोगनिमित्ता हि सर्वकर्मणां सिद्धिरिष्टा व्यापच्चासम्यक्प्रयोगनिमित्ता। अथ सम्यगसम्यक्च समारब्धं कर्म सिध्यति व्यापद्यते वाऽनियमेन तुल्यं भवति ज्ञानमज्ञानेति" ॥ ३ ॥

याप्रमाणें आत्रेय ऋषींचें भाषण ऐकून अग्निवेश ह्मणाले, हे भगवन्, मला असें वाटतें कीं, ज्ञानवान् वैद्यानें प्रारंभींच औषधादिकांची अशी योजना करावी कीं, त्याचा खात्रीनें गुणच येईल. औषधाची योजना बरोबर झाल्यास गुण आला पाहिजे आणि ती चुकल्यास त्यापासून अपाय झाला पाहिजे. हा नियम नेहमीं न राहतां जर कधीं औषधाचा बरोबर प्रयोग झाला असूनही त्यापासून अपाय होईल व अयोग्य प्रयोग झाला असतां गुण येईल तर आयुर्वेदाचें ज्ञान असून नसून सारखेंच समजलें पाहिजे. कारण योग्य व अयोग्य प्रयोगांत कांहीं अंतर रहात नाहीं.

तमुवाच भगवानात्रेयः-"शक्यं तथा प्रतिविधातुमस्माभिरस्मद्विधैर्वाऽप्यग्निवेश यथा प्रतिविहिते सिध्येदेवौषधमेकान्तेन तत्र प्रयोगसौष्ठवमुपदेष्टुं यथावत्। न हि कश्चिदस्ति य एतदेवमुपदिष्टमुपधारयितुमुत्सहेदुपधार्य वा तथा प्रतिपत्तुं प्रयोक्तुं वा । सूक्ष्माणि हि

# धुपणीवर चमत्कारिक औषध,

धुपणीचा प्रकार साधारण नाहीं! कित्येक स्त्रिया फार फार भयंकर रीतीनें दुःख भोगतात!

कंबर दुखते; तांबडें किंवा पांढरें देखील–पाण्यासारखें किंवा एखादीस थोडें पुवासारखें योनींतून पाझरतें; एखाद्या स्त्रीस हा स्राव अतोनात होऊन, तिची फार चमत्कारिक स्थिति होते; तिला निरनिराळे अनेक रोग झालेले दिसून, भलतेच उपचार करीत असल्यानें मूळ रोग बाजूस ठेऊन भलतेच उपचार करीत असल्यानें मूळ रोग फारच फैलावतो; आणि **कित्येक स्त्रिया बिचाऱ्या फुकट प्राणास मुकतात!**

मुख्य जबाबदारी ही घेतली पाहिजे कीं, स्त्रियांना खरें काय झालें आहे? आणि नंतर त्याचा योग्य उपचारानें प्रतिकार करावा.

पोट दुखतें; अन्न पचत नाहीं; इत्यादि विकार धुपणीनेंही होतात. पण तिचा विचार न करितां औषध दिल्यानें '**काऱ्याचा नायटा**' याप्रमाणें दुखणें विकोपास जातें.

लाजेनें व कोणी स्त्रिया गैरसमजुतीनें–धुपणीचा विकार बाजूस ठेऊन, वर लिहिल्याप्रमाणें चुका करतात. किंवा उपचारांतही चूक होते.

योनींत किंवा ऋतु जाण्याच्या मार्गावर बिघाड होतो. कुठेंतरी हा बिघाड होतो, आणि कित्येक वेळीं उपचारांत यांची दादच घेत नाहींत! यावर हें औषध फार उत्तम आहे. डबीची किं. १॥ रु. टपालखर्च शिवाय.

---

मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक्कार्यालयांत मिळणाऱ्या

## विक्रीच्या पुस्तकांची यादी.

**वनौषधी–गुणादर्श.**—भाग १ ला १२ आणे; दुसरा १ रु.; तिसरा १। रु.; चवथा १॥ रु.; पांचवा १। रु; व सहावा १२ आणे.

**सार्थ श्रीचरकसंहिता.**—सूत्रस्थान पूर्वार्ध २ रु., कल्पस्थान १४ आणे, निदानस्थान १४ आणे, इंद्रियस्थान १२ आणे, सिद्धिस्थान १॥ रु., विमानस्थान १॥ रु. बाकीचीं स्थानें छापत आहेत.

**वृहन्निघंटु.**—बावीस तेवीस भाषेंतलीं औषधांचीं नांवें व विशेष माहिती. किंमत १॥ रु.

**औषधीगुणदोष.**—किंमत १॥ रु. सहा निघंटांतील एकंदर गुणदोष दिलेले आहेत.

**निघंटशिरोमणि.**—धन्वंतरी, राजनिघंट, शालिग्राम, मदनपालनिघंट, द्रव्यगुण-निघंट या सहा निघंटांतील सर्व विशेष भाग यांत सविस्तर संस्कृत श्लोकबद्ध आला आहे किंमत अवघी—भाग पहिला १२ आणे व दुसरा १॥ रु.

**सुबोध वैद्यक.**—संक्षिप्त रीतीनें सर्व रोगांची निदान—चिकित्सा यांत आहे. पूर्वार्ध किंमत ८ आणे. उत्तरार्ध १ रु.

**सार्थ हारीत संहिता**—महर्षि आत्रेयांनीं सांगितलेली. भाग १ ला किं. १। रु.

**गर्भारपण बाळंतपण.**—आर्य व इंग्लिश अशी दोन्ही प्रकारची, या विषयाची माहिती यांत फार उत्तम आहे. कि १ रु.

**नपुंसकमीमांसा व कामसंजीवन**—किंमत १॥ रु

**बृहत्पाकसंग्रह.**—पाक, अवलेह, शिरके, मुरंबे वगैरे माहिती किं १॥ रुपया.

**राजवैद्य, संग्रह पहिला.**—फारच उत्तम संग्रह आहे, किंमत १२ आणे.

**औषधीक्रिया.**—जरूरीचीं औषधें यांत आहेत. कि. ८ आणे.

**सार्थ योगशतक व सार्थवैद्यवल्लभ.**—किंमत प्रत्येकास ४ आणे.

**हल्लींचा वीर्यनाशक व स्थावर जंगम**—किंमत ३ आणे.

**औषधीवाद.**—महत्वाची निवडक माहिती यांत आहे किंमत २ रु.

**नाडीपरीक्षेचें महत्व.**—वैद्यसभेनें पसंत करून छापविलेला निबंध. किंमत ३ आणे.

**अश्वरोगपरिज्ञान.**—कि. पाऊण आणा.

**गोवैद्यक, गोपरीक्षा व प्राणिज औषधी.**—प्रत्येकास किंमत २ आणे.

**औषधी-मानपरिभाषा.**—किंमत १॥ रु.

**सार्थ ज्वरपराजय.**—( सचित्र. ) किंमत २ रु.

**रसवैद्य.**—रसायनवगैरेसंबंधीं माहिती. किंमत फक्त १२आणे.

**आयुर्वेदरहस्य** अथवा वाग्भटार्थविस्तार.—भाग १ ला, कि. १ रु.

**योगविज्ञान.**—योगशास्त्राची माहिती थोडक्यांत आणि सर्व प्रकारची आहे. किंमत फक्त ४ आणे.


**त्रिदोषविचार.**—संग्रह पहिला. त्रिदोषसंबंधानें ग्रंथांचे आधार, विचार व नवीन माहिती, विवेचनासह यांत आहे किंमत ४ आणे.

**सूचना.**—किंमतीशिवाय रीतीप्रमाणें टपालखर्च पडेल.

---

मुंबई:—" नेटिव्ह ओपिनियन " छा० छापविलें.

कै० ज्योतिर्विंद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



पुस्तक १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक २ रा.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषकार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥-श्रीवाग्भटः ।

सिंहसंक्रांति.-शके १८२४ श्रावण शु. १२ शनिवार. ता० १६ आगस्ट, सन १९०२.

## राज्याभिषेकोत्सव.

ता. २६ जून रोजीं, बादशहा एकाएकीं रोगानें ग्रस्त झाल्यानें, हुपार डाक्टरांनीं प्रयत्न करून ता० ९ आगस्ट रोजीं हा उत्सव करण्यास सवड करून दिली त्यांचे प्रथम आभार मानले पाहिजेत. सर्व कांहीं परमेश्वरावांचून होत नाहीं, त्या परमेश्वराचे आभार मानणें हें इष्ट; पण "ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम्" ही त्याची उक्ति, तेव्हां 'इहैव फलमश्नुते' या न्यायानें येथील बऱ्यावाइटावद्दल अत्रस्थांनाच बोलणें यांत कांहीं वाईट नाहीं; त्याप्रमाणें आह्मीं डाक्टरांचे आभार मानले आहेत. परमेश्वराची कृपा अशीच राहून व बादशाहांचें आयुरारोग्य वाढून, प्रजेचीं दुःखें नाश पावोत व बादशहांना त्यांचा आशीर्वाद चिरकाल मिळो हीच आमची इच्छा आहे.

## वैद्यकीय वृत्तसार.

**धर्मार्थ देशी दवाखाने.**—ठिकठिकाणीं होणें फार अगत्याचें आहे. मुंबई मुन्सिपालिटीनें आपल्या खर्चानें कां ठेऊं नयेत? पुण्यास तसा एक दवाखाना चालू आहे. श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वरींही आमच्या मार्फत एक चालू आहे. मुंबईस आयुर्वेदविद्यालयाचा धर्मार्थ दवाखाना चालू असून लहानसें हास्पिटलही साधारणपणें सुरू आहे. मुंबई वैद्यसभेमार्फत एक दवाखाना चालू होणार असें ऐकतों. होईल तेव्हां खरें. आमच्या लोकांची आत्मश्लाघा कमी होईल तेव्हांच अशा कामीं पूर्ण यश मिळणार!

**काष्ठौषधींचा संग्रह.**— खऱ्या वनस्पती चांगल्या स्थितींत मिळत नाहींत अशी सर्वत्र ओरड आहे ती दूर करण्यास अंशतः तरी साधन व्हावें ह्मणून लौकरच त्या बाबतींत मुंबईस एक संग्रह सुरू होणार आहे.

**वैद्यक–पूनापंच.**—वैद्यकसंबंधीं पुष्कळ दिवस प्रयत्न करीत असलेले रा. रा. वामन बाबाजी महाजन यांनीं पुण्यास सदरहु मासिकपुस्तक सुरू करण्याचें ठरविलें आहे. वैद्यकीय किरकोळ पण उपयुक्त माहिती देउन इतर मनोरंजक माहितीही देण्याची यांत सोय केली आहे. शिवाय एक वैद्यक पेढीची योजना आहे. विद्वान् लोकांच्या देखरेखीखालीं चालेल तर हा प्रयत्न फार चांगला आहे. रा. रा. महाजन यांना पुष्कळ दिवसांचा अनुभव असल्यानें आमची खात्री आहे कीं, त्यांनीं निश्चयानें काम चालविल्यास हें कार्य चांगलें नांवारूपास येईल.

---

## या अंकांतील विषयानुक्रम.

चरकसंहिता विमानस्थान–अनुक्रमणिका वगैरे

" सूत्रस्थान उत्तरार्ध पृष्ठें ५३–६४

श्रीशंकर.

'आर्यभिषक्' पुस्तकावली, अंक ३९.

# सार्थ श्रीचरक संहिता.

## विमानस्थान.

सम्पादक

आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.

चिकित्सितं वन्हिवेश स्वस्थातुरहितं प्रति ।

यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥–दृढबलः ।

सर्व अधिकार स्वाधीन ठेवले आहेत.

शके १८२४–सन १९०२.

किंमत १॥ रु.

मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

मुंबई,

"नेटिव ओपिनिअन छापखान्यांत" छापिलें.

# अर्पणपत्रिका.

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड,
जी. सी. एस्. आय्., सेनाखासखेल
समशेरबहादूर, राज्य बडोदें.

विद्याप्रसारार्थ महाराजसाहेबांचा अत्यंत
मार्मिक व स्तुत्य प्रयत्न, दया–दाक्षि-
ण्यादि सद्गुण, इत्यादिकांचा

आणि

तदाश्रयजन्यतेचा फलरूपी हा उपक्रम,
प्रेमादरविनयपुरःसर सादर
केला आहे.

# खुलासा.

सार्थ चरकसंहिता लौकर छापून निघावी ह्मणून ज्याप्रमाणें आश्रयदात्यांच्या वारंवार सूचना होत आहेत, त्याचप्रमाणें आमचीही उत्कट इच्छा आहे. तथापि अशा कांहीं अपरिहार्य अडचणी उत्पन्न होतात कीं, आमची इच्छा सफल होत नाहीं, व आश्रयदाते मात्र रुष्ट होतात. परंतु परमेश्वरकृपेनें अशाही अडचणींतून हें काम आतां बरेंच रूपास आलें आहे, आणि पुढील साधनेंही चांगलीं दिसून येत आहेत. परमेश्वरकृपा असेल तर बाकी राहिलेलें काम निघून, आश्रयदात्यांच्या रोषांतून आह्मीं लौकरच मुक्त होऊं, अशी उमेद आहे. शारीरस्थान, सूत्रस्थानाचा उत्तरार्ध व चिकित्सास्थान, इतकें छापून बाहेर पडणें आहे; आणि तें आमच्या उमेदीप्रमाणें लौकर बाहेर पडावें, अशी आह्मीं श्रीशंकरापाशीं प्रार्थना करितों.

कांहीं प्राचीन दुर्मिळ ग्रंथांचा तपास आह्मांस लागला आहे, व त्यांपैकीं एक ग्रंथ फारच उत्कृष्ट असल्यामुळें, तो हातीं घेण्याचा प्रयत्न आह्मीं चालविला आहे. ईश्वरकृपेनें तो हातीं आल्यास, चरकसंहिता पुरी झाली ह्मणजे, याप्रमाणेंच तोही ग्रंथ छापण्याचा विचार आहे.

सम्पादक.

मुंबई, ता० १९।१।१९०२.

# सार्थ श्रीचरक संहिता.

## विमानस्थान.

### विषयानुक्रमणिका.

### अध्याय पहिला–रसविमान.


| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| अध्यायाचा उपक्रम. ... ... ... ... | १ |
| चिकित्सा सुरू करण्यापूर्वी वैद्यानें समजून घ्यावयाच्या गोष्टी | " |
| रस व दोषांविषयीं संक्षिप्त वर्णन. ... ... ... | २ |
| रस व दोष यांच्या कशा प्रकारच्या संयोगांत काय परिणाम होतो | ३ |
| द्रव्यांचें गुणदोषनिरूपण. ... ... ... ... | ४ |
| कोणतीं द्रव्यें विशेष सेवन केलीं असतां अपकार करितात. ... | ५ |
| सात्म्यपदनिर्वचन. ... ... ... ... ... | ८ |
| सात्म्याचे प्रकार व त्यांचें वर्णन. ... ... ... | ९ |
| आहारविधीचीं आयतनें. ... ... ... ... | " |
| त्यांचें उदाहरणांसहित स्पष्टीकरण. ... ... ... | " |
| रोगी व निरोगी दोहोंस सामान्यतः हितकारक भोजनविधि.... | १२ |
| त्यांत सांगितलेल्या प्रत्येक विधिनिषेधरूपी नियमाचें अनुक्रमें गुणदोषनिरूपण. ... ... ... ... | १३ |
| अध्यायाचा उपसंहार. ... ... ... ... | १६ |


### अध्याय दुसरा–त्रिविधकुक्षीयविमान.


| | |
|---|---|
| अध्यायाचा आरंभ. ... ... ... ... | १७ |
| भोजनव्यवस्थेकरितां उदराच्या विभागांची कल्पना. ... | " |

| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| तदनुसार प्रमाणानें भोजन केल्यानें होणारे गुण. ... ... | १८ |
| यथाप्रमाण भोजन केल्याचीं लक्षणें. ... ... ... | " |
| अमात्रा-भोजनाचे प्रकार. ... ... ... ... | " |
| हीनमात्राभोजनाचे अवगुण ... ... ... ... | १९ |
| अतिभोजनाचे " ... ... ... ... | " |
| शुष्क व पेय पदार्थांचें कोणत्या आनुपूर्वीनें सेवन केलें असतां काय विकार होतात. ... ... ... ... | " |
| आम दूषित होण्याचीं कारणें ... ... ... | २० |
| यथाप्रमाण केलेलें भोजनहि न पचण्याचीं कारणें... ... | " |
| आमदोषाचे भेद. ... ... ... ... ... | २१ |
| विषूचिका व अलसक यांचें प्रतिपादन.... ... ... | " |
| आमविषाचें लक्षण. ... ... ... ... | २२ |
| अलसीभूत दूषित आमावर चिकित्सा. ... ... ... | " |
| विषूचिकेवर चिकित्साक्रम. ... ... ... ... | " |
| आमदोषावर चिकित्सा. ... ... ... ... | " |
| भक्ष्यभोज्यादि पदार्थांचें पचनस्थान कोणतें. ... ... | २४ |
| अध्यायाची समाप्ति. ... ... ... ... | " |


## अध्याय तिसरा—जनपदोध्वंसनीय विमान.


| | |
|---|---|
| अध्यायाचा आरंभ. ... ... ... ... | २५ |
| अध्यायांतील विषयांचें प्रास्ताविक निरूपण. ... ... | २५ |
| जनपदाचा उध्वंस करणारे रोग कसे होतात. ... ... | २७ |
| रोगोत्पादक वायूंचीं लक्षणें.... ... ... ... | " |
| " जलाचीं " ... ... ... ... | " |

| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| ,, देशाचीं ,, ... ... ... ... | २८ |
| ,, कालाचा ,, ... ... ... ... | २९ |
| त्यांच्या स्वाभाविक गौरवलाघवाचें विवेचन. ... ... | ,, |
| जनपदोध्वंसक रोगांपासून रक्षण करण्याचे धार्मिक उपाय. ... | ३० |
| अशा प्रकारचे दारुण रोगादि भयंकर प्रसंग अधर्ममूलक असतात याविषयीं सविस्तर विवेचन. ... ... ... | ३१ |
| रोगांची उत्पत्ति व मनुष्याचें आयुष्य क्षीण होण्याची मूलकारणपरम्परा. ... ... ... ... ... | ३४ |
| मनुष्याच्या आयुष्याचें प्रमाण कशावर अवलंबून असतें ... | ३६ |
| आयुष्याचें प्रमाण नियत आहे कीं अनियत याविषयीं प्रश्नप्रतिवचनरूपानें सिद्धान्त. ... ... ... | ३७ |
| कालमृत्यु व अकालमृत्यूविषयीं विवेचन. ... ... | ३९ |
| ज्वरावर ऊन पाणी प्यावयास देण्याचा हेतु. ... ... | ४१ |
| पित्तज्वरांत त्याचा निषेध. ... ... ... ... | ४२ |
| रोगांच्या हेतुविपरीत चिकित्सेचें विधान. ... ... | ,, |
| अपतर्पणाचे प्रकार. ... ... ... ... | ४३ |
| फार दोषयुक्त रोगांत वमनविरेचनादिकांची आवश्यकता. ... | ४४ |
| तीं कोणास देऊं नयेत. ... ... ... ... | ,, |
| अध्यायांत निरूपण केलेली विषयावली. ... ... | ४५–४६ |


---

## अध्याय चवथा–त्रिविधरोगविशेषविज्ञानीय.


| | |
|---|---|
| रोगांच्या परीक्षेचे प्रकार. ... ... ... ... | ४७ |
| त्या प्रकारांचें स्पष्टीकरण. ... ... ... ... | ,, |
| रोगतत्व जाणण्याकरितां रोग्याची परीक्षा कशी करावी. ... | ५० |

विषय. पृष्ठांक.
रोग्याच्या शरीरांतील रसाची आनुमानिक परीक्षा. ... ५१
रोग्याच्या आणखी कोणकोणत्या भावांची परीक्षा अनुमानानें केली जाते त्यांचें निरूपण. ... ... ... ५२-५४

## अध्याय पांचवा-स्त्रोतोविमान.

स्त्रोतसांविषयीं सामान्य निरूपण. ... ... ... ५५
मनुष्यशरीरांत किती प्रकारचे स्त्रोतस्समूह आहेत ? ... ५७
निरनिराळ्या स्त्रोतस्समूहाचीं मूळ इन्द्रियें व तीं दूषित झालीं असतां होणारीं लक्षणें. ... ... ... ... ५७
शरीरांतील धातुस्थानांचीं नांवें. ... ... ... ६१
त्यांच्या प्रकोपाचा परिणाम. ... ... ... ... ,,
निरनिराळीं स्त्रोतसें दूषित होण्याचीं निरनिराळीं कारणें. ... ६१
स्त्रोतसें दूषित होण्याचीं सामान्य कारणें व तीं दूषित झालीं असतां होणारीं लक्षणें.... ... ... ... ६४
स्त्रोतस्समूहाचा रंग व आकार. ... ... ... ६५
दूषित स्त्रोतसांची चिकित्सा. ... ... ... ६५-६६

## अध्याय सहावा-रोगानीक विमान.

निरनिराळ्या प्रकारांनीं रोगांचे भेद. ... ... ... ६७
शारीरिक व मानसिक दोष व त्यांचे विकार. ... ... ७०
दोष कुपित होण्याचीं मुख्य तीन कारणें. ... ... ७१
अनुबध्य व अनुबंध यांचीं लक्षणें. ... ... ... ,,
संसर्ग व सन्निपात यांचीं लक्षणें. ... ... ... ७२
शरीरांतील अग्नीचे भेद व त्यांचीं लक्षणें. ... ... ,,

विषय पृष्ठांक.

आपल्या अग्न्यनुकूल आहाराची आवश्यकता. ... ... ७९

तद्दोषप्रधान प्रकृतीच्या मनुष्यास तद्दोषजनित रोग झाल्यास ते तदितर दोषप्राय प्रकृतीच्या मनुष्यापेक्षां प्रबल होतात याविषयीं प्रतिपादन व कुपित झालेल्या दोषांवर चिकित्साक्रम. ... ... ... ... ... ७६-८१

---

## अध्याय सातवा-व्याधितरूपीय विमान.

रोग्यांचीं वरून दिसणारीं भ्रामक स्वरूपें व केवळ त्यावरच अवलंबून राहिल्यास वैद्याकडून चिकित्सेंत घडणारा अनर्थ. ८१

कृमींविषयीं वर्णन. ... ... ... ... ८३

त्यांपैकीं प्रत्येकाच्या उत्पत्तीचीं निरनिराळीं कारणें, त्यांचें स्वरूपवर्णन व उपद्रव. ... ... ... ... ८४

त्यांची चिकित्सा. ... ... ... ... ८७-९६

---

## अध्याय आठवा-रोगभिषग्जितीय विमान.

वैद्यक शास्त्राचें अध्ययन करूं इच्छिणाऱ्यानें प्रथम काय काय करावें. ... ... ... ... ... ९७

अध्ययनविधि. ... ... ... ... ... १००

अध्यापनविधि. ... ... ... ... ... १०१

अध्ययनास प्रारंभ करण्यापूर्वी करावयाचे विधि ... ... १०२

यश संपादन करण्याची इच्छा बाळगणाऱ्या वैद्यानें कसें वागलें पाहिजे.... ... ... ... ... १०४

विधिनिषेधरूपानें वैद्याचें इतिकर्तव्यवर्णन. ... ... १०६

संभाषणविधीचें निरूपण. ... ... ... ... १०९

| विषय. | पृष्ठांक. |
|---|---|
| अनुलोमसंभाषाविधि. ... ... ... ... | ११० |
| प्रतिवादीचें गुणदोषपरीक्षण.... ... ... ... | १११ |
| सभा किती प्रकारची असते. ... ... ... | ११२ |
| वाद कोणाशीं करूं नये व कोणाशीं करावा ? ... ... | ,, |
| आपल्यापेक्षां कमी योग्यतेच्या प्रतिवादीचा पराजय कसा करावा. ... ... ... ... ... | ११४ |
| वादमर्यादेचें लक्षण. ... ... ... ... | ११६ |
| वादविषयक पारिभाषिक शब्द. ... ... ... | ,, |
| त्यांचीं लक्षणें. ... ... ... ... ... | ११७ |
| चिकित्सोपयोगी दहा परीक्ष्य वस्तूंविषयीं प्रतिपादन. ... | १३६ |
| त्यांचें स्पष्टीकरण. ... ... ... ... | १४० |
| रोग्यास औषध देतांना त्याच्या बलाबलाच्या विचाराचें महत्त्व... | १४६ |
| प्रकृतिविचार. ... ... ... ... ... | १४७ |
| कफ व कफप्रधान प्रकृतीच्या मनुष्याचीं लक्षणें ... ... | १४८ |
| पित्त व पित्तप्रधान ,, ,, ,, ... ... | १४९ |
| वात व वातप्रधान ,, ,, ,, ... ... | १५० |
| विकृतीवरून रोग्याची परीक्षा. ... ... ... | १५२ |
| शरीरांतील सारांची संख्या व नांवें. ... ... ... | ,, |
| तत्तत्सारप्रधान मनुष्यांस ओळखण्याचीं लक्षणें ... ... | १५३ |
| शरीररचनेवरून रोग्याची परीक्षा. ... ... ... | १५७ |
| शरीराच्या प्रमाणावरून ,, ,, .... ... ... | ,, |
| निरनिराळ्या अङ्गावयवांचें प्रमाण. ... ... ... | १५८ |
| सात्म्यद्वारा परीक्षा. ... ... ... ... | १६० |
| सत्वाविषयीं निरूपण व तद्द्वारा रोग्याची परीक्षा ... ... | ,, |
| आहार व व्यायाम यांच्या शक्तीवरून परीक्षा. ... ... | १६२ |

| विषय. | पृष्ठांक. |
| --- | --- |
| वर्षांचे विभाग व त्यांचे गुणधर्म आणि तद्द्वारा परीक्षा ... | १६२ |
| संशोधनोपयोगी वर्षाचे विभाग–संशोधनास योग्यायोग्य ऋतु व त्याविषयीं सोपपात्तिक निरूपण. ... ... ... | १६४ |
| वमनकारक द्रव्यें. ... ... ... ... | १७० |
| रेचक द्रव्यें. ... ... ... ... ... | १७२ |
| आस्थापन प्रयोगांत उपयुक्त औषधांचे मधुरादि रसपरत्वें सह विभाग. ... ... ... ... ... | १७६ |
| अनुवासनबस्तीचीं द्रव्यें. ... ... ... ... | १८२ |
| शिरोविरेचनाचीं द्रव्यें. ... ... ... ... | १८३ |
| विमानस्थानांत वर्णन केलेल्या विषयांची परिगणना. ... | १८४ |

नंतर सुस्वभावाचे, शुचिर्भूत, स्वामिभक्त, चतुर, प्रामाणिक, औषध-उपचार करण्यांत कुशल, रोग्यांच्या सर्व प्रकारच्या कार्यांत प्रवीण, अनेक प्रकारचे पाक बनविण्यांत कुशल, स्नान घालणारे, अंग दाबणारे, हात देऊन उठवणारे, बिछाना बैठक घालणारे, औषधें वाटणारे असे निरनिराळ्या कामाचे नोकर ह्या घरांत आणून ठेवावे तसेंच गाणारे, वाद्यें वाजवणारे, स्तुति पाठक श्लोक–कथा–आख्यायिका–इतिहास–पुराणादि जाणणारे, दुसऱ्याच्या मनांतील अभिप्राय ओळखणारे आणि देशकालजाणणारे व रोग्यास प्रिय होतील असे सल्ला देणारे सभासद लोकही तेथें एकत्र करावे . त्याचप्रमाणें लाव, कपिंजल ( कवडा ), ससे हरणें–काळींहरणें–कालपुच्छ ( भेकर )–मृगमातृका ( मोठ्या पोटाची एक हरणाची जात आहे ) व मेंढे आणि निरोगी, गरीब स्वभावाची, जिवंत वासराची अशी दुभती गाय, तिचा गोठा, चारा व पाणी यांचा चांगला बंदोबस्त करून आणून ठेवावीं. तसेंच पाण्याचीं भांडीं, तांब्ये, कळशा, माठ, मडकीं, ताटें, तवे, कुम्भी, लहान तोंडाचे घट, कुंड्या सराव, पळ्या चट्या, वेळण्या, कढई, रवी, मृगचर्म, कापड, सूत, कापूस व लोंकरीचे बिछाने व आसनें, झाऱ्या, पिकदाण्या, गाद्या बिछान्यावरच्या चादरी, तकिये, बसणें उठणें, स्नेहन, स्वेदन, तैलमर्दन स्नान, उटीलावणें, वमन, विरेचन, आस्थापन व अनुवासन बस्ती, शिरोविरेचन, इत्यादि क्रिया सुखानें करण्यास लागणारीं साधनें, स्वच्छ धुतलेल्या उशा, अगदीं बारीक, खरखरीत व मध्यम असे वाटावयाचे पाटे, कुदळी, कुऱ्हाडी वगैरे हत्यारें, धूम्रनेत्र(हुक्याची नळी ) पश्चिम व उत्तर बस्तीच्या नळ्या, कुंचा, तराजू, माप, तूप तेल, वसा, मज्जा, मध, राई, मीठ, लांकडें, पाणी, मध, सीधु–सुरा–सौवीरक–तुषोदक–मैरेय व मेदक हीं मद्यें, दह्यांची निवळी, ताक, धान्यें, अम्लें व मूत्रें हीं जमा करावीं. शिवाय साठसाळीचे तांदूळ, मूग, उडीद, जव, तीळ, कुळीत, बोरें, द्राक्षें,

हकोत्थापकसंवेशकौषधपेषकाँश्चपरिचारकान्सर्वकर्मस्वप्र-
तिकूलान्तथागीतवादित्रोल्लापकश्लोकगाथाख्यायिकेति-
हासपुराणकुशलानभिप्रायज्ञानानुमताँश्च देशकालविदः
पारिषद्याँश्च तथा लावकपिञ्जलशशहरिणैणकालपुच्छ-
कमृगमातृकोरभ्रान् गां दोग्ध्रीं शीलवतीमनातुरां जीव-
द्वत्सां सुप्रतिविहिततृणशरणपानीयां पात्र्याचमनीयोद-
कोष्ठमणिकघटपिठरपर्योगकुम्भीकुम्भकुण्डशरावदर्वीकटो-
दञ्चनपरिपचनमन्थानचर्मचेलसूत्रकार्पासोर्णादीनि च
शयनासनादीनि चोपन्यस्तभृङ्गारप्रतिग्रहाणि सुप्रयुक्ता-
स्तरणोत्तरप्रच्छदोपधानानि स्वापाश्रयाणि संवेशनोप-
वेशनस्नेहस्वेदाभ्यङ्गप्रदेहपरिषेकानुलेपनवमनविरेचना-
स्थापनानुवासनशिरोविरेचनमूत्रोच्चारकर्मणामुपचारसु-
खानि सुप्रक्षालितोपधानाश्च सुश्लक्ष्णखरमध्यमा दृषदः
शस्त्राणिचोपकरणार्थानि धूमनेत्रं च बस्तिनेत्रञ्चोत्तरब-
स्तिकश्च कुशहस्तकश्च तुलाञ्च मानभाण्डञ्च घृततैल-
वसामज्जक्षौद्रफाणितलवणेन्धनोदकमधुसीधुसुरासौवीर
कतुषोदकमैरेयमेदकदधिदधिमण्डोदश्विद्धान्यम्लमूत्राणि
च तथा शालिषष्टिकमुद्गमाषयवतिलकुलत्थबदरमृद्वीका-
काश्मर्यपरूषाभयामलकविभीतकानि नानाविधानि च
स्नेहस्वेदोपकरणानि द्रव्याणि तथैवोर्ध्वहरानुलोमिकोभय-
भाञ्जि संग्रहणीयदीपनीयपाचनीयोपशमनीयवातहराणि
समाख्यातानि चौषधानि यच्चान्यदपि किञ्चिद्व्यापदः
परिसंख्यायोपकरणं विद्याद्यच्च प्रतिभोगार्थं तत्तदुप-
कल्पयेत् ॥ ६ ॥

इदानीं तावत्सम्भारान्विविधानपि समासेनोपदेक्ष्यामस्तद्यथा—दृढं निवातं प्रवातैकदेशं सुखप्रविचारमनुपत्यकं धूमातपजलरजसामनभिगमनीयमनिष्टानाञ्च शब्दस्पर्शरसरूपगन्धानां सोदपानोदूखलमुषलवर्चःस्थान स्नानभूमिमहानसोपेतं वास्तुविद्याकुशलः प्रशस्तं गृहमेव तावत्पूर्वमुपकल्पयेत् ॥ ९ ॥

आतां साहित्यें अनेक निरनिराळ्या प्रकारचीं आहेत. तथापि आह्मीं त्यांचें संक्षिप्त वर्णन करूं. प्रथम वास्तुविद्येंत कुशल अशा मनुष्यानें ( इंजिनियरनें ) असें एक घर तयार करावें कीं, जें मजबूत व निवात असेल; ( अर्थात् वाऱ्याच्या तोंडावर नसेल ). परंतु ज्याच्या एका भागांत मोकळा वारा येत असेल; ज्यांत सुखानें हिंडतां फिरतां येत असेल, ज्याच्याजवळ सार दुसरें एखादें मोठें घर नसेल; ज्यांत धूर, ऊन, पाणी व धूळ हीं शिरूं शकत नसतील; शब्द, स्पर्श, रस, रूप गन्ध या पंच महातत्वांचे अनिष्ट प्रकार अनुभवास येत नसतील ह्मणजे जेथें बीभत्स भाषण ऐकूं येत नसेल, विकृत व अमंगल अशी माणसें किंवा वस्तु दिसत नसतील, दुर्गंधी येत नसेल इत्यादि; आणि ज्यांत विहिर, उखळी, मुसळ, शौचकूप, स्नानाकरितां न्हाणी, व स्वयंपाक घर हीं असतील.

ततःशीलशौचाचारानुरागदाक्ष्यप्रादक्षिण्योपपन्नानुपचारकुशलान्सर्वकर्मसुपर्यवदातान्सूपौदनपाचकस्नापकसंवा-

---

आहाराचे प्रकृति—करण-संयोग-राशि इत्यादि भेद आहेत; सात्म्य, देश—काल—व्याधि—प्रकृति—स्वभाव व अभ्यास इत्यादि भेदेंकरून भिन्न आहे; सत्वाचे भय—शौर्य—विषाद—द्वेष—हर्षादिकांचे संयोगानें होणारे निरनिराळे प्रकार आहेत; वातादिदोषजनित प्रकृति भेद व बाल्य—यौवनादि वयाचे भेद प्रसिद्धच आहेत. १ क्वचित् ‘ द्विविधानपि ’ असा पाठ आढळतो तो स्वीकारिल्यास भोगार्थ औषधें व व्यापत्साधनें या दोहोंचें वर्णन करितों असा अर्थ होईल.

**दोषभेषजदेशकालबलशरीराहारसात्म्यसत्वप्रकृतिव- यसामवस्थान्तराणि यान्यनुचिन्त्यमानानि विमलवि- पुलबुद्धेरपि बुद्धिमाकुलीकुर्युः किं पुनरल्पबुद्धेः । तस्मा- दुभयमेतद्यथावदुपदेक्ष्यामः सम्यक्प्रयोगश्चौषधानां व्या- पन्नानाञ्च व्यापत्साधनानि सिद्धिषूत्तरकालम् ॥४ ॥**

याप्रमाणें अग्निवेशांची शंका ऐकून आत्रेय ऋषि ह्मणाले—हे अग्नि- वेश! आह्मीं किंवा आमच्या सारखे दुसरे वैद्य अशा प्रकारची औ- षधाची योजना करूं शकतों कीं, त्यापासून खात्रीनें गुणच येईल. इतकेंच नव्हे तर ती योजना इतरांसही अगदीं यथार्थ रीतीनें सांगूं शकतों. परंतु आतां असा कोण आहे कीं जो आह्मीं केलेल्या निरूपणाचें चिंतन करून तें समजून घेऊन ध्यानांत ठेवील व त्याचा सांगितल्याप्रमाणें उपयोग करूं शकेल! दोष[1] औषध, देश, काल, बल, शरीर, आहार, सात्म्य, सत्व, प्रकृति आणि वय यांच्या अवस्थांचे भेद इतके सूक्ष्म आहेत कीं, त्यांचा विचार करूं लागलें असतां निर्मळ व विशाल बुद्धिच्या मनुष्याची बुद्धिही गुंग होऊन जाते. मग यःकश्चित् बुद्धिच्या मनुष्यांची कथाच काय? या कारणांस्तव आह्मीं पुढें सिद्धिस्थानांत औषधांचा योग्य प्रयोग व त्यांपासून कांहीं अपाय झाल्यास त्याच्या प्रतीकाराचे उपाय हीं दोन्हीं निरूपण करणार आहोंत.

---

१ क्षय—वृद्धि—समता, उर्ध्वदेहगमन—अधोगमन—तिर्यग्गमन, शाखाश्रयित्व—कोष्ठाश्रयित्व—मध्यमार्गाश्रयित्व, स्वदेशगमन-परदेशगमन, स्वतंत्र-परतंत्र, अंशांश-विकल्प, धातुविशेषाश्रयित्व, इत्यादि दोषांचे अवस्थाभेद आहेत; नवीन, जुनें, ओलें, सुकें, द्रव्यान्तरसंयुक्त, स्वरसादिकल्पनायोगी, रस-वीर्य-विपाक व प्रभा व यांच्यायोगें करून विशिष्ट शरीरांत दोषांवर निरनिराळें कार्य करण्याची शक्ति इत्यादि औषधांचे भेद आहेत; आनूप, जांगल, साधारण, प्रशस्तादि देशभेद आहेत; सहा ऋतु, पूर्वाण्हादि दिवसाचे विभाग, रोग्याची स्थिति इत्यादि कालभेद आहेत; बलाचे स्वाभाविक, युक्तीनें आणलेलें, उत्कृष्ट, निकृष्ट, मध्यम इत्यादि भेद आहेत; शरीराचे स्थूळ, सारयुक्त, निस्सार, परिपालनीय, दुष्ट, मर्मादिअवयवविषययुक्त इ. भेद आहेत.

कायफळ, भुयधामण, हरडा, आंवळा, बेहडा, नानाप्रकारचीं स्नेहन व स्वेदनकारक द्रव्यें, वमनकारक, रेचक, वमन व विरेचन हीं दोन्हीं उत्पन्न करणारीं व संग्रहणीय, दीपक पाचक, शामक आणि वातहारक औषधें एकत्रित करावीं. त्याचप्रमाणें वर सांगितलेल्या औषधांशिवायही जीं लागू पडलीं असतां पुन्हां द्यावयास लागणारीं व अपाय झाला असतां तो दूर करण्याकारितां लागणारीं औषधें वैद्यास उचित वाटतील तीं त्यानें जमा करून ठेवावीं.

ततस्तं पुरुषं यथोक्ताभ्यां स्नेहस्वेदाभ्यां यथार्हमुपपादयेत् । तस्मिंश्चेदन्तरे मानसःशारीरो वा व्याधिः कश्चित्तीव्रतरः सहसाऽभ्यागच्छेत्तमेव तावदस्योपावर्त्तयितुं यतेत । ततस्तमुपावर्त्य तावन्तमेवैनं कालं तथाविधेनैव कर्मणोपाचरेत् ॥ ७ ॥

नंतर त्या रोगी मनुष्यास त्याची योग्यता पाहून त्याप्रमाणें पूर्वी सांगितलेल्या स्नेहन व स्वेदन क्रिया कराव्या. स्नेहनस्वेदन करावयाच्या वेळीं अकस्मात् एखादा फार जोराचा शारीरिक किंवा मानसिक रोग त्यास उत्पन्न झाल्यास, स्नेहनस्वेदन बंद ठेवून प्रथम त्या नवीन रोगाची शांति करण्याचा यत्न करावा. तो शांत झाल्यानंतरही जितके दिवस शांत होण्यास लागले असतील तितकेच दिवस आणखी त्याच रोगावरचे उपचार चालू ठेवावे.

ततस्तं पुरुषं स्नेहस्वेदोपपन्नमनुपहतमानसमभिसमीक्ष्य सुखोषितं सुप्रजीर्णभक्तं शिरःस्नातमनुलिप्तगात्रं स्रग्विणमनुपहतवस्त्रसंवीतं देवताग्निद्विजगुरुवृद्धवैद्यानर्चितवन्तमिष्टे नक्षत्रतिथिकरणमुहूर्ते कारयित्वा ब्राह्मणान्स्वस्तिवाचनं प्रयुक्ताभिराशीर्भिरभिमन्त्रितां मधुमधुकसैन्धवफाणितोपहितां मदनफलकषायमात्रां पाययेत् ॥ ८ ॥

याप्रमाणें स्नेहनस्वेदन झाल्यानंतर रोग्याचें मन प्रसन्न आहे, त्यास पूर्वरात्रीं ( सर्वरात्र ) चांगली सुखाची झोंप आली होती व त्यानें पूर्वी खाल्लेलें अन्न चांगल्या रीतीनें पचलें आहे असें पाहून, त्यास डोक्यावरून स्नान घालावें, अंगास सुगंधित उटी लावावी, गळ्यांत माळा घालाव्या, चांगलीं स्वच्छ वस्त्रें अंगावर द्यावीं आणि याप्रमाणें करून देवता, अग्नि, ब्राह्मण, गुरु, व वृद्धवैद्य यांची पूजा करावी. तदनंतर नक्षत्र, तिथि, करण व मुहूर्त यांचा शुभ[१] योग असेल अशा वेळीं ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचनादि मंगल क्रिया करवून, गेळफळाच्या काढ्यांत मध, ज्येष्टीमध, सैन्धव व काकवी हीं मिळवून तें मिश्रण आशीर्वाद मंत्रांनीं अभिमंत्रित करून रोग्यास पाजावें.[२]

**मदनफलकषायमात्राप्रमाणन्तु खलु सर्वसंशोधनमात्राप्रमाणानि च प्रतिपुरुषमपेक्षितव्यानि भवन्ति । यावद्धि यस्य संशोधनं पीतं वैकारिकदोषहरणायोपपद्यते न चातियोगाय तावदस्य मात्राप्रमाणं वेदितव्यं भवति ।**

---

१ ज्योतिषांत औषध कोणत्या तिथीस कोणत्या नक्षत्र वगैरेवर घ्यावें याविषयीं नियम सांगितले आहेत. त्या नियमांस अनुसरून शोधन वगैरे द्यावें. जसें; "पुष्योहस्तस्तथा ज्येष्ठारोहिणी श्रवणाश्विनौ । स्वातिःसौम्यश्च भैषज्ये कुर्यादन्यत्र वर्जयेत्" ॥ या वचनांत सांगितलेल्या नक्षत्रांवर औषध सुरू करावें. बाकी नक्षत्रें वर्ज्य करावीं.

२ याविषयासंबंधी विशेष सविस्तर निरूपण सिद्धिस्थानांत केलें आहे. त्या ठिकाणीं असे सांगितलें आहे कीं "ग्राम्योदकानूपरसैःसमांसैरुत्क्लेशनीयःपयसा च वम्यः' । ज्यास वमन द्यावयाचें असेल त्यास पूर्वरात्रीं ग्राम्य जलचर व आनूप ( अर्थात अनुक्रमें कोंबडे बकरें वगैर; मत्स्यादि आणि डुकर, रेडे इत्यादि ) जनावरांचा मांसरस किंवा मांसरस व दूध मिळवून तें पाजावें. त्यापासून कफ स्वस्थानापासून सुटून वमन चांगलें व सुखानें होतें. वरील द्रव्यें कफास वाढविणारीं आहेत व तें वमनास इष्टच आहे. कारण कफाची शक्ति मंद असल्यास वमन अधोगामी होतें. 'अधः कफेऽल्पेवमनं विगच्छेत्' असें प्रमाण आहे. वाग्भटांनींही 'श्वोवम्यमुत्क्लिष्टकफं मत्स्यमाषतिलादिभिः' या वचनांत असेंच सांगितलें आहे. म्हटलेंच आहे "नरःश्वोवमनं पाता भुंजीत कफवर्धनम् ।"

पीतवन्तन्तु खल्वेनं मुहूर्तमनुकांक्षेत्तस्य यदा जानीयात्स्वेदप्रादुर्भावेण दोषप्रविलयनमापद्यमानं लोमहर्षेण च स्थानेभ्यः प्रचलितं कुक्षिसमाध्मापनेन च कुक्षिमनुगतं हृल्लासास्यस्रवणाभ्यामपि चोर्द्ध्वमुखीभूतमथास्मै जानुसममसम्बाधं सुप्रयुक्तास्तरणोत्तरप्रच्छदोपधानं स्वापाश्रयमासनमुपवेष्टुं प्रयच्छेत् ॥ ९ ॥

गेळफळाचा काढा एके वेळीं किती द्यावयाचा हें, इतर सर्व संशोधन द्रव्याप्रमाणेंच, प्रत्येक रोग्याच्या बल व प्रकृतीवर अवलंबून असतें. ज्यास जितकें औषध दिलें असतां तें त्याचे सर्व विकृत दोष बाहेर काढून टाकितें व अतियोग होऊं देत नाहीं, तें त्याचें प्रमाण समजावें.[१] याप्रमाणें गेळफळाचा काढा रोग्यास पाजल्यापासून दोन घटकापर्यंत एकाग्र चित्तानें रोग्यास होणारीं पुढें लिहिलेलीं लक्षणें वैद्यानें पहात बसावें. रोग्यास घाम येऊं लागला ह्मणजे अंतस्थ दोष पातळ होऊं लागले असें समजावें. अंगावर रोमांच उभे राहूं लागले ह्मणजे दोष आपापल्या स्थानापासून सुटूं लागले असें समजावें. पोट फुगूं लागलें ह्मणजे पोटांत दोष गेले असें जाणावें आणि शेवटीं हृदयांत अडकल्यासारखें वाटूं लागलें ( हृदुपरोध ) व तोंडावाटे लाळ गळूं लागली ह्मणजे दोष उर्द्ध्वगामी झाले, अर्थात् वमनाची तयारी झाली, असें समजून रोग्याच्या गुडघ्या इतकें उंच, निजावयास उपयोगी पडेल असें एक आसन, अर्थात् बाज वगैरे टाकून त्यावर गादी, चादर, उशी इत्यादि वस्त्रें आंथरून त्यावर रोग्यास बसवावें.[२]

१ मागें मात्राशितीयाध्यायांत 'यावध्यस्याशनमाशितम् ,' इत्यादि वचनांत आहाराच्या प्रमाणाविषयीं जो एक व्यापक नियम सांगितला आहे तोच विषयभेदाच्या अनुरोधानें तत्वशः येथेंही लावावयाचा.

२ मूळांत ' स्वापाश्रयम् ' असा शब्द आहे. ह्मणजे ' निद्रालम्बन् ' ' निद्राकरणोपयोगी ' असें आसन असा अर्थ होतो.

प्रतिग्रहाँश्चोपचारयेत् । ललाटप्रतिग्रहे पार्श्वोपग्रहणे नाभिप्रपीडने पृष्ठोन्मर्दनेऽनपत्रपणीयाः सुहृदोऽनुमताः प्रयतेरन् ॥ १० ॥

पिकदाणी वगैरे पात्रें वमनादिक घेण्याकरितां त्या त्या योग्य जागीं ठेवावीं आणि रोग्याच्या अगदीं इतक्या स्निग्ध संबंधांतले व इतके प्रिय कीं, ज्यांची त्यास लाज वाटत नसेल असे जे त्याचे मित्र असतील त्यांपैकीं एकानें त्याचें डोकें दाबून धरावें, दुसऱ्यानें दोन्ही कुशी दाबून धराव्या, तिसऱ्यानें (उलट्या मार्गानें[२]) बेंबी चोळावी आणि चवथ्यानें (तशीच) पाठ रगडावी.

अथैनमनुशिष्याद्विवृतोष्ठतालुकण्ठो नातिमहता व्यायामेन वेगानुदीर्णानुदीरयन्किञ्चिदवनम्य ग्रीवामूर्ध्वशरीरमुपवेगमप्रवृत्तान्प्रवर्तयन्सुपरिलिखितनखाभ्यामङ्गुलीभ्यामुत्पलकुमुदसौगन्धिकनालैर्वा कण्ठमभिस्पृशन्सुखं प्रवर्तयस्वेति ॥ ११ ॥

नंतर रोग्यास पुढें लिहिलेल्या विधीनें वागावयास सांगावें. तें असें— ओठ, टाळू व घसा हीं पसरून, मान व छातीपासून वरचें शरीर किंचित् खालीं वांकवून, आलेले वमनाचे वेग हलकेंच बाहेर सोडून द्यावे. अर्धवट वेग आले असतां ते, चांगल्या रीतीनें नखें काढलेल्या बोटांनीं अथवा निळ्या, तांबड्या किंवा पांढऱ्या कमळांचे देंठ घशाच्या आजुबाजूस हळू हळू फिरवून बाहेर प्रवृत्त करावे. याप्रमाणें सुखपूर्वक वमन करावें.

---

१ 'प्रतिस्वीकरणे सैन्ये पृष्ठे चैव पतद्ग्रहे' असें मेदिनीकोषाचें वाक्य आहे.

२ दोष ऊर्ध्वमार्गाकडे प्रवृत्त करावयाचे असल्यामुळें नेहमींच्या रीतीप्रमाणें वरून खालीं याप्रमाणें न चोळतां त्याच्या उलट खालून वर चोळावें. वाग्भटांनींही 'प्रपीडयेत्तथा नाभिं पृष्ठं च प्रतिलोमतः' या वचनांत असेंच सांगितलें आहे.

स तथाविधं कुर्यात्। ततोऽस्य वेगान्प्रतिग्रहगतानवे क्षतावहितः। वेगविशेषदर्शनाद्धि कुशलो योगायोगातियोगविशेषानुपलभेत। वेगविशेषदर्शी पुनः कृत्यं यथार्हमवबुध्येत लक्षणेन। तस्माद्वेगानवेक्षेतावहितः॥ १२॥

वैद्यानें वर सांगितल्याप्रमाणें रोग्यानें करावें; वमनाच्या वेळा, जसजसें वमन भांड्यांत पडत जाईल तसतसे त्याचे वेग लक्ष्य लावून पहाणें, हें वैद्याचें एक महत्वाचें कर्तव्य आहे. कारण वेगांच्या परीक्षेवरूनच, रोग्यास वमन बरोबर झालें किंवा तें पुरतें लागू पडलें नाहीं अथवा त्याचा अतियोग झाला हें समजलें जातें व वेगांची परीक्षा त्यांच्या यथायोग्य लक्षणांवरून समजली जाते[१] ह्मणून वेगांची परीक्षा फार लक्ष्य लावून करावी.

तत्रामून्ययोगयोगातियोगविशेषज्ञानानि भवन्ति तद्यथा—अप्रवृत्तिः कुतश्चित्केवलस्य वाऽप्यौषधस्य विभ्रंशो विबन्धो वेगानामयोगलक्षणानि भवन्ति। काले प्रवृत्तिरनतिमहती व्यथा यथाक्रमं दोषहरणं स्वयञ्चावस्थानमिति योगलक्षणानि भवन्ति। योगेन तु दोषप्रमाणविशेषेण तीक्ष्णमृदुमध्यविभागो ज्ञेयः। योगाधिक्येन तु फेनिलरक्तचन्द्रिकोपगमनमित्ययोगलक्षणानि भवन्ति। तत्रातियोगायोगनिमित्तानिमानुपद्रवान्विद्या-

---

१ याचा दुसरा अर्थ असाही होईल कीं, वमनाचा योग झाला तरी त्यापासून कितपत संशोधन झालें आहे हें समजण्याकारितां वेग पहावे; कारण संशोधनाच्या योगाचे तीन भेद केले आहेत व वेगांच्या संख्येवर त्याची परीक्षा ठेविली आहे. कल्पनासिद्धांत लिहिलें आहे कीं, 'जघन्यमध्यप्रवरे तु वेगाश्चत्वार इष्टा वमने षडष्टौ' उत्तम मध्यम व अधम संशोधनांत अनुक्रमें ८–६-व ४ वेग येतात. वेग मोजतांना मात्र औषधाचे वेग सोडून फक्त दोषाचे वेग मोजावयाचे. कल्पनासिद्धांतच सांगितलें आहे 'द्वित्रीन्सविट्कानपनीयवेगान्मेयं विरेके वमने तु पीतम्'

तु । आध्मानं परिकर्तिका परिस्रावो हृदयोपशरणमङ्गग्रहो जीवादानं विभ्रंशः स्तम्भक्लमउपद्रव इति ॥ १३ ॥

अयोग, योग व अतियोगाचीं लक्षणें याप्रमाणें जाणावीं–मुळींच वमन न होणें किंवा थोडेंसें होणें, फक्त औषधच पडणें, वमन अधोगामी ह्मणजे विरेचनाच्या मार्गानें होणें व मलावरोध होणें हीं अयोगाचीं लक्षणें समजावीं[1]. वेळेवर वमन होणें, फार क्लेश न होणें, यथाक्रमें[2] दोष निघून जाणें व आपोआप बंद होणें हीं योगाचीं लक्षणें होत. योगाचेही, जो दोष काढून टाकावयाचा असतो तो जमा थोड्या, मध्यम किंवा संपूर्ण प्रमाणांत निघाला असेल त्या मानानें, मृदु, मध्य, व तीक्ष्ण असे तीन भेद होतात[3]. अतियोग झाला असतां, वमन फेंसदार चंद्रकयुक्त[4] व रक्तमिश्रित होऊं लागतें. अयोग किंवा अतियोग झाला असतां पुढील उपद्रव होतात. पोट फुगतें, मलाशयांत कातरल्यासारखी अतिशय पीडा होते, तोंडांतून थुंकी वाहूं लागते, दोष हृदयांत प्रविष्ट होऊन हृद्ग्रह उत्पन्न करितात, अर्थात् हृदय अवरुद्ध[5] होतें, जीवनरक्त[6] पडूं लागतें, संज्ञाभ्रंशादि उत्पन्न होतात, शरीर जड किंवा बधिर होतें व सर्वांगास थकवा येतो.

---

१ 'अयोगः प्रातिलोम्येन न वाऽल्पं वा प्रवर्तनम्' असें सिद्धिस्थानांत अयोगाचें लक्षण सांगितलें आहे.

२ 'क्रमात् कफः पित्तमथानिलश्च यस्यैति सम्यग्वमितः स इष्टः' कफपित्त व वात या क्रमानें ज्याचे दोष पडतात त्यास वमनाचा बरोबर योग झाला आहे असें समजावें. यास यथाक्रम म्हणतात.

३ सिद्धिस्थानांत 'पेयाविलेपीमकृतं कृतंच' या वचनांत जो पेयादिक्रमाचा विधि वमनानंतर पाळण्याविषयीं सांगिलें आहे त्यासंबंधानें हे तीन भेद केले आहेत. याचें विशेष विवेचन पुढें येईल.

४ मोराच्या पिसांवर नेत्राकार चिन्हें असतात तद्वत्.

५ 'कुपिता हृदयं गत्वा दोषाः कुर्वन्ति हृद्ग्रहम' असें पुढें सांगितलें आहे.

६ जीवनास आधारभूत असें जें विशिष्ट प्रकारचें रक्त तें जाणें याचें नांव जीवादान. म्हटलेंच आहे, "अतियोगाच्च भैषज्यं जीवं हरति शोणितम्। तज्जीवादानमित्युक्तमादत्ते जीवितं यतः"

योगेन तु खल्वेनं छर्दितवन्तमभिसमीक्ष्य सुप्रक्षालितपाणिपादास्यं[1] मुहूर्तमाश्वास्य स्नैहिकवैरेचनिकोपशमनीयानां धूमानामन्यतमं सामर्थ्यतः पाययित्वा पुनरेवोदकमुपस्पर्शयेत् ॥ १४ ॥

रोग्यास बरोबर रीतीनें वमन झालें आहे असें निश्चयात्मक पाहून, त्याचे हात, पाय, व तोंड हीं स्वच्छ धुवावीं आणि दोन घटकांपर्यंत त्यास वारा वगैरे घालून विसांवा देऊन, स्निग्ध, विरेचक अथवा उपशामक ( तीक्ष्ण, मृदु, मध्य ) या तीन प्रकारच्या धुरांपैकीं, ज्या रोग्यास जो त्याच्या शक्तीच्या मानानें योग्य असेल असा एक प्रकारचा धूर देऊन, पुन्हां हातपाय वगैरे धुवावे.

उपस्पृष्टोदकश्चैनं निवातमागारमनुप्रवेश्य संवेश्य चानुशिष्यात्--उच्चैर्भाष्यमत्यासनमतिस्थानमतिचंक्रमणं क्रोधशोकहिमातपावश्यायातिप्रवातान्यानयानं ग्राम्यधर्ममस्वपनं निशि दिवास्वप्नं विरुद्धाजीर्णासात्म्याकालप्रमितातिहीनगुरुविषमभोजनवेगसन्धारणोदीरणमिति भावानेतान्मनसाऽप्यसेवमानः सर्वमाहारमद्यादिति ; स तथा कुर्यात् ॥ १५ ॥

हातपाय धुतल्यावर, वैद्यानें त्या रोग्यास बिनवाऱ्याच्या घरांत नेऊन बसवावें आणि पुढें लिहिल्याप्रमाणें सांगावें—मोठ्यानें बोलणें, फार बसणें, एकाच जागेवर अतिशय बसणें, अतिशय फिरणें, राग किंवा शोक करणें, थंडी, ऊन किंवा दंव घेणें, फार वारा घेणें, गाडींत बसून फिरणें. मैथुन, रात्रीं जागरण करणें व दिवसा निजणें, प्रकृतीच्या विरुद्ध भोजन करणें, अजीर्णावर जेवणें, प्रतिकूल भोजन करणें, अवेळीं जेवणें एकाच प्रकारचे पदार्थ खाणें, निःशक्त पदार्थ खाणें, जड पदार्थ खाणें,

१ लाडू पोह वगैरे जे स्वाभाविक जड पदार्थ आहेत ते सांगितलेल्या योग्य प्रमाणांत देखील घऊं नयत असें प्रतिपादन केल आहे

विषम भोजन करणें. मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, आले नसतां बळेंच आणणें या गोष्टी अगदीं मनांत देखील आ आणि योग्य तें भोजन कर. रोग्यानें याप्रमाणें करावें.

अथैनं सायान्हे परेद्यान्हि सुखोदकपरिषिक्तं पुराणानां शालितण्डुलानां स्ववक्लिन्नानां मण्डपूर्वां सुखोष्णां यवागूं पाययेदग्निबलमभिसमीक्ष्य चैवं द्वितीये तृतीये चान्नकाले। चतुर्थे त्वन्नकाले तथाविधानामेव शालितण्डुलानामुत्स्विन्नां विलेपीमुष्णोदकद्वितीयां ... हलवणामल्पस्नेहलवणां वा भोजयेदेवं पञ्च... चान्नकाले। सप्तमे त्वन्नकाले तथाविधानामेव शा... नां द्विप्रसृतं सुस्विन्नमोदनमुष्णोदकानुपानं तनुना त... स्नेहलवणोपपन्नेन मुद्गयूषेण भोजयेदेवमष्टमे नवमे चान्नकाले। दशमे त्वन्नकाले लावकपिञ्जलादीनामन्यतमस्य मांसरसेनौदकलावणिकेनापि सारवतां भोजयेदुष्णोदकानुपानम्। एवमेकादशे द्वादशे चान्नकाले। अतऊर्ध्वमन्नगुणान्क्रमेणोपभुञ्जानः सप्तरात्रेण[3] प्रकृतिभोजनमागच्छेत् ॥ १६ ॥

नंतर त्या दिवशीं सायंकाळीं किंवा दुसरे दिवशीं सकाळीं ऊन पाण्यानें स्नान घालून, जुन्या लाल साळीच्या तांदुळांची किंचित गरम गरम

१ तांदुळांच्या सहापट पाणी घालून पातळ भात करितात तो. २ तांदुळांच्या चौपट पाणी घालून पातळ भात करितात तो. 'सिक्थैर्विरहितो मण्डः पेया सिक्थसमन्विता। घनसिक्था विलेपी स्याद्यवागूर्विरलद्रवा।' ज्यांत शितें नाहींत अशी निव्वळ पेज तो मण्ड. ज्यांत थोडीं शितें आहेत ती पेया. पेयेपेक्षां ज्यांत अधिक शितें आहेत ती विलेपी व ज्यांत नाम मात्र शितें आहेत अशी जी कण्हेरी ती यवागू. अन्यत्र असेंहि लक्षण केलें आहे—"लाजांबुसैंधवकणाधान्यनागरदाडिमैः। युक्ता विम्लदितः पूतो मण्डः संस्कृत उच्यते। निर्द्रव्या प्राकृता पेया तक्रदाडिमतण्डुलैः।

३ 'सप्ताहात्' असाही पाठ आहे.

## वैद्यकाचा जगन्मान्य ग्रंथ.

# सार्थ श्रीचरक संहिता.

.ग्रधोपचार करण्यासंबंधानें हा ग्रंथ जसा **हिंदुस्थानांत पूज्य झाला आहे,** ।, **यूरोप-अमेरिका इकडील प्रख्यात डाक्टरांनींही** अतिशय उत्तम ठरविला " इंग्रजींतही भाषांतर झालें असून, तें जगन्मान्य झालें आहे.

रोग्य

" चिकित्सितं वन्हिवेश स्वस्थातुरहितं प्रति ।
यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥ "

त्याचे महर्षि दृढबल यांचेंही या ग्रंथासंबंधानें हें मत आहे. ते ह्मणतातः—" **रोगी किंवा** त्यास **अशा कोणत्याही मनुष्यास हा ग्रंथ उपयोगी आहे.** या ग्रंथांत जें सांगि- मक ( तीक्ष्ण, " दुसरीकडे असेल; पण जें यांत नाहीं तें कुठेंही मिळणार नाहीं. "

जो त्याच्या ... व कांहीं भरपूर आहे.

देऊन, पुन्हां शास्त्रावर अनेक ऋषींनीं व त्यानंतर विद्वानांनीं ग्रंथ केले आहेत; **काची योग्यता अद्याप कोणत्याही रीतीनें कमी झाली नाहीं, उपशी बरोबरीही अद्याप कोणीं केली नाहीं;** ह्मणूनच पुढील श्लोक ष्टांतरूपानें ह्मटला जात असतोः—

" निदाने माधवः श्रेष्ठः सूत्रस्थाने तु वाग्भटः ।
शारीरे सुश्रुतः प्रोक्तः **चरकस्तु चिकित्सिते** ॥"

चिकित्सा ह्मणजे रोगांवर उपचार करणें: आणि वैद्यशास्त्रांत मुख्य फल तेंच आहे. त्यांत चरकासारखा ग्रंथ नाहीं असें आमचेच लोक ह्मणत नसून,

**सुधारलेल्या देशांतील विद्वान् व शोधक डाक्टरही**
**तसेंच जोरानें ह्मणत आहेत.**

हा ग्रंथ महर्षि आत्रेय यांनीं सांगितल्याप्रमाणें यथावत् महर्षि अग्निवेश यांनीं तयार केला. नंतर पुढें महर्षि चरक यांनीं पुष्कळ रीतींनीं सुधारला. त्यानंतरही महर्षि दृढबल यांनीं याच्यांत वृद्धि केली असें ह्मणतात. एकंदरींत अशा रीतीनें **या ग्रंथावर एवढ्या महान् तत्ववेत्त्यांचा संस्कार झालेला असल्यानें, तो सर्वत्र पूज्य व्हावा हें योग्यच आहे.**

**याचें मराठी भाषांतर, मूळासहित व जागजागीं टीपा आणि**
**जरूरप्रसंगीं देखावे यांसहित भागरूपानें छापत आहे.**

श्रीमंत गायकवाड सरकारांच्या आश्रयानें छापण्याचें काम चालू आहे.

**सम्पादक—आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री, पदे.**

भाग **विक्रीस तयार** आहेतः—**सूत्रस्थान**—पूर्वार्ध किं. २ रु.; **निदान-विमानस्थान** १॥ रु०; **इंद्रियस्थान** १२ आणे; **कल्पस्थान** १४

चालू आहेः-**सूत्रस्थान—उत्तरार्ध; शारीरस्थान व चिकि-**

त्सास्थान. हे भाग जसजसे छापून तयार होतील, तसतसे कायमच्या वर्गणीदारांना व्ही. पी. नें पाठविण्यांत येथील.

## विशेष सवड—फक्त वर्ष अखेरपर्यंत !

वैद्यकसंबंधीं अत्यंत उपयुक्त ठरलेलें व सतत १४ वर्षें चालू असलेलें " **आर्य-भिषक्** " **मासिकपुस्तक** घेणारांस; चरकसंहितेचे भाग,

# निम्मे किंमतीस

देण्यांत येतील; तरी हा संधि घालवूं नका, त्वरा करा. टपालखर्च शिवाय पडेल.

☞ नमुना पहाणें असल्यास अर्ध्या आण्याचें टिकीट पाठवावें. आमच्याकडील इतर पुस्तकांची वगैरे यादीही पाठविण्यांत येईल.

**आर्यभिषक्** मासिक पुस्तक. सोवत 'भारतधर्म' मासिक पुस्तकही असतें. त्यासह टपालसह वर्षाची वर्गणी १ रु. १० आणे.

## खालील जिनसा, हिमालयांतून मोठ्या प्रयासानें मिळविल्या आहेत. योग्यतेच्या मानानें किंमत फार स्वस्त आहे.

**अस्सल मृगनाभींतील कस्तूरी.** ३० रु० तोळा.

**शुद्ध शिलाजित.** २ रु० तोळा.

**जेहर मोहरा.** हा एक प्रकारचा दगड फक्त हिमालयांतच मिळतो. हा जखमेस लावला तर जखम त्वरित मिळून येते. दूध किंवा पाण्यांत दिला असतां उष्णनाशक व रक्तशोधक आहे. १० रुपये रत्तल.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय. **के. रामराव,** व्यवस्थापक आ. भि.

## धुपणीवर चमत्कारिक औषध,

**धुपणीचा प्रकार साधारण नाहीं !** कित्येक स्त्रिया फार फार भयंकर रीतीनें दुःख भोगतात !

कंबर दुखते; तांबडें किंवा पांढरें देखील—पाण्यासारखें किंवा एखादीस थोडें पुवासारखें पाझरतें; एखाद्या स्त्रीस हा स्राव अतोनात होऊन, तिची फार चमत्कारिक स्थिती होते; तिला निरनिराळे अनेक रोग झालेले दिसून भलतेच उपचार करीत असल्यानें, मूळ रोग बाजूस ठेऊन भलतेच उपचार करीत असल्यानें, मूळ रोग फारच फैलावतो; आणि **कित्येक स्त्रिया बिचाऱ्या फुकट प्राणास मुकतात !**

मुख्य जबाबदारी ही घेतली पाहिजे कीं, स्त्रियांना खरें काय झालें आहे? आणि त्यांचा योग्य उपचारानें प्रतीकार करावा.

पोट दुखतें; अन्न पचत नाहीं; इत्यादि विकार धुपणीनेंही होतात; पण तिचा विचार न करितां औषध दिल्यानें **काव्याचा नायटा** याप्रमाणें दुखणें विकोपास जातें.

लाजेनें व कोणी स्त्रिया गैरसमजुतीनें—धुपणीचा विकार बाजूस ठेऊन, वर लिहिल्याप्रमाणें चुका करतात. किंवा उपचारांतही चूक होते.

आंत किंवा ऋतु जाण्याच्या मार्गावर बिघाड होतो. कुठें तरी हा बिघाड होतो, आणि कित्येक वेळीं उपचारांत यांची दादच घेत नाहींत. यावर हें औषध फार उत्तम आहे. डबीची किं. १॥ रु. टपालखर्च शिवाय. मुंबई नवा नागपाडा, व्य. आर्यभिषक्.

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक २ रा.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ –श्रीवाग्भटः ।

कन्यासंक्रांति.–शके १८२४ भाद्रपद शु. १४ मंगळवार. ता० १६ सप्टेंबर. सन १९०२

विषयानुक्रम:—पारदसंशोधनचर्चा, वशीकरणचिकित्सा, सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान उत्तरार्ध पृष्ठें ६५–८०

---

## वैद्यकीय वृत्तसार.

**मुंबईवैद्यसभा.**—धर्मार्थ दवाखाना लौकरच सुरू होईल असा प्रयत्न चालू आहे. पुढारी मंडळी प्रयत्न करीत आहे. वै. रामकृष्ण सेवाराम, सभेची सेवा उदार मनानें करतील तर वैद्यसभेचें पाऊल पुढें पडण्यास उत्पन्न झालेल्या हरकती दूर होऊन, एकमताचीं फळें सर्वांसच मिळतील.

**श्रीराजराजेश्वर–वनौषधिप्रासाद.**—गतांकीं कळविल्याप्रमाणें, खऱ्या व स्वच्छ वनस्पती वगैरे औषधोपयोगी जिनसा मिळण्याची सोय व्हावी ह्मणून हें दुकान, माधव-बागेच्या रस्त्यावर दुसऱ्या पांजरपोळच्या गल्लीसमोर आमच्या मार्फत सुरू करण्यांत आलें आहे. सुमारें एक दीड महिन्यांत, औषधींची किंमतवार यादी प्रसिद्ध करण्यांत येईल. ज्यांनां ज्या ज्या अप्रसिद्ध वनस्पती मिळतील त्यांनीं या ठिकाणीं पाठविण्याची मेहेरबानी करावी. प्रथम पत्रव्यवहारानें किंवा समक्ष, खर्चाचें मान कळवून, उत्तर मिळाल्यावर वनस्पती पाठवाव्या. खऱ्या वनस्पती मिळण्याची इच्छा करणाऱ्या सद्गृहस्थांनीं या कामास अवश्य साहाय्य करावें अशी विनंति आहे.

**आयुर्वेदीय धर्मार्थ दवाखाना**—पंजाब प्रांतांत भिवानी येथें हा मोठ्या समारंभानें नुक्ताच सुरू करण्यांत आला. असे दवाखाने निघतील तितके पाहिजे आहेत. पूर्वी गरीब लोकांनां वैद्यच फुकट औषधें पुरवीत असत; पण प्रस्तुत वैद्यांनांच पोटभर मिळण्याची मारामार; त्यामुळें चांगलीं मोठ्या किंमतीचीं औषधें करण्याची त्यांस पंचाईत पडते; तेव्हां त्यांनीं गरीबांस मदत कोठून करावी? यासाटीं उदार धनिकांनीं इकडे लक्ष देऊन गरीबांचा निभाव लागण्याकरितां आर्यवैद्यकास उत्तेजन दिलें पाहिजे. आमचे म्ह-णविणारे लहानमोठे संस्थानिक कांहीं करतील कां?

**ब्रह्मचारी आशारामजी.**—यांनीं येथें येऊन माधवबागेत धर्मार्थ दवाखाना चालू केला असून, सुमारें एक वर्षांत शेंकडों लोकांनां धर्मार्थ औषधें देण्याचें सत्कृत्य केलें याबद्दल ते स्तुतिपात्र आहेत. हे लौकरच बाहेरगांवीं जाणार असून, दिल्ली दरबारास हजर होणार आहेत. जाण्यापूर्वी, ब्रह्मचारीमहाराजांनीं या चालविलेल्या धर्मार्थ दवाखा-न्याची व्यवस्था कायमची करून ठेवावी ह्मणजे लोकोपयोग होईल.

**साभार स्वीकार व अभिप्राय.**—'ठाणें मराठी ग्रंथसंग्रहालय' व 'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' या दोन संस्थांचे नवीन रिपोर्ट पोंचले. प्रयत्न स्तुत्य असून, तो चांगल्या रूपास येत आहे याबद्दल आनंद वाटतो. कायमची इमारत, दोन्ही संस्थांना पाहिजे आहे. ठाणेकर बहुश: लौकरच यश मिळवितील असें दिसतें; ही समाधानाची गोष्ट आहे; मग मुंबईकरांनां–मालकीची राहो पण मोटीशी भाड्याचीही जागा मिळविण्यांत यश येऊं नये ही धनिकांनां लाजविणारी गोष्ट नव्हे कां?

---


## धुपणीवर चमत्कारिक औषध.

आंत किंवा ऋतु जाण्याच्या मार्गांवर बिघाड होतो. कुठें तरी हा बिघाड होतो, आणि कित्येक वेळीं उपचारांत याची दादच घेत नाहींत. यावर हें औषध फार उत्तम आ[हे.] बाटलीची किं. १॥ रु. टपालखर्च शिवाय. मुंबई नवा नागपाडा, व्य. आर्यभिष[क्]

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.

पु० १४ ] # आर्यभिषक्. [अं० ३ रा.

ARYABHISHAK OR DOCTOR OF ARYANS.

A Monthly Journal Containing Medical news and articles.

कन्यासंक्रांति शके १८२४ भाद्रपद शु० १४ मंगळवार ता० १६।९।१९०२.

## शोधकांनीं अवश्य विचारणीय पारदाचे संस्कार.

प्रस्तुत आपल्या आर्यावर्तांत जीं वैद्यशास्त्रें प्रचलित आहेत, त्यांत एतद्देशीय आर्यशास्त्र, मुसलमानांच्या संसर्गानें आलेलें युनानीशास्त्र व आंग्लांच्या राजकीयसत्तेनें पसरलेलें आंग्लशास्त्र अशीं तीन शास्त्रें प्रमुख आहेत; पैकीं औषधी तयार करण्याचा मक्ता आंग्लशास्त्रांत परदेशीयांनीं घेतल्यामुळें, तत्संबंधानें या देशांत चर्चा करण्याचें कोणास कारणच उरलें नाहीं. युनानीशास्त्र हें परकीय व त्यास राजसत्तेचाही जोर नाहीं, त्यामुळें त्याबद्दल चर्चा चालून कांहीं नवें जुनें करण्याची वृत्ति निघून न यावी हें आश्चर्यकारक नाहीं. परंतु आमच्या आर्यशास्त्राची स्थिति त्याहून भिन्न आहे. आह्मांला आमचीं औषधें येथेंच तयार केलीं पाहिजेत; आमच्याबद्दल काळजी घेण्याची जरूर इतरांना मुळींच नाहीं आहे; सत्तेचा कोणत्याही प्रकारें आह्मांस जोर राहिला नाहीं; अशा स्थितींत—आर्यवैद्यशास्त्रापैकीं औषधीक्रियेचा भाग उन्नत दशेस आणणें तर बाजूस राहिलें, पण आमच्या शास्त्राची पीठिका तरी कायम ठेवणें हें देखील फारच कठीण होऊन बसलें आहे.

कोणासही हें कबूल केलें पाहिजे कीं, वैद्यशास्त्राचा तात्विक विचार कोणी कसाही करो; त्याची कोणी कितीही आवश्यकता मानो; अथवा तत्वज्ञान हेंच सर्वस्वीं प्रमुख आहे असेंही मानोत; तथापि वैद्यशास्त्राचें महत्व, कोणत्याही शास्त्रानुरोधानें प्रस्थापित करणें असेल तर रोगांचा नाश करण्याचें कार्य, त्या शास्त्रानुरोधानें करून दाखविल्याशिवाय त्या शास्त्राची महती कधींही सिद्ध होणार नाहीं हें निर्विवाद आहे.

आमच्या शास्त्राची परंपरा तुटक तुटक झाली आहे; साधनें न्यून होऊं लागली आहेत; उत्साह कमी झाला आहे; पायापुरते पहाणाऱ्यांची संख्या झपाट्यानें वाढत आहे; अशा स्थितींत वैद्यशास्त्रांतील औषधीक्रिया हा जो महत्वाचा भाग, तो आमच्या देशातून नाहींसा होत जात असल्यामुळें व त्याऐवजीं परकीयांची उन्नति होत असल्यामुळें, परदेशांतील औषधांचा खप या देशांत झपाट्यानें होत आहे आणि त्यामुळें येथील द्रव्याचा झरा, सारखा परदेशाकडे ओढ घेऊं लागला आहे. द्रव्याचा नाश होण्यास केवळ हें एकच कारण घडत नसून, परदेशीय तयार औषधांचा जारीनें खप होण्याकारितां, तज्ज्ञ म्हटलेल्या एतद्देशीय विद्वानांची मोठीच जोड, एकसारखी वाढत्या प्रमाणानें मिळत आहे.

विद्वान् म्हणविणारांचेंही लक्ष्य अशा नाशाकडे लागत नसून, बहुतेक कालास अनुकूल असेंच वर्तन ठेऊन, आपल्या हातून दोन ओंजळी तरी परदेशांत जातील असा इमानें इतबारें प्रयत्न करीत आहेत. कित्येक विद्वानांचें लक्ष्य या बाजूकडे जाऊन, परदेशीय औषधें येथें तयार करण्याचा विचार मध्यंतरीं बराच जोरानें ऐकू येत होता; पण तो गर्भांतच जिरला! ईश्वरी इच्छा!

परदेशीय औषधें येथें तयार करण्याच्या प्रयत्नानें परदेशास टक्कर देणें जितकें अशक्य व चमत्कारिक आहे, तितकें—एतद्देशीय औषधें,

यथायोग्य पद्धतीनें येथें बनवून तीं यथोचित उपयुक्त करणें शक्य व अनुकूल आहे. पण तिकडेही विद्वानांचें लक्ष्य असावें तितकें नाहीं. अवघ्या भरतखंडांत असे कांहीं कारखाने, एका हाताच्या बोटावर मोजतां येण्याजोगे आहेत; आणि त्यांतही शोधकपणापेक्षां व्यापारी दृष्टीनें विशेषत: व्यवस्था होत आहे. अशा वेळीं शोधकपणाच्या पायावर कांहीं तरी प्रयत्न होण्याची किति अपेक्षा आहे हें सांगणें नकोच.

अशीं कामें वास्तविक राजाश्रय व लोकाश्रय यांवर अवलंबून आहेत. पण आमच्याकडे या दोन्ही आश्रयाला पाहिजे तसें अनुकूल वळण मुळींच नाहीं. त्यामुळें मोडक्या तोडक्या साधनांच्या जोरावर प्रयत्न करावा लागतो. असो. हींच साधनें, परमेश्वराची इच्छा असेल तर आह्मांला यशस्वी करतील, असें ह्मणून आह्मीं पुढच्या विचारास लागतों.

आर्यवैद्यकानुरोधानें यथाशास्त्र थोडीं कां होईनात, पण थेट शास्त्रानुसार तयार केलेलीं औषधें आह्मांस पाहिजे आहेत. अमुक प्रमाणाचा अग्नि देण्यास सांगितला आहेना; मग तो जमीनींत गजपूट अग्नि देण्यापेक्षां एक नवीन प्रकारची भट्टी, तितकीच आच देण्यासारखी तयार करून दिल्यास काय हरकत आहे? अमुक पुटें देण्याच्या भस्मास त्याची राख करण्यापुरती स्वतंत्र कृति करण्यास कोणती हरकत आहे? अमुक तास पर्यंत करावयाचा खल, विशेष जोर असलेल्या खलानें कमी तासांत केल्यानें कोणतें नुकसान होणार आहे? अशा प्रकारच्या तर्कांनीं, सुधारणा केलेल्या पद्धतीनें औषधें तयार केल्यास, आमच्या मतें तीं औषधें यथाशास्त्र होत नाहींत. कस्तूरीच्या अभावीं लवंग घातल्यानें कस्तूरीचा गुण मिळणार नाहीं; तसेंच हेंही आहे. रसायनशास्त्राचा थोडा तरी विचार करणारांना हें ज्यास्त समजाऊन देण्यास नको.

कित्येक जुन्या पद्धतीनें औषधें तयार करण्याचा हट्ट घेणाऱ्या विद्वान् वैद्यांना कांहीं लोक दोष देतात; पण त्यांत ते चूक करतात. वरील विचारपद्धतीनें औषधांच्या पद्धतींत फेरफार करण्याचा अधिकार, स्वतःच्या हातीं घेण्याची ज्यांची मर्जी असेल त्यांनीं तो घेऊ नये असें आह्मीं ह्मणत नाहीं; पण त्याबद्दल त्यांनीं स्पष्ट ह्मटलें पाहिजे कीं, आह्मी ही पद्धति, स्वतंत्रपणानें युक्त दिसली तशी फिरविली आहे; अमुक पाठाप्रमाणें औषध केलें आहे असें नाहीं. पाठाप्रमाणें करावयाचें ह्मणजे पद्धतींत मुळींच फेरबदल उपयोगीं नाहीं. इतका फेरबदल मात्र अवश्य आहे, कीं यंत्रसामुग्री मजबूत व सोयीची असेल व ती, शास्त्रपद्धतीस कोणत्याही रीतीनें विरुद्ध नसेल, तर तिचा स्वीकार करावा.

या आमच्या लिहिण्याचा कटाक्ष, प्रस्तुत काळच्या विद्वानांसंबंधानेंच आहे असें नाहीं. तर अशा प्रकारचें कर्म करणाऱ्या नव्या व जुन्या अशा सर्वांसंबंधानें आमचें ह्मणणें आहे. कित्येक प्राचीन पद्धतींतही कांहीं अशा प्रकारें फेरफार करणारे विद्वान् आढळून येतात. त्यांनीं तो फेरफार, स्वतंत्र रीतीनें व उघड रीतीनें केला आहे तेथें आपणास क्षम्य ह्मटलाच पाहिजे. तो एक प्रकारें 'निराळा विधि' या सदरांत घालतां येईल. पण विधि एक धरून, त्या नांवाखालीं मुकाट्यानें फेरफार करणें मात्र अयोग्य आहे असें आह्मीं ह्मणतों.

या बाबतींत वारंवार लिहून चर्चा करण्याचा आमचा विचार असल्यानें, तूर्त आह्मीं इतकाच इषारा करून, आर्यवैद्यकाचा उत्कर्ष इच्छिणाऱ्या सर्व प्रकारच्या शोधकांस या लेखानें इतकी प्रार्थना करीत आहों, कीं—

## पाऱ्याच्या संस्कारासंबंधानें

त्यांनीं चर्चा करण्यास बाहेर पडावें. पाऱ्याचें शोधन केलें ह्मणजे तो वापरण्यालायक झाला; मग तो भस्में, खल्वी व कुपीस्थ रसायनें, अथवा

गुटिका वगैऱ्यांमध्यें वापरण्यास हरकत नाहीं. यांत कितपत ग्राह्यांश आहे याचा विचार करावयाचा आहे. (१) पारा प्रथम शोधनास घ्यावयाचा तो कोणता घ्यावा? (२) शोधन करावयाचें तें पाऱ्यावर करणें बरें कीं हिंगुळांतून शोधणें बरें? (३) हिंगुळांतून डमरूयंत्रानें पारा काढणें बरें? किंवा त्यावर फडकें गुंडाळून, त्यास आंच देऊन, पारा उडून न जातां धरतां येईल असा प्रयत्न (डमरुयंत्राशिवाय) करणें बरें? (४) स्वेदनादि संस्कार कोणत्या कार्यासाठीं किति करणें अगत्य आहे? व तो खरोखर शुद्ध होण्यास किति संस्कार जरूरीचे आहेत? (५) त्याच्यातील दोष नाहींसे करणें व त्याच्यांत गुण-वृद्धि करणें हे दोन भाग, संस्कारानुरोधानें कितपत आहेत?

अशा प्रकारें या बाबतींत पुष्कळ मुद्दे आहेत. रसरत्नसमुच्चयादि ग्रंथांत सांगितलेले संस्कार व प्रस्तुत व्यवहारांत जे न्यून संस्कार पाऱ्यावर होऊन तेवढ्यानेंच औषधें तयार होतात त्यांत कितपत योग्यायोग्य आहे अथवा तर-तमभाव आहे? याचा विचार या मुद्द्यांत यथासांग व्हावयास पाहिजे. त्याकरितां चर्चा करण्यास सर्व प्रकारें मोकळीक ठेविली आहे. सर्वांच्या लेखास स्थळ देण्यांत येईल. फक्त विषयावर लिहावें अशी मात्र विनंति आहे. या चर्चेचा परिणाम, प्रत्यक्ष त्याप्रकारचीं औषधें तयार करण्यास साधन व्हावें व औषधांचें फल, सर्वतः आपल्यास दिसून येऊन, आर्यवैद्यकाचें खरें स्वरूप दिसून यावें असा व्हावा हीच इच्छा आहे.

या लेखानें कोणास नांवें ठेवण्याचा आमचा हेतु नसून, फक्त चर्चा होऊन आर्यवैद्यकाचें यथार्थ स्वरूप लोकनिदर्शनास येण्यास साधन व्हावें हाच आहे. पुढच्या अंकीं यासंबंधानें आणखीही कांहीं विचार सादर करूं.

# वशीकरण-चिकित्सा.

मेस्मेरिझम् व हिपनॉटिझम् या नांवानें हल्लीं ज्या क्रिया प्रसिद्ध आहेत, त्या भारतवर्षांत फार प्राचीन काळापासून वशीकरण (वशिता) या नांवानें चालत आल्या आहेत. या विषयावर योग व तन्त्रशास्त्राचे अनेक मोठमोठे स्वतंत्र ग्रंथ लिहिलेले आहेत. पूर्वीं या विद्यांची इतकी उन्नति झाली होती कीं, त्यापासून सर्वसाधारण लोकांपासून मोठमोठ्या राजामहाराजांपर्यंत अनेक प्रकारचे लौकिक व अलौकिक फायदे करून घेत असत. परंतु हल्लीं आपल्या भरतखंडांत, कालगतिमाहात्म्यानें, आपल्या इतर अनेक लोकोत्तर विद्यांच्या ऱ्हासाबरोबर हेही विषय अगदीं लुप्तप्राय झाले आहेत. क्वचित् अवशिष्ट राहिले आहेत, ते अशा लोकांजवळ आहेत, कीं त्यांस याचें खरें उत्तम रहस्य कळलें नसल्यामुळें, ते याचा क्षुद्र उपयोग करितात. त्यामुळें लोकांची या विषयावरची आदरबुद्धि नाहींशी होऊन, ते यांचा तिरस्कार करितात. अशा रीतीनें उक्त विद्यांचा आपल्या देशांतून प्रायः समूळ नाश होण्याचा प्रसंग आला असून, पाश्चात्य देशांत मात्र त्यांचा दिवसेंदिवस उत्कर्ष होत चालला आहे. अमेरिकेंत तर केवळ याच विषयाच्या ज्ञानप्रसारार्थ बरींच वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें निघत असतात.

---

१ योगशास्त्राप्रमाणें क्रिया घडल्यावर आठ प्रकारच्या सिद्धि प्राप्त होत असतात. त्या येणेंप्रमाणें:—**अणिमा** (परमाणूप्रमाणें देखील देह सूक्ष्म करून घेण्याची शक्ति), **महिमा** (आकाशाएवढा देखील देह स्थूल करण्याची शक्ति), **गरिमा** (अति हलक्या पदार्थास पर्वतप्राय जड करण्याची शक्ति), **लघिमा** (पर्वत दिक अति जड पदार्थास हलकें करण्याचा शक्ति), **प्राप्ति** (पदार्थमात्राचें सान्निध्य होणें), **प्राकाम्य** (इच्छेस येईल तसें करण्याची शक्ति. जसें—जलांत बुडून जाणें, पुनः निघणें; वाटेल तेव्हां दिसणें, वाटेल तेव्हां गुप्त होणें इत्यादिक.), **ईशिता** (पाहिजे तो पदार्थ उत्पन्न करण्याची शक्ति), **वशिता** (चराचर स्वाधीन करून घेण्याची शक्ति.)

मेस्मेरिझम् व हिप्नॉटिझम् पासून जशा आपल्या क्षुल्लक वासना तृप्त करून घेतां येतात, त्याप्रमाणें व्यावहारिक व पारमार्थिक विषयांतही त्यांचा अनेक प्रकारें उत्तमोत्तम उपयोग करून घेतां येतो. नानाप्रकारचे दुश्चिकित्स्य रोग, विशेषेंकरून मानसिक रोग—ज्यांस आंग्लवैद्यकांत Functional diseases ह्मणतात—या क्रियापासून निवृत्त करितां येतात; अनेक प्रकारच्या दुष्ट सवई सोडवितां येतात; सतत अभ्यास केल्यानें भूतभविष्यकथा जाणण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें व शेवटीं योगसमाधिद्वारा साक्षात्परब्रह्मप्राप्तीपर्यंत पोंचतां येतें.

वस्तुतः मेस्मेरिझम् व हिप्नॉटिझम् हीं योगाचीं अंगें आहेत. यांत दोन क्रिया होतात. एकीकरण व वशीकरण. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' 'एकमेवाद्वितीयं ब्रह्म' या श्रुतीप्रमाणें सर्व जगांत एक आत्मा निरवच्छिन्न आकाशाप्रमाणें व्याप्त आहे, व तो संकल्पविकल्पात्मक मनाचा नित्यसाक्षी आहे. जगतांतील सर्व प्राण्यांची जी एक विशिष्ट मनोरूप शक्ति ती एकच आहे. परंतु कर्मभेदाप्रमाणें निरनिराळ्या स्वरूपांत आविर्भूत झाली आहे. त्यामुळें तत्तत्स्वरूपाच्या उपाधीनुरूप त्या त्या मनुष्याच्या वासना भिन्न भिन्न होतात. तशा दोन व्यक्तींच्या भिन्न भिन्न वासनांचें सम्मेलन अथवा एकीकरण करणें ही पहिली दशा. सम्मेलन झाल्यानंतर दोहोंपैकीं ज्याची मानसिकशक्ति बलवत्तर असते त्यानें आपल्या वासना दुसऱ्याच्या हृदयांत स्थापित करणें याचें नांव मेस्मेरिझम् होय. मानसिक शक्तीचें बीज, त्याचें स्थैर्य हें होय. ज्याच्या मनाचा संकल्पविकल्पात्मक स्वभाव निवृत्त होऊन चित्त निवात दिव्याप्रमाणें शांत व स्थिर झालें, तो सर्वांत बलवान् मनुष्य समजावा. आतां, अशा प्रकारची स्थिरता होणें हेंच योगाचें लक्षण आहे. 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' ॥ अशा प्रकारच्या स्थिरतेनें बलवान् झालेल्या मनाचें कार्य, जो गुण त्यांत प्रधान असेल त्या प्रकारचें होतें व हा मुद्दा

ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. कारण, या विषयाची युक्तायुक्तता या मुद्द्यावर अवलंबून असते. जर मन, तामसिक वासना-प्रधान असेल, तर तें लोकांवर उपकार न करितां उलटा अपकार करीत सुटेल. ह्मणूनच, ब्राह्मण, पूर्वी योगाभ्यासानें मनोबल व तदायत्त इतर सामर्थ्य संपादन करीत असल्यामुळें, त्यांचा नेहमीं सात्त्विकच उपयोग व्हावा एतदर्थ, त्यांचे आहारविहार वगैरे सर्व तशाच प्रकारचे सौम्य सांगितले होते. हल्लींचे मेस्मेरिझम् प्रयोग करणारे या मुद्द्याकडे द्यावें तितकें लक्ष देत नाहींत. कारण, कित्येक लोक तर यापासून केवळ आपल्या क्षुद्र इच्छा पूर्ण करण्याकरितांच या विषयाचा अभ्यास करीत असल्याचें आढळून येतें. या प्रयोगांच्या रीतीकडे पाहिलें असतां, असें स्पष्ट प्रतीत होतें कीं, त्या, योगाच्या अंगभूत ध्यानसमाधीच्या तत्वावर बसविलेल्या आहेत. 'तत्रैकतानता ध्यानम्,' 'सजातीय-प्रत्ययप्रवाहान्तरितविजातीयप्रत्ययप्रवाहाभिमुखीकरणम्' असें ध्यानाचें लक्षण आहे. कोणत्याही वस्तूशीं तद्रूप होणें, त्यांत सर्व वृत्ति लीन होऊन तदाकार बनणें याचें नांव ध्यान. किंवा ज्या वस्तूविषयीं आपण एकाग्रचित्तानें विचार करीत असतों, त्या विचारप्रवाहाच्या मध्यंतरीं ज्या तत्प्रतिकूल वासना, कल्पना किंवा वृत्ति उठतील त्यांचा निग्रह करून, आपल्या ध्येय विषयांकडे त्यांस लावणें याचें नांव ध्यान. हीच क्रिया मेस्मेरिझम् व हिप्नाटिझम्मध्यें होते. प्रयोक्ता, प्रयुक्ताची वृत्ति सर्वथा आपल्या ठायीं लीन करून घेतो, ह्मणजे आपलें यथार्थ ध्यान करावयास लावतो. त्या वेळीं प्रयुक्ताचे स्वतःचे सर्व तरंग बाजूस राहून, त्याच्या अंतःकरणांत प्रयोग करणाराच्या हृदयांतील सर्व विचार प्रविष्ट होतात व प्रयोगाच्या पुनरावृत्तीनें ते त्याचे स्वतःचेच विचार बनतात. यावरून वाटेल तशा दुष्ट विचारांच्या मनुष्यास सात्विक व निर्मल अंतःकरणाचा मनुष्य कशा रीतीनें बनवितां येतें हें स्पष्ट होतें. अपूर्ण.

कण्हेरी पेजेसहित, (ज्यांत पेजच विशेष आहे अशी) रोग्याच्या शक्तीच्या मानानें, त्यास द्यावी. दुसऱ्या व तिसऱ्या जेवणाच्या वेळीं अशीच कण्हेरी द्यावी. चवथ्या वेळीं जुन्या लाल साळीच्या तांदुळांची विलेपी, तूप-मिठाशिवाय किंवा थोडेंसें तूप-मीठ टाकून द्यावी. वर ऊन पाणी प्यावयास द्यावें. पांचव्या व सहाव्या वेळीं हेंच द्यावें. सातव्या वेळीं तशाच प्रकारच्या दोन पसे तांदुळांचा सरबरीत भात, किंचित तूप व मीठ टाकलेल्या पातळशा मुगाच्या डाळीच्या कढवणाबरोबर (यूष) जेवूं घालावा. वर ऊन पाणी द्यावें. आठव्या व नवव्या वेळीं असेंच करावें दहाव्या वेळीं लावा, कपिंजल वगैरे पक्ष्यांपैकीं कोणा तरी एकाच्या, पाणी व मीठ घालून तयार केलेल्या, मांसरसाबरोबर जेवूं घालावें; वर ऊन पाणी प्यावयास द्यावें. अकराव्या व बाराव्या वेळीं हेंच द्यावें. यापुढें क्रमशः मधुर-लवण-तिक्तादि व जड-कठिण वगैरे निरनिराळ्या रसांचें व निरनिराळ्या गुणयुक्त पदार्थांचें सेवन करून सातव्या रात्रीं नेहमींच्या जेवणावर यावें *

---

* यांत **सायंकाळीं** किंवा दुसरे दिवशीं **सकाळीं** स्नान वगैरे घालून कण्हेरी द्यावी असें जें मोघम सांगितलें आहे त्याचा अभिप्राय असा कीं, वमन झाल्यानंतर देखील जर रोग्याचे दोष जीर्ण झाले नसतील तर त्यानें लंघनच करावें आणि ज्यावेळीं ते जीर्ण झाल्याचीं लक्षणें दिसतील त्यावेळेपासून पेयादिक्रम सुरू करावा. मग तें त्यादिवशीं संध्याकाळीं असो किंवा दुसरे दिवशीं सकाळीं असो. सांगितलेंच आहे कीं—"वमितं लङ्घयेत्सम्यग्जीर्णलिङ्गान्यपेक्षयन्। तानि दृष्ट्वा तु पेयादिक्रमं कुर्यान्न लंघनम्" ॥-दुसरें—हा जो सर्व विधि सांगितला आहे तो, ज्याचें उत्तम प्रकारें शोधन झालें आहे त्यासच फक्त लागू पडणारा आहे. याविषयीं विशेष नियम सिद्धिस्थानांत सांगितला आहे तो असा-"पेयां विलेपी मकृतं कृतं च। यूषं रसं त्रीनुभयं तथैकम्। क्रमेण सेवेत नरोऽन्नकालान्प्रधानमध्यावरशुद्धिशुद्धः" ॥ उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशा प्रकारांनीं शोधन झालेल्या रोग्यानें पेया, विलेपी व यूषरस क्रमानें प्रत्येकीं तीन, दोन व एक एक वेळां घ्यावा. याचा स्पष्टार्थ असा आहे कीं, ज्याची उत्तम प्रकारें शुद्धि झाली असेल त्यानें एक दिवशीं दोन वेळ व दुसऱ्या दिवशीं एक वेळ पेया घ्यावी. दुसऱ्या दिवशीं एक वेळ विलेपी व तिसऱ्या दिवशीं दोन वेळ विलेपी घ्यावी.

अथैनं पुनरेव स्नेहस्वेदाभ्यामुपपाद्यानुपहतमानसमभिसमीक्ष्य सुखोषितं सुप्रजीर्णभक्तं कृतहोमबलिमङ्गलजप्यप्रायश्चितमिष्टे तिथिनक्षत्रकरणमुहूर्ते ब्राह्मणान्स्वस्तिवाचयित्वा त्रिवृत्कल्कमक्षमात्रां यथार्हालोडनप्रतिविनीतां पाययेत्प्रसमीक्ष्य दोषभेषजदेशकालबलशरीराहारसात्म्यसत्वप्रकृतिवयसामवस्थान्तराणि विकाराँश्च । सम्यग्विरिक्तश्चैनं वमनानन्तरलक्षणोक्तेन धूमवर्जेन विधिनोपपादयेदाबलवणप्रकृतिलाभाद्बलवर्णोपपन्नश्चैनमनुपहतमानसमभिसमीक्ष्य सुखोषितं सुप्रजीर्णभक्तं शिरःस्नातमनुलिप्तगात्रं स्रग्विणमनुपहतवस्त्रसंवीतमनुरूपालङ्कारालङ्कृतं सुहृदां दर्शयित्वा ज्ञातीनां दर्शयेदथैनं कामेष्ववसृजेत् ॥ १७ ॥

याप्रमाणें हा क्रम आटोपून रोग्यास पुन्हां स्नेहन व स्वेदन द्यावें. तें झाल्यावर, रोग्याचे चित्त प्रसन्न आहे, त्यास सर्वरात्र चांगली झोंप लागली होती व त्यानें खाल्लेलें सर्व अन्न पचलें आहे असें पाहून

---

चवथ्या दिवशीं दोन वेळ व पांचव्या दिवशीं एक वेळ अकृत (सुंठ, मीठ वगैरे न टाकितां केलेलें) यूष घ्यावें. बाकी राहिलेल्या तीन वेळीं कृत यूष घ्यावें. याप्रमाणें बारा वेळचा हा विधि झाला ज्याचें शोधन मध्यम प्रतीचें झाले असेल त्यानें प्रत्येक जातीचा आहार तीन वेळां न घेतां दोन वेळ घ्यावा. ह्मणजे त्याचा एकंदर क्रम आठ वेळांत आटपतो. कनिष्ठ प्रतीच्या शोधनाच्या रोग्याचा विधि चारच वेळांत संपतो. **तिसरें**–सातव्या रात्रीं नेहमींच्या आहारावर यावें असें सांगितलें आहे परंतु तसें करणें तें वमनानंतर विरेचन द्यावयाचें नसेल तरच करावें. विरेचन द्यावयाचें असल्यास वमनानंतर स्नेहपान केलें पाहिजे. 'संसृष्टभक्तं नवमेऽन्हि सर्पिस्तं पाययद्वाऽप्यनुवासयेद्वा' असें प्रमाणच आहे. सुश्रुतांतही सांगितलें आहे कीं, 'पक्षाद्विरेको वान्तस्य.' जर वमनानंतर पेयादिक्रम व निरानिराळया रसांचें क्रमशः सेवन करून मग स्नेहन केलें तर 'पक्षाद्विरेको वान्तस्य' या प्रमाणास बाध येतो.

तिथि, नक्षत्र, करण व मुहूर्त यांच्या शुभयोगावर त्याच्याकडून होम, बलि, मंगल, जप व प्रायश्चित्त हे विधि करवून आणि ब्राह्मणांकडून स्वस्तिवाचन करवून, दोष, औषध, देश, काल, बल, शरीर, आहार, सात्म्य, सत्व, प्रकृति व वय यांच्या पूर्वोक्तभेदांचा व रोग्याच्या विकारांचा पूर्णपणें विचार करून व त्यावरून योग्य वाटणाऱ्या इतर द्रव्यांत मिळवून, एक तोळा ( ८० गुंजा ) निशोत्तराचा कल्क त्या रोग्यास पाजावा. त्यापासून त्याचें साफ विरेचन झालें ह्मणजे, वमनानंतर जो पेयादिविधि सांगितला आहे त्यापैकीं फक्त धूमपानखेरीज करून बाकी सर्व तोच विधि रोग्याच्या उपयोगांत आणावा व तो रोग्याची शक्ति, प्रकृति व वर्ण हीं पूर्वीप्रमाणें सुस्थावस्थेंत येईपर्यंत तसाच चालू ठेवावा. तो बलवर्णसंपन्न झाला ह्मणजे त्याचें चित्त प्रसन्न आहे, त्यास पूर्व रात्रीं झोंप चांगली लागली होती, व त्यानें खाल्लेलें सर्व अन्न चांगलें जीर्ण झालें आहे असें ज्या दिवशीं सकाळीं दिसेल त्यादिवशीं त्यास डोक्यावरून स्नान घालावें, त्याच्या अंगास सुगंधी उटी लावावी, व गळ्यांत माळा घालाव्या, चांगलीं स्वच्छ वस्त्रें अंगावर द्यावीं व तदनुरूप चांगले अलंकार अंगावर घालावे आणि अशा समारंभानें त्यास आपले इष्टमित्र व ज्ञानीचे लोक असतील त्यांस भेटवून त्या वेळेपासून त्यास त्याच्या इच्छेप्रमाणें वागण्यास मोकळीक द्यावी. ×

अनेन विधिना राजा राजमात्रोऽथवा पुनः ।
यस्य वा विपुलं द्रव्यं स संशोधनमर्हति ॥ १८ ॥
दरिद्रस्त्वापदं प्राप्य प्राप्तकालं विरेचनम् ।
पिबेत्काममसम्भृत्य सम्भारानपि दुर्लभान् ॥ १९ ॥

× याचा अर्थ असा मात्र समजूं नये कीं, त्यास मोकळीक मिळाली ह्मणजे त्यानें यथेच्छ वाटेल ते आहारविहार करावे. या लिहिण्याचा अभिप्राय इतकाच आहे कीं ज्या गोष्टी सामान्यतः विहित असूनही संशोधनाच्यासंबंधानें फक्त निषिद्ध केल्या होत्या त्यांवर त्याची इच्छा जात असल्यास त्यानें त्या कराव्या.

न हि सर्वमनुष्याणां सन्ति सर्वपरिच्छदाः ।
न च रोगा न बाधन्ते दरिद्रानपि दारुणाः ॥ २० ॥
यद्यच्छक्यं मनुष्येण कर्तुमौषधमापदि ।
तत्तत्सेव्यं यथाशक्ति वसनान्यशनानिच ॥ २१ ॥
मलापहं रोगहरं बलवर्णप्रसादनम् ।
पीत्वा संशोधनं सम्यगायुषा युज्यते चिरम् ॥ २२ ॥

राजे, त्याहून उतरत्या श्रेणीचे जहागिरदार वगैरे लोक व शेटसावकारादि धनवान् लोकांस संशोधन देणें तें याविधीनें द्यावें. एखाद्या दरिद्री मनुष्यास रोग उत्पन्न होऊन विरेचन घेण्याचा प्रसंग आला तर त्यानें या अध्यायांत सांगितलेल्या सामग्रीसाठीं अडून न असतां त्या वांचूनच संशोधन घ्यावें. कारण त्यास ती सर्व सामग्री मिळणें दुरापास्त असतें. सर्वत्र मनुष्यांस सर्व सामग्री मिळूं शकतें असें नाहींत. परंतु असें आहे ह्मणून दरिद्री लोकांस भयंकर रोगच होत नाहीं असें मात्र होत नाहीं. सारांश रोग सर्वांस होतात परंतु त्यांच्या प्रतीकारांची उत्तम सामग्री मात्र थोड्या मनुष्यांजवळ असते. ह्मणून रोग झाला असतां मनुष्यानें आपापल्या शक्तिप्रमाणें औषधोपचार व आहारविहारादिकांचें सेवन करीत असावें. संशोधनानें शरीरांतील मळ निघून जातो, रोग नाहींसे होतात, शक्ति वाढते, वर्ण प्रफुल्लित होतो आणि मनुष्य दीर्घायुषी होतो.

ईश्वराणां वसुमतां वमनं सविरेचनम् ।
सम्भारा ये यदर्थश्च समानीय प्रयोजयेत् ॥ २३ ॥
यथा प्रयोज्या मात्रा या यदयोगस्य लक्षणम् ।
योगातियोगयोर्यच्च दोषा येचाप्युपद्रवाः ॥ २४ ॥
यदसेव्यं विशुद्धेन यश्च संसर्जनक्रमः ॥
तत्सर्वं कल्पनाध्याये व्याजहार पुनर्वसुः ॥ २५ ॥

राजे, जहागिरदार व धनिक लोकांस वमन व विरेचन देण्याचा विधि, त्यास लागणारीं साहित्यें, त्यांचा निरानिराळा उपयोग, औषधाची मात्रा, ती द्यावयाचा प्रकार, योग, अयोग व अतियोगाचीं लक्षणें आणि अयोग व अतियोगापासून होणारे उपद्रव, संशोधनानंतर वर्ज करावयाचे विषय व पेयादिक्रम, इतक्या विषयांचें विवेचन आत्रेयऋषींनीं या उपकल्पनीय अध्यायांत केलें आहे.

इत्यग्निवेशकृते तन्त्रे चरकप्रतिसंस्कृते
उपकल्पनीयो नाम पञ्चदशोऽध्यायः समाप्तः

# अथ षोडशोऽध्यायः ।

अथातश्चिकित्साप्राभृतीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण चिकित्साप्राभृतीय नांवाच्या अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले. ( या अध्यायांत, मागील अध्यायांत सांगितलेल्या वमनविरेचनांच्या योग–अयोगादिकांचीं लक्षणें व वमनविरेचन कोणत्या रोग्यांनीं कोणाकडून घ्यावें याविषयींचें सविस्तर निरूपण आहे. )

चिकित्साप्राभृतो विद्वान् शास्त्रवान्कर्मतत्परः ।
नरं विरेचयति यं स योगात्सुखमश्नुते ॥ २ ॥
यं वैद्यमानी त्वबुधो विरेचयति मानवम् ।
सोऽतियोगादयोगाच्च मानवो दुःखमश्नुते ॥ ३ ॥

विद्वान्, शास्त्रसिद्धान्तांचें रहस्य जाणणारा व चिकित्सेंत तत्पर अशा ‘ चिकित्साप्राभृत ’[1] वैद्याकडून जो रोगी वमनविरेचन[2] प्रयोग करवितो त्याचें उत्तम प्रकारें संशोधन होऊन तो निरोगी होतो. त्याच्याच उलटपक्षीं एखाद्या अविद्वान् व वैद्यपणाची निव्वळ घमेंड बाळगणाऱ्या

---

१ रोग्यांस चिकित्सारूपी भेट किंवा नजराणा नेहमीं यत्नपूर्वक आदरानें देण्याविषयीं तत्पर राहणारा असा जो विद्वत्तादिगुणांनीं युक्त वैद्य तो.

२ विरेचन शब्दानें वमनाचेंही ग्रहण होतें.

'वैद्यानें' संशोधन दिलें असतां रोग्यास तें बरोबर न लागू पडतां त्याचा अतियोग किंवा अयोग होऊन अनेक व्याधि[3] उत्पन्न होतात. *

दौर्बल्यं लाघवं ग्लानिर्व्याधीनामणुता रुचिः ।
हृद्वर्णशुद्धिः क्षुत्तृष्णा काले वेगप्रवर्तनम् ॥ ४ ॥
बुद्धीन्द्रियमनःशुद्धिर्मारुतस्यानुलोमता ।
सम्यग्विरिक्तलिङ्गानि कायाग्नेश्चानुवर्तनम् ॥ ५ ॥

शरीराचा स्थूलपणा कमी होणें, अंग हलकें होणें, थकवा येणें, विकार कमी होणें, तोंडास रुचि येणें, हृदय शुद्ध होणें, शरीराचा वर्ण सतेज होणें, वेळेवर भूक व तहान लागणें, वेळेवर मलमूत्रादिकांचें उत्सर्जन होणें, बुद्धि, इंद्रियें आणि मन निर्मल व प्रफुल्लित होणें, वाताचें अनुलोमन होणें ह्मणजे त्यानें आपल्या स्वाभाविक नियत मार्गानें संचार करणें आणि जठराग्नि प्रकृतावस्थेंत येणें हीं लक्षणें

---

३ मूलांत 'दुःख' शब्द आहे. त्याचा अर्थ 'विकारो दुःखमेव तु' या वचनाप्रमाणें रोगादिक होतो.

* वमनविरेचनाच्या मिथ्यायोगाचें वर्णन, इतर विषयांसंबंधांत केलें आहे, तसें कां केलें नाहीं ही शंका येथें उद्भवते. त्याचें समाधान असें आहे कीं, येथें योग, अयोग व अतियोग या तिहींचें वर्णन केलें आहे. त्यापैकीं अयोगांत मिथ्या योगाचा समावेश होत असल्यामुळें त्याचा वेगळा निर्देश केला नाहीं. अल्पयोग होणें किंवा मुळींच न होणें याचें नांव अयोग व अनुचित संबंध होणें हा मिथ्या योग उदाहरणार्थ—ज्यास विरेचन द्यावयाचें असेल त्याचा कफ पूर्वी वमनद्वारा निघून गेला पाहिजे ह्मणजे विरेचनाचा बराबर योग होईल असें सांगितलें आहे. परंतु याच्या उलट कफ वाढलेला असतां विरेचन दिलें तर त्याचा परिणाम 'विरेचन वृद्धकफे तथोर्ध्वम्' या वचनाप्रमाणें असा होईल कीं, विरेचन प्रतिलोमगामी अर्थात् ऊर्ध्वगामी होईल. या ऊर्ध्वगामी होण्यास अयोग झाला असें ह्मणण्यांत येईल. 'प्रातिलोम्येन दोषाणां हरणाद्धेत्वकृत्स्नशः । अयोगसंज्ञे कृच्छ्रेण यदा गच्छति चाल्पशः' असें अयोगाचें लक्षण सांगितलेंच आहे. ह्मणजे मिथ्या योगाच्या परिणामाचा समावेश अयोगाच्या लक्षणांत झाला ह्मणून मिथ्यायोगाचें निराळें वर्णन केलें नाहीं.

झालें असतां रोग्यास विरेचन बरोबर लागू पडून त्याचें चांगलें संशोधन झालें असें समजावें.

> ष्ठीवनं हृदयाशुद्धिरुत्क्लेशः श्लेष्मपित्तयोः ।
> आध्मानमरुचिश्छर्दिरदौर्बल्यमलाघवम् ॥ ६ ॥
> जङ्घोरुसदनं तन्द्रा स्तैमित्यं पीनसागमः ।
> लक्षणान्यविरिक्तानां मारुतस्य च निग्रहः ॥ ७ ॥

वारंवार थुंकणें, छाती भरलेली राहणें, कफ व पित्त हीं वाढून त्यायोगानें अनेक विकार उत्पन्न होणें, पोट फुगणें, अरुचि, ओकारी शरीराचा स्थूलपणा न जाणें, अंग हलकें न होणें, पोटऱ्या व मांड्या वळणें, सुस्ती येणें, अंग जड होणें, पडसें येणें व वायूचा अवरोध होणें हीं लक्षणें विरेचनाचा अयोग झाला असतां होतात.

> विट्पित्तश्लेष्मवातानामागतानां यथाक्रमम् ।
> परं स्रवति यद्रक्तं मेदमांसोदकोपमम् ॥ ८ ॥
> निःश्लेष्मपित्तमुदकं शोणितं कृष्णमेव वा ।
> तृष्यतो मारुतार्त्तस्य सोऽतियोगः प्रमुह्यतः ॥ ९ ॥
> वमनेऽतिकृते लिङ्गान्येतान्येव भवन्ति हि ।
> ऊर्ध्वगा वातरोगाश्च वाग्ग्रहश्चाधिको भवेत् ॥ १० ॥

प्रथम विष्ठा, पित्त, कफ व वात या अनुक्रमानें दोष बाहेर निघून नंतर मेद किंवा मांसाच्या धुवणासारखें तांबडें, कफ व पित्त नसलेलें, रक्तमिश्रित असें पाणी किंवा काळ्या रंगाचें रक्त निघूं लागेल, रोग्यास तहान लागेल, वाताचा जोर वाढेल व मूर्च्छा येईल तर त्यास विरेचनाचा अतियोग झाला असें समजावें. वमनाचा अतियोग झाला असतांही हींच लक्षणें होतात. त्यांत फक्त वात ऊर्ध्वगामी झाल्यामुळें होणारे विकार व आवाज बसणें हे उपद्रव अधिक होतात.

चिकित्साप्राभृतं तस्मादुपेयाच्छरणं नरः ।
युञ्ज्याद्य एनमत्यन्तमायुषा च सुखेन च ॥ ११ ॥

याप्रमाणें संशोधनाच्या क्रियेंत कांहीं प्रमाद झाला असतां, त्यापासून अयोग किंवा अतियोग होऊन नानाप्रकारचे उपद्रव होतात. ह्मणून रोग्यानें नेहमीं वर वर्णन केल्याप्रमाणें विद्वत्तादि सद्गुणसंपन्न असा जो 'चिकित्साप्राभृत' वैद्य असेल, त्या सत्र शरण जाऊन, त्याच्याद्वारा संशोधन घ्यावें ह्मणजे त्यापासून दीर्घायु व आरोग्य प्राप्त होईल.

अविपाकोऽरुचिः स्थौल्यं पाण्डुता गौरवं क्लमः ।
पिडकाकोठकण्डूनां सम्भवोऽरतिरेव च ॥ १२ ॥
आलस्यश्रमदौर्बल्यं दौर्गन्ध्यमवसादकः ।
श्लेष्मपित्तसमुत्क्लेशो निद्रानाशोऽतिनिद्रता ॥ १३ ॥
तन्द्राक्लैब्यमबुद्धित्वमशस्तस्वप्नदर्शनम् ।
बलवर्णप्रणाशश्च तृप्यतो बृंहणैरपि ॥ १४ ॥
बहुदोषस्य लिङ्गानि तस्मै संशोधनं हितम् ।
ऊर्ध्वञ्चैवानुलोम्यञ्च यथादोषं यथाबलम् ॥ १५ ॥

अपचन, अरुचि; शरीर स्थूल होणें, फिकें व निस्तेज पडणें, जड होणें, श्रमावांचून नेहमीं थकवा वाटणें, अंगावर गळवें–फोड वगैरे होणें, शीतपित्त, खाज सुटणें, दुर्गंधि येणें, मनास ग्लानि वाटणें, कफ व पित्त यांचा जोर वाढणें, झोंप न येणें किंवा अतिशय येणें,[1] नेहमीं सुस्ती असणें, निरुत्साह, बुद्धिमांद्य, वाईट स्वप्नें पडणें व चांगले पुष्टिकारक आहार सेवन करीत असूनही शक्ति व तेज नाहींसें होणें हीं लक्षणें ज्यास होत असतील त्याचे सर्व दोष अतिशय वाढलेले आहेत असें समजावें. अशा रोग्यास, त्याचे दोष व शक्ति यांच्या मानानें ऊर्ध्व व अधोगामी संशोधन अर्थात् वमन व विरेचन देणें हितकारक असतें.

---

१ झोंप न येणें हें वातप्रधान दोषानें होतें व कफाच्या जोरानें अधिक झोंप येते.

एवं विशुद्धकोष्ठस्य कायाग्निरभिवर्द्धते ।
व्याधयश्चोपशाम्यन्ति प्रकृतिश्चानुवर्तते ॥ १६ ॥
इंद्रियाणि मनोबुद्धिर्वर्णश्चास्य प्रसीदति ।
बलं पुष्टिरपत्यञ्च वृषता चास्य जायते ॥ १७ ॥
जरां कृच्छ्रेण लभते चिरञ्जीवत्यनामयः ।
तस्मात्संशोधनं काले युक्तियुक्तं पिबेन्नरः ॥ १८ ॥

याप्रमाणें संशोधन घेऊन ज्याचा कोठा शुद्ध झाला आहे त्याचा जठराग्नि प्रदीप्त होतो, रोग शान्त होतात, सर्व दोष व धातु आपापल्या प्रकृतदशेस प्राप्त होतात; इंद्रियें, मन, बुद्धि व वर्ण हीं प्रफुल्लित होतात; शरीर पुष्ट होतें, शक्ति वाढते, कामोद्दीपन होतें, अकालीं वृद्धावस्था प्राप्त होत नाहीं व याप्रमाणें निरोगी होऊन तो दीर्घकालपर्यंत वांचतो. परंतु हे सर्व अलौकिक गुण प्राप्त होण्यास, संशोधन योग्य काळीं व सांगितलेल्या विधीप्रमाणें यथार्थ रीतीनें घेतलें पाहिजे. ह्मणून ज्यांस संशोधन घ्यावयाचें त्यांनीं अशाच रीतीनें घ्यावें.

दोषाः कदाचित्कुप्यन्ति जिता लङ्घनपाचनैः ।
जिताः संशोधनैर्ये तु न तेषां पुनरुद्भवः ॥ १९ ॥
दोषाणाञ्च द्रुमाणाञ्च मूलेऽनुपहते सति ।
रोगाणां प्रसवानाञ्च गतानामागतिर्ध्रुवा ॥ २० ॥

लङ्घन व पाचनाच्या योगेंकरून हटविलेले विकार कदाचित् पुनः उद्भवण्याचा संभव असतो. परंतु संशोधनाच्या योगानें बरे केलेले विकार पुन्हा उद्भवत नाहींत. जसें—एखाद्या वृक्षाचें मूळ कायम ठेवून फक्त त्याचा शाखादि विस्तार तोडून टाकला असतां, त्यास कालान्तरानें शाखा वगैरे फुटून तो पुन्हा पूर्ववत् होतो, तद्वत्च, शरीरांतील दोष जर समूळ

काढून टाकले नाहींत तर पुन्हा ते कांहीं कारणानें वाढून रोग उत्पन्न करितात.*

भेषजक्षपिते पथ्यमाहारैरेव बृंहणम् ।
घृतमांसरसक्षीरहृद्ययूषोपसंहितैः ॥ २१ ॥
अभ्यङ्गोत्सादनैः स्नानैर्निरूहैः सानुवासनैः ।
तथा स लभते शर्म युज्यते चायुषा चिरम् ॥ २२ ॥

आतां ज्या प्रमाणें संशोधनानें दोषांचा नाश झाला त्याप्रमाणें त्यांच्याबरोबर धातुक्षय होण्याचाही संभव असतो. ह्मणून त्याच्या प्रतीकारास्तव सांगतात कीं, वमन-विरेचनानें कृश झालेल्या रोग्यास पुष्टि आणणें इष्ट आहे. पण ती, वीर्यप्रधान औषधांच्या द्वारा न आणतां तूप-मांसरस-दूध व हृदयास हितकारक अशा निरनिराळ्या डाळीच्या रसांनीं मिश्रित केलेल्या आहारांनीं, अभ्यङ्ग-मर्दन-स्नान आणि निरूह व अनुवासन बस्ती यांच्या योगानें आणली पाहिजे. कारण, वीर्यप्रधान औषधांचा जोर रोगी त्या स्थितींत सहन करूं शकणार नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें आहारादिकांनीं त्याचें बृंहण केल्यानें तो ताजातवाना होऊन दीर्घकालपर्यंत जगतो.

अतियोगानुबद्धानां सर्पिःपानं प्रशस्यते ।
तैलं मधुरकैः सिद्धमथ वाऽप्यनुवासनम् ॥ २३ ॥

---

* याचा भावार्थ असा आहे कीं, एखाद्या रोगास कारणीभूत झालेला जो दोषाचा प्रकोप तेवढाच लंघनपाचनाच्या योगेंकरून काढून टाकल्यामुळें, तो रोग बरा झाला असल्यास, कालान्तरानें यत्किंचित् कारणानेंही मूलाशयांत जाऊन राहिलेला शेष दोष पुन्हा प्रकुपित होऊन पूर्वींचा विकार पुन्हा उत्पन्न करील. परंतु संशोधनाचें तसें नाहीं. कारण, संशोधन दोषांस समूळ काढून टाकितें. त्यामुळें तसेंच प्रबळ कारण झाल्यावांचून संशोधनानें बरे झालेले रोग पुन्हा उद्भवत नाहींत. लंघन व पाचन, केवळ दोषांचा प्रकोप कमी करूं शकतें. त्यांस समूळ काढूं शकत नाहीं. दृष्टान्त स्पष्टच आहे.

यस्य त्वयोगस्तं स्निग्ध पुनः संशोधयेन्नरम् ।
मात्रा कालबलापेक्षी स्मरन्पूर्वमनुक्रमम् ॥ २४ ॥
स्नेहने स्वेदने शुद्धौ रोगाः संसर्जने च ये ।
जायन्तेऽमार्गविहिते तेषां सिद्धिषु साधनम् ॥ २५ ॥

ज्यास अतियोगाचे उपद्रव होत असतील त्यास तूप पाजणें हा उत्तम उपाय आहे. किंवा मधुरवर्गांतील द्रव्यांनीं सिद्ध केलेलें तेल अथवा अनुवासन बस्ती द्यावा. ज्यास अयोग झाला असेल, त्यास प्रथम स्नेहन करून पुन्हा संशोधन द्यावें. तें देतांना पूर्वीच्या वेळीं, औषध किती प्रमाणांत दिलें होतें, कोणत्या वेळीं दिलें होतें, सध्या रोग्याच्या शक्तीचें मान कसें आहे, पूर्वीं औषध कोणत्या रीतीनें दिलें होतें व त्या वेळीं कोणत्या कारणानें अयोग झाला, हें सर्व लक्ष्यांत आणून पूर्वीं घडलेलें अयोगाचें कारण या खेपेस टाळण्याची खबरदारी घ्यावी. स्नेहन, स्वेदन, संशोधन व त्यानंतरचा पेयादिक्रम हीं सांगितलेल्या विधिप्रमाणें न झालीं असतां होणाऱ्या रोगांचे उपाय पुढें सिद्धिस्थानांत सांगूं.

जायन्ते हेतुवैषम्याद्विषमा देहधातवः ।
हेतुसाम्यात्समास्तेषां स्वभावोपरमः सदा ॥ २६ ॥
प्रवृत्तिहेतुर्भावानां न निरोधेऽस्ति कारणम् ।
केचित्त्वत्रापि मन्यन्ते हेतुं हेतोरवर्तनम् ॥ २७ ॥

एवमुक्तार्थमाचार्यमग्निवेशोऽभ्यभाषत ।
स्वभावोपरमे कर्म चिकित्साप्राभृतस्य किम् ॥ २८ ॥

भेषजैर्विषमान्धातून्कान्समीकुरुते भिषक् ।
का वा चिकित्सा भगवन्किमर्थं वा प्रयुज्यते ॥ २९ ॥

तच्छिष्यवचनं श्रुत्वा व्याजहार पुनर्वसुः ।
श्रूयतामत्र या सौम्य युक्तिर्दृष्टा महर्षिभिः ॥ ३० ॥

न नाशकारणाभावाद्भावानां नाशकारणम्।
ज्ञायते नित्यगस्येव कालस्यात्ययकारणम् ॥ ३१ ॥
शीघ्रगत्वाद्यथा भूतस्तथा भावो विपद्यते।
निरोधे कारणं तस्य नास्ति चैवान्यथाक्रिया ॥ ३२ ॥
याभिः क्रियाभिर्जायन्ते शरीरे धातवः समाः।
सा चिकित्सा विकाराणां कर्म तद्भिषजां स्मृतम् ॥ ३३ ॥
कथं शरीरे धातूनां वैषम्यं न भवेदिति।
समानाश्चानुबन्धः स्यादित्यर्थं क्रियते क्रिया ॥ ३४ ॥
त्यागाद्विषमहेतूनां समानाश्चोपसेवनात्।
विषमा नानुबध्नन्ति जायन्ते धातवः समाः ॥ ३५ ॥

आतां, सर्व रोग क्षणिक आहेत व ते आपोआप नाश पावतील, करितां त्यांची चिकित्सा करण्याचें कांहीं कारण नाहीं असें जें नास्तिक मत आहे, त्याचें खंडण करण्याकरितां, आत्रेयऋषी त्या मताचा पूर्वपक्ष करितात. तो असा—हेतुवैषम्यामुळें अर्थात् कारणें विषम झाल्यानें ह्मणजे ज्या कारणांचें कार्य ज्या धातूंवर घडत असेल तीं कारणें विकृत झाल्यामुळें शरीरांतील ते धातू विषम किंवा विकृत होतात. पुन्हां तीं कारणें सम किंवा प्रकृत झालीं ह्मणजे ते विकृत धातु सम होतात! याप्रमाणें त्यांचा ह्मणजे विषम व सम धातूंचा, उत्पन्न झाल्याबरोबर लागलाच आपोआप नाश होतो. जगांतील सर्व पदार्थ उत्पन्न होण्यास कारण लागतें; परंतु त्यांच्या नाशास कारणाची अपेक्षा नसते. कित्येकांचें मात्र असें मत आहे कीं कारण न होणें झाल्यानें कार्य नाहींसें होतें तर कारणाचा नाश होणें हेंच कार्याच्या नाशाचें कारण होय. आत्रेयांनीं येथपर्यंत हा पूर्वपक्ष सांगितला. तो ऐकून अग्निवेश विचारूं लागले कीं, हे महाराज! जर रोग आपोआप नाश पावतात तर आपण नुकेंच वर्णन केलेल्या 'चिकित्साप्राभृत' वैद्याचें काय प्रयोजन! कोणत्या विषम धातूंस वैद्य औषधांनीं सम करणार! चिकित्सा कशाची व कशा करितां ती करावयाची! या सर्व गोष्टी

अगदीं अप्रयोजक समजल्या पाहिजेत. यावर आत्रेय ऋषि पुन्हां आपल्या पूर्वपक्षाचेंच समर्थन करूं लागतात व ह्मणतात कीं, हे अग्निवेश ! महर्षींची याविषयीं जी युक्ति आहे ती श्रवण कर. पदार्थांच्या नाशाचें कारण तें नसल्यामुळें कळत नाहीं. जसें नेहमीं चालणाऱ्या वेळेच्या नाशाचें कारण नसल्यामुळें तें कळत नाहीं, तद्वतच हें समजावें. त्याचप्रमाणें पदार्थ उत्पन्न होतात व लागलेच नाश पावतात. हें चक्र चाललें आहे. ह्मणून त्यांच्या नाशास कारण नको. त्याच कारणानें त्यांत फेरबदलही करितां येत नाहीं. आतां यापुढें समाधान करितात. तें असें—ज्या क्रियांनीं शरीरांतील धातू सम होतात ती रोगांची चिकित्सा व तेंच वैद्याचें काम. शरीरांतील धातु विषम होऊं नयेत व समधातूंची परंपरा चालू रहावी याकरितां चिकित्सा केली जाते. विषम कारणें सोडून दिल्यानें व सम कारणांचें सेवन केल्यानें विषम परंपरा उत्पन्न न होतां शरीरांतील धातू नेहमीं सम राहतील.*

---

* याच्या आरंभीं केलेला पूर्वपक्ष नास्तिकांचा 'क्षणभंगभाव' पक्ष आहे. ते असें मानितात कीं, जगतांतील यावत्पदार्थ क्षणभंगुर आहेत, या क्षणभंगुर शब्दाचा अर्थ मात्र जसा आपण हा सर्व संसार क्षणभंगुर आहे असें ह्मणतांना करितों तसा करावयाचा नव्हे, तर अक्षरशः क्षणभंगुर असा करावयाचा. त्यांची तर्कपरंपरा संक्षेपतः अशी आहे कीं—सर्व पदार्थांच्या उत्पत्तीस कारणाची जरूर असते; परंतु नाशास नसते. नाश आपोआप होतो. जसें, दिवा लावण्यास जोत पेटविण्याकरितां कारणाची जरूर आहे, परंतु तो विझविण्यास कारण लागत नाहीं. या ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं, प्रत्येक पदार्थाच्या उत्पत्तिकालींच त्याच्या नाशाची सामग्री त्यांत असते. जसें दिव्यांतील तेल संपलें ह्मणजे तो आपोआप विझेल. सर्व पदार्थांची उत्पत्ति दिव्याप्रमाणें कारणापेक्षी आहे व त्यांचा नाश स्वाभाविक होतो. सर्व पदार्थांचा जर असा नियम आहे तर शरीरांतील विषम झालेल्या धातूंसही तो लागणारच. अर्थात् ते आपोआप नाश पावणारच. करितां ते सम कर याकरितां चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. विनाश हा सर्व पदार्थांचा अवश्यम्भावि धर्म आहे हें तत्व सर्वमान्य आहे. आतां कोणतीही गोष्ट अवश्यम्भावि होण्यास ती स्वाभाविक अथवा स्वतंत्र पाहिजे. ती हेत्वन्तरापेक्षी असतां कामा नये; उदाहरणार्थ लाल रंगाचें वस्त्र

रूपैस्तु हेतुभिर्यस्माद्धातून्संजनयेत् समान् ।
चिकित्साप्राभृतस्तस्माद्दाता देहसुखायुषाम् ॥ ३६ ॥
धर्मस्यार्थस्य कामस्य नृलोकस्योभयस्य च ।
दाता सम्पद्यते वैद्यो दानाद्देहसुखायुषाम् ॥ ३७ ॥

घ्या. त्याचा काल रग हा हेत्वन्तरापेक्षी आहे. अर्थात् तो त्याचा अवश्यम्भावि धर्म नाहीं. विनाश जर सर्व पदार्थांचा आवश्यक धर्म आहे तर त्यास कारणाची जरूर असतां कामा नये. आतां विनाशाचें कारण जें कळत नांहीं तें सशाच्या शिंगाप्रमाणें अस्तित्वांतच नाहीं ह्मणून कळत नाहीं किंवा असूनही अज्ञेय ठिकाणीं असल्यामुळें कळत नाहीं! याचें उत्तर असें देतात कीं, जसा काळ हा निमेषादिरूपानें नेहमीं नाश पावत आहे त्याचें कारण अस्तित्वांतच नसल्यामुळें कळत नाहीं. तद्वतच उत्पन्न झालेले सर्व पदार्थ क्षणभंगुर अथवा क्षणांत विनाशी असल्यामुळें त्यांच्याही विनाशाचें कारण नाहीं व ह्मणून तें कळत नाहीं. यावर पुन्हां तुह्मी अशी शंका घ्याल कीं, ज्या कारणानें उत्पत्ति झाली त्या कारणाचा अभाव हेंच नाशाचें कारण कां मानूं नये? यावर त्यांचें उत्तर असें आहे कीं, पाहिजे तर असें माना परंतु ती हेतुपरंपरा सर्व क्षणिक आहे व स्वाभाविक आहे. एतावता चिकित्सेचें प्रयोजन सिद्ध होत नाहीं. येथपर्यंत पूर्वपक्ष झाला. याचें खंडण करून चिकित्सेचें सप्रयोजकत्व आत्रेयऋषि अगदीं सुगमरीतीनें सिद्ध करितात. तें असें ते ह्मणतात:—कबूल आहे, धातुवैषम्य विनश्वर आहे, परंतु तें स्वयं नाश पावताना मागें जी क्रिया अथवा परिणाम ठेवून जाईल ती क्रिया विषमच असणार. ती विषमक्रिया स्वयनाश पावतांना पुन्हा तसेंच करणार ह्मणजे जरी प्रत्येक भाव स्वयं व्यक्तिशः विनश्वर अथवा क्षणभंगुर आहे तरी त्यांची जी एक परंपरा चालेल ती परिणामीं नित्यच आहे. करितां ती धातुवैषम्याची विषम परंपरा अटकवून त्याच्या जागीं धातुसाम्याची समसन्तति चालेल अशी क्रिया करणें इष्ट आहे. हीच चिकित्सा. विषमधातुपरंपरेंत समधातुकरणहेतु प्रविष्ट केला ह्मणजे पुढें, जसें एखाद्या मातीच्या घड्यावर सोटा मारला ह्मणजे घटाची परमाणु सन्तति बदलून निराळ्याच प्रकारची खापऱ्यांची परंपरा सुरू होते तसेंच, समधातूची परंपरा सुरू होईल.

'चिकित्साप्राभृत' वैद्य याप्रमाणें धातुसाम्य उत्पन्न करून रोग्यांस शरीर, आरोग्य व आयुष्य देतो ह्मणून त्यांस इह व परलोकीं धर्म, अर्थ, काम व मोक्ष दान केल्याचें श्रेय प्राप्त होतें.[१]

चिकित्साप्राभृतगुणो दोषो यश्चेतराश्रयः ।
योगायोगातियोगानां लक्षणं शुद्धिसंश्रयम् ॥ ३८ ॥
बहुदोषस्य लिङ्गानि संशोधनगुणाश्च ये ।
चिकित्सासूत्रमात्रं च सिद्धिव्यापत्तिसंश्रयम् ॥ ३९ ॥
या च युक्तिश्चिकित्सायां यंचार्थं कुरुते भिषक् ।
चिकित्साप्राभृतेऽध्याये तत्सर्वमवदन्मुनिः ॥ ४० ॥

'चिकित्साप्राभृत' वैद्याचे गुण, इतर अविद्वान् वैद्यांच्या चिकित्सेपासून होणारे अनर्थ, संशोधनाच्या योग, अयोग व अतियोगाचीं लक्षणें, फार दोष वाढलेल्या रोग्याचीं लक्षणें, संशोधनाचे गुण, अयोगादिकांच्या चिकित्सेचें दिग्दर्शन, चिकित्सेच्या सप्रयोजकत्व—अप्रयोजकत्वाविषयीं शंका—समाधान व चिकित्सेचें प्रयोजन इतके विषय या चिकित्साप्राभृतीय अध्यायांत आत्रेय ऋषींनीं प्रतिपादन केले आहेत.

इत्यग्निवेशकृते तन्त्रे चरकप्रतिसंस्कृते
चिकित्साप्राभृतीयो नाम षोडशोऽध्यायः समाप्तः ।

---

१ 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्' या वचनाप्रमाणें शरीरादि दान केल्यानें, धर्मानुष्ठानाचें साधन दान केल्याचें अर्थात् धर्मादि पुरुषार्थचतुष्टय दान केल्याचें श्रेय प्राप्त होतें.

भारतीय वैद्यकाच्या उन्नत्यर्थ मासिक पुस्तक.

# आर्यभिषक्.

सन १८८९ च्या जुलैपासून हें सारखें सुरू आहे. अनेक उपयुक्त पुस्तकें यांतून निघून, स्वतंत्र बांधून विक्रीस तयार आहेत. आजच्या 'भारतधर्मा'च्या अंकांत त्यांची सविस्तर यादी आहे ती पहा.

मासिक पुस्तकाची वर्गणी, गरीबगुरीबांनांही देण्यास हरकत पडूं नये ह्मणून फारच कमी ठेवली आहे. भारतधर्म मासिक पुस्तकासहित 'आर्यभिषक' घेणारास, वर्षास टपालसह १ रु. १० आणे पडतील. फक्त 'आर्यभिषक्' च घेणारास १॥ रु. व फक्त 'भारतधर्म' ८ आण्यांत मिळेल.

**सम्पादक**—आयुर्वेदमहोपाध्याय ( वैद्यराज ) **शंकर दाजी शास्त्री पदे.** मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

---

**सहाशांवर वनस्पतींची सविस्तर माहिती.**

# वनौषधी–गुणादर्श.

**असें पुस्तक दुसरें कुठें निघालेंच नाहीं!**

वनस्पती ओळखण्याच्या खुणाखाणा वगैरे माहिती; निरनिराळ्या भाषेंतील नांवें; गुणदोष, व निरनिराळ्या रोगांवर तिचे उपयोग कसे होतात—असें प्रत्येक वनस्पतीचें वर्णन करून, वर्णानुक्रमानें सहा भागांत सहाशांवर वनस्पतींचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे!

सर्वसाधारण आबालवृद्धांच्या उपयोगीं असा हा ग्रंथ, सरळ मराठी भाषेंत असल्यानें, त्याचा खप झपाट्यानें होऊन, दुसरी आवृत्तिही निघाली आहे. भाग १ किंमत १२ आणे; भाग २ रा १ रुपया; तिसरा १। रु; चवथा १॥ रु; पांचवा १। रु; व सहावा १२ आणे. टपालहशील शिवाय पडेल. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मे किंमतीस मिळेल.

**थोडक्यांत सर्व रोगांचें निदान करून सुलभ उपचार कळण्यासाठीं!**

# सुबोध वैद्यक.

प्रत्येक रोगाचें कारण, रोग ओळखण्यासाठीं चिन्हें, रोगावर सुलभ व खात्रीचे उपचार; पथ्यापथ्य इत्यादि संपूर्ण माहिती, एका पुस्तकांत सरळ मराठी भाषेंत मिळावी ह्मणून हें पुस्तक मुद्दाम तयार करण्यांत आलें आहे.

पहिली आवृत्ति लवकरच संपून ही दुसरी आवृत्ति निघाली आहे. पूर्वार्ध व उत्तरार्ध असे याचे दोन भाग आहेत. पूर्वार्ध किं. ८ आणे; उत्तरार्ध १ रु. टपाल शिवाय. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मी किंमत.

### वैद्यकाचा जगन्मान्य ग्रंथ.

# सार्थ श्रीचरक संहिता.

औषधोपचार करण्यासंबंधानें हा ग्रंथ जसा हिंदुस्थानांत पूज्य झाला आहे, तसाच तो, यूरोप-अमेरिका इकडील प्रख्यात डाक्टरांनींही अतिशय उत्तम ठरविला आहे. याचें इंग्रजींतही भाषांतर झालें असून, तें जगन्मान्य झालें आहे.

**याचें मराठी भाषांतर, मुळासहित व जागजागीं टीपा आणि जरूरप्रसंगीं देखावे यांसहित भागरूपानें छापत आहे.**

श्रीमंत गायकवाड सरकारांच्या आश्रयानें छापण्याचें काम चालू आहे.

**सम्पादक-आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.**

पुढील भाग विक्रीस तयार आहेतः-**सूत्रस्थान**-पूर्वार्ध कि. २ रु., **निदानस्थान** १४ आणे; **विमानस्थान** १॥ रु०, **इंद्रियस्थान** १२ आणे; **कल्पस्थान** १ आणे, **सिद्धिस्थान** १॥ रु०.

पुढील भागांचें काम चालू आहे:-**सूत्रस्थान**-उत्तरार्ध; **शारीरस्थान** व **चिकित्सास्थान**. हे भाग जसजसे छापून तयार होतील, तसतसे कायमच्या वर्गणीदारांना व्ही. पी. नें पाठविण्यांत येतील.

**विशेष सवड-फक्त वर्ष अखेरपर्यंत !**

वैद्यकसंबंधीं अत्यंत उपयुक्त ठरलेलें व सतत १४ वर्षें चालू असलेलें "**आर्यभिषक्**" मासिकपुस्तक घेणारांस, चरकसंहितेचे भाग,

# निम्मे किंमतीस

देण्यांत येतील; तरी ही संधि घालवूं नका, त्वरा करा. टपालखर्च शिवाय पडेल.

**अस्सल मृगनाभींतील कस्तूरी.** ३० रु० तोळा.

**शुद्ध शिलाजित.** २ रु० तोळा.

**जेहर-मोहरा.** हा एक प्रकारचा दगड फक्त हिमालयांतच मिळतो. हा जखमेस लावला तर जखम त्वरित मिळून येते. दूध किंवा पाण्यांत दिला असतां उष्णनाशक व रक्तशोधक आहे. १० रुपये रसल.


# रसवैद्य.

पारा हिंगूळ सोमल, सुवर्ण, रौप्य, ताम्र, लोह इत्यादि सर्व रसायनें वगैरे औषधें ओळखणें. शुद्ध करणें, भस्में वगैरे करणें, रोगांवर वापरणें इत्यादि सर्व माहिती यांत आहे. आवृत्ती दुसरी कि. १२ आणे. टपाल शिवाय.

**मुंबई,** नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय. **के. रामराव,** व्यवस्थापक आ. भि.

'नेटिवओपिनियन' छा. छा.

कै० ज्योतिर्विंद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक ४ था.

संपादक कै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥–श्रीवाग्भटः ।

तूळसंक्रांति.–शके १८२४ आश्विन शु. १५ शुक्रवार. ता० १७ आक्टोबर, सन १९०२.

**विषयानुक्रमः**—वशीकरणचिकित्सा, त्रिदोषविचार–पित्त; सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान उत्तरार्ध पृष्ठें ८१–९६.

---

## वैद्यकीय वृत्तसार.

—कलकत्त्याच्या 'बेलगाशिया हास्पिटल' मध्यें पंडित कृपाराम यांनीं एका महारोग्यास दोन तीन महिने देशी औषध देऊन बरें केल्याचें अ. व. पत्रिकेवरून कळतें. आमच्या वैद्यकास उत्तेजन मिळेल तर अशीं औषधें पुष्कळ तयार होऊं शकतील.

—मद्रास जनरल हास्पिटलमध्यें एका पुरुषाच्या पोटांतील रोग कापून काढतांनां दिसून आलें कीं, त्यांत दोन डोकीं एकमेकांस चिकटलेलीं होतीं. त्यांस दांत व केसही होते. अर्थात् ही पुरुषासही गर्भधारणा झाली म्हणावयाची! केवळ सृष्टिक्रमावर सिद्धांत ठोकणारांस ही गोष्ट पुष्कळ नडेल.

—देशी पेटंट औषधांची तपासणी करणारें एक मंडळ स्थापन होण्याचें घाटत आहे. खोट्या औषधांचा कांहीं प्रतिबंध होईल तर या मंडळाचा उपयोग; नाहींपेक्षां भरतींत आणखी एक संख्या वाढली, इतकेंच.

---


## सिद्ध बाळकृष्ण प्रासादिक नूतन शोधक शास्त्री
## भगवंत गोविंद तोडेवाला.

हे गृहस्थ मोंगलाईंत पैठणास आहेत. एखाद्यास समक्ष पहातांच त्याचें भूतभविष्य व त्याचप्रमाणें पांच पिढींतील सर्व आप्तवर्गांची स्थिति व चेहरे वगैरे बरोबर सांगतात. पत्रिका नूतन पद्धतीनें निवळ मराठींत तयार करतात. यांचीं भविष्यें पूर्ण जुळल्याचे बरेच लोकांस अनुभव आले आहेत. **रेणुराव बीडकर वकील, पाथरी.**

---

वैद्यराज आयुर्वेदमहोपाध्याय **शंकर दाजी शास्त्री पदे** यांनीं स्थापन केलेला

## श्रीराजराजेश्वर–वनौषधिप्रासाद.

मुंबई, माधवबागेचा रस्ता, ट्राम्वेच्या सडकेवर २ न्या पांजरपोळ गल्लीच्या समोर.

काढे, चूर्णें वगैरे सर्व प्रकारच्या औषधांत लागणाऱ्या वनस्पति वगैरे जिनसा–खऱ्या, चोख व माफक किंमतीनें मिळण्याकरितां मुद्दाम ही सोय केली आहे.

**के. रामराव, व्यवस्थापक.**

---

## धुपणीवर चमत्कारिक औषध.

आंत किंवा ऋतु जाण्याच्या मार्गावर बिघाड होतो. कुठें तरी हा बिघाड होतो, आणि कित्येक वेळीं उपचारांत याची दादच घेत नाहींत. यावर हें औषध फार उत्तम आहे. डबीची किं. १॥ रु. टपालखर्च शिवाय. मुंबई, नवा नागपाडा, व्य. आर्यभिषक्.

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.

वर्ष १४ वें] # आर्यभिषक्. [अं० ४ था.

ARYABHISHAK OR DOCTOR OF ARYANS.
A Monthly Journal Containing Medical news and articles.

तूळसंक्रांति. शके १८२४ आश्विन शु. १५ शुक्रवार. ता. १७।१०।१९०२.

## वशीकरण-चिकित्सा

(गतांकावरून पुढें.)

शास्त्रकारांनीं सांगितलेंच आहे. "प्राणायामैर्दहेद्दोषान्धारणाभिश्च किल्बिषम् । प्रत्याहारेण विषयान्ध्यानेनानैश्वरान्गुणान्" आतां या ठिकाणीं ध्यान ईश्वराचें सांगितलें आहे. तो सत्वमूर्ति असल्यामुळें, त्याच्या ध्यानानें असात्विक गुणांचा नाश सहजच होतो. मेस्मेरिझम् प्रयोगांत प्रयुक्त मनुष्याची जी स्थिति असते ती तात्कालिक असते हें खरें आहे; परंतु प्रयोगाच्या आवृत्तीनें तीच कायमची होऊं शकते. 'आनंदमयोऽभ्यासात्' असें ब्रह्मसूत्रच आहे.

ज्याप्रमाणें एक प्रकारचे गुण काढून त्या ठिकाणीं दुसऱ्या प्रकारचे गुण स्थापित करितां येतात, त्याच रीतीनें रोग्याची रोगी अवस्थेंत जी शारीरिक व मानसिक स्थिति असते ती बदलून त्या ठिकाणीं आरोग्य दर्शक स्थिति स्थापन करितां येते. मानसिकरोगांस तर याचाचून दुसरें औषधच नाहीं. आर्यवैद्यशास्त्रकारांनीं ह्मटलेंच आहे कीं "धीधैर्यात्मादिविज्ञानं मनोदोषौषधं परम्" शारीरिक दोषही मानसिक शुद्धीच्या द्वारें बरे केले जातात. कारण, सर्व रोगांचें मूळ कारण चित्तविक्षेप

मनाचें चांचल्य व कामक्रोधादि विकार हे होत. हे निवृत्त झाले ह्मणजे रोग आपोआप शांत होतात.

वरील निरूपणावरून योगी व साधु पुरुषांच्या केवळ कृपादृष्टीनें रोगी बरे झाल्याचीं उदाहरणें जीं आपण ऐकतों त्याविषयींचा खुलासा सहज मिळतो. उक्त पुरुषांची कृपादृष्टी ह्मणजे मेस्मेरिक अथवा हिप्नॉटिक दृष्टी होय. याचप्रमाणें गुरुकृपेनें मूर्ख शिष्य एकदम पंडित झाल्याच्या ज्या गोष्टी आपण ग्रंथांतरीं वाचतों किंवा जनपरंपरेनें ऐकतों त्यांचेंही हेंच बीज होय.

आह्मीं या वशीकरणचिकित्सेच्या प्रयोगाचे प्रकार व इतर तदानुषंगिक माहिती सवडीअंतीं देणार आहों. येथें फक्त या चिकित्सेचा प्रभाव दर्शविणारीं एक दोन उदाहरणें दृष्टान्तादाखल देऊन हा विषय संपवीत आहों.

पुढील हकीकत 'ह्युमॅनिटेरियन्' पत्रांत प्रसिद्ध झालेली आहे. एका स्त्रीचा अशा प्रकारचा भ्रांतिमूलक दृढ ग्रह झाला होता, कीं फ्रान्स देशांत पाप करणाऱ्या मनुष्यास पापाबद्दल जाळीत असतात व त्याप्रमाणें आपलीहि पाळी लवकरच येईल असें वाटून ती नेहमीं अस्वस्थचित्त होई. या बाईस डॉ० बेरिलोन यांजकडे नेण्यांत आलें. त्यांनीं तिला आपलें ध्यान करावयास लावून तिचें चित्त विक्षेपरहित झालें असें पाहून असें निक्षून सांगितलें कीं, "तुझा हा समज चुकीचा आहे. तूं जागी झालीस ह्मणजे या गोष्टी खऱ्या मानूं नको. चल पाहूं आतां मला सांग कीं, तूं ही गोष्ट खरी मानीत नाहींस." याप्रमाणें डॉक्टराच्या सांगण्यावरून तिनें पहिल्या वेळेस थोडेसें जबरदस्तीनें तें कबूल केलें; परंतु कांहीं प्रयोगानंतर तिचा भ्रम संपूर्ण दूर झाला.

तसेंच एका मनुष्यास आपलीं नखें चावीत बसण्याची वाईट संवय जडली होती;ती ही डॉक्टर बेरिलोन यांनीं वरील प्रयोगांनीं सोडविल्याची हकीकत प्रकाशित झाली आहे, ती येणेंप्रमाणें:—डॉक्टर बॉरिलोन यांनीं

उक्त रोग्यास एका आराम खुर्चीवर बसवून ध्यानपरायण केलें व एका हातानें त्याचा हात व दुसऱ्या हातानें मनगट धरून त्यास सांगितलें कीं, " तू आपला हात तोंडाजवळ नेऊन नखें चावण्याचा यत्न कर. यत्नाअंतीं तुला कळेल कीं, तुझा हात वर उचलत नाहींत. मी तुझ्या हातास आपल्या हातानें दाबून जो प्रतिबंध केला आहे तो तुला दूर करितां येणार नाहीं. यानंतर ज्या ज्या वेळीं तूं आपलीं नखें चावण्याकरितां हात तोंडाजवळ नेण्याचा यत्न करशील, त्या त्या वेळीं तुझ्या हातास आतांच्या सारखाच प्रतिबंध वाटून तो चालणार नाहीं. तुझा हात जड होईल आणि आतां जो प्रतिबंध, मी आपल्या हातानें तुझा हात दाबून केला आहे तो यापुढें तुझ्या स्वतःच्या मेंदूतून होईल. याप्रमाणें इतःपर तुझी ही सवय नाहींशी होईल." येथपर्यंत हा प्रयोग झाला. याप्रमाणें कांहीं प्रयोग झाल्यानंतर त्या मनुष्याची ती वाईट संवय समूळ नाहींशी झाली.

---

# त्रिदोषविचार-पित्त.

## ( रा. रा. अवधूत वासुदेव वैद्य यांजकडून. )

पूर्वीं आर्यभिषक् पु० १२ अं० ८ यांत देहांतून पित्ताची व्याप्ति आहे याखालीं जें विवरण दिलें गेलें, त्यांत या सदराखालीं कांहीं ठिकाणांतून, अज्ञानानें रञ्जक पित्तास फाजील महत्व दिलें गेलें. व त्यावरच भर ठेविला जाऊन, पित्ताचीं कार्यें व विकृत झाल्यावर घडणारे परिणाम यांचें विवरण झालें. त्यामुळ पुढें घडणारे पित्तसंबंधी विवरणाचा मेळ, मागें झालेल्याशीं बरोबर बसणार नाहीं अशी शंका वाटून, पुन्हा पित्तदोषाचा व त्यापासून अविकृत स्थितींत घडणाऱ्या कार्यांचा थोडक्यांत उल्लेख करितों.

### पित्ताग्नेयमिति. ( सांख्यसूत्र )

अग्नि ( तेज ) यापासून या पित्ताची उत्पत्ति होते अर्थात् तेजतत्व भूयिष्ट असून तद्गुणविशिष्ट आहे. दुसरीकडे ( आयुर्वेदसंहितेंतील महाप्रवचनांतर्गत दीर्घ पाठांत ) देखील असेंच ह्मटलेलें आहे.

दृष्टिः पाकः प्रकाश उष्मा पित्तं च तेजसः ।

ह्मणजे सृष्टींतील वा आमच्या देहांतील अग्नितत्वापासून आह्मांस दृष्टी, पचनशक्ति, प्रकाश ( कांति ); उष्मा ( अंगांतील उष्णता-उबारा ) व पित्त ( मुख्यत्वें रञ्जक ) या पांच गोष्टी प्राप्त होतात. तेव्हां या एकंदर ५ गोष्टी करणारे असे पदार्थ वा अदृष्ट अशा शक्ति आमच्या देहांत आहेत. त्यांच्या एकंदर जमावास बहुधा पित्त ही संज्ञा दिली जाते असें मला वाटतें.

यावरून कळून येईल कीं, वरील ५ गोष्टी जर निरनिराळया [ स्वरूप व गुण यांनीं भिन्न ] आहेत, तर त्या निरनिराळया पांच गोष्टी करणारें पित्तही पंचविध पाहिजे. मग तें प्रत्यक्ष नजरेस येवो वा न येवो. नजरेस आलें नाहीं ह्मणून त्याचें तसें अस्तित्वच नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. असो, झालें काय कीं वरील पंचविध कार्ये करणारें पंचविध पित्त आमच्या देहांत उत्पन्न होतें, तें अग्नितत्वामुळें. अर्थात् तद्गुणभूयिष्ठ तें असतें.

तेव्हां येथें एवढेंच सुचवावयाचें कीं, मला जें कांहीं विवरण करावयाचें तें केवळ रंजक पित्तासंबंधीं नसून, व्यापक जें अग्नितत्वजन्य असें शरीरांत निरनिराळ्या जागीं वास करितें, त्याविषयीं देखील लिहिणें आहे. हा विषय माझ्या शक्तीबाहेरचाच काय पण केवळ थोडें देखील लिहूं जाण्यास अशक्य असा आहे. कारण, सजीव शरीरांतर्गत घडणारे जे नानाविध व सूक्ष्म व्यापार त्यांची पूर्ण माहिती किंवा अनुभव नसतां लिहावयाचें आहे. असो, तरी आधारदृष्टीनें थोडें सांगतों. असें सांगण्याचें कारण, सारज्ञांपुढें विचार मांडिले गेल्यास कदाचित् उपयोग झाल्यास होईल.

---

१ हा व दुसरे १।२आधार मला रा. दामोदर वामन वैद्य यांजकडून मिळाल्यामुळें मी त्यांचा आभारी आहे.

वर-पित्तासंबंधानें जें सांगितलें त्याचेंच थोडें विशदीकरण कार्यानुरोधें ज्यांत तीं वचनें ( आ० म० दी० यांत आलेलीं ) सांगतों.

॥ अथ तेजसः ( पित्तस्य ) दर्शनं चक्षुरुष्मा कायाग्नि·
हृदयं त्वक्पर्यन्तमिति। तत्र चक्षुर्गतरूपाणि गृण्हाति।
कायाग्निरामाशयपक्वाशययोरन्तरस्थो धातूनां चान्तरेषु
प्रमोचयति ॥

यांत थोडक्यांत पित्ताची व्याप्ति देहांतून कसकशी आहे तें मुद्देसूद विवरण दिलें आहे. तेंच त्या पित्तव्याप्तीचें यथार्थ स्वरूप ध्यानांत येण्याकरितां या मह वाक्याचेंच संक्षिप्त अनुवादन करितों.

पित्तांत २ भेद. एक तैजसगुणविशिष्ट व दुसरें रूपगुणविशिष्ट. हीं दोन्ही पित्तें शरीरांत आहेत त्यांचेयोगानें कार्यें होतात तीं:—

प्राणिमात्रास जी दृष्टि (नेत्रेन्द्रिय कार्य ). ती अनुभूत होते. आमच्या अंगास रक्तद्वारें हृदयापासून त्वचेपर्यंत उष्णता मिळते. शरीरांत होणारी जी अजस्र झीज ती भरून काढण्याकरितां जीवनावश्यक अन्न पोटांत गेल्यावर त्याचें पचन ( समानसाह्यानें ) होऊन त्यापासून पोषक—रस-धातु—तयार होतो. जो तयार होण्यास आमाशय व पक्वाशय यांतील पित्तविभागांची जरूरी असते. हा रसधातु तयार झाल्यावर त्यांतून सांठविलेल्या पित्तविभागानें—कायाग्नीनें—पुढें निरनिराळे धातु क्रमाक्रमानें रक्तापासून ओजापर्यंत बनतात व पुढें ओजापासून गर्भ बनविण्यास साधन तरी हा कायाग्नि ( पित्त ) आहेच. म्हणजे रसापासून रक्त पुढें, मांस नंतर, मेद इ० चढत्या पायरीचे ( विशिष्ट गुणधर्माचे ) सप्तधातु तयार होण्यास या कायाग्नि ( पित्त ) संज्ञा पावलेल्या वस्तूची गरज आहे, असा वरील आधाराचा अर्थ वाटतो.

अर्थात् हा कायाग्नि ( तैजसगुणविशिष्ट पित्त) जेव्हां भलताच वाढतो तेव्हां क्रमेंकरून अनुलोम प्रकारानें रसापासून ओजापर्यंत सर्व धातु

क्षीण करणार हें वरील स्पष्टीकरणावरून उघड होतें. वाग्भट-सूत्रस्थानांत तसेंच ह्मटलेंलें आहे.

²स्वस्थानस्थस्य कायाग्नेरंशा धातुषु संश्रिताः ॥
तेषां सादातिदाप्तिभ्यां धातुवृद्धिक्षयोद्भवः ॥

ह्मणजे कायाग्न्यंश धातूंच्या अंतर्गत राहून क्रमोत्तर धातू तयार करितात ते तयार करीत असतां जर त्याचे अंश कमी असल तर मंदाग्नीशी संयुक्त ( मंदाग्नीवर ठेवलेले ) पदार्थ जसे यथायोग्य पचन पावतात तद्वत धातु ( शरीरस्थ रसरक्तादि ) सम्यक् पद्धतीनें वृद्धि पावतात. याच्या उलट तीक्ष्ण असतां घडतें. एवंच या मुख्य कायाग्नीमळें निरनिराळ्या धातूंचें अन्वीभवन ( घटना ) घडतें. असें आहे ह्मणूनच ह्मटलें आहे कीः—

अन्नस्य पक्ता सर्वेषां पक्तृणामधिको मतः ॥
तन्मूलास्तेहि तद्वृद्धिक्षयवृद्धिक्षयात्मकः ॥

---

२ ह्या कायाग्नीचें स्थान विशेषतः पक्वाशयांतून घ्यावयाचें. असें घेण्यास कारण, त्याच ग्रंथांत स्वस्थानस्थस्य यावर पर्याय ग्रहणीस्थितस्य असा दिला आहे, वर ग्रहणीस्थान पक्वाशयांत गणले जातें असें पित्तधराकलेच्या वर्णनावरून वाटतें. खेरीज यास दुसरा आधार धन्वंतरि संहिता अ० १६८ यांत आहे तोः—“ पित्तं पक्वाशयस्थितं”

तसेंच वाग्भटांत पित्तस्थाननिर्णायक श्लोकांत शेवटीं “ नाभिरत्र विशेषतः ” असें आलें आहे. यावरून आमच्या कायाग्नीचें मुख्य स्थान, ज्या ठिकाणापासून धातूप्रवाहिन्यास अन्नांतील सारांश मुख्यतः मिळतो तें होय.

हाच अर्थ “ प्राणापानसमायुक्तं पचाम्यन्नं चतुर्विधं ” या भगवद्वचनांतूनही निघतो प्राणापानांच्या मेळनाचें कार्य समानांत ज्या स्थानीं घडतें तेंच स्थान हें आहे, असें वरील भगवद्वाक्याचे अनुभवी जाणूं शकतीलसें वाटतें.

आणि हाच अर्थ, ज्यांस तात्त्विक पद्धतीनें शोधणें असेल त्यांनीं खालील आधाराकडे लक्ष्य देणें बरेसें वाटतें.

॥ पायूपस्थेऽपानं । चक्षुः श्रोत्रेमुखनासिकाभ्यां प्राणः । स्वयं प्रतिष्ठते मध्ये तू समानः । एष ह्येतद्हुतमन्नं समं नयति तस्मादेताः सप्तार्चिषो भवन्ति ॥

प्र० उ० त्रि० प्र० क्र०५

यावरून धातुवृद्धि होण्यास मुख्य तैजसगुणविशिष्ट पित्ताच्या सम्यकतेची आवश्यकता आहे.

असो, एकंदरींत आर्यवैद्यकांतून असणारें पित्ताचें व्यापक स्वरूप व त्याचे पंचविध भेद जे शरीरांतील अंतर्बाह्य व्यापार सुरळीत चालविण्यास साधन, त्यांचीं नांवेंही सांगण्यांत आलीं. तसेंच पित्तविभागांत जे दोन भेद त्यांतील मुख्य कोणतें तें सकारण थोडक्यात स्पष्ट झालें.

आतां रूप, रुचि वगैरे सामान्य वर्णन त्रोटक पद्धतीनेंच देतों.

पीतं रक्तं विदाही कृष्णं चेति । पित्तं पुनराग्नेयमुष्णं ती-
क्ष्णं रूक्षं लघु । कट्वम्ललवणानुरसं विशदं ॥

बहुधा पित्त हें ( १ ) वर्णानें पिवळें, तांबडसर व कधीं काळें असें असतें. व

( २ ) तें पचनावश्यक, उष्ण, रूक्ष व हलकें असें आहे.

( ३ ) तसेंच पित्ताची रुचि कडू, आंबट, खारट अशी असते.

( ४ ) त्याप्रमाणेंच याचे अंगीं अणवीभवनशक्ति–पदार्थघटक धर्म– व भेदकता–द्रव्याणु विलग करण्याची शक्ति असते.

यात विशद शब्दाचा अर्थ पांढरा असाही होतो. तरी जरूर लागल्यास व तो साधार वाटल्यास पुढें घेऊं.

वर जें पित्तासंबंधीं वर्णन झालें तें सर्व त्याच्या अविकृत स्थितीसंबंधानें घ्यावयाचें. तेव्हां त्या सर्वाचा सार थोडक्यात ध्यानांत यावा म्हणून अविकृत पित्तकार्यें वाग्भटांतून आलेलीं आहेत तीं सांगतों.—

अनुगृण्हात्यविकृतं पित्तं पक्त्यूष्मदर्शनैः ॥
क्षुत्तृड्रुचिप्रभामेधाधीशौर्यतनुमार्दवैः ॥ ३ ॥

अ० ११

म्हणजे सम्यक् पित्ताच्या योगानें पुढें लिहिलेल्या क्रिया होतातः— निरनिराळ्या पाचकरसांचा वगैरे योग्य पुरवठा घडून पचनक्रिया सुरळितपणें चालते. शरीरभर उष्णता असते. नेत्रद्वारें सृष्टीचें ज्ञान होतें.

अन्नपचन चांगलें झाल्यामुळें रिक्तामाशयांत क्षुधादायी रस उत्पन्न होतो. रक्तातील जलांश, पित्तजनितशक्तिप्राप्त रक्ताच्या नित्य वा जरूरीच्या वहनामुळें कमी होतो ह्मणून क्लोमस्थानीं अतृप्ति भास होऊन तहान वाटते. जिव्हा वगैरे ठिकाणीं योग्य ते रस सम्यक् व शुद्धरक्तवहनानें उत्पन्न झालेले असतात. ह्मणून रुचि–अन्नप्रीति–वाढते. त्वचेजवळ सम्यक् रक्तवहनानें व इतर (भ्राजक पित्तानें) कांति चढते. मेंदूतील शुद्ध व जरूर तेवढ्या चपळाईच्या वेगानें होणाऱ्या रक्तवहनानें धारणशक्ति व कल्पनाशक्ति ह्या असतात. पचनादि क्रिया सुरक्षितपणानें चालल्यामुळें तसेंच रक्तांत बेताची उष्णता कायम रहात असल्यामुळें अंगांत हिंमत वाटते; अर्थात् बलही असतें. यकृत्जन्य पितास योग्य वा जास्त उत्पन्न करण्याची शक्ति असल्यामुळें, कोठा व आंतडीं वगैरे यांतून फाजील मलसंचय होत नाहीं. अर्थात् अपान कुपित होऊन होणाऱ्या बद्धकोष्ठामुळें जी फाजील जाडी (निरनिराळे ग्यास त्वचांच्या दरम्यान सांचून उत्पन्न होणारी–मेदबाहुल्य दाखविणारी) वातानें होणारी ती होत नाहीं. त्वचेंत शुद्ध रक्त खेळत असल्यानें व तिची फाजील जाडी (जी होतांना अंतस्त्वचा व बहिस्त्वचा अगदीं एक बनून होते ती) नसल्यानें त्वचेंतील स्पर्शज्ञान वाढतें व तीहि स्वतः नाजूक —सुकुमार—होते.

पित्त हें निजप्रकोपकारणांनीं[3] प्रकुपित झाल्यावर निरनिराळ्या धातूंतून व स्थानांतून ४० तऱ्हचे रोग उत्पन्न करितें. सामान्यपणें प्रकुपित पित्तांत निरनिराळीं लक्षणें दिसून येतात.

झालें. एव्हांपर्यंत पित्त या सदराखालीं मोडणारी सामान्य माहिती संक्षेपतः दिली गेली; आतां त्याच्यासंबंधी विशेष माहिती द्यावयाची आहे.

(पुढें चालू.)

---

३ पित्तं कट्वम्लतीक्ष्णोष्णं पटु क्रोधविदाहिभिः । शर...इ०

४ कुपितस्य च पित्तस्य दाहरागोष्णपाकिताः । स्वेदः क्लेदः इ०. कटुकाम्लौ रसौ वर्णौ पांडुरारुणवर्जिताः । श्वेतान्येत.०...इ० परिश्रमस्वेदविदाहरागा वैगंध्यसंक्लेद विपाकदोषाः । प्रलापमूर्च्छाभ्रमपित्तदाहाः । पीतविण्मूत्रनेत्रत्वक्कुक्षत्तृट् इ०

# अथ सप्तदशोऽध्यायः ।

अथातः कियन्तःशिरसीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण 'कियन्तः शिरसीय' अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

याच्या मागच्या १६ अध्यायांत औषधींविषयीं निरूपण केलें आहे. आयुर्वेदाचें फळच चिकित्सा असल्यामुळें प्रथम त्याविषयीं निरूपण करणें योग्यच आहे. त्यानंतर आतां येथून पुढच्या चार अध्यायांत रोगांविषयीं प्रतिपादन केलें जाईल. ह्मणून या चार अध्यायांचें नांव रोगचतुष्क असें आहे. त्यांपैकीं या अध्यायांत 'सर्वेषु गात्रेषु शिरः प्रधानम्' या वचनाप्रमाणें सर्व शरीरांत प्रधान असें जें मस्तक त्याचे रोग प्रथम वर्णन केले असल्यामुळें या अध्यायाचें नांव 'कियन्तः शिरसीय' असें ठेविलें आहे याचा शब्दार्थ 'डोक्यांत किती' ( रोग ) आहेत असा होतो.

कियन्तःशिरसि प्रोक्ता रोगा हृदि च देहिनाम् ।
कति चाप्यनिलादीनां रोगा मानविकल्पजाः ॥ २ ॥
क्षयाः कति समाख्याताः पिडका कति चानघ ।
गतिःकतिविधा चोक्ता दोषाणां दोषसूदन ॥ ३ ॥

( अग्निवेश विचारितात ) हे दोषांचा नाश करणारे महर्षि, मनुष्यांच्या मस्तकांत किती रोग होतात, हृदयांत किती होतात, वातादि

दोषांच्या संसर्गप्रमाणभेदें करून एकंदर रोगांचे किती प्रकार होतात, क्षय किती प्रकारचे आहेत. फोड किती प्रकारचे आहेत व दोषांची गति किती प्रकारची असते हें कृपाकरून सांगा.

हुताशवेशस्य वचस्तच्छ्रुत्वा गुरुरब्रवीत् ।
पृष्टवानसि यत्सौम्य तन्मे शृणु सविस्तरम् ॥ ४ ॥
दृष्टाः पञ्च शिरोरोगाः पञ्चैव हृदयामयाः ।
व्याधीनां व्यधिकाषष्टिर्दोषमानविकल्पजाः ॥ ५ ॥
दशाष्टौ च क्षयाः सप्त पिडका मधुमेहिकाः ।
दोषाणां त्रिविधा चोक्ता गतिर्विस्तरतः शृणु ॥ ६ ॥

याप्रमाणें अग्निवेशाचा प्रश्न ऐकून आत्रेय ऋषि ह्मणाले, हे सौम्य! जो प्रश्न तूं केलास त्याचें सविस्तर उत्तर मी देतों तें तूं ऐक. पांच मस्तकरोग आहेत, हृदयाचे रोगही पांचच प्रकारचे आहेत, वातादि दोषांच्या न्यूनाधिकप्रमाणांत होणाऱ्या संसर्गानें होणारे रोग बासष्ट आहेत, क्षय अठरा प्रकारचे आहेत, प्रमेहा[१]पासून होणारे फोड सात

१ या ठिकाणीं मूळांत ' मधुमेह ' असा शब्द आहे. परंतु त्याचा अर्थ सामान्यतया प्रमेह असाच केला पाहिजे. कारण याच अध्यायांत पुढें पिडकांचें वर्णन करितांना ' विना प्रमेहमप्येते जायन्ते दुष्टमेदसः ' असें सांगितलें आहे. त्या ठिकाणीं, मधुमेहाचा अर्थ प्रमेह नसता तर ' विनाप्रमेहम् ' च्या जागीं ' विना मधुमेहम् ' असा प्रयोग केला असता. चिकित्सास्थानांतही एके ठिकाणीं लिहिलें आहे ' प्रमेहिणो याः पिडका यथोक्ता रोगाधिकारे पृथगेव सप्त '. या ग्रंथांत मधुमेह शब्दः प्रायः सर्वत्र प्रमेह या अर्थीं योजलेला आढळतो. ' गुल्मी च मधुमेही च राजयक्ष्मी च यो नरः अचिकित्स्या भवन्त्येते बलमांसपरिक्षये ' या ठिकाणीं मधुमेह शब्दाचा अर्थ प्रमेह नसून वातिक मधुमेहच असता तर ' बलमांसपरिक्षये '. या विशेषणाचें प्रयोजन नव्हतें. कारण मधुमेह स्वरूपतःच अचिकित्स्य सांगितला आहे सुश्रुतांतही या पिडका प्रमेही मनुष्यास होतात असें सांगितलें आहे. ' तद्वच्च वसा मेदोभ्यामभिपन्नस्य शरीरस्य दोषैश्चानुगतधातोः प्रमेहिणः पिडका जायन्ते ' वास्तविक सर्व प्रमेहांत शरीरांतील धातु मधुर होत असल्यामुळें त्या सर्वांस मधुमेह अशी सामान्य संज्ञा दिली आहे. वाग्भटांनीं लिहिलें आहे ' मधुरं यच्च सर्वेषु प्रायो मध्विव मेहति । सर्वे हि मधुमेहाख्या माधुर्याच्च तनोरतः " ॥

प्रकारचे आहेत व दोषांची त्रिविध गति पूर्वी सांगितलीच आहे. आतां यांचें सविस्तर वर्णन ऐक.

सन्धारणाद्दिवास्वप्नाद्रात्रौ जागरणान्मदात् ।
उच्चैर्भाष्यादवश्यायात्प्राग्वातादतिमैथुनात् ॥ ७ ॥
गन्धादसात्म्यादाघ्रातादुजोधूमहिमातपात् ।
गुर्वम्लहरितादानादतिशीताम्बुसेवनात् ॥ ८ ॥
शिरोऽभिघाताद्दुष्टामाद्रोदनाद्बाष्पनिग्रहात् ।
मेघागमान्मनस्तापाद्देशकालविपर्ययात् ॥ ९ ॥
वातादयः प्रकुप्यन्ति शिरस्यस्रं प्रदुष्यति ।
ततः शिरसि जायन्ते रोगा विविधलक्षणाः ॥ १० ॥

मलमूत्रादिकांचे वेग आवरून धरणें, दिवसा निजणें, रात्रीं जागणें, अमल येणें, मोठ्यानें ओरडून बोलणें, पडसें होणें, पूर्वदिशेचा झोंकाचा वारा लागणें, अत्यंत स्त्रीसंग करणें, आपल्यास अप्रिय किंवा असह्य पदार्थांचा वास घेणें, वाळू, धूर, थंडवारा व ऊन्ह यांचा शरीरावर अतिशय परिणाम होणें; जड, आंबट आणि आलें वगैरे ओले पदार्थ व थंड पाणी यांचा फाजील उपयोग करणें, डोक्यास घाव लागणें, आमाशय दूषित होणें, रडणें, रडतांना आसूं आवरून धरणें, आकाशांत ढग येणें, रागशोक वगैरेच्या योगानें मनाचा संताप होणें, भूकम्प, उल्कापातादि उत्पातांच्या योगानें देशाचा विपर्यास होणें ह्मणजे स्थिती बदलणें, तसेंच कालविपर्यास होणें ह्मणजे उष्ण ऋतूंत शीत ऋतूंचीं लक्षणें होणें व वर्षाऋतूंत उष्ण ऋतूंची लक्षणें होणें—इतक्या कारणांनीं वातादिदोष प्रकुपित होऊन मस्तकांतील रक्त दूषित होतें[1] व त्यांपासून नानाप्रकारचे शिरोरोग उत्पन्न होतात,

---

१ यावरून सर्व शिरोरोगांत रक्तदोष प्रधान असतो हें दाखविण्याचा हेतु आहे.

प्राणाः प्राणभृतां यत्र श्रिताः सर्वेन्द्रियाणि च।
यदुत्तमाङ्गमङ्गानां शिरस्तदभिधीयते ॥ ११ ॥

मनुष्यांचे प्राण व समस्त इंद्रियें ज्याच्या आश्रयानें राहतात व जें सर्व शरीरांत प्रधान अंग तें मस्तक होय.[१]

अर्द्धविभेदको वा स्यात्सर्वं वा रुज्यते शिरः ।
प्रतिश्यायमुखनासाक्षिकर्णरोगाः शिरोभ्रमः ॥ १२ ॥
अर्दितं शिरसः कम्पो गलमन्याहनुग्रहः ।
विविधाश्चापरे रोगा वातादिकृमिसम्भवाः ॥ १३ ॥

त्यास मागें सांगितलेल्या कारणांनीं पुढील रोग उत्पन्न होतात— अर्धें किंवा सगळें डोकें दुखूं लागतें, पडसें येतें, तोंड–नाक–डोळे व कान यांस अनेक प्रकारच्या विकृति होऊन तीं दुखूं लागतात, घेरी येते, पक्षवायु होतो, मस्तकाचा कंप होतो, गळ्यांत सूज येऊन आवाज बसतो, मानेच्या शिरा धरतात व ती तिरपी होते, दांतखिळी बसते किंवा तोंड आ केल्यासारखें आखडतें, याशिवाय वात–पित्त–कफजन्य, सान्निपातिक व मस्तकांत कृमि उत्पन्न होऊन त्यापासून नानाप्रकारचे शिरोरोग उत्पन्न होतात.

पृथग्दृष्टास्तु ये पञ्च संग्रहे परमर्षिभिः ।
शिरोगदाँस्तान् शृणु मे यथास्वैर्हेतुलक्षणैः ॥ १४ ॥

वर सांगितलेल्या वात–पित्त–कफ–सन्निपात व कृमिजन्य अशा पांच प्रकारच्या शिरोरोगांचा अष्टोदरीयाध्यायांत केवळ नामनिर्देश केलेला आहे. त्या प्रत्येकाचें निरनिराळें लक्षणपूर्वक वर्णन येथें करीत आहों तें श्रवण कर.

---

१ मस्तकाचें इतकें महत्व प्रतिपादन करण्याचा हेतु असा आहे कीं, त्यावरून पुढें वर्णन केले जाणारे मस्तकाचे रोग अत्यंतअहितकर असें समजलें जावें.

उच्चैर्भाष्यातिभाष्येभ्यस्तीक्ष्णपानात्प्रजागरात् ।
शीतमारुतसंस्पर्शाद्व्यवायाद्वेगनिग्रहात् ॥ १५ ॥
उपवासादभीघाताद्विरेकाद्वमनादति ।
बाष्पशोकभयत्रासाद्भारमार्गातिकर्षणात् ॥ १६ ॥
शिरोगताः शिरावृद्धो वायुराविश्य कुप्यति ।
ततः शूलं महत्तस्य वातात्समुपजायते ॥ १७ ॥
निस्तुद्येते भृशं शंखौ घाटा सम्भिद्यते तथा ।
सभ्रूमध्यं ललाटं च तपतीवातिवेदनम् ॥ १८ ॥
बध्येते स्वनतः श्रोत्रे निष्कृष्येते इवाक्षिणी ।
घूर्णतीव शिरः सर्वं सन्धिभ्य इव मुच्यते ॥ १९ ॥
स्फुरत्यतिशिराजालं स्तभ्यते च शिरोधरा ।
स्निग्धोष्णमुपशेते च शिरोरोगेऽनिलात्मके ॥ २० ॥

मोठ्यानें बोलणें, अतिशय बोलणें, तीक्ष्ण मद्यपान किंवा काळीं मिरें वगैरे तीक्ष्ण पदार्थांचें पान, रात्रीं अतिशय जागरण करणें, झोंबणारा थंडवारा घेणें, अतिमैथुन, मलमूत्रादि आवरून धरणें, उपास, घाव लागणें, वांति किंवा जुलाब अतिशय होणें, रडणें, शोक करणें, भय, त्रास, फार मोठा बोजा उचलणें व अतिशय मार्ग चालणें या कारणांनीं कुपित झालेला वायु मस्तकांतील शिरांत शिरतो व त्या योगानें डोकें अतिशय दुखूं लागतें. आंखांत टोंचल्यासारखी अतिशय पीडा होते, मानेचा कांटा[1] तुटून पडल्यासारखें वाटतें, भोंवयांत, भोंवयाच्या मध्यभागीं व ललाटभागीं अत्यंत दाह व वेदना होतात, कानांत ध्वनि होतो व बाहेरचा ध्वनि ऐकूं येत नाहीं, डोळे ओढून काढल्यासारखें वाटतें, सर्व मस्तक फिरत असून सांधे सुटत असल्याचा भास होतो, सर्व शिरा अतिशय फडकतात किंवा उडतात आणि मान जखडल्यासारखी होते. हीं सर्व

---

१ कानाजवळचें कपाळाचें हाड.

लक्षणें, वातापासून झालेल्या मस्तक रोगांत होतात. या वातजन्य रोगांत स्निग्ध व उष्ण औषधोपचार हितकारक होत.

कट्वम्ललवणक्षारमद्यक्रोधातपानलैः ।
पित्तं शिरसि सन्दुष्टं शिरोरोगाय कल्पते ॥ २१ ॥
दह्यते रुज्यते तेन शिरः शीतं सुखूयते ।
दह्येते चक्षुषी तृष्णा भ्रमः स्वेदश्च जायते ॥ २२ ॥

तिखट, आंबट, खारट व क्षारयुक्त पदार्थ आणि मद्य यांचें अति सेवन केल्यानें, फार राग आल्यानें, तसेंच ऊन्ह व अग्नि यांच्या अति सहवासानें, मस्तकांतील पित्त दूषित होऊन पित्तज शिरोरोग उत्पन्न होतो. त्यायोगानें मस्तकांत दाह व सुई टोंचल्यासारख्या वेदना होतात; शीतोपचारांची इच्छा होते व त्यांनीं शांति होते; डोळ्यांची आग होते, तहान लागते, चक्कर येते व मस्तकास घाम येतो. हीं पित्तज शिरोरोगाचीं लक्षणें जाणावीं.

आस्यासुखैः स्वप्नसुखैर्गुरुस्निग्धातिभोजनैः ।
श्लेष्मा शिरसि सन्दुष्टः शिरोरोगाय कल्पते ॥ २३ ॥
शिरो मन्दरुजं तेन सुप्तस्तिमितभारिकम् ।
भवत्युत्पद्यते तन्द्रा तथाऽऽलस्यमरोचकम् ॥ २४ ॥

नेहमीं निरुद्योगी बसणें, दिवसा निजणें, जड व स्निग्ध पदार्थ अतिशय खाणें, अधिक जेवणें या कारणांनीं मस्तकांतील कफ दूषित होऊन कफज मस्तकरोग उत्पन्न होतो. त्यापासून डोकें बारीक बारीक दुखें, निचेष्ट होतें, गुंगींत असल्यासारखें वाटतें, जड होतें आणि निद्रा, आळस व अन्नावर अरुचि उत्पन्न होते. हीं कफज शिरोरोगाचीं लक्षणें जाणावीं.

वाताच्छूलं भ्रमः कम्पः पित्ताद्दाहो मदस्तृषा ।
कफाद्गुरुत्वं तन्द्रा च शिरोरोगे त्रिदोषजे ॥ २५ ॥

सान्निपातिक शिरोरोगांत पुढें लिहिल्याप्रमाणें प्रत्येक दोषांची निर निराळीं लक्षणें एकत्र होतात.—वायूपासून शूल, घेरी व कंप हीं होतात; पित्तापासून दाह, मद व तहान हीं होतात आणि कफापासून जडपणा व सुस्ती येते.

तिलक्षीरगुडाजीर्णपूतिसङ्कीर्णभोजनात् ।
क्लेदोऽसृक्कफमांसानां दोषलस्योपजायते ॥ २६ ॥
ततः शिरसि सङ्क्लेदात्कृमयः पापकर्मणः ।
जनयन्ति शिरोरोगं जातबीभत्सलक्षणम् ॥ २७ ॥
व्यधच्छेदरुजाकण्डूशोफदौर्गन्ध्यदुःखितम् ।
कृमिरोगातुरं विद्यात्कृमीणां दर्शनेन च ॥ २८ ॥

तीळ, दूध, गूळ यांचें अतिसेवन करणें, अजीर्णावर जेवणें, आंबलेलें व परस्पर विरुद्ध द्रव्यांच्या संयोगानें बनलेलें असें अन्न खाणें, या कारणांनीं मस्तकांतील वातादि दोष अतिशय वाढून त्या ठिकाणचें रक्त, कफ व मांस हीं क्लिन्न (१ ओलीं) होतात. त्या क्लेदापासून पापकर्मी[२] मनुष्याच्या

---

१ एखादा पदार्थ सडूं लागला असतां, किंवा जखम झाली असतां त्यांत जो एक प्रकारचा ओलसरपणा असतो त्यास क्लेद ह्मणतात.

२ कृमिज मस्तकरोग अधर्माचरणी मनुष्यास होतो व तो अतिशय दुःखदायक असतो हें दाखविण्याकरितां 'पापकर्मणाम्' या पदाचा प्रयोग केला आहे. अधर्माचरणाचा निर्देश करण्याचा हेतु हा कीं, त्यांत औषधोपचार करून शिवाय दैवव्यपाश्रय चिकित्सा ह्मणजे जप, बलिहोमादि धार्मिक क्रियाही कराव्या. 'धर्मेण हरते व्याधिः' असें वचनच आहे. आर्य व आंग्ल वैद्यकांत मुळांतच मोठा फरक हा आहे कीं आंग्ल वैद्यक रोगाचें केवल दृष्ट कारण मानून त्यावर केवल दृष्टचिकित्साच प्रतिपादन करितें आणि आर्यवैद्यकांत रोगाचें निदान व चिकित्सा यांच्याशीं पूर्वजन्मार्जितकर्मविपाक व वर्तमान जन्मांतील धार्मिक व नैतिक आचरण यांच्याशीं अत्यंत संबंध जोडला आहे. कित्येक रोगांचें निदान केवल अधर्माचरणच सांगितलें आहे व त्यांची चिकित्साही धार्मिक स्वरूपाचीच प्रदिपादन केली आहे. इतकेंच नव्हे तर कोणत्याही रोगाची चिकित्सा सुरू करण्यापूर्वी तो दैवकृत आहे कीं काय याचा निश्चय करून घ्यावा असें सांगितलें आहे. आर्यवैद्यकाच्या उक्त सिद्धान्ताची यथार्थता हल्लींच्या प्लेगच्या साथीनें पूर्णतया सिद्ध केली आहे.

मस्तकांत किडे उत्पन्न होऊन शिरोरोग उत्पन्न होतो व त्यांत किळस[1] वाटण्याजोगीं लक्षणें होतात. मस्तकांत टोंचल्यासारखें वाटते, कापल्या-सारखें दुखतें, शूळ होतो, खाज सुटते, सूज येते, घाण सुटते व अतिशय क्लेश होतात. हीं लक्षणें झालीं व कृमिही पडतांना दिसले ह्मणजे त्या रोग्याच्या मस्तकांत कृमि उत्पन्न होऊन त्यापासून शिरोरोग उत्पन्न झाला आहे असें समजावें.

> शोकोपवासव्यायामरूक्षशुष्काल्पभोजनैः ।
> वायुराविश्य हृदयं जनयत्युत्तमां रुजम् ॥ २९ ॥
> वेपथुर्वेष्टनं स्तम्भः प्रमोहः शून्यता दरः ।
> हृदि वातातुरे रूपं जीर्णे चात्यर्थवेदना ॥ ३० ॥

शोक, उपास, दंड–कसरत वगैरे व्यायाम आणि रूक्ष, शुष्क व थोडें अन्न खाणें, यांच्यायोगानें कुपित वायु हृदयांत प्रवेश करून त्या ठिकाणीं अतिशय शूळ उत्पन्न करितो. त्यापासून हृदय कांपूं लागतें, पिळवटल्या-सारखी पीडा होते, छाती भरून येते, मूर्च्छा येते, हृदय शून्य भासतें व छातींत धडधड होते. हीं सर्व वातजहृद्रोगाचीं लक्षणें समजावीं. यांत विशेषें करून अन्नपचन झाल्यानंतर अतिशय वेदना होतात.

> उष्णाम्ललवणक्षारकटुकाजीर्णभोजनैः ।
> मद्यक्रोधातपैश्चाशु हृदि पित्तं प्रकुप्यति ॥ ३१ ॥
> हृद्दाहस्तिक्तता वक्त्रे तिक्ताम्लोद्गिरणं क्लमः ।
> तृष्णा मूर्च्छा भ्रमः स्वेदः पित्तहृद्रोगलक्षणम् ॥ ३२ ॥

उष्ण, आंबट, खारट, क्षारयुक्त व तिखट अशा पदार्थांचें अति-सेवन करणें, अजीर्णावर जेवणें, मद्यपान करणें, क्रोध करणें व उन्ह

१ किळस वाटण्याजोगीं बीभत्सलक्षणें ह्मणजे नाकांतून पू वाहणें वगैरे होत.

लागणें या कारणांनीं हृदयांतील पित्त प्रकुपित होऊन त्यापासून छातींत जळजळ होते, तोंड कडू होतें, कडू व आंबट ढेकर येतात, अंग गळ-ल्यासारखें वाटतें, तहान लागते, मूर्च्छा येते, मस्तक फिरतें व घाम येतो. हीं सर्व पित्तजहृद्रोगाचीं लक्षणें समजावीं.

अत्यादानं गुरुस्निग्धमचिन्तनमचेष्टनम् ।
निद्रासुखं चाभ्यधिकं कफहृद्रोगकारणम् ॥ ३३ ॥
हृदयं कफहृद्रोगे सुप्तस्तिमितभारिकम् ।
तन्द्रारुचिपरीतस्य भवत्यश्मावृतं यथा ॥ ३४ ॥

अति भोजन, जड व स्निग्ध पदार्थ खाणें, आळस व बेफिकरींत काळ घालविणें आणि अतिशय व वेळीं अवेळीं निजणें, या कारणांनीं कफ प्रकुपित होऊन हृद्रोग उत्पन्न करितो. या कफहृद्रोगांत हृदय अ-चेतन, स्तब्ध व जड होतें; गुंगी येते, अरुचि उत्पन्न होते व हृदया-वर एखादा दगड ठेविल्याप्रमाणें भास होतो.

हेतुलक्षणसंसर्गादुच्यते सान्निपातिकः ।
त्रिदोषजे तु हृद्रोगे यो दुरात्मा निषेवते ॥ ३५ ॥
तिलक्षीरगुडादीनि ग्रन्थिस्तस्योपजायते ।
मर्मैकदेशे सङ्क्लेदं रसश्चास्योपगच्छति ॥ ३६ ॥
सङ्क्लेदात्क्रिमयश्चास्य भवन्त्युपहतात्मनः ।
मर्मैकदेशे सञ्जाताः सर्पन्तो भक्षयन्ति च ॥ ३७ ॥
तुद्यमानं स हृदयं सूचीभिरिव मन्यते ।
छिद्यमानं यथा शस्त्रैर्जातकण्डूमहारुजम् ॥ ३८ ॥
हृद्रोगं क्रिमिजं त्वेतैर्लिङ्गैर्बुद्ध्वा सुदारुणम् ।
त्वरेत जेतुं तं विद्वान्विकारं शीघ्रकारिणम् ॥ ३९ ॥

वर वातजन्य, पित्तजन्य व कफजन्य अशा तिन्ही प्रकारच्या हृद्रो-गांचीं जीं निरनिराळीं कारणें व लक्षणें सांगितलीं आहेत तीं सर्व कारणें

व लक्षणें एकत्र झालीं ह्मणजे त्यास सान्निपातिक किंवा त्रिदोषज हृद्रोग ह्मणतात. या त्रिदोषज हृद्रोगांत जो मूर्ख मनुष्य तीळ, दूध, गूळ, किंवा अन्य अशाच प्रकारच्या गुणधर्मांचे पदार्थ सेवन करितो त्याच्या हृदयांत फोड उत्पन्न होऊन त्याचा स्राव व दूषित रस एका भागांत जाऊन जमतो व त्या स्रावापासून त्या ठिकाणीं कृमि उत्पन्न होतात. ते कृमि हृदयांत सर्वत्र फिरून मांसाचें भक्षण करितात. त्यावेळीं सुया टोंचल्याप्रमाणें किंवा एखाद्या शस्त्रानें कापल्याप्रमाणें वेदना होतात, अतिशय खाज सुटते व असह्य पीडा होते. हीं सर्व लक्षणें दिसलीं ह्मणजे रोग्यास भयंकर कृमिजहृद्रोग झाला आहे असें समजून कुशल वैद्यानें ताबडतोब त्याची चिकित्सा करण्यास आरंभ करावा. कारण विलंब लागल्यास हा तत्काल रोग्याचे प्राण हरण करील.

*द्युल्बणैकोल्बणैः षट् स्युर्हीनमध्याधिकैश्च षट् ।
समैश्चैको विकारास्ते सन्निपातास्त्रयोदश ॥ ४० ॥

वातादि दोषांच्या सन्निपाताचे एकंदर तेरा प्रकार आहेत. ते असे—दोनदोन दोषांच्या वृद्धीनें तीन; एकेक दोष वाढून तीन; एक

---

* हा विषय अति सूक्ष्म विचारानें समजून घेण्याजोगा आहे. कारण आर्यवैद्यकाचा मूळ पाया त्रिदोष व त्या त्रिदोषांवर एकंदर रोगांचें निदान व चिकित्सा अवलंबून असावयाची. त्या त्रिदोषांची एकंदर व्यवस्था वर लाविली आहे. कोणताही रोग वर वर्णन केलेल्या बासष्ट प्रकारांच्या बाहेर राहूं शकत नाहीं. करितां या व्यवस्थेचें रहस्य यथार्थ समजल्यास निदान व चिकित्सेंत काठिन्य राहत नाहीं. ह्मणून यांचें पूर्णपणें ज्ञान होणें इष्ट आहे. या ठिकाणीं यांचें वर्णन सूत्रमात्र केलें असल्यामुळें तें समजण्यास कठीण पडतें. ह्मणून त्याचें थोडें स्पष्टीकरण पुढें केलें जात आहे.

१ कफ वाढलेला व वातपित्त त्याहून अधिक वाढलेलें, २ पित्त वाढलेलें व वातकफ त्याहून अधिक वाढलेले, ३ वात वाढलेला व पित्तकफ त्याहून अधिक वाढलेले, ४ पित्त कफ वाढलेले वात त्याहून अधिक वाढलेला, ५ वातकफ वाढलेले व पित्त त्याहून अधिक वाढलेलें, ६ वातपित्त वाढलेलें व कफ त्याहून अधिक वाढलेला, ७ वात वाढलेला त्याहून

दोष क्षीण, दुसरा मध्यम व तिसरा वाढलेला अशा संयोगानें सहा; आणि तीन्ही दोष समान स्थितींत असणें हा एक प्रकार–असे, सर्व मिळून तेरा झाले.

---

पित्त अधिक वाढलेलें व पित्तापेक्षां कफ अधिक वाढलेला, ८ वात वाढलेला कफ त्याहून वाढलेला व पित्त त्याहीपेक्षां वाढलेलें, ९ पित्त वाढलेलें, कफ त्यापेक्षां वाढलेला व वात सर्वांत अधिक वाढलेला, १० पित्त वाढलेलें, वात त्याहून अधिक वाढलेला व कफ सर्वांत वाढलेला, ११ कफ वाढलेला, वात त्याहून वाढलेला व पित्त सर्वांत अधिक वाढलेलें, १२ कफ वाढलेला, पित्त अधिक वाढलेलें व वात सर्वांत अधिक वाढलेला, १३ सर्व दोष सारखे वाढलेले.

'संसर्गे नवषट् ' इत्यादि–१ वात वाढलेला व पित्त त्याहून अधिक वाढलेलें, २ पित्त वाढलेलें व वात त्यापेक्षां अधिक वाढलेला, ३ कफ वाढलेला व पित्त त्याहून अधिक वाढलेलें, ४ पित्त वाढलेलें व कफ त्याहून अधिक वाढलेला, ५ कफ वाढलेला व वात त्याहून अधिक वाढलेला, ६ वात वाढलेला व कफ त्याहून अधिक वाढलेला, ७ वात पित्त–८वातकफ–व ९ पित्तकफ हे सारखे वाढलेले, १०–११–१२ आणि वात पित्त व कफ हे एकेकटे वाढलेले–याप्रमाणें दोषांच्या वाढीच्या कमी जास्त प्रमाणावरून हे पंचवीस प्रकार झाले. आतां ' यथावृद्धैस्तथाक्षीणै: ' जसे दोष वाढून तसे दोष कमीं होऊन पुन्हां पंचवीस प्रकार होतात. वर सांगितलेल्या पंचवीस प्रकारांत ज्या ठिकाणीं वाढलेला असा शब्द आहे त्या ठिकाणीं या दुसऱ्या प्रकारच्या विभागांत क्षीण झालेला असा शब्दबदल केला म्हणजे त्यांचें स्पष्टीकरण आपोआप होतें. म्हणून येथें केलें नाहीं.

' वृद्धिरेकस्य समता ' इत्यादि—१ वात वाढलेला, पित्त सम व कफ क्षीण, २ पित्त वाढलेलें, वात सम व कफक्षीण, ३ कफ वाढलेला, पित्त सम वात क्षीण, ४ कफ वाढलला, वात सम व पित्त क्षीण, ५ वात वाढलेला, कफ समान व पित्त क्षीण, ६ पित्त वढलेलें, कफ सम व वात क्षीण, ७ वात क्षीण व पित्तकफ वाढलेले ८ पित्त क्षीण व वातकफ वाढलेले, ९ कफ क्षीण व वातपित्त वाढलेलें, १० वातपित्त क्षीण व कफ वढलला, ११ वातकफ क्षीण व पित्त वाढललें, १२ पित्तकफ क्षीण व वात वाढलेला.

याप्रमाणें प्रतिज्ञात बासष्ट भेद आहेत. याशिवाय वातादि तीन्ही दोष स्वाभाविक समस्थितींत असण्याचा एक त्रेसष्टावा प्रकार आहे. परंतु तो प्रकार शरिराचें आरोग्य राखणारा असल्यामुळें त्याचा निर्देश वर केला नाहीं. वरील बासष्ट प्रकार रोगाचे आहेत.

संसर्गे नव षट्तेभ्य एकवृद्ध्या समैस्त्रयः ।
पृथक्त्रयः स्युस्तैर्वृद्धैर्व्याधयः पञ्चविंशतिः ॥ ४१ ॥

दोन दोन दोष मिळून होणारे संसर्गज रोग नऊ प्रकारचे आहेत. त्यांपैकीं दोहोंतून एक दोष वाढल्यानें सहा प्रकार; दोन्ही सारखे वाढल्यानें तीन आणि एकेक वेगळा वाढल्यानें तीन; याप्रमाणें वरचे व हे मिळून एकंदर पंचवीस प्रकार झाले.

यथा वृद्धैस्तथा क्षीणैर्दोषैः स्युः पञ्चविंशतिः ॥ ४२ ॥

जसे हे पंचवीस प्रकार दोष वाढल्यानें होतात तसेच याच रीतीनें ते कमी झाल्यानें आणखी पंचवीस प्रकार होतात.

वृद्धिक्षयकृतश्चान्यो विकल्प उपदेक्ष्यते ।
वृद्धिरेकस्य समता चैकस्यैकस्य संक्षयः ॥
द्वन्द्ववृद्धिः क्षयश्चैकस्यैकवृद्धिर्द्वयोः क्षयः ॥ ४३ ॥

याशिवाय दोषांच्या वृद्धिक्षयानें होणारे रोगांचे आणखी दुसऱ्या प्रकारचे विभाग सांगतों. ते असे—एक दोष वाढलेला, दुसरा समस्थितींत व तिसरा क्षीण झालेला अशा रीतीनें सहा प्रकार होतात; दोन दोष वाढलेले व एक क्षीण झालेला अशा रीतीनें तीन आणि एक वाढलेला व दोन क्षीण झालेले असे तीन. असे हे सर्व मिळून बारा भेद झाले.

प्रकृतिस्थं यदा पित्तं मारुतः श्लेष्मणः क्षये ।
स्थानादादाय गात्रेषु यत्र यत्र विसर्पति ॥ ४४ ॥
तदा भेदश्च दाहश्च तत्र तत्रानवस्थितः ।
गात्रदेशे भवत्यस्य श्रमो दौर्बल्यमेव च ॥ ४५ ॥

आतां मागें सांगितलेल्या बारा भेदांचीं क्रमानें उदाहरणें देत आहेत. वात वाढलेला, कफ क्षीण झालेला व पित्त समस्थितींतलें अशी स्थिति

झाली ह्मणजे, वाढलेला वायु, समस्थितींतील पित्ताशीं मिळून शरीराच्या ज्या ज्या भागांत पसरतो त्या त्या ठिकाणीं तितका वेळ त्या पित्तापासून चिरण्यासारखी पीडा होते, दाह होतो, परिश्रम वाटतात व अशक्तता उत्पन्न होते.[1]

साम्ये स्थितं कफं वायुः क्षीणे पित्ते यदा बली ।
कर्षेत्कुर्यात्तदा शूलं सशैत्यस्तम्भगौरवम् ॥ ४६ ॥

पित्त क्षीण होऊन वायु कुपित झाला असतां तो साम्यावस्थेंतील कफास मिळून त्यास ज्या ज्या ठिकाणीं नेतो त्या त्या ठिकाणीं शूल, शैत्य, स्तब्धता व जडपणा उत्पन्न होतो.

यदाऽनिलं प्रकृतिगं पित्तं कफपरिक्षये ।
संरुणद्धि तदा दाहः शूलं चास्योपजायते ॥ ४७ ॥

कफदोष क्षीण होऊन पित्त प्रकुपित झालें असतां तें वायुची गति बंद करितें; त्यायोगानें ज्या ज्या ठिकाणीं वायू बंद होतो त्या त्या ठिकाणीं दाह व शूल उत्पन्न होतो.

श्लेष्माणं हि समं पित्तं यदा वातपरिक्षये
निपीडयेत्तदा कुर्यात्सतन्द्रागौरवं ज्वरम् ॥ ४८ ॥

---

१ यावर शंका अशी उद्भवेल कीं, पित्त जर आपल्या साम्यावस्थेंत आहे तर त्यापासून दाहादि विकार कसे होऊं शकतील. कारण रोग नेहमीं दोषांच्या विषमतेमुळें होत असतात. ह्मटलेंच आहे कीं—' रोगो हि दोषवैषम्यं दोषसाम्यमरोगता '. तर याचें कारण असें आहे कीं, यद्यपि याठिकाणीं पित्त आपल्या स्वाभाविक प्रमाणांतच असतें तथापि ज्या भागांत कुपित वायु त्यास नेतो त्या भागांत त्याचा संबंध फाजील होत असल्यामुळें त्यापासून अर्थातच वाढलेल्या पित्ताचे दाहादि विकार होतात. किंवा जसें रक्त, दूषित दोषांच्या संबंधानें विकार करतें तद्वतच कुपित वायूच्या संयोगानें या ठिकाणीं पित्तही विकृति उत्पन्न करतें असें मानलें तरी चालेल.

वात क्षीण होऊन पित्त कुपित झालेलें असलें ह्मणजे तें प्रकृताव- स्थेंतील कफास दाबून टाकितें, अर्थात् त्याचा अवरोध करितें. त्यापासून सुस्ती येते आणि आंग जड होऊन ताप येतो.*

प्रवृद्धो हि यदा श्लेष्मा पित्ते क्षीणे समीरणम् ।
रुन्ध्यात्तदा प्रकुर्वीत शीतकं गौरवं ज्वरम् ॥ ४९ ॥

पित्त क्षीण होऊन कफ वाढला असतां तो साम्यावस्थेंतील वायूची गति बंद करितो. त्यायोगानें थंडी लागून व आंग जड होऊन ताप येतो.

समीरणे परिक्षीणे कफः पित्तं समत्वगम् ।
कुर्वीत सन्निरुन्धानो मृद्वग्नित्वं शिरोग्रहम् ॥ ५० ॥
निद्रां तन्द्रां प्रलापश्च हृद्रोगं गात्रगौरवम् ।
नखादीनाञ्च पीतत्वं ष्ठीवनं कफपित्तयोः ॥ ५१ ॥

वायु क्षीण होऊन कफ वाढलेला असला ह्मणजे तो साम्यावस्थेंतील पित्तास अवरोध करितो. त्यापासून रोग्याची क्षुधा मंद होते, मस्तक- धारण करणाऱ्या शिरांत वेदना उत्पन्न होतात, अतिशय झोंप व सुस्ती येते, रोगी बडबड करूं लागतो, हृदयांत वेदना होतात, अंग जड होतें, नखादिकांचा रंग पिवळट होतो व थुंकीवाटे कफ आणि पित्त पडतें.

हीनवातस्य तु कफः पित्तेन सहितश्चरन् ।
करोत्यरोचकापाकौ सदनं गौरवं तथा ॥ ५२ ॥
हृल्लासमास्यस्रवणं दूयनं पाण्डुतां मदम् ।
विरेकस्य हि वैषम्यं वैषम्यमनलस्यच ॥ ५३ ॥

वायु क्षीण होऊन कफ व पित्त वाढले ह्मणजे ते एकत्र होऊन संचार करितात आणि पुढील विकार उत्पन्न करितात.—अरुचि,

* या जातीचा ताप हल्लीं आपल्याकडे विशेष प्रचारांत आढळतो. यांत मध्यान्ह काळीं जोराचा ताप येत असतो.

अपचन, थकवा येणें, अंग जड होणें, मळमळ होणें, तोंडांतून लाळ वाहणें, वर्ण फिकट होणें, शरीरांत वेदना होणें, उन्माद, शौचास कधीं जास्त व कधीं कमी होणें आणि भूकही कधीं अधिक, कधीं कमी किंवा कधीं मुळींच न लागणें.

क्षीणपित्तस्य तु श्लेष्मा मारुतेनोपसंहितः ।
स्तम्भं शैत्यं च तोदञ्च जनयत्यनवस्थितम् ॥ ५४ ॥
गौरवं मृदुतामग्नेर्भक्ताश्रद्धां प्रवेपनम् ।
नखादीनाञ्च शुक्लत्वं गात्रपारुष्यमेवच ॥ ५५ ॥

पित्त क्षीण झालें व कफ आणि वायु हे वाढून दोन्ही एकत्र झाले ह्मणजे शरीर शून्य पडतें, थंड होतें, निरनिराळ्या ठिकाणीं कळा मारतात, अंग जड होतें, जठराग्नि मंद पडतो, अर्थात् त्यापासून भूक कमी होऊन अन्नावरील प्रीति नाहींशी होते, कांपरें सुटतें, नख–मल–मूत्रादिकांचा रंग पांढरा होतो आणि शरीर खडबडीत होतें.

हीने कफे मारुतस्तु पित्तं तु कुपितं द्वयम् ।
करोति यानि लिङ्गानि शृणु तानि समासतः ॥ ५६ ॥
भ्रममुद्वेष्टनन्तोदं दाहं स्फोटनमुत्तमम् ।
अङ्गमर्दं परीशोषं दूयनं धूपनं तथा ॥ ५७ ॥

कफ क्षीण होऊन, वायु व पित्त हीं दोन्ही कुपित होऊन एकत्र मिळालीं असतां जीं विकारलक्षणें होतात तीं संक्षेपतः सांगतों—भ्रम होतो, पिळवटल्यासारखी पीडा होते, कळा लागतात, दाह होतो, हाडें फुटतात, कांपरें सुटतें, अंग वळतें, सुकतें, वेदना होतात व धुरी दिल्याप्रमाणें वाटतें.

वातपित्तक्षयेश्लेष्मा स्रोतांस्यभिदधद्भृशम् ।
चेष्टाप्रणाशं मूर्च्छाञ्च वाक्सङ्गञ्च करोति हि ॥ ५८ ॥

वात व पित्त हीं दोन्ही क्षीण होऊन एकटा कफ वाढलेला असला ह्मणजे तो शरीरांतील सर्व स्रोतसें अगदीं बंद करून टाकितो व त्यायोगानें रोगी क्रियाशून्य होतो, त्यास मूर्च्छा येते व वाणी अवरुद्ध होते, ह्मणजे जीभ वगैरे निचेष्ट होऊन बोलतां येईनासें होतें.

श्लेष्मवातक्षये पित्तं देहौजः स्रंसयच्चरत् ।
ग्लानिमिन्द्रियदौर्बल्यं तृष्णां मूर्च्छां क्रियाक्षयम् ॥ ५९ ॥

वात व कफ हे दोन्ही क्षीण होऊन एकटें पित्त वाढलेलें असलें ह्मणजे तें शरीरांतील साररूपी जो ओज धातु त्यास विगलित करून टाकितें. त्यापासून थकवा येतो, इंद्रियें निर्जीव होतात, तहान फार लागते, मूर्च्छा येते व कोणतेंही काम करण्यास उत्साह व सामर्थ्य राहत नाहीं.

पित्तश्लेष्मक्षये वायुर्मर्माण्यति निपीडयन् ।
प्रणाशयति संज्ञाञ्च वेपयत्यथवा नरम् ॥ ६० ॥

पित्त व कफ हे दोन दोष क्षीण होऊन एकटा वायु वाढला ह्मणजे तो हृदयादि जीं शरीराचीं मर्मस्थानें आहेत, त्या ठिकाणीं पीडा उत्पन्न करितो. त्यापासून मूर्च्छा येते किंवा कंप सुटतो.[1]

---

१ येथपर्यंत संक्षिप्त उदाहरणांसह वातादि दोषांचा परस्पर संसर्ग व त्यांच्या प्रमाणांचा कमीजास्तीपणा यावरून होणारे एकंदर रोगांचे बासष्ट प्रकार सांगितले. आतां यावर शंका अशी आहे कीं, हे बासष्ट प्रकार, दोषांचा संयोग होत असेल तरच होतात. तो संयोग वास्तविक होतां कामा नये. कारण वात, पित्त व कफ यांचे गुणधर्म परस्परविरुद्ध आहेत. परस्परविरुद्धधर्मी पदार्थ एकत्र झाले असतां ते परस्परांचा नाश करितात. जसें अग्नि व पाणी. याचें उत्तर असें आहे कीं, पदार्थांचा विरोध हा त्यांच्या साक्षात्कार्यापासून ठरविला पाहिजे. केवळ स्थूल मानानें पाहून कल्पना करणें बरोबर नाहीं. कारण सामान्यतः आपण पाण्याचा व अग्नीचा विरोध पाहतों. परंतु तो जर सर्वत्र लागू केला तर पांच महाभूतांच्या उत्पत्तीच्या आरंभीं 'अग्नेरापः' या वचनाप्रमाणें अग्नीपासून पाण्याची उत्पत्ती लिहिली आहे ती देखील झाली नसती. तसेंच पाणी व अग्नि यांच्या प्राधान्यानें झालेला अम्लरसही झाला नसता. या गोष्टी

**भारतीय वैद्यकाच्या उन्नत्यर्थ मासिक पुस्तक.**

# आर्यभिषक्.

सन १८८९ च्या जुलैपासून हें सारखें सुरू आहे. अनेक उपयुक्त पुस्तकें यांतून निघून, तीं स्वतंत्र बांधून विक्रीस तयार आहेत. आजच्या 'भारतधर्मा'च्या अंकांत त्यांची सविस्तर यादी आहे ती पहा.

मासिक पुस्तकाची वर्गणी, गरीबगुरीबांनांही देण्यास हरकत पडूं नये ह्मणून फारच कमी ठेवली आहे. भारतधर्म मासिक पुस्तकासहित 'आर्यभिषक्' घेणारास, वर्षास टपालसह १ रु. १० आणे पडतील. फक्त 'आर्यभिषक्' च घेणारास १॥ रु. व फक्त 'भारतधर्म' ८ आण्यांत मिळेल.

**सम्पादक**—आयुर्वेदमहोपाध्याय (वैद्यराज) **शंकर दाजी शास्त्री पदे.** मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

---

**सहाशांवर वनस्पतींची सविस्तर माहिती.**

# वनौषधी–गुणादर्श.

**असें पुस्तक दुसरें कुठें निघालेंच नाहीं!**

वनस्पती ओळखण्याच्या खुणाखाणा वगैरे माहिती; निरनिराळ्या भाषेंतील नांवें; गुणदोष, व निरनिराळ्या रोगांवर तिचे उपयोग कसे होतात—असें प्रत्येक वनस्पतीचें वर्णन करून, वर्णानुक्रमानें सहा भागांत सहाशांवर वनस्पतींचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे!

सर्वसाधारण आबालवृद्धांच्या उपयोगीं असा हा ग्रंथ, सरळ मराठी भाषेंत असल्यानें, त्याचा खप झपाट्यानें होऊन, दुसरी आवृत्तिही निघाली आहे. भाग १ किंमत १२ आणे; भाग २ रा १ रुपया; तिसरा १। रु; चवथा १॥ रु; पांचवा १। रु; व सहावा १२ आणे. टपालहशील शिवाय पडेल. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मे किंमतीस मिळेल.

**थोडक्यांत सर्व रोगांचें निदान करून सुलभ उपचार कळण्यासाठीं!**

# सुबोध वैद्यक.

प्रत्येक रोगाचें कारण, रोग ओळखण्यासाठीं चिन्हें, रोगावर सुलभ व खात्रीचे उपचार; पथ्यापथ्य इत्यादि संपूर्ण माहिती, एका पुस्तकांत सरळ मराठी भाषेंत मिळावी ह्मणून हें पुस्तक मुद्दाम तयार करण्यांत आलें आहे.

पहिली आवृत्ति तेव्हांच संपून ही दुसरी आवृत्ति निघाली आहे. पूर्वार्ध व उत्तरार्ध असे याचे दोन भाग आहेत. पूर्वार्ध किं. ८ आणे; उत्तरार्ध १ रु. टपाल शिवाय. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मी किंमत.

# श्रीसयाजी–औषधशाला.

## मुंबई, कावसजीपटेल तलावाजवळ.

यथाशास्त्र औषधें तयार करणें व नवीन अनुभूत औषधांचा प्रसार करणें यासाठीं ही स्थापन केली आहे. बऱ्याच तदानुषंगिक गोष्टी या शालेकडून व्हावयाच्या आहेत; परंतु सर्वसाधनसम्पन्नता झाल्यावर खुलासा प्रसिद्ध करणें बरें ह्मणून तूर्त विशेष न लिहितां, तूर्त जीं औषधें तयार आहेत त्यांपैकीं कांहींची यादी याखालीं देत आहों:—

**दीपनार्क**—आम्लपित्तावर, बाटली किं. १ रु. **कफघ्न अर्क.**—बाटली किं. १॥ रु. **बस्तिशोधनार्क.**—बाटली किं. १ रु० **पाचनार्क.**—बाटली किंमत १२ आणे. **रक्तशोधक गोळ्या.**—डबीची किंमत १॥ रु. **अभ्रकभस्म.**—१५ रु. तोळा. **कपर्दिकभस्म.**—८ आ. तोळा. **प्रवाळभस्म.**—(अग्निपुटी.) १॥ रु. तोळा. **मंडूरभस्म.**—२॥ रु. तो. **वंगभस्म.**—२॥ रु. तो. **सुवर्णमाक्षिकभस्म.**—२॥ रु. **गंधकरसायन.**— ६ रु. तोळा. **सूतशेखर.**—६ रु. तोळा. **हेमगर्भ.**—२० रुपये तोळा. **चंद्रप्रभागुटिका.**—२॥ रु. तोळा. **कर्पूरादिगुटिका.**—**वीर्यस्तंभकाचा** गुण या गोळ्यांत फारच उत्कृष्ट रीतीनें आणला आहे. प्रकृतीस कोणत्याही रीतीनें बिघाड न होतां उत्तम गुण येतो अशाबद्दल **सरदार, श्रीमंत,** विद्वान् वगैरे सर्व प्रकारच्या लोकांनीं याचा अनुभव घेतला आहे. किं. १६ गोळ्यांस ३ रु.

**भारतधर्म मासिकपुस्तकाचे वर्गणीदारांस**

### निम्मे किंमतीस !

**गीता–ज्ञानेश्वरीरहस्य.** ह्या पुस्तकांत श्रीभगवद्गीतेंतील निवडक निवडक श्लोक व ज्ञानेश्वरीच्या ओंव्या देऊन, त्यांचें सरळ व सोप्या अशा मराठी भाषेंत उत्कृष्ट हृद्गत दिलेलें आहे. किंमत मुद्दाम फारच थोडी ह्मणजे फक्त ८ आणे ठेविली आहे; तरी भारतधर्माच्या वर्गणीदारांकरितां ह्मणून, **तूर्त ४ आणे.** टपालखर्च १ आणा.

**अस्सल मृगनाभींतील कस्तूरी.** ३० रु० तोळा.

**शुद्ध शिलाजित.** २ रु० तोळा.

**जेहर–मोहरा.** हा एक प्रकारचा दगड, फक्त हिमालयांतच मिळतो. हा जखमेस लावला तर जखम त्वरित मिळून येते. दूध किंवा पाण्यांत दिला असतां उष्णनाशक व रक्तशोधक आहे. १० रुपये रत्तल.

# रसवैद्य.


पारा, हिंगूळ, सोमल, सुवर्ण, रौप्य, ताम्र, लोह इत्यादि सर्व रसायनें वगैरे औषधें ओळखणें, शुद्ध करणें, भस्में वगैरे करणें, रोगांवर वापरणें इत्यादि सर्व माहिती यांत आहे. आवृत्ती दुसरी किं. १२ आणे. टपाल शिवाय.

मुंबई, श्रीसयाजी-औषधशाला व आर्यभिषक्कार्यालय. **के. रामराव,** व्यवस्थापक.

---

'नेटिवओपिनियन' छा. छा.

के० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक ५ वा.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषकार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥—श्रीवाग्भटः ।

वृश्चिकसंक्रांति.—शके १८२४ कार्तिक शु. १५ शनिवार. ता० १५ नोवेंबर, सन १९०२.

**विषयानुक्रम.**-सार्थ चरकसंहिता, सूत्रस्थान, उत्तरार्ध पृष्ठें ९७-१२०.

**सूचना.**-उत्तरार्धाचा पहिला भाग, आर्यभिषकांतून लौकरे पुरा करणें असल्यामुळें या वेळीं इतर मजकुराचीं पृष्ठें कमी केलीं आहेत. त्रिदोष-पित्तावरील मजकूर पुढच्या अंकापासून थोडथोडा येत जाईल.

---

## भारतीय रसायनशास्त्राचें अग्रेसरत्व.

रसायनशास्त्रांत हिंदुस्थान फार प्राचीनकाळापासून उच्च स्थितीस आलें आहे ही गोष्ट कित्येक आधुनिकांना आश्चर्य वाटण्यासारखी आहे. पण कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजचे रसायनशिक्षक प्रो० प्रफुल्लचंद्र राय, डी. एस्. सी. यांनीं नुक्ताच एक ग्रंथ सदर विषयावर सप्रमाण असा केला आहे. त्यावर अलाहाबादचें अंग्लोइंडियन प्रख्यात पत्र 'पायोनियर' यानें अभिप्राय प्रगट करतांनां ह्मटलें आहे कीं, **पृथ्वीवरच्या सर्व देशांपेक्षां हिंदू रसायनज्ञ फारच पुढें गेलेले होते.** प्रो. राय यांनीं आपल्या ग्रंथांत, प्राचीन ग्रंथांतील उतारे देऊन असें स्पष्ट सिद्ध करून दिलें आहे कीं, रसायन व धातुप्रकरणांत हिंदुस्थान शिखरास पोंचलें होतें. हलक्या धातूंची श्रेष्ठ धातु करण्याची कृति, थेट ऋग्वेदापासून प्रचलित होती. इसवी सनाच्या चारशें वर्षांपूर्वी चरक ग्रंथ केलेला असावा, व त्यानंतर दोनशें वर्षांनीं सुश्रुत झाला असें त्यांनीं सिद्ध केलें आहे. अरबस्तान किमियासंबंधानें यूरोपांत प्रसिद्ध आहे; पण त्या अरबस्तानाचें गुरुत्व हिंदुस्थानाकडे आहे इतकेंच नव्हे, तर प्रसिद्ध अरबी ग्रंथ 'सनाक'मध्यें कित्येक प्रकरणांचे अक्षरशः उतारे चरकसुश्रुतांतून दिलेले आढळतात; त्यावरून हिंदुस्थानच्या विद्येची श्रेष्ठता निर्विवाद ठरते. प्रो० प्रफुल्लचंद्र राय यांनीं आपल्या ग्रंथांत अनेक बावती अशा उत्कृष्ट रीतीनें प्रतिपादन केल्या आहेत, कीं ज्या वाचून आर्यांची अप्रतिम विद्वत्ता अजूनही जगास आश्चर्यचकित करून सोडण्यासारखी असून, फक्त उत्तेजनाभावामुळेंच ती झांकून गेली आहे असें कोणासही वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

---


### सहाशांवर वनस्पतींची सविस्तर माहिती.

# वनौषधी-गुणादर्श.

### असें पुस्तक दुसरें कुठें निघालेंच नाहीं!

वनस्पती ओळखण्याच्या खुणाखाणा वगैरे माहिती; निरनिराळ्या भाषेंतील नांवें; गुणदोष, व निरनिराळ्या रोगांवर तिचे उपयोग कसे होतात—असें प्रत्येक वनस्पतीचें वर्णन करून, वर्णानुक्रमानें सहा भागांत सहाशांवर वनस्पतींचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे!

सर्वसाधारण आबालवृद्धांच्या उपयोगी असा हा ग्रंथ, सरळ मराठी भाषेंत असल्यानें, त्याचा खप झपाट्यानें होऊन, दुसरी आवृत्तिही निघाली आहे. भाग १ किंमत १२ आणे; भाग २ रा १ रुपया; तिसरा १। रु.; चवथा १॥ रु.; पांचवा १। रु.; व सहावा १२ आणे. टपालहंशील शिवाय पडेल. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मे किंमतीस मिळेल.

दोषाः प्रवृद्धाः स्वं लिङ्गं दर्शयन्ति यथाबलम् ।
क्षीणा जहति लिङ्गं स्वं समाः स्वकर्म कुर्वते ॥ ६१ ॥

दोष वाढले असतां, त्यांच्या वाढीच्या प्रमाणानुरूप विकृत लक्षणें उत्पन्न होतात; ते क्षीण झाले म्हणजे त्यांचीं जीं स्वाभाविक लक्षणें असतात तीं फक्त नाहींशीं होतात आणि ते आपल्या साम्यावस्थेंत असले म्हणजे त्यांच्या ज्या स्वाभाविक क्रिया आहेत त्या करितात.

---

प्रत्यक्ष घडलेल्या आहेत त्या अर्थी दोषांच्या परस्परसंयोगांत कांहीं बाध दिसत नाहीं. तेव्हां " विरुद्धगुणसन्निपाते भूयसाऽल्पमवजीयते " ' ह्रासहेतुर्विशेषस्तु ' विरुद्ध गुणाच्या दोषांचा संयोग झाला असतां जो बळवत्तर असतो दुर्बळ दोषाचा पराभव करितो. इत्यादि अर्थाचीं ही वचनें निरर्थक समजलीं पाहिजेत. तसें नाहीं—दोष स्वरूपतः विरुद्ध नाहींत. तर त्यांची प्रभाव नांवाची जी एक अचिन्त्य शक्ति आहे ती परस्परविरुद्ध आहे. जसें—लकुच फल तीन्ही दोषाची वृद्धि करणारें आहे; परंतु वरील शंकेप्रमाणें पाहतां त्यानें तीन्ही दोषांचें हरण केलें पाहिजे. तसें होत नाहीं. याचें कारण त्यांत तीन्ही दोष वाढविण्याची अचिन्त्य शक्ति ऊर्फ प्रभाव आहे. तसेंच आवळ्यांत अम्लत्व, माधुर्य, शैत्य, तिखटपणा व कडूपणा इतके गुण आहेत. तर तो आवळा तीन्ही दोषांचें आपल्या अंगच्या निरनिराळ्या गुणांनीं निवारण करितो. अम्लत्व वातास हटवितें, माधुर्यशैत्य पित्त दूर करितें आणि तिखट व कडूपणा कफास नाहींसा करितो. असें होण्यास कारण त्यांचा प्रभाव होय. असा प्रभाव होण्यास कारण मनुष्यांचें अदृष्ट. त्या अदृष्टामुळेंच परस्परविरुद्ध दोष अविरोधानें त्यांच्या शरीरांत राहतात. आचार्यांनीं पुढें सांगितलें आहे " विरुद्धैरपि न त्वेते गुणैर्घ्नन्ति परस्परम्। दोषाः सहजसात्म्यत्वाद्घोरं विषमहीनिव. " ज्याप्रमाणें सर्पाच्या तोंडांत इतकें भयंकर विष नेहमीं राहत असूनही तें त्यास दैववशात् झालेल्या स्वाभाविक सात्म्यामुळें बाधत नाहीं तद्वतच दोषही मनुष्याच्या शरीरांत राहून परस्परांस बाधत नाहींत. एतावता दोषांचा संसर्ग व सन्निपात यांत कोणताही विरोध येत नाहीं.

२. या श्लोकांत, दोषांच्या वृद्धि, क्षय व साम्य अशा तीन निरनिराळ्या अवस्थांत त्यांच्या ज्या क्रिया होतात त्यांचें तत्त्व निरूपण केलें आहे. सारांश साक्षात विकृति उत्पन्न करण्याची शक्ति फक्त वाढलेल्या दोषांतच आहे. क्षीण झालेल्या दोषांत त्यांची साम्यावस्थेंतील जीं स्वाभाविक कर्मे असतात तेवढीं फक्त नाहींशीं होतात. दोष वाढून, प्रतिलोमगामी झाले म्हणजे रसादि दूष्य धातूंस दूषित करून ते ज्वरादि रोग उत्पन्न करितात. क्षीण झालेल्या दोषांत तशी शक्ति नसते. कारण त्यांची स्वाभाविक शक्ति देखील कमी होते.

**वातादीनां रसादीनां मलानामोजसस्तथा ।**
**क्षयास्तत्रानिलादीनामुक्तं संक्षीणलक्षणम् ॥ ६२ ॥**

वात, पित्त व कफ हे तीन दोष, रसादि सप्त धातु, विष्ठा, मूत्र व तोंड, नाक, डोळे, कान आणि लोमकूप या पंचेन्द्रियांचे मल मिळून सात प्रकारचे मल आणि ओज या अठरा पदार्थांचा क्षय होत असतो. त्यापैकीं वातादि त्रिदोषांच्या क्षयाचीं लक्षणें पूर्वी सांगितलींच आहेत. आतां रसादिकांच्या क्षयाचीं लक्षणें सांगतों.

**घट्टते सहते शब्दं नोच्चैर्द्रवति शूल्यते ।**
**हृदयं ताम्यति स्वल्पचेष्टस्यापि रसक्षये ॥ ६३ ॥**

रसक्षय झाला असतां पुढील लक्षणें होतातः–हृदय धडधडतें, मोठ्यानें बोललेलें सहन होत नाहीं, हृदय ‘ धुगधुग ’ करतें, निडका मारतात व यत्किंचितही श्रम केला तर छातींत पीडा होते व डोळ्यांपुढें काळोखी येते.

**परुषा स्फुटिता म्लाना त्वग्रूक्षा रक्तसङ्क्षये ॥ ६४ ॥**

रक्तक्षय झाला असतां, शरीराची कातडी राठ, फाटलेली किंवा चिरा पडलेली, निस्तेज व खरखरीत अशी होते.

**मांसक्षये विशेषेण स्फिग्ग्रीवोदरशुष्कता ॥ ६५ ॥**

मांसक्षयांत सर्व शरीरच सुकतें, परंतु विशेषेंकरून कुले, मान व पोट हीं अतिशय कृश होतात.

**सन्धीनां स्फुटनं ग्लानिरक्ष्णोरायास एव च ।**
**लक्षणं मेदसि क्षीणे तनुत्वं चोदरस्य च ॥ ६६ ॥**

सांधे फुटणें, डोळ्यांवर सुस्ती येणें, थकवा वाटणें व पोट कृश होणें हीं मेदक्षयाचीं लक्षणें जाणावीं.

**केशलोमनखश्मश्रुद्विजप्रपतनं श्रमः ।**
**ज्ञेयमस्थिक्षये रूपं सन्धिशैथिल्यमेव च ॥ ६७ ॥**

डोक्याचे व अंगावरील केंस आणि दाढी व मिशीचे केंस गळणें आणि नखें व दांत पडणें, थकवा येणें व सांधे ढिले पडणें, हीं अस्थिक्षयाचीं लक्षणें होत.

शीर्यन्त इव चास्थीनि दुर्बलानि लघूनिच ।
प्रततं वातरोगाणि क्षीणे मज्ज्ञानि देहिनाम् ॥ ६८ ॥

मज्जा धातूचा क्षय झाला असतां पुढील लक्षणें होतात.–हाडें गळल्यासारखीं वाटतात, त्यांची शक्ति नाहींशी होते, तीं बारीक होतात व त्यांत नेहमीं वायुसंबंधी विकार राहतात.

दौर्बल्यं मुखशोषश्च पाण्डुत्वं सदनं श्रमः ।
क्लैब्यं शुक्राविसर्गश्च क्षीणशुक्रस्यलक्षणम् ॥ ६९ ॥

दुर्बलता, तोंड कोरडें पडणें, शरीर फिकट व निस्तेज होणें, अंग गळणें. नेहमीं थकवा वाटणें, पुरुषत्वाची हानि व संभोग केला असतां वीर्य पतन न होणें हीं वीर्यक्षयाचीं लक्षणें होत.

क्षीणे शकृति चान्त्राणि पीडयन्निवमारुतः ।
रूक्षस्योन्नमयन्कुक्षिं तिर्यगूर्ध्वश्च गच्छति ॥ ७० ॥

विष्टाक्षय झाला असतां वायु आंतड्यांत शिरून त्या ठिकाणीं तीं पिळून काढल्याप्रमाणें पीडा उत्पन्न करितो. रोग्याचें अन्तर्बाह्य शरीर रूक्ष होतें. तशा स्थितींत वायु त्याच्या कुशीस उंच करून तिरपा व उर्ध्वगामी चालतो[1].

मूत्रक्षये मूत्रकृच्छ्रं मूत्रवैवर्ण्यमेव च ।
पिपासा बाधते चास्य मुखश्च परिशुष्यति ॥ ७१ ॥

---

१ विसूचिका ( कॉलेरा ) आदि रोगांत आंतड्यांत विष्ठा नसल्यामुळें त्यांच्या वरचा यंत्रसमूह त्यांवर चिकटून बसतो. त्यावेळीं रोग्यास अतिशय भयंकर वेदना होतात व त्या ठिकाणीं त्या वेदना अधिक वेळ राहिल्यास दाह व शूल उत्पन्न होतो. कॉलेऱ्याची अन्तिम स्थिति विष्ठाक्षयाच्या लक्षणांशीं जुळते.

मूत्रक्षय झाला असतां पुढील लक्षणें होतात. लघ्वीस वरचेवर थोडं थोडें व पीडायुक्त होतें, मूत्राचा रंग बदलतो, तहान फार लागते व तोंडास कोरड पडते. .

मलायनानि चान्यानि शून्यानि च लघूनिच ।
विशुष्काणि च लक्ष्यन्ते यथास्वं मलसंक्षये ॥ ७२ ॥

- तोंड, नाक, डोळे, कान व त्वचेवरील लोमछिद्रें हीं इन्द्रियें त्यांच्या त्यांच्या मलांचा क्षय झाला असतां शून्य, हलकीं व कोरडीं पडलेशीं दिसतात.

बिभेति दुर्बलोऽभीक्ष्णं ध्यायति व्यथितेन्द्रियः ।
दुश्छायो दुर्मना रूक्षः क्षामश्चैवोजसः क्षये ॥ ७३ ॥
[1]हृदि तिष्ठति यच्छुद्धं रक्तमीषत्सपीतकम् ।
ओजः शरीरे सङ्ख्यातं तन्नाशान्ना विनश्यति ॥ ७४ ॥

१ ओज समजण्यास कठिण असल्यामुळें हें त्याचें लक्षण केलें आहे. यांतील ' रक्तमीषत् ' या पदांचा अर्थ ईषत्-किंचित तांबूस असा केला आहे. दुसरा अर्थ असाही होऊं शकेल कीं, ' ईषत् ' ह्मणजे अल्पप्रमाण. ओज दोन प्रकारचें सांगितलें आहे. एक श्रेष्ठ व दुसरें कनिष्ठ. पहिल्या प्रकारच्या ओजाचें प्रमाण आठ बिंदुमात्र सांगितलें आहे. " प्राणाश्रयस्यौजसोष्टौ बिन्दवो हृदयाश्रयाः " असें प्रमाण आहे. दुसऱ्या प्रकारच्या ओजाचें प्रमाण अर्द्ध अंजलि ( ८ तोळे ) सांगितलें आहे. " तावच्चैव श्लेष्मण ओजसश्च प्रमाणम् " असें शारीरस्थानांत प्रमाण आहे. अष्टबिन्दुक ओज श्रेष्ट आहे त्याचा एक अवयव ह्मणजे बिन्दु जरी नाश झाला तर मनुष्याचा लागलाच मृत्यु होतो. अर्थेदशमहामूलीय अध्यायांत सांगितलें आहे कीं ' तत्परस्यौजसः स्थानम्' पर ह्मणजे श्रेष्ठ अष्टबिन्दुप्रमाण होय. याठिकाणीं जें ओजःक्षयाचें लक्षण सांगितलें आहे तें गौण अर्द्धाञ्जलि प्रमाणाचें समजावें. हें ओज रसादि सप्त धातूंचें समुदायरूप असल्यामुळें त्यास स्वतंत्र आठवा धातु मानण्याचें कारण नाहीं. ' सुश्रुतांनीं ह्मटलें आहे कीं, ' रसादीनां शुक्रान्तानां तत्परं तेजस्तत्खल्वोजः' अन्यत्रही प्रमाण आहे कीं, भ्रमरैः फलपुष्पेभ्यो यथा संह्रियते मधु । तद्वदोजः शरीरेभ्यो गुणैः संह्रियते नृणाम् ॥"

प्रथमे जायते ह्योजः शरीरेऽस्मिन् शरीरिणाम् ।
सर्पिर्वर्णं मधुरसं लाजगन्धि प्रजायते ॥ ७५ ॥

ओजक्षय झालेला मनुष्य नेहमीं भयभीत असतो, निश्शक्त होतो, नेहमीं उदास व चिन्तित असतो, त्याच्या सर्व शरीरांत व्यथा होते, निस्तेज दिसतो, त्याची मानसिक शक्ति नष्ट होऊन त्यास कोणत्याही गोष्टींत उत्साह राहत नाहीं आणि शरीर रूक्ष व कृश होतें. मनुष्याच्या हृदयांत पांढऱ्या रंगाचें किंचित तांबूस व पिवळटपणाची झांक मारणारें असें जें एक रसादि सप्त धातूंचे सार अथवा तेज राहतें त्यास ओज ह्मणतात. त्याचा क्षय झाला असतां मनुष्याचा मृत्यु अवश्य होतो. प्रथम मनुष्याच्या शरीरांत ओज उत्पन्न होतें. त्याचा रंग तुपाप्रमाणें असतो, तें रुचीस मधुर असतें व त्यास लाह्यांप्रमाणें वास येतो.

व्यायामोऽनशनं चिन्ता रूक्षाल्पप्रमिताशनम् ।
वातातपो भयं शोको रूक्षपानं प्रजागरः ॥ ७६ ॥
कफशोणितशुक्राणां मलानां चातिवर्तनम् ।
काल[2]ो भूतोपघातश्च ज्ञातव्याः क्षयहेतवः ॥ ७७ ॥

दंड, कसरत वगैरे व्यायाम अतिशय करणें, उपास करणें व वेळेवर न खाणें, नेहमीं चिन्ता करणें, रूक्षान्न खाणें, थोडें जेवणें, एकाच प्रकारचे (रसाचे) पदार्थ नेहमीं खाणें, वारा व ऊन्ह यांचें अतिसेवन, भीति, शोक, रूक्ष अशा पेय वस्तु पिणें, रात्रौ जागरण करणें, कफ, रक्त व वीर्य हीं कोणत्याही कारणानें शरीरांतून अतिशय बाहेर जाणें, मलमूत्रादिकांचीही अतिप्रवृत्ति होणें, वृद्धावस्था आणि पिशाचादिकांनीं झपाटणें या कारणांनीं वर सांगितलेले अठरा प्रकारचे क्षय उत्पन्न होतात[3].

---

१ हा श्लोक अप्रसिद्ध आहे. तो सर्वत्र आढळत नाहीं.

२ क्वचित 'कासो' ह्मणजे खोकला असाही पाठ आढळतो.

३ यांत वातक्षयाचें कारण त्याचें स्पष्ट लक्षण करतां घेण्याजोगें नसल्यामुळें

गुरुस्निग्धाम्ललवणं भजतामतिमात्रशः ।
नवमन्नं च पानश्च निद्रामास्यासुखानि च ॥ ७८ ॥
त्यक्तव्यायामचिन्तानां संशोधनमकुर्वताम् ।
श्लेष्मा पित्तश्च मेदश्च मांसं चातिप्रवर्द्धते ॥ ७९ ॥
तैरावृतगतिर्वायुरोज आदाय गच्छति ।
यदा वस्तिं तदा कृच्छ्रो मधुमेहः प्रवर्तते ॥ ८० ॥

जड, स्निग्ध, आंबट व खारट अशा प्रकारचे पदार्थ अतिशय खाणें, नवें अन्न खाणें, नवें पाणी किंवा नवें मद्य पिणें, दिवसा व अतिशय झोंपणें, एका जागीं नेहमीं बसून राहणें, दंड, कसरत किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा व्यायाम न करणें, सर्वदा निश्चिन्त असणें आणि वमन विरेचनादिकांच्या द्वारा कधीं शरीराचें शोधन न करणें, या कारणांनीं मनुष्याच्या शरीरांतील कफ, पित्त, मेद व मांस हीं अतिशय वाढतात. त्याच्या योगानें वायूच्या गतीस अडथळा होतो. असें झालें ह्मणजे तो अवरुद्ध वायु हृदयावर आक्रमण करून तेथील ओज आकर्षण करून तें बस्तींत घेऊन जातो ह्मणजे कृच्छ्रसाध्यप्रमेह उत्पन्न होतो.

समारुतस्य पित्तस्य कफस्य च मुहुर्मुहुः ।
दर्शयत्याकृतिं गत्वा क्षयमाप्याय्यते पुनः ॥ ८१ ॥
उपेक्षयाऽस्य जायन्ते पिडकाः सप्त दारुणाः ।
मांसलेष्ववकाशेषु मर्मस्वपि च सन्धिषु ॥ ८२ ॥

---

सांगितलें नाहींसें दिसतें. तरी तें निष्काळजीपणा, दिवसा झोंपणें वगैरे समजावें. किंवा उपासानें किट्ट धातू उत्पन्न होणार नाहीं व किट्टरूप वायू उत्पन्न न झाल्यानेंच त्याचा क्षय होतो असें समजावें.

१ या ठिकाणीं मुळांत मधुमेह शब्द असून त्याचा अर्थ प्रमेह कां केला याचें विवरण या अध्यायाच्या आरंभीं 'दशाष्टौच क्षयाः सप्त पिडका मधुमेहिकाः' या श्लोकाच्या टीपेंत केलें आहे.

शराविका कच्छपिका जालिनी सर्षपी तथा ।
अलजी विनताख्या च विद्रधी चेति सप्तमी ॥ ८३ ॥

यांत प्रथम वात पित्त, व कफ यांच्या प्रकोपाचीं लक्षणें दिसतात व मागाहून त्यांच्या क्षयाचीं लक्षणें दिसूं लागतात. असें वरचेवर होत असतें. या प्रमेहाची उपेक्षा केल्यास ह्मणजे योग्य चिकित्सा न केल्यास त्यापासून शरीराच्या मांसाळ भागीं, मर्मस्थानीं किंवा सांध्याच्या ठिकाणीं सात प्रकारचे भयंकर फोड उत्पन्न होतात. त्यांची नांवें शराविका, कच्छपिका, जालिनी, सर्षपी, अलजी, विनता व विद्रधी अशीं आहेत.

अन्तोन्नता मध्यनिम्ना श्यावा क्लेदरुजान्विता ।
शराविका स्यात्पिडका शरावाकृतिसंस्थिता ॥ ८४ ॥
अवगाढार्तिनिस्तोदा महावास्तुपरिग्रहा ।
श्लक्ष्णा कच्छपपृष्ठाभा पिडका कच्छपी मता ॥ ८५ ॥
स्तब्धा शिराजालवती स्निग्धस्रावा महाशया ।
रुजानिस्तोदबहुला सूक्ष्मच्छिद्रा च जालिनी ॥ ८६ ॥
पिडका नातिमहती क्षिप्रपाका महारुजा ।
सर्षपी सर्षपाभाभिः पिडकाभिश्चिता भवेत् ॥ ८७ ॥
दहति त्वचमुत्थाने तृष्णामोहज्वरप्रदा ।
विसर्पत्यनिशं दुःखाद्दहत्यग्निरिवालजी ॥ ८८ ॥
अवगाढरुजाक्लेदा पृष्ठे वाऽप्युदरेऽपि वा ।
महती विनता नीला पिडका विनता मता ॥ ८९ ॥

१ त्यांपैकीं, मध्यभागीं खोलवट असून घेरास उंचवट असलेली, उदी रंगाची, स्रावयुक्त, ठणकणारी व परळ नांवाचें जें एक मातीचें भांडें असतें त्याच्या आकृतीची जी पुटकुळी तीस शराविका ह्मणतात. जिच्यांत फार आंतल्या बाजूस पीडा होते व ठणका लागतो, जिचा घेर

मोठा असतो, आणि जी नरम व कांसवाच्या पाठीच्या रंगाची पुटकुळी असते तीस कच्छपी ह्मणतात. जी फुटकुळी घट्ट असते, जिच्यावर शिरा पसरलेल्या दिसतात, जिच्यांतून चिकट स्राव होतो, जिचा आकार मोठा असतो, जिच्यांत ठणका व टोंचण अतिशय होते व जिच्यांत एखाद्या जाळ्याप्रमाणें बारीक बारीक छिद्रें असतात तीस जालिनी ह्मणतात. ४ जी मध्यम आकाराची, लवकर पिकणारी, अतिशय ठणकणारी, अशी पुटकुळी असते व जिच्यावर मोहरीच्या रंगाच्या बारीक बारीक पुळ्या पुष्कळशा असतात तीस सर्षपी ह्मणतात. ५ जी उत्पन्न होत असतांना त्वचेंत आग होते, शोष पडतो, मूर्च्छा व ज्वर येतो, जी नेहमीं पसरत असते व पसरतांना अतिशय वेदना होतात आणि जिच्यापासून अग्नीनें पोळल्याप्रमाणें आग होत असते तीस अलजी[१] ह्मणतात. ६ जी पुळी मोठी व निळ्या रंगाची असून पाठीवर किंवा पोटावर होते व जिच्यांत आंत मुळापासून तिडीक येउन स्राव होतो व जी वांकलेली असते ( ताठ नव्हे ) तीस विनता ह्मणतात.

विद्रधिं द्विविधामाहुर्बाह्यामाभ्यन्तरीं तथा।
बाह्या त्वक्स्नायुमांसोत्था कण्डराभा महारुजा ॥ ९० ॥

विद्रधी दोन प्रकारचा आहे. एक बाह्य व दुसरा आभ्यन्तर ह्मणजे एक बाहेरचा व दुसरा आंतला. बाहेरची विद्रधीपिडका त्वचा, स्नायु व मांस यांवर होते. ती मुख्य रक्तवाही नाडीच्या आकाराची ( स्थूल स्नायुसारखी ) असते व तींत ठणका फार लागतात.

शीतकान्नविदाह्युष्णरूक्षशुष्कातिभोजनात्।
विरुद्धजीर्णसङ्क्लिष्टविषमासात्म्यभोजनात् ॥ ९१ ॥
व्यापन्नबहुमद्यत्वाद्वेगसन्धारणाच्छ्रमात् ॥
जिह्मव्यायामशयनादतिभाराध्वमैथुनात् ॥ ९२ ॥

---

१ अलजी संज्ञा रूढ आहे.

अन्तःशरीरे मांसासृगाविशन्ति यदा मलाः ।
तदा सञ्जायते ग्रन्थिर्गम्भीरस्थः सुदारुणः ॥ ९३ ॥
हृदये क्लोम्नि यकृति प्लीह्नि कुक्षौ च वृक्कयोः ।
नाभ्यां वंक्षणयोर्वापि बस्तौ वा तीव्रवेदनः ॥ ९४ ॥

आतां अन्तर्विद्रधि गुरुरोग असल्यामुळें त्याचें निदान सांगतात. थंड, दाह उत्पन्न करणारें, उष्ण, रुक्ष व शुष्क असें अन्न खाणें, अति भोजन करणें, बिघडलेलें मद्य पिणें, अति मद्यपान करणें, मल-मूत्रादिकांचे वेग थांबविणें, विशेष श्रम पडणें, दंड कसरत वगैरे करितांना शरीर वांकडें तिकडें करणें, तसेंच वांकडें तिकडें निजणें, फार मोठा बोजा घेऊन रस्ता चालणें आणि अतिमैथुन करणें इतक्या कारणांनीं दोष कुपित होऊन ते कोष्ठ भागांतील मांस व रक्तांत प्रवेश करितात. त्यायोगानें हृदय, पिपासास्थान, यकृत् (लिव्हर), प्लीहा (स्प्लीन), कुशीं, मूत्रपिण्ड, बेंबी, जांघाडे व बस्तीच्या ठिकाणीं खोल व भयंकर अशा गांठी उत्पन्न होतात व त्यापासून तीक्ष्ण वेदना होतात.

दुष्टरक्तातिमात्रत्वात्स वै शीघ्रं विदह्यते ।
ततः शीघ्रविदाहित्वाद्विद्रधीत्यभिधीयते ॥ ९५ ॥
व्यधच्छेदभ्रमानाहशब्दस्फुरणसर्पणैः ।
वातिकीं पैत्तिकीं तृष्णादाहमोहमदज्वरैः ॥
जृम्भोत्क्लेशारुचिस्तम्भशीतकैः श्लैष्मिकीं विदुः ॥ ९६ ॥

यांत दुष्ट रक्त अतिशय असल्यामुळें गांठींत अतिशय आग होऊन त्या लवकर पिकूं लागतात. या त्यांच्या शीघ्रविदाही स्वभावामुळेंच त्यांचें नांव विद्रधि असें पडलें आहे. टोंचल्यासारखी, कापल्यासारखी पीडा होणें, भ्रम, मलमूत्र बंद होऊन पोट फुगणें, पोटांत गुडगुडणें, फडफडणें, कांहीं चालत असल्यासारखें वाटणें हीं लक्षणें झालीं ह्मणजे वातविद्रधि आहे असें समजावें. तहान, दाह, मूर्च्छा, मद व ताप

हीं लक्षणें झालीं ह्मणजे पित्तविद्रधी आहे असें समजावें. जांभया, मळमळ, अरुचि, स्तब्धता व थंडी लागणें हीं लक्षणें झालीं ह्मणजे कफ विद्रधी असें समजावें.

सर्वासु च महच्छूलं विद्रधीषूपजायते ।
*तप्तैः शस्त्रैर्यथा मथ्येतोल्मुकैरिव दह्यते ॥
विद्रधी व्यम्लतां याता वृश्चिकैरिव दश्यते ॥ ९७॥

वातज, पित्तज किंवा कोणत्याही प्रकारची विद्रधी (पिडका) असली तरी सर्वांत अतिशय शूल होतो. तापविलेल्या शस्त्रानें घुसळल्याप्रमाणें किंवा विस्तवानें भाजल्याप्रमाणें आग व वेदना होतात. विद्रधी पिकतांना त्यांत दाह होऊं लागला ह्मणजे विंचू चावल्याप्रमाणें भयंकर वेदना होतात.

तनुरूक्षारुणस्रावं फेणिलं वातविद्रधी ।
तिलमाषकुलत्थोदसन्निभं पित्तविद्रधी ॥ ९८ ॥
श्लैष्मिकी स्रवति श्वेतं बहलं पिच्छिलं बहु ।
लक्षणं सर्वमेवैतद्भजते सान्निपातिकी ॥ ९९ ॥

वातविद्रधी पिकली असतां तींतून स्राव होतो तो पातळ, रूक्ष (चिकट नव्हे) पिंगट रंगाचा व फेंसदार असतो. तीळ, उडीद किंवा कुळतांच्या काढवणाप्रमाणें स्राव होऊं लागला ह्मणजे पित्तविद्रधी आहे असें जाणावें. कफ विद्रधीचा स्राव पांढरा, दाट, बुळबुळीत व पुष्कळ असतो. सान्निपातिक विद्रधींत हीं सर्व लक्षणें होतात.

अथासां विद्रधीनां साध्यासाध्यविशेषज्ञानार्थं स्थानकृतं लिङ्गविशेषमुपदेक्ष्यामः । तत्र प्रधानमर्मजायां विद्रध्यां हृद्घट्टनतमकप्रमोहकासश्वासाः क्लोमजायां पिपा-

---

* शस्त्रैर्भिद्यत इव चोल्काकैरिव दह्यते, असें पाठान्तर आहे.

सामुखशोषगलग्रहाः यकृज्जायां श्वासः प्लीहजायामुच्छ्वासोपरोधः कुक्षिजायां कुक्षिपार्श्वान्तरांसशूलं वृक्कजायां पृष्ठकटीग्रहः नाभिजायां हिक्का वंक्षणजायां सक्थिसादः बस्तिजायां कृच्छ्रपूतिमूत्रवर्चस्त्वश्चेति ॥ १०० ॥

आतां वरील विद्रधींचे साध्यासाध्यभेद चांगले लक्ष्यांत यावे ह्मणून निरनिराळ्या अवयवांत ते झाले असतां होणारीं निरनिराळीं लक्षणें सांगतों. हृदयांत विद्रधी उत्पन्न झाली असतां त्याठिकाणीं धडधड होते, तमकश्वास उत्पन्न होतो, मूर्च्छा येते, खोकला येतो व दम लागतो; पिपासास्थानांत विद्रधी झाली असतां फार तहान लागते, तोंडास कोरड पडते आणि गळ्यांत सूज येऊन आवाज बसतो; ती यकृतांत झाली असतां दमा होतो; प्लीहेंत झाली असतां श्वासोच्छ्वासास अडथळा होतो; कुशींत झाली असतां कूस, बरगड्या व खांदे या भागांत शूल होतो; मूत्रपिण्डांत झाली असतां पाठ व कमर धरते; बेंबीच्या ठिकाणीं झाली असतां उचकी लागते; जांघाड्यांत झाली असतां जांघा शून्य पडतात व बस्तीचे ठायीं झाली असतां लघ्वीस व शौचास फार कष्टानें होतें व मलमूत्रास फार वाईट घाण येते.

पक्वासूर्ध्वजासु मुखात्स्रावः स्रवंत्यधोजासु गुदादुभयतस्तु नाभिजासु ॥ १०१ ॥

बेंबीच्या वरच्या भागांत होणाऱ्या विद्रधी पिकून फुटल्या ह्मणजे त्यांचा स्राव तोंडावाटे होतो. बेंबीच्या खालच्या भागाच्या फुटल्या ह्मणजे त्यांचा स्राव मलद्वारानें होतो आणि खुद्द बेंबीच्या जागची विद्रधी फुटली ह्मणजे ती दोन्ही मार्गांनीं वाहूं लागते.

तासां हृन्नाभिबस्तिजाः परिपक्वाः सान्निपातिकी च मरणायावशिष्टाः पुनः कुशलमाशुप्रतिकारिणं चिकित्सकमासाद्योपशाम्यन्ति । तस्मादचिरोत्थितां विद्रधीं शु-

शस्त्रसर्पविद्युदग्नितुल्यां स्नेहविरेचनैराश्वेवोपक्रामेत् सर्वशो
गुल्मवच्चेति ॥ १०२ ॥

त्यापैकीं हृदय, नाभि व बस्ती या ठिकाणच्या विद्रधी ( पुळ्या ) पिकल्या ह्मणजे रोग्याचें मरण निश्चयात्मक समजावें. तशीच सान्निपातिक विद्रधीही असाध्यच समजावी. बाकीच्या विद्रधी चांगला कुशल वैद्य मिळून त्यानें तावडतोब औषधोपचार केल्यास, बऱ्या होतात. ह्मणून विद्रधीचें पूर्वरूप दिसूं लागतांच तावडतोब, तीस शस्त्र[1], सर्प, वीज व अग्निसमान समजून, स्नेहन व रेचनाच्या योगानें तिची चिकित्सा सुरू करावी. हृदय, नाभि व बस्तीच्या विद्रधीची चिकित्सा सर्व प्रकारें गुल्म चिकित्सेसारखीच करावी.

विना प्रमेहमप्येता जायन्ते दुष्टमेदसः ।
तावच्चैता न लक्ष्यन्ते यावद्वास्तुपरिग्रहाः ॥ १०३ ॥
शराविका कच्छपिका जालिनी चेति दुस्सहाः ।
जायन्ते ता ह्यतिबलाः प्रभूतश्लेष्ममेदसाम् ॥ १०४ ॥
सर्षपी चालजी चैव विनता विद्रधी च या ।
साध्याः पित्तोल्बणास्ता हि सम्भवन्त्यल्पमेदसाम् ॥ १०५ ॥
मर्मस्वंसे गुदे पाण्योः स्तने सन्धिषु पादयोः ।
जायन्ते यस्य पिडकाः स प्रमेही न जीवति ॥ १०६ ॥

वर सांगितलेल्या पिडका प्रमेहापासून होतात असें सांगितलें त्याचा अर्थ असा घ्यावयाचा कीं, या बहुशः प्रमेहापासून होतात. कारण प्रमेहावांचूनही शरीरांतील मेद बिघडल्यानें या होतात. जोंपर्यंत या मूळ धरीत नाहींत तोंपर्यंत त्यांस ओळखतां येत नाहीं. ह्मणजे

---

१ या दृष्टान्तापासून, विद्रधी शस्त्राप्रमाणें 'मर्मच्छेद' करणारी, सर्पाप्रमाणें तत्काल बेशुद्ध करणारी आणि वीज व अग्निप्रमाणें तत्काल मारणारी आहे असें समजावें.

यांचीं निश्चित पूर्वरूपें नाहींत ज्यांच्या योगानें त्यांचें भावी आगमन जाणतां येईल. शराविका, कच्छपिका व जालिनी या तीन पुळ्या दुस्सह असतात. ज्यांच्या शरीरांत कफ व मेद विशेष असतो त्यांस त्या फार जोराच्या होतात. सर्षपी, अलजी, विनता व विद्रधी[1] यांत पित्ताचें प्राधान्य असतें. ज्यांच्या शरीरांत मेद थोडा असतो त्यांस त्या होतात. या साध्य असतात. ज्या प्रमेही मनुष्याच्या हृदयादि मर्मस्थानीं, खांद्यावर, गुदद्वारावर, कानाच्या पाळावर, स्तनांवर व दोन्ही पायांवर उक्त पिडका होतात तो वांचत नाहीं.

तथाऽन्याः पिडकाः सन्ति रक्तापीतासितारुणाः ।
पाण्डुराः पाण्डुवर्णाश्च भस्माभा मेचकप्रभाः ॥ १०७ ॥
मृद्व्यश्च कठिनाश्चान्याः स्थूलाः सूक्ष्मास्तथाऽपराः ।
मन्दवेगा महावेगा स्वल्पशूला महारुजाः ॥ १०८ ॥
ता बुध्द्वा मारुतादीनां यथास्वैर्हेतुलक्षणैः ।
ब्रूयादुपचरेच्चाशु प्रागुपद्रवदर्शनात् ॥ १०९ ॥
तृड्श्वासमांससङ्कोथमोहहिक्कामदज्वराः ।
वीसर्पमर्मसंरोधः पिडकानामुपद्रवाः ॥ ११० ॥

वर सांगितलेल्या मुख्य पिडकांशिवाय आणखी दुसऱ्या प्रकारच्या पिडका आहेत. त्यांचा रंग तांबडा, पिवळा, काळा, पिंगट, पांढरुक, पांढरा, ( रूक्ष पांढरा ) भस्मासारखा व स्निग्ध काळा असतो. कांहीं नरम असतात व कांहीं कठिण असतात. कांहीं लहान असतात, कांहीं मोठ्या असतात. कांहीं हळू हळू वाढणाऱ्या व कांहीं लवकर वाढणाऱ्या असतात. कांहींत पीडा थोडी असते व कांहींत अतिशय होते. त्यांच्या निरनिराळ्या लक्षणांवरून त्या वातज आहेत, पित्तज आहेत किंवा संसर्गज वगैरे आहेत हें ओळखून अर्थात् त्यांचें निदान ठरवून तत्काल

१ या ठिकाणीं विद्रधी म्हणजे बाह्यविद्रधी घ्यावयाचा.

ह्मणजे अवांतर बाहेरचे विकार उत्पन्न होण्यापूर्वी तदनुसार चिकित्सा सुरू करावी. तहान, दमा, लागणें मांस सडणें, मूर्च्छा, उचकी, उन्माद, ताप, विसर्प व हृदयादि मर्मस्थानें अवरुद्ध होणें हे पिडकांचे उपद्रव अथवा अवांतर विकार होत.

क्षयः स्थानं च वृद्धिश्च दोषाणां त्रिविधा गतिः ।
ऊर्ध्वं चाधश्च तिर्यक्च विज्ञेया त्रिविधाऽपरा ॥ १११ ॥
इत्युक्ता विधिभेदेन दोषाणां त्रिविधा गतिः ।
त्रिविधा चापरा कोष्ठशाखामर्मास्थिसन्धिषु ॥ ११२ ॥

क्षय, साम्य (सारखेपणा) व वृद्धि अशा वातादि दोषांच्या तीन गतिः अथवा अवस्था आहेत. दुसऱ्या रीतीनें वर जाणें, खालीं येणें व तिरपें जाणें अशा तीन प्रकारच्या गति आहेत. याशिवाय कोष्ठगति, शाखा (रक्तादि धातु व त्वचा) गति व मर्मास्थिसन्धिगति या भेदें करून तीन गति आहेत.

चयप्रकोपप्रशमाः पित्तादीनां यथाक्रमम् ।
भवन्त्येकैकशः षट्सु कालेष्वभ्रागमादिषु ॥ ११३ ॥
गतिः कालकृता चैषा चयाद्या पुनरुच्यते ।
गतिश्च द्विविधा दृष्टा प्राकृती वैकृती च या ॥ ११४ ॥

पित्ताची वृद्धि, प्रकोप व शांति हीं अनुक्रमें वर्षा, शरत् व हेमंत ऋतूंत होतात. कफाची वृद्धि प्रकोप व शांति अनुक्रमें शिशिर, वसंत व ग्रीष्मऋतुंत होते. वाताची वृद्धि, प्रकोप व शांति हीं अनुक्रमें ग्रीष्म वर्षा व शरद् ऋतूंत होते. या निरनिराळ्या अवस्था त्या त्या ऋतूंच्या गुणधर्मानें होत असतात. आतां प्रकृत व विकृत अशा दोषांच्या दोन अवस्था आहेत त्या सांगतों.

पित्तादेवोष्मणः पक्तिर्नराणामुपजायते ।
तच्च पित्तं प्रकुपितं विकारान्कुरुते बहून् ॥ ११५ ॥

प्राकृतस्तु बलं श्लेष्मा विकृतो मल उच्यते ।
स चैवोजः स्मृतः काये स च पाप्मोपदिश्यते ॥ ११६ ॥
सर्वा हि चेष्टा वातेन स प्राणः प्राणिनां स्मृतः ॥
तेनैव रोगा जायन्ते तेन चैवोपरुध्यते ॥ ११७ ॥

आपल्या प्रकृतावस्थेंत असलेल्या पित्ताच्या उष्णतेनें मनुष्यांच्या आहाराचें पचन होतें. तेंच पित्त विकृत झालें असतां नानाप्रकारचे रोग उत्पन्न करितें. तसाच कफ आपल्या प्रकृतावस्थेंत असला ह्मणजे तो मनुष्याच्या शक्तीचा आधार असतो परंतु तोच विकृत झाला ह्मणजे शरीरास मलिन करून टाकितो. अविकृत कफापासूनच शरीराचें सार-रूप जें ओज[1] तें बनत असतें. तोच कफ विकृत झाला ह्मणजे अनेक प्रकारचे रोग, उत्पन्न करितो. प्राणिमात्रांच्या एकंदर क्रिया वायूनें होत असतात. त्याचें शरीरांत इतकें महत्व आहे कीं, त्यास प्राण असें ह्मटलेलें आहे. परंतु तो विकृत झाला ह्मणजे अनेक रोग उत्पन्न करितो व मृत्यूसही कारण होतो.

नित्यसन्निहितामित्रं समीक्ष्यात्मानमात्मवान् ।
नित्यं युक्तः परिचरेदिच्छन्नायुरनित्वरम् ॥ ११८ ॥

रोगरूपी शत्रु नेहमीं आपल्याजवळ आहे असें समजून बुद्धिमान् मनुष्यानें, त्यास दीर्घायु होण्याची इच्छा असल्यास, नेहमीं आपल्या शरीर स्थितीची परीक्षा करून वैद्य शास्त्रांत सांगितलेल्या विधीप्रमाणें नियमपूर्वक वागावें.

शिरोरोगाः सहृद्रोगा रोगा मानाविकल्पजाः ।
क्षयाः सपिडकाश्चोक्ता दोषाणां गतिरेव च ॥ ११९ ॥
कियन्तःशिरसीयेऽस्मिन्नध्याये तत्व दर्शिना ।
ज्ञानार्थं भिषजाञ्चैव प्रजानाञ्च हितैषिणा ॥ १२० ॥

१ हें अर्द्धांजलिप्रमाणें श्लैष्मिक ओज होय.

शिरोरोग, हृद्रोग, दोषांच्या प्रमाण व संसर्गादि संयोगांच्या योगानें होणारे रोग, क्षयरोग, पिडका आणि दोषांच्या अवस्था इतक्या विषयांचें निरूपण या 'कियन्तःशिरसीय' अध्यायांत तत्वदर्शी आत्रेय महर्षींनीं वैद्य लोकांस ज्ञान व्हावें व त्या योगानें लोकांचें हित व्हावें ह्मणून केलें आहे.

सप्तदशोऽध्यायः समाप्तः



# अथ अष्टादशोऽध्यायः ।

अथातस्त्रिशोथीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति ह स्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण त्रिशोथीय नांवाच्या अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

त्रयः शोथा भवन्ति वातपित्तश्लेष्मनिमित्तास्ते पुनर्द्वि-
विधा निजागन्तुभेदेन तत्रागन्तवश्छेदनभेदनक्षणनभ-
ञ्जनपिच्छनोत्पेषणप्रहारवधबन्धनवेष्टनव्यध ।पीडनाभि-
र्वा भल्लातकपुष्पफलरसात्मगुप्ताशूककृमिशूकाहितपत्रलता-
गुल्मसंस्पर्शनैर्वा स्वेदनपरिसर्पणावमूत्रनैर्वा विषिणां स-
विषप्राणिदंष्ट्रादन्तविषाणनखनिपातैर्वा सगराविषवात-
हिमदहनसंस्पर्शनैर्वा शोथाः समुपजायन्ते ॥ २ ॥

मागच्या अध्यायांत पुळ्यांचें (पिडकांचें) वर्णन केलें. पुळ्यांत सूज ही मुख्य असावयाची. म्हणून या अध्यायांत सर्व प्रकारच्या सुजांविषयीं वर्णन केलें आहे.—वात, पित्त व कफ या तीन दोषांपासून तीन प्रकारची सूज उत्पन्न होते. तिचे पुन्हां आगन्तु व निज अशा भेदानें दोन प्रकार होतात. त्यापैकीं तोडणें, चिरणें, हाडें चुरणें, क्षतपडणें, अत्यंत जोरानें दाबणें किंवा पिळणें, फेंकून देणें, घाय लागणें, बांधून टाकणें, (सर्पादि प्राण्यांनीं) पिळ घालणें, टोंचणें व दाबणें, या क्रिया शरीरावर झाल्या असतां आगन्तु सूज उत्पन्न होते. तसेंच बिब्याच्या फुलाचा किंवा फळाचा रस, कुहिरीची कुसें, अंगावर कुसें

असणाऱ्या कृमींची ( सुरवंट वगैरे ) कुसें किंवा खाज वगैरे उत्पन्न करणारीं झाडांची पानें, वेली किंवा झांकर हीं अंगास लागल्यानें त्या ठिकाणीं आगन्तु सूज उत्पन्न होते. त्याचप्रमाणें विषारी प्राण्यांचा घाम अंगास लागल्यानें, ते अंगावरून चालून गेल्यानें किंवा अंगावर मुतल्यानें त्या ठिकाणीं आगन्तु सूज उत्पन्न होते. या शिवाय विषारी प्राण्यांची दाढ, दांत, शिंगें किंवा नखें यांच्या स्पर्शानेंही आगन्तुसूज उत्पन्न होते. तशीच, कृत्रिम विष ( गर[1] ) व विषारी वायु यांच्या स्पर्शानें, बर्फांतून चालल्यानें किंवा अग्नीनें भाजल्यानें आगन्तु सूज ( शोथ ) उत्पन्न होते.

ते पुनर्यथास्वं हेतुव्यञ्जनैरादावुपलभ्यन्ते निजव्यंजनैकदेशविपरीतैः बन्धमन्त्रागदप्रलेपप्रवातनिर्वापणादिभिश्चोपक्रमैरुपक्रम्यमाणाः प्रशान्तिमापद्यन्ते ॥ ३ ॥

वर सांगितलेल्या कारणांपैकीं ज्या कारणानें आगन्तु शोथ उत्पन्न झाला असेल, त्या कारणाच्या लक्षणांवरून आरंभीं[2] त्याची परीक्षा होऊं शकते. हीं लक्षणें निज शोथाच्या लक्षणाहून एका अंशांत भिन्न असतात. उक्त शोथांवर बन्ध बांधणें, मंत्र घालणें, पोटांत औषध घेणें,

---

१ 'गरःस्यादविषस्तत्र सविषश्चकृत्रिमं यतः' इतिवृद्धकाश्यपः । 'दंष्ट्राविषे मूलविषे सगरे कृत्रिमे विषे' च. 'विषाणाञ्चाल्पवीर्याणां योगो गर इतिस्मृतः' वा. उ. अ. ३५

२ आरंभींच म्हणण्याचें कारण असें आहे कीं, आगन्तु शोथ मागाहून निजशोथासारखेच बनतात. त्यांचें जें विशिष्ट आगन्तु स्वरूप तें आरंभापुरतेंच असतें. 'आगन्तुरन्वेति निजं विकारम्' असें प्रमाण आहे. निज व आगन्तु शोथांत फरक हा असतो कीं, निज शोथांत प्रथम वातादि दोष कुपित होऊन ते वेदना उत्पन्न करितात आणि आगन्तु शोथांत प्रथम वर दर्शविलेल्या कारणांनीं व्यथा उत्पन्न होते व मागाहून वातादि दोषांचा त्याच्याशीं संबंध होतो. दोहोंच्या लक्षणांतील एकदेशीय भेद सांगितला तो हाच. हा भेद आरंभींच ओळखतां येण्यासारखा आहे. मागाहून वातादिदोषांचा आगन्तु विकारांशीं संबंध झाला म्हणजे दोहोंचें स्वरूप समान होतें.

लेप लावणें, प्रवातनिर्वापण (शेक वगैरेच्या योगानें वायू काढून टाकणें) इत्यादि क्रिया, ज्या तऱ्हेचा शोथ असेल त्या मानानें योग्य अशा रीतीनें योजिल्या असतां, ते बरे होतात.

निजाः पुनः स्नेहस्वेदवमनविरेचनास्थापनानुवासनशिरोविरेचनानामयथावत्प्रयोगान्मिथ्यासंसर्जनाद्वा छर्दिरलसकविसूचिकाश्वासकासातिसारशोषपाण्डुरोगज्वरोदरप्रदरभगन्दरार्शोविकारातिकर्षणैर्वा कुष्ठकण्डूपिडकादिभिर्वा छर्दिक्षवथूद्गारशुक्रवातमूत्रपूरीषवेगधारणैर्वा कर्मरोगोपवासातिकर्षितस्य वा सहसातिगुर्वम्ललवणपिष्टान्नफलशाकरागदधिहरितकमद्यमन्दकविरूढनवशूकशमीधान्यानूपौदकपिशितोपयोगान्मृत्पङ्कलोष्टभक्षणाल्लवणातिभक्षणाद्वा गर्भसम्पीडनादामगर्भप्रपतनात्प्रजातानां च मिथ्योपचारादुदीर्णदोषत्वाच्छोफाः प्रादुर्भवन्तीत्युक्तः सामान्यो हेतुः ॥ ४ ॥

निज शोथ पुढील कारणांनीं उत्पन्न होतातः—स्नेहन, स्वेदन, वमन, विरेचन, आस्थापन व अनुवासन बस्ती आणि शिरोविरेचन या क्रिया बरोबर विधिप्रमाणें न घडणें; वमन विरेचनानंतर सांगितलेला पथ्याचा क्रम बरोबर न पाळणें; वांति. जुलाब [अलसक], विसूचिका [कॉलेरा] दमा, खोकला, अतिसार, शोष, पांडुरोग, ज्वर, उदररोग, प्रदर, भगन्दर व मूळव्याधी या विकारांनीं शरीर अगदीं क्षीण होणें; कुष्ट, खाज, व पुटकुळ्या होणें; वांति, शिंका, ढेकर, वीर्यपात, अधोवायु, मळ व मूत्र यांचे वेग थांबवून धरणें; वमन, विरेचन, नस्य, निरूह व अनुवासन बस्ती हीं पंचकर्में, रोग व उपासाच्या योगानें अगदीं क्षीणशक्ति झा-

---

१ वांतिपासून मूळव्याधीपर्यंत जे रोग शोथाचीं कारणें म्हणून सांगितले आहेत त्यांच्यामागे पुष्कळ दिवसांचे जुने असें विशेषण अध्याहृत घेतलें पाहिजे.

झाल्या रोग्यानें एकदम अतिशय जड, आंबट, खारट, पिठाचे पदार्थ, फळें, भाज्या, रागे, दहीं, हिरवे भाजीपाले, मद्य, मन्दक, कोंब फुटलेलें किंवा नवें शूक [ कणसांत होणारे जव, गहूं वगैरे ] व शमी धान्य [ शेंगांत होणारे उडीद, मूग, तूर वगैरे ], आणि आनूप व जलचर प्राण्यांचें मांस खाणें; माती, चिखल व ढेंकळें खाणें; अतिशय मीठ खाणें; गर्भाचें पीडन करणें किंवा कच्चा गर्भ पडणें आणि बाळंतीण बायकोचे अयोग्य उपचार करणें—या योगानें वातादि दोष कुपित होऊन शोफ उत्पन्न होतात; हीं कारणें सरसकट सांगितलीं.

**अयं त्वत्रविशेषः—शीतरूक्षलघुविशदश्रमोपवासातिकर्षणक्षपणादिभिर्वायुः प्रकुपितस्त्वङ्मांसशोणितादीन्यभिभूय शोफञ्जनयति ॥ ५ ॥**

आतां त्यांची दोषभेदेंकरून खुलासेवार कारणें सांगतों.—थंड, रूक्ष, हलकें व विशद अन्न खाणें; परिश्रम व उपासानें क्षीण होणें; आणि वमनविरेचनादिकांच्या अति योगानें दोष अतिशय निघून जाणें या कारणांनीं वायु प्रकुपित होऊन, त्वचा—मांस—रक्तादिकांस बिघडवून शोथ उत्पन्न करितो.

**स क्षिप्रोत्थानप्रशमो भवति श्यामारुणवर्णः प्रकृतिवर्णो वा चलः स्पन्दनः खरपरुषभिन्नत्वग्लोमा छिद्यत इव भिद्यत इव पीड्यत इव सूचीभिरिव तुद्यते पिपीलिकाभिरिव संसृप्यते सर्षपादिकल्कावलिप्त इव चिमचिमायते संकुच्यत आयम्यत इति वातशोफः ॥ ६ ॥**

हा वातशोफ लवकर वाढतो व लवकरच शांतही होतो; त्याचा रंग काळसर, तांबूस किंवा रोग्याच्या शरीराच्या स्वाभाविक वर्णासारखा असतो; याच्यांत पसरण्याचा व फडकण्याचा धर्म असतो; ज्या जागीं

१ साखर, गोड दहीं व मध हे एकत्र करून गाळून करितात तो किंवा गूळ, हिरव्या आंब्याच्या कापट्या, तूप, सुंठ व बेलफळी मिळवून गुळंबा करितात तो.

सूज असेल त्या ठिकाणची चामडी व केस खडदडीत व रांठ होतात व त्वचेस चिरा पिडतात; त्या ठिकाणीं तोडल्यासारखी, चिरल्यासारखी व दाबून पिळल्यासारखी पीडा होते; सुया टोंचल्याप्रमाणें वाटतें; मुंग्या चालत असल्यासारखा भास होतो; मोहरी वाटून लेप लावल्याप्रमाणें झणझणतें किंवा झोंबतें आणि सुजेच्या जागीं वरचेवर संकोच व विस्तार होत असतो. हीं वातशोफाचीं लक्षणें सांगितलीं.

उष्णतीक्ष्णकटुकक्षारलवणाम्लाजीर्णभोजनैरग्न्यातपप्रतापैश्च पित्तं प्रकुपितं त्वङ्मांसशोणितान्यभिभूय शोफञ्जनयति ॥ ७ ॥

उष्ण, विदाही, तिखट, क्षारयुक्त, खारट व आंबट पदार्थांच्या अतिसेवनानें, अजीर्णावर जेवल्यानें आणि अग्नि व ऊन्ह यांच्या अति सहवासानें पित्त प्रकुपित होऊन तें त्वचा, मांस व रक्त यांस दूषित करून शोफ उत्पन्न करितें.

स क्षिप्रोत्थानप्रशमो भवति कृष्णपीतनीलताम्रकावभास उष्णो मृदुः कपिलताम्रलोमा उष्यते दह्यते दूयते धूप्यते ऊष्णायते स्विद्यति क्लिद्यते न च स्पर्शमुष्णं वा सुषूयत इति पित्तशोफः ॥ ८ ॥

हा पित्तशोफ लवकर उभरतो व त्याचप्रमाणें लवकर बसतो; याचा रंग काळा, पिवळा, निळा किंवा तांबूस असतो; हा गरम व नरम असतो; शोथाच्या जागेवरचे केस पिंगट व तांब्याच्या रंगाचे असतात; जवळ विस्तव ठेविला असतां ज्या प्रकारचा परिणाम होतो तशा विशिष्ट प्रकारचा दाह आंत होतो; सामान्यतः दाह होतो, टोंचल्याप्रमाणें दुखतें, आंतून धूर निघत असल्याप्रमाणें वाटतें, स्पर्श केला असतां उष्ण लागतो, त्या जागीं घाम येत असतो, ओलावा राहतो आणि उष्णता व स्पर्श सहन होत नाहीं. हीं पित्तशोफाचीं लक्षणें सांगितलीं.

गुरुमधुरशीतस्निग्धैरतिस्वप्नाव्यायामादिभिश्च श्लेष्मा प्रकुपितस्त्वङ्मांसशोणितादीन्यभिभूय शोफञ्जनयति ॥ ९ ॥

जड, मधुर, थंड व स्निग्ध पदार्थांचा अतिशय उपयोग करणें; अति निजणें, परिश्रम न करणें इत्यादि कारणांनीं कफ कुपित होऊन त्वचा मांस व रक्त बिघडवून शोफ उत्पन्न करितो.

स कृच्छ्रोत्थानप्रशमो भवति पाण्डुश्वेतावभासः स्निग्धः श्लक्ष्णः गुरुः स्थिरः स्त्यानः शुक्लाग्ररोमा स्पर्शोष्णसहश्चेति श्लेष्मशोफः ॥ १० ॥

हा कफशोफ हळू हळू वाढतो व तसाच सावकाशानें उतरतो. याचा रंग फिकट पिवळा किंवा पांढरा असतो; सुजलेला भाग गुळगुळीत व नरम असतो; हा जड, ताठ व चिकचिकीत असतो. सुजलेल्या भागावरच्या केसांचीं टोंकें पांढरीं होतात; आणि या भागावरून हात फिरविला असतां किंवा शेक वगैरेच्या द्वारा उष्णता पोंचविली असतां बरें वाटतें.

यथास्वकारणाकृतिसंसर्गाद्विदोषजास्त्रयः शोफा भवन्ति कारणाकृतिसन्निपातात्सान्निपातिक एकः ॥ ११ ॥

वर वातादि दोष कुपित होऊन त्यापासून उत्पन्न होणाऱ्या प्रत्येक निरनिराळ्या प्रकारच्या शोथांचीं भिन्न भिन्न कारणें व लक्षणें सांगितलीं आहेत. आतां एकाच वेळीं तशीं कारणें घडून दोन दोष कुपित होऊन त्यांच्या संयोगापासून शोथ उत्पन्न झाला व त्यांत दोहोंचीं निरनिराळीं लक्षणें एकत्र दिसूं लागलीं ह्मणजे त्यास संसर्गज किंवा द्विदोषज शोथ ह्मणतात. हे द्विदोषज तीन प्रकारचे असतातः—वात-पित्त, वात-कफ व पित्त-कफ. तीन्ही दोष एकदम प्रकुपित होण्याचीं कारणें घडून, तिह्नींचीं लक्षणें एकत्र दिसूं लागलीं ह्मणजे सान्निपातिक शोथ उत्पन्न होतो. हा एकच प्रकारचा असतो.

एवं भेदप्रकृतिभिस्ताभिर्भिद्यमानो द्विविधस्त्रिविधश्चतु-
र्विधः सप्तविधश्च शोथ उपलभ्यते पुनश्चैक एवोत्सेधसा-
मान्यादिति ॥ १२ ॥

याप्रमाणें निरनिराळ्या भेदेंकरून शोफाचे दोन, तीन, चार व सात प्रकार होतात. १ निज, व २ आगन्तु; १ वातज, २ पित्तज व ३ कफज; १ वातज, २ पित्तज, ३ कफज व ४ सान्निपातिक; १ वातज, २ पित्तज, ३ कफज, ४ वातपैत्तिक, ५ वातश्लैष्मिक, ६ पित्तश्लैष्मिक, व ७ सान्निपातिक. अन्य रीतीनें, सर्व प्रकारच्या सुजांत उंचवटपणा हा एक समानधर्म आहे ह्मणून तशा दृष्टीनें शोफ एकच प्रकारचा असेंही मानतां येतें.

भवन्तिचात्र

शूयन्ते यस्य गात्राणि स्वपन्तीव रुजन्ति च।
पीडितान्युन्नमन्त्याशु वातशोफन्तमादिशेत् ॥ १३ ॥
यश्चाप्यरुणवर्णाभः शोफो नक्तं प्रणश्यति।
स्नेहोष्णमर्दनाभ्याञ्च प्रणश्येत्स च वातिकः ॥ १४ ॥

ज्या शोफांत सुजलेले अवयव शून्यसे भासतात, क्षणांत दुखूं लागतें व क्षणांत बंद होतें आणि सुजलेला भाग बाजूंनीं दाबला ह्मणजे मध्य भाग वर उठतो तो वात शोफ असें समजावें. याचा रंग तांबूस असतो; रात्रौ याचा जोर कमी होतो; आणि स्निग्ध व उष्ण मर्दन केल्यानें हा उतरतो.

यः पिपासाज्वरार्त्तस्य दूयतेऽथ विदह्यते।
स्विद्यति क्लिद्यते गन्धी स पैत्तः श्वयथुः स्मृतः ॥ १५ ॥
यः पीतनेत्रवक्त्रत्वक्पूर्वं मध्यात्प्रशूयते।
तनुत्वक्चातिसारी च पित्तशोफः स उच्यते ॥ १६ ॥

ज्या सुजेंत अतिशय तहान लागते, ज्वर येतो, पीडा होते, आग

होते, घाम येतो, व्यथित भाग चिकचिकीत होतो व दुर्गंधी येते ती पैत्तिक सूज समजावी. या सुजेंत डोळे, तोंड व त्वचा पिवळी पडते; प्रथम शरीराच्या मध्यभागीं तिचा प्रादुर्भाव होतो; सुजलेली त्वचा पातळ असते आणि रोग्यास जुलाब होऊं लागतात.

शीतः सक्तगतिर्यस्तु कण्डूमान्पाण्डुरेव च ।
निपीडितो नोन्नमति श्वयथुः स कफात्मकः ॥ १७ ॥
यस्य शस्त्रकुशच्छिन्नाच्छोणितं न प्रवर्तते ।
कृच्छ्रेण पिच्छां स्रवति स चापि कफसम्भवः ॥ १८ ॥

ज्या सुजेस स्पर्श केला असतां ती थंड लागते, जिच्यांत पसरण्याचा धर्म नसतो, खाज सुटते, जिचा रंग फिकट पिवळा असतो आणि जी बाजूंनीं दाबली असतां मध्य भागीं वर उठत नाहीं ती सूज कफापासून झालेली असें समजावें. यांत सुजलेल्या जागीं शस्त्र किंवा दर्भासारख्या तीक्ष्ण टोंकाच्या वस्तूनें चिरलें असतां आंतून रक्त न निघतां भागाहून थोडथोडा चिकट किंवा बुळबुळीत स्राव निघूं लागतो.

निदानाकृतिसंसर्गाच्छ्वयथुः स्याद्विदोषजः ।
सर्वाकृतिः सन्निपाताच्छोफो व्यामिश्रहेतुजः ॥ १९ ॥

ज्यांत वर सांगितल्याप्रमाणें दोन दोन दोषांचीं प्रकोप कारणें व लक्षणें मिळतात त्यांस संसर्गज अथवा द्विदोषज शोफ ह्मणतात. त्यांत तीन्ही प्रकारचीं लक्षणें एकत्र झालीं ह्मणजे त्यास सान्निपातिक शोफ ह्मणावें.

यस्तु पादाभिनिर्वृत्तः शोफः सर्वाङ्गगो भवेत् ।
जन्तोः स च सुकष्टः स्यात्प्रसृतः स्त्रीमुखाच्च यः ॥ २० ॥
यश्चापि गुह्यप्रभवः स्त्रियो वा पुरुषस्य वा ।
स च कष्टतमो ज्ञेयो यस्य च स्युरुपद्रवाः ॥ २१ ॥

# वैद्यकाचें ज्ञान पायाशुद्ध व सविस्तर होण्यासाठीं अत्यंत सुलभ ग्रंथसंग्रह.

निरनिराळ्या विषयांकरितां मुद्दाम स्वतंत्र ग्रंथ तयार केले आहेत. **'आर्यभिषक्'** मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होणारांस **निम्मी किंमत !**

**'आर्यभिषक्'** मासिकपुस्तकांत वैद्यकाचे स्वतंत्र ग्रंथ व तत्संबंधींच माहिती प्रसिद्ध होत असते. सन १८८९ च्या जुलैपासून हें दरमहा एकसारखें १४ वर्षें चालू आहे. हल्लीं **वर्गणी फारच कमी** केली आहे. **'भारतधर्म'** मासिकपुस्तक त्याबरोबरच मिळतें; त्याची वर्गणी ६ आणे व 'आर्यभिषक्' १। रुपया; मिळून **टपालसुद्धां फक्त** १ रु. १० आणे. **फक्त** 'आर्यभिषक्' घेणारांस १॥ रु. व **फक्त** 'भारतधर्म घेणारांस ८ आणे.

## विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी. किंमतीशिवाय टपालखर्च.

| | | | |
|---|---|---|---|
| वनौषधीगुणादर्श, भाग १ ला | १२ आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान, पूर्वार्ध. | २ रु. |
| ,, भाग २ रा. | १ रु. | ,, सूत्रस्थान, उत्तरार्ध—भा. १. ला | १॥ |
| ,, भाग ३ रा. | १। रु. | ,, निदानस्थान ... | १४ आ. |
| ,, भाग ४ था. | १॥ रु. | ,, विमानस्थान ... | १॥ रु. |
| ,, भाग ५ वा. | १। रु. | ,, इंद्रियस्थान ... | १२ आ. |
| ,, भाग ६ वा. | १२ आ. | ,, कल्पस्थान ... | १४ आ. |
| सुबोध वैद्यक, पूर्वार्ध. ... | ८ आ. | ,, सिद्धिस्थान ... | १॥ रु. |
| उत्तरार्ध. ... | १ रु. | नपुंसकमीमांसा व कामसंजीवन | १॥ रु. |
| रसवैद्य. ... ... ... | १२ आ. | निघंटशिरोमणि, भा. पहिला | १२ आ. |
| बृहन्निघंटु ... ... ... | १॥ रु. | ,, दुसरा ... ... | १॥ रु. |
| औषधीगुणदोष ... ... | १॥ रु. | आयुर्वेदरहस्य भाग १ ला.... | १ रु. |
| गर्भारपणबाळंतपण. ... | १ रु. | सार्थ हारीतसंहिता, भाग १ ला | १। रु. |
| हल्लींचा वीर्यनाश व उपाय. | ३ आ. | सार्थ योगशतक ... ... | ४ आ. |
| औषधीक्रिया. ... ... | ८ आ. | सार्थ वैद्यवल्लभ ... ... | ४ आ. |
| राजवैद्य, संग्रह १ ला. ... | १२ आ. | बृहत्पाकसंग्रह ... ... | १॥ रु. |
| औषधीमानपरिभाषा. ... | १॥ आ. | नाडीपरीक्षेचें महत्व... ... | ३ आ. |
| गोवैद्यक. ... ... ... | २ आ. | औषधीबाड ... ... ... | २ रु. |
| प्राणिजऔषधी ... ... | २ आ. | सार्थ ज्वरपराजय ... ... | २ रु. |
| अश्वरोगपरिज्ञान ... ... | पाऊण आ. | त्रिदोषविचार, भाग १ ला ... | ४ आ. |
| मधुमेहनिदान ... ... | अर्धा आणा. | | |

## योगशास्त्राची उत्तम माहिती होण्याचें पुस्तक.

किं. ४ आणे. **योगविज्ञान.** टपाल ८॥. आ.

**ठिकाणः**—प्रत्यक्ष येऊन घेणारांनीं मुंबई, कावराजी पटेल तलावाजवळ **"श्रीसयाजी औषधशाला"** या ठिकाणीं यावें व **बाहेरगांवीं मागविणारांनीं** पुढील नांवानें व्यवहार करावाः—**आयुर्वेद महोपाध्याय** शंकर दाजीशास्त्री पदे. मुंबई, नवानागपाडा.

वैद्यकाचा जगन्मान्य महान् ग्रंथ.

# सार्थ श्रीचरक संहिता.

आर्यभिषक् मासिक पुस्तक घेणारांस निमे किंमतीस मिळेल. त्याची वार्षिक वर्गणी टपालसह १ रु. १० आणे. ( त्याचे बरोबर **'भारतधर्म'** मासिक पुस्तकही मिळतें. ) चरक ग्रंथ जसा हिंदुस्थानांत आबालवृद्धांना मान्य आहे, तसाच तो यूरोप-अमेरिकेसारख्या प्रस्तुत सुधारलेल्या देशांतील विद्वानांसही अत्यंत पसंत पडला आहे. **वैद्यकांत यासारखा चिकित्साग्रंथच नाहीं ! याचें मराठी भाषांतर** ( मूळ ग्रंथ, टीपा व देखाव्यांसहित) **भागशः विक्रीस तयार आहे.** सूत्रस्थान-पूर्वार्ध २ रु., इंद्रियस्थान १२ आणे, कल्पस्थान १४ आणे; सिद्धिस्थान १॥ रु. निदानस्थान १४ आणे; विमानस्थान १॥. व सूत्रस्थान-उत्तरार्ध १॥ रु. त्याशिवाय शारीरस्थान व चिकित्सास्थान हे भाग छापण्याचें सुरू आहे. तयार होतील त्याप्रमाणें पाठवीत जाऊं. **संपादक**-आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजीशास्त्री पदे, मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय. **" गीताज्ञानेश्वरीरहस्य "** मराठींत अपूर्व पुस्तक. निम्मे ( ४ आणे ) किंमतीस येथेंच मिळेल.

---

## सिद्ध बाळकृष्ण प्रासादिक नूतन शोधक शास्त्री

## भगवंत गोविंद तोडेवाला.

हे गृहस्थ मोंगलाईंत पैठणास आहेत. एखाद्यास समक्ष पहातांच त्याचें भूतभविष्य व त्याचप्रमाणें पांच पिढींतील सर्व आप्तवर्गाची स्थिति व चेहरे वगैरे बरोबर सांगतात. पत्रिका नूतन पद्धतीनें निवळ मराठींत तयार करतात. यांचीं भविष्यें पूर्ण जुळल्याचे बरेच लोकांस अनुभव आले आहेत. **रेणुराव बीडकर वकील, पाथरी.**

---

वैद्यराज आयुर्वेदमहोपाध्याय **शंकर दाजीशास्त्री पदे** यांनीं स्थापन केलेला

## श्रीराजराजेश्वर-वनौषधिप्रासाद.

मुंबई, माधवबागेचा रस्ता, ट्राम्वेच्या सडकेवर २ ऱ्या पांजरपोळ गल्लीच्या समोर.


काढे, चूर्णे वगैरे सर्व प्रकारच्या औषधांत लागणाऱ्या वनस्पति वगैरे जिनसा-खऱ्या योग्य व माफक किंमतीनें मिळण्याकरितां मुद्दाम ही सोय केली आहे.

**के. रामराव**, व्यवस्थापक.

---

'नेटिवओपिनियन' छा. छा.

कै० ज्योतिर्विद् दाजीहरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक ६ वा.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागम शालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥—श्रीवाग्भटः ।

धनसंक्रांति.—शके १८२४ मार्गशीर्ष शु. १५ सोमवार. ता० १५ डिसेंबर, सन १९०२.

**विषयानुक्रम.**–सार्थ चरकसंहिता, सूत्रस्थान, उत्तरार्ध पृष्ठें १२१–१४४.

**सूचना.**–उत्तरार्धाचा पहिला भाग, आर्यभिषकोतून लौकर पुरा करणें असल्यामुळें या वेळीं इतर मजकुराचीं पृष्ठें कमी केलीं आहेत. त्रिदोष–पित्तावरील मजकूर या अंकीं दिला नाहीं. येत्या अंकीं येईल.

---

# धर्मार्थ देशी दवाखाने.

तत्वविचार जो कोणाचा योग्य असेल तो घेण्यास हरकत नाहीं; तथापि दोन महत्त्वाच्या कारणांनीं, हिंदुस्थानांत वापरण्यांत येणारीं औषधें देशीच असलीं पाहिजेत हें अगदीं निर्विवाद आहे. पहिलें कारण हें आहे कीं, प्रस्तुत हिंदुस्थान दिवसेंदिवस दरिद्री होत चाललें आहे; त्याजवळ द्रव्य खर्चण्यास त्राण नसल्यामुळें हजारों लोक रोगी स्थितींतच पडून आहेत; शिवाय जर त्यांनां कोणी फुकट कां होईना पण परदेशांतून तयार होऊन आलेलीं औषधें दिलीं, तर त्यारूपानें हिंदुस्थानांतील पैसा, जो येथल्या लोकांत फिरावयास पाहिजे तो थेट परदेशांत गेल्यानें देशाची मोठी हानि होत आहे. ज्या वेळीं देशांत बाहेरून द्रव्य येण्याचे ओघ पुष्कळ असतात, त्या वेळीं कांहीं ओघ बाहेर जाणारे असले तरी हरकत नसते; परंतु त्याच्या अगदीं उलट स्थिति प्रस्तुत झाल्यामुळें, देशांतून बाहेर जाणारा ओघ सर्वथा बंद होईल असेंच केलें पाहिजे. त्याप्रमाणें पाहिलें ह्मणजे, जे विद्वान् लोक आहेत त्यांनां देशस्थितीचें ज्ञान नाहीं किंवा देशस्थिति सुधारण्याविषयीं त्यांची इच्छा नाहीं असें कोणासही ह्मणतां यावयाचें नाहीं. कदाचित् स्वभावधर्माप्रमाणें बेदरकारी किंवा केवळ स्वार्थाची अपुर्ती दृष्टि, यामुळें असा दोष होण्याचा संभव आहे; त्या वेळीं त्यांनां चार उपदेशाच्या गोष्टी सुचविणें हें जाणत्याचें काम आहे. जुन्या प्रकारच्या विद्वानांपेक्षां देशस्थितीचें ज्ञान नवीन विद्वानांनां असणें हें स्वाभाविकच आहे; पण **नवविद्वानांत** अशा प्रकारचा विचार करणारे गृहस्थ फारच थोडे आढळतात हें देशाचें दुर्भाग्य समजलें पाहिजे. कित्येक वेळां भलत्याच हट्टाला पेटून, कांहीं विद्वानांकडून याविरुद्ध वर्तन झालेलें दिसून येतें; त्याबद्दल त्यांनां पुनः पुनः विनंतिपूर्वक सुचविलें पाहिजे.

हिंदुस्थानांत देशी औषधेंच वापरण्याचा प्रघात पाडणें परमावश्यक आहे यास वरील महत्वाच्या कारणांशिवायही आणखी दुसरें कारण असें आहे कीं, देशाचा खरा उपयोग ज्ञानाची वृद्धि झाल्यानेंच होत नाहीं; जेवणाच्या गोष्टी सांगून कधींही कोणाची भूक शांत होत नाहीं; त्याप्रमाणें, ज्ञानानुरूप कृती घडल्याशिवाय कांहीं उपयोग नसतो; ह्मणून आर्य असो, आंग्ल असो किंवा युनानी असो; कोणत्याही शास्त्राच्या ज्ञानानें अलंकृत झालेला मनुष्य असला व त्यानें त्याप्रमाणें जर परदेशांतील औषधें घेऊन आपला गुजारा केला, तर त्यानें देशाचा फायदा करण्यापेक्षां जबरदस्त तोटाच केला असें उघड ह्मणावें लागतें. कारण, देशाची खरी गरज यामुळें संपत नाहीं; तर उलट देशास जास्त पंगूपणा येतो. स्वयंपाकास कंटाळून किंवा घरचें अन्न चांगलें होत नाहीं ह्मणून बाजारांतील जिनसांवर निर्वाह करणारा किती परतंत्र; ते पदार्थ बनावण्याच्या कामांत किती असमर्थ व शेवटीं हताश होतो याचा विचार या ठिकाणीं अगदीं मूर्तिमंत पुढें उभा राहतो. असेंही आपण समजूं, कीं अमुक परदेशी

छर्दिः श्वासोऽरुचिस्तृष्णा ज्वरोऽतीसार एव च ।
सप्तकोऽयं सदौर्बल्यः शोफोपद्रवसंग्रहः ॥ २२ ॥

जो सूज पुरुषाच्या पायापासून व स्त्रियांच्या तोंडापासून सुरू होऊन सर्वांगावर पसरते ती कष्टसाध्य असें समजावें. तशीच पुरुषाच्या किंवा स्त्रियांच्या गुह्य भागावर सूज येऊन त्याबरोबर उपद्रवही उत्पन्न झाल्यास ती अत्यंत कष्टसाध्य समजावी. सुजेंत होणारे उपद्रव ह्मणजे-वांति, दमा, अरुचि, अन्तर्दाह, ताप, जुलाब व दुर्बलता हे सात विकार होत.

यस्य श्लेष्मा प्रकुपितो जिव्हामूलेऽवतिष्ठते ।
आशु सञ्जनयेच्छोथं जायन्तेऽस्योपजिह्विका ॥ २३ ॥

कफ प्रकुपित होऊन जिभेच्या मुळाशीं जाऊन स्तब्ध बसला ह्मणजे त्याठिकाणीं तत्काल सूज येऊन उपजिव्हिका नामक रोग उत्पन्न होतो. ( त्यास आंग्लवैद्यकांत Renula रैन्यूला असें ह्मणतात )

यस्य श्लेष्मा प्रकुपितः काकले व्यवतिष्ठते ।
आशु सञ्जनयेच्छोफं करोति गलशुण्डिकाम् ॥ २४ ॥

कफ प्रकुपित होऊन तो तालूच्या मुळाशीं जाऊन स्थिर बसला ह्मणजे त्यापासून त्याजागीं सूज येऊन गलशुण्डिका नामक रोग उत्पन्न होतो. ( Enlarged Tonsil एन्लार्ज्ड टॉन्सिल ).

यस्य श्लेष्मा प्रकुपितो गलबाह्येऽवतिष्ठते ।
शनैः सञ्जनयेच्छोफं गलगण्डोऽस्य जायते ॥ २५ ॥

---

१ याचा अभिप्राय असा आहे कीं, 'अधोभागो गुरुःस्त्रीणामूर्ध्वः पुंसां गुरुस्तथा' या वचनाप्रमाणें स्त्रियांचें खालचें शरीर जड असतें व पुरुषांचा वरचा भाग जड असतो. आतां पुरुष व स्त्रियांचे अनुक्रमें पाय व तोंड या हलक्या भागावर प्रथम सूज आली असतां तिचा जर प्रतिबंध करतां आला नाहीं व ती आंगभर पसरली तर त्यांच्या जड भागीं तीं गेली असतां बरी करणें अर्थातच कष्टसाध्य आहे

२ गलगण्ड उत्पन्न करणाऱ्या दोषांची क्रिया गलग्रहजनक दोषांपेक्षां सावकाश चालते ह्मणून 'शनैः' या पदाचा प्रयोग केला.

कफ प्रकुपित होऊन तो गळ्याच्या बाहेरच्या भागीं जाऊन जमा झाला ह्मणजे त्याठिकाणीं हळूहळू सूज उत्पन्न करून शेवटीं गलगण्ड नामक रोग उत्पन्न करितो. ( यास डॉक्टर Bronchocele अथवा Goitre ब्रॉंकोसील अथवा गॉइटर ह्मणतात )

यस्य श्लेष्मा प्रकुपितो तिष्ठत्यन्तर्गले स्थितः।
आशु सञ्जनयेच्छोफं जायतेऽस्य गलग्रहः ॥ २६ ॥

कफ प्रकुपित होऊन तो घशाच्या आंतल्या भागीं जाऊन स्थिर झाला ह्मणजे त्यापासून त्याठिकाणीं शीघ्र सूज उत्पन्न होऊन गलग्रह होतो. ( यांत घसा सुजून आवाज बसतो. )

यस्य पित्तं प्रकुपितं सरक्तं त्वचि सर्पति ।
शोफं सरागं जनयेद्विसर्पस्तस्य जायते ॥ ॥ २७ ॥
यस्य पित्तं प्रकुपितं त्वचि रक्तेन तिष्ठति ।
शोथं सरागं जनयेत्पिडका तस्य जायते ॥ २८ ॥
यस्य प्रकुपितं पित्तं शोणितं प्राप्य शुष्यति।
तिलकापिप्लवोव्यङ्गा नीलिका तस्य जायते ॥ २९ ॥
यस्य पित्तं प्रकुपितं शङ्खयोरवतिष्ठते ।
श्वयथुः शङ्खको नाम दारुणस्तस्य जायते ॥ ३० ॥
यस्य पित्तं प्रकुपितं कर्णमूलेऽवतिष्ठते।
ज्वरान्ते दुर्जयोऽन्ताय शोफस्तस्योपजायते ॥ ३१ ॥

ज्याचें पित्त कुपित होऊन रक्तासह त्वचेंत पसरतें त्याची त्वचा आरक्त होऊन सुजते व त्यास विसर्प उत्पन्न होतो. ( यास Erysipelas 'इरीसीपेलस' ह्मणतात ). ज्याचें पित्त कुपित होऊन रक्तासहित त्वचेंत जमा होतें, त्यच्या अंगावर आरक्तवर्णाची सूज येऊन त्यास पिडका ( पुळ्या) होतात[१]. ज्याचें रक्त प्रकुपित झालेल्या पित्ताशीं मिळून

१ विसर्प व पिडका या दोहोंचीं कारणें एकच आहेत. फरक इतकाच आहे

शुष्क होतें त्याच्या अंगावर, तीळ. चामखीळ, लासें वगैरे क्षुद्र त्वचेचे रोग उठतात. ज्याचें पित्त प्रकुपित होऊन आंखांत जाऊन बसतें त्यास शङ्खक नांवाची दारुण[1] सूज उत्पन्न होते. तापाच्या शेवटीं ज्याचें पित्त प्रकुपित होऊन कानाच्या मुळाशीं जाऊन बसतें त्याच्या त्याठिकाणीं भयंकर सूज उत्पन्न होऊन त्यांतच त्याचा शेवट होतो. या सुजेस कर्णमूल[2] ह्मणतात.

वातः प्लीहानमुद्धूय कुपितो यस्य तिष्ठति ।
शनैः परितुदन्पार्श्वं प्लीहा तस्याभिवर्धते ॥ ३२ ॥
यस्य वायुः प्रकुपितो गुल्मस्थानेऽवतिष्ठते ।
शोफं सशूलं जनयन्गुल्मस्तस्योपजायते ॥ ३३ ॥
यस्य वायुः प्रकुपितः शोफशूलकरश्चरन् ।
वंक्षणाद्वृषणौ याति ब्रध्नस्तस्योपजायते ॥ ३४ ॥
यस्य वातः प्रकुपितस्त्वङ्मांसान्तरमाश्रितः ।
शोफं सञ्जनयन्कुक्षावुदरं तस्य जायते ॥ ३५ ॥
यस्य वातः प्रकुपितः कुक्षिमाश्रित्य तिष्ठति ।
नाधो व्रजति नाप्यूर्ध्वमानाहस्तस्य जायते ॥ ३६ ॥
रोगाश्चोत्सेधसामान्यादधिमांसार्बुदादयः ।
विशिष्टा नामरूपाभ्यां निर्देश्याः शोथसंग्रहे ॥ ३७ ॥

---

कीं, विसर्पांत दोष पसरतात व पिडकांत ते एकाजागीं स्थिर होऊन बसतात. या फरकामुळेंच पिडकांविषयीं लिहितांना 'सर्पति' च्या ठिकाणीं 'तिष्ठति' असें पद घातलें.

१ वेळेवर चिकित्सा न केल्यास तत्काल प्राणहरण करणारी.

२ इंद्रियस्थानांत सांगितलेंच आहे कीं, या सुजेंतून एखादाच भाग्यवान् वांचतो. "सन्निपातज्वरस्यान्ते कर्णमूले सुदारुणः । शोथः संजायते तेन कश्चि- देव प्रमुच्यते."

ज्याचा वायु कुपित होऊन प्लीहेस फुगवून तींत स्थिर होतो त्याच्या बरगड्यांत हळूहळू टोंचल्यासारखी पीडा होऊन शेवटीं प्लीहा सुजते. या सुजेस प्लीहशोथ ह्मणतात. (Enlargement of Spleen) वायु प्रकुपित होऊन गुल्मस्थानांत[1] जाऊन बसला ह्मणजे त्याठिकाणीं शूल व सूज होऊन गुल्मरोग उत्पन्न होतो. वायु प्रकुपित होऊन जांघाड्यापासून अंडकोशांपर्यंत संचार करूं लागला ह्मणजे त्याठिकाणीं सूज उत्पन्न होते व शूल होतो त्यास अग्नि[2]रोग ह्मणतात. वायु प्रकुपित होऊन कुशींत त्वचा व मांसाच्या मध्यभागीं जाऊन स्थित झाला ह्मणजे त्याठिकाणीं सूज उत्पन्न होते त्या सुजेस उदर असें नांव आहे. ज्याचा वात प्रकुपित होऊन कुशींत जाऊन ठाम बसतो आणि खालींही सरत नाहीं किंवा वरही जात नाहीं, त्याच्या त्या जागीं सूज उत्पन्न होऊन मलमूत्र बंद होतात. या रोगाला आनाह असें ह्मणतात. याशिवाय अधिमांस, अर्बुदादि ह्मणजे वडस, राजगवाडी, अवाळू वगैरे ( Staphyloma, tumour &c. ) रोगांतही सूज असते. यद्यपि या रोगांचीं नांवें व लक्षणें या ठिकाणीं सांगितलेल्या शोथाहून भिन्न आहेत तथापि या सर्वांत उंचपणा हा एक समानधर्म असल्यामुळें या ठिकाणीं त्यांचा निर्देश केला आहे.

वातपित्तकफा यस्य युगपत्कुपितास्त्रयः ।
जिव्हामूलेऽवतिष्ठन्ते विदहन्तः समुच्छ्रिताः ॥ ३८ ॥
जनयन्ति भृशं शोथं वेदनाश्च पृथग्विधाः ।
तं शीघ्रकारिणं नाम्ना रोहिणीति विनिर्दिशेत् ॥ ३९ ॥
त्रिरात्रं परमं तस्य जन्तोर्भवति जीवितम् ।
कुशलेन त्वनुक्रान्तः [3]क्षिप्रं सम्पद्यते सुखी ॥ ४० ॥

---

१ तस्य पञ्चविधं स्थानं पार्श्वहृन्नाभिबस्तयः(कुशी, हृदय, नाभि व बस्ती)

२ करोति ग्रन्थिवच्छोथं दोषो वंक्षणसन्धिषु । ज्वरशूलाङ्गसादाढ्यं तं अग्निनिं निर्दिशेत् असें तन्त्रान्तरीं प्रमाण आहे.

३ क्षिप्रं या पदाचा 'अनुक्रान्तं' या पदाशीं अन्वय जोडला आहे. कारण 'संपद्यते' या शब्दाशीं संबंध जोडला तर, जो रोग तीन दिवसांत मनुष्याचे प्राण

ज्याचे वात. पित्त व कफ हे तीन्ही दोष एकदम प्रकुपित होऊन जिभेच्या मुळाशीं जाऊन स्तब्ध बसतात, त्याच्या त्या जागीं, दोष अतिशय वाढलेले असल्यामुळें, अत्यंत दाह होऊन भयंकर सूज उत्पन्न होते व नाना प्रकारच्या वेदना होऊं लागतात. या रोगास रोहिणी असें नांव आहे. याची क्रिया फार लवकर घडते. ह्या रोगाचा मनुष्य, हयगय केली असतां, तीन दिवसांतर वांचत नाहीं. परंतु चांगल्या (कुशल) वैद्यानें तत्काळ चिकित्सा केल्यास रोगी बरा होतो.

सन्ति ह्येवंविधा रोगाः साध्या दारुणसम्मताः ।
ये हन्युरनुपक्रान्ता मिथ्याचारेण वा पुनः ॥ ४१ ॥
साध्याश्चाप्यपरे सन्ति व्याधयो मृदुसम्मताः ।
यत्नायत्नकृतं येषु कर्म सिध्यत्यसंशयम् ॥ ४२ ॥
असाध्याश्चापरे सन्ति व्याधयो याप्यसंज्ञिताः ।
सुसाध्येष्वपि कृतं येषु कर्म यात्राकरं भवेत् ॥ ४३ ॥
सन्ति चाप्यपरे रोगाः कर्म येषु न सिध्यति ।
अपि यत्नकृतं बालैर्न तान्विद्वानुपाचरेत् ॥ ४४ ॥
साध्याश्चैवाप्यसाध्याश्च व्याधयो द्विविधाः स्मृताः ॥
मृदुदारुणभेदेन ते भवन्ति चतुर्विधाः ॥ ४५ ॥

या सारखे असे कांहीं रोग आहेत कीं, जे साध्य आहेत; परंतु त्यांची योग्यकाळीं व योग्य रितीनें चिकित्सा न झाली तर ते फार लवकर रोग्याचा नाश करितात. अशा रोगांस दारुण रोग ह्मणतात. साध्य रोगांचा दुसरा एक प्रकार आहे त्यांत चिकित्सा सावकाश होते

---

घेतो तो लगेच बरा कसा होईल अशी शंका उत्पन्न होईल. तथापि या शंकेच सहज उत्तर असें देतां येईल कीं, या रोगाचा असा प्रभावच आहे कीं, यानें रोगी मरतो ही लवकर व बराही लवकरच होतो. याची क्रिया फार लवकर होत असल्यामुळें माऱ्याकडे व बरें होण्याकडे सारखीच उपयोगी पडते. ‘ स शीघ्रं शीघ्रकारित्वात्प्रशमं याति हन्ति वा, असें यास प्रमाणही आहे.

किंवा तत्काल केली जावो; एखादा सामान्य वैद्य सामान्य चिकित्सा करो किंवा कुशल वैद्य उत्कृष्ट प्रकारची चिकित्सा करो; कसेंही झालें तरी रोगी मागें पुढें अवश्य बरा होतो. साध्य रोगांप्रमाणें असाध्य रोगांचेही दोन प्रकार आहेत. एक याप्य व दुसरा असाध्य. याप्य रोगाचें लक्षण असें आहे कीं. रोग बरा होणारा नसतो; परंतु त्यापासून रोग्यास तत्काल मरणही येत नाहीं. रोग शरीरांत कायमच असतो परंतु योग्य चिकित्सा जोंपर्यंत केली जाते तोंपर्यंत रोग्यास शांति वाटते. चिकित्सा बंद झाली कीं रोगी लवकरच मरण पावतो. अशा रोग्यांची कशीही उत्तम चिकित्सा केली तरी दिवस काढण्या पलीकडे कायमचा उपयोग होत नाहीं. दुसरे निव्वळ असाध्य रोग आहेत त्यांत चिकित्सेचा कांहीं उपयोग होत नाहीं. अशा रोगांची अज्ञ वैद्य मोठ्या उत्साहानें श्रमपूर्वक चिकित्सा करीत असतात. विद्वान् व शास्त्रज्ञ वैद्य त्यांचा आरंभींच त्याग करितात. वर रोगांचे साध्य व असाध्य असे दोन प्रकार सांगितले. त्यांचे पुन्हां मृदु व दारुण असे प्रत्येकाचे दोन भेद आहेत. याप्रमाणें एकंदर चार प्रकार आहेत.

त एवापरिसङ्ख्येया भिद्यमाना भवन्ति हि ।
रुजावर्णसमुत्थानस्थानसंस्थाननामभिः ॥ ४६ ॥
व्यवस्थाकरणं तेषां यथास्थूलेषु सङ्ग्रहः ।
तथा प्रकृतिसामान्यं विकारेषूपदिश्यते ॥ ४७ ॥
विकारनामाकुशलो न जिह्रीयात्कदाचन ।
न हि सर्वविकाराणां नामतोऽस्ति ध्रुवा स्थितिः ॥ ४८ ॥
स एव कुपितो दोषः समुत्थानविशेषतः ।
स्थानान्तरगतश्चैव जनयत्यामयान्बहून् ॥ ४९ ॥

---

१ 'यापनीयं तु तं विद्यात्क्रिया धारयते हि यम् । क्रियायान्तु निवृत्तायां सद्यो यश्च विनश्यति ' असें तन्त्रान्तरीं प्रमाण आहे.

तस्माद्विकारप्रकृतीरधिष्ठानान्तराणि च।
समुत्थानविशेषाँश्चबुद्ध्वा कर्म समाचरेत् ॥ ५० ॥
यो ह्येतत्त्रिविधं ज्ञात्वा कर्माण्यारभते भिषक्।
ज्ञानपूर्वं यथान्यायं स कर्मसु न मुह्यति ॥ ५१ ॥

+ते पुन्हां वेदना, रंग, निदान, स्थान, आकृति व नांव यांच्या निरानिराळ्या भेदेंकरून मोजले तर त्यांचे असंख्य भेद होतात. चिकित्सा करितांना त्यांची बरोबर व्यवस्था समजावी ह्मणून याच्याच पुढच्या अष्टोदरीय अध्यायांत त्यांची स्थूलमानानें संख्या सांगितली आहे शिवाय रोगांची सामान्यदोषप्रकृति सांगितली आहे इतकें ठाऊक असलें ह्मणजे रोगाचें नांवच माहित नाहीं ह्मणून वैद्य नें चिकित्सा कर-

---

+ वेदनांचे भेद ह्मणजे टोंचल्यासारखी, कापल्यासारखी पीडा होणें सतत ठणका मारणें इत्यादि; वर्णभेद–श्याव, अरुण इत्यादि; समुत्थान भेद ह्मणजे हेतु भेद–एकच वात रूक्षभोजन, रात्रौ जागरण इत्यादि अनेक कारणांनी कुपित होतो. तेव्हां प्रकोप कारणाच्या भेदाप्रमाणें त्याची चिकित्साही भिन्नभिन्नच केली पाहिजे हा त्याचा भावार्थ आहे; स्थानभेद ह्मणजे आमाशय, रस, रक्त इत्यादि; आकृतिभेद ह्मणजे गुल्म, अर्बुद इत्यादि; नामभेद ह्मणजे एकाच क्षयरोगास राजयक्ष्मा, शोष इत्यादि असलेलीं निरानिराळीं नांवें; व्यवस्थाकरण ह्मणजे चिकित्साव्यवहारार्थ संख्या–कथन. आतां अष्टोदरीयाध्यायांत फक्त रोगांची संख्या सांगितली आहे त्यांचीं नांवें दिलीं नाहींत. त्यांची व्यवस्था कशी करावयाची; या प्रश्नावर सांगतात 'तथा प्रकृतिसामान्यं विकारेषूपदिश्यते' 'प्रकृतिसामान्य ह्मणजे समानकारणता सांगितली आहे. म्हणजे जे रोग साक्षात् नांवानें सांगितले नाहींत त्यांची, वातज, पित्तज, श्लेष्मज किंवा संसर्गज अथवा रक्तज इत्यादि परीक्षा करून चिकित्साव्यवहार करावा हा भावार्थ आहे म्हणून अष्टोदरीयाध्यायांत सांगितलें आहे कीं, 'सर्वे विकारा वातपित्तकफान्नातिवर्तन्ते' कोणताही विकार असला तरी त्याचा वातादि दोषांत अवश्य समावेश व्हावयाचा. म्हणून ज्वर–रक्तपित्ताप्रमाणें एखाद्या रोगाचें नांव ठाऊक नसलें तरी त्यांत कोणत्या दोषांचा बिघाड आहे हें पाहून त्याची चिकित्सा करावी सारांश अमुक एक रोग अमुक दोषांच्या वृद्धि किंवा प्रकोपामुळें झाला आहे हें जाणण्याचा चिकित्सेंत खरा उपयोग आहे. बाकी नांव ठाऊक असणें हें फक्त व्यवहाराकरितां आहे. नुसत्या नांवानें चिकित्सा करितां येणार नाहीं.

ण्यास मागें पुढें पाहूं नये. कारण सर्वच रोगांचीं (कोणत्याही वैद्य-शास्त्रांत) ठरीव नांवें असतात असें नाहीं. एकच कुपित झालेला दोष ज्या ज्या निरनिराळ्या कारणांनीं कुपित झालेला असेल त्या त्या कारण भेदाप्रमाणें व तो ज्या निरनिराळ्या स्थानांत जाईल त्या स्थानभेदाप्रमाणें अनेक निरनिराळे विकार उत्पन्न करितो. ह्मणून कोणत्याही रोगाची चिकित्सा करण्यापूर्वी तो कोणत्या दोषाच्या प्रकोपामुळें झाला आहे, कोणत्या स्थानांत आहे व दोषप्रकोप होण्यास काय कारणें झालीं होतीं यांचा निश्चय करून घ्यावा. जो वैद्य उक्त तीन गोष्टींचा बरोबर निश्चय करून, चिकित्साज्ञानपूर्वक यथाविधि चिकित्सा करितो त्याच्या हातून चूक होत नाहीं.

नित्याः प्राणभृतां देहे वातपित्तकफास्त्रयः ।
विकृताः प्रकृतिस्था वा तान्बुभुत्सेत पण्डितः ॥ ५२ ॥

मनुष्याच्या शरीरांत वात पित्त व कफ हे तीन्ही दोष प्रकृत किंवा विकृत कोणत्या तरी एका दशेंत नेहमीं असतात. ह्मणून विवेकशाली वैद्यानें ते जाणण्याविषयीं नेहमीं यत्न करावा.

उत्साहोच्छ्वासनिःश्वासचेष्टा धातुगतिः समा ।
समो मोक्षो गतिमतां वायोः कर्माविकारजम् ॥ ५३ ॥
दर्शनं पक्तिरूष्मा च क्षुत्तृष्णा देहमार्दवम् ॥
प्रभा प्रसादो मेधा च पित्तकर्माविकारजम् ॥ ५४ ॥
स्नेहोबन्धः स्थिरत्वञ्च गौरवं वृषता बलम् ।
क्षमा धृतिरलोभश्च कफकर्माविकारजम् ॥ ५५ ॥

वातादि दोषांच्या ज्ञानानेंच रोग ज्ञान होतें असें वर प्रतिपादन केलें. त्या उपोद्धातावर आतां वातादि दोषांचीं प्रकृत व विकृत लक्षणें सांगतातः—उत्साह, श्वासोच्छ्वास, कायिक–वाचिक–मानसिक कोणत्याही प्रकारची क्रिया, रसादि पोषक धातूंचें मांसादि पोष्य धातूं प्रत समान

अवस्थेंत ह्मणजे विकृत न होतां जाणें आणि मलमूत्रादि बाहेर टाकावयाच्या पदार्थांचें यथायोग्य विसर्जन होणें या निर्विकार वायूच्या क्रिया होत. दृष्टि, अन्नपचन, उष्णता, भूक, तहान, शरीराचा मऊपणा, तेज, चित्ताची प्रसन्नता आणि बुद्धीची धारणाशक्ति या प्रकृतावस्थेंतील पित्ताच्या क्रिया आहेत. शरीराची स्निग्धता, शरीराचे सांधे जागच्या जागीं दृढ राहणें, शरीर चुस्त राहणें ( शिथिल न पडणें ), जडं[१] असणें, शरीरांत वीर्य व बल विपुल असणें, सहनशीलता, धैर्य आणि निर्लोभता या अविकृत कफाच्या क्रिया होत.

वाते पित्ते कफे चैव क्षीणे लक्षणमुच्यते ।
कर्मणः प्राकृताद्धानिर्वृद्धिर्वाऽपि विरोधिनाम् ॥ ५६ ॥
दोषप्रकृतिवैशेष्यं नियतं वृद्धिलक्षणम् ।
दोषाणां प्रकृतिर्हानिर्वृद्धिश्चैवं परीक्ष्यते ॥ ५७ ॥

वर सांगितलेल्या तत्तद्दोषांच्या अविकृत क्रियांचा ऱ्हास होणें किंवा तद्विरुद्ध क्रियांची वृद्धि होणें हें त्या त्या दोषाच्या क्षयाचें लक्षण समजावें.[२]

---

१ हा जडपणा शरीराचा स्वाभाविक जडपणा होय. यानें, अंग गळल्यासारखें न वाटतां शरीरांत एकप्रकारचा भारदस्तपणा वाटणें, असा अर्थ ग्रहण करावयाचा.

२ उत्साहादि वाताच्या स्वाभाविक क्रिया सांगितल्या आहेत. त्यांपैकीं उदाहरणार्थ—उत्साह कमी होणें ही वाताच्या प्रकृत क्रियेची हानि होय; आणि उत्साह कमी झाला म्हणजे विषाद वाढणें ही तद्विरुद्ध क्रियेची वृद्धि होय. उत्साह कमी झाला म्हणजे विषाद सहजच वाढणार असें दिसत असून 'वृद्धिर्वाऽपि विरोधिनाम्' असें वेगळें सांगण्याचें कारण असें कीं, प्रकृत क्रियेचा क्षय झाला असतां तद्विपरीत क्रियेची हानि झालीच पाहिजे असा नियम नाहीं. उत्साहहानि अल्प प्रमाणांत असली म्हणजे विषाद वाढत नाहीं. किंवा निर्लोभतेंत कांहीं न्यूनता झाली म्हणजे लोभ वाढला असेंही म्हणतां येत नाहीं किंवा निषेध मुखानें व विधिमुखानें दोन्ही प्रकारांनीं निरूपण करण्याकरितां निराळ्या रीतीनें सांगितलें असें मानलें तरी चालेल. 'वृद्धिर्वाऽपि विरोधिनाम्' याचा कित्येकांनीं असा अर्थ केला आहे कीं, एक दोष क्षीण झाला असतां त्याच्या विरुद्ध दोषाची वृद्धि होते. ह्मणजे पित्त वाढलें असतां कफाचा क्षय होतो व पित्त कमी झालें असतां कफ वाढतो इत्यादि. परंतु हा अर्थ आ-

दोषांच्या[1] स्वाभाविक गुणधर्मांची वृद्धि झाली ह्मणजे ते दोष वाढले आहेत असें समजावें. याप्रमाणें दोषाच्या हानिवृद्धीची परीक्षा केली जाते.

सङ्ख्यानिमित्तं रूपाणि शोथानां साध्यता न च ।
तेषां तेषां विकाराणां शोथाँस्ताँस्ताँश्च पूर्वजान् ॥ ५८ ॥
विधिभेदं विकाराणां त्रिविधं बोध्यसंग्रहम् ।
प्राकृतं कर्म दोषाणां लक्षणं हानिवृद्धिषु ॥ ५९ ॥
वीतमोहरजोदोषलोभमानमदस्पृहः ।
व्याख्यातवाँस्त्रिशोथीये रोगाध्याये पुनर्वसुः ॥ ६० ॥

शोथांची संख्या, कारणें, लक्षणें, साध्यासाध्य वर्णन, उपजिव्हिकादि रोगांत प्रारंभीं येणारे शोथ, रोगांचे विधिभेद, प्रकृत्यादि जाणावयाच्या तीन गोष्टी, दोषांच्या स्वाभाविक क्रिया आणि त्यांची क्षयवृद्धि झाली असतां होणारीं लक्षणें. इतके विषय या त्रिशोथीय अध्यायांत निर्मोह, सत्वप्रधान, निर्लोभ, निरभिमान, मदरहित व निस्पृह असे जे पुनर्वसु महर्षि त्यांनीं प्रतिपादन केले आहेत.

## अष्टादशोऽध्यायः समाप्तः

---

ह्मांस सम्मत नाहीं. कारण एक दोष वाढला असतां दुसरा अवश्य कमी होतो असा नियम नाहीं. तसें होऊं लागलें तर पित्त वाढलें म्हणजे कफाचा मुळींच क्षय झाला पाहिजे. तसें होत नाहीं. अशा रीतीनें दोष परस्पर विरोधी नाहींत हें कियन्तःशिरसीय अध्यायांत सप्रमाण सिद्ध केलें आहे. शिवाय त्याच अध्यायांत, स्वयंक्षीण झालेल्या दोषांत, त्यांच्या स्वतःच्या क्रिया कमी होणें किंवा बंद पडणें या पलीकडे प्रत्यक्ष कोणत्याही प्रकारचा फेरबदल करण्याची शक्ति नसते, हें ही 'क्षीणा जहति लिंगं स्वं' या श्लोकाच्या टीपेंत सिद्ध केलें आहे.

१ कफाचे स्वाभाविक गुण धर्म स्नेह, शैत्य, माधुर्यादि आहेत. शरीरांत त्या गुणांचें वैशेष्य झालें म्हणजे कफ वाढला असें समजावें. याचप्रमाणें इतर दोषांविषयीं ही समजावें.



# अथ ऊनविंशोऽध्यायः ।

अथातोऽष्टोदरीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण अष्टोदरीय अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

इह खल्वष्टावुदराण्यष्टौ मूत्राघाताः अष्टौ क्षीरदोषाः अष्टौ रेतोदोषाः सप्त कुष्ठानि सप्त पिडकाः सप्त वीसर्पाः षडतीसाराः षडुदावर्ताः पञ्च गुल्माः पञ्च प्लीहदोषाः पञ्च कासाः पञ्च श्वासाः पञ्च हिक्काः पञ्च तृष्णाः पञ्च छर्दींषि पञ्च भक्तस्यानशनस्थानानि पञ्चशिरोरोगाः पञ्च हृद्रोगाः पञ्च पाण्डुरोगाः पञ्चोन्मादाश्चत्वारोऽपस्माराश्चत्वारोऽक्षिरोगाश्चत्वारः कर्णरोगाश्चत्वारः प्रतिश्यायाश्चत्वारो मुखरोगाश्चत्वारो ग्रहणीदोषाश्चत्वारो मदाश्चत्वारो मूर्च्छायाश्चत्वारः शोषाश्चत्वारि क्लैब्यानि त्रयः शोफास्त्रीणि किलासानि त्रिविधं लोहितपित्तं द्वौ ज्वरौ द्वौ व्रणौ द्वावायामौ द्वे गृध्रस्यौ द्वे कामले द्विविधमामं द्विविधं वातरक्तं द्विविधान्यर्शांसि एक ऊरुस्तम्भः एकः सन्यासः एको महागदः विंशतिः कृमिजातयः विंशतिः प्रमेहा विंशतिर्योनिव्यापद इत्यष्टाचत्वारिंशद्रोगाधिकरणान्यस्मिन्सङ्ग्रहे समुद्दिष्टानि ॥ २ ॥

उदर रोग आठ प्रकारचे आहेत, मूत्राघात आठ प्रकारचे, स्त्रियांच्या

दुधाचे दोष आठ प्रकारचे, वीर्यदोष आठ प्रकारचे, कुष्ठ सात प्रकारचे, पुळया सात प्रकारच्या, विसर्प सात प्रकारचे, अतिसार सहा प्रकारचे, उदावर्त सहा प्रकारचे, गुल्म पांच प्रकारचे, प्लीहरोग पांच प्रकारचे, खोकला पांच प्रकारचा, दमा पांच प्रकारचा, उचकी पांच प्रकारची, अन्तर्दाह [तृष्णा] पांच प्रकारचा, वांति पांच प्रकारची, अन्नावरची अरुचि पांच प्रकारची, मस्तकरोग पांच प्रकारचे, हृद्रोग पांच प्रकारचे, पाण्डुरोग पांच प्रकारचे, उन्माद पांच प्रकारचे, अपस्मार चार प्रकारचे, नेत्ररोग चार प्रकारचे, कानाचे रोग चार प्रकारचे, पडसें चार प्रकारचें, मुखरोग चार प्रकारचे, संग्रहणी चार प्रकारची, मद चार प्रकारचा, मूर्च्छा चार प्रकारची, क्षय चार प्रकारचे, नपूंसकत्व चार प्रकारचें, सूज तीन प्रकारची, किलास तीन प्रकारचें, रक्तपित्त तीन प्रकारचें, ताप दोन प्रकारचा, व्रण दोन प्रकारचे, आयामरोग दोन प्रकारचे, गृध्रसी (Sciatica) दोन प्रकारची, कावीळ दोन प्रकारची, आमविकार दोन प्रकारचे, वातरक्त दोन प्रकारचें, मूत्रव्याधी दोन प्रकारची, ऊरुस्तम्भ (Paralysis of the lower extremeties) एक प्रकारचा, संन्यास एक प्रकारचा, महारोग एक प्रकारचा, कृमि वीस प्रकारचे, प्रमेह वीस प्रकारचे आणि योनिरोग वीस प्रकारचे आहेत. याप्रमाणें हीं रोगांचीं ४८ प्रकरणें या ठिकाणीं सांगितलीं आहेत*

> एतानि यथोद्देशमभिनिर्देक्ष्यामः । अष्टावुदराणीति वातपित्तकफसान्निपातप्लीहबद्धछिद्रोदकोदराणीति । अष्टौ मूत्राघाता इति वातपित्तकफसन्निपाताश्मरीशर्कराशुक्रशोणितजा इति । अष्टौ क्षीरदोषा इति वैवर्ण्यं वैगन्ध्यं वैरस्यं पैच्छिल्यं फेनसङ्घातो रौक्ष्यं गौरवमतिस्नेहश्चेति ।

---

* यांत सांगितलेल्या रोगांचीं लक्षणें पुढें निदानादिस्थानांत त्या त्या योग्य भागीं येतील म्हणून येथें तीं दिलीं नाहींत.

**अष्टौ रेतोदोषा इति तनु शुष्कं फेनिलमश्वेतं पूति अति पिच्छिलमन्यधातूपहितमवसादि चेति ॥ ३ ॥**

आतां त्यांचें संक्षिप्त स्पष्टीकरण करूं.—आठ उदररोग ह्मणजे—वातोदर. पित्तोदर, कफोदर, सान्निपातिकोदर, प्लीहोदर, बद्धोदर, छिद्रोदर अथवा क्षतोदर आणि जलोदर हे होत. आठ प्रकारचे मूत्राघात ह्मणजे—वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक, अश्मरीजन्य ( मूतखडा ), शर्करोत्पन्न, वीर्यज व रक्तज हे होत. स्त्रियांच्या दुधाचे आठ प्रकारचे दोष ह्मणजे–रंग बिघडणें, दुर्गंध येणें, स्वाद बिघडणें, बुळबुळीतपणा, फेंस येणें, चिकणास (स्निग्धता) नसणें, जडपणा, आणि अतिशय चिकणास हे होत; पातळ, सुकें, फेंसदार, पांढऱ्या रंगाहून निराळ्या रंगाचें, दुर्गंधयुक्त, अतिशय बुळबुळीत, रक्तादि इतर धातुमिश्रित आणि अवसादी (हीनसत्व अथवा चिथडलेलें) असें असणें हे आठ प्रकारचे वीर्यदोष आहेत.

**सप्त कुष्ठानीति कपालोदुम्बरमण्डलर्ष्यजिव्हपुण्डरीकसिध्मकाकणानीति । सप्त पिडका इति शराविका कच्छपिका जालिनी सर्षप्यलजी विनता विद्रधी चेति । सप्त विसर्पा इति वातपित्तकफाग्निकर्दमकग्रन्थिसान्निपाताख्याः ॥ ४ ॥**

कपाल, उदुम्बर, मण्डल, ऋष्यजिव्ह, पुण्डरीक, सिध्म, व काकण हे कुष्ठांचे सात प्रकार[1] आहेत; शराविका, कच्छपिका, जालिनी, सर्षपी, अलजी, विनता व विद्रधी या सात प्रकारच्या पुळ्या आहेत; वातविसर्प, पित्तविसर्प, कफविसर्प, अग्निविसर्प, कर्दमकविसर्प, ग्रन्थिविसर्प आणि सान्निपातिक विसर्प असे विसर्पाचे सात प्रकार आहेत.

---

1 चिकित्सास्थानांत सर्व मिळून अठरा प्रकारची कुष्टें सांगितलीं आहेत. या ठिकाणीं फक्त सात प्रकारचीं महाकुष्ठें सांगितलें आहेत.

षडतीसारा इति वातपित्तकफसन्निपातभयशोकजाः ष-
डुदावर्ता इति वातमूत्रपुरीषशुक्रछर्दिक्षवथुजाः ॥ ५ ॥

सहा प्रकारचे अतिसार ह्मणजे—वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक भय व शोकापासून होणारे; सहा प्रकारचे उदावर्त ह्मणजे—वात, मूत्र, मल, वीर्य, वांति व शिंका यांचे वेग थांबविल्यानें होणारे.

पञ्चगुल्मा इति वातपित्तकफसन्निपातशोणितजाः ।
पञ्च प्लीहदोषा इति गुल्मैर्व्याख्याताः । पञ्च कासा
इति वातपित्तकफक्षतक्षयजाः । पञ्च श्वासा इति महो-
र्ध्वछिन्नतमकक्षुद्राः । पञ्च हिक्का इति महती गम्भीरा-
व्यपेता क्षुद्रा चान्नजा च । पञ्च तृष्णा इति वातपित्ता-
मक्षयोपसर्गात्मिकाः । पञ्च छर्दय इति द्विष्टार्थसंयोग-
वातपित्तकफसन्निपातोद्रेकात्मिकाः । पञ्च भक्तस्यानश-
नस्थानानीति वातपित्तकफद्वेषायासाः । पञ्च शिरोरो-
गा इति पूर्वोद्देशमभिसमस्य वातपित्तकफसन्निपातकृमि-
जा इति । पञ्च हृद्रोगा इति शिरोरोगैर्व्याख्याताः ।
पञ्च पाण्डुरोगा इति वातपित्तकफसन्निपातमृद्भक्षणजाः ।
पञ्चोन्मादा इति वातपित्तकफसन्निपातागन्तुनिमित्ताः ॥६ ॥

वातगुल्म, पित्तगुल्म, कफगुल्म, सान्निपातिकगुल्म आणि रक्तगुल्म हे गुल्माचे पांच प्रकार आहेत; प्लीहरोगाचे व गुल्मरोगाचे भेद एकच आहेत; खोकल्याचे पांच प्रकार ह्मणजे—वातिक, पैत्तिक, कफज आणि क्षत पडून झालेला व क्षयांत होणारा; महाश्वास, ऊर्ध्वश्वास, छिन्नश्वास, तमकश्वास व क्षुद्रश्वास असे दम्याचे पांच प्रकार आहेत; पांच प्रकारच्या उचक्या ह्मणजे—महती, गम्भीरा, व्यपेता, क्षुद्रा आणि अन्नजा या होत; तृष्णारोगाचे पांच प्रकार—वातज, पित्तज, आणि आम, क्षय व उपसर्गापासून होणारा हे होत; पांच प्रकारच्या उलट्या—वीट आलेलें अन्न

खाणें आणि वात, पित्त, कफ व सन्निपाताच्या उमाशानें होणाऱ्या; अरुचिरोगाचे पांच प्रकार—वातज, पित्तज, कफज आणि अन्नावर अप्रीति व श्रमापासून होणारे हे होत. शिरोरोग पांच प्रकारचे ह्मणजे—वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक आणि कृमिजन्य हे होत. हे पांच प्रकार, कियन्तः शिरसीय अध्यायांत 'अर्द्धावभेदको वा स्यात्' इत्यादि श्लोकांत सविस्तर सांगितले होते त्यांचा संक्षेप करून येथें सांगितले आहेत; हृद्रोगाचे पांच भेद शिरोरोगाच्या भेदांप्रमाणें समजावे. पांच प्रकारचे पांडुरोग—वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक आणि माती खाण्यापासून होणारे; उन्माद ( Mania ) पांच प्रकारचे—वातज, पित्तज, कफज, सान्निपातिक आणि आगन्तु.

**चत्वारोऽपस्मारा इति वातपित्तकफसन्निपातनिमित्ताश्चत्वारोऽक्षिरोगाश्चत्वारः कर्णरोगाश्चत्वारः प्रतिश्यायाश्चत्वारो मुखरोगाश्चत्वारो ग्रहणीदोषाश्चत्वारो मदाश्चत्वारो मूर्च्छाया इत्यपस्मारैर्व्याख्याताः । चत्वारः शोषा साहससन्धारणक्षयविषमाशनजाश्चत्वारि क्लैब्यानीति बीजोपघाताद्ध्वजभङ्गाज्जरया शुक्रक्षयाच्च ॥ ७ ॥**

वातापस्मार, पित्तापस्मार, कफापस्मार आणि सान्निपातिकापस्मार हे अपस्माराचे (Epilepsy) चार प्रकार आहेत; नेत्ररोग, कर्णरोग, पडसें, मुखरोग, संग्रहणी, मद, आणि मूर्च्छा या प्रत्येकाचे चार चार भेद अपस्माराच्या भेदाप्रमाणेंच समजावें; शोष अथवा क्षय रोगाचे चार प्रकार—साहस, मलमूत्रांचे वेग थांबवून धरणें, रसादि धातूंचा क्षय व विषमभोजन या चार कारणांनीं होतात; तसेंच नपुंसकत्व चार प्रकारांनीं होतें—वीर्यास विकृति झाल्यानें, लिङ्गपातानें, वृद्धावस्थेनें व वीर्याचा क्षय झाल्यानें.

त्रयः शोथा इति वातपित्तश्लेष्मनिमित्ताः । त्रीणि कि-
लासानीति रक्तताम्रशुक्लानि । त्रिविधं लोहितपित्तमि-
त्यूर्ध्वभागमधोभागमुभयभागञ्च ॥ ८ ॥

शोथाचे तीन प्रकार-वातज, पित्तज व श्लेष्मज हे होत; श्वित्र तीन प्रकारचें ह्मणजे-तांबडें, तांब्याच्या रंगाचें व पांढरें; रक्तपित्ताचे तीन प्रकार--ऊर्ध्वगामी, अधोगामी व उभयमार्गगामी हे होत.

द्वौ ज्वराविव्युष्णाभिप्रायः शीतसमुत्थश्च शीताभिप्राय-
श्चोष्णसमुत्थः । द्वौ व्रणौ निजश्चागन्तुजश्च । द्वावायामा-
विति बाह्यश्चाभ्यन्तरश्च । द्वे गृध्रस्याविति वाताद्वात-
कफाच्च । द्वे कामले इतिकोष्ठाश्रया शाखाश्रया च । द्वि-
विधमाममित्यलसको विषूचिका च । द्विविधं वातरक्त-
मितिगम्भीरमुत्तानञ्च । द्विविधान्यर्शांसीति शुष्कान्या-
र्द्राणि च ॥ ९ ॥

दोन प्रकारचे ज्वर ह्मणजे-थंडी पासून उत्पन्न झालेला व ज्यांत उष्णोपचारांची इच्छा होत असेल असा एक आणि उष्णतेपासून उत्पन्न होऊन शीतोपचारांची इच्छा होत असेल असा दुसरा; व्रण दोन प्रकारचे-एक बाह्य व दुसरा आभ्यन्तर; गृध्रसी रोग दोन प्रकारचा-एक वायुपासून होणारा व दुसरा वात आणि कफापासून होणारा; कावीळ दोन प्रकारची एक काष्ठाश्रय व दुसरी शाखाश्रय; आमरोगाचे दोन प्रकार-अलसक व विषूचिका; वातरक्त दोन प्रकारचें-गम्भीर व उत्तान; मुळव्याध दोन प्रकारची-सुकी व ओली ( रक्तमूळव्याध ).

एक ऊरुस्तम्भ इत्यामात्र दोषसमुत्थानः । एकः सन्न्यास
इति त्रिदोषात्मको मनःशरीराधिष्ठानः । एको महागद
इत्यतत्वाभिनिवेशः ॥ १० ॥

उरुस्तम्भ एकच प्रकारचा—हा आमदोषमिश्रित त्रिदोषांपासून होतो; संन्यास एक प्रकारचा—हा त्रिदोषज आहे व याचें स्थान मन आणि शरीर हें आहे; महारोग एक आहे—तो अतत्त्वाभिनिवेश[1] होय.

विंशतिः कृमिजातय इति—यूकाः पिपीलिकाश्चेति द्विविधा बहिर्मलजाः—केशादा लोमादा लोमद्वीपाः सौरसा औदुम्बरा जन्तुमातरश्चेति षट् शोणितजा—अन्त्रादा उदरादा हृदयचराश्चुरवो दर्भपुष्पाः सौगन्धिका महागुदाश्चेति सप्त कफजाः—ककेरुका लेलिहाः सशूलकाः सौसुरादाश्चेति पञ्च पुरीषजा इति विंशतिः कृमिजातयः। विंशतिः प्रमेहा इति—उदकमेहश्चेक्षुरसमेहश्च सान्द्रमेहश्च सान्द्रप्रसादमेहश्च शुक्लमेहश्च शुक्रमेहश्च शीतमेहश्च शनैर्मेहश्च सिकतामेहश्च लालामेहश्चेति दश श्लेष्मनिमित्ताः—क्षारमेहश्च कालमेहश्च नीलमेहश्च लोहितमेहश्च मञ्जिष्ठामेहश्च हरिद्रामेहश्चेति षट् पित्तनिमित्ताः—वसामेहश्च मज्जामेहश्च हस्तिमेहश्च मधुमेहश्चेति चत्वारो वातनिमित्ता इति विंशतिः प्रमेहाः। विंशतिर्योनिव्यापद इति वातिकी पैत्तिकी चेति चतस्रः—दोषदूष्यसंसर्गप्रकृतिनिर्देशैरवशिष्टाः षोडश निर्दिश्यन्ते तद्यथा—रक्तयोनिश्चारजस्का चाचरणा चातिचरणा च प्राक्चरणा चोपप्लुता च परिप्लुता चोदावर्तिनी च कर्णिनी च पुत्रघ्नी चान्तर्मुखी च सूचीमुखी च शुष्का च वामिनी च षण्डयोनिश्च महायोनिश्चेति विंशतिर्योनिव्यापदः। केवलश्चायमुद्देशो यथोद्देशमभिनिर्दिष्ट इति ॥ ११ ॥

---

१ अतत्त्वाभिनिवेश म्हणजे अयथार्थ—मिथ्या वस्तूंचे ठायीं ममता असणें, अर्थात् सारभूत सत्य वस्तूंचे ठायीं तीं नसणें हा मानसिक रोग आहे सर्व सांसारिक दुःखांचें मूळ कारण हें असल्यानें यास महारोग असें ह्मटलें आहे.

कृमि वीस प्रकारचे आहेत–त्यांपैकीं यूक (ऊ) व पिपीलिका नांवाचे कृमी बाह्य मलापासून होतात; केशाद, लोमाद, लोमद्वीप, सौरस, उदुंबर व जन्तुमातर हे सात रक्तापासून होतात; अन्त्राद, उदराद, हृदयचर, चुरु, दर्भपुष्प, सौगन्धिक व महागुद हे सात कफापासून उत्पन्न होतात; ककेरुक, मकेरुक, लेलिह, सशूलक व सौसुराद हे पांच विष्ठेपासून उत्पन्न होतात; याप्रमाणें कृमींचे वीस प्रकार आहेत. प्रमेह वीस प्रकारचे आहेत–त्यांपैकीं उदकमेह, इक्षुरसमेह, सान्द्रमेह, सान्द्रप्रसादमेह, शुक्लमेह, शुक्रमेह, शीतमेह, शनैर्मेह, सिकतमेह व लालामेह हे दहा प्रकारचे प्रमेह कफापासून होतात; क्षारमेह, कालमेह, नीलमेह, लोहितमेह, मंजिष्ठामेह आणि हारिद्रमेह हे सहा पित्तापासून होतात वसामेह, मज्जामेह, हस्तिमेह आणि मधुमेह हे वातापासून होतात; याप्रमाणें हे प्रमेहाचे वीस प्रकार झाले. योनिरोग वीस प्रकारचे–त्यांपैकीं वातज, पित्तज, कफज व सान्निपातिक असे चार; बाकीचे सोळा प्रकार वातादि दोष व रक्तादि दूष्य यांच्या संयोग व कारणांवरून सांगतों. रक्तयोनि, अरजस्का, अचरणा, अतिचरणा प्राक्चरणा, उपप्लुता, परिप्लुता, उदावर्तिनी, कर्णिनी, पुत्रघ्नी, अंतर्मुखी, सूचीमूखी, शुष्का, वामिनी, षण्डयोनी व महायोनि[2]. या ठिकाणीं हीं केवळ रोगांचीं संख्येनुरूप नांवें सांगितलीं आहेत[3].

विंशकाश्चैककाश्चैव त्रिकाश्चोक्तास्त्रयस्त्रयः ।
द्विकाश्चाष्टौ चतुष्काश्च दशद्वादशपञ्चकाः ॥ १२ ॥
चत्वारश्चाष्टका वर्गाः षट्कौ द्वौ सप्तकास्त्रयः ।
अष्टोदरीये रोगाणां रोगाध्याये प्रकाशिता ॥ १३ ॥

---

१ यांचीं लक्षणें वगैरे सविस्तर प्रतिपादन विमानस्थानाच्या सातव्या अध्यायांत आहे तेथें पहावें.

२ यांचीं लक्षणें योनिव्यापच्चिकित्साध्यायांत पुढें येतील.

३ यांत मदात्यय रोग सांगितला नाहीं तो मदापासूनच पुढें मदात्यय होतो म्हणून गाळला असावा.

या अष्टोदरीय नांवाच्या रोगाध्यायांत, वीस प्रकार असणारे तीन रोग, एक प्रकार असणारे तीन, तीन प्रकार असणारे तीन, दोन प्रकार असणारे आठ, चार प्रकार असणारे दहा, पांच प्रकार असणारे बारा, आठ प्रकार असणारे चार, सहा प्रकार असणारे दोन आणि सात प्रकार असणारे तीन रोग सांगितले आहेत.

सर्व एव विकारा निजा नान्यत्र वातपित्तकफेभ्यो निवर्तन्ते । यथा हि शकुनिः सर्वं दिवसमपि परिपतन्स्वां छायां नातिवर्तते तथा स्वधातुवैषम्यनिमित्ताः सर्व विकारा वातपित्तकफान्नातिवर्तन्ते । वातपित्तश्लेष्मणां पुनः स्थानसंस्थानप्रकृतिविशेषानभिसमीक्ष्य तदात्मकानपि च सर्वविकारास्तानेवोपदिशन्ति बुद्धिमन्तः॥ १४ ॥

यापूर्वीं सांगितलेले, पुढें महारोगाध्यायांत सांगितले जाणारे किंवा यांत मुळींच न सांगितलेले असे निज[1]रोग कोणत्याही प्रकारचे असले तरी ते पूर्वीं वर्णन केलेल्या वात, पित्त व कफ या तीन दोषांच्या प्रक्रियेबाहेर राहूं शकत नाहींत. जसें, पक्षी दिवसभर भ्रमण करतो तरी त्याची छाया त्यापासून दूर होत नाहीं, तद्वत् शरीरांतील धातूंच्या वैषम्य अथवा न्यूनाधिकतेमुळें उत्पन्न झालेले कोणत्याही प्रकारचे विकार वातादि त्रिदोषांहून वेगळे राहूं शकत नाहींत. अर्थात् एकंदर रोगांचा या दोषांत समावेश होतो. असें असूनही ऊरुस्तम्भ, रक्तयोनि, कावीळ वगैरे–पिडका, गुल्म वगैरे–कफोदर, प्लीहोदर वगैरे जीं निरनिराळीं रोगांचीं नांवें दिलीं तीं अनुक्रमें दोषांचें स्थान, विकारांची आकृति व नि-

---

१ निजपदाचा प्रयोग करण्याचा हेतु, आगन्तुविकारांत दोषांचा संबंध नसतो हें सांगण्याचा नाहीं; तर आगन्तु रोगांत चिकित्सा करावयाची तीस दोषांची अपेक्षा नसते हें दाखविण्याचा आहे.

रानिराळीं कारणें यांच्या भेदांवरून फक्त दिलीं आहेत. हीं नांवें वगैरें-ची व्यवस्था फक्त निदानचिकित्सेच्या सौकर्याकरितां केली आहे[1].

स्वधातुवैषम्यनिमित्तजा ये विकारसङ्घा बहवःशरीरे।
न ते पृथक्पित्तकफानिलेभ्य आगन्तवस्त्वेव ततो विशिष्टाः ॥ १५ ॥

शरीरांतील धातु विषम झाल्यानें जे नानाप्रकारचे रोग उत्पन्न होतात त्या सर्वांचें कारण वातादि तीन दोषच आहेत. आगन्तु रोग मात्र या नियमास अनुसरून नाहींत[2].

आगन्तुरन्वेति निजं विकारं निजस्तथाऽऽगन्तुमपि प्रवृद्धः।
तत्रानुबन्धं प्रकृतिं च सम्यग्ज्ञात्वा ततः कर्म समारभेत ॥१६॥

कधीं कधीं निजरोगांत आगन्तु विकारांचा प्रवेश होतो व कधीं निजरोग फार वाढून आगन्तु विकारांत येऊन मिळतात. ह्मणजे कधीं दोषजज्वर किंवा उन्माद प्रथम होऊन मागाहून त्यांत भूतसंचार होतो व कधीं याच्या उलट घाव लागून ताप आला असतां किंवा भूतसंचार होऊन उन्माद झाला असतां त्यांत अनुक्रमें दोषज ताप व उन्मादांचीं लक्षणें मागाहून होतात. ह्मणून आगन्तु व दोषज अशी दोन्ही प्रका-

---

१ जरी प्लीहादि कारणभेदानें रोग भिन्न असले तरी ते वातादिदोषांच्या स्थानांत उत्पन्न झाल्यानें, वातादिदोषांच्या लक्षणांनीं युक्त असल्यामुळें आणि वातादिकारणांनींच झालेले असल्यामुळें सर्व विकार वातादिदोषजन्यच समजावे हा भावार्थ आहे.

२ यांत मागील वाक्याचाच अर्थ श्लोकबद्ध सांगितला आहे. एखादा घाव लागून ताप आला असतां त्यांतही धातुवैषम्य होतें. त्यामुळें निज व आगन्तु या दोहोंचे एकच लक्षण लागू पडूं नये ह्मणून 'निमित्तजाः' हें पद घातलें. आगन्तु रोगांत धातुवैषम्य असलें तरी तें त्या रोगाचें कारण नसतें. आगन्तु रोगांत चिकित्सा करावयाची ती मुख्य धातुवैषम्याची नसून घाव वगैरे ज्या कारणांनीं विकार उ-

रचीं मिश्रित लक्षणें एकत्र आढळल्यास मूळ विकार कोणता व मागाहून येऊन मिळालेला कोणता हें बरोबर ओळखून व त्यांच्या बलाबलाची परीक्षा करून नंतर त्याप्रमाणें चिकित्सा सुरू करावी.

ऊनविंशोऽध्यायः समाप्तः

---

त्पन्न झाला असेल त्याची करावयाची असते. अर्थात् धातुवैषम्य त्यांत गौण आहे. निज रोगांत धातुवैषम्य प्रधान आहे व चिकित्सा त्यावर करावयाची असते.

१ अनुबन्ध व प्रकृति याचा दुसरा अर्थ गौण व मुख्य असाही करितां येईल. त्यास 'स्वतन्त्रो व्यक्तलिङ्गः स्वचिकित्साप्रशमश्चानुबन्ध्योऽतो विपरीतस्त्वनुबन्धः' असें प्रमाणही आहे.



# अथ विंशोऽध्यायः ।

अथातो महारोगाध्यायं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण महारोगाध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

चत्वारो रोगा भवन्ति आगन्तुवातपित्तश्लेष्मनिमित्ता-
स्तेषां चतुर्णामपि रोगत्वमेकविधं भवति रुक्सामान्या-
द्द्विविधा पुनः प्रकृतिरेषामागन्तुनिजविभागाद्द्विविधं चै-
षामधिष्ठानं मनःशरीरविशेषात् ॥ २ ॥

एकंदर रोग चार जातीचे आहेतः—आगन्तु, वातज, पित्तज आणि कफज. या सर्वांत दुःख अथवा वेदना हा एक साधारण धर्म असल्यामुळें रोगमात्र एकच प्रकारचे आहेत असेंही मानतां येतें. पुन्हा निज व आगन्तु या कारणभेदेंकरून यांचे दोन प्रकार होतात. त्यापैकीं प्रत्येकाचे स्थानभेदेंकरून आणखी दोन दोन प्रकार होतात. तीं स्थानें मन व शरीर अर्थात् निज व आगन्तु आणि मानसिक व शारीरिक असे एकंदर चार भेद झाले.

विकाराः पुनरपरिसङ्ख्येयाः प्रकृत्यधिष्ठानलिङ्गायत-
नविकल्पविशेषापरिसङ्ख्येयत्वात् ॥ ३ ॥

दुसऱ्या रीतीनें, ज्या वातादि निरनिराळ्या कारणांनीं रोग होतात, ज्या भिन्न भिन्न स्थानांत ते असतात आणि त्यांचीं जीं जीं निरनिराळीं

लक्षणें व दुष्ट आहारविहाररूपी बाह्य हेतु अथवा आयतनें असतात त्यांवरून भेद केले तर ते असंख्य होतील. कारण दोषांच्या संसर्गाच्या अंशांश कल्पना केल्या तर त्या असंख्य होतात; दूष्य–शरीराचे अवयव, त्यांचेही अणुशः विभाग करून परस्पर संयोगवियोगकल्पना केली तर तेही असंख्य होतात. याप्रमाणें निरनिराळ्या रोगांचीं निरनिराळीं लक्षणेंही असंख्य आहेत.

मुखानि तु खल्वागन्तोर्नखदशनपतनाभिचाराभिशापाभिषङ्गाभिघातबधबन्धपीडनरज्जुदहनशस्त्राशनिभूतोपसर्गादीनि । निजस्य तु मुखं वातपित्तश्लेष्मणां वैषम्यम् ॥ ४ ॥

आगन्तु रोगांचीं मुख्य कारणें–नख लागणें, दांत लागणें, पडणें, जारणमारणादि प्रयोग करणें, शाप लागणें, पिशाचबाधा होणें, घाय लागणें, टोंचणें, बंधन, दाबणें, दोरीनें बांधून टाकणें, जळणें, शस्त्र लागणें, वज्रपात व भूतसंचारादि हीं होत. निजरोगाचें कारण, वात, पित्त व कफ या तीन दोषांचें वैषम्य होय.

द्वयोस्तु खल्वागन्तुनिजयोः प्रेरणमसात्म्येन्द्रियार्थसंयोगः प्रज्ञापराधः परिणामश्चेति ॥ ५ ॥

आगन्तु व निज या दोन्ही प्रकारच्या रोगांचें मूळ प्रेरक कारण–असात्म्य वस्तूंशीं इंद्रियांचा संयोग, बुद्धिदोष आणि कृतकर्माचें फळ हें होय.

सर्वेऽपि तु खल्वेतेऽभिप्रवृद्धाश्चत्वारो रोगाः परस्परमनुबध्नन्ति न चान्योन्यसन्देहमापद्यन्ते ॥ ६ ॥

हे आगन्तु, वातज, पित्तज, व कफज असे चारही प्रकारचे रोग अतिशय वाढले असतां एक दुसऱ्याशीं मिळून जातात. ह्मणजे प्रथम पिशाचबाधा होऊन ती वाढली असतां त्यांतच दोषज ज्वर मागाहून उत्पन्न होतो किंवा प्रथम दोषज ज्वर उत्पन्न होऊन तो वाढला ह्मणजे

त्यांत भूतोन्मादादि विकार मागाहून मिळतात. अशा प्रकारें निज व आगन्तु या दोन्हींतल्हेच्या रोगांचें मिश्रण झालें असतांही, प्रत्येकाचीं लक्षणें निरनिराळीं सांगितलीं असल्यामुळें, त्यांस ओळखण्यास अडचण पडत नाहीं.

आगन्तुर्हि व्यथापूर्वसमुत्पन्नो जघन्यं वातपित्तश्लेष्मणां वैषम्यमापादयति निज तु वातपित्तश्लेष्माणः पूर्वं वैषम्यमापद्यन्ते जघन्यां व्यथामभिनिर्वर्तयन्ति ॥ ७ ॥

आगन्तु रोगांत प्रथम पीडा होऊन नंतर त्यापासून वातादि दोषांचें वैषम्य उत्पन्न होतें आणि निजरोगांत आरंभीं वातादिदोष विषम होऊन नंतर ते व्यथा उत्पन्न करितात.

तेषां त्रयाणामपि दोषाणां शरीरे स्थानविभाग उपदेक्ष्यते तद्यथा-बस्तिः पुरीषाधानं कटिः सक्थिनी पादावस्थीनि च वातस्थानान्यत्रापि पक्वाशयो विशेषेण वातस्थानम् । स्वेदो रसो लसीका रुधिरमामाशयश्च पित्तस्थानानि अत्राप्यामाशयो विशेषेण पित्तस्थानम् । उरः शिरो ग्रीवा पर्वाण्यामाशयो मेदश्च श्लेष्मणः स्थानानि अत्राप्युरो विशेषेण श्लेष्मस्थानम् ॥ ८ ॥

आतां तिन्ही दोषांचीं शरीरांतील निरनिराळीं स्थानें सांगतों.-बस्ति, पक्वाशय, कमर, मांड्या ( वरचा भाग ) पाय व हाडें हीं सामान्यतया वायूचीं स्थानें आहेत. त्यांतून पक्वाशय हें मुख्यस्थान आहे. घाम, रस, लाळ किंवा लस, रक्त व आमाशय हीं पित्तांचीं स्थानें आहेत. त्यापैकीं आमाशय हें मुख्य स्थान आहे. छाती, मस्तक, मान, बोटांचीं पेरें, आमाशय[1] व मेद हीं कफाचीं स्थानें आहेत. त्यांत छाती हें मुख्यस्थान आहे.

१ आमाशयाचा खालचा भाग पित्ताचें स्थान आहे व वरचा भाग कफाचें

औषधासारखें अमुक रोगावर चांगलें औषध देशी मिळत नाहीं, ह्मणून परदेशी औषधावर निर्वाह चालविला, तर जें एखादें साधारणसें देशी औषध करतां येत असेल त्याचाही नाश होऊन, सर्वथा पराधीन वृत्ति स्वीकारल्यानें देशाचा भयंकर तोटा होतो. विचार करणाराला ही स्थिति केवढी भयंकर आहे हें सांगणें नकोच, तेव्हां तीच एखाद्या वेळीं नड सोसून स्वदेशी औषध परदेशाप्रमाणें उत्तम बनविण्याचा प्रयत्न केला; किंवा आहेत त्यांचा नीट शोध लावून, आपलें अज्ञान आहे कीं काय हें पाहिलें, तर प्रयत्नानें, देशांत खऱ्या ज्ञानाची-प्रत्यक्ष फलरूपी ज्ञानाची वृद्धि होणार नाहीं काय?

फार कशाला; आज जे **परदेश** या विषयांत उच्चत्वाला पोंचले आहेत, त्यांनीं आमच्या सारखेंच दुसऱ्याच्या ओंजळीनें पाणी पिण्याचें केलें असतें, तर त्यांनीं आज जे आपल्या देशांत शोध केले आहेत ते त्यांनां कधींही लागले नसते. आह्मीं आतां विनमेहनतीचें फळ पाहूं लागलों आहों. लागलींच पैसे कसे मिळतील; तावडतोब लोकांवर छाप कशानें बसेल; भपका लौकर कशानें होईल-अशा प्रकारच्या विचारांनीं आमच्या ज्ञानाचा नाश होऊन गेला आहे; ह्मणून आह्मीं पुनः पुनः प्रार्थना करतों कीं, थोडें दूरवर लक्ष्य द्या, पायापाशीं पाहूं नका; ह्मणजे त्यांत सर्वांचें हित आहे.

हिंदुस्थानची हवा, त्याप्रमाणें प्रकृति व खाद्यपेयें-यांच्या अनुरोधानें आह्मांस देशीच औषधें हितकर आहेत हा विचार बाजूला ठेवला तरी, वरील दोन निर्विवाद कारणांसाठीं तरी देशी औषधांनां पुढें आणण्याचा प्रयत्न, आमच्या नवीन विद्वानांनीं केला पाहिजे. त्यासाठीं धर्मार्थ देशी दवाखाने काढून, त्यांत देशी औषधांचा अनुभव घेण्याची तजवीज होणें अतिशय जरूरीचें आहे.

---


**सहाशांवर वनस्पतींची सविस्तर माहिती.**

# वनौषधी-गुणादर्श.

**असें पुस्तक दुसरें कुठें निघालेंच नाहीं!**

वनस्पती ओळखण्याच्या खुणाखाणा वगैरे माहिती; निरनिराळ्या भाषेंतील नांवें; गुणदोष, व निरनिराळ्या रोगांवर तिचे उपयोग कसे होतात—असें प्रत्येक वनस्पतीचें वर्णन करून, वर्णानुक्रमानें सहा भागांत सहाशांवर वनस्पतींचा संग्रह या पुस्तकांत केलेला आहे!

सर्वसाधारण आबालवृद्धांच्या उपयोगी असा हा ग्रंथ, सरळ मराठी भाषेंत असल्यानें, त्याचा खप झपाट्यानें होऊन, दुसरी आवृत्तिही निघाली आहे. भाग १ किंमत १२ आणे; भाग २ रा १ रुपया; तिसरा १। रु.; चवथा १॥ रु.; पांचवा १। रु.; व सहावा १२ आणे. टपालहंशील शिवाय पडेल. आर्यभिषकाचे वर्गणीदारास निम्मे किंमतीस मिळेल.

---

**सिद्ध बाळकृष्ण प्रासादिक नूतन शोधक शास्त्री**
**भगवंत गोविंद तोडेवाला.**

हे गृहस्थ मोंगलाईंत पैठणास आहेत. एखाद्यास समक्ष पहातांच त्याचें भूतभविष्य व त्याचप्रमाणें पांच पिढींतील सर्व आप्तवर्गाची स्थिति व चेहरे वगैरे बरोबर सांगतात. पत्रिका नूतन पद्धतीनें निवळ मराठींत तयार करतात. यांचीं भविष्यें पूर्ण जुळल्याचे बरेच लोकांस अनुभव आले आहेत. **रेणुराव बीडकर वकील, पाथगी.**

# वैद्यकाचें ज्ञान पायाशुद्ध व सविस्तर होण्यासाठीं अत्यंत सुलभ ग्रंथसंग्रह.

निरनिराळ्या विषयांकरितां मुद्दाम स्वतंत्र ग्रंथ तयार केले आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होणारांस **निम्मी किंमत !**

**'आर्यभिषक्'** मासिकपुस्तकांत वैद्यकाचे स्वतंत्र ग्रंथ व तत्संबंधींच माहिती प्रसिद्ध होत असते. सन १८८९ च्या जुलैपासून हें एकसारखें १४ वर्षें चालू आहे. हल्लीं **वर्गणी फारच कमी**—वर्षास टपालसह फक्त सव्वा रु. केली आहे. **'भारतधर्म'** मासिकपुस्तक त्यावरोबरच मिळतें; त्याची वर्गणी ६ आणे, मिळून **टपालसुद्धां** फक्त १ रु. १० आणे. [illegible] भिषक्' घेणारांस १॥ रु. व **फक्त** 'भारतधर्म' घेणारांस ८ आणे.

## विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी. किंमतीशिवाय टपालखर्च.

| | | | |
|---|---|---|---|
| वनौषधीगुणादर्श, भाग १ ला | १२ आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान, पूर्वार्ध. | २ रु. |
| ,, भाग २ रा. | १ रु. | ,, सूत्रस्थान, उत्तरार्ध—भा. १ ला. | १॥ |
| ,, भाग ३ रा. | १। रु. | ,, निदानस्थान ... | १४ आ. |
| ,, भाग ४ था. | १॥ रु. | ,, विमानस्थान ... | १॥ रु. |
| ,, भाग ५ वा. | १। रु. | ,, इंद्रियस्थान ... | १२ आ. |
| ,, भाग ६ वा. | १२ आ. | ,, कल्पस्थान ... | १४ आ. |
| सुबोध वैद्यक, पूर्वार्ध. ... | ८ आ. | ,, सिद्धिस्थान ... | १॥ रु. |
| ,, उत्तरार्ध. ... | १ रु. | ,, चिकित्सास्थान, भाग १ ला. | १॥। रु. |
| रसवैद्य. ... ... ... | १२ आ. | नपुंसकमीमांसा व कामसंजीवन | १॥ रु. |
| बृहन्निघंटु ... ... ... | १॥ रु. | निघंटशिरोमणि, भा. १ व २ रा. | २। रु. |
| औषधीगुणदोष ... ... | १॥ रु. | आयुर्वेदरहस्य, भाग १ ला ... | १ रु. |
| गंभीरपणबाळंतपण. ... | १ रु. | सार्थ हारीतसंहिता, भाग १ ला | १। रु. |
| स्त्रीचा वीर्यनाश व त्यावर उपाय. | ३ आ. | सार्थ योगशतक ... ... | ४ आ. |
| औषधीक्रिया. ... ... | ८ आ. | सार्थ वैद्यवल्लभ ... ... | ४ आ. |
| राजवैद्य, संग्रह १ ला. ... | १२ आ. | बृहत्पाकसंग्रह ... ... | १॥ रु. |
| औषधीमानपरिभाषा. ... | १॥ आ. | नाडीपरीक्षेचें महत्व ... ... | ३ आ. |
| गोवैद्यक. ... ... ... | २ आ. | औषधीवाड ... ... ... | २ रु. |
| प्राणिज औषधी ... ... | २ आ. | सार्थ ज्वरपराजय ... ... | २ रु. |
| अश्वरोगपरिज्ञान .. ... | पाऊण आ. | त्रिदोषविचार, भाग १ ला ... | ४ आ. |
| मधुमेहनिदान ... ... | अर्धा आणा | | |

## योगशास्त्राची उत्तम माहिती होण्याचें पुस्तक.

कि. ४ आणे. **योगविज्ञान.** टपाल ०॥. आ.

ठिकाणः—प्रत्यक्ष येऊन घेणारांनीं मुंबई, कावसजी पटेल तलावाजवळ **"श्रीसयाजी औषधशाळा"** या ठिकाणीं यावें व **बाहेरगांवीं मागविणारांनीं** पुढील नांवानें व्यवहार करावा:—**आयुर्वेदमहोपाध्याय** शंकर दाजी शास्त्री पदे. मुंबई, नवानागपाडा.

'नेटिवओपिनियन' छा. छा.

के० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचे स्मारक.



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्.

अंक ७ वा.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेद[illegible]ध्याय.

मुंबई, नवा नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय

[illegible] आयु[illegible], [illegible]।
अभ्यस्य[illegible] [illegible]सापिणाम ॥—श्रीवाग्भटः।

मकरसंक्रांति —शके १८२४ पौष शु. १५ मंगळवार. ता० १३ जानेवारी, सन १९०३.

**विषयानुक्रम.**–सार्थ चरकसंहिता, सूत्रस्थान, उत्तरार्ध पृष्ठें १४५–१६८.

# आर्यभिषकाच्या वर्गणीदारांस महत्वाची सूचना.

सार्थ श्रीचरकसंहिता हा ग्रंथ भागशः निघत आहे. तो आर्यभिषकांतूनही आला आहे. परंतु **सूत्रस्थान पूर्वार्ध** आणि **उत्तरार्ध–भाग २ रा,** तसेंच **निदानस्थान** हे भाग आर्यभिषकांतून आलेले नाहींत; त्यामुळें नुसते आर्यभिषकच जे घेणारे आहेत व चरकाचे भाग घेत नाहींत अशा **जुन्या वर्गणीदारांनाही** हीं पुस्तकें मिळालीं नाहींत. ज्यांस घेणें असतील त्यांनीं **निम्मे किंमतीस मागवून घ्यावीं.**

तसेंच—चरकाची ज्या स्थानाविषयीं विशेष प्रख्याती आहे अशा चिकित्सास्थानाचेही भाग आर्यभिषकांत न येतां स्वतंत्र पुस्तकरूपानें निघणार आहेत. पैकीं पहिला भाग विक्रीस तयार आहे. किं. १॥ रु. मासिकपुस्तकांत घातल्यानें ग्रंथ पुरा होण्यास कित्येक वर्षें लागतील ह्मणून अशीं पुस्तकें काढीत आहों. हें स्थान संपल्यावर राहिलेलें '**शारीरस्थान**'ही छापण्यांत येईल. त्यांत शारीराचे सर्व देखावे देणार आहों.—**व्यवस्थापक.**

# ग्रंथिक सन्निपाताचा प्रसार.

या सांथीचा प्रसार प्रस्तुत सर्व हिंदुस्थानभर झाला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदुस्थानांत याचा प्रसार नव्हता तोही झाला आहे. कित्येक प्रांतांत तर, अगदीं खेड्यापाड्यांतूनही याचा प्रवेश झाला आहे. यंदा हा रोग, जुन्या ठिकाणीं असून, उत्पत्तीपासून (सुमारें ७ वर्षें) देखील ज्या ठिकाणीं याचा प्रवेश झाला नव्हता अशा लहानमोठ्या सर्व गांवांत याचा संचार झाला आहे, व जेथें हा नवीन आहे तेथें कल्पनातीत सहार करीत आहे! एकंदरीवरून याचा पाय हिंदुस्थानांत दिवसेंदिवस जास्त जास्त कायम होऊं लागला आहे. आमच्या धर्मसमजुतीप्रमाणें व शास्त्रीय ज्ञानाच्या शेवटच्या सिद्धान्ताप्रमाणें पाहिलें ह्मणजे हा रोग वाढण्याचें कारण, आमचेंच वर्तन झालें आहे यांत संशय नाहीं ' ईश्वर मानणारे असोत किंवा न मानणारे असोत, त्या सर्वांनां विचारांतीं हा गोष्ट कबूल केलीच पाहिजे, कीं जें कांहीं होतें तें सर्व आपल्या कृतीचेंच फळ आहे. त्याप्रमाणें पाहिलें ह्मणजे—

**प्लेगप्रसार हें आमच्याच कृतीचें फळ** आहे; आणि तें जर नको असेल, तर लोकांनीं आपली स्थिति सुधारली पाहिजे हेंच उघड आहे. त्यासाठीं आरोग्यरक्षणाची खबरदारी घेणें हें वरकरणीं दिसणारें पण प्रथम लक्ष्यांत घेण्याचें कर्तव्य आहे; ईश्वराचा धांवा करणें, दुर्गुण सोडणें, साधूंना मान देणें व निंद्य व्यसनांतून आपणास मुक्त करून घेणें हें दुसरें **पण** महत्वाचें कर्तव्य होय, आणि आपल्या देशाची स्थिति **सद्धर्मपूर्ण** राहील ह्मणून सार्वजनिक प्रयत्न करणें हा शेवटचा व चिरकालिक फल देणारा उपाय आहे. पण त्रास [illegible] गोष्ट ही आहे कीं, करावयाचे ते उपाय करण्याकडे लोकप्रवृत्ति मुळींच दिसत नाहीं ' पळापळी करणें, लोकांचीं गांठोडीं उपटण्याचा, विश्वासघात करण्याचा, व्यसनें वाढविण्याचा [illegible] सपाटा चालविणें; आणि **प्लेगची भीति दूर करण्याचा उपाय** ह्मणून दारू पिण्याचें व्यसन जास्त वाढविणें किंवा नसलें तर लावून घेणें, यापेक्षां लोकांची प्रवृत्ति खऱ्या उपायाकडे मुळींच दिसत नाहीं ! **तेव्हां सांथीचा प्रसार कमी हो-**

सर्वशरीरचरास्तु वातपित्तश्लेष्माणो हि सर्वस्मिन्शरीरे कुपिताऽकुपिताः शुभाशुभानि कुर्वन्ति–प्रकृतिभूताः शुभानि उपचयबलवर्णप्रसादादीनि अशुभानि पुनर्विकृतिमापन्नानि विकारसंज्ञकानि ॥ ९ ॥

हे वातादि तीन दोष सर्व शरीरांत संचार करितात. ते प्रकुपित झाले असतां अशुभ फल देतात ह्मणजे रोग उत्पन्न करितात आणि आपल्या स्वाभाविक स्थितींत असले ह्मणजे आरोग्यरूपी शुभफल देतात. शुभफल ह्मणजे शरीराची पुष्टी, बल, तेज आणि प्रसन्नता वगैरे होय. अशुभ फल ह्मणजे नानाप्रकारचे विकार होत.

तत्र विकाराः सामान्यजा नानात्मजाश्च तत्र सामान्यजाः पूर्वमष्टोदरीये व्याख्याताः नानात्मजास्त्विहाध्यायेऽनुव्याख्यास्यामः । तद्यथा—अशीतिर्वातविकाराश्चत्वारिंशत्पित्तविकारा विंशतिः श्लेष्मविकाराः ॥ १० ॥

रोग दोन तऱ्हेचे आहेत. एक–वातादिदोष एकमेकांशीं मिळून उत्पन्न होणारे व दुसरे–फक्त एकेकट्या दोषानेंच होणारे. त्यापैकीं पहिल्या प्रकारच्या रोगांचें प्रतिपादन मागें अष्टोदरीय अध्यायांत केलेंच आहे. या अध्यायांत फक्त एकेकट्या दोषापासून उत्पन्न होणाऱ्या रोगांचें निरूपण करूं. वातविकार ८० आहेत, पित्तविकार ४० आणि कफविकार २०.

तत्रादौ वातविकाराननुव्याख्यास्यामः । तद्यथा नखभेदश्च विपादिका च पादशूलश्च पादभ्रंशश्च सुप्तपादता च वातखुड्डुका च गुल्फग्रन्थिश्च पिण्डिकोद्वेष्टनश्च गृध्र

स्थान आहे. वाग्भटांनीं पित्ताचें मुख्यस्थान नाभि ह्मटलें आहे. परंतु त्याचा वरील विधानास बाध येत नाहीं कारण "नाभिस्तनान्तरं जन्तोरामाशय इति स्मृतः" नाभि व स्तन यांच्या मधील भाग तो आमाशय. अर्थात् आमाशयाचा अधोभाग नाभि असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सीं च जानुभेदश्च जानुविश्लेषश्च उरुस्तम्भश्च ऊरुसादश्च पाङ्गुल्यञ्च गुदभ्रंशश्च गुदार्तिश्च वृषणोत्क्षेपश्च शेफस्तम्भश्च वंक्षणानाहश्च श्रोणिभेदश्च विड्भेदश्च उदावर्तश्च खञ्जत्वञ्च कुब्जत्वञ्च वामनत्वञ्च त्रिकग्रहश्च पृष्ठग्रहश्च पार्श्वावमर्दश्च उदरावेष्टश्च हृन्मोहश्च हृद्द्रावश्च वक्षउद्घर्षश्च वक्षउपरोधश्च. बाहुशोषश्च ग्रीवास्तम्भश्च मन्यास्तम्भश्च कण्ठोध्वंसश्च हनुताडश्च ओष्ठभेदश्च दन्तभेदश्च दन्तशैथिल्यञ्च मूकत्वञ्च वाक्सङ्गश्च कषायास्यतां च मुखशोषश्च अरसज्ञता च घ्राणनाशश्च कर्णशूलञ्च अशब्दश्रवणञ्च उच्चैः श्रुतिश्च बाधिर्यञ्च वर्त्मस्तम्भश्च वर्त्मसङ्कोचश्च तिमिरश्च अक्षिशूलञ्च अक्षिव्युदासश्च भ्रूव्युदासश्च शङ्खभेदश्च ललाटभेदश्च शिरोरुक्च केशभूमिस्फुटनञ्च अर्दितञ्च एकाङ्गरोगश्च सर्वाङ्गरोगश्च पक्षवधश्च आक्षेपकश्च दण्डकश्च श्रमश्च वेपथुश्च जृम्भाच विषादश्च [illegible] पारुष्यञ्च श्यावारुणावभासता च अस्वप्नश्च अनवस्थितत्वञ्चेत्यशीतिर्वातविकारा वातविकाराणामपरिसंख्येयानामाविष्कृततमा व्याख्याताः ॥ ११ ॥

त्यांतून वातविकारांचें आरंभीं वर्णन करितों.—नखें फाटणें, पायांच्या खोटा फुटणें, पायांतील शूल, पाय घसरणें, पाय बधिर होणें, वात खुड्डुका, पायांचे घोटे धरणें, पोटऱ्या वळणें, गृध्रसींत होणारा शूल, गुडघे फुटणें, गुडघे लुले पडणें, मांड्या आंखडणें, मांड्या गळणें, पांगळेपणा, मलद्वार बाहेर येणें (Prolapsus Ani) गुदद्वारीं पीडा होणें, वृषण वर ओढले जाणें, शिस्न आखडणें, जांघाड्यांत ओढून धरल्यासार-

१ यांत आंखडण्याची क्रिया तेवढी वाताची असते. तसेंच कान व डोळ्याच्या शूळांत फक्त शूल तेवढा वातजन्य समजावा.

खी पीडा होणें, कुले फुटणें, मलभेद, मलमूत्रांचा अवरोध, कंबर वायूनें धरल्यामुळें येणारा लंगडेपणा, कुबडेपणा, ठेंगूपणा, पाठीच्या कण्याच्या खालीं ज्याठिकाणीं तीन हाडें मिळालेलीं असतात ती जागा धरणें, पाठ धरणें, बरगड्या दुखणें, उदरावेष्ट, उन्माद, छाती धडधडणें, छातींत घासल्याप्रमाणें पीडा होणें, छातींत उपरोध होणें, खांद्यांत वायु शिरून त्याचा जोड सुकवून टाकणें ( बाहुशोष ), मान जखडणें, तिरपणें, तोंड आंखडणें, ओठ फाटणें, दन्तभेद ( दांत ठणकतात, शिवशिवतात, तिडका मारतात इत्यादि ) दांत हालणें, मुकेपणा, वाचा बंद होणें, तोंडाचा स्वाद तुरट होणें, तोंडास कोरड पडणें, जिभेचें रसज्ञान नाहींसें होणें, नाकाची वास घेण्याची शक्ति नाहींशी होणें, कान ठणकणें, कानांत आवाज होणें, मोठ्यानें बोलल्यावांचून ऐकूं न येणें, बहिरेपणा, डोळ्यांच्या पापण्या स्तब्ध व संकुचित होणें, तिमिर ( कांचबिंदु ), डोळे ठणकणें, डोळे वाकडे तिकडे होणें, भोंवया फिरविणें, आंखांत व ललाटांत फाटल्यासारखी पीडा होणें, मस्तक दुखणें, मस्तकाची कातडी फुटणें, अर्दित, एकाङ्गरोग, सर्वाङ्गरोग, पक्षाघात, धनुर्वात, दण्डक, थकवा, भ्रम जांभई, विषाद, अति बडबड करणें, ग्लानि, रूक्षता, खडद्डीतपणा, शरीरावर काळसर किंवा पिंगट रंगाची झांक मारणें, झोंप न येणें, आणि चित्त चलायमान होणें हे वाताच्या असंख्य विकारांपैकीं संक्षेपतः मुख्य मुख्य अयशीं विकार सांगितले आहेत.

सर्वेष्वपि खल्वेतेषु वातविकारेषूक्तेष्वन्येषु चानुक्तेषु वायोरिदमात्मरूपमपरिणामि कर्मणश्च स्वलक्षणं यदुपलभ्य तदवयवं वा विमुक्तसन्देहा वातविकारमेवाध्यवस्यन्ति कुशलाः । तद्यथा–रौक्ष्यं लाघवं वैशद्यं शैत्यङ्गति रमूर्तत्वञ्चेति वायोरात्मरूपाणि भवन्त्येवंविधत्वाच्च कर्मणः स्वालक्षण्यमिदमस्य भवति ॥ १२ ॥

वर सांगितलेल्या वातविकारांत, त्याचप्रमाणें या ठिकाणीं न सांगितलेल्या इतर सर्व वातविकारांत, वायूचें सहजसिद्ध स्वरूप ह्मणजे पित्तकफादि दोषांचा संसर्ग न झालेलें असें स्वतंत्र व स्वाभाविक स्वरूप आणि तो विकृत झाला असतां होणारीं लक्षणें यांचा विचार करून कुशलवैद्य अमुक विकार वाताचाच आहे असें निश्चयात्मक ठरवितात. त्याचीं प्रकृत लक्षणें येणेप्रमाणें आहेत.—खरखरीतपणा, हलकेपणा, स्वच्छपणा ह्मणजे बुळबुळीतपणाचा अभाव, थंडपणा, चलनशक्ति आणि अदृश्यत्व. आतां विकृतवायूचीं लक्षणें सांगतों.

तं तं शरीरावयवमाविशतः स्रंसभ्रंशव्यासभेदसादहर्षतर्षकम्पवर्तचालतोदव्यथाचेष्टाद्यास्तथा खरपरुषाविशदसुषिरारुणवर्णकषायविरसमुखशोषशूलसुप्तिसंकुचनस्तम्भनखञ्जतादीनि वायोः कर्माणि तैरन्वितं वातविकारमेवाध्यवस्येत् ॥ १३ ॥

वायु अदृश्य आहे, असें त्याच्या लक्षणांत सांगितलें. आहे आतां अदृश्य वायूचे रूक्षतादि गुण किंवा या वाक्यांत सांगितलेलीं त्याचीं स्रंसादि कर्मे प्रत्यक्ष पहावयास कशीं मिळतील व प्रत्यक्ष पहावयास मिळत नाहींत तर हीं वायूचीं लक्षणें हें कसें ओळखणार? अशा प्रकारची शंका उठूं नये ह्मणून सांगतात कीं, शरीराच्या ज्या निरनिराळ्या अवयवांत ज्या ज्या वेळीं वायु शिरतो त्या त्या ठिकाणीं त्या त्या वेळीं पुढील क्रिया होतात. घसरणें, दूरजाणें, पसरणें, फाटणें, गळल्यासारखें वाटणें, हर्ष वाटणें, तहान लागणें, कंप सुटणें, शरीर गोलाकार होणें ( जसें धनुस्तम्भांत होतें ), फडकणें किंवा हालणें, टोंचल्यासारखें वाटणें, खरखरीतपणा, कठिणपणा ( मळाचा ) स्वच्छता, छिद्रयुक्तता, आरक्तवर्ण, तोंडाचा स्वाद तुरट होणें, तोंड बेचव होणें, तोंडास कोरड पडणें, शूल, बधिरता, संकोच, आखडणें, लंगडणें इत्यादि. ज्या रोगांत हीं लक्षणें आढळतील ते वातरोग असें समजावें.

तं मधुराम्ललवणस्निग्धोष्णैरुपक्रमेत स्नेहस्वेदास्थापनानुवासननस्तःकर्मभोजनाभ्यङ्गोत्सादनपरिषेकादिभिर्वातहरैर्मात्राकालञ्च प्रमाणीकृत्यास्थापनानुवासनन्तु खलु सर्वथोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः तदादित एव पक्वाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूलं छिनत्ति तत्रावजिते वातेऽपि शरीरान्तर्गता वातविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते यथा वनस्पतेर्मूले छिन्ने स्कन्धशाखावरोहकुसुमफलपलाशादीनां नियतो विनाशस्तद्वत् ॥ १४ ॥

वातविकारांत मधुर, आंबट, खारट, स्निग्ध व उष्ण अशा औषधांनीं चिकित्सा करावी. तसेंच वातनाशक स्नेहन, स्वेदन, आस्थापन व अनुवासन बस्ती, नस्तकर्म, वातहारक आहार, अभ्यङ्ग, स्नान, उत्सादन ( मर्दन ), परिषेक वगैरे क्रिया ऋतु व रोग्याची अवस्था पाहून पूर्वी सांगितलेल्या योग्य प्रमाणानें कराव्या. वातजन्य रोगांत आस्थापन व अनुवासन बस्तीस वैद्यलोक सर्वोत्तम चिकित्सा मानितात. कारण बस्ती हा वाताचें जें मुख्य स्थान पक्वाशय त्यांत एकदम जाऊन त्याठिकाणीं असणारें सर्व विकारांचें मूळच नाहींसें करितो. ज्याप्रमाणें वृक्षाचें एक मूळ तोडून टाकिलें असतां कांडें, फांद्या, वेली, फुलें, फळें, पानें वगैरे सर्व आपोआप खात्रीनें नाश पावतात, त्याच प्रमाणें, एक पक्वाशयांतील वात काढून टाकिला ह्मणजे सर्व शरीरांतील वातविकार स्वयं नाहींसे होतात.

पित्तविकाराः—ओषश्च प्लोषश्च दाहश्च दवथुश्च धूमकश्च विदाहश्च अन्तर्दाहश्च अंसदाहश्च उष्मण आधिक्यश्च अतिस्वेदश्च अङ्गगन्धश्च अङ्गावदरणञ्च शोणितक्लेदश्च मांसक्लेदश्च त्वग्दाहश्च मांसदाहश्च त्वङ्मांसा-

वदरणञ्च चर्मदरणञ्च रक्तकोठकाश्च रक्तविस्फोटश्च रक्तपित्तञ्च रक्तमण्डलानि च हरितत्वञ्च हारिद्रत्वञ्च नीलिका च कक्ष्या च कामला च तिक्तास्यता च पूतिमुखता च तृष्णाया आधिक्यञ्च अतृप्तिश्च आस्यविपाकश्च गलपाकश्च अक्षिपाकश्च गुदपाकश्च मेढ्रपाकश्च जीवादानञ्च तमःप्रवेशश्च हरितहारिद्रनेत्रमूत्रवर्चस्त्वञ्चेति चत्वारिंशत्पित्तविकाराः पित्तविकाराणामपरिसंख्येयानामाविष्कृततमा व्याख्याताः ॥ १९ ॥

आतां चाळीस प्रकारचे पित्तविकार सांगतों.—विस्तवाजवळ बसून शेक घेत असल्याप्रमाणें दाह होणें, विस्तवानें किंचित् भाजल्यासारखा दाह होणें, सर्वांगांत दाह होणें, शरीर धगधगणें, तोंडांतून वाफा किंवा धूर निघणें, आंबट ढेंकर येणें, हातापायाची आग होणें, अन्तर्दाह (छातींतील जळजळ), खांद्यांत आग होणें, शरीरांत उष्णता वाढणें, फार घाम येणें, अंगाची घाण येणें, शरीराचे अवयव फाटणें, रक्त व मांस नासणें, त्वचेंत दाह होणें, मांसांत दाह होणें, त्वचा व मांस फाटणें, चामडी फाटणें, लाल रंगाच्या दाद्दी उठणें, लाल रंगाचे फोड उठणें, रक्तपित्त, लाल रंगाच्या गोल चकत्या अंगावर उठणें, शरीराचा रंग हिरवा होणें, हळदीसारखा पिवळा होणें, लसें–तीळ वगैरे उठणें, काखमांजरी, कावीळ, तोंड कडू होणें, तोंडास घाण येणें, तहान फार लागणें, जेवणापासून तृप्ति न होणें, तोंड येणें, गळा सुजणें, डोळे सुजणें गुदा सुजणें, शिस्न सुजणें, जीवरक्त नांवाचें जें शरीरांत मुख्य रक्त आहे तें पडणें, डोळ्यांपुढें काळोखी येणें, आणि डोळे, मूत्र व मल यांचा रंग हिरवा किंवा पिवळा होणें हे पित्त विकाराचे चाळीस प्रकार होत. विस्तृतभेद करूं गेले असतां ते असंख्य होतील. त्यांपैकीं हे चाळीस संक्षेपांत सांगितले आहेत.

---

१ त्वचा म्हणजे फक्त बाहेरची एक कातडी आणि चर्म म्हणजे साद्दी त्वचा.

सर्वेष्वपि खल्वेतेषु पित्तविकारेष्वन्येषु चानुक्तेषु पित्तस्येदमात्मरूपमपरिणामि कर्मणश्च स्वलक्षणं यदुपलभ्य तदवयवं वा विमुक्तसन्देहाः पित्तविकारमेवाध्यवस्यन्ति कुशलास्तद्यथा औष्ण्यं तैक्ष्ण्यं लाघवमनतिस्नेहो वर्णश्च शुक्लारुणवर्जो गन्धश्च विस्रो रसौ च कटुकाम्लौ पित्तस्यात्मरूपाण्येवंविधत्वाच्च कर्मणः स्वालक्षण्यमिदमस्य भवति ॥ १६ ॥

या व याठिकाणीं न सांगितलेल्या इतर सर्व पित्तविकारांत पित्ताचें स्वाभाविक स्वरूप, तें अविकृत अवस्थेंत असतांना त्याच्या होणाऱ्या क्रिया व त्यांचीं लक्षणें हीं संपूर्णतया किंवा अंशतः पाहून त्यावरून हा पित्तविकार आहे असें कुशल वैद्य निश्चित करितात. उष्णता, तीक्ष्णता, हलकेपणा, किंचित् स्निग्धता ( रूक्ष व स्निग्ध या दरम्यानची अवस्था ) हे गुण; पांढरा व पिंगट रंगाखेरीज इतर रंग, कच्चया मांसासारखा वास; आणि कडू व आंबट हे रस—हें पित्ताचें स्वाभाविक स्वरूप आहे. तें शरीराच्या निरनिराळ्या स्थानांत प्रकुपित झालें असतां जीं कार्यें करितें त्यांचीं लक्षणें येणेप्रमाणें होतात.

तं तं शरीरावयवमाविशतो दाहौष्ण्यपाकस्वेदक्लेदकोथकण्डूस्रावरागाः यथास्वञ्च गन्धवर्णरसाभिनिर्वर्तनं पित्तस्य कर्माणि तैरन्वितं पित्तविकारमेवाध्यवस्येत् ॥ १७ ॥

ज्या ज्या अवयवांत तें जातें त्यांत दाह होतो, रक्तांत उष्णता वाढते, पाक होतो, घाम सुटतो, क्लेद होतो, तो भाग कुसतो, खाज सुटते, स्राव होतो, लाली येते, कच्चया मांसाप्रमाणें वास येतो, पांढरा व पिंगट सोडून इतर कोणताही रंग उत्पन्न होतो आणि तिखट व आंबट रस उत्पन्न होतात. ह्या सर्व कुपितपित्ताच्या क्रिया होत. ज्या विकारांत अशा प्रकारचीं लक्षणें आढळतील तो पित्तविकार समजावा.

तं मधुरतिक्तकषायशीतैरुपक्रमैरुपक्रमेत स्नेहविरेकप्रदे-

हपरिषेकाभ्यङ्गादिभिः पित्तहरैर्मात्रां कालञ्च प्रमाणीकृत्य विरेचनन्तु सर्वोपक्रमेभ्यः पित्ते प्रधानतमं मन्यन्ते भिषजस्तध्यादित एवामाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं पित्तमूलञ्चापकर्षति । तत्रावजिते पित्तेऽपि शरीरान्तर्गताः पित्तविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते यथाग्नौ व्यपोढे केवलमग्निगृहञ्च शीतीभवति तद्वत् ॥ १८ ॥

पित्तविकारांत मधुर, कडू, तुरट व थंड अशा द्रव्यांनीं चिकित्सा करावी. तसेंच पित्तहारक स्नेहन, विरेचन, उटी, परिषेचन, स्नान व इतर पित्तनाशक क्रियाही कराव्या. ऋतु व रोगाची अवस्था आणि औषधांचें प्रमाण यांचा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें विचार करून काय ते उपचार करावे. पित्तविकारांत सर्वप्रधान उपाय ह्मणजे विरेचन (जुलाब) असा वैद्यांचा सिद्धान्त आहे. कारण विरेचन हें पित्ताचें मुख्यस्थान जो आमाशय त्यांतच एकदम जाऊन त्याठिकाणीं असलेलें विकारांचें मूळ काढून टाकितें. त्यामुळें, जसें भट्टींतील अग्नि काढून टाकिला ह्मणजे भट्टी आपोआप थंड होते, त्याप्रमाणें विरेचनानें आमाशयांतील दोषकारक पित्त नाहींसें केलें ह्मणजे सर्व शरीरांतील पित्त विकार आपोआप नाश पावतात.

श्लेष्मविकारांश्च विंशतिमत ऊर्ध्वं व्याख्यास्यामस्तद्यथा तृप्तिश्च तन्द्रा च निद्राया आधिक्यञ्च स्तैमित्यञ्च गुरुगात्रता च आलस्यञ्च मुखमाधुर्यञ्च मुखस्रावश्च श्लेष्मोद्गिरणञ्च मलस्याधिक्यञ्च बलासकश्च हृदयोपलेपश्च कण्ठोपलेपश्च धमनीप्रतिचयश्च गलगण्डश्च अतिस्थौल्यञ्च शीताग्निता च उदर्दश्च श्वेतावभासता च श्वेतमूत्रनेत्रवर्चस्त्वञ्चेति विंशतिः श्लेष्मविकाराः । श्लेष्मविकाराणामपरिसंख्येयानामाविष्कृततमा व्याख्याता भवन्ति ॥ १९ ॥

आतां वीस प्रकारच्या कफविकारांची व्याख्या करितों. नेहमीं पोटभरल्याप्रमाणें वाटणें, गुंगी, फार झोंप येणें, थिम्मेपणा, अंग जड होणें, आळस, तोंड गुळमट होणें, तोंडांतून वरचेवर कफयुक्त थुंकी पडणें, कफाचे ढेंकर येणें, मळ जास्ती होणें, बलासक ( शक्ति क्षीण होणें ) हृदय, गळा व धमन्या यांत कांहीं तरी दाटल्याप्रमाणें वाटणें, गलगण्ड, अतिशय स्थूलता, मन्दाग्नि, उदर्द, फिकट दिसणें आणि डोळे, मळ व मूत्र यांचा रंग पांढरा होणें, हे वीस कफ विकार आहेत. सूक्ष्म भेदानें असंख्य प्रकार होतात त्यांपैकीं हे मुख्य वीस येथें संक्षेपानें सांगितले आहेत.

सर्वेष्वपि तु खल्वेतेषु श्लेष्मविकारेष्वन्येषु चानुक्तेषु श्लेष्मण इदमात्मरूपमपरिणामि कर्मणश्च स्वलक्षणं यदुपलभ्य तदवयवं वा विमुक्तसन्देहाः श्लेष्मविकारमेवाध्यवस्यन्ति तद्यथा–स्नेहशैत्यशौक्ल्यगौरवमाधुर्यमात्स्यानि श्लेष्मण आत्मरूपाण्येवंविधत्वाच्च कर्मणः स्वालक्षण्यमिदमस्य भवति ॥ २० ॥

या व इतर सर्व प्रकारच्या कफ विकारांत कफाचें मूळ स्वरूप आणि अविकृत कफाचीं व तो विकृत झाला असतां होणारीं लक्षणें हीं पाहून हा कफ विकार आहे असें निश्चित ठरविलें जातें. तीं लक्षणें येणे प्रमाणें—स्निग्धता, शीतता, पांढरेपणा, जडपणा, मधुरता व मृदुता हीं कफाचीं स्वाभाविक लक्षणें आहेत.

तं तं शरीरावयवमाविशतः श्वैत्यशैत्यकण्डूस्थैर्यगौरवस्नेहस्तम्भसुप्तिक्लेदोपदेहबन्धमाधुर्यचिरकारित्वानि श्लेष्मणः कर्माणि तैरन्वितं श्लेष्मविकारमेवाध्यवस्येत् ॥ २१ ॥

शरीराच्या ज्या ज्या अवयवांत प्रकुपित कफ शिरतो त्या त्या जागीं पुढील लक्षणें होतात–पांढरेपणा, शीतता, खाज, स्थिरता, जडपणा, स्नि-

ग्धता, स्तब्धता, निष्क्रियत्व ( सुप्ति ), क्लेद, चिकचिकोतपणा, अवरोध, मधुरता व सावकाशता. ज्या विकारांत हीं लक्षणें आढळतील तो कफविकार आहे असें समजावें.

तं कटुकातिक्तकषायतीक्ष्णोष्णरूक्षैरुपक्रमैरुपक्रमेत स्वेदवमनाशिरोविरेचनव्यायामादिभिः श्लेष्महरैर्मात्राकालं प्रमाणीकृत्य वमनन्तु सर्वोपक्रमेभ्यः श्लेष्माणि प्रधान तमं मन्यन्ते भिषजः । तद्ध्यादित एवामाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं श्लेष्ममूलमपकर्षति तत्रावजिते श्लेष्मण्यपि शरीरान्तर्गताः श्लेष्मविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते यथा भिन्ने केदारसेतौ शालियवषष्टिकादीन्यनभिष्यन्द्यमानान्यम्भसा प्रशोषमापद्यन्ते तद्वदिति ॥ २२ ॥

कफविकारांत तिखट, कडू, तुरट, तीव्र, उष्ण व रूक्ष अशा औषधांनीं आणि स्वेदन, वमन, शिरोविरेचन, व्यायाम वगैरे कफहारक क्रियांनीं, औषधांचें प्रमाण व ऋतु आणि रोग्याची अवस्था यांचा विचारकरून, चिकित्सा करावी. कफविकारांत सर्वोत्तम चिकित्सा ह्मणजे वमन, असा वैद्यांचा सिद्धान्त आहे. कारण वमन एकदम कफाच्या मुख्य स्थानीं ह्मणजे आमाशयांत जाऊन त्या ठिकाणीं असलेलें विकारांचें मूळ काढून टाकितें. ज्याप्रमाणें ( बागाइती ) शेतांतील वाफ्यांचा बांध तोडून रोप्यांच्या मुळांतील सर्व पाणी वाहवून टाकिलें ह्मणजे तांदूळ, जव, साठेसाळी वगैरे धान्यें आपोआप सुकून जातात, त्याप्रमाणें वमनाच्या योगें करून आमाशयांतील दोष सर्व काढून टाकिला ह्मणजे सर्व शरीरांतील विकार आपोआप नाहींसे होतात.

---

१ सुप्ति वातविकारांतही होते व कफविकारांतही होते. वातविकारांत बधिर झालेल्या अवयवाचें स्पर्शज्ञान नाहींसें होतें. आणि कफविकारांत त्या अवयवाची क्रियाशक्ति नाहींशी होते.

रोगमादौ परीक्षेत ततोऽनन्तरमौषधम् ।
ततः कर्म भिषक्पश्चाज्ज्ञानपूर्वं समाचरेत् ॥ २३ ॥
यस्तु रोगमविज्ञाय कर्माण्यारभते भिषक् ।
अप्यौषधविधानज्ञस्तस्य सिद्धिर्यदृच्छया ॥ २४ ॥
यस्तु रोगविशेषज्ञः सर्वभैषज्यकोविदः ।
देशकालप्रमाणज्ञस्तस्य सिद्धिरसंशयम् ॥ २५ ॥

रोग्याची चिकित्सा करावयाची ह्मणजे अगोदर रोगाची परीक्षा केली पाहिजे. नंतर औषधाचा विचार करावा. रोग व औषधें या दोहोंची परीक्षा करून मग अनुभवपूर्वक चिकित्सा सुरू करावी. जो वैद्य रोगाची परीक्षा केल्यावांचून चिकित्सा सुरू करितो त्यास औषधांचा विधि कितीही उत्तम प्रकारें माहित असला तरी यश मिळेलच अशी खात्री नसते. कदाचित् भाग्यानें रोगी बराही होतो. परंतु तें यश वैद्याचें नव्हे. ज्या वैद्यास रोगांची व औषधांची सर्व माहिती उत्तम प्रकारची असते आणि जो देश काल व प्रमाण हींही चांगल्या रीतीनें जाणतो त्यासच चिकित्सेंत निस्सन्देह यश मिळतें.

संग्रहः प्रकृतिर्देशो विकारमुखमीरणम् ।
असन्देहोऽनुबन्धश्च रोगाणां सम्प्रकाशितः ॥ २६ ॥
दोषस्थानानि रोगाणां गणा नानात्मजाश्च ये ।
रूपं पृथक्त्वाद्दोषाणां कर्म चापरिणामि यत् ॥ २७ ॥
पृथक्त्वेन च दोषाणां निर्दिष्टाःसमुपक्रमाः ।
सम्यङ्महति रोगाणामध्याये तत्त्वदर्शिना ॥ २८ ॥

रोगांची संक्षिप्त संख्या, त्यांचे प्रकार, त्यांचीं स्थानें आणि साक्षात् व प्रेरक कारणें तीं निस्सन्देह जाणण्याचा उपाय, निरनिराळ्या प्रकारच्या रोगांचा परस्पर संबंध, वातादि दोषांचीं स्थानें, रोगांचे निरनिराळे गण, दोषांचीं

निरनिराळीं रूपें, अविकृत दोषांचीं कार्यें आणि निरनिराळ्या दोषांची चिकित्सा इतके विषय या महारोगाध्यायांत तत्वदर्शी आत्रेय ऋषींनीं निरूपण केले आहेत.

विंशोऽध्यायः समाप्तः

---

समाप्तञ्च रोगचतुष्कम्.



# अथैकविंशोऽध्यायः

अथातोऽष्टौनिन्दितीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति ह स्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण अष्टौनिन्दितीय[1] नांवाच्या अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच बोलते झाले.

इह खलु शरीरमधिकृत्याष्टौ पुरुषा निन्दिता भवन्ति
तद्यथा-अतिदीर्घश्चातिह्रस्वश्चातिलोमा चालोमा चा-
तिकृष्णश्चातिगौरश्चातिस्थूलश्चातिकृशश्चेति ॥ २ ॥

शरीराच्या[2] संबंधानें आठ प्रकारचे मनुष्य निन्दित[3] मानले आहेत. अति उंच, अति ठेंगणा, अति केंसाळ, अंगावर मुळींच केंस नसलेला, अतिकाळा, अतिगोरा, अतिस्थूल व अति कृश[4].

---

१ प्रथम रोगचतुष्कांत रोगांचें वर्णन केलें; नंतर भेषजचतुष्कांत औषधांविषयीं निरूपण केलें. आतां रोग वर औषधांची योजना कशी करावी हें प्रतिपादन करण्याकरितां योजनाचतुष्काचा आरंभ केला आहे. औषधयोजना रोग्याच्या शरीरावर अवलंबून असते ह्मणून या अध्यायांत मनुष्याच्या शरीराचे भेद सांगून त्यांच्या चांगले वाईटपणाचें विवेचन केलें आहे. प्रथम आठ प्रकारच्या निन्दित शरीरांचें वर्णन केलें असल्यामुळें या अध्यायाचें नांव अष्टौनिन्दितीय असें ठेविलें आहे.

२ अधार्मिकता, कृपणतादि मानसिक निन्दित गोष्टींचें या ठिकाणीं निराकरण करण्याकरितां शरीरसंबंधानें असें पद घातलें आहे. ३ अशा प्रकारच्या पुरुषांचें वैरूप्य ह्याच त्यांच्या निन्दितपणाचा हेतु होय. ४ 'अतिदीर्घश्च-अतिह्रस्वश्च' यांत जो चकार आहे तो कुबडा, लुळा वगैरेचें ग्रहण करतां यावें ह्मणून घातलेला असावा किंवा त्यापैकीं दोन दोन गोष्टींचा परस्पर संकर झाला असतां तो मनुष्य आणखी वि-

तत्रातिस्थूलकृशयोर्भूय एवापरे निन्दितविशेषा भवन्ति। अतिस्थूलस्य तावदायुषो ऱ्हासो जरोपरोधः कृच्छ्रव्यवायता दौर्बल्यं दौर्गन्ध्यं स्वेदाबाधः क्षुदतिमात्रं पिपासातियोगश्चेति भवन्त्यष्टौ दोषाः। तदतिस्थौल्यमतिसम्पूरणाद्गुरुमधुरशीतस्निग्धोपयोगादव्यायामादव्यवायाद्दिवास्वप्नाद्धर्षनित्यत्वादचिन्तनत्वाद्बीजस्वभावाच्चोपजायन्ते तस्य हि अतिमात्रं मेदस्विनो मेद एवोपचीयते न तथेतरे धातवस्तस्मादस्यायुषो ह्रासः शैथिल्यात्सौकुमार्याद्गुरुत्वाच्च मेदसो जरोपरोधः शुक्राबहुत्वान्मेदसाऽऽवृतमार्गत्वात्कृच्छ्रव्यवायता दौर्बल्यमसमत्वाद्धातूनां दौर्गन्ध्यं मेदोदोषान्मेदसःस्वभावात्स्वेदलत्वाच्च मेदसः श्लेष्मसंसर्गाद्विष्यान्दत्वाद्बहुत्वाद्गुरुत्वाव्यायामासहत्वाच्च स्वेदाबाधस्तीक्ष्णाग्नित्वात्प्रभूतकोष्ठवायुत्वाच्च क्षुदतिमात्रश्च पिपासाऽतियोगश्चेति ॥ ३ ॥

त्या सर्वांत अतिस्थूळ व अति कृश या दोन प्रकारच्या मनुष्यांत अहितकारक किंवा निन्दित गोष्टी विशेष असतात. अतिस्थूल मनुष्य अल्पायुषी असतो, त्यास म्हातारपण लवकर येतें, स्त्रीसंभोगांत कष्ट होतात, तो अशक्त असतो, त्याच्या अंगास घाण येते, घाम फार सुटतो, आणि भूक व तहान फार लागते. मनुष्य पुढील कारणांनीं अतिस्थूळ होतो. अतिशय खाणें, जड, मिष्ट, थंड व स्निग्ध आहार अतिशय करणें, परिश्रम न करणें, स्त्रीसंग न करणें, दिवसा निजणें, नेहमीं चैनींत असणें, चिंता किंवा काळजी कांहीं नसणें आणि आइबाप स्थूळ असणें; इतक्या कारणांनीं मनुष्य अति स्थूळ होतो. स्थूळ मनु-

शेष निन्दित समजला जावा याकरितां योजलेला असावा. जसें अतिउंच किंवा अति ठेंगण्या मनुष्याच्या अंगावर फार केस असले तर तो नुसत्या उंच किंवा ठेंगण्या मनुष्याच्या पेक्षांही अधिक निन्दित समजला जावा.

त्याच्या सर्व शरीरांत अतिशय मेद भरलेला असल्यामुळें, तो जे जे आहारादिक करतो त्यानें मेदच वाढतो. रसरक्तादि इतर सर्व धातु मेदानें दबले जात असल्यामुळें, त्यांस वाढण्यास जागा मिळत नाहीं. अर्थात् धातु विषम होऊन त्यापासून आयुष्याचा क्षय होतो; मेद शिथिल, नाजुक व जड असल्यामुळें अतिस्थूळ मनुष्यास अकालीं म्हाता- रपण येतें; त्याच्या शरीरांत वीर्य कमी असतें व त्याचा मार्ग मेदानें भरून गेलेला असतो; त्यामुळें स्त्रीसंभोगकालीं त्रास होतो. धातु विषम झाल्यानें अशक्तता सहजच होते; मेद दूषित झाला ह्मणजे अंगास घाण येते, मेद स्वाभाविकही दुर्गन्धियुक्तच आहे आणि मेदस्वी मनु- ष्यास घाम फार येतो ह्मणून त्यायोगानेंही अंगास घाण येते—या तीन कारणांनीं स्थूळ मनुष्याच्या अंगास दुर्गंध येतो; मेदाशीं कफाचा संसर्ग झाल्यामुळें, मेदांत स्वभावतः स्वेदोत्पादक धर्म असल्यामुळें, स्थूळ मनु- ष्यांत मेद अधिक असल्यामुळें आणि तो जड असल्यामुळें त्यास परि- श्रम सहन होत नसल्या कारणानें, अति स्थूळ मनुष्यास अतिशय घाम येतो; अति स्थूळ मनुष्याचा अग्नि फार कडक असल्यामुळें आणि त्याच्या कोठ्यात वायु फार राहत असल्यामुळें त्यास भूक व तहान अतिशय लागते.

भवन्ति चात्र

मेदसावृतमार्गत्वाद्वायुः कोष्ठे विशेषतः ।
चरन्सन्धुक्षयत्यग्निमाहारं शोषयत्यपि ॥ ४ ॥
तस्मात्स शीघ्रञ्जरयत्याहारं चातिकाङ्क्षति ।
विकारांश्चाश्नुते घोरान्कांश्चित्कालव्यतिक्रमात् ॥ ५ ॥
एतावुपद्रवकरौ विशेषादग्निमारुतौ ।
एतौ हि दहतः स्थूलं वनदावो वनं यथा ॥ ६ ॥
मेदस्याति च संवृद्धे सहसैवानिलादयः ।
विकारान्दारुणान्कृत्वा नाशयन्त्याशु जीवितम् ॥ ७ ॥

अति स्थूळ मनुष्याच्या शरीरांत वायूचे मार्ग मेदानें बंद झाले ह्मणजे तो वायु त्याच्या कोठ्यांतच विशेष जोरानें संचार करून अग्नि प्रदीप्त करितो व अन्नाचें शोषणही करितो. त्यायोगानें त्यानें खाल्लेलें अन्न लवकर जिरून त्यास अतिशय भूक लागते. ती इतकी प्रबल असते कीं, जेवणास यत्किंचितही उशीर झाला तर त्यापासून त्यास अनेक प्रकारचे विकट विकार उत्पन्न होतात. याप्रमाणें स्थूल मनुष्यास अग्नि व वायु हेच विशेषेंकरून उपद्रव करितात. अरण्यांत लागलेला अग्नि ज्याप्रमाणें सगळ्या अरण्यास जाळून फस्त करितो त्याप्रमाणें हे अग्नि व वायु स्थूळ मनुष्यास जाळतात. मेद अतिशय वाढला असतां वातादिदोष एकाएकीं वाढून त्यापासून (प्रमेह–पिडका–ज्वर–भगन्दर–विद्रधि-वगैरे) दारुण रोग उत्पन्न होतात व तत्काल रोग्याचे प्राण हरण करितात.

मेदोमांसातिवृद्धत्वाच्चलस्फिगुदरस्तनः ।
अयथोपचयोत्साहो नरोऽतिस्थूल उच्यते ॥ ८ ॥
इति मेदस्विनो दोषा हेतवो रूपमेव च ।
निर्दिष्टं वक्ष्यते वाच्यमतिकार्श्येऽप्यतःपरम् ॥ ९ ॥

ज्याचे मेद व मांस हे अतिशय वाढून, कुले, पोट व स्तन थलथल हालतात व ज्याच्या अंगीं शरीराच्या आकारा प्रमाणें शक्ति नसते, त्या मनुष्यास अति स्थूळ ह्मणतात. याप्रमाणें हे मेदस्वी अर्थात् अति स्थूळ मनुष्याच्या आंगचे दोष, त्यांचीं कारणें व त्यांचें स्वरूप सांगितलें. आतां पुढें अतिकृश मनुष्याचे दोष सांगतों.

सेवा रूक्षान्नपानानां लङ्घनं प्रमिताशनम् ।
क्रियातियोगः शोकश्च वेगनिद्राविनिग्रहः ॥ १० ॥
रूक्षस्योद्वर्तनं स्नानस्याभ्यासः प्रकृतिर्जरा ।
विकारानुशयः क्रोधः कुर्वन्त्यति कृशं नरम् ॥ ११ ॥

रूक्ष अशा खाण्यापिण्याच्या पदार्थांचा उपयोग करणें, लंघन, थोडें खाणें, वमनविरेचनादि क्रियांचा अतियोग होणें, शोक करणें, मळमूत्र थांबविणें, जागरण करणें, रूक्ष द्रव्यांचें उटणें अंगास लावून स्नान करणें, आईबाप अतिकृश असणें, म्हातारपण, रोगानें शक्ति क्षीण होऊन त्याची ( रोगाची ) कसर अंगांत राहणें आणि क्रोध या कारणांनीं मनुष्य अतिकृश होतो.

व्यायाममतिसौहित्यं क्षुत्पिपासामहौषधम् ।
कृशो न सहते तद्वदतिशीतोष्णमैथुनम् ॥ १२ ॥
प्लीहा कासः क्षयः श्वासो गुल्मार्शांस्युदराणि च ।
कृशं प्रायोऽभिधावन्ति रोगाश्च ग्रहणीगताः ॥ १३ ॥

कृश मनुष्यास परिश्रम, अतिशय पोट भरून खाणें, भूक, तहान, जोरदार औषध; तसेंच—अतिशय थंडी, अतिशय उष्णता आणि अतिमैथुन हीं सहन होत नाहींत. प्लीहा, खोकला, क्षय, दमा, गुल्म, मुळव्याध, उदररोग आणि अतीसारादि ग्रहणीचे रोग हे बहुत करून कृश मनुष्याच्या मागें असावयाचेच.

शुष्कस्फिगुदरग्रीवो धमनीजालसन्ततः ।
त्वगस्थिशेषोऽतिकृशः स्थूलपर्वा नरो मतः ॥ १४ ॥

ज्याचे कुले, पोट व मान हीं सुकून जातात, शरीरांतील सर्व शिरा फुगतात, मांस नाहींसें होऊन फक्त त्वचा व हाडें दिसूं लागतात आणि ज्याच्या बोटाचीं पेरें व हाडांचे सांधे, ( गुडघे, घोटे वगैरे ) इतर भागापेक्षां मोठे दिसूं लागतात त्या मनुष्यास अति कृश म्हणतात.

सततव्याधितावेतावतिस्थूलकृशौ नरौ ।
सततं चोपचर्यौ हि कर्षणैर्बृंहणैरपि ॥ १५ ॥
स्थौल्यकार्श्ये वरं कार्श्यं समोपकरणौ हि तौ ।
यद्युभौ व्याधिरागच्छेत्स्थूलमेवातिपीडयेत् ॥ १६ ॥

स्थूल व कृश हे दोन्ही प्रकारचे मनुष्य नेहमीं रोगग्रस्त असतात; ह्मणून नेहमीं स्थूल मनुष्यास लंघन व कृश मनुष्यास बृंहणद्वारा त्यांचे उपचार करीत असावें. स्थूलता व कृशता या दोहोंच्या दोषांची परस्पर तुलना करून पाहिली असतां कृशता ही स्थूलतेपेक्षां चांगली ठरते. कारण जरी दोहोंचें चिकित्साविधान सारखेंच असतें व दोघेही चिकित्स्यत्वानें सारखेच आहेत, तथापि एकच रोग दोघांस झाला असतां त्यापासून स्थूल मनुष्यास कृशमनुष्यापेक्षां विशेष त्रास होतो.

**सममांसप्रमाणस्तु समसंहननो नरः ।**
**दृढेन्द्रियत्वाद्व्याधीनां न बलेनाभिभूयते ॥ १७ ॥**
**क्षुत्पिपासातपसहः शीतव्यायामसंसहः ।**
**समपक्ता समजरः सममांसचयो मतः ॥ १८ ॥**

ज्याचें शरीर सारख्या प्रमाणानें वाढलेलें असतें व ज्याच्या अंगाची ठेवण सारखी असते त्याचीं सर्व इंद्रियें बळकट असतात. त्यामुळें रोगांचा जोर त्याच्यावर चालत नाहीं. असा मनुष्य भूक, तहान, ऊन, थंडी व परिश्रम हीं सहन करूं शकतो; त्याचा जठराग्नि नेहमीं एकसारख्या स्थितींत असतो व त्यास वार्धक्यही अकालीं येत नाहीं.

**गुरु चातर्पणं चेष्टं स्थूलानां कर्षणंप्रति ।**
**कृशानां बृंहणार्थं च लघु सन्तर्पणञ्च यत् ॥ १९ ॥**

स्थूल मनुष्यांस कृश करण्याकरितां जड व अतृप्तिकारक (लंघन) असे पदार्थ खावयास द्यावे आणि कृश मनुष्यास पुष्ट करण्याकरितां हलके व सन्तर्पण पदार्थ द्यावे.

---

१ उदाहरणार्थ मध घ्या; तो जड असल्यामुळें स्थूल मनुष्याच्या फार वाढलेल्या जठराग्नीस बेतावर आणतो आणि अतर्पकस्वभावामुळें मेदाचा नाश करितो. तसेंच कृश मनुष्यास हलके व तर्पण पदार्थ द्यावे; ह्मणजे त्यांच्या हलकेपणानें त्याचा अग्नि प्रदीप्त होईल व सन्तर्पण द्रव्यांनीं पुष्टि येईल. हा विधि सर्व श्रेष्ठ आहे. परंतु

वातघ्नान्यन्नपानानि श्लेष्ममेदोहराणि च ।
रूक्षोष्णा बस्तयस्तीक्ष्णा रूक्षाण्युद्वर्तनानि च ॥ २[redacted]
गुडूचीभद्रमुस्तानां प्रयोगस्त्रैफलस्तथा ।
तक्रारिष्टप्रयोगस्तु प्रयोगो माक्षिकस्य च ॥ २१ ॥
विडङ्गं नागरं क्षारं काललोहरजो मधु ।
यवामलकचूर्णञ्च प्रयोगः श्रेष्ठ उच्यते ॥ २२ ॥
बिल्वादि पञ्चमूलस्य प्रयोगः क्षौद्रसंयुतः ।
शिलाजतुप्रयोगस्तु साग्निमन्थरसः परः ॥ २३ ॥
प्रशातिकाःप्रियङ्गुश्च श्यामाका यवका यवाः ।
जूर्णाह्वाः कोद्रवा मुद्गाः कुलत्थाश्चक्रमुद्गकाः ॥ २४ ॥
आढकीनाञ्च बीजानि पटोलामलकैःसह ।
भोजनार्थं प्रयोज्यानि पानञ्चानुमधूदकम् ॥ २५ ॥
अरिष्टाँश्चानुपानार्थे मेदोमांसकफापहान् ।
अतिस्थौल्यविनाशाय संविभज्य प्रयोजयेत् ॥ २६ ॥
प्रजागरं व्यवायञ्च व्यायामं चिन्तनानि च ।
स्थौल्यमिच्छन्परित्यक्तुं क्रमेणाभिप्रवर्धयेत् ॥ २७ ॥

अतिस्थूलपणा नाहींसा करण्याकरितां पुढें लिहिलेल्या उपायांची योजना करावी. वातहारक आणि कफ व मेद नाशक खाण्यापिण्याच्या पदार्थांचा उपयोग करावा. रूक्ष, उष्ण व तीव्र बस्ती द्यावे. रूक्ष उटणीं अंगास लावून मर्दन करावें. गुळवेल व नागरमोथ्याचा

पुढें स्थूल मनुष्यासच देवभात कांगवगैरे हलके व अतर्पण पदार्थ द्यावे आणि कृशमनुष्यास नवें धान्य, नवें मद्य वगैरे जड व सन्तर्पण पदार्थ द्यावे असें सांगितलें आहे तेंही करण्यास प्रत्यवाय नाहीं. मात्र त्या त्या पदार्थांचें स्वाभाविक लाघव गौरव त्या त्या संस्कारांनीं इष्ट असेल तसें बदलून घ्यावें. लाघव गौरव बदलण्यास कोणकोणत्या द्रव्यावर कोण कोणते संस्कार करावे लागतात याचें विवेचन पुढें याच स्थानाच्या २७ व्या अध्यायांत केलें आहे तें पहावें.

काढा किंवा त्रिफळ्याचा काढा द्यावा अथवा तक्रारिष्ट व मध यांचा उपयोग करावा. वावाडिंग, सुंठ, यवक्षार, कांतलोहभस्म, मध आणि जव व आंवळकाठीचें चूर्ण या सर्वांचा प्रयोगही उत्तम आहे. बेलमूळ, शिवणमूळ, ऐरणमूळ, पाडळमूळ व टेंटूमूळ यांच्या काढ्यांत मध टाकून तो घ्यावा किंवा शिलाजेत व नरवेलीचा रस घ्यावा. प्रशातिका (तांबडें नीवारधान्य), कांग, सांवे, क्षुद्रजव, जव, देवभात, हरीक, मूग, कुळीथ, ऋषिमूग व तुरीचीडाळ हीं परवर व आंवळे यांच्या काढ्यांबरोबर द्यावीं आणि त्यावर मधपाणी प्यावयास द्यावें. त्याचप्रमाणें मेद, मांस व कफ हरण करणारीं अरिष्टेंही अनुपानास द्यावीं. ज्यास स्थूलता अगदीं टाकून कृश व्हावयाचें असेल त्यानें रात्रीचें जागरण, मैथुन, परिश्रम व चिंता क्रमाक्रमानें वाढवीत जावीं.

स्वप्नो हर्षः सुखा शय्या मनसो निर्वृतिः शमः।
चिन्ताव्यवायव्यायामविरामः प्रियदर्शनम् ॥ २८ ॥
नवान्नानि नवं मद्यं ग्राम्यानूपौदका रसाः।
संस्कृतानि च मांसानि दधि सर्पिः पयांसि च ॥ २९ ॥
इक्षवः शालयो मांसा गोधूमा गुडवैकृतम्।
बस्तयः स्निग्धमधुरास्तैलाभ्यङ्गश्च सर्वदा ॥ ३० ॥
स्निग्धमुद्वर्तनं स्नानं गन्धमाल्यनिषेवणम्।
शुक्लवासो यथाकाल दोषाणामवसेचनम् ॥ ३१ ॥

---

१ मधाचा जागो जागीं पुष्टिकारक प्रयोगांत उपयोग सांगितला असल्यामुळें तो वृष्यच आहे असें समजूं नये. कारण वस्तुगत्या मध योगवाही आहे वृष्य द्रव्यांबरोबर योजिला असतां तो बृंहण करितो व लेखनकारक औषधांबरोबर दिला असतां लेखन करितो. स्वरूपतः देखील रूक्षादि गुणांमुळें तो स्थूलता हरण करणारा आहे. "नानाद्रव्यात्मकत्वाच्च योगवाहि परं मधु" असें प्रमाण आहे २ वावडिंगादि द्रव्यांत गौरव नसूनही प्रभावामुळें तीं स्थूलता दूर करितात.

रसायनानां वृष्याणां योगानामुपसेवनम् ।
हरत्यातिकार्श्यमादत्ते नृणामुपचयं परम् ॥ ३२ ॥
अचिन्तनाच्च कार्याणां ध्रुवं सन्तर्पणेन च ।
स्वप्नप्रसङ्गाच्च नरो वराह इव पुष्यति ॥ ३३ ॥

दिवसा व रात्रीं निजणें, नेहमीं आनंदांत असणें, उत्तम प्रकारच्या मऊ व सुखदायक बिछान्यांवर निजणें, मन स्वस्थ ठेवणें, शांति बाळगणें (क्रोध न करणें), काळजी, स्त्रीसंग व परिश्रम सोडून देणें आणि प्रिय वस्तु व प्रिय मनुष्यांस भेटणें इतक्या गोष्टी पुष्ट होऊं इच्छिणाऱ्या मनुष्यानें केल्या पाहिजेत. त्यास नवीन धान्य, नवीन मद्य, ग्राम्य, आनूप व जळचर पशुपक्ष्यांचा मांसरस, चांगल्या रीतीनें तयार केलेली मांसें, दहीं, तूप, दूध, भात, मांस आणि गव्हांचे व गुळाचे पदार्थ हे द्यावे. नेहमीं स्निग्ध व मधुरगणांत सांगितलेल्या औषधांनीं तयार केलेले बस्ती द्यावे; अंगास तैल मर्दन करावें, स्निग्ध उटणीं अंगास लावून स्नान घालावें; अंगास सुगंधी द्रव्यें लावावीं; गळ्यात सुगंधि पुष्पांच्या माळा घालाव्या; स्वच्छ वस्त्रें धारण करावीं; योग्य काळीं वमनविरेचनाच्या द्वारा शरीराचें शोधन करावें आणि रसायनें व बृंहण करणारीं औषधें सेवन करावीं. या उपचारांनीं अतिकृशता नाहींशी होऊन मनुष्य उत्तम प्रकारें पुष्ट होतो. कोणत्याही कामाची काळजी नसणें, उत्तम प्रकारचे पौष्टिक आहार सेवन करणें आणि नेहमीं अतिशय निजणें या तीन गोष्टींनीं मनुष्य डुकराप्रमाणें हृष्टपुष्ट होतो.

यदा तु मनसि क्लान्ते कर्मात्मानः क्लमान्विताः ।
विषयेभ्यो निवर्तन्ते तदा स्वपिति मानवः ॥ ३४ ॥

वर स्थूलता व कृशता यांची जी चिकित्सा सांगितली तींत झोंपेस बरेंच महत्व दिलें आहे. ह्मणून आतां झोंपेविषयीं सविस्तर निरूपण करितातः—मन ह्मणजे अंतःकरण किंवा मनोयुक्त आत्मा निष्क्रिय झाला

ह्मणजे तदधीन इंद्रियेंही क्रियारहित होतात अर्थात् आपापले शद्बस्पर्शादि विषय ग्रहण करीनासे होतात. याप्रमाणें मन व शरीर क्रियाशून्य झालें ह्मणजे मनुष्यास झोंप लागते.

निद्रायत्तं सुखं दुःखं पुष्टिः कार्श्यं बलाबलम् ।
वृषता क्लीवता ज्ञानमज्ञानं जीवितं न च ॥ ३५ ॥
अकालेऽतिप्रसङ्गाच्च न च निद्रा निषेविता ।
सुखायुषी पराकुर्यात्कालरात्रिरिवापरा ॥ ३६ ॥
सैव युक्ता पुनर्युङ्क्ते निद्रा देहं सुखायुषा ।
पुरुषं योगिनं सिद्ध्या सत्या बुद्धिरिवागता ॥ ३७ ॥

मनुष्याचें सुख, दुःख, पुष्टि, कृशता, शक्ति. अशक्तता, पुरुषत्व, नपुंसकत्व, ज्ञान, अज्ञान, फार तर काय जीवन व मरण हें देखील सर्व झोंपेच्या आधीन आहे. ती झोंप जर अवेळीं ह्मणजे दिवसा वगैरे घेतली, अतिशय घेतली किंवा मुळींच न घेतली तर त्यापासून, ज्याप्रमाणें काळरात्र मनुष्यांचा नाश करिते त्याप्रमाणें, त्याच्या आरोग्य व आयुष्याचा नाश होतो. परंतु तीच झोंप योग्य काळीं व योग्य प्रमाणांत घेतल्यास, ज्याप्रमाणें योगिजनांस सिद्धिद्वारा तत्वज्ञान प्राप्त होतें तद्वत् त्यापासून मनुष्यांस आरोग्य व आयुष्य प्राप्त होतें.

गीताध्ययनमद्यस्त्रीकर्मभाराध्वकर्षिताः ।
अजीर्णिनः क्षतक्षीणा वृद्धा बालास्तथाऽबलाः ॥ ३८ ॥
तृष्णातीसारशूलार्ताः श्वासिनो हिक्किनः कृशाः ।
पतिताभिहतोन्मत्ताः क्लान्ता यानप्रजागरैः ॥ ३९ ॥
क्रोधशोकभयक्लान्ता दिवास्वप्नोचिताश्च ये ।
सर्व एते दिवा स्वप्नं सेवेरन्सार्वकालिकम् ॥ ४० ॥
धातुसाम्यन्तथा ह्येषां बलञ्चाप्युपजायते ।
श्लेष्मा पुष्णाति चाङ्गानि स्थैर्यं भवति चायुषः ॥ ४१ ॥

वर दिवसा निजण्याचा जो सामान्य निषेध केला आहे त्यास आतां अपवाद सांगतातः—गाणें, विद्याभ्यास, मद्यपान, स्त्रीसंग, वमनविरेचनादिकर्में, बोजा वाहणें व मार्ग चालणें या कारणांनीं थकून गेलेल्या मनुष्यांनीं सर्व ऋतूंत दिवसा निजावें. तसेंच अजीर्ण झालेले, क्षयी, म्हातारे, मुलें व अशक्त मनुष्यांनींही वाटेल त्या ऋतूंत दिवसा निजावें. त्याचप्रमाणें, तृषार्त, अतिसार झालेले, शूलरोगी, दमेकरी, उचकी लागलेले, कृश झालेले, पडलेले, घाव लागलले, उन्माद रोगी, प्रवास व जागरणानें थकलेले, राग, शोक व भयानें त्रासलेले व ज्यांस दिवसा निजण्याची सवय आहे असे,—या सर्व लोकांनीं सर्व ऋतूंत दिवसा निजावें. उक्त प्रकारचे लोक दिवसा निजले असतां, त्यांचे विषम झालेले धातु समानावस्थेंत येतात, अंगीं शक्ति येते, कफ वाढून शरीराचे अवयव बळकट होतात आणि आयुष्यही कायम राहतें *

ग्रीष्मे चादानरूक्षाणां वर्धमाने च मारुते ।
रात्राणां चातिसङ्क्षेपाद्दिवा स्वप्नः प्रशस्यते ॥ ४२ ॥

---

* गायन वगैरेच्या योगानें थकलेल्या मनुष्यांनीं दिवसा झोंप घेतल्यानें त्यांची धातु पुष्ट होते. अतिसारांत दिवसा निजल्यानें गुण होतो हा त्या रोगाचा प्रभाव आहे. अजीर्णांत दिवसा निजल्यानें स्रोतसांचा अवरोध होऊन अग्निबल वाढतें आणि त्या योगानें अपक्व आहार लवकर पचतो. ज्यांस दिवसा निजण्याची संवय जडलेली असते. त्यांनीं ती एकाएकीं मोडल्यास त्यापासून अवश्य अपाय होईल. रात्रीं जागरण करणारांनीं त्या जागरणापासून झालेल्या वाताचा क्षोभ शांत करिण्याकरितां दिवसा निजावें परंतु तें यथाप्रमाण निजलें पाहिजे. तें प्रमाण क्षारपाणींनीं असें सांगितलें आहे कीं, " यावत्कालं न सुप्तः स्याद्रात्रौ स्वप्नाद्यथोचितात् । ततोऽर्द्धमात्रं तत्कालं दिवा स्वप्नो विधीयते " म्हणजे रात्रीं निजावयाच्या वेळेपैकीं जितका वेळ जागरण झालें असेल त्यावेळेच्या अर्ध्यानें दुसऱ्या दिवशीं दिवसा निजावें. उदाहरणार्थ—रात्रीं आठ तास झोंप घ्यावयाची असून त्यांतून चार तास जागरण झालें तर दुसऱ्या दिवशीं त्याच्या निम्मे दोन तास निजावें. दिवसा निजावयाचें तें जेवणापूर्वीं निजावें. हारीतांनीं सांगितलेंच आहे कीं, 'भुक्त्वा स्वप्नं न सेवेत स्वस्थोऽप्यसुखितो भवेत्' । अन्यत्रही ' नराश्चिरशानान्कामं दिवा स्वापयेत् ' असें प्रमाण आहे.

ग्रीष्मवर्ज्येषु कालेषु दिवा स्वप्नात्प्रकुप्यतः ।
श्लेष्मपित्ते दिवास्वप्नात्तस्मात्तेषु न शस्यते ॥ ४३ ॥
मेदस्विनः स्नेहनित्याः श्लेष्मलाः श्लेष्मरोगिणः ।
दूषीविषार्ताश्च दिवा न शयीरन्कदाचन ॥ ४४ ॥
हलीमकः शिरःशूलं स्तैमित्यं गुरुगात्रता ।
अङ्गमर्दोऽग्निनाशश्च प्रलेपो हृदयस्य च ॥ ४५ ॥
शोफारोचकहृल्लासपीनसार्धावभेदकाः ।
कोठोरुः पिडकाः कण्डूस्तन्द्रा कासो गलामयाः ॥ ४६ ॥
स्मृतिबुद्धिप्रमोहश्च संरोधः स्रोतसां ज्वरः ।
इन्द्रियाणामसामर्थ्यं विषवेगप्रवर्तनम् ॥ ४७ ॥
भवेन्नृणां दिवास्वप्नस्याहितस्य निषेवणात् ।
तस्माद्धिताहितं स्वप्नं बुद्ध्वा स्वप्यात्सुखं बुधः ॥ ४८ ॥

ग्रीष्म ऋतूंत मनुष्याचें शरीर रूक्ष होतें व त्यामुळें वायु वाढतो. शिवाय रात्रीही लहान असल्यामुळें झोंप कमी मिळते; ह्मणून त्या ऋतूंत दिवसा निजणें प्रशस्त असतें. ग्रीष्म ऋतु वेगीज करून इतर ऋतूंत दिवसा निजल्यानें कफ व पित्त प्रकुपित होतात ह्मणून इतर ऋतूंत दिवसा निजणें निषिद्ध आहे. स्थूल मनुष्य, नेहमीं स्निग्धोपचारांचें सेवन करणारे, कफप्रकृतीचे, कफरोगी व दूषित विषार चढलेले, अशा लोकांनीं ग्रीष्म ऋतूंत देखील दिवसा निजूं नये. ज्यांस दिवसा निजणें निषिद्ध सांगितलें आहे त्यांनीं दिवसा झोंप घेतल्यास हलीमक, कावीळ, डोकें दुखणें, सुस्ती, अंग जड होणें, अंग मोडणें, अग्नि मंदावणें, छातींत कफ दाटणें, सूज, अरुची, मळमळ, पडसें, अर्धशिशी, शीतपित्त, क्षतव्रण, पुटकुळ्या, खाज, गुंगी, खोकला, घशांतील रोग, स्मृतिभ्रंश, बुद्धिभ्रम, स्रोतसांचा अवरोध, ज्वर, हातपाय गळणें व विषार चढलेल्यांस त्याचे वेग येणें—हे विकार होतात. ह्मणून शहाण्या मनुष्यानें निषिद्ध

**ण्याची तर आशाच नको;** पण आणखी नव्या सांथी मात्र हिंदुस्थानांत न येवोत ह्मणजे मिळविलें अशी भीति दिसूं लागली आहे. पृथ्वीभर आतां नव्या नव्या सांथी उत्पन्न होत आहेत व 'प्याथी'ही पिकत आहेत; तेव्हां मृत्युलोकचा दरबार "नानायोनिसमुत्पन्नाः क्रियन्ते पापकर्मभिः" या वाक्याप्रमाणें तंतोतंत होणार हें स्पष्ट दिसतें आहे. हरीच्छा!

या संकटांतून सोडविणारा व सुटण्याची बुद्धि देणारा परमेश्वर आहे; त्याची प्रार्थना करणें एवढेंच आपल्या हातीं उरलें आहे.

**वैद्यकदृष्टीनें** या बाबतींत औषधांसहित मिळविलेल्या अनुभवांचें पुस्तक आह्मी काढलें होतें, त्यानी सुधारलेली दुसरी आवृत्ति छापत आहे. तें येत्या महिन्याच्या अखेरीस तयार होईल. किंमत ६ आणे, टपाल शिवाय.

---

## प्लेग-इनाक्युलेशन.

डॉ. जे. एच्. थॉर्नटन, सी. बी., एम्. बी., बी. ए., फेलो किंग्स-कॉलेज-लंडन; डेप्युटी सर्जन जनरल आय्. एम्. एस्. (रिटायर्ड) यांजकडून प्लेग इनॉक्युलेशनसंबंधीं एक पत्र, ता. १२ डिसेंबर १९०२ चें आमच्याकडे आलेलें आहे. त्याचा आशय पुढीलप्रमाणें आहेः "नुक्तीच टाइम्स पत्रांत अशी हकीकत प्रसिद्ध झाली आहे कीं, पंजाबांत कांहीं दिवसांपासून जारीनें चालू असलेलें प्लेग इनॉक्युलेशन, त्यापासून बरींच माणसें मरण पावल्याकारणानें हल्लीं बंद ठेविलें आहे. यावरून, नुक्तीच हिंदुस्थानच्या स्टेट सेक्रेटरींना इनॉक्युलेशनच्या अशा तऱ्हेच्या भयंकर परिणामांविषयीं मीं जी सूचना केली होती तिची रास्तता स्पष्ट सिद्ध होत आहे. यावरून तरी आतां, हिंदुस्थानच्या गरीब प्रजेवर होत असलेले हे भयंकर प्रयोग बंद करण्यांत येतील व शास्त्रज्ञ आणि तत्ववेत्ते ह्मणविणारांच्या असल्या बेपर्वाईच्या व निर्मूल प्रयोगांस आळा पडेल अशी आशा करितों." आमचा या बाबतींतील अनुभव याच प्रकारचा असल्याचें, **ग्रंथिकसन्निपात** पुस्तकांत सविस्तर लिहिलें आहेच. आलेलें पत्र, याखालीं इंग्रजींत देत आहों.—

## PLAGUE INOCULATION.

SIR,

A statement has appeared in the "Times" to the effect that the anti-plague inoculations in the Punjab have been suspended in consequence of many deaths having occurred from them. My recent warning against these inoculations addressed to the Secretary of State for India, has thus been fully justified and it is to be hoped that these empirical and dangerous operations will now be countermanded, and pseudo-scientists prevented in future from making their reckless and unjustifiable experiments upon the helpless population of India.

Yours faithfully,

11, WILBURY AVENUE,
HOVE, SUSSEX,
*12th December, 1902.*

J. H. THORNTON, C. B., M. B., B. A.
Fellow of King's College, London.
Dy. Surgeon-General. I. M. S. (retired.)

# वैद्यकाचें ज्ञान पायाशुद्ध व सविस्तर होण्यासाठीं

## अत्यंत सुलभ ग्रंथसंग्रह.

निरनिराळ्या विषयांकरितां मुद्दाम स्वतंत्र ग्रंथ तयार केले आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होणारांस **निम्मी किंमत!**

---

'आर्यभिषक्' मासिकपुस्तकांत वैद्यकाचे स्वतंत्र ग्रंथ व तत्संबंधींच माहिती प्रसिद्ध होत असते. सन १८८९ च्या जुलैपासून हें एकसारखें १४ वर्षें चालू आहे. हल्लीं **वर्गणी फारच कमी** वर्षास टपालसह फक्त सव्वा रु. केली आहे. **'भारतधर्म'** मासिक पुस्तक त्यावरोवरच मिळतें. त्याची वर्गणी ६ आणे, मिळून **टपालसुद्धां** फक्त १ रु.१० आणे. फक्त 'आर्यभिषक्' घेणारांस १॥ रु. व फक्त 'भारतधर्म' घेणारांस ८ आणे.

### विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी. किंमतीशिवाय टपालखर्च.

| | |
|---|---|
| वनौषधीगुणादर्श, भाग १ ला १२ आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान, पूर्वार्ध. २ रु. |
| ,, भाग २ रा. १ रु. | ,, सूत्रस्थान,उत्तरार्ध–भा.१ला. १॥ |
| ,, भाग ३ रा. १। रु. | ,, निदानस्थान ... १४ आ. |
| ,, भाग ४ था. १॥ रु. | ,, विमानस्थान ... १॥ रु. |
| ,, भाग ५ वा. १। रु. | ,, इंद्रियस्थान ... १२ आ. |
| ,, भाग ६ वा. १२ आ. | ,, कल्पस्थान ... १४ आ. |
| सुबोध वैद्यक, पूर्वार्ध व उत्तरार्ध. १॥ रु. | ,, सिद्धिस्थान ... १॥ रु. |
| रसवैद्य. ... ... ... १२ आ. | ,, चिकित्सास्थान, भाग१ला. १॥।रु. |
| वृद्धवैद्यबिंदु ... ... ... १॥ रु. | नपुंसकमीमांसा व कामसंजीवन १॥ रु. |
| औषधिगुणदोष ... ... १॥ रु. | निघंटशिरोमणि, भा. १ व २ रा. २। रु. |
| गर्भारपण बाळंतपण. ... १ रु. | आयुर्वेदरहस्य, भाग १ ला ... १ रु. |
| स्त्रीच्या वीर्यनाश व त्यावर उपाय. ३ आ. | सार्थ हारीतसंहिता, भाग १ ला १। रु. |
| औषधीक्रिया ... ... ८ आ. | सार्थ योगशतक . ... ४ आ. |
| राजवैद्य. . . . ... १२ आ. | सार्थ वैद्यवल्लभ ... ... ४ आ. |
| औषधीमानपरिभाषा. ... १॥ आ. | वृहत्पाकसंग्रह ... ... १॥ रु. |
| गोवैद्यक. ... ... ... २ आ. | नाडीपरीक्षेचें महत्व ... ... ३ आ. |
| प्राणिज औषधी .. ... आ. | औषधीपाड ... . ... २ रु. |
| आरोग्याचे ज्ञान .. ... पाऊण आ. | सार्थ ज्वरपराजय ... ... २ रु. |
| मधुमेहनिदान . .. अर्धा आणा. | त्रिदोषविचार, भाग १ ला ... ४ आ. |
| प्राणरक्षाविधान (व्रणचिकित्सा). ६ आ | |

### योगशास्त्राची उत्तम माहिती होण्याचें पुस्तक.

कि. ४ आणे **योगविज्ञान.** टपाल ०॥ आ.

ठिकाणः- प्रत्यक्ष येऊन घेणारांनीं मुंबई, बावराजी पटेल तलावाजवळ **"श्रीसयाजी औषधशाळा"** या ठिकाणीं यावें व **बाहेरगांवीं मागविणारांनीं** पुढील नांवानें पत्रव्यवहार करावा:—**आयुर्वेदमहोपाध्याय** शंकर दाजीशास्त्री पदे, मुंबई, नवा नागपाडा.

'नेटिवओपिनियन' छा. छा

कै० ज्योति ... रि ... निरम



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्

अंक ८ वा.



संपादक - वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई नवी नागपाडा, आर्यभिषक्कार्यालय

भिषजां साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ श्रीवाग्भट ।

मेषसंक्रांति शके १ ... गु ... १ ... १०

विषयानुक्रम—प्लेगसंरक्षण ( संपूर्ण पुस्तक. ) हूर्त प्लेगची साथ सर्वत्र असल्या मुळें या अंकांत सर्व हाच मजकूर दिला आहे. बाकीचे विषय येत्या अंकांत येतील

---

## Triumph of Ayurveda in America.

# आर्यवैद्यकाचा अमेरिकेंत प्रभाव.

अमेरिकेंतील सॅन् फ्रान्सिस्को नांवाच्या शहरांत गेल्या पांचवर्षांपासून 'आयुर्वेदिक इन्स्टिट्यूट' नांवाची, आयुर्वेदाच्या प्रसारार्थ स्थापन झालेली एक संस्था (विद्यालय) अस्तित्वांत आली आहे हें या देशांतील फारच थोडे लोकांस माहीत असेल. ही संस्था अमेरिकेंतील कित्येक नामांकित डाक्टरांची आयुर्वेदिकचिकित्सेच्या श्रेष्ठत्वाविषयीं खात्री झाल्यावरुन, त्याच्या प्रसारार्थ त्यांनीं स्थापन केलेली आहे. या संस्थेचे अग्रेसर व स्थायी चिकित्सक डॉ. जार्ज. डब्ल्यू. कार्पेन्डर्स, एम्. डी. (१४२२ पोस्ट स्ट्रीट सॅन् फ्रान्सिस्को. कालिफोर्निया. यू. एस. ए.) या नांवाचे सुप्रसिद्ध डॉक्टर आहेत. यांजकडून कलकत्त्याचे कविराज अविनाशचन्द्र कविरत्न यांस एक पत्र कांहीं दिवसांपूर्वी आलें आहे. तें, आर्यवैद्यकाचा नुस्ता गंध देखील न घेतां नवशिक्षेच्या मदानें इतर सर्व प्राचीन आर्यवस्तूंप्रमाणें आपल्या अनादिसिद्ध त्रिकालाबाधित आर्यवैद्यकाचाही तिरस्कार करणाऱ्या आधुनिक महापुरुषांनीं मनन करण्याजोगें असल्यामुळें, त्यांतील कांहीं मुद्द्यांचा सारांश आह्मीं पुढें देत आहों.

प्रथम त्यांनीं चरक-सुश्रुतादि प्राचीन आर्यवैद्यक-ग्रंथकार व त्यांच्या ग्रंथांची बरीच प्रशंसा करून, कित्येक शतकांपूर्वी या ग्रंथाचीं अरबी व लाटिन भाषेंत भाषांतरें होऊन त्याद्वारेंच ग्रीक व अरब लोकांस प्रथम वैद्यकाचें ज्ञान प्राप्त झालें, व पुढें तेथून यूरोप व अमेरिकेंत त्याचा प्रसार झाला इत्यादि प्रतिपादन करून, आर्यवैद्यकाचें प्राचीनत्व व सर्वश्रेष्ठत्व दर्शविलें आहे.

नंतर विद्यालयें, मासिक पुस्तकें भाषांतरें वगैऱ्यांच्या द्वारा आर्यवैद्यकाच्या ज्ञानाचा अधिकतर प्रसार करण्याची आवश्यकता दर्शवून, असें केल्यानें आर्यवैद्यकाची खरी योग्यता व महत्व जगाच्या निदर्शनास येऊन अत्यंत उन्नत दशेस पोंचलेलें व शास्त्र ह्मणविण्यास लायक असें वैद्यक आर्यवैद्यकच आहे हें सिद्ध होईल असें प्रतिपादन केलें आहे.

शेवटीं त्यांनीं, अमेरिकेंत उक्त आयुर्वैदिक संस्था कशी स्थापन झाली याविषयींची हकीकत लिहिली आहे; ती आह्मीं त्यांच्याच शब्दांत देत आहों.

ते लिहितातः—" 'आयुर्वैदिक इन्स्टिट्यूट' ही 'रॉयल एशियाटिक अक्याडेमि ऑफ सायन्स' या महा संस्थेची एक शाखा आहे. पांच वर्षांपूर्वी, सर्व यूरोप व अमेरिकाभर आपल्या यशस्वी चिकित्सेनें चळवळ उत्पन्न करणाऱ्या एका आयुर्वैदिक वैद्यानें ही स्थापन केली आहे. अमेरिकेंत या वैद्याकडे यूरोपांतून रोगी येत असत. लंडनहून सॅन फ्रान्सिस्कोस अनेक रोगी येत असत. लंडन व पारीसमध्यें रहात असतांना पुष्कळ सरदार वगैरे मोठमोठ्या मंडळींनी हा चिकित्सा करीत असे. माझी एक मुलगी, तीन

श्रीशंकर.

# प्लेगसंरक्षण.

## प्लेगचीं कारणें, लक्षणें, उपचारादि संक्षिप्त विवेचन.

## सारांश.

सन १८९६ पासून हिंदुस्थानांत प्रथम मुंबईस हा रोग सुरू झाला; त्यानंतर सर्व हिंदुस्थानभर त्याचा प्रसार झाला. या सांथीचा सतत आणि ठिकठिकाणचा परिचय झाल्यानें, या सांतीच्या बाबतींत जितका अनुभव, विचार आणि चर्चा आह्मीं संपादन केली, त्या सर्वांचा उपयोग आह्मीं "ग्रंथिक सान्निपात" या पुस्तकांत सविस्तर केला असून, त्या पुस्तकांतील सारांश यांत दिला आहे. जास्त माहिती पाहिजेअसेल त्यांनीं 'ग्रंथिक सान्निपात' या नांवाच्या आमच्या पुस्तकांत पहावा.

हिंदुस्थानची हवा विशेषेंकरून उष्ण आहे. तरी या हवेस सामान्यत्वें समशीतोष्ण हवा असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण, येथें अमुकच एक ऋतु सर्वदां प्रमुख असतो असें धरून चालतां येत नाहीं. निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या प्रकारचा ऋतु असतो, आणि तो, मनुष्यांच्या मानानें पाहिलें ह्मणजे—ज्या प्रमाणें, एखाद्या मनुष्याच्या प्रकृतीवर शीतोष्णतेचा परिणाम तत्काळ होऊं शकतो, व जसें थरमामेटरवर शीतोष्णाचें न्यूनाधिक प्रमाण तत्काल दिसून येतें, तशा प्रकारची हिंदुस्थानची भूमि आहे. येथें कोणत्याही हवेचा परिणाम, स्पष्ट रीतीनें व तत्काल होतो. नियमित व प्रमाणपूर्वक वागण्याची येथें त्यामुळें जास्त जरूर आहे. त्यासाठीं आमच्या चाणाक्ष पूर्वजांनीं आचरणाचे निर्विवाद नियम स्पष्ट रीतीनें घालून ठेवले आहेत. त्यामुळें आह्मांस आमची प्रकृती चांगली ठेवतां येऊन, आमच्यावरील संक-

टांतून आह्मास वचावतां येणें शक्य आहे. पण तिकडे आमचें दुर्लक्ष होत चाललें असून, हवेचे फेरबदल व संकर तर विशेष होत चालला आहे; त्यामुळें निरनिराळ्या प्रकारचे रोग व सांथीचा हिंदुस्थानवर भडिमार चालू आहे.

आमच्या वैद्यकाचा उपयोग, या कामीं विशेष होण्याचा संभव आहे. कारण, तें शास्त्र एतद्देशीय हवा—पाणी व आचारविचारांवरच रचलें गेलें असून, तें रचण्यांत शेंकडो वर्षें निरपेक्ष रीतीचा प्रयत्न, सर्वमान्य विद्वान् ऋषींनीं केला आहे. त्याचा उपयोग करून घेणें प्रस्तुत फार जरूरीचें आहे. त्यापासून केवळ हिंदुस्थानचेंच हित होईल असें नाहीं, तर शास्त्राचा उपयोग सर्वांस सारखा होत असल्यामुळें, त्यापासून सर्व जगाचा फायदा होईल यांत संशय नाहीं.

रोग हा एक प्रकारचा शत्रु आहे. त्यापासून सरकार व प्रजा या दोघांचाही सारखाच नाश आहे. तेव्हां त्या शत्रूवर चाल करण्यास दोघांचीही तत्परता तितकीच असावयाची! शत्रूनें आपल्या किल्ल्यावर स्वारी केली असतां, तो किल्ला सोडून पळून जावें किंवा त्या समरांत गोळी लागलेल्या मनुष्यास दूर टाकून द्यावें, अशा प्रकारच्या गोष्टी शत्रूच्या नाशास कारण होत नाहींत हें कोणीही कबूल करील. त्यासाठीं खरा उपाय ह्मणजे, शत्रूचा आपल्यावर ज्या बाजूनें जोर चालावयाचा, ती बाजू आपली कमी असल्यास तिला जोर आणावयाचा! आपल्यांत आपसांत प्रेम व्यक्त करावयाचें, व एकमेकांस प्राण जाईपर्यंत मदत करावयाची. गोळी लागलेल्यास किंवा ज्यावर शत्रूचा कटाक्ष आहे त्यास धीर देऊन, त्याचें पुत्रवत् रक्षण करावयाचें, इत्यादि गोष्टी विशेष ध्यानांत ठेवल्या पाहिजेत. दूषित हवेनें स्थल बिघडल्यावर त्याच स्थलीं राहून जगण्याची आशा कमी; ही गोष्ट रणांगणांतही विचार करण्यासारखी असते. पण अशा वेळीं सैरावैरा धावल्यानें, संरक्षित वस्तूंचा नाश व जीवावर संकट हें फल मिळविणें सहाजिक आहे. तोच विचार या सांथींतही केला पाहिजे. आधीं हवा

दूषित होऊं नये ह्मणून पुष्कळ रीतीनें जपावें; ती गोष्ट आटोक्याबाहेर जाण्यापूर्वींच आपल्या संरक्षित वस्तूंचा नीट बंदोबस्त करून, स्थल व शरीर शुद्ध रहाण्याचा प्रयत्न करावा. इतकेंही करून चालत नाहीं असें होण्यापूर्वींच पुढें दुसरीकडे जाण्याची खात्रीपूर्वक व्यवस्था करून ठेवावी. व्यवस्था नसल्यास, न घाबरतां शरीरशुद्धतेचा प्रयत्न होण्यासाठीं 'आरोग्यरक्षणाचीं तत्वें' पूर्ण उपयोगांत आणावीं; न घाबरतां उपचार करावे; इत्यादि व्यवस्था करावी. भिरभिरा पळूं नये. पळत असणारांस धीर देऊन स्वस्थ करावें. इत्यादि उपचार, जे वैद्यशास्त्रानें उपयुक्त असून, व्यवहारांतही योग्य दिसतात, त्यांचा उल्लेख, प्राचीन ऋषींच्या आधारासह आह्मीं या पुस्तकांत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचा सर्वांनीं व सरकारांनींही अवश्य विचार करावा. जी पद्धति उपयुक्त वाटेल ती अंमलांत आणण्यास, प्रेमाची व सुलभ तजवीज करावी.

असो. सुज्ञ लोकांना यापेक्षां जास्त सुचविण्याचें कारण नाहीं. या इतक्या मेहनतीचा थोडा तरी उपयोग होईल, व या किंवा दुसऱ्या सांथीच्या संबंधांत सरकार व प्रजा, रोगरूपी शत्रूचा नाश करण्यास संगनमतानें प्रयत्न करतील, तर मला सार्थक्य झालें असें वाटेल.

कारण.—वात, पित्त आणि कफ या तिन्हीं दोषांच्या बिघाडामुळें जीं लक्षणें होणें शक्य आहेत त्या प्रकारचीं लक्षणें यांत दिसतात, ह्मणून यास सान्निपात असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. कारण, सान्निपात ह्मणजे—वात, पित्त व कफ या तिन्हीं दोषांचें मिश्रण, आणि तें मिश्रण ज्यांत कमीजास्त अंशानें असतें, त्यास सान्निपात असें ह्मणतात.

ग्रंथिक सान्निपातांत, ताप येऊन मनुष्यें मरतात असा सर्वत्र अनुभव आहे. त्यांत पुष्कळांना, शरीरांतील कोणत्याही भागावर गांठ किंवा सूज येते, व कांहींना तसा प्रकार होत नाहीं. इतर लक्षणांत भिन्न भिन्न प्रकार, किंबहुना एकाहून एक उलट प्रकारही दिसून

येतात. कित्येकांना प्रथम गांठ येते व मागाहून ताप येतो; कित्येकांना प्रथम ताप येतो व कांहीं वेळानंतर किंवा दिवसांनंतर लहान किंवा मोठी आणि एक किंवा अनेक गांठी उत्पन्न होतात. या सर्वांत ही गोष्ट मात्र निर्विवाद सिद्ध आहे, कीं अशा सर्व रोग्यांना ताप हा कमी जास्त प्रमाणांत मात्र असल्याशिवाय रहात नाहीं. ह्मणजे या सांथींतील सर्व रोग्यांस ताप असतो याविषयीं कोणाचाही मतभेद नाहीं. अर्थात् ही सांथ ह्मणजे तापाचीच सांथ होय असें निर्विवाद ह्मणावें लागतें. कारण, ज्या रोगाची जी सांथ ह्मणावयाची, त्या सांथींत त्या रोगाचें लक्षण कमीजास्त प्रमाणांत तरी असलें पाहिजे. ह्मणून प्रस्तुतच्या सांथीस तापाची सांथ असें ह्मटलें पाहिजे. या सांथींत गांठ येणें हें एक महत्वाचें लक्षण आहे. तें लक्षण पुष्कळ अंशीं या सांथींत असूं शकतें. किंवा असाही प्रकार होऊं शकणें संभवनीय आहे, कीं कांहीं कारणांनीं या लक्षणाहून इतरही लक्षण असूं शकेल.

सदरहु सांथीस, आमच्या वैद्यकाप्रमाणें पाहिलें ह्मणजे—ताप येण्याचे जे प्रकार आहेत, त्यांतील 'सन्निपात' हा प्रकार, या सांथींशीं सर्वथा जुळता आहे. नुकतेंच मी सांगितलें आहे त्याप्रमाणें, या सांथींत—वात, पित्त व कफ, कमी किंवा जास्त बिघडून ताप उत्पन्न करतात. अशा प्रकारास सन्निपात ज्वर असें ह्मटलें आहे. तीन दोष ज्या ठिकाणीं बिघडतात, त्या ठिकाणीं सन्निपात असें ह्मणतात. सन्निपात हें विशेषण पुष्कळ रोगांना लावतां येतें; परंतु त्या सर्वांत तिन्हीं दोष बिघडले असतात. प्रस्तुतच्या सांथींत अशीच स्थिति असल्यानें, या सांथीस सन्निपात ज्वर असें ह्मटलें पाहिजे. परंतु या सांथीचा इतका प्रादुर्भाव झाला आहे कीं, **ग्रंथिक सन्निपात** या संक्षिप्त नांवानेंच 'ग्रंथिक सन्निपातज्वर' असा अर्थ सहज ध्यानांत येतो. फार तर काय, पण सध्या 'प्लेग' या एका शब्दानेंच या सांथीचा अर्थबोध होत आहे. वास्तविक 'प्लेग' हा इंग्रजी शब्द

असून, त्याचा अर्थ ‘ साथ ’ असा आहे. परंतु आबालवृद्धांना त्या एका शब्दानेंच सर्व अर्थ समजण्यासारखी प्रस्तुत स्थिति झाली आहे. ह्मणूनच मीं या विषयास ग्रंथिक सन्निपात एवढेंच नांव दिलें आहे. असो.

सन्निपात ज्वराचीं लक्षणें निर्विवादपणें व स्थूलमानानें वाग्भटांत पुढील प्रमाणें दिलीं आहेत:—

> सर्वजो लक्षणैः सर्वैर्दाहोऽत्र च मुहुर्मुहुः।
> तद्वच्छीतं महानिद्रा दिवा जागरणं निशि ॥२७॥
> सदा वा नैववा निद्रा महास्वेदोऽति नैव वा। ” इत्यादि.

विस्तारभयास्तव त्यांचा थोडक्यांत, मराठी भाषेंतच येथें अर्थ सांगतोंः— त्रिदोषात्मक ज्वरांत निरनिराळ्या तिन्हीं दोषांचीं लक्षणें मिश्र असतात. यांत वारंवार थंडी, दाह; दिवसा झोंप किंवा रात्रीं जागरण अथवा नेहमींच झोंप किंवा मुळींच नसणें; घाम फार येणें, कमी येणें किंवा मुळींच न येणें; गाणें, नाचणें, हांसणें वगैरे वेड्यावांकड्या चेष्टा करणें; तसेंच डोळे पाण्यानें भरून येणें, गढूळ होणें; लाल किंवा वांकडे होणें, व पापण्यांचे केंस लुळे पडणें; कधीं पोटऱ्या, कुशी, डोकें, सांधे व हाडें हीं दुखणें; भ्रम, कानांत दुखणें अथवा शब्द होणें; घशांत टोंचण्यासारखी पीडा होणें; जीभ जळल्यासारखी काळी खरखरीत व जड होणें; अंग व सांधे गळल्यासारखे होणें, थुंकींत रक्त, पित्त, किंवा कफ पडणें; मान हालणें, मस्तक दुखणें; मलाचा अवरोध, किंवा अवरोध न होतां मल थोडा होणें, अथवा व चेवर फार होणें, शक्ति कमी होणें, आवाज बसणें, बडबड, झांपड, वगैरे वगैरे.

हीं जीं तापाचीं लक्षणें सांगितलीं आहेत, तीं सर्व किंवा त्यांपैकीं कांहीं नियमित लक्षणेंच सन्निपात ज्वरांत होतात असें नाहीं. इतर रोगांप्रमाणें सन्निपात ज्वराचाही आर्यवैद्यकांत पुष्कळ विचार केला आहे. त्यामुळें निरनिराळ्या शोधकांनीं आपले निरनिराळे अनुभव खुलासेवार

लिहून ठेवले आहेत. हल्लीं ज्या प्रकारची सांथ दिसते, तशा प्रकारच्या सांथीचा अंतर्भाव सन्निपातांतच केला पाहिजे असें, प्राचीन ग्रंथांवरून ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं. कारण, सन्निपाताचे जे निरनिराळे प्रकार केले आहेत, त्यास पहिला आधार, दोषांच्या कमीजास्तपणाचा आहे. वात, पित्त व कफ हे तिन्हीं दोष जरी कोपलेले असले, तरी त्यांपैकीं एक कमी, दुसरा त्याहून कमी व तिसरा सर्वांत कमी; अथवा यांचा उलटपालट कमीजास्तपणा असला ह्मणजे, जो दोष जास्त असेल त्या दोषाचें प्राबल्य त्या प्रकारांत जास्त असूं शकते. एकंदरींत मिश्रणाच्या कमीजास्त प्रमाणानुरूप लक्षणें भिन्न भिन्न असूं शकतात. तसाच प्रकार, त्या बिघडलेल्या दोषांचा परिणाम, शरीरांतील ज्या विभागावर झाला असेल; किंवा शरीरांतील रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा वगैरे ज्या शरीरस्थ साहित्यावर झाला असेल, त्याप्रमाणें त्यांचीं भिन्न भिन्न लक्षणें दिसून येतात. आणि ह्मणूनच सुश्रुत, भावप्रकाश, माधवनिदान वगैरे ग्रंथकारांनीं सान्निपातांचीं निरनिराळीं स्वरूपें व भेद यांचें वर्णन केलें आहे. कोणीं पांच, कोणीं बारा, काणीं तेरा असे या सन्निपाताचे भेद केले आहेत. माधवनिदानावरील 'मधुकोष' टीकेंत याचा सर्व विस्तार केला असून, टीकाकारांनीं शेवटीं असें तात्पर्य दिलें आहे:-

" विकृतौ नियमो नास्ति, तेन विकृतिविषयसम-
वाया अनेकप्रकाराः भवंति । "

यावरून स्पष्ट होतें, कीं सान्निपातांत अमुकच विकार होतात असें ठरवितां येणें अशक्य असून, विकाराच्या अनुकूल साधनांप्रमाणें त्याचे निरनिराळे, अनेक प्रकार होणें संभवनीय आहे. वास्तविक 'सन्निपात' या शब्दांतच तसा अर्थ आहे. शरीराला बिघडविण्यास कारण असलेले सर्व दोष जेथें प्रसंगानुरूप अनेक प्रकार-किंबहुना रोगाच्या सर्व प्रकारांचा त्यांत प्रसंगानुसार देखावा दिसून येणें अगदीं संभवनीय आहे.

आत्रेयांनीं, अशा सांथी उत्पन्न होण्याची जी चौकडी दिली आहे, तींत या ऋतूला अर्थात् कालालाच विशेष महत्व दिलेलें आहे:—

"वातात् जलं जलात देशं देशात्कालं स्वभावतः ।
विद्यादपरिहार्य्यत्वाद्गरीयस्तरमभावेत् ॥"

वातापेक्षां जल, जलापेक्षां देश, व देशापेक्षां काल असे—स्वाभाविक रीतीनेंच व त्यांचा त्यांचा परिहार करणें अशक्य असल्यामुळें शक्तिवान् आहेत.

यावरून—जल व देश हे जरी इतके बिघडलेले नसले, तरी वायु व ऋतू हे त्यांच्यांत अनिष्ट स्थिति उत्पन्न करूं शकतात असें उघड आहे. सांथ उत्पन्न करण्याची चौकडी सर्वच दोषी होईल, तर तेथें सांथीचा जोर जास्त वाढेल हें उघड आहे, आणि जितका या चौकडींत कमीपणा असेल तितका तिचा जोर कमी होईल हेंही उघड आहे. आतां आपणांस हें पाहिलें पाहिजे कीं, प्रस्तुतच्या सांथींत या चौकडीचा कसकसा फेरफार होत असतो?

सांथी उत्पन्न होण्याचीं सामान्य कारणें एकच आहेत तरी, ज्या प्रमाणें मनुष्याचें मन विकारी झाल्यामुळें मानसिक दोष उत्पन्न होतात असें आहे, परंतु मनाच्या विकारांपैकीं—काम, क्रोध, लोभ, मोह इत्यादि ज्या प्रकारच्या विकारानें मन दोषी झालें असेल, त्या प्रमाणें त्यांचे परिणाम होतात; तसेंच, या चौकडीचा विकार ज्या प्रकारचा असेल व तो शरीरांत ज्या भागावर होत असेल, त्या ठिकाणीं व त्या प्रकारचा परिणाम त्यापासून होतो हें स्पष्टच आहे. त्या प्रमाणें—प्रस्तुत जी सांथ उद्भवली आहे, त्यांत जे विकार होतात, ते उत्पन्न होण्यासारख्या फेरफारांची ही चौकडी बिघडलेली आहे असें समजावयाचें. हल्लींच्या सांथींत ज्वर हा मुख्य आहे. त्या ज्वरांतही—त्रिदोष बिघडून व रक्तावर परिणाम होऊन, एकदम प्राणवायु कोपण्याची स्थिति उत्पन्न होते. यावरून—ही सांथ, या चौकडींपैकीं विशेषत: 'ऋतू' च्या विपर्यासानें उत्पन्न होत असून, त्याला कमीजास्त प्रमाणानें तिघांचें सहाय्य होत असावें असें सकृद्दर्शनीं दिसतें. कारण, "विप-

र्यासागते काले रसे विपरिसेविते । तदा स्यात्सन्निपातो हि रोगोपद्रवकारकः ॥ " हारित, प्रथमस्थान, अध्याय ९ वा.

यांत, सन्निपात उत्पन्न होण्यास–'विपर्यासागते काले' असें ह्मटलेलें असून, "प्रायः कुप्यंति पुंसां मधुसमयशरद्वर्षणे सन्निपाताः ।" या माधवाच्या व "वर्षाशरद्वसंतेषु वाताद्यैः प्राकृतः क्रमात् । वैकृतोऽन्यः स दुःसाध्यः प्रायश्च प्राकृतोऽनिलात्" या वाग्भटादिकांच्या ह्मणण्यावरून, प्रस्तुतच्या सांथींत ऋतूचा विपर्यास, ह्मणजे ऋतूचा अनियमितपणा विशेष कारण घडला असल्याचें उघड दिसतें. मात्र, अशा बदलावरच केवळ या सांथीचा कटाक्ष दिसून येत नसून, या बदलास अनुसरून–जल व देश यांचें बल मिळालें ह्मणजे ही सांथ उद्भवते अथवा वाढते असा अनुभव आहे. ह्मणून, ऋतूंची स्थिति जरी आपल्या स्वाधीन नाहीं, तरी देश व जळ यांची स्थिति सुधारण्याची शक्ति आपल्यांत थोडीफार आहे असें कबूल केलें पाहिजे.

आत्रेय ह्मणतात कीं, वातादि चारी कारणें जरी कोपलीं आणि त्यांनीं सांथ उत्पन्न केली, तरी औषध वगैरेसंबंधा खबरदारी ठेविली असतां, रोग होण्याची भीति रहात नाहीं. मृत्यूचीं लक्षणें किंवा मृत्यु येण्याच्या कर्माचीं लक्षणें ज्यांना झालीं नाहींत—ह्मणजे ज्यांच्यांत रोगोत्पत्ति झालेली नाहीं, त्यांनीं–वमनाविरेचनादि, वैद्यकांतील पंचकर्मे करणें फार चांगलें आहे. या पंचकर्मांच्या योगानें, शरीरातील धातु व मल हे स्वरूपांत रहातात. हीं पंचकर्मे करून, विधिपूर्वक रसायनांचाही उपयोग करावा असें सांगितलें आहे. रसायन शब्दाचा अर्थ, हल्लीं पारिभाषिक ठरला गेला असून, ज्यांत पारा वगैरे आहेत अशा औषधांसच रसायन ह्मणावयाचा प्रघात पडला आहे. पण तसाच येथें अर्थ नाहीं. रसादि सप्त धातूंना शुद्धिपूर्वक जीं औषधें पुष्टि करतात, तशा सर्व औषधांना 'रसायन' ही संज्ञा आहे. मग तीं औषधें वनस्पतिज, खनिज किंवा इतर कोणतींही असोत. असो. हवा बिघडण्याच्या पूर्वी आणलेल्या औषधींनीं ( ह्मणजे ज्या औषधांवर हवेचा अनिष्ट परिणाम झाला नाहीं. ) शरीरांत उत्तम बल उत्पन्न करावें. सत्य भाषण,

प्राणिमात्रांवर दया, बलिदान, देवतापूजन, सद्वर्तनें, शांति आणि ज्ञानादि–साधनांनीं आत्म्याचें संरक्षण, या गोष्टी आचराव्या. जेथें रोग नाहीं अशा जागेंत रहावें. ब्रह्मचाऱ्यांची सेवा करून स्वतःही ब्रह्मचर्य पाळावें–धर्मशास्त्र, महर्षि आणि जितात्मे यांच्या कथा गाव्या किंवा श्रवण कराव्या. वृद्धांना संमत अशा धार्मिक व सात्विक यांच्या सहवासानें असावें. अशा रीतीनें वागलें असतां, भयंकर सांथींमध्येंही अनिश्चित् किंवा अपमृत्यु येत नाहीं.

या प्रमाणें थोडक्यांत निर्देश केलेला आहे. भूमिशुद्धि, जलशुद्धि इत्यादि शुद्धींचे उपाय वगैरे, आपल्या वैद्यकांतून व कित्येक शांतिक–पौष्टिक ग्रंथांतून सांगितले आहेत. त्यांत–प्रस्तुतच्या सारखी सांथ उत्पन्न झाली असतां कसें वागावें वगैरे सांगितलें आहे. ‘विधानमाला’ वगैरे ग्रंथांतून असले विषय पुष्कळ आहेत. त्या सर्वांचा येथें उल्लेख करून जास्त विस्तार न करितां, जरूरीपुरता तात्पर्यार्थच घेऊन, मी हा मुद्दा पुरा करणार आहे.

सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, संसर्ग शद्बाला लांब झुगारून देऊन, किंवा त्याची परिमित व्याख्या ध्यानांत ठेऊन, या सांथींत चालू असलेले इलाज करण्यांत येतील तेथें ते सफळ झालेच पाहिजेतः–

( १ ) जेथें हवा दूषित झाली असेल तेथें शुद्धि करण्याचा, व मूळांत, हवा बिघडू नये ह्मणून अगाऊच शुद्धि करण्याचा प्रयत्न चालविला पाहिजे.

( २ ) हवा बिघडली असतां लोकांना धैर्य देऊन व त्यांचीं मनें सुप्रसन्न ठेऊन, त्यांना या रोगांत साह्य केलें पाहिजे. औषधपाणी, स्वच्छता ठेवण्याचीं साधनें, चांगलीं पांघरुणें, मोकळी जागा, चांगलें व पुरेसें अन्न इत्यादि साधनें, लोकांच्या सवडीप्रमाणें व त्यांच्या चालीप्रमाणें त्यांस पुरी पाडलीं पाहिजेत.

( ३ ) दूषित हवेंतील माणसांचा तिटकारा न करितां, त्यांची स्वच्छता रहावी, त्यांनीं दूषित हवेंतील आपली प्रकृति साफ करून

घ्यावी ह्मणून त्यांस औषधपाण्याची मदत करावी, व त्यांच्या संसर्गानेंच केवळ रोग वाढत नसून, संसर्गाबरोबर घाण व अव्यवस्थित वागण्याची कृति कारण होत असते अशी सर्वत्रांची समजूत करून देऊन, दूषित हवेची स्थिति, शुद्ध राहिलेल्या जागेंत होऊ नये म्हणून, तेथें सुगंधि व शोधक धूप, व चालीरीतीप्रमाणें स्वच्छतेचे नियम मात्र परिपूर्ण अमलांत आणावे.

(४) घरीं बरदास्त होण्यासारखी नाहीं अशी घरांतील माणसांची खात्री करून दिल्यावर व रोग्याच्या मनास कोणत्याही प्रकारें धक्का बसणार नाहीं अशी तजवीज करून, जरूर असेल तव्हांच रोग्यास इस्पितळांत, तेथें त्याच्या समजुती व नित्य सहवास यास अनुसरून औषधपाण्याची व्यवस्था रहावी.

( ५ ) आणि हें सर्व करतांना, करणारांनीं हें ध्यानांत ठेवावें, कीं आह्मीं या लोकांचे सेवक असून, यांना कोणत्याही प्रकारें दुखविण्याचें कारण नाहीं. दूषित हवेंतील रोगी किंवा त्यासंबंधांत असलेलीं माणसें हीं सभ्य माणसें आहेत; चोर, दरोडखोर किंवा गुन्हेगार नाहींत; अथवा त्यांच्यावर आपणास धाड घालण्यासाठीं परमेश्वरानें उत्पन्न केलें नाहीं—अशा समजुतीच्या माणसांसच अशा कामीं कामास लावावें.

हीं पांच तत्वें ध्यानांत ठेऊन, जेथें या सांथीचे उपाय होत असतील, तेथें बहुश: वाईट होण्याचा संभव दिसत नाहीं. पण जेथें यांपैकीं कोणतीही गोष्ट थोडीफार चुकेल, तेथें उपयोग होण्यापेक्षां नुकसान होत असेल असें ह्मणणें संभवतें. परंतु सर्वांत्रच जेथें तारंबळ उडाली आहे; काय करावें ह्मणजे सांथ हटेल हें कळण्यास साधन नाहीं, अशा वेळां, मनुष्यस्वभावानें होणाऱ्या चुका क्षम्य आहेत.

सांथीच्या दिवसांत तशा जागीं, मनुष्यांचीं मनें स्वस्थ असणें संभवनीय नाहीं, व निरनिराळ्या भीतीनें तीं तशीं रहाण्यास मोठीच अडचण आहे; परंतु होईल तितकें अशा वेळीं मन शांत व धैर्ययुक्त असणें फार अगत्याचें आहे हें विसरतां कामा नये. कोणत्याही रीतीनें

मनाला त्रास झाल्यानें, शारीरिक त्रासापेक्षां लौकर वाईट परिणाम होतो. कोणत्याही सांथींत व त्यांतही प्रस्तुतच्या सांथींत तर विशेषेंकरून, मन सुप्रसन्न, शांत व धैर्ययुक्त असलें पाहिजे. आत्रेयांनीं सांथीच्या प्रतिबंधाचा जो मार्ग सांगितला आहे, त्यांत हीच गोष्ट महत्वानें सांगितली आहे.

या सांथीच्या संबंधानें सन १८९७ च्या जून महिन्यांत आमच्या अनुभवाचें एक पुस्तक छापून आह्मीं फुकट वांटलें होतें. त्यानंतर आमच्या अल्पस्वल्प शक्तीप्रमाणें जो अनुभव व विचार यांचा संग्रह केला, त्यावर ता. ११ फेब्रुवारी १८९९ रोजीं मुंबई भारतीय-व्याख्यानमालेंत व्याख्यान देऊन तें पुस्तकरूपानें छापलें; आणि त्यांत योग्य सुधारणा करून द्वितीयावृत्तिही काढली आहे. त्याची किं. ६ आणे.

## उपचारांची सरणी.

सांथ उत्पन्न होऊं नये ह्मणून ज्यांस वाटत असेल, त्यांनीं स्वच्छतेचे सर्व नियम व रोग उत्पन्न होऊं नये ह्मणून घेण्याची सर्व काळजी घेतली पाहिजे. हवा शुद्ध रहाण्यासाठीं धूप, चंदन व उपलेट या तीन किंवा अशाच—सुगंधि, दुर्गंधनाशक व मनाला आल्हाद देणाऱ्या वस्तूंचा धूप, वरचेवर व विशेषतः संध्याकाळच्या वेळीं अवश्य केला पाहिजे. गंधक, डांबर वगैरे पदार्थांच्या धूपानें किंवा कृमिनाशक विषारी पदार्थांमुळें कृमि मरत असतील; पण तशा धूपानें व पदार्थांनीं, मनाला त्रास व शारीरिक व मानसिक शक्तींना पोषक अशा तत्वांचा नाश होण्याचा संभव आहे. उदाहरणार्थ, याचा प्रत्यक्ष दाखला ज्यास पहाणें असेल, त्यानें गंधकाचा धूर करून पहावा. गंधकाच्या धुरानें कृमि मरतात ही निर्विवाद गोष्ट आहे. ज्या ठिकाणीं कृमि असतील, अशा जागेंत हा धूर करून दरवाजे वगैरे सर्व बंद करावे आणि कांहीं वेळानें पहावें; ह्मणजे त्या जागेंतील कृमि तेथें मरून पडलेले आपणास दिसतील. पण जर त्याच जागेंत, तशा स्थितींत मनुष्य बसेल, तर त्यास ढास लागून त्याचाही जीव कासावीस होईल. आणि जास्त प्रमाण झालें तर, या कृमीबरोबर हा मोठा कृमिही कदा-

चित् मरून गेलेला, निदान व्याकुळ पडलेला तरी आढळेलच ! म्हणून केवळ जंतुनाशक जेवढीं औषधें आहेत तेवढीं सर्व चांगलीं आहेत, असें समजून त्यांचा सहसा उपयोग करूं नये. फिनाईलचें पाणी जंतूंचा नाश करतें, तसाच तें उंदरांचाही नाश करून, दूषित हवेच्या कचाट्यांत असलेले बिचारे उंदीर, आणखी हवा दूषित करण्यास समर्थ होतात अशी तक्रार, लोकांतून बरेच दिवस चालू आहे. पण फिनाईलची माहिती ज्या प्रकारानें करून घेणें आह्मांस अवश्य वाटतें, तितकी करून घेण्याचें कारण पडलें नसल्यानें, त्याबद्दल जरी आह्मांस कांहीं सांगणें नाहीं, तरी इतकी गोष्ट मात्र आम्हीं खात्रीनें सांगतों कीं, केवळ जंतूंचा नाश करणारीं औषधें ह्मणूनच त्यांचा प्रयोग—जागा, हवा, किंवा मनुष्याच्या शुद्धीकरितां कधींहि करू नये. तर जीं औषधें स्वतः विषकारक नसतील किंवा असलीं तरी ज्यांच्यांतील विषांश, मनुष्याला किंवा उंदरांस लहानमोठ्या कोणत्याही रीतीनें बाधक होणारा नसेल, अशाच औषधांचा उपयोग—हवा, जागा किंवा मनुष्य यांच्या शुद्धीकडे करावा. इतरांचा मुळींच करू नये. केल्यास फायदा होणें निदान माझ्या अनुभवानें तरी शक्य दिसत नाहीं.*

---

* प्रस्तुत जी सांथ उत्पन्न होते, तिच्यांत कुजटपणा हा मुख्य असतो. कुजटपणा सहाजिक रीतीनें उत्पन्न होण्यासारखी ही हवा असते. ज्याप्रमाणें उन्हाळ्यांत ज्या अन्नांत जितका द्रवांश जास्त तितका तो पदार्थ लौकर आंबतो, त्याप्रमाणें या हवेचा असा धर्म आहे कीं, थोडीशी अस्वच्छता झाली किंवा विकारी उष्णता अथवा शीतता उत्पन्न झाली, किंवा वायूच्या चलनवलनास प्रतिबंध झाला, ह्मणजे तेथें कुजटपणा उत्पन्न होतो. कुजटपणा जितक्या अंशानें जास्त असतो, तितका या सांथीचा जोर विशेष होतो. उंदीर कुजल्यानें जशी घाण येते, तशाच प्रकारची घाण गटारें साफ धुतलीं गेलीं नसलीं तर या हवेनें उत्पन्न होते. मुंबईच्या गटारांतून अशी घाण पुष्कळ वेळां अनुभवास आलेली आहे. ही घाण जितक्या अंशानें जास्त दिसली, तितका तेथें रोगाचा जोर जास्त अनुभवास आला. असाच प्रकार, या हवेमुळें प्राण्यांच्या शरीरांत होतो. हवेची गति, व कफ-पित्ताची शीतोष्णक्रिया, यांच्यांत अडथळा उत्पन्न होऊन, शरीरांतही अशी घाण उत्पन्न होत असावी. या घाणीनें रक्त बिघडतें. बिघडलेलें रक्त गोठणें, त्याच्या गाठी बनणें, त्यामुळें ताप उद्भवणें किंवा सूज वगैरे येणें हें सहाजिक आहे. या हवेनें शरीरांत उत्पन्न हो-

हवा शुद्ध करण्यांच्या कामीं धूपाचा चांगला उपयोग होतो असा पुष्कळांनीं आपला अनुभव प्रसिद्ध केलेला आहे. शास्त्रांतही असे धूप पुष्कळ सांगितले आहेत. त्यांत—सर्व बाजूंनीं उपयुक्त असा पुढील औषधी—द्रव्यांचा उपयोग, धूपांत करण्यास हरकत वाटत नाहीं. यांतील जीं द्रव्यें मिळतील तींच घ्यावीं. त्यांचें प्रमाणही साधारणपणें समभाग ठेवण्यास हरकत नाहीं. या द्रव्याचें कमीजास्त प्रमाण घेऊन, कांहीं जास्त गुण उत्पन्न करतां येतील, पण त्याबद्दल सविस्तर विचार करीत बसल्यास फार विस्तार होईल, ह्मणून थोडक्यांत व सोपी अशी हीच योजना कळवीत आहों. तथापि, यांत इतकी गोष्ट अवश्य लक्ष्यांत ठेवावी, कीं या मिश्रणापासून सुगंध व मनास आल्हाद वाटावा.

---

णारा कुजटपणा, त्रिदोषांतही बिघाड करूं शकतो; ह्मणून तीं सर्व ( भिन्न भिन्न ) लक्षणें प्राण्यांत आढळतात उंदरांत घाणीचा संसर्ग लौकर होतो, व उंदरांचें रक्त या घाणीनें लौकर दोषी होऊं शकतें, ह्मणून ते अगोदर मरतात. कुजणें हा धर्म पृथ्वीशीं अर्थात् पंचमहाभूतांपैकीं पृथ्व्यंशाशीं विशेष निकट असल्यामुळें, याचा परिणाम, पृथ्वींत विशेष होतो. आकाशांत संचार करणाऱ्यावर, याचा परिणाम कालांतरानें— पृथ्वीच्या अधिक बिघाडामुळें, हवेस जोर मिळाल्यामुळें होऊं शकेल. पण तसें क्वचित् प्रसंगीं होईल. वायूंत याचा संसर्ग घडतोच. कारण, त्याशिवाय एका ठिकाणची दूषित किंवा दुर्गंधि हवा दुसरीकडे जाऊं शकतच नाहीं. जलांतील पृथ्वीच्या संसर्गानें व क्वचित खुद्द जलाच्याही बिघडानें इचा प्रादुर्भाव होणें संभवनीय आहे. एक, अग्नींत मात्र इचा प्रादुर्भाव होणें संभवनीय नाहीं. कारण, कुजट भाग जाळून शुद्ध करण्याचा गुण अग्नींत आहे. असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, कुजटपणा हा या हवेचा दूषित परिणाम आहे, व तो नाहींसा करण्यास शुद्ध औषधांचाच उपयोग केला पाहिजे. विषारी पदार्थही कित्येक असे आहेत, कीं ते कुजटपणाचा नाश करितात. पण जरी कुजटपणाचा नाश केला, तरी शरीरास त्यांच्या पासून कमीजास्त अपाय होण्याचा संभव असतोच. ह्मणून या हवेस शुद्ध करण्याकरितां उपयोगांत आणावयाचीं औषधें, निर्विष व कुजटपणा नाहींसा करणारीं अशीं असावींत. हा गुण साधारणपणें मिठांत ( क्षारांत ) विशेष आहे. मनुष्यांनीं मीठ जास्त खाल्लें तर या हवेला चांगलें आहे. त्यांत, मनुष्यांनीं सैंदेलोण वगैरे मिठांचा उपयोग केल्यास जास्त फायदा आहे. समुद्राचें **मीठ हें गटारें वगैरे मधील अशुद्ध हवा शुद्ध करण्यास** चांगलें उपयोगीं आहे. ज्यांस हिंदुस्थानांतील प्राचीन ' पेवाचे शौचकूप ' माहीत असतील, त्यांस ही गोष्ट विशेष

**धूपाचीं उपयुक्त द्रव्यें**:-कवड्या ऊद, पांढरा चंदन, सांवरीचीं पानें, सावरीच्या मुळ्या, नागरमोथा, गंधाबिरुदा, वेखंड, त्रिचे, गुग्गुळ, लसूण, कांद्याचीं सलपटें, कडूनिंबाचा व करंजाचा पाला, हिरडा, बेहडा, आंवळकटी, वावडिंगें, गूळ, अर्जुनसादड्याचीं फ़ुलें, लाख, हळद, कोष्ट (ज्यास उपलेट ह्मणतात तें घ्यावें. 'काष्टकोळिंजन' ह्मणून कोळिंजनच देतात तें नव्हे ), पांढरें शिरस, राळ, वाळा.

या प्रमाणें धूप केल्यानें हवा शुद्ध होते. स्वच्छता सर्वत्र ठेवावी. शरीराची बाह्य व अंतःशुद्धि अक्षयी ठेवावी. बाह्यशुद्धिकरितां-

---

स्पष्ट करून सांगण्याची जरूर नाहीं. कारण, त्या शौचकूपांतील मळ कधींही काढून टाकीत नसत; तर त्या खाड्यांत वर्ष सहा महिन्यांनीं मीठ टाकिलें ह्मणजे ती दुर्गंधि अगदीं नाहींशी होई. आह्मीं येथें यासंबंधानें, चालू सांथींत पुष्कळ अनुभव घेतला आहे. त्यामुळें आमची खात्री आहे कीं, गटारें व मोऱ्यांची दुर्गंधि फार लौकर नाहींशी करण्यास **मिठासारखें त्वरित व खात्रीचें** उपयोगीं पडणारें दुसरें औषध नाहीं. मिठापासून अपाय होण्याचा संभव नसून, तें अतिशय स्वस्त आहे. किंबहुना सरकारास जर प्रजेचा इतकी कळकळ आहे, तर त्यांनीं मिठावरील कर या वेळेपुरता तरी काढून टाकल्यास, मिठाचा इतका सुलभ रीतीनें उपयोग करतां येईल, कीं एका दिवसास एका पैचें मीठ, मोठ्या कुटुंबास देखील पुरून उरेल. शोधांतीं असें कळतें कीं, सरकारी कराशिवाय जर मीठ मिळेल, तर एका माणसास वर्षास फार तर च्यार आण्यापासून आठ आण्यापर्यंत किंमत पडेल. हा कर बसण्यापूर्वीं खुद्द **मुंबईंत एका पायलीभर मिठास दोन पै** पडत असें सांगतात. तेव्हां हें असलें उपयुक्त औषध इतकें स्वस्त असतां, हवा शुद्धतेकरितां व शरीराचें आरोग्य रक्षण करण्याकरितां महागाईचे इलाज करण्यापासून फायदा कोणता ? या मिठासंबंधानें ज्याला खात्री करून घेणें असेल, त्यानें अगदीं दुर्गंधीच्या गटारांत, गटाराच्या मानानें शेर अर्धाशेर मीठ घालून पहावें, व किती लौकर तेथील घाण कमी होते याचा अनुभव घ्यावा. **मुंबईंत सांथ जारीनें चालू असतां,** सांथीच्या घाणीसारखी दुर्गंधि उत्पन्न झालेल्या गटारांत व उंदीर मेलेल्या बिळांत हें **मीठ** अगदीं बारीक करून **घातल्यानें**, फारच थोड्या अवकाशांत तेथील **घाण अजीबात नाहींशी झाल्याचा**, आह्मीं स्वतः बऱ्याच वेळां **अनुभव** घेतला आहे. **चुन्यांत क्षाराचा अंश** विशेष असतो, ह्मणून कांहीं अंशीं त्यामुळें, घाण किंवा जंतूच्या मतांची मंडळी जंतू नाहींसे होतात असें सांगतात. पण ज्याच्यांत क्षाराचा अंश असल्यानें इतका फायदा होतो, त्या खुद्द क्षाराचा उपयोग, सुलभ व खात्रीपूर्वक असतां, मग द्राविडी प्राणायाम कशासाठीं करावा ? लोकांनीं व शास्त्रज्ञांनीं याचा अनुभव घेऊन तो प्रसिद्ध केल्यास मोठा उपयोग होईल.

स्नान, तेल लावून अंग धुणें, निर्मळ कपडे; मलमूत्र वगैरे द्वारें अक्षयी स्वच्छ ठेवणें, हें उपयोगी आहे. अंतःशुद्धि करितां—मलमूत्र साफ राहील, पचन व दीपन चांगलें होईल, आणि शरीरांत कोणताही विकार न उद्भवतां, मानसिक व शारीरक बल चांगलें राहील असें केलें पाहिजे. रोग चालू असेल त्या वेळीं ज्वर-नाशक, रक्तशोधक व ओजोवर्धक औषधांचाही समावेश यांत केला पाहिजे. अशीं औषधें पुष्कळ असल्यामुळें तीं सर्व सांगतां येणार नाहींत म्हणून अशा प्रकारचा निर्देश केला आहे. तथापि तशा गुणांचीं थोडीं औषधें येथें सांगतों. हिरडा, बेहडा व आवळकटी ( त्रिफळा-चूर्ण ) या तीन जिनसा समभाग वस्त्रगाळ चूर्ण करून सुमोर पाव तोळा चूर्ण उन्हाळ्यांत गार पाण्याशीं व सर्दीचे दिवसांत किंवा तशा प्रकारचे प्रकृतीस ऊन पाण्यांतून घेतल्यानें—प्रकृति उत्तम रहाते असा सर्वांस अनुभव आहेच. हें चूर्ण, अक्षयीं रात्रीं निजते वेळीं एकदां किंवा एकदोन दिवस आड घेतल्यानें प्रकृति निकोप रहाते. ज्या वेळीं साथीचा जोर चालू असतो अशा वेळीं, पुढीलप्रमाणें गोळ्या करून घेतल्यानें प्रकृति चांगली रहाते असा पुष्कळ अनुभव मिळाला आहेः—कडूनिंबाचा पाला १० तोळे, अगदीं बारीक वाटून, त्यांत १ मासा हिराहिंग व २ मासे कापूर घालावा. तसेंच त्यांत ज्येष्टमधाचें चूर्ण २ तोळे घालावें. अडूळशाचा पाला २ तोळे, कडू इंद्रावणमूळ ३ तोळे, किराईत २ तोळे, पित्तपापडा २ तोळे, धमासा ३ तोळे, नागरमोथा ३ तोळे व वावडिंग ४ तोळे याप्रमाणें जिनसांत २ शेर

---

१, कपडे परटाकडून धुतलेले घेण्यापेक्षां, रिठे वगैरे पदार्थांनीं घरींच स्वच्छ धुतलेले बरे असें या साथींत अनुभवास आलेलें आहे. कारण, परटाकडे सर्व प्रकारचे कपडे येतात, व त्यांत घालण्याचा क्षारही कदाचित् वाईट झाला असतो, त्यामुळें अत्यंत स्वच्छतेंत त्यांचा समावेश करण्यास अडचण आहे. या अडचणी नसतां, विशेष हरकत नाहीं.

पाणी घालून पाव शेर पाणी उरवावें. ( ८० तोळ्यांचा शेर. ) आणि तो काढा गाळून घेऊन, त्यांत, आतां सांगितलेल्या सर्व औषधांचें चूर्ण एकत्र करून भिजवून त्यांचा खल करावा. खल करतां करतांच औषध सुकवावें; पुन्हा त्यांत काढा घालून भिजवावें; पुन्हा खल करून सुकवावें; अशा रीतीनें, काढ्यांत औषधें चवदा वेळ भिजवून सुकवावीं. अशीं चौदा पुटें देण्यास, फार कमी तर सात दिवस व जास्त तर चौदा दिवस लागतील. दररोज काढा नवा केलेला असावा. शिळा काढा उपयोगांत आणू नये. नंतर, याप्रमाणें केलेल्या औषधाच्या, सुमारें ४।४ गुंजावजनाच्या गोळ्या कराव्या. मोठ्या मनुष्यास २ गोळ्या, लहानास एक गोळी, आणि २।३ वर्षांच्या मुलांना अर्धी गोळी, याप्रमाणें–दर वेळीं पाण्यांत उगाळून देत जाणें. दिवसांतून एकदां किंवा दोनदां या गोळ्या घेऊन, रात्रौ त्रिफळाचूर्ण सुरू ठेवावें. सदर्हू गोळ्या मुद्दाम या सांथींत करून, पुष्कळ लोकांस मीं फुकट दिल्या आहेत. या गोळ्यांचा उपयोग, सांथीच्या रोगानें पछाडलेल्या-सही होऊं शकतो. त्यास, आल्याचा रस व मधांत ह्या गोळ्या प्रथम स्थितीपासून सुरू केल्यास गुण येतो. या गोळ्यांचे नांव, सोयीकरितां **'सन्निपातज्वरांतक'** असें ठेवलें आहे. याच गोळ्या घ्याव्या असें आमचें सांगणें नसून, या औषधांच्या गुणांप्रमाणें असणारीं औषधें, सांथीचा प्रतिबंध बऱ्याच अंशीं करूं शकतात असें सांगण्याचा आमचा हेतु आहे.

## दररोजची जपणूक.

जेथें हवा बिघडली असेल, तेथील लोकांनीं दररोज रात्रीं तुळशीचा चहा करून घेत जावा. सुमारें दहा पंधरा तुळशीचीं ओलीं किंवा वाळलेलीं पानें, अथवा त्या अंदाजानें मंजिरा घेऊन त्यांत सुमारें अर्धा शेर ( ४० तोळे ) पाणी व ५ तोळे साखर आणि १० तोळे दूध असें सर्व एकदम एकत्र करून उकळावें. निम्में उरलें ह्मणजे गाळून प्यावें. रात्रीं निजतेवेळीं किंवा संध्याकाळीं अथवा जेव्हां कुंद हवा

असेल तेव्हां केव्हांही हा चहा द्यावा. एखादे दिवशीं हवा जास्त बिघडली असेल तर दोन तीन वेळां घेतला तरी हरकत नाहीं. अगदीं लहान वयापासून म्हातान्यापर्यंत-सर्वांस हा चहा थोडाफार देण्यास हरकत नाहीं. यापासून अन्न पचन होतें, शौच साफ होतें, अग्नि प्रदीप्त होतो व हुषारी येते; याशिवाय—वरील गोळ्यांचा उपयोग करावा.

कोणत्याही रोग्याला स्वच्छता वगैरे विषय जितके जरूर आहेत, त्यापेक्षां स्वच्छ हवा व स्वच्छतेचे इतर विषय या रोगांत जास्त असावे लागतात. परंतु तेवढ्यासाठीं, रोग्यास घराबाहेर किंवा वस्तीबाहेर ठेवलें पाहिजे असें मात्र नाहीं. जो मनुष्य ज्या प्रकारच्या स्थितींत वापरला असेल, त्या स्थितीस अनुसरून ही व्यवस्था झाली पाहिजे. त्यांतही, त्याची पथ्य व खाण्यापिण्याची व्यवस्था, व त्याच्या उपयोगीं पडणारीं माणसें हीं त्याला आवडतील व त्याला सजतील अशा प्रकारचीं असलीं पाहिजेत. ज्या रोग्याला शौचास होत नसेल त्यास, त्याच्या शक्तीच्या बेतानें दोषनाशक असा रेचक द्यावा. अशा हवेंत उत्पन्न होणाऱ्या सर्व प्रकारच्या रोगांत ही काळजी अवश्य ठेवावी. अश्वकंचुकी, ज्यास घोडाचोळी म्हणतात, ती एक किंवा दोन गोळ्या, साखर व पाण्यांत एकदां दिल्यानें रेचनाचा इष्ट कार्यभाग चांगला होऊन, तो या दोषाला शुद्ध करणारा असा असतो. नारायणज्वरांकुश किंवा तापावरील रेचनगुणविशिष्ट औषधें दिल्यानें हा कार्यभाग होतो. ज्यांना रेच होतात त्यांस हीं औषधें देऊं नयेत. त्यांना तापाचें औषध पुढें सांगितल्याप्रमाणें द्यावें. बेभानपणा जितका कमी करवेल तितका करीत जावा. त्या कामीं—हेमगर्भ किंवा हिरण्यगर्भ, समीरपन्नग, कालकूट, सन्निपातभैरव इत्यादिकांचा ( मिळेल तर ब्राह्मीचा रस व ) आल्याचा रस व मधांत उपयोग होतो. रेचन द्यावयाचें असेल त्यास तें देऊन रेच साफ झाल्यावर लागलीच ज्वरनाशक औषधांपैकीं —सन्निपातज्वरांतक, ज्वरांकुश, महामृत्युंजय, मृत्युंजय, सन्निपात—भैरव वगैरे औषधें, आल्याचा रस व मधांत किंवा ऊन पाण्यांत दिल्यानें चांगला उपयोग होतो. सन्निपातज्वरावर सांगितलेलीं नस्यें, अंजनें, वगैऱ्यांचाही यांत उपयोग होतो. हल्लीं जी सांथ सुरू आहे तिचे अनेक प्रकार आढळून येतात. तथापि पुढील प्रकार मुख्यत्वें दिसून येतातः—

१ **गांठीसहीत ताप.**—यांत जीं लक्षणें होतात, तीं सन्निपाताच्या भेदांपैकीं, 'संधिक' सन्निपाताच्या लक्षणाशीं विशेष जुळतात.

२ **गळ्यावरील सुजेसहीत ताप.**—यांत 'तन्द्रिक' सन्निपाताचीं लक्षणें जुळतात.

३ **फुफ्फुसावरील सुजेसहीत ताप.**—यांत 'पाकल' सन्निपाताचीं लक्षणें जुळतात.

४ **मस्तक-विकारासहीत ताप.**—यांत 'अंतक' सन्निपाताचीं लक्षणें जुळतात.

५ **बस्ति-विकारासहीत ताप.**—यांत 'संन्यास' सन्निपाताचीं लक्षणें जुळतात.

या सांथीचे जे अनेक प्रकार होतात, त्यांत उपचार करण्याच्या सोयीसाठीं पुढील गोष्टी ध्यानांत ठेवाव्या:—( १ ) ज्यांना ताप व गांठ प्रथमच येते, त्यांच्या दोन्हीं प्रकारावर औषध द्यावें; अशा वेळीं गांठीसंबंधी हयगय मुळींच उपयोगीं नाहीं

( २ ) ज्यांना ताप अगोदर येऊन पुढें गांठ येते, अशा रोग्यांना, विकाराप्रमाणें उपचार करावे. पण या सांथीच्या वेळीं सर्व ज्वरांत इतकी काळजी जरूर घ्यावी कीं, गांठ नसली तरी सांध्यासांध्यांतून, गांठ न येणारी औषधें चोळण्याचा क्रम ठेवावा.

---

१ गांठ न येऊं देण्याकारतां सांध्यासांध्यानें औषध चोळावयाचें तें गुणांनीं रक्तशोधक, रक्तांत उष्णता कायम व प्रमाणांत ठेवणारें, आणि निर्विष, असें असावें. कोष्ठ ( उपलेट ) पाण्यांत उगाळून ऊन करून चोळणें; किंवा दालचिनीच्या तेलांत थोडें करंजेल घालून तें सर्व साध्यांत चोळणें; अथवा रोगाचा कमजोर असेल तेव्हां एरंडेल व करंजेल एकत्र करून, तें चोळून त्यावर कढत कढत पाणी ओतून शेकणें, किंवा कढत पाण्यांत लोकरीच्या कपड्याचा तुकडा भिजवून त्यानें शेकणें **या सर्वांत विशेष उपयुक्त** आणखी एक उपाय आहे. पण तो, रोग्याची शक्ति पाहून बेताबातानें, दिवसांतून १।२ किंवा ३ वेळां उपयोगांत आणावा. तो उपाय म्हणजे '**वाफारा**' हा होय. **या सांथीच्या सर्व प्रकारच्या अवस्थेंत या उपचाराचा उपयोग होतो.** नुसता ताप असो, गांठ-युक्त किंवा सूज-युक्त ताप असो; किंवा कोणताही प्रकार असो; पण त्या त्या प्रकारावर पोटांत औषधें देण्याचा क्रम चालू असून, त्याशिवाय तारतम्यानें या वाफाऱ्याचाही उपयोग करावा. वाफाऱ्याचा साधा प्रकार म्हणजे–एका पातेल्यांत पुष्कळ पाणी घालून, त्यांत कडूनिंबाचा पाला व गवती ( ओल्या ) चहाच्या पाती थोड्या ठेचून घालून, त्यावर झांकण ठेवून, तें पाणी खूप उकळावें. उकळते वेळीं, भांड्यावर झांकण ठेवावें. उकळल्या-

( ३ ) गळ्याच्या सुजेवर उपचार करावयाचे ते कफ व उष्णता या दोहींचे नाशक आणि व्रणशोधक असावे. एकदम उष्ण उपचार केल्यानें ती सूज आणखी वाढून, त्यांतच रोग्याचा अंत होतो. सांथीच्या दिवसांत अशी सूज पुष्कळांना तापाशिवायही येऊं शकते. आणि ती बहुशः शीतकालांत ( हिंवाळ्यांत ) असते. अशा वेळीं जर मल—मूत्रद्वारें शरीरांतील उष्णता काढून टाकून, कफ व व्रणशोधक—शामक क्रिया केली नाहीं, तर तोच प्रकार पुढें असाध्य बनतो; त्यांत तापही येऊं लागतो.

---

नंतर, रोग्यास बसवून, त्याच्या डोक्यावरून सर्वांगावर पांघरूण घालावें. आणि त्या पांघरूणाचे आंत सदहू भांडें उघडून, त्याची वाफ घेण्यास रोग्यास सांगावें. कलाक अर्धा कलाक अशी वाफ घेतल्यानंतर भांडें दूर ठेवून, रोग्यास पांघरूण घालून निजवावें. त्यामुळें त्यास दरदरून घाम येईल, आणि त्यास बरेंच हलकें वाटेल. याहून निराळ्या रीतीनें वाफारा देण्याची एक रीत आहे; त्यामुळें वाफारा जास्त चांगला बसतो. ती रीत अशी:—काथ्यानें किंवा दुसऱ्या रीतीनें विणलेल्या बाजेवर रोग्यास निजवावें. 'काथ्यानें विणलेल्या' असें ह्मणण्याचें कारण, बाजेस पुष्कळ फटी असाव्या. व त्यांतून वाफ वर यावी. बाजेवर कांहीं न टाकतां निजतां आलें तर बरेंच; नाहींपेक्षां पातळ झिरझिरीत एखादें वस्त्र बाजेवर टाकून त्यावर रोग्यास निजवावें. आणि त्यापूर्वी वर सांगितलेल्याप्रमाणें, कडू निंबाचा पाला, चहाचीं पानें किंवा निर्गुडीचा पाला, पुष्कळशा पाण्यांत टाकून उकळवून तीन बहुगुणी ( भांडीं ) तयार करून ठेवावीं. रोग्यास निजविल्यावर त्यांतील एक भांडें, प्रथम रोग्याच्या मानेखालीं ( बाजेखालीं ) ठेऊन त्यावरील झांकण काढून वाफ मोकळी करावी, ( रोग्यास, अंगावरून चांगलें पांघरूण असें घालावें कीं, खालची वाफ बाहेर जाऊ नये. शिवाय खोलीचें दार, खिडक्या वगैरे बंद कराव्या. ) याप्रमाणें पहिलें भांडें ठेऊन १५ मिनिटें झाल्यावर, तें भांडें कमरेखालीं सारावें व दुसरें भांडें मानेखालीं आणून ठेवावें. तें तेथें पंधरा मिनिटें झाल्यावर, ते भांडें कमरेखालचें पायाखालीं व मानेखालचें कंबरेखालीं ठेऊन, तिसरें भांडें मानेखालीं आणून ठेवावें. नंतर हीं तिन्ही भांडीं सुमारें तास अर्धातास ठेवल्यानंतर तीं बाजूला ठेऊन देऊन, वारा न लागूं देतां रोग्यास पांघरूण घालून दोन तस निजूं द्यावें. याप्रमाणें दिलेल्या वाफाऱ्यानें रोग्यास जास्त चांगला घाम येऊन विशेष फायदा होतो. याहूनही वाफाऱ्याच्या निराळ्या तऱ्हा आहेत; पण या दोन बऱ्याच सुलभ व या वेळीं उपयोगी पडणाऱ्या अशा वाटल्यानें यांचाच येथें उल्लेख केला आहे. **वाफारा देणें तो शक्तिमान पाहून द्यावा.** यानें प्रथम बरेंच अशक्तपण दिसतें. पण पुढें पुनः उल्हास उत्पन्न होतो.

व सन्निपात होण्यास चांगली जागा होते. ( ४ ) ज्या रोग्याला शौचास होतें किंवा ओकाऱ्या येतात अथवा दोन्हीं लक्षणें होतात, त्यास रक्तशोधक व प्रतिबंधक असा इलाज करावा. ( ५ ) गांठ कापण्याचा इलाज केल्यानें गुण आल्याचाही कित्येक वेळां अनुभव आलेला कळतो. परंतु गांठ अगदींच लहान असल्यास किंवा रोगी, गांठ कापण्याच्या लायक शक्तीचा नसल्यास, कापल्यानें फायदा होणें शक्य नाहीं ! **गांठीवर**—लेप, पोटीस, डाव वगैऱ्यांचाही उपयोग होतो. ( ६ ) रोग्याची बेशुद्ध स्थिति किंवा कोणत्याही मनोविकाराचें आधिक्य होऊं नये ह्मणून, सांथीच्या सर्व प्रकारच्या रोग्यांची काळजी ठेवली पाहिजे. संज्ञानाश ( बेशुद्धि ) या रोगांत फार लौकर होतो, आणि तो फार भयंकर आहे ह्मणून त्यावर विशेष नजर ठेवली पाहिजे. अगदीं क्षुल्लक कारणानें, या रोग्याचा वात भडकून मस्तकांत जातो, आणि बरे होत आलेले; रोगी त्यामुळें जाया होतात असे अनुभव फार आलेले आहेत. सन्निपाताचें हें एक ध्यानांत ठेवण्यासारखेंच तत्व आहे. त्याकरितां 'हेमगर्भ' आल्याचा रस व मधांत वरचेवर जिभेस चोळीत असावा.

याप्रमाणें या रोगाच्या ज्या अनेक भावना होतात, त्या सर्वांस धरून वरील मुद्याच्या गोष्टी सांगितल्या आहेत. त्या प्रत्येकीबद्दल ( या रोगाच्या प्रत्येक प्रकाराबद्दल ) औषधोपचार सांगितल्यास, विषय फार वाढेल इतकेंच नव्हे तर त्याचा उपयोग सर्वांसच होण्यासारखा नसून, जाणत्या वैद्यानेंच त्याचा विचार करणें अवश्य असल्यामुळें, विशेष विस्तार करीत नाहीं. यापूर्वीच्या भागांत व याच्या पुढेंही उपचाराचे प्रकार वर्णन केले आहेत; त्यांचा उपयोग त्या त्या अवस्थेंत अवश्य करावा इतकें सुचवून ठेवलें ह्मणजे—जाणत्या माणसाला जास्त विस्तारानें सांगण्याचें कारण राहिलें नाहीं असें मला वाटतें.

तापावर औषधांची योजना काय करावी ती आह्मीं पूर्वी सांगितलीच आहे. **संज्ञानाश**( बेशुद्धि ) होऊं नये ह्मणून—ब्राह्मी व आलें यांच्या किंवा आलें, नागवेलीचीं ( विड्याचीं ) पानें, पुदीना, माका व अडू-

ळसा या सर्वांच्या किंवा यांपैकीं मिळतील त्यांच्या **रसांत** 'हेमगर्भ' मात्रा किंवा हारीतोक्त 'प्रचेतनी गुटिका' अथवा त्या गुणाचें दुसरें औषध, रोग्याच्या शक्तीप्रमाणें उगाळून त्यांत मध घालून, प्रसंगानुरूप रोग्याच्या जिभेस चोळीत जावें. ओकारी बंद करणें असल्यास लिंबू, रेशीम, मोराचें पीस व सालीसुद्धां वेलदोडा हीं समभाग जाळून, ती राख दर वेळीं सुमारें ३ गुंजा, व असल्यास कपर्दीकभस्म ३ गुंजा एकत्र करून मधांत चाटविणें. पाचन करणें असल्यास, त्यांतच आल्याचा रस घालणें. ओकारी व शौच अशीं दोन्हीं बंद करणें असल्यास—सदरहु औषधें, व सुमारें २।३ वाल वजनाइतकें जायफळ व अर्धा पाऊण तोळा सुंठ, पांच पासून दहा तोळे दुधांत उगाळून, व त्यांत थोडी मध, खडीसाखर व तूप घालून कढवून तयार करून देणें. सदरहु औषधें, स्थितिमानाप्रमाणें दिवसांतून १।२।३ किंवा ४ वेळां देऊन, तापावरील औषधें, बेताबातानें चालू ठेवावीं. ताप एकदम काढण्याचा प्रयत्न करू नये. पथ्य—हलके पदार्थ खाण्यास द्यावे. ज्यांस सोसेल त्यांस साधारण लंघन द्यावें. तेलकट, आंबट व वावडे पदार्थ देऊ नयेत.

**सूज किंवा गोळा** कोणत्याही जागीं असला तरी पोटीसाचा उपयोग फार चांगला अनुभवास आलेला आहे. हें पोटीस, तांदुळजाची भाजी, जिला मुंबईत चवळीची **पालभाजी** म्हणतात, तिचें करावें. ती भाजी, पाणी न घालतां बारीक वाटून तींत थोडी हळद घालून तशीच ऊन करावी, व तें पोटीस, शेकत शेकत, सुजेवर किंवा गोळयावर बांधावें; त्यावर विड्याचें किंवा एईचें पान ठेऊन वरून फडक्यानें आवळून टाकावें. हें पोटीस दोन दोन तासानें बांधीत गेल्यास व त्यापासून माफ-

२. रोग्यास पाणी प्यावयास द्यावयाचें तें, उकळून निवालेलें द्यावें. कफप्रधान प्रकृताच्या रोग्यास किंवा थंडीचे दिवसांत सुंठ टाकून पाणी तापवून तें ऊन पाणी दिल्यास चांगलें. **सर्वसाधारण रीतीनें पाणी पिणें तर**—दूषित हवा झाली असेल तेव्हां थोडीशी सुंठ किंवा तुळशीचीं पानें टाकून, निवालेलें पाणी पिणें हितकर आहे.

क शेक बसल्यास, सूज व गोळा वितळून जाऊन, तापाचा जोरही कमी होतो. किंवा सदर्हू उपायानें एखादे वेळीं गांठ पिकून फुटून, त्यांतून दूषित भाग बाहेर निघून जातो. गांठ फुटल्यावर देखील वर पोटीस लावण्याचा क्रम सुरू ठेवावा. पण तें वारंवार सोडून न बांधतां, जास्त वेळ राहिलें तरी हरकत नाहीं. मात्र त्यांत उबारा रहावा. फुटल्यास, वारा लागूं देऊं नये. या योगानें दोष सर्व वाहून जाऊन, जखम स्वच्छ झाल्यावर, त्यावर जखमेवरील कोणतेंही मलम लावून, ती जखम बरी करावी. अथवा नुसत्या संगजिऱ्याची बारीक केलेली पूड जखमेवर कोरडीच लावल्यानेंही जखम बरी होईल. गांठ किंवा सूज ही फुटून अथवा बसून जाऊन, त्यांतील दोषाचा सर्व भाग निघून गेला अशी खात्री झाल्यावर व तापाचा जोर उतरल्यावर पोटीस बांधण्याचें बंद करावें. जसजसा दोष कमी होत जाईल तसतशीं पोटीसेंही कमी बांधलीं असतां चालतील. हा उपाय, आम्हीं व इतर बऱ्याच लोकांनीं पुष्कळ वेळां अनुभवून पाहिला आहे. गळ्यावरील सूज अथवा इतर कोणत्याही ठिकाणची सूज अथवा गांठ या सर्वांवर या उपायाचा चांगला उपयोग होतो.*

---

* आमच्या श्रीसयाजी-औषधशालेचे प्रस्तुतचे व्यवस्थापक-वैद्यराज नारायण बाळशास्त्री अष्टपुत्रे यांनीं या बाबतींत सतत पांच सहा वर्षें अनुभव घेतला आहे, त्यावरून त्यांस पुढील उपचार ठीक वाटतात:—

**महामृत्युंजय.**—ताप येण्याबरोबर महामृत्युंजय २ गुंजा, तुळशीच्या चहांत दिवसांतून, तीन तीन तासांनीं देत जावा. घाम येऊन ताप निघाल्यास मात्र बंद ठेवणें. हा सारक आहे, त्याचप्रमाणें लहान मुलें व गर्भिणी स्त्रियांस तारतम्यभावानें तीन तीन तासांनीं देणें.

**सन्निपातभैरव.**—बडबड, पोट फुगणें, खोकला व तापाचा जोर विशेष असतां, सन्निपातभैरवाची योजना प्रत्येक तीन तासांनीं करावी. हा तीव्र असून सारक आहे. बेशुद्धि, दमा, खोंकला, बडबड, कफ ह्यांवर **कालकूट** अगर **हेमगर्भ** जवळ नसेल तर, त्याचेंही काम हा वेळेस बजावतो. हा रात्रंदिवस मिळून ८ गुंजा द्यावा. मूळव्याध, रक्त पडणें व गर्भिणी अशा रोग्यांस देऊं नये. त्याचप्रमाणें लहान मुलांस **कालकूट रस,** आल्याचा रस व मध ह्यांतून १ गुंज प्रमाणें देणें. तीन तासांनीं.

**वातविध्वंस.**—आलें किंवा तुळशीचा रस व मध ह्यांतून देणें. १ पासून २ गुंजा.

**मल्लसिंदूर.**—फार बडबड, भ्रम, वात वगैरे ह्यांवर याचा उपयोग करणें. अनुपान–आल्याचा रस, मध किंवा लसणीचा रस, मध वगैरे.

**चाटण**—तुळशीचा रस, आल्याचा रस, माक्याचा रस हे तीन रस समभाग घेऊन त्यांत तितकाच मध घालून १५।२० वेढ्यांपर्यंत **हेमगर्भ** उगाळून, तितकेंच सोनें उगाळून, त्यांत **शंखभस्म** ५ गुंजा घालून, वरचेवर चाटवीत जाणें; ह्मणजे कफ वगैरे होणार नाहीं.

**छातीस अळशीच्या** पोटिसाचा शेक करणें, अगर ह्मशीच्या ताज्या शेणाचा शेक करणें, तो असा:—ह्मशीचें शेण, निखाऱ्यावर तव्यांत ठेऊन ऊन करणें, मग तें घेऊन फडक्यांत घालणें. छातीवर दुसरें एक फडकें ठेऊन, त्या पुरचुंडीनें वारंवार शेकीत जाणें. ह्या योगानें कफ पातळ होईल. हा उपाय कफ फार झाला तर करणें; नाहींपेक्षां अळशीनें शेकणें.

**गांठीवर लेप.**—चुना २ भाग, पापडखार १॥ भाग, सज्जीखार १ भाग, सेंदूर पाऊण भाग, तिधारी निवडुंगाची राख पाऊण भाग, या सर्वांचा गुगुळांत खल करून, दिवसांतून तीन वेळा लावणें. गांठ फुटून रक्त फार वाहूं लागलें तर कापूस थोडा जाळून त्याचा शेक द्यावा, आणि हळद -।- तोळा, संगजिरें १ तोळा, पांढरा कात ( पेटीचा ) -॥- तोळा, ह्यांचें वस्त्रगाळ चूर्ण करून वर सोडणें, त्यानें रक्त बंद होईल.

**औषध देण्याची पद्धति**—आरंभीं महामृत्युंजय; दोन तासांनीं सन्निपात भैरव; त्यावर एक तासानें वातविध्वंस, फारच वाताचा जोर असल्यास त्यावर मल्ल देणें. ह्या नियमानुसार औषधें सारखीं चालू ठेवणें. रात्रीस वायूचा जोर होत असतो, त्या वेळेस मात्र मल्लसिंदूर, वातविध्वंस ह्याचा उपयोग बराच करावा. डोकें फार दुखूं लागल्यास अगर भोंवळ येत असल्यास, मधून मधून सूनशेखराचा उपयोग करावा. **मस्तकांत फार भार असल्यास** लसूण वाटून चोळणें व मस्तक बांधून टाकणें.किंवा ब्राह्मी अथवा बेलाचीं पानें मोदकपात्रांत वाफून शेक देणें. खाण्यास तांदुळांची पेज देणें.

**औषधाचें प्रमाण वयपरत्वें.**—१२–१६ वर्षांचे मुलास औषधाचें प्रमाण पाऊणपट. वर्षें ८—१२ अर्धें. वर्षें ४—८ तृतीयांश. वर्षें १–४ चतुर्थांश.

**उलटी होत आहे व कांहीं जिरत नाहीं त्यांकरितां:**—रेशीम, वाळलेलें लिंबू, मोरपीस, मक्याचें बोंड या सर्वांची राख एकत्र करून मधांत वरचेवर चाटविणें.

**सूचना.**—हे सर्व उपाय, कुशल वैद्याच्या देखरेखीखालीं झाल्यास उपयोग होईल. नाहींपेक्षां भूलचूक होण्याचा संभव आहे. (२) यांत वापरण्याचीं औषधें शास्त्रशुद्ध रीतीनें तयार केलेलीं आमच्याकडे विकत मिळतात. मलपृष्ठावर यादी आहे ती पहा.

गाठीवर दुसरे बरेच उपाय आहेत, आणि त्यांत--पाताळयंत्राच्या कृतीनें बिब्याचें तेल काढून त्याचा उपयोग गाठीवर लावण्यास करा-वा, अशाबद्दल आम्हीं प्रथमतः बऱ्याच वेळां अनुभव घेतला आहे.

---

१ गोळ्यावर नुसत्या रुईच्या चिकाचा लेप, किंवा एकदां चीक व त्यावर शेराचा चीक, पुनः रुईचा व शेराचा; अशा रीतीनें चिकाचे वरचेवर ओढे दि-ल्यानें तो फुटून वाहून बरा होतो असा अनुभव पुष्कळांनीं घेतला आहे. त्याशि-वाय पुढील उपाय, बऱ्याच लोकांनीं अनुभवून पाहिले आहेत असें कळतें; ह्मणून ते याखालीं देतों:—

(१) गोळ्यावर फासण्या टाकून वर खापी तमाखू बांधून नीट गरम करून शेकावी. (२) फासण्या टाकून लसूण, मोहऱ्या व चित्रकाची मुळी समभाग वाटून लेप करावा, व वर कापूस चिकटवावा. (३) फासण्या टाकून जमालगोट्या-तील बिया व 'जिंगालकी डली' उगाळून लावून कापूस लावावा. (४) अर्धे हळ-कुंड भाजून त्यानें डाग देऊन, कडूनिंबाचा पाला व गुग्गुळ वाटून दोन दिवस बां-धावा. (५) गूळ पाण्यांत मिसळवून लावून, गरम लोखंडाच्या पट्टीचा डाग देऊन, कडुनिंबाचा पाला व गुग्गुळ बांधावा. (६) कांटे निवडुंगांतील गीर व फटकी (तुरटी) समभाग वाटून वर लावून, बिब्बा, हळद व कांदा वांटून त्याचा शेक लागेल असा पेंड बांधावा. (७) बिबा लावून वर कळीचुना, पापडखार, हिंगूळ, मोचरस व कांद्याचा रस हीं मधांत वाटून लावून कापूस चिकटवावा. [८] गोळा चिरून त्यांत हळद व बिब्बा एकत्र वाटून त्याचा पेंड शेकत शेकत बांधावा, (९) मोहरी, मेथी, बिब्बा, रुई, चाफा (साल, चिक किंवा गड्डा,) चुना, सैंधव, गुग्गुळ, मुसंबरी बोळ, सुरूचा चीक, हळकुंड, गूळ, करवंदीचें मूळ, घाणेरीचें मूळ हे जिन्नस मिळतील ते घेऊन पाण्यांत शिजवून वरचेवर लेप करावा.

२. पाताळयंत्रानें बिब्याचें तेल काढण्याची रीति.—एका मडक्यांत, साधारणपणें तोंडोतोंड बिबे भरून, त्यावर एक पणती (तिच्या मधोमध जवळ जवळ ५।७ भोकें पाडून) पालथी घालून, कणीक व चुना पाण्यांत कालवून, त्यानें संधिलेप करावा. अशा रीतीनें त्या तयार केलेल्या मडक्याचा खालचा भाग वर करून, पणतीचा भाग (भोकें आंत राहतील—अर्थात् त्यांतून तेल दुसरीकडे जाणार नाहीं अशा बेतानें) आंत राहील इतक्या मोठ्या तोंडाचें भांड्यावर किंवा तशा एखाद्या मडक्यावर ठेऊन, त्यासही सदरप्रमाणें संधिलेप करावा. याप्रमाणें हें यंत्र तयार झालें ह्मणजे तें तशाच रीतीनें आंत मावेल अशा, जमिनींत घेतलेल्या खाड्यांत ठेवावें. ज्या मड-क्यांत बिब्बे घातले असतील, त्याचें बूड वर यावयाचें हें ध्यानांत ठेवावें. त्या बुडावर आगीची चांगली आंच बसेल अशा बेतानें वीस पंचवीस गोवऱ्या ठेऊन, त्या पेटऊन द्याव्या, त्या आंचीनें, तळच्या रिकाम्या मडक्यांत किंवा भांड्यांत तेल उतरतें. विस्तव आपोआप विझून थंड झाल्यावर, हळूच तळचें पात्र सोड-वून घेऊन, त्यांत पडलेलें तेल बाटलींत भरून ठेवावें, आणि वाटेल तेव्हां तें उप-योगांत आणावें.

कै० ज्योतिर्विद दाजी हरि भट्ट पदे यांचे स्मारक



वर्ष १४ वें.

# आर्यभिषक्

अंक ९ वा



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।

अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ –श्रीवाग्भटः ।

मीनसंक्रांति.–शके १८२४ फाल्गुन वद्य १ शनिवार. ता. १४ मार्च, सन १९०३.

**विषयानुक्रम.**—सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान, उत्तरार्ध. त्रिदोषविचार वगैरे.

**सूचना**—येत्या अंकापासून **सर्व देखाव्यांसहित चरकाचें शारीरस्थान** येईल.

---

**सन १९०३ एप्रील अखेरपर्यंत 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाच्या १५ व्या वर्षाची अगाऊ वर्गणी भरणारांस**

# बक्षिसें.

**नवीन वर्गणीदार होणारे किंवा जुने असलेले यांनी आर्यभिषक्** मासिकपुस्तकाच्या १५ व्या वर्षाची वर्गणी [ जुलैस १५ वें वर्ष लागतें ती वर्गणी ] जर **एप्रीलपर्यंत** भरली तर त्यांस खालील बक्षिसें मिळतील:—

**(१) श्रीपंढरीनाथांच्या काकड आरतीचे अभंग हें पुस्तक;**
आणि (२) **दासबोध.चा एकविसावा दशक.**

त्याशिवाय—

# सविग्रह संस्कृत आणि मराठी कोश.

हें पुस्तक **५ रुपये** किंमतीचें आहे, तें देखील, सदरप्रमाणें वर्गणीदार होणारांस दीड **रुपयास** मिळेल.

**यांत—अमरकोशांतील प्रत्येक शब्दाचा विग्रह, अर्थ, वृत्ति, धातु, लिंगबोध, शब्दार्थ व नानार्थ यांचा संग्रह वर्णानुक्रमानें केलेला आहे.**

मराठी भाषा साधारण समजणारांसही, हें पुस्तक जवळ असल्यानें, संस्कृत भाषेचें मर्म चांगल्या रीतीनें समजेल.

रायल ८ पेजी (मोठ्या आकाराचीं) सुमारे ७५० पृष्ठांचें हें उत्तम पुस्तक असल्यानें आणि हें अक्षयी उपयोगी पडणारें असल्यामुळें, याची

**पांच रुपये किंमत—म्हणजे योग्यच आहे!**

# तथापि

**केवळ अगाऊ वर्गणी भरणारांस एक प्रकारें बक्षिस समजून,**

**त्यांस हें पुस्तक आम्ही दीड रुपयास देत आहों.**

# तसेंच

**सार्थ ज्वरपराजय (सचित्र) पुस्तक २ रुपये किंमतीचें आहे तें ८ आण्यांत देण्यांत येईल.**

**विशेष सूचना:**—(१) बक्षिसांच्या व कमी किंमतीच्या पुस्तकांस लागणारा टपालखर्च वर्गणीदारांस भरावा लागेल. [ २ ] आर्यभिषक् व भारतधर्म दोन्ही मिळ

कै० ज्योतिर्विद् वामन हरि भट्ट पदे यांचे स्मारक.

वर्ष १४ वें.) आर्यभिषक्. (अंक ९ वा.

ARYABHISHAK or DOCTOR OF ARYANS.
A Monthly Journal Containing Medical news and articles.

मीन संक्रांति. शके १८२४ फाल्गुन वद्य १ शनिवार. ता० १४।३।१९०३.

# त्रिदोषविचार.-पित्त.

[रा. रा. अवधूत वासुदेव वैद्य यांजकडून.]

## पित्तभेद.

(अंक ४ थ्यावरून पुढें चालू.)

मागील प्रकरणांत पित्तासंबंधीं सामान्य माहिती देणें जरूर तेवढी दिली. पुढें पित्तासंबंधीं विशेष माहिती सांगावयाची ह्मणजे—त्याचीं एकंदर कार्यें, ज्या पांच प्रकारांखालीं मोडतात त्यांविषयीं (पाचक, रंजक, साधक, आलोचक व भ्राजक यांच्याविषयीं) लिहावयाचें.

प्रस्तुत लेख नुसता श्लोकमय असाच राखिला गेला किंवा केवळ श्लोकार्थाचीच परिस्फुटता झाली, तर कालमाहात्म्यानें, त्यांत असणारें महत्व कदाचित् व्यक्त होणार नाहीं असें मनांत वागतें. करितां त्या त्या पित्तप्रकारांतून घालण्याजोगा आधुनिक* शोध घेऊन, त्याशीं योग्य ती पित्तांची जुळणी करून दाखविणें बरें व जरूरीचें दिसतें.

इतक्यांत वर जें ह्मटलें तें सगळें बाह्यदृष्टया दिसण्याला व विचाराला मोठें गोड, सयुक्तिक व शक्य दिसतें. पण त्यांत जों जों विचार करावा तों

* पौरस्त्य कलांची क्षीणता, लोप आणि पाश्चिमात्यांची भरभराट व नूतन जन्म, या दोन्हीं गोष्टी वारंवार विचारांत आल्यानें असें ह्मणावें लागतें.

तों अशक्यता, असंभाव्यता, काठिन्य* भासतें. कारण कोणत्याहीं दोन निरनिराळ्या विचारांची जुळणी करून द्यावयाची ह्मणजे त्यांतील साम्य असेल तें नजरेपुढें ठेवावयाचें. अर्थात् जोंवर साम्य वाढतें तोंवर त्या निरनिराळ्या विचारांची संगति जुळेल. व भिन्नपणा नजरेंत आला कीं, मग त्यांत तुलना करणें भाग पडेल हें उघड आहे. तुलना करणें ह्मणजे गुणदोषांचें वा न्यूनाधिक्याचें विवरण करणें होय.

हाच प्रसंग प्रस्तुत प्रकरणीं आहे. ह्मणजे आर्यांग्लवैद्यकांतील भेदाचें स्पष्टीकरण करणें तूर्त प्राप्त आहे. आतां भेद दाखविणें किंवा तारतम्य जाणविणें वगैरे कृत्यांकरितां पुरी माहिती व बुद्धिमत्ता ह्यांची जरूरी असते. व मजजवळ या दोन्ही गोष्टींचा पुरा अभाव. तेंव्हां हें काम माझ्याकडून वठणें शक्यही नाहीं. उलटें कदाचित् उपहासार्ह देखील होईल. हें खरें, पण प्रसंग व जरूरी जाणून दोन शब्द थोडक्यांत लिहितों.

आंग्ल वैद्यकांत रक्त, मांस, मेंदु स्नायु, त्वचा इत्यादि पदार्थ व हृदय, फुप्फुस, यकृत् इ. अंतरावयव यांच्या संबंधीं योग्य विचार व चिकित्सा झालेल्या आहेत व नवीन ठरत आहेत, पण हे सर्व पदार्थ वा अंतरावयव दृष्ट आहेत. आर्य वैद्यकांत दृष्ट असे शरीरस्थ पदार्थ वा अंतरावयव यांवरच केवळ भर ठेवून विवरण

---

* हे विचार ज्या लेखावरून सुचले तो लेख महत्वाचा आहे. तरी त्यांतून कामापुरता येथें स्पष्टीकरणास घेतों. बाकी पुढें योग्य ठिकाणीं घातला जाईल.—

" आर्य व आंग्ल वैद्यकांच्या मानण्यामध्यें मुख्य भेद असा पडतो कीं, आर्यवैद्यकाचीं तत्वें दृष्ट व अदृष्ट अशा दोन्हीं प्रकारच्या पदार्थांस धरून ठरविलेलीं आहेत व आंग्ल वैद्यक केवळ दृष्ट पदार्थांवर आधार ठेवून आहे. आर्यवैद्यकांत वस्तु व तिची क्रिया, मुख्यत्वें तिची क्रिया प्रधान मानली गेली आहे. परंतु आंग्लवैद्यक निवळ त्या पदार्थासच मानितो. उदाहरणार्थ Muscle घ्या. त्याचा धर्म Contraction संकोचविकास हा आहे. आह्मी Muscle व Contraction शक्ति स्वतंत्र पदार्थ समजून कित्येक सिद्धांत ठरवूं. आंग्लवैद्यक तसें न करितां निव्वळ मसलचे अवयव पाहून थांबणार. या पद्धतिभेदामुळें त्यांनीं केलेलें निरूपण आमच्या निम्में असतें. अर्धा अदृष्टाचा, क्रियेचा अथवा शक्तीचा भाग त्यांत नसतो.

नाहीं; तर त्या त्या पदार्थांचे घटक वा अवयवांचे चालक यांस मध्यस्थ घेऊन विवरण झालेलें आहे. कांहीं कांहीं ठिकाणीं घटक वा चालक यांस ( दोषांस ) च महत्व दिलें आहे. ह्मणजे आर्य वैद्यकांत निदान व चिकित्सा ठरवितांना दृष्ट पदार्थ व त्यांतील अदृष्ट शक्ति यांचा विचार झाला आहे. आतां कोणत्याही पदार्थांतील शक्तिसंबंधी माहिती, कल्पना मनांत बरोबर आल्यास पदार्थज्ञान आपल्या आटोक्यांत येतें किंवा येण्याचा संभव असतो. हें आधुनिक निरनिराळ्या ( पदार्थविज्ञान, रसायन इ. ) शास्त्रांनीं सिद्ध आहे. तेव्हां नुसत्या पदार्थज्ञानापेक्षां तद्व्यापक शक्तीचें ज्ञान करून घेणें अत्यावश्यक ठरतें. असाच विचार आर्यवैद्यकांत आहे. ह्मणजे आर्य वैद्यकांत शक्तिविचार* जास्त —प्रमुख—पणें झाला आहे. आणि यामुळेंच तें आंग्ल वैद्यकाच्या पुढें आहे असें ह्मणावें लागतें.

आतां वरील ह्मणण्याचा खुलासा करणें योग्य व जरूरीचें जाणून थोडक्यांत करितों. व तो करितांना चालू पित्तदोषसंबंधींच वाग्भटांतील उतारा घेतों ह्मणजे विषयांतराची भीति उरणार नाहीं.

> **पित्तं त्वचि स्थितं कुर्याद्विस्फोटकमसूरिकाम्। रक्ते विसर्प-दाहंच मांसे मांसपाककोथनं ॥ स्नदाहान् मेदसि ग्रंथीन् स्वेदात्युद्गमनं तृषं । अस्थिदाहं भृशं मज्जिहारिद्रनखनेत्रतां ॥ पूतिपीतावभासंच शुक्रंशुक्रसमाश्रितां शिरागतां क्रोधनतां स्नायुगं तृषः । कोष्ठगं मदतृद्दाहान् व्यापिनोऽन्यांश्च याक्ष्मिणः ॥**

या श्लोकांतून दूषी पित्त निरनिराळ्या धातूंतून गेल्यास होणाऱ्या रोगांचें विवरण केलें आहे. तेंच खालीं देतों:—

दूषी पित्त रक्तसाह्यानें त्वचेंत संचय पावल्यास विस्फोट, मसूरिका ( देवी ) हे त्वचेचे रोग होतात. कारण त्वचेजवळ आलेलें तें दूषी रक्त बाहेर पडायला पाहतें अर्थात् त्वचा उचलून येते. आतां दूषी पित्त त्वचेजवळ न येतां रक्तां-

---

* दोषा एव हि सर्वेषां रोगाणामेककारणं ॥—वाग्भट, सूत्रस्थान.

तच राहूं लागल्यास तसें दूषी रक्त जेथें जमेल त्या स्थळीं विसर्प, आग होणें, जळजळणें इ. रक्तविकारांत मोडणारे रोग होतात. तसेंच तें पित्त मांसांतच संचय पावल्यास मांस फुलपुलित होणें, कधीं तर तेवढें तें कुजणें अशा क्रिया वडून मांस रोग होतात. पण मेदांत संचय पावल्यास मेदोजन्य ग्रंथि दाहयुक्त अशा होतात, स्वेद जास्त सुटतो, मेदांतील ओलावा कमी होऊन अंतस्त्वचा क्षुब्ध होते; असा प्रकार आमाशयांतही घडतो व त्यामुळें तेथें कफ सुटूं लागतो, पुढें वमन होण्यास पाहतें व त्याच कारणानें तहानही लागते. याप्रमाणेंच अस्थींत पित्तसंचय झाल्यास हाडांत दाह होतो. हा दाह इतर धातूंतून घडणाऱ्या दाहाहून विलक्षण असतो. आतां मज्जेंत पित्तसंचय झाल्यास नखें व नेत्र हीं पिंवळीं बनतात; कारण या भागांचा मज्जेशीं संबंध आहे. अशा रीतीनें दूषी पित्तानें मज्जेचे रोग होतात. शुक्रांत पित्तसंचय झाल्यास शुक्राचा रंग पिवळसर बनून त्यास घाण मारते. ह्मणजे शुक्राचा रोग होतो. पण पित्त शिरागत झाल्यास क्रोधाविष्टता इ० येते, परंतु जेव्हां कोष्ठांतच तसा तो संचय होतो तेव्हां मद, भ्रम, प्रलाप, बेशुद्धि, तृषा, दाह, पोटांत आग पेटणें वा आंगाची लाही होणें इ० विकार होतात.

तेव्हां त्वचेचे, रक्ताचे, मांसाचे, अस्थीचे वगैरेचे जे रोग होतात, त्यांच्या उत्पत्तीस जीं कारणें असतील त्यांत पित्तही मोडतें असें वरील श्लोकांवरून स्पष्ट होतें. व असें कळल्यामुळेंच त्या त्या रोगांची चिकित्सा करितांना आणखी निराळी लक्षणांची सरणी लक्ष्यांत घेण्याची आवश्यकता लागत नाहीं. आतां आंग्ल वैद्यकांत अशा पद्धतीनें रोगांचें विवेचन नसल्यानें निरानिराळ्या रोगांचीं जीं कमी अधिक लक्षणें अनुभवानें गोळा केलेलीं त्यांस अनुसरूनच वेळोवेळीं निदान व चिकित्सा करावी लागते. ह्मणजे त्यांत लक्षणास कारण ज्या शक्ति त्यांस धरून विवरण नसल्यानें लक्षणांचा विस्तार नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून त्यांवरच अवलंबून राहणें भाग पडतें. व त्याकरितां कधीं कधीं पडणारी उणीव भरून काढण्यांत यावी ह्मणून मधून मधून अंतरिंद्रियांच्या परीक्षेची आवश्यकता, त्यांची भर घालावी लागते. [पु. चा.]

---

श्रीशंकर.

'आर्यभिषक्' पुस्तकावलि, अंक ४०.

# सार्थ श्रीचरक संहिता.

## सूत्रस्थान, उत्तरार्ध.

### भाग १ ला, अध्याय १२ ते २२.

सम्पादक

आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.

चिकित्सितं वह्निवेश स्वस्थातुरहितं प्रति ।

यदिहास्ति तदन्यत्र यन्नेहास्ति न तत्क्वचित् ॥–दृढबल: ।

सर्व अधिकार स्वाधीन ठेवले आहेत.

शके १८२४–सन १९०२.

मुंबईत

" नेटिव ओपिनियन " छापखान्यांत छापविलें.

किंमत १॥ रु.

मुंबई, नवानागपाडा, आर्यभिषकार्यालय.

## सूचना.

चरकाच्या सूत्रस्थानाचा भाग बराच वाढत चालल्यामुळें, हा उत्तरार्धाचा पहिला भाग काढला आहे दुसरा भाग, लौकरच निघून सूत्रस्थान पूर्ण होईल. चिकित्सा-स्थान छापण्याचें सुरू आहे.

अर्पणपत्रिका.

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड,
जी. सी. एस्. आय्., सेनाखासखेल
समशेरबहादूर, राज्य बडोदें.

विद्याप्रसारार्थ महाराजसाहेबांचा अत्यंत
मार्मिक व स्तुत्य प्रयत्न, दया-दाक्षि-
ण्यादि सद्गुण, इत्यादिकांचा

आणि

तदाश्रयजन्यतेचा फलरूपी हा उपक्रम,
प्रेमादरविनयपुरःसर सादर
केला आहे.

झोपेचा त्याग करून विहित झोपेचें सेवन करावें ह्मणजे त्यापासून आरोग्य कायम राहतें.

> रात्रौ जागरणं रूक्षं स्निग्धं प्रस्वपनं दिवा ।
> अरूक्षमनभिष्यन्दि त्वासीनप्रचलायितम् ॥ ४९ ॥
> देहवृत्तौ यथाऽऽहारस्तथा स्वप्नः समासतः ।
> स्वप्नाहारसमुत्थे च स्थौल्यकार्श्ये विशेषतः ॥ ५० ॥

जागरण व निद्रा यांची रूक्षता व स्निग्धता त्यांच्या दिवसा किंवा रात्रीं सेवन करण्यावरच अवलंबून नाहीं. अर्थात् त्यांचे धर्म नियत आहेत. जागरण दिवसा किंवा रात्रीं केव्हांही केलें तरी त्यापासून रूक्षता उत्पन्न होते. तसेंच निद्रा ही दिवसा किंवा रात्रीं केव्हांही घेतली तरी ती स्निग्धता उत्पन्न करिते. फरक इतकाच आहे कीं, दिवसाचें जागरण, सूर्याच्या उष्णतेमुळें रात्रीच्या जागरणापेक्षां विशेष रूक्ष असतें. तशीच रात्रीची झोपही रात्रीच्या सौम्य वेळेमुळें दिवसाच्या झोपेपेक्षां अधिक स्निग्ध असते. रात्रीच्या झोपेच्या विशेष स्निग्धतेमुळें दिवसाच्या जागरणानें उत्पन्न होणाऱ्या रूक्षतेचा प्रतीकार होतो. ह्मणून त्याचा परिणाम होत नाहीं. तेंच जागरण रात्रीं केलें असतां त्याचा प्रतीकार करणारें कोणी नसल्यामुळें, उलट दिवसाच्या जागरणाची रूक्षता त्यास मदत करणारी असल्यामुळें त्यापासून रूक्षतेचे परिणाम होतात. ह्मणून रात्रीचें जागरण रूक्ष असें ह्मटलें आहे. तसेंच दिवसाच्या निद्रेविषयीं समजावें. बसल्या बसल्या झोंप घेण्यापासून रूक्षताही उत्पन्न होत नाहीं किंवा स्निग्धताही उत्पन्न होत नाहीं. निद्रा ही आहाराप्रमाणें आहे. शरीरनिर्वाहार्थ आहाराची अनिवार्य आवश्यकता आहे, तशीच निद्रेचीही आहे. आहार व निद्रा हीं योग्य काळीं, योग्य प्रमाणानें व योग्य रीतीनें घेतल्यास त्यापासून पुष्टि येते व

याच्या उलट प्रकारांनीं घेतल्यास विकार उत्पन्न होतात. स्थूलता व कृशाता हीं मुख्यत्वेंकरून आहार व निद्रेवर अवलंबून आहेत.

अभ्यङ्गोत्सादनं स्नानं ग्राम्यानूपौदका रसाः ।
शाल्यन्नं सदधिक्षीरं स्नेहो मद्यं मनःसुखम् ॥ ५१ ॥
मनसोऽनुगुणा गन्धाः शब्दाः संवाहनानि च ॥
चक्षुषस्तर्पणं लेपः शिरसो वदनस्य च ॥ ५२ ॥
स्वास्तीर्णं शयनं वेश्म सुखं कालस्तथोचितः ।
आनयन्त्यचिरान्निद्रां प्रनष्टा या निमित्ततः ॥ ५३ ॥

कांहीं कारणानें झोंप येत नसली तर—अंगास तेल मर्दन करणें, उटी लावणें, स्नान करणें; ग्राम्य व आनूप जलचर प्राण्यांचे मांसरस खाणें, दहीं—दुधाबरोबर शाल्यन्न खाणें, मद्यपान, चित्ताची प्रसन्नता, स्वतःस प्रिय असणाऱ्या सुगंधि द्रव्यांचा वास घेणें; गायन, वादन, वगैऱ्यांचे प्रिय शब्द ऐकणें; हातपाय दाबणें, डोळ्यांस शीतता पोंचविणें मस्तकास व तोंडावर शीतल द्रव्याची उटी लावणें, निजावयाची जागा रम्य असणें, सुंदर मऊ बिछाना व नेहमींच्या वेळेवर निजण्याचा यत्न करणें—या गोष्टी केल्यानें पुन्हा लवकरच झोंप येते.

कायस्य शिरसश्चैव विरेकश्छर्दनं भयम् ।
चिन्ता क्रोधः कथा धूमो व्यवायो रक्तमोक्षणम् ॥ ५४ ॥
उपवासोऽसुखा शय्या सत्त्वौदार्यं तमोजयः ।
निद्राप्रसङ्गमहितं वारयन्ति समुत्थिताम् ॥ ५५ ॥
एत एव च विज्ञेया निद्रानाशस्य हेतवः ।
कार्यं कालो विकारश्च प्रकृतिर्वायुरेव च ॥ ५६ ॥

विरेचन, शिरोविरेचन, भीति, काळजी, राग, गोष्टी, धूर, मैथुन, रक्त काढणें, उपास, मोडकातोडका, मळिन किंवा अन्य प्रकारें असुखदायक बिछाना आणि योगाभ्यासादिकेंकरून सत्त्वगुणाचा उत्कर्ष होऊन तमो-

गुण नाहींसा होणें, या गोष्टींनीं गुण करणारी व अवगुण करणारी दोन्ही प्रकारची झोंप आलेली मोडते. शिवाय एखाद्या कार्यांत मग्न झालेल्या मनुष्यास झोंप येत नाहीं; वृद्ध मनुष्यांस स्वभावतःच झोंप येत नाहीं; शूलादि विकार झाले असतां झोंप येत नाहीं; कित्येकांची प्रकृतीच अशी असते कीं, त्यांस झोंप विशेष येत नाहीं. तसेंच शरीरांत वाताचा जोर झाला असतांही झोंप येत नाहीं.


तमोभवा श्लेष्मसमुद्भवा च मनःशरीरश्रमसम्भवा च ।
आगन्तुकी व्याध्यनुवर्तिनी च रात्रिस्वभावप्रभवा च निद्रा॥५७
रात्रिस्वभावप्रभवा मता या तां भूतधात्रीं प्रवदन्ति निद्राम् ।
तमोभवामाहुरघस्य मूलं शेषं पुनर्व्याधिषु निर्दिशन्ति॥५८ ॥

निद्रा एकंदर तीन प्रकारची आहे. एक तमोगुणाच्या आधिक्यानें येणारी—ही कफविकारांत व मानसिक किंवा शारीरिक श्रम झाले असतां येते, दुसरी आगन्तुकी—ही सन्निपातज्वरादि असाध्य रोगांत येते, आणि तिसरी रात्रीच्या स्वभावधर्मानें येणारी. यांपैकीं रात्रीच्या स्वभावधर्मानें येणारी निद्रा प्राणिमात्रांचें पोषण करणारी व आरोग्य देणारी आहे. ह्मणूनच तीस भूतधात्री असें ह्मणतात. तमोगुणाच्या आधिक्यानें येणारी निद्रा पापाचें मूळ आहे असें मानितात. कारण, नेहमीं निद्रेंत वेळ घालविल्यानें मनुष्य आपल्या कर्तव्यापासून विमुख होतो. तिसरी आगन्तुकी निद्रा रोगांच्या संबंधानेंच येत असल्यामुळें तीस स्वयंही रोगरूपच मानितात.

निन्दिताः पुरुषास्तेषां यौ विशेषेण निन्दितौ ।
निन्दिते कारणं दोषास्तयोर्निन्दितभेषजम् ॥ ५९ ॥
येभ्यो यदा हिता निद्रा येभ्यश्चाप्यहिता यदा ।
अतिनिद्रानिद्रयोश्च भेषजं यद्भवा च या ॥ ६० ॥
या या यथाप्रभावा च निद्रा तत्सर्वमात्रेजः ।
अष्टौनिन्दितसंख्याते व्याजहार पुनर्वसुः ॥ ६१ ॥

आठ प्रकारचे निन्दित मनुष्य, त्यांतही दोन विशेष निन्दित प्रकार, असें होण्याचें कारण, त्यांचे दोष, त्यांवर चिकित्सा, कोणत्या वेळीं कोणी निजलें असतां त्यापासून गुण होतो व कोणत्या वेळीं अवगुण होतो, अतिनिद्रा व अनिद्रा यांचीं कारणें व त्यांवर उपाय आणि कोणकोणत्या निद्रेंत काय काय प्रभाव आहे, या सर्व विषयांचें सविस्तर विवेचन या अष्टौनिन्दितीय अध्यायांत महर्षि आत्रेयानीं केलें आहे.

एकविंशोऽध्यायः समाप्तः



# अथ द्वाविंशोऽध्यायः

अथातो लङ्घनबृंहणीयमध्यायं व्याख्यास्यामः ।
इति ह स्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण लंघनबृंहणीय नांवाच्या अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

तपःस्वाध्यायनिरतानात्रेयः शिष्यसत्तमान् ।
षडग्निवेशप्रमुखानुक्तवान्परिचोदयन् ॥ २ ॥
लङ्घनं बृंहणं काले रूक्षणं स्नेहनं तथा ।
स्वेदनं स्तम्भनञ्चैव जानीते यः स वै भिषक् ॥ ३ ॥
तमुक्तवन्तमात्रेयमग्निवेशं उवाच ह ।
भगवँल्लंघनं किंस्विल्लंघनीयाश्च कीदृशाः ॥ ४ ॥
बृंहणं बृंहणीयाश्च रूक्षणीयाश्च रूक्षणम् ।
स्नेहनं स्नेहनीयाश्च स्वेदाः स्वेद्याश्च के मताः ॥ ५ ॥
स्तम्भनं स्तम्भनीयाश्च वक्तुमर्हसि तद्गुरो ।
लङ्घनप्रभृतीनाञ्च षण्णामेषां समासतः ॥ ६ ॥
कृताकृतातिरिक्तानां लक्षणं वक्तुमर्हसि ।
वचस्तदग्निवेशस्य निशम्य गुरुरब्रवीत् ॥ ७ ॥

आत्रेय महर्षि, तपश्चर्या व स्वाध्यायांत मग्न झालेल्या, आपल्या अग्निवेशादि सहा पट्टशिष्यांस ज्ञान व्हावें ह्मणून सांगते झाले कीं, लंघन, बृंहण, रूक्षण, स्नेहन, स्वेदन व स्तम्भन या सहा क्रियाचें ज्यास उत्तम

ज्ञान असेल तोच खरा वैद्य समजावा. हें आत्रेयांचें भाषण ऐकून अग्निवेशांनीं प्रार्थना केली कीं, हे गुरो! हे भगवन्! लंघन ह्मणजे काय व तें कोणास द्यावयाचें, बृंहण ह्मणजे काय, रूक्षण ह्मणजे काय, स्नेहन कसें असतें, स्वेदन कसें असतें, तसेंच स्तम्भन ह्मणजे काय व या क्रिया कोणकोणत्या प्रकारच्या मनुष्यांवर करावयाच्या, त्याचप्रमाणें या लंघनादि सर्व क्रिया बरोबर झाल्या किंवा त्यांचा अयोग अथवा अतियोग झाला हें ओळखण्याचीं लक्षणें आपण कृपा करून सांगावीं. ही अग्निवेशाची प्रार्थना ऐकून आत्रेय ऋषि पुढील विवेचन करते झाले.

यत्किञ्चिल्लाघवकरं देहे तल्लङ्घनं स्मृतम् ।
बृहत्वं यच्छरीरस्य जनयेत्तच्च बृंहणम् ॥ ८ ॥
रौक्ष्यं खरत्वं वैशद्यं यत्कुर्यात्तद्धि रूक्षणम् ।
स्नेहनं स्नेहविष्यन्दमार्दवक्लेदकारकम् ॥ ९ ॥
स्तम्भगौरवशीतघ्नं स्वेदनं स्वेदकारकम् ।
स्तम्भनं स्तम्भयति यद्गतिमन्तं चलं ध्रुवम् ॥ १० ॥

जें शरीरांत हलकेपणा उत्पन्न करितें तें लंघन व स्थूळपणा किंवा जडपणा उत्पन्न करितें तें बृंहण समजावें. जें शरीरास शुष्क, खरखरीत व विशद (चिकट किंवा बुळबुळीत नसलेलें) करितें तें रूक्षण आणि स्निग्धता, पातळपणा, नरमपणा व ओलसरपणा उत्पन्न करितें तें स्नेहन होय. शरीराचा अवरोध, जडपणा व थंडी नाहींसें करितें आणि घाम उत्पन्न करितें तें स्वेदन आणि वाहुं[1] गाऱ्या, चलायमान किंवा चढणाऱ्या व पातळ अशा पदार्थांचा अवरोध करितें तें स्तंभन समजावें.

लघूष्णतीक्ष्णविशदं रूक्षं सूक्ष्मं खरं सरम् ।
कठिनञ्चैव यद्द्रव्यं प्रायस्तल्लङ्घनं स्मृतम् ॥ ११ ॥
गुरुशीतमृदुस्निग्धं बहलं स्थूलपिच्छिलम् ।
प्रायो मन्दं स्थिरं श्लक्ष्णं द्रव्यं बृंहणमुच्यते ॥ १२ ॥

---

१ अतिसारादिकांत रक्तादि वाहणें व विषाचे वेग चढणें वगैरे.

रूक्षं लघु खरं तीक्ष्णमुष्णं स्थिरमपिच्छलम् ।
प्रायशः कठिनञ्चैव यद्द्रव्यं तद्धि रूक्षणम् ॥ १३ ॥
द्रवं सूक्ष्मं सरं स्निग्धं पिच्छिलं गुरु शीतलम् ।
मन्दं मृदु च प्रायो यद्द्रव्यं तत्स्नेहनं मतम् ॥ १४ ॥
उष्णतीक्ष्णं सरं स्निग्धं रूक्षं सूक्ष्मं द्रवं स्थिरम् ।
द्रव्यं गुरु च यत्प्रायस्तद्धि स्वेदनमुच्यते ॥ १५ ॥
शीतं मन्दं मृदु श्लक्ष्णं रूक्षं सूक्ष्मं द्रवं स्थिरम् ।
यद्द्रव्यं लघुचोद्दिष्टं प्रायस्तत्स्तम्भनं स्मृतम् ॥ १६ ॥

हलकें, उष्ण, तीक्ष्ण, स्वच्छ, रूक्ष, सूक्ष्म (सुटें, मोकळें), खरखरीत, वाहणारें व कठिण अशा प्रकारचा पदार्थ बहुतकरून लंघन असतो. जड, थंड, नरम, स्निग्ध, जाड, घट्ट (लाडू वगैरे), बुळबुळीत, उशिरां परिणाम करणारे, न वाहणारे व मृदु अशा प्रकारचे पदार्थ बहुशः बृंहण करणारे असतात. रूक्ष¹, हलकें, खरखरीत, तीक्ष्ण, उष्ण, स्थिर, स्वच्छ व बहुशः कठिण पदार्थ रूक्षण करणारे असतात. पातळ, विरळ, वाहणारे, स्निग्ध, बुळबुळीत, जड, थंड, बहुशः उशिरां क्रिया करणारे व मृदु असे पदार्थ स्नेहन करणारे असतात. उष्ण, तीक्ष्ण, वाहणारे किंवा न वाहणारे, स्निग्ध किंवा रूक्ष, विरळ, पातळ, व प्रायः जड पदार्थ स्वेदनकारक असतात. थंड, सावकाश क्रिया करणारे, मृदु, श्लक्ष्ण, रूक्ष, मोकळे, पातळ, न वाहणारे, व हलके पदार्थ प्रायः स्तम्भक असतात.

---

१ रूक्ष व लंघन या दोहींचीं लक्षणें एकसारखींच सांगितलीं आहेत. फरक इतकाच कीं लंघनांत लघुतेचें प्राधान्य असतें व रूक्षणांत रूक्षतेचें असतें. याच भेदानुसार लंघनांत लघु पद प्रथम घातलें आहे व रूक्षणांत रूक्ष पद आरंभीं योजिलें आहे. सारांश, रूक्षणांत स्निग्धतेचा अभाव व लंघनांत जडपणाचा अभाव अभीष्ट असतो.

चतुष्प्रकारा संशुद्धिः पिपासा मारुतातपौ ।
पाचनान्युपवासश्च व्यायामश्चेति लङ्घनम् ॥ १७ ॥
प्रभूतश्लेष्मपित्तास्रमलाः संसृष्टमारुताः ।
बृहच्छरीरा बलिनो लङ्घनीया विशुद्धिभिः ॥ १८ ॥
येषां मध्यबला रोगाः कफपित्तसमुत्थिताः ।
वम्यतीसारहृद्रोगविसूच्यलसकज्वराः ॥ १९ ॥
विबन्धगौरवोद्गारहृल्लासारोचकादयः ।
पाचनैस्तान्भिषक्प्राज्ञः प्रायेणादावुपाचरेत् ॥ २० ॥
एत एव यथोद्दिष्टा येषामल्पबला गदाः ।
पिपासानिग्रहैस्तेषामुपवासैश्च ताञ्जयेत् ॥ २१ ॥
रोगाञ्जयेन्मध्यबलान्व्यायामातपमारुतैः ।
बलिनां किं पुनर्येषां रोगाणामवरं बलम् ॥ २२ ॥

वमन, विरेचन, नस्य व आस्थापन बस्ती, तहानेचा निग्रह, वारा व उन्हांत फिरणें, पाचन, उपास व कसरत वगैरे परिश्रम करणें, हे—लंघन द्रव्यें न सेवन करितांना लाघव उत्पन्न करण्याचे दहा लंघनप्रकार आहेत. त्यांपैकीं ज्यांच्या शरीरांत कफ, पित्त, रक्त व मल हे विशेष असून ज्यांचा वायु दूषित झाला असेल, ज्यांचें शरीर स्थूल असेल किंवा जे बलवान् असतील, त्यांनीं लंघन करावयाचें तें वमनविरेचनादि संशोधनाच्या योगानें करावें. ज्यास कफ व पित्तापासून उत्पन्न होणारे, वमन, अतिसार हृद्रोग, विषूचिका, अलसक, ज्वर, मलावरोध, अंग जड होणें, ढेंकर, मळमळ, अरुची वगैरे रोग मध्यम बलाचे झाले असतील, त्यांचें लंघन, वैद्यानें आरंभीं पाचक औषधांच्या द्वारा करावें. हेच रोग अगदीं अल्पबल असले तर, तहान मारून व उपासांच्या द्वारानें ते बरे करावे. मध्यम बलांच्या लंघनीय रोगांत व्यायाम, ऊन व वारा यांच्या सेवनानें लंघन करावें. बलवान् मनुष्यास, एखादा अल्पबलाच्या लंघनानें बरा होणारा रोग झाला तर तो, व्यायामादिकांच्या द्वारा लंघन करून बरा करावा.

त्वग्दोषाणां प्रमीढानां स्निग्धाभिष्यन्दिबृंहिणाम् ।
शिशिरे लङ्घनं शस्तमपि वातविकारिणाम् ॥ २२ ॥

त्वचेचे रोग झालेले, प्रमेह रोगी, ज्यांचें शरीर स्निग्ध, अभिष्यन्दि व पुष्ट आहे असे व वातरोगी यांस यांतील दहाही प्रकारचें लंघन देण्यास (शिशिरगुणयुक्त) हेमन्त व शिशिर ऋतू प्रशस्त आहेत.

अदिग्धं विद्धमक्लिष्टं वयःस्थं सात्म्यचारिणाम् ।
मृगमत्स्यविहङ्गानां मांसं बृंहणमुच्यते ॥ २३ ॥
क्षीणाः क्षताः कृशा वृद्धा दुर्बला नित्यमध्वगाः ।
स्त्रीमद्यनित्या ग्रीष्मे च बृंहणीया नराः स्मृताः ॥ २४ ॥
शोषार्शोग्रहणीदोषैर्व्याधिभिः कर्शिताश्च ये ।
तेषां क्रव्यादमांसानां बृंहणा लघवो रसाः ॥ २५ ॥
स्नानमुत्सादनं स्वप्नो मधुराः स्नेहबस्तयः ।
शर्करा क्षीरसर्पींषि सर्वेषां विद्धि बृंहणम् ॥ २६ ॥

ज्यांस विषारी शस्त्र लागलेलें नाहीं असे, निरोगी, तरुण व त्यांच्या प्रकृतीस मानवणाऱ्या प्रदेशांत संचार करणार, अशा मृग, मत्स्य व पक्ष्यांचें मांस बृंहणकारक असतें. क्षीण झालेले, क्षतरोगी, कृश झालेले, म्हातारे, अशक्त, नेहमीं रस्ता चालणारे आणि नेहमीं स्त्रीसंग व मद्यपान करणारे असे रोगी असतील त्यांचें बृंहण ग्रीष्म ऋतूंत करावें. क्षयरोग, मूळव्याध व संग्रहणी रोगांनीं कृश झालेल्या मनुष्यांस क्रव्याद ( मांसाहारी ) पक्ष्यांचा मांसरस संस्कारांनीं हलका करून बृंहणार्थ द्यावा; किंवा क्रव्याद पक्ष्यांपैकीं हलका जो ससाणा पक्षी त्याचा मांसरस द्यावा. स्नान, उटणें, मर्दन, झोंप मधुरगणोक्त औषधांनी अनुवासन बस्ती, साखर, दूध व तूप हीं सर्व प्रकारच्या मनुष्यांचें बृंहण करतात.

कटुतिक्तकषायाणां सेवनं स्त्रीष्वसंयमः ।
खलिपिण्याकतक्राणां मध्वादीनां च रूक्षणम् २७ ॥
अभिष्यन्दा महादोषा मर्मस्था व्याधयश्च ये ।
ऊरुस्तम्भप्रभृतयो रूक्षणीया निदर्शिताः ॥ २८ ॥

तिखट, कडू व तुरट पदार्थांचें सेवन, अतिशय स्त्रीसंग, शिरसाची खळ, तिळांची खळ, (किंवा हिंग) ताक व मध वगैरे पदार्थ रूक्षण

करणारे आहेत. कफरोग, ज्यांत वातादि दोष फार वाढलेले असतील असे रोग, मर्मस्थानांतील रोग व ऊरुस्तंभ, आढ्यवात, प्रमेह वगैरे रोगांत रूक्षण द्यावें हें मागेंच सांगितलें आहे.

स्नेहाः स्नेहयितव्याश्च स्वेदाः स्वेद्याश्च ये मताः ।
स्नेहाध्याये मयोक्तास्ते स्वेदाख्ये च सविस्तरम् ॥ २९ ॥
द्रवं तन्वसरं यावच्छीतीकरणमौषधम् ।
स्वादु तिक्तं कषायश्च स्तम्भनं सर्वमेव तत् ॥ ३० ॥
पित्तक्षाराग्निदग्धा ये वम्यतीसारपीडिताः ।
विषस्वेदातियोगार्ताः स्तम्भनीयास्तथाविधाः ॥ ३१ ॥

स्नेह व स्वेदाचे सर्व प्रकार व त्यांपैकीं कोणते कोणास कशा रीतीनें द्यावे वगैरे विषयांचें सविस्तर निरूपण मागें स्नेह व स्वेदाध्यायांत केलें आहे. वाहणारीं, पातळ, स्थिर अशा स्वरूपाचीं व मधुर, कडू, तुरट रुचीचीं आणि शैत्योत्पादक गुणांचीं जीं औषधें तीं सर्व स्तंभक समजावीं. पित्त, क्षार व अग्नि यांहींकरून दग्ध झालेले, वांति व अतिसार झालेले, विष चढलेले, स्वेदाचा अतियोग झालेले व अशाच प्रकारचे इतर विकार झालेले—अशा सर्व रोग्यांचें स्तंभन करावें.

वातमूत्रपुरीषाणां विसर्गे गात्रलाघवे ।
हृदयोद्गारकण्ठस्य शुद्धौ तन्द्राक्लमे गते ॥ ३२ ॥
स्वेदे जाते रुचौ चैव क्षुत्पिपासासहोदये ।
कृतं लङ्घनमादेश्यं निर्व्यथे चान्तरात्मनि ॥ ३३ ॥
पर्वभेदोऽङ्गमर्दश्च कासः शोषो मुखस्य च ।
क्षुत्प्रणाशोऽरुचिस्तृष्णा दौर्बल्यं श्रोत्रनेत्रयोः ॥ ३४ ॥
मनसः संभ्रमोऽभीक्ष्णमूर्द्ध्ववातस्तमो हृदि ।
देहाग्निबलनाशश्च लङ्घनेऽतिकृते भवेत् ॥ ३५ ॥

अधोवायु, मल व मूत्र वेळच्या वेळीं साफ होणें, शरीर हलकें होणें, हृदय, ढेंकर, घसा व तोंड स्वच्छ होणें, गुंगी व थकवा नाहींसा होणें, घाम येणें, तोंडास रुचि येणें, प्रखर भूक व तहान लागणें किंवा भूक व तहान एकदम लागणें आणि मन प्रसन्न होणें, हीं लंघन बरोबर रीतीनें झाल्याचीं लक्षणें आहेत. बोटांचीं पेरें फुटणें, अंग मोडणें, खोकला, तों-

डास कोरड पडणें, भूक मरणें, तोंडाची रुची नाहींशी होणें, तहान लागणें, कान व डोळे दुर्बळ होणें, मनाची भ्रांति, वरचेवर उचकी, दम, कानांत भणभण शब्द होणें, जांभया वगैरे ऊर्ध्ववातांचीं लक्षणें होणें, हृदय कळकळणें आणि शरीर व जठराग्नि मंदावणें. हीं लक्षणें लंघनाचा अतियोग झाला असतां होतात.

बलं पुष्ट्युपलम्भश्च कार्श्यदोषविवर्जनम् ।
लक्षणं बृंहिते स्थौल्यमति चात्यर्थबृंहिते ॥ ३६ ॥
कृताकृतस्य लिङ्गं यल्लङ्घिते तद्धि रूक्षिते ।
स्तम्भितः स्याद्बले लब्धे यथोक्तैश्चामयैर्जितैः ॥ ३७ ॥
श्यावता स्तब्धगात्रत्वमुद्वेगो हनुसंग्रहः ।
हृद्वर्चोनिग्रहश्च स्यादतिस्तम्भितलक्षणम् ॥ ३८ ॥

शक्ति व पुष्टि येणें आणि कृशतेंत थंडी, उष्णता वगैरे न सहन होण्याचे व इतर जे दोष असतात ते नाहींसे होणें ह्मणजे ते सर्व सहन करण्याची शक्ति येणें, हीं बृंहण योग्य प्रमाणांत झाल्याचीं द्योतक लक्षणें होत. बृंहणाचा अतियोग झाला असतां स्थूलता येते. जीं लक्षणें लंघनाचा बरोबर योग व अतियोग झाला असतां होतात तींच रूक्षणाच्याही योग व अतियोगांत होतात. ज्या विकारांत स्तंभन दिलें असेल, ते विकार नाहींसे होऊन रोग्यास शक्ति आली ह्मणजे स्तंभन बरोबर झालें असें समजावें. अतिस्तंभन झालें असतां शरीराचा उदी रंगाप्रमाणें वर्ण होतो, इंद्रियें आखडतात, ऊर्ध्ववात चढतो, हनुग्रह होतो, हृदय आंखडतें व मलाचा अवरोध होतो.

लक्षणं चाकृतानां स्यात्षण्णामेषां समासतः ।

---

१ 'क्षुत्पिपासासहोदयः' याचा चक्रपाणिदत्तांनीं 'पीडाकरत्वेनोदयः' ह्मणजे असह्य पीडा करणारी भूक व तहान लागते असा अर्थ केला आहे व प्रमाणार्थ 'सृष्टमारुतविण्मूत्रक्षुत्पिपासासहं लघुम्' या सुश्रुतवचनाचा उल्लेख केला आहे, परंतु वाग्भटांनीं योग्य लंघनाचें लक्षण सांगण्याकारितां 'क्षुत्तृट् सहोदयः शुद्धहृदयोद्गारकण्ठता । व्याधिमार्दवमुत्साहस्तन्द्रानाशश्च लंघिते' हा श्लोक लिहिला आहे. त्यांत भूक व तहान ही बरोबर एकाच वेळीं लागतात असें सांगितलें आहे. याप्रमाणें उक्त दोन्हीं अर्थ प्रमाणसिद्ध आहेत.

२ ऊर्ध्ववाताचा अर्थ या ठिकाणीं ऊर्ध्व श्वास असा घ्यावयाचा नाहीं. कारण तो कफाच्या प्रकोपानें होतो व या ठिकाणीं लंघनानें कफाचा क्षय झालेला असतो.

तद्दोपगानां धातूनामसमो वृद्धिरेव च ॥ ३९ ॥
इति षट् सर्वरोगाणां प्रोक्ताः सम्यगुपक्रमाः ।
साध्यानां साधने सिद्धा मात्राकालानुरोधिनः ॥ ४० ॥

हे साही लंघनादि प्रकार कमी प्रमाणांत झाले असतां लंघनादिसाध्य दोष विषम होतात व वाढतात. यावरून लंघनादिक्रियांच्या अयोगानें उलट दोषाचा क्षोभ होतो हें सिद्ध होतें. याप्रमाणें सर्व रोगांवर चालणारी ही लंघनादि सहा प्रकारची चिकित्सा सविस्तर सांगितली आहे. ही प्रमाण व काल यांचा विचार करून केल्यास सर्व प्रकारचे साध्य रोग बरे होतात.

दोपाणां बहुसंसर्गात्संकीर्यन्ते ह्युपक्रमाः ।
षट्त्वं तु नातिवर्तन्ते त्रित्वं वातादयो यथा ॥ ४१ ॥
इत्यस्मिँल्लंघनाध्याये व्याख्याताः षडुपक्रमाः ।
यथाप्रश्नं भगवता चिकित्सा यैः प्रवर्तिता ॥ ४२ ॥

वातादि तीन दोपांचा संसर्ग व सन्निपाताच्या अनेक भेदांमुळें त्यांवर करावयाची चिकित्साही अनेक प्रकारें मिश्रित होते; परंतु त्यामुळें त्याच्या नियत सहा संख्येच्या बाहेर ते जात नाहींत. ज्याप्रमाणें वातादि दोप तीन आहेत त्यांचें अनेक प्रकारें मिश्रण होतें; परंतु मिश्रणात देखील प्रत्येक दोष आपापलें ठरीव स्वाभाविक कार्यच करतो; ह्मणून संसर्गसान्निपातेंकरून किती जरी भेद झाले तरी मूळ दोप तीनच कायम राहतात. तसेंच, चिकित्सा करावयाची ह्मणजे तिचा वरील लंघनादि सहा प्रकारांतच समावेश व्हावयाचा. आता त्याचे आपसांत 'लंघन स्वेदन, बृंहण-स्वेदन ' असे संसर्ग होतात; परंतु अशा संसर्गांत देखील लंघन आपलें कार्य स्वतंत्र करितें व स्वेदनही आपलें कार्य निरपेक्ष करितें. जसें तूप व मध मिळविलें असतां तें मिश्रण दोहोंच्या पृथक् पृथक् क्रियांच्या व्यतिरिक्त तिसरेंच कार्य करितें, तसें वातादि दोपाचें किंवा चिकित्सेच्या उक्त प्रकारांचें नाहीं. ह्मणून कितीही संयोग प्रकार झाले तरी त्यांच्या मूळ सहा संख्येस बाध येत नाहीं. याप्रमाणें या लंघनबृंहणीय अध्यायांत आत्रेय महर्षींनीं अग्निवेशाच्या प्रश्नावरून चिकित्सेच्या सहा प्रकारांचें सविस्तर प्रतिपादन केलें आहे.

एकदम घेणारांस वर्षाची टपालसह वर्गणी १ रु. १० आणे, फक्त आर्यभिषक् घेणारांस १॥ रुपया व फक्त भारतधर्म घेणारांस १ रुपया.

**वर्गणी पाठवून बक्षिसें व्ही. पी. नें मागवावीं किंवा व्ही. पी. तच वर्गणी आकारण्याची सूचना करावी**

☞ **ध्यानांत ठेवा !**

बक्षिसें देण्याचीं पुस्तकें किंवा कमी किंमतीस देण्याचीं पुस्तकें संपून गेल्यावर मागणी करणारांस तीं मिळणें संभवनीय नाहीं. म्हणून—**त्वरा करा व लौकर मागवा !!**

आर्यभिषक्कार्यालय.
मुंबई, पोस्ट गिरगांव.

**व्यवस्थापक आर्यभिषक्.**

---

# श्रीसयाजी–औषधशाला.

## मुंबई, माधवबागेजवळ. (पोस्ट गिरगांव.)

**अधिपति व नियोजक-वैद्यराज**

**आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.**

(१.) **रोगपरीक्षा करून औषधें** देण्यांत येतात. केवळ गरीबांनां सकाळीं ८ ते ९ पर्यंत **धर्मार्थ** औषधें मिळतात.

(२.) **सप्रमाण-शास्त्रशुद्ध औषधें** तयार केलेलीं विकत मिळतात. यादी मागवा.

(३.) वैद्यकविषयाची भरपूर माहिती देणारें सुप्रसिद्ध '**आर्यभिषक्**' **मासिकपुस्तक १४** वर्षें एकसारखें निघत असतें. सर्व भारतीयांनां अत्यंत उपयुक्त अशा '**भारतधर्म**' मासिकपुस्तकासह मिळतें. टपालसहित वार्षिक वर्गणी १ रु. १० आणे. **फक्त आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **फक्त भारतधर्म** घेतल्यास १ रु०

(४.) आर्यभिषक्-पुस्तकावलींतील-**वैद्यकाच्या भिन्न भिन्न विषयांच्या संपूर्ण माहितीचीं निरनिराळीं पुस्तकें** विक्रीस तयार आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होतील त्यांस मात्र—

**निम्मे किंमतीस**

मिळतात. **सार्थ श्रीचरकसंहिता** हा ऋषिप्रणित जगन्मान्य वैद्यकग्रंथ, **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या उदाराश्रयानें**, भागशः छापत असून, तोही सदरप्रमाणेंच मिळतो. सर्व माहिती, यादी व नमुना मागवा.

(५.) काढे, चूर्णें वगैरेंसाठीं खात्रीच्या **वनस्पतीही येथें मिळतात.**

श्रीसयाजी–औषधशाला,
मुंबई, पोस्ट गिरगांव.

**नारायण बाळशास्त्री अणुत्रे,**
व्यवस्थापक वैद्य—श्रीस. औ.

**विशेष सूचना.**—प्रत्येक बाबतीचा पत्रव्यवहार, मनिआर्डर वगैरे "**आ. म. धं. शंकर दाजी शास्त्री पदे**" **यांच्या नांवें** "मुंबई, पोस्ट गिरगांव" या पत्त्यावर करणें.

# वैद्यकाचें ज्ञान पायाशुद्ध व सविस्तर होण्यासाठीं
## अत्यंत सुलभ ग्रंथसंग्रह.

निरनिराळ्या विषयांकरितां मुद्दाम स्वतंत्र ग्रंथ तयार केले आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होणारांस **निम्मी किंमत !**

'आर्यभिषक्' मासिकपुस्तकांत वैद्यकाचे स्वतंत्र ग्रंथ व तत्संबंधींच माहिती प्रसिद्ध होत असते. सन १८८९ च्या जुलैपासून हें एकसारखें १४ वर्षे चालू आहे. हल्ली **वर्गणी फारच कमी**—वर्षास टपालसह फक्त सव्वा रु. केली आहे. **'भारतधर्म'** मासिक पुस्तक त्याबरोबरच मिळतें; त्याची वर्गणी ६ आणे, मिळून **टपालसुद्धां फक्त** १ रु. १० आणे. **फक्त** 'आर्यभिषक्' घेणारांस १॥ रु. व **फक्त** 'भारतधर्म' घेणारांस १ रु.

**विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.** किंमतीशिवाय टपालखर्च.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| वनौषधी-गुणादर्श, भाग १ ला | १२ आ. | | सार्थ श्रीचरकसंहिता, सूत्रस्थान, पूर्वार्ध. | २ रु. |
| " भाग २ रा. | १ रु. | | " सूत्रस्थान उत्तरार्ध—भा. १ ला. | १॥ |
| " भाग ३ रा. | १। रु. | | " " भा. २ रा | २ रु. |
| " भाग ४ था. | १॥ रु. | | " निदानस्थान ... | १४ आ. |
| " भाग ५ वा. | १। रु. | | " विमानस्थान ... | १॥ रु. |
| " भाग ६ वा. | १२ आ. | | " इंद्रियस्थान ... | १२ आ. |
| सुबोध वैद्यक. पूर्वार्ध व उत्तरार्ध | १॥ रु. | | " कल्पस्थान ... | १४ आ. |
| रसवैद्य ... ... ... | १२ आ. | | " सिद्धिस्थान ... | १॥ रु. |
| बृहन्निघंटु... ... ... | १॥ रु. | | " चिकित्सास्थान, भाग १ ला. | १॥ रु. |
| औषधिगुणदोष ... ... | १॥ रु. | | नपुंसकमीमांसा व कामसंजीवन | १॥ रु. |
| गर्भारपण-बाळंतपण ... | १ रु. | | निघंटशिरोमणि, भा. १ व २ रा | २। रु. |
| हल्लींचा वीर्यनाश व त्यावर उपाय. | ३ आ. | | आयुर्वेदरहस्य, भाग १ ला ... | १ रु. |
| औषधीक्रिया. ... ... | ८ आ. | | सार्थ हारीतसंहिता, भाग १ ला | १। रु. |
| राजवैद्य. ... ... ... | १२ आ. | | सार्थ योगशतक ... ... | ४ आ. |
| औषधीमानपरिभाषा. ... | १॥ आ. | | सार्थ वैद्यवल्लभ ... ... | ४ आ. |
| गोवैद्यक. ... ... ... | २ आ. | | बृहत्पाकसंग्रह ... ... | १॥ रु. |
| प्राणिज औषधी. ... ... | २ आ. | | नाडीपरिक्षेचें महत्व ... ... | ३ आ. |
| अश्वरोगपरिज्ञान ... ... | पाऊण आ. | | औषधीबाग ... ... ... | २ रु. |
| त्रिदोषविचार, भाग १ ला ... | ४ आ. | | सार्थज्वरपराजय ... ... | २ रु. |
| ग्रंथिकसन्निपात (प्लेगचिकित्सा). | ६ आ. | | | |

## योगशास्त्राची उत्तम माहिती होण्याचें पुस्तक.

कि. ४ आणे. **योगविज्ञान.** टपाल ०॥ आ.

प्रत्यक्ष येऊन घेणारांनीं मुंबई, माधवबागेजवळ **"श्रीसयाजी-औषधशाला"** या ठिकाणीं यावें व **बाहेरगांवीं मागविणारांनीं** पुढील नांवानें व्यवहार करावा—

**वैद्यराज आयुर्वेदमहोपाध्याय** शंकर दाजी शास्त्री पदे, पोस्ट गिरगांव, **मुंबई.**



मुंबई 'नेटिव्ह ओपिनियन' छा० त छापविले.

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट यांचे स्मारक.



वर्ष १४.

# आर्यभिषक्

अंक १०.

सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई पोस्ट गिरगांव. आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्र भद्राभिलाषिणाम् ॥-श्रीवाग्भटः ।

मेषसंक्रांति. शके १८२९ चैत्र वद्य २ सोमवार, ता. १३ माहे एप्रिल सन १९०६.

विषयानुक्रम.—त्रिदोषविचार; व दीर्घायु कसें व्हावें ?–२५-३२.

---

लोकाग्रहास्तव–सन१९०३ मे अखेरपर्यंत 'आर्यभिषक्' मासिकपुस्तका-च्या १५ व्या वर्षाची अगाऊ वर्गणी भरणारांस

# बक्षिसें.

**नवीन वर्गणीदार होणारे किंवा जुने असलेले, यांनीं आर्यभिषक्** मासिकपुस्तकाच्या १५ व्या वर्षाची वर्गणी [ जुलैस १५ वें वर्ष लागते ती वर्गणी ] जर **मे अखेरपर्यंत** भरली, तर त्यांस खालील बक्षिसें मिळतील:—

**(१) श्रीपंढरीनाथांच्या काकड आरतीचे अभंग** हें पुस्तक आणि **(२) दासबोधाचा एकविसावा दशक.**

त्याशिवाय—

# सविग्रह संस्कृत आणि मराठी कोश.

**यांत–अमरकोशांतील प्रत्येक शब्दाचा विग्रह, अर्थ, वृत्ति, धातु लिंगबोध, शब्दार्थ व नानार्थ यांचा संग्रह वर्णानुक्रमानें केलेला आहे.**

मराठी भाषा साधारण समजणारांसही, हें पुस्तक जवळ असल्यानें, संस्कृत भाषेचें मर्म चांगल्या रीतीनें समजेल.

रायल ८ पेजी [ मोठ्या आकाराचीं ] सुमारें ७५० पृष्ठांचें हें उत्तम पुस्तक असल्यानें आणि हे अक्षयी उपयोगीं पडणारें असल्यामुळें, याची

**पांच रुपये किंमत—ह्मणजे योग्यच आहे !**

## तथापि

**केवळ अगाऊ वर्गणी भरणारांस एक प्रकारें बक्षिस समजून, त्यांस हें पुस्तक आह्मी दीड रुपयास देत आहों.**

## तसेंच

**सार्थ ज्वरपराजय (सचित्र) पुस्तक २ रुपये किंमतीचें आहे तें ८ आण्यांत देण्यांत येईल.**

**विशेष सूचना**:—[१] बक्षिसांच्या व कमी किंमतीच्या पुस्तकांस लागणारा टपालखर्च वर्गणीदारास भरावा लागेल. [२] आर्यभिषक् व भारतधर्म दोन्ही मिळून एकदम घेणारांस वर्षाची टपालसह वर्गणी १ रु. १० आणे. फक्त आर्यभिषक् घेणारांस १॥ रुपया व फक्त भारतधर्म घेणारांस १ रुपया.

**वर्गणी पाठवून बक्षिसें व्ही. पी. नें मागवावीं किंवा व्ही. पी. नच वर्गणी आकारण्याची सूचना करावी.**

आर्यभिषक्कार्यालय, मुंबई, पोस्ट गिरगांव. **व्यवस्थापक आर्यभिषक्.**

---

के० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.

वर्ष १४ वें.] # आर्यभिषक्. [अंक १० वा.

ARYABHISHAK OR DOCTOR OF ARYANS.

A Monthly Journal Containing Medical news and articles.

मेष संक्रांति. शके १८२५ चैत्र वद्य २ सोमवार. ता० १३।४।१९०६.

## त्रिदोषविचार.-पित्त.

[ रा. रा. अवधूत वासुदेव वैद्य यांजकडून. ]

( गतांकावरून पुढें चालू. )

लेन्साचा-फोकस बरोबर मिळाल्यास सर्व किरणमार्ग आपोआप हातीं येतात. पण फोकसाचा वेध सोडून लेन्साच्या कडेकडून किरणाकडे दृष्टि देण्याचा प्रयत्न करूं लागल्यास अनेक किरणमार्ग लक्षांत येण्यास अनेक ठिकाणीं दृष्टि फिरवावी लागते. बरें.-अशीं दृष्टि चालवून काम तरी योग्य होतें काय? नाहीं. त्यांतही पुन्हां वक्रीभवनाच्या संस्काराची अडचण असतेच. हाच प्रकार प्रस्तुत दोन्हीं वैद्यकांत आहे. ह्मणजे आर्य वैद्यकांत धातूंच्या केंद्रस्थानाचा-शक्तीचा-विचार झाला आहे. अर्थात् धात्वंतर्गत शक्तिशोधन घडल्यानें आर्य वैद्यकांत सम्यक्ता आली आहे असें वाटतें.

एव्हांपर्यंत जें सांगितलें गेलें त्यावरून दोन्हीं वैद्यकांची सर्वांशीं सांगड घालणें प्रस्तुतकाळीं आवश्यक खरें, पण तें काम कठिण, असंभवनीय आहे असें तज्ज्ञांस समजणार आहे. तरी पुढें तसा मेळ घातला नसल्यास ती उणीव आर्य वैद्यकानें आलेली नाहीं; तर आंग्ल वैद्यकाच्या शोधांत आणखी कांहीं आवश्यक शोधन घडावयाचें राहिल्यानें येते; किंवा येणारी आहे; असेंही विचारी अंतःकरणांत वळणार आहेसें एव्हां माझ्या ध्यानीं येतें.

असो. चालू ( हल्लीं विवेचनास घेतलेल्या ) दोषभेदांच्या विवरणासंबंधीं

माझें कर्तव्य काय आहे तें पुन्हां एकवार संक्षिप्तरीत्या सांगून हातीं घेतलेलें काम पुरें ( शक्त्यनुरूप ) करण्याचा पंथ स्वीकारितों.

" पाचकादि पंचविध पित्तांचा उल्लेख आर्य वैद्यकांतून सांपडणाऱ्या आधारासह संक्षेपतः करावयाचा, व तो सर्वांस चांगला समजावा ह्मणून ×जुळवितां येईल तेवढा आंग्लवैद्यकांतर्गत विवरणाशीं जुळवावयाचा. जेथें जुळविणें ×शक्य वाटत नसेल तेथें आर्यवैद्यकीय आधारांचेंच स्पष्टीकरण करावयाचें "

झालें, माझी पित्तदोषविवरणासंबंधीं जी कर्तव्य दिशा ती, व तिची सम्यक्ता या दोन्ही गोष्टी साधार व संक्षेपतः कळविल्या. आतां कर्तव्य दृष्टि बनून पुढील कर्तव्य करितों.

## साधक.

आपल्या शरीराचे ३ भाग मुख्यत्वें आहेत. तेः—एक कोष्ठ+; दुसरा हस्तपादयुगुल, व तिसरा शीर्ष, असे होत. कोष्ठांत आमच्या पित्तप्रकारांपैकीं तीन ( साधक, पाचक, रंजक ) आहेत. शीर्षांत नेत्रस्थानीं एक आलोचक व राहिलें एक ( भ्राजक ) तें व्यान वायुप्रमाणें सर्व बाह्यत्वचेंत असतें. एकूण पित्तभेदांची-जास्त संख्या किंवा प्रकार कोष्ठांत आहेत. तेव्हां प्रथम कोष्ठांत पित्तांचा विचार करून पुढें राहिलेल्या २ पित्तांचा विचार करूं— आतां कोष्ठगत पित्तांत गुणमाहात्म्यानें पाचक—पित्त—विचार अगोदर झाला पाहिजे पण पाचक पित्ताचा उगम तरी रक्तांतूनच आहे. आणि रक्ताधार—जीवनविशिष्ट पदार्थाधार—हृदय आहे. तेव्हां त्यांतील *पित्ताचा विचार अगोदर झाला पाहिजे. खेरीज हें पित्तस्थान कोष्ठांत सगळ्यांत वर—प्रथमच—आहे; तेव्हां त्यासंबंधीच पहिल्यांदा विचार करूं.

---

× " माझ्या अल्प ज्ञानास अनुसरून " हें या ठिकाणीं घ्यावयाचें. कारण कदाचित् मला माहीत नाहींत असे पुष्कळ शोध जुळण्यासारखे असतील.

+स्थानान्यामाग्निपक्वानां मूत्रस्यरुधिरस्यच ।।
हृदुण्डुकः फुफ्फुसश्च **कोष्ठ** इत्यभिधीयते ।। १ ।।

* हृदि चैतन्यं तिष्ठति । ज्योतिरग्नौदिवाकरे

ब्र० नि०

**हृदिस्था देवताः सर्वा हृदि प्राणाः प्रतिष्ठिताः ।।**
**हृदि प्राणश्च ज्योतिश्च त्रिवृत् सूत्रं च यन्महत् ।।**

साधक पित्तस्थान जें हृदय त्याचें महत्व या श्लोकांतून वर्णिलेलें आहे. हृदयांतून सर्व देव ( कल्याणकारिणी शक्ति ) आहेत. हृदयास व्यापून प्राण-वायु आहे. हृदयांत प्राण ( चैतन्य+शक्ति ) आहे. तसेंच त्यांतून ज्योति अग्नि—उष्णतोत्पादकधर्मी—किंवा विशिष्ट तेज, आहे इ०

आतां एथें हृदयाच्या ठिकाणीं जी ज्योति अग्निमय* वा सूर्यमय आहे असें ह्मटलें आहे तेंच आमचें साधक पित्त असेलसें वाटतें. व तें सजीव. शरीरांत हृदयस्थ स्नायूंत क्रियाशक्तीनें नजरेस येतें. या साधक पित्तासन्निधच ओज ह्मणजे चरम धातु तो असतोसें वाटतें.

**हृदि तिष्ठति यच्छुद्धं रक्तमीषत्सपीतकं ।।**
**ओजः शरीरे व्याख्यातं तन्नाशान्म्रियते नरः ।।** चरक.
**ओजस्तु तेजो धातूनां शुक्रांतानां परं स्मृतम् ।।**
**हृदयस्थमपि व्यापि देहस्थितिनिबंधनम् ।। ३७।।** वाग्भट.

आतां साधक पित्तस्थान लक्ष्यांत चांगलें भरावें ह्मणून हृदयाकडे थोडें जास्त लक्ष पुरवून उलगडा करून पाहूं.

**हृद्रचना.**—ह्या हृदयाच्या अंतर्भागीं जी संकीर्ण अशी रचना आहे तिज-वरून कोणी त्याला घड्याळाची उपमा देतात. वस्तुतः त्याची रचना भारी संकीर्ण व खोल विचाराची आहे. अर्थात् ती उपमा अयोग्यच. पहा, हृत्कोशावरून व मधून निरनिराळ्या ४ पुडांतून लहान, मोठे, जाड बारीक असे असंख्य स्नायु आहेत ह्मणजे तें जालमय स्नायूंनींच घटित आहे.' व ते स्नायु

---

+ ह्यास अधार खालील लेखही होय.

तत्र हृदि दश च धमन्यः प्राणोदानमनोबुद्धिचेतना महाभूतानि च नाभ्यामराइव प्रतिष्ठितानि ।।

चरक—सिद्धिस्थान.

* अग्निमय कशी तें समजत नाहीं. पण योगी असें ध्यान करितात असें ऐकिवांत आहे. इतर पित्तापेक्षां सतेजत्व या पित्ताच्या अंगीं कदाचित् जास्त असेल.

त्यांत अशा रीतीनें गुंफलेले आहेत कीं, त्यांतील कांहींचा विकास झाल्याबरोबर इतर स्नायूंचें आकुंचन घडतें. पुन्हां आंखुडलेले स्नायु विकसित होऊं पाहतात तोंच पूर्वीचे विकसित जे स्नायु ते आकुंचित होतात. या रीतीनें चालणाऱ्या स्नायूंच्या प्रसरणाकुंचन* क्रियेनें हृदयाचा व्यापार जीवन असे तोंपर्यंत अखंड सुरू असतो. व जिच्यामुळें रक्त अंगांत १० इंच जाऊं शकतें ती त्याची गति आपल्या गमन संक्रमणानें शरीराच्या अगदीं शेवटापर्यंत देखील पोंचते. तेव्हां हृत्कोशाची जरूरी केवळ मोटमोठ्या धमन्यांत रक्त न्यावें एवढ्यापुरतीच नाहीं, तर धमन्यांतून असलेलें रक्त पुढें निरनिराळ्या केशवाहिनींत पोचावें म्हणून धक्का पोंचविण्यासही आहे, असें होतें.

---

*स्नायु व त्यांतून असणारी प्रसरणाकुंचन शक्ति या दोन गोष्टी अगदीं भिन्न आहेत. प्रसरणाकुंचनशक्तीस कारण कर्धी त्या स्नायूंत जे मज्जातंतु असतात ते होत. यास प्रत्यय, एखादा अवयव लटका पडतो, त्यावेळीं मिळतो. अशा वेळीं त्या अवयवांतील मज्जांततूंत बिघाड होतो, तुटतो, किंवा अन्य रीतीनें त्याचा मुख्य मज्जेशीं–मेंदूशीं–संमंध नाहींसें लक्ष्यांत येतो. म्हणजे वात कार्यास या वेळीं प्रत्यवाय येतो. कारण तद्वाहक मज्जेंत विकार घडल्याने त्याचा वहन मार्ग बंद होतो. तेव्हां या रीतीनें ऐच्छिक स्नायुचलन घडण्यास वायूचें–तद्वाहक मज्जेचें–सहाय्य असावें लागते हें ध्यानीं येईल. खेरीज असा प्रत्यय मिळण्यास उष्ण रक्ताचीही जरूरी लागतें. म्हणजे स्नायुकार्य नजरेंत येण्यास ३ गोष्टींची आवश्यकता असते असें झालें त्या गोष्टी:—स्नायु; तदंतर्गत मज्जातंतु व त्यांचा मेंदूशीं कायम संबंध. आणि उष्ण रक्त (वेताचें) ह्या होत. आतां याप्रमाणेंच हृदयस्थ अशा कार्यकर्त्या स्नायूंच्या चलनाचा उगम केवळ त्या स्नायूंतूनच नसतो. म्हणजे तेथें ती स्नायुचलनशक्ति प्राणवायूनें–तद्वाहक क्रेनिक व सिंपॉथेटिक मज्जातंतुशाखा त्यांनीं–उत्पन्न होत असेल खरें तरी वायुरूप पदार्थांस प्रसरणाकुंचन शक्ति आणविणारा–भडिमाराचा वा साधा दाव उत्पन्न करविणारी केवळ चित्कलेखेरीज कोणी तरी शक्ति पाहिजे. तीच आमची शक्ति साधकापित्त होयसें वाटतें. यास उदाहरण हल्लीं यांत्रिक कामांत उपयोगीं वाफ वायुरूप खरी, तरी तिच्या अंगीं उष्णतेच्या न्यूनाधिक्यानें दाबाचें न्यूनाधिक्य येतें. अर्थात दाबानुरूप कमी अधिक गत्युत्पादकता असते. तेव्हां हृदयस्थ स्नायूंत निरनिराळ्या गोष्टींनीं प्रसरणाकुंचन शक्ति येते. अर्थात् स्नायूंच्या अंगीं ती स्वाभाविक नव्हे. मात्र स्नायूंत सतत अनुभवास येत असल्यानें एकच भासते. एवढेंच.

यावरून रक्तवहन कार्य घडविण्यास कारण "हृदय" असें झालें. व तें घडण्यास साधन त्याच्या स्नायूंची चलनवलन—गति; आतां हें सर्वसिद्ध आहे कीं गति व उष्णता हे परस्परांचे उत्पादक आहेत. अर्थात् शरीरांत विशेषत: हृदयांत उष्णता वाढल्यास रक्तवहन वेग[1] वाढेल. बरें रक्तवहन वेग कांहीं कारणानें कमी करवला तर उष्णता कमी[2] होईल. हा अनुभव चिकित्सकांस येतो. एकूण रक्तवहनवेगावर उष्णता अवलंबून असते. किंवा रक्तवहनवेग उष्णतेवर अवलंबून असतो. तेव्हां अविकृत हृदयाची गति तीव्र वा मंद असेल त्या मानानें रक्त उष्ण वा थंड होणार.

आपल्या शरीरांतील उष्णता कशी वाढते किंवा उत्पन्न होते याविषयीं पाश्चिमात्य निश्चित मत अद्याप ठरलें नाहीं असें आंग्लवैद्यांच्या ग्रंथांतून समजतें. तरी पण श्वासामुळें फुफ्फुसांतर्गत शुद्ध हवेंतील ऑक्सिजन तेथून रक्तांत मिसळतो. व तो पुढें रक्तांत त्याचे घटक जे कार्बान व हैद्रोजन त्यांच्याशीं शरीरभर मिळत मिळत मिळतो. आणि त्यामुळें रसायनमिश्रणजन्यदहनक्रिया सर्व शरीरभर सारखी सुरू होते; अर्थात् उष्णता उत्पन्न होते; असें हल्लीं शोधांतीं कांहींच्या मतें ठरलें आहे खरें; तरी पण विशिष्ट जागीं उष्णतासंचय वा उष्णताजनित कार्यसंभव कसा असतो, याचा उलगडा या उपपत्तींत +होत नाहीं.

आतां हेंच उष्णतोत्पादक कार्य लक्षांत घेऊन वा अन्य रीतीनें हृदयांत उष्णता सांठविलेली आहे असें ध्यानीं आणून अथवा अनुभवानें देखील असेल आर्यवैद्यकविशारदांनीं तेथें साधक पित्त आहे असें ह्मटलें आहे. कारण

---

१ ज्वरांत किंवा व्यायाम केल्याबरोबर इ० वेळीं हा अनुभव येतो.

२ ज्वर वगैरेंत डोकें तापून जातें तेव्हां त्यांतून होत असलेलें फाजील रक्तवहन कमी करण्यासाठीं बर्फ ठेवितात वगैरे. या क्रियेनें फाजील उष्णतेचें अंशुविक्षेपण घडतें ह्मणजे तिला बर्फांत जागा मिळते अर्थात रक्तांतील उष्णता कमी झाल्यानें त्याचा वेग मंदावतो.

+ ज्वराच्या उत्पत्तीच्या व स्वरूपाच्या संबंधाची जी उपपत्ति आहे तिजरून हें लक्ष्यांत येण्याचा संभव आहे. कारण तिचांत समाधान व्हावें तसें होत नाहीं. असें माझ्या अल्प मसजुतींत येतें.

पित्तावांचून धातूंत हीं शक्ति उत्पन्न होत नाहीं. हें धातु व दोष यासंबंधीं जे त्यांचे विचार झाले आहेत त्यांवरून स्पष्ट होतें.

असो. तर जिवंतपणीं हृद्गति चालविणारें हें आमचें अग्नितत्वजनित साधक पित्त कारण असावेंसें वाटतें. ह्मणजे हृत्स्थ चित्कला साधक पित्तास मध्यस्थ घेते व त्याजकडून हृत्कार्य करवितें.

ह्याचें स्वरूप वगैरेसंबंधीं कांहीं माहिती दिली पाहिजे पण मला तिचा आढळ न झाल्यानें देतां येत नाहीं. तरी कोणाकडून कळेल अशी आशा आहे. आतां साधक पित्ताकडून घडणारीं कार्यें पाहूं:—

**बुद्धिमेधाभिमानाद्यैरभिप्रेतार्थसाधनात् । साधकं हृद्गतं पित्तं ..........................................**

वाग्भट.

आंग्ल वैद्यकांत बुद्धि व मेधा यांचें स्थान मेंदु धरिलें आहे. आतां मेंदूचा व हृत्कोशस्थलाचा असलेला संबंध मागें प्राणवायुसंबंधीं जें विवरण केलें गेलें त्यांत व्यक्त झाला आहे. त्यावरून मेंदूची सुस्थिति असण्यास कारण सम्यक् रक्ताभिसरण आवश्यक, तद्वत् प्रमाणबद्ध प्राणवायुलहरीही आवश्यक आहेत असें होतें. व या दोन्हीं गोष्टी सम्यकशा मिळणार हृत्क्रियेनें. तेव्हां निरनिराळ्या कल्पनांची स्फूर्ति उठविणें व मिळालेल्या स्फूर्तींचा ठसा कायम ठेवणें हें काम पुष्कळ अंशानें—फार करून—हृदयाचें आहे असें होतें. ह्मणजे बुद्धि व मेधा हीं दोन्हीं योग्यतया प्राप्त होण्यास कारण आमचें हृदयस्थ साधक पित्त ठरतें.

ओजाधीन अहंभाव असतो ह्मणजे ज्याचे शरीरांत ओज जास्त त्यांत अहंभाव, तेजी, मानीपणा, वीर्यशालीनता हीं जास्त असतात. पण ओज व साधकपित्त यांचें सान्निध्य वर सांगितलें गेलें आहे. अर्थात् जोंवर साधक पित्त प्रकुपित नाहीं तोंवर ओज सुस्थितींत राहणार, व तदनुरोधानें बुद्धि, धारणाशक्ति, मानीपणा, वीर्यवत्ता इ० गोष्टींनीं मनुष्यास प्रिय गोष्टींचा लाभ होत रहाणार.

आतां याच्या उलट साधक पित्त प्रकुपित झाल्यास घडणारे परिणाम.—

**साधकं बुद्धिभ्रंशंतु अधैर्यं भीतिसंभवम् ।।**

वाग्भट.

असें ह्मटलें आहे. पण अधैर्यादि परिणाम ओज क्षीण झाल्यानेंही होतात.

**विभेति दुर्बलोऽभीक्ष्णं ध्यायतिव्यथितेंद्रियः ।**

**दुश्छायो दुर्मनारूक्षो.........इ०**

तेव्हां साधक पित्तविकृतीमुळें ओज क्षीण होऊन हे परिणाम घडतात असें अनुमान बांधण्यास हरकत नाहीं. खेरीज अनुमान सरणीस दुसरें साधन असें आहे कीं ओजक्षीण होण्याचीं जीं कारणें आहेत तींच साधक पित्त प्रकोपाचींही होऊं शकतात. कशीं तरः—

**ओजःक्षीयेत कोपक्षुत्ध्यानशोकश्रमादिभिः**

ह्मणजे ओजाचा क्षय क्रोध, कडक क्षुधा, चिंता, व्यग्रचित्त, शोक, श्रम यांनीं होतो. आतां या कारणांतून क्रोध, तीव्र क्षुधा, श्रम व कधीं शोक यांनीं पित्त प्रकुपित होतें. तेव्हां या क्रोध इ० कारणांनीं साधक पित्ताचा प्रकोप घडून ओज क्षीण होत असावें व त्यायोगें मनुष्य अधीर, भित्रा असा बनत असावा.

मेधा व बुद्धि यांची सुस्थिति राहण्यास २ कारणें सांगितलीं गेलीं. एक सम्यक् रक्तवहन व दुसरें प्राणप्रमाणबद्ध वायुलहरी. आतां ज्या अर्थीं हीं कारणें कार्यत्वानें घडणें हें साधक पित्ताधीन आहे; त्या अर्थीं साधक पित्तांत बिघाड घडल्यास अस्वस्थ चित्त बनून बुद्धिभ्रंशही घडणार. झालें. साधकापुरतें सांगावयाचें तें आटोपलें. आतां याचा पाचक वगैरेशीं असलेला संबंध दाखविण्यासारखे आधार पुढें पाचक विभागांत येतील. आतां क्रमप्राप्त रंजक विभागाविषयीं विचार करूं.

## रंजक.

शरीर पोषक असल्यामुळें जीवनाधार ( वाइटल् फ्लूइड ) हें नांव ज्यास यथार्थ रीतीनें लागतें असें रक्त आपल्या शरीरांत आहे. त्या रक्तांत ४ घटकावयव आहेत. ते ( १ ) रक्तकण ( २ ) श्वेतकण ( ३ ) फेब्रीन ( ४ ) सीरम असे होत. आतां यांत रक्तकण व त्यांतून असणारा क्रूओर रस हीं

द्रव्यें ( ज्यांस समुच्चयवाचक रेड्कॉर्पसेल्स नांव देतां येईल ) तांबडसर असून घनसर असतात. पण सीरम ह्मटलेला पदार्थ पिंवळसर असून प्रवाही असतो हे पीत वा रक्त रंगाचे पदार्थ शरीरांत वारंवार उत्पन्न व्हावे लागतात. कारण रक्ताच्या आंगच्या पोषकत्वादि धर्मांमुळें या रक्तांतर्गत अवयवांची अजस्र झीज होत असते. तेव्हां तशी झीज भरून काढण्यास त्यांची उत्पत्तिही दांडगी पाहिजे. आतां ही उत्पत्ति व्हावी ह्मणून लेह्य खाद्यादि पदार्थ व इतर पेयें जीं आमच्या पोषण नळांत जातात त्यांची निरनिराळ्या द्रव्यांतून रूपांतरें व्हावीं लागतात. अशीं रूपांतरें घडविण्यास अनुकूल असणाऱ्या ज्या दृश्य गोष्टी त्यां पैकींच हें आमचें रंजक पित्त होय. यास "रूपगुणविशिष्ट पित्त" अशी संज्ञा दिला असतां चालेल.

आतां या रंजक पित्ताच्या उत्पत्तीचा खुलासा पाहूं. आपल्या कोठ्यांत यकृत् नामें जें १॥ १॥। शेर वजनाचें जबरदस्त असें कार्यकारी इंद्रिय आहे त्यांतून याची उत्पत्ति होते. शिरागत रक्त हृदयांत आल्यावर शुद्ध होण्याकरितां फुप्फुसभर पसरतें व तेथें श्वासांतर्गत आक्सिजन मिळून लालभडक बनतें. या वेळीं त्या आपण "शुद्धरक्त" अशी संज्ञा देतों खरी, तरी त्यांत कांहीं टाकाऊ क्षार वा विषारी पदार्थ राहतातच. तेव्हां ते त्यांतून नाहींसे व्हावे, किंवा कांहीं शिरागत रक्तांतूनही ते नाहींसे व्हावे; ह्मणजे रक्ताच्या आंगची धातुपोषक शक्ति वाढावी ह्मणूनही या अंतरिंद्रियाचा उपयोग आहे. एकूण हें अंतरिंद्रिय "रंजकपित्त" संज्ञा पावलेला पाचकद्रव तयार करितें व रक्ताचें शोधन करितें. अशीं २ महत्कार्यें करितें शरीरभर फिरून आलेल्या रक्तांत कांहीं मृत असे तांबडे कण असतात त्यांजपासून हें अंतरिंद्रिय आमचा पित्तरस तयार करितें असें ह्मणतात. या वेळींच रक्तांतून असलेले टाकाऊ क्षार वगैरे त्या पित्तरसांत कधीं मिसळतात. व पुढें तें मिश्रण संयुक्त पित्तवह नाडींतून ( कॉमनडक्टमधून ) आमाशयाच्या खालच्या तोंडाजवळ येतें. पण आमाशयांत कांहीं, ( अन्न इ. ) नसल्यास पित्ताशयां ( गॉलब्लाडरां ) तून संचित होतें. पुढें आमाशयांत अन्न आल्यावर ( जरूरीच्या वेळीं ) त्यांत उतरतें. याचा वर्ण बहुधा पिंवळा असतो. तसेंच हें थोडें स्निग्ध असतें.

हा पित्तसंज्ञा पावलेला पदार्थ आमाशयस्थ अन्नपाणी वगैरेशीं मिळल्यावर जें एकंदर मिश्रण बनतें तेंही पिंवळसर होतें. पुढें एकंदर मिश्रण आंतड्यांतून गेल्यावर धातूपवाहिन्यां ( Lacteals )त शोषिलें जातें तेंव्हां जें रासायनिक द्रव्य ( रसधातु ) तयार होते त्यांतही हा आपला पित्तनामा रस असतो. आतां रक्तांत पांढरे व तांबडे असे २ तऱ्हेचे अणु असतात; त्यांतील तांबडे अणु बनण्यास २ कारणें असतात. त्यांत, त्या अणूंच्या पूर्वरूपांत ह्या रंजक द्रव्याचें आधिक्य असणें हें मुख्य असावेंसें वाटतें. अर्थात् दुसरें ऑक्सिजन—विशिष्टता येणें हें गौण कारण होणार.

असो, तर हा पित्तरस आमाशयस्थ बनून रसरंजन करण्यास कारणीभूत असा आहे हें वरील विवरणावरून दिसून येईल. व हेंच आपल्या ग्रंथांत संक्षेपानें सांगितलें आहे.

**आमाशयाश्रयं पित्तं रंजकं रसरंजनात् ॥**

वाग्भट.

तेंव्हां अविकृत स्थितींत रंजक पित्त आमाशयांत जातें व पुढें रसधातूचें रंजन करितें. आतां या खेरीज आणखी कांहीं कार्यें तें करितें, तीं—या पित्ताच्या अंगीं दुर्गंधनाशक शक्ति आहे यामुळें अन्न आंतड्यांत असतांही कुजत नाहीं. जेव्हां हें पित्त विकृत बनतें तेव्हां आंतड्यांत त्यासह गेलेलें अन्न पृथक्करण पावतें—नासतें. अविकृत असतां अन्नांत जे नैत्रोजनविहीन ( स्निग्ध ) पदार्थ असतात त्यांस विरविण्याचे कामीं आमाशयस्थ रसास याची मदत होते. या रंजक पित्ताचे अंगीं सारकपणाही आहे. यास्तव अविकृत स्थितींत तें शौचासही साफ करितें. ह्मणजे शरीरांतून जबरी घाण काढून टाकितें. या पित्तानें संमिश्र असें अन्न जेव्हां आंतड्यांतून फिरूं लागतें तेव्हां तें आंतड्यांस आंतून रूक्षता येऊं देत नाहीं. तर त्या आंतड्यांतून बुळबुळितपणा राखितें. त्या योगें अन्नाचें अंत्रांतून चलन सुलभपणें घडत असतें. अर्थात् अंत्रांतून चालणारी जी संकोचविकसनक्रिया तीस या पित्तरसाच्या योगानें मदत होते. पण जेव्हां हा रंजक पित्तरस कांहीं कारणानें अन्नांत मिसळत नाहीं किंवा विकृत होऊन मि-

सळतो तेव्हां त्याजपासून वर वर्णिलेले फायदे घडत नाहींत. उलट निरनिराळे विकार घडतात. ते विकार निरनिराळ्या ग्रंथांतून अनेकसे सांपडतील. तरी सध्यां एथें फक्त वाग्भटांतून आले आहेत तेवढेच घेतों.

**रंजकः साररोधौच पण्डूदाहतृषादिकान् ॥**
**पित्तरोगान् यकृत्प्लीहगदानन्यांश्च सर्वशः ॥**
**( पीतत्वक् रक्तमूत्रत्वं मलबंधं तथा सरः )**

आतां या विकारांचा संबंध रंजकाशीं कसा घडतो तें मागें रंजकविषयीं जें विवरण झालें त्यावरून लक्ष्यांत येणार आहे. तेव्हां विकारविषयक विवेचन आणखी निराळें देण्याची गरज नाहीं असें कोणास वाटण्याचा संभव आहे,तरी विनंती कीं, मागें जें संक्षेपतः सांगितलें गेलें, त्यावरून त्याचा या विकारांशीं घडणारा संबंध चटकर ध्यानीं वठणार नाहीं अशी मला शंका वाटते. तसेंच त्या विकारविवरण–प्रसंगीं समयानुरूप त्या रंजकाचेंही योग्य स्वरूप ध्यानीं येणार; असेंही वाटतें. ह्मणून, हे जे विकार होतात त्यांपैकीं एकेक घेऊन त्यांचें अगदीं संक्षेपतः स्पष्टीकरण करूं:—

रंजक पित्त 'साररोधकारी' आहे. — मागें या रंजक पित्तापासून घडणाऱ्या उपयोगाविषयीं वर्णन करितांना याचे अंगीं शौचशुद्धि करण्याचा गुण आहे असें सांगितलें. हा गुण त्याचे अंगीं येण्याचें कारण त्याचे अंगीं जो सारकत्व× धर्म आहे तो आहे. तेव्हां हा रस विपुल उत्पन्न करणारे पदार्थ पोटांत गेल्यास सडकून रेच होतात. मग जेव्हां हा रस विकृत करणारे किंवा कमी उत्पन्न करणारे असे आहार विहार घडतात तेव्हां मलबद्धता येणार; हें उघड आहे. एकूण हें पित्त मलाचें सरण किंवा अवरोधन करणारें आहे.

---

×जेव्हां मळ मोकळा कराविण्याची आवश्यकता असते, तेव्हां जीं सारक किंवा रेचक अशीं औषधें देतात त्यांचे अंगीं, बहुधां हें पित्त जास्त उत्पन्न करण्याचा ( यकृत् क्रियावर्धनाचा ) धर्म असतो अर्थात् या पित्तरसाची तशी उत्पत्ति झाल्यावर अनायासेंच त्याच्या सारकत्व धर्मामुळें कोठा मोकळा होतो.

रंजकांत विकृति घडल्यास पंडू रोग होतो. } आपल्या ग्रंथांत पंडू उत्पन्न होण्याची कारणें सांगितलीं आहेत. त्यांत विशेषत्वें पित्तकर ( पित्तविकृतिकर ) आहारविहारांचें अतिसेवन हें प्रमुख धरिलेलें आढळतें.

"पांडुरोगी तु योऽत्यर्थं पित्तलानि निषेवते"।

हें रंजक पित्त, पित्तकर आहार–विहारांनीं विकृत झाल्यावर रक्तांत जीं रेड कॉर्पसेल्स, सीरम संज्ञा घेतलेलीं द्रव्यें असतात, तीं विकृत होतात. अर्थात् हें दूषी पित्त रक्तास दूषीत× करितें. रक्त दूषित झाल्यावर त्याचे अंश ज्यांतून ज्यांतून असतात ते ते मांसादि धातु दूषी बनणार हें उघड आहे. दूषी पदार्थ शरीरांतून राहण्यास अयोग्य असतात. अर्थात् शरीर ( दोषधातु, मल यांनीं संयुक्त पुतळा ) झडत चालतें. आतां हाच अर्थ ज्यांत असें निर्दिष्ट श्लोकार्ध—

"तस्य पित्तमसृङ्मांसं दग्ध्वा रोगाय कल्पते"॥

असें आहे. तेव्हां रंजक पित्तविकारानें मनुष्य पंडु होण्यास पात्र होतो, असें झालें. या वेळीं त्याचे ठायीं लक्षणें पंडुकामिलेंत होणारीं होतात.

( वि. रंजक ) दाहकारी बनतें } दोषी रंजकामुळें दूषित बनलेलें रक्त आपलें कार्य चांगलें करूं शकत नाहीं. अर्थात् रक्तवहनही चांगलें होणार नाहीं. मग ज्या ज्या ठिकाणांतून तसें दूषित रक्त मंदवहनानें किंवा अन्य रीतीनें ज्या स्थळीं रक्त स्थिरावत किंवा सांकळत जाणार, त्या त्या ठिकाणांतून असलेल्या मज्जातंतूंवर त्याचा दाब पडून दाह होतो. कधीं अतिवहन घडून मज्जातंतु क्षुब्ध होतात व दाह( आशुकारी ) होतो. आतां याखेरीज देखील अन्यकारण असेल.

वि. रंजक तृषा उत्पन्न करतें } विकृत रंजकदूषित रक्तवहनानें अंतस्त्वचा क्षुब्ध होते. क्षुब्धांतस्त्वचा कफ जास्त सोडिते, व अशा वेळीं उष्णताही वाढलेली असते; यामुळें ती त्वचा व तत्प्राप्त कफ हीं दोन्ही कोरडीं पडतात. त्या-

---

+ पांडुत्वं नेत्रयोश्चापि कपाले स्वेददर्शनं ।
अल्पायासेन शैथिल्यं पूर्वरूपाणि ते विदु. ॥
रंजकस्यच पितस्य नाशोयं परिकीर्तितः ॥

मुळें कण्ठ ओष्ठ, गळा, तालु, क्लोम (पिपासास्थान) वगैरे ठिकाणांतून या त्वचेच्या पुडांतून गेलेल्या तोयवाहिन्या व रसवाहिन्या ( लिंफॅटिक व्हेसल्स ) यांजकडून स्वकार्य चांगलें होत नाहीं. अर्थात् तोंड वगैरे ठिकाणीं कोरड पडते. ह्मणजे तहान वाढते. व ती पुढें पुढें दोषाच्या महतीस अनुसरून वाढतच राहते. आणि असेंच ह्मटलेंलेंही आहे.

**"भयश्रमाभ्यां बलसंक्षयाद्वाप्यूर्ध्वं चितं पित्तविवर्धनैश्च ॥**
**पित्तं सवातं कुपितंनराणां तालुप्रपन्नं जनयेत्पिपासां ॥**

अथवा—

**स्रोतःस्वपांवाहिषु दूषितेषु । दोषैश्च तृष्णा भवतीहजंतोः ॥**

या वेळीं कार्य कसें घडतें तें:—

**जिव्हामूलगलक्लोमतालुतोयवहाः शिराः ।**
**संशोष्य तृष्णा जायंते इ०**

वि. रंजक यकृत रोग उत्पन्न करितें. — आपल्या कोष्ठांत जें यकृत् नामें अंतरिंद्रिय, तें ह्या रंजकाचें जनक आहे. तेव्हां तज्जनित हा पित्तरस, अन्नांत योग्य रीतीनें संमिश्र झाल्यावर त्या मिश्रणांतून जो सार रसांत शोषिला जातो त्यांत कांहीं उतरतो. कांहीं भाग त्या मिश्रणांतून, जो किट्ट ( टाकाऊ ) भाग, त्यांतून असतो. कांहीं मूत्रांत उतरतो. अशा प्रकारें एकंदर अंतरिंद्रियांतून या रसाची वांटणी होते. व तोही त्या त्या स्थलीं आपापलीं योग्य ( इंद्रियानुरूप ) कार्यें करितो. आतां आपल्या अन्नांत बहुधा सारापेक्षां किट्टभाग जास्त असतो. तेव्हां त्याच्याशीं मिश्रण पावणार रसही पुष्कळ पाहिजे. ह्मणजे क्रमानें असेंच ह्मणणें भाग येतें कीं या रसाचा व्यय मलमूत्रद्वारेंच अधिक होतो. शरीर सुयंत्रित रहाण्यास जशी शुद्ध रसरक्तादिकांची आवश्यकता आहे तद्वत् निरानिराळ्या द्वारांतून निरानिराळीं टाकाऊ द्रव्यें किंवा क्षार बाहेर जाणें आवश्यक आहे. पण कधीं हीं कार्यें होत नाहींत. ह्मणजे मलमूत्रावरोध होतो. तेव्हां त्या आनद्धावस्थेंत कोष्ठांतील निरानिराळे इंद्रिय व्यापार बंद पडतात. त्यावेळीं पित्तवाहिनी शिरा वगैरेंतून पित्त संचय

पावतें. असेंच नित्याजीर्णांत वा अलसकांतही घडतें. किंवा प्लीहा, प्रमेह, कफक्षय, मद्यातिरेकानें घडणारा मदात्यय, मेदवृद्धि. गुल्म, अंत्रस्थ विद्रधि, सविषान्नभोजन वा सविषपेयपान इ. रोगांतही असेंच घडतें. ह्मणजे या वेळीं पित्तवाहिनी किंवा पित्ताशय हीं आपणांत ग्राह्य तेवढा पित्तरस घेईनातशीं होतात. पण यकृताचा व्यापार पूर्ववत् चालू असतोच त्यामुळें त्यांत क्षणोक्षणीं उत्पन्न होणारे पित्तकण तेथेंच संचित होतात. मग जर कां रक्तद्वाराही शरीरांत त्यांचा फैलाव* झाला नाहीं तर त्या संचित पित्तानें यकृत् वाढूं लागतें. या वेळीं त्यांतील छिद्रें ताणलीं जातात यामुळें त्यास बाहेरून धक्का लागल्यास तो सहन होत नाहीं. तसेंच तें रक्तासारख्या द्रव पदार्थांनीं प्रपूरित झाल्यामुळें मऊही पण बनतें. व असेंच सांगितलेंही आहे.

"अजीर्णे चाग्निमांद्येच तथा प्लीहप्रमेहयोः ।
कफक्षये मद्यपाने मेदवृद्ध्या तु गुल्मिनां ॥
इत्येषां जायते वृद्धिर्विद्रधौ हि रुजं विना ।
सविषैरन्नपानैश्च अजीर्णैश्चातमैथुनैः ॥
मलमूत्रावरोधैश्च नित्याजीर्णेन वा पुनः ।
पित्तवाहि शिरारोधात् पित्तसंचयनेन वा ॥
सशूलं कामिलायुक्तं यकृद्वृद्धिं च गच्छति ।
स्पर्शासहं यकृज्जायेन्मृदुत्वमपि गच्छति ॥

वि. रंजक प्लीहा वृद्धि करण्यास कारण आहे.

प्लीहा रोग होण्यास आपल्या ग्रंथांतून कारणें दिलीं आहेत तीं—

त्रिःसप्ताह व्यतितेतु ज्वरेतु धातुदूषिते ।
सकरोत्यग्निमांद्यं च मलरोधैस्तथैव च ॥

ह्मणजे जीर्णज्वरांत अग्निमांद्य, मलावरोध होतात; यांनीं प्लीहा होते. कांतर त्यांनीं रक्त दूषीत बनतें. आतां अग्निमांद्य व मलरोध होण्यास बहुधा विकारी

---

* असा फैलाव होणें ह्मणजे कामला; पंडुकामला इ. रोग होणें, होय.

रंजक कारण असतें या संबंधीं खुलासा वर झाला आहेच तेव्हां विकारी रंजकानें अग्निमांद्य, मलरोध वगैरे होऊन रक्त दूषित होतें मग—

**रक्तदुष्टेन प्लीहाभिवृद्धिराशु प्रजायते ॥**

झालें; तर रंजक पित्तविकारानें ठोकळ रोगांचें संक्षेपतः आविष्करण घडलें. आतां याखेरीज तें त्वचेस पिंवळेपणा आणितें. कधीं मूत्रास तांबडा वगैरे रंग देतें. इ० गोष्टीही करितें.

असो. तर एव्हांपर्यंत झालें काय कीं यकृत् व तत्संबंधीं प्रदेश तेवढा रंजकस्थान होय. त्यांत यकृत् रंजक पित्तरसोत्पादक आहे. ह्या रंजक पित्ताची पाचनसारणादि क्रियेस आवश्यकता आहे तद्वत् रक्तादि द्रव्यास वर्ण येण्यासही आवश्यकता आहे. तसेंच तें विकृत झाल्यास कांहीं निरनिराळे विकारही होतात. इ. गोष्टी थोडक्यांत सांगितल्या गेल्या. आतां पुढें पाचकाविषयीं विचार करूं.

## पाचक.

आपल्या ग्रंथांतून पित्तांचीं जीं अनेक कार्यें वर्णिलीं आहेत त्यांत मुख्य पचनकार्य आहे. कारण यावरच पुढील एकंदर सर्व शारीर व्यापार अव्याहत चालतात. तेव्हां तें पचनकार्यकारी पाचक सर्व पित्तविभागांत महत्वाचें असणार मग त्याचें वर्णन यथार्थ असें मनांत ठसणें अगदीं अगत्याचें आहे. आतां तसें तें ठसण्यास एकंदर चालणारी जी पचनक्रिया तिचा दृष्टभाग तरी डोळ्यापुढें असणें अगदीं जरूरीचें आहे. पचनक्रियेचा दृष्टभाग ध्यानीं येण्यास जीं कोष्टस्थ पचनेंद्रियें त्यांची, तशीच तत्कार्याची माहिती देणें आवश्यक आहे. पण द्यावयाची ती माहिती आधुनिक शोधाशीं जुळवून दाखवीत गेल्यास प्रस्तुत प्रसंगीं पाचकपित्तमहिमा ध्यानीं वठणार. ह्मणून तशी माहिती त्रोटक रीतीनें जुळवून आणण्याचा यत्न करून पाहतों.

आपण जीं चतुर्विध अन्नें तोंडांत टाकितों त्यांजकडून शरीर पोषण व्हावें अर्थात् तें शरीराशीं एकरूप व्हावें यासाठीं तोंडापासून गुदापर्यंत एक

लांबच्यालांब मधून मधून रुंद निरुंद असा पोषणनळ ( आलिमेंटरी कॅनाल ) सारखा पसरलेला आहे. हा नळ जठराच्या ठिकाणीं फार रुंदावला आहे. या नळाचे आंतले बाजूस सर्वत्र आर्द्रत्वचा आहे. व बाहेरले बाजूस स्नायु आहेत. त्यांचे अंगीं संकोचविकसन धर्म येतो. संकोच झाल्यास त्यांत असलेलें अन्न दबलें जाऊन पुढें ढकललें जातें. यांत असणारी आर्द्र तांबड-सर त्वचा व बाहिस्त्वचा यांत देखील संकोच विकसन शक्ति येते. यावरून त्याही स्नायूंनीं घटित आहेत असें ह्मणतात. मात्र हे स्नायु इतरत्र स्नायूंपेक्षां अगदीं निराळे असें गृहीत घेतात.

या पोषण नळाचे मुख्यतः ४ भाग आहेत ते १—( १ ) अन्नमार्ग ( २ )आमाशय ( ३ ) लहान अंत्र व ( ४ ) स्थूलांत्र हे होत. अंत्यांतून पचनक्रियेचा विपाक ह्मणजे शरीरस्थधातुघटकद्रव्योत्पादन मुख्यत्वें आमाशय व लहान आंतडी ( ज्यांस पक्वाशय संज्ञा दिली जाते ) या दोन भागांतून बहुधा घडतें. तेव्हां प्रस्तुत प्रसंगीं या दोन भागांकडे थोडें जास्त लक्ष पुरविलें पाहिजे.

या पोषण नळाची आमाशयांतून व्याप्त जी अंतस्त्वचा तिच्यांत तर द्रव छिद्रांची इतकी गर्दी आहे कीं जणु ती द्रवाछिद्रांनींच बनली आहेसें दिसतें. हीं छिद्रें घर्मनळाप्रमाणें मागल्या बाजूस रुंद असतात व त्यांवर केशवाहिनींचें जाळें असतें. यामुळें जें अन्न पोषणनळांत जातें त्याचें त्या ठिकाणीं केश' वाहिनीं-तील रक्ताशीं सान्निध्य असतें. बहुधा कोठ्यांत अन्न असतें तेव्हां तेथली ती अंत-स्त्वचा जास्त उत्तेजित होते व तिच्यांतून जाठररस थेंब थेंब पाझरतो. तो रस ती त्वचा केशवाहिन्यांतील रक्तांतून निराळा करून आंत सोडीत असते. हा रस पातळ, नितळ, आंबट, असा असून भारी तीव्र असतो. हा कधीं कधीं एका जेवणांत १ शेर किंवा जास्त असा देखील निघतो. मात्र हें प्रमाण कोठ्याच्या संवयी व आहारांतील पदार्थ यांवर अवलंबून असतें. हा रस जठरांत अन्नाशीं मिळाल्याबरोबर तेथेंच कांहीं नैत्रोजनविहीन—स्निग्ध—अन्नाची विद्रावणक्रियाही सुरू होते. पचनक्रिया घडत असतां हा रस थे

डथोडा उत्पन्न होतो आणि कोणत्याही एका कालीं त्याचा थोडा अंश मात्र कोठ्यांत असतो कारण अन्न वितळविण्याची क्रिया केल्यानंतर तो रस व त्याच्या योगानें जे अन्नकण पचून–जिरून–वितळलेल्या स्थितींत राहतात त्या सर्वांचें शोषण पुन्हां कोठ्याकडून होतें. अर्थात् रक्तांतील तें द्रव्य फिरून रक्तांत जातें. अन्नांतील स्निग्धपदार्थांवर ह्मणजे उष्णताजनक द्रव्यांवर याची क्रिया घडते. ह्मणजे अन्नांतून असलेली उष्णता प्रकट होण्यास जीं साधनें असतील त्यांत हा रसही मोडतो. असो, तर क्लेदक श्लेष्म्यानें क्लेदित अन्नावर प्रथमच पाचक संस्कार घडविणारा हा रस आहे असें झालें.

आमाशयस्थ रसानें कालवलेलें अन्न आमाशयाच्या खालच्या मुखांतून लहान अंत्रांत शिरूं लागलें असतां तेथेंच आणखी रंजक पित्त व मांसरस (प्यांक्रियाटिक) त्यास मिळतो. यांच्या योगें तेथपर्यंत पोंचलेल्या अन्त्रांतील सर्व द्रव्यांचें पचन होऊं लागतें. पुढें त्या अन्नांतून असलेला पाचक असा आमासारखा रस तोही त्या कार्यास मदत करितो. अशा वेळीं आमाशयापासून अंत्रभर प्रसृत लोमवाहिन्या आपलें अन्नजनितरसधातूंच्या शोषणाचें कार्य करीत असतात. व एकंदर पचनकार्य सुरळीतपणें चालतें. इतक्यांत जो मांसरस सांगितला तो आमाशय व आंतडी यांच्या मागल्या बाजूनें व मध्यावर जें लिबलिब प्यांक्रियास–नामें इंद्रिय त्यांतून निघतो.

एकूण आमाशयांतील रसाचें कार्य घडल्यावर पुन्हां राहिलेले संस्कार होण्याकरितां यकृत्, प्यांक्रियास, व अंत्र यांजपासून प्राप्तरसांची जरूरी आहे. ह्मणजे एकंदरींत अन्नावर पचनकार्य घडण्याकरितां मुखरसाखेरीज ४ द्रवांची जरूरी लागते. असें आधुनिक पद्धतीच्या अनुरोधानें ठरतें. यांत प्लीहा वगैरे कोष्ठगत अवयवांचा विचार सुटतो. कारण तद्विषयक आधुनिक शोध ते मला पुरते समजले नाहींत. आतां वरील ४ द्रवांपैकीं एकाचा ह्मणजे रंजकाचा विचार पूर्वी झाला आहे. तेव्हां राहिले ३ द्रव, एक अमाशयस्थ नितळ अम्लद्रव, दुसरा मांसरस, तिसरा अंत्रांतून असणारा द्रव. हे तिन्ही पचनकार्योपयोगी द्रव पाचकांत मोडणार हें त्यांच्या गुणावरून स्पष्ट होतें.

[१८०] जे बहुश्रुत नसतील ते, व जे मंदबुद्धीचे असतील ते, अशांनाच प्रतिशेवर मी अमुक एक करीनच, असें, विचार केल्याशिवाय सांगण्याची संवय फार असते.

[१८१] एका मिनिटांत नाडीचे सत्तर ठोके असले ह्मणजे शरीरप्रकृति उत्तम आहे असें समजावें. परंतु यापेक्षां जलद नाडी चालली व पहाटेस खोकला येत असला, तर क्षयाच्या भावनेस आरंभ झाला असें समजावें.

[१८२] अजीर्णाचा विकार कोणत्याहि औषधानें मिटला नाहीं व मिटणार नाहीं. अजीर्ण न होण्यास फक्त रामबाण उपाय इतकाच, कीं हलक्या व पौष्टिक आहाराचें सेवन करावें. नियमित आहार करावा व मोकळया हवेंत दढोद्योगानें काम करीत जावें. ॥ वैद्यकीय दिनचर्या पहा ॥

[१८३] कोणत्याहि रीतीची अस्वस्थता नसून व चांगली रुची असून, दिवसा पाटावर बसून तीन वेळ यथेच्छ आहार करणें हें एक धन्यत्व व मोठें सौख्य आहे. पुष्कळ लोकांची शरीरप्रकृति दिसण्यांत मोठी चांगली असते; परंतु संताप व दुःखामुळें त्यांना कोणत्याहि प्रकारची रुची नसते. संतापामुळें वर्तणूक अगदीं बदलते, स्वभाव बिघडतो, प्रकृती अस्वस्थ राहते व उत्तम प्रकारच्या प्रीतीऐवजीं अप्रीती उत्पन्न होते. ॥ शेवटीं याचें फल अजीर्ण किंवा क्षय ॥

[१८४] एका तीन वर्षाच्या लहान मुलास, तो ईशस्तवन करीत नव्हता ह्मणून, त्याच्या बापानें दोन तास पावेतों यथास्थीत बडविलें; नंतर तो बराच अशक्त झाला असें पाहून, त्यानें स्वतःच्या बायकोस बोलाविलें; त्या मुलाकडे पाहून "**तो मरत आहे**" असें ती घाबरून ह्मणाली. त्याची वास्तवीक तशीच स्थिति होती. त्या मुलाचा बाप सुशिक्षित व बुद्धिमान् असून, त्यानें लौकिकहि चांगला संपादला होता. अखेर पावेतों त्याला मोठा पश्चात्ताप झाला, व आपले हातून घडलेली चूक वरचेवर त्याला जाचतच होती. एकंदरींत, या चुकीबद्दल त्याला जन्मभर जें दुःख झालें, तें वर्णनें करणें सुध्धां मोठें अशक्य आहे.

(१८५) मुलास जर मारणेंच (शिक्षा करणेंच) असेल, तर दूरवर व संपूर्ण विचार करून व ईश्वराला स्मरून जें करणें तेवढेंच शासन करावें.

(१८६) एका कुंटुंबांतील नवराबायको अत्यन्त प्रीतीनें व सुखानें नांदत होतीं; परंतु अजीर्णाचा आजार घरांत शिरल्यापासून त्यांचा स्वभाव इतका बिघडला, कीं घरांत जणूं काय एक पिशाच्च-सभाच झाली आहे. ह्मणजे नवऱ्याचा स्वभाव अती जुलमी झाला व बायको सुध्धा पुरुषवृत्तीची (जुलमी, तंटेखोर व कठोर हृदयाची) व केवळ दुस्सह अशी एक कर्कशाच बनली.

(१८७) अजीर्ण होण्याचें एक सर्वसाधारण व मुख्य खरें कारण असें आहे कीं, खाण्याच्या कामीं अतिशय गर्दी करणें, अधाशीपणा ठेवणें व वरचेवर खाणें.

[१८८] प्रत्येकाच्या शरीरांतून भिन्न भिन्न प्रकारचा गंध निघत असतो. जनसमूह जरी मोठा असला, तरी कुत्रा त्या गर्दीतून आपल्या धन्यास हुडकून काढून त्याच्या

मागें मागें चालतो. याचें कारण हेंच. शरीरांतून वाईट गंध निघत असला तर त्यावर उपाय योजिलेच पाहिजेत. जसें:—पायाची घाण येत असली तर सकाळ संध्याकाळ पाय स्वच्छ धुवावेत व तळपायांस चाहाचे प्यालाभर पाणी घेऊन त्यांत एक चमचा भर "स्पिरिट् ऑफ हॅार्ट्स हॉर्न्" घालून खूप चोळावें ! [ याहीपेक्षां, या ठिकाणीं कापराचा उपयोग जास्त चांगला होतो ] हातासहि हाच उपाय योजावा.

(१८९) जेव्हां अंतकाळ समीप येतो तेव्हां एका मिनिटांत नाडीचे १४० ठोके चालतात; व याच प्रमाणानें वाढत जाऊन अखेर ती बंद पडते. लोकरीची दोरी जशी हातास भरीव लागते, तशा स्थितीची नाडी **सुरक्षित** समजावी. परंतु धातूच्या पातळ तारेप्रमाणें **आवाजयुक्त** लागत असलेली नाडी **भयंकर** समजावी. ॥ नाडीज्ञानाचें महत्व यावरूनही सिद्ध होतें ॥

(१९०) जे देवीच्या रोगांतून उठतात, त्यांना पुढें बहुतकरून इतर रोग होत नाहींत व ते पुष्कळ दिवस वांचतात.

(१९१) एक महिन्याचें वय झाल्यावर, व चवदावे वर्षी प्रत्येकानें देवी काढवाव्यात, व त्या चांगल्या वठेपर्यंत दर महिन्यास काढवीतच जाव्यात. याप्रमाणें केल्यावर देवीपासून भय राहणार नाहीं. ॥ हा एक सात्म्य करण्याचा साधारणसा मार्ग आहे. ॥

(१९२) "अमुक रोगावर मजजवळ अमुक औषध आहे व तें घेतलें असतां गुण येईलच; परंतु गुण जरी न आला तरी त्यापासून अपाय नाहीं." असें पुष्कळ लोक खात्रीनें सांगतात; पण गुण येण्याची आशा धरून आपला जीव मात्र घालवाल हें लक्षांत धरा. अशा औषधानें फायदा कधींही होणार नाहीं. जें औषध इतरास गुणावह आहे असें जरी तुह्मांस वाटलें, तथापि तुह्मांस तें अगदीं निरुपयोगी आहे असेंही घडतें. कित्येक रोग मुदतीचे असतात व ते अमुक मुदत पावेतों स्वाभाविक रीतीनें वाढत जाऊन, शेवटीं देवी–गवर वगैरे रोगाप्रमाणें आपोआप नाहींसे होतात. ॥ या बाबतींत आर्यवैद्यकांत तर विशेष कटाक्ष आहे. रोगाची पक्कावस्था वगैरे पहाण्याचे विषय आर्यवैद्यकांत अतिशय वर्णन केले आहेत. ॥

(१९३) गोळ्या, चूर्णें अथवा कोणत्याहि तऱ्हेचें पिण्याचें औषध जास्त देण्यापेक्षां, रोग्यास उत्तेजक शब्द बोलल्यानें व आनंदित मुद्रा दाखविल्यानें त्याला विशेष फायदेशीर होईल.

(१९४) खिन्न चित्त असतांनां जर कोणी कांहीं लेख लिहीत असला, तर तो लेख असंबध्द व विपरीत लिहिला जाईल. ॥ मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः ॥

(१९५) प्रकृति चांगली असतांनां विश्रांतीच्या वेळीं आपली नाडी किती चालते हें प्रत्येकास माहित असलें पाहिजे. कारण, कित्येक वेळीं नाडी कांहीं विलक्षण स्वाभाविक रीतीनें मंद अथवा जलद चालते, व आजारी असतांना कदाचित् हें वैद्यास माहित नसल्यानें त्याचे हातूनहि ढोबळ चूक घडेल. लहान मुलाची नाडी एक मिनिटांत १३० ठोके चालते; सात वर्षांचे वयांत ८० ठोके चालते; सुमारें ६० वर्षांचें वय होईपर्यंत

नाडी ७० ठोके चालते; व स्त्रियांची, त्यापेक्षां पांच सहा ठोके जास्त चालते; ऐशीं वर्षांचें वय झालें ह्मणजे नाडीचे ठोके कमी होऊन ६० पावेतों येतात.

(१९६) ज्यांना क्षयाची भावना झाली आहे, त्याची नाडी ९०–१०० चे दरम्यान असते, व ती त्यांच्या अंतकाळ पावेतों इतकीच चालते. फुफ्फुसांतून वारंवार रक्त पडत असेल, तर ती नाडी दीर्घकाळ पावेतों स्वाभाविकच कायम राहूं शकेल.

(१९७) अलर्काभिभवरोग (कुत्र्याच्या विषापासून होणारा रोग) हा पुष्कळ वेळीं केवळ कल्पनाशक्तीनेंच मजागत रोग होतो, ह्मणजे अशीं पुष्कळ घडलेलीं उदाहरणें आहेत, कीं पिसाळलेलें कुत्रें चावलेले रोगी, पाणी पाहून धास्ती घेतात व तोंडास फेस वगैरे येऊन मरतात हें पाहूनही, कित्येकांना, साधारण दंश झाला तरी शंका येऊन, त्यांना हीं लक्षणें होतात. ॥ संशयात्मा विनश्यति.॥

(१९८) पिसाळलेलें कुत्रें एखाद्यास चावलें तर त्याला मारून टाकूं नये. कारण; तसें केल्यानें तें पिसाळलेलें होतें अगर नव्हतें हें समजाण्याला साधन राहणार नाहीं; व ज्याला तें चावलें, त्याला तें कुत्रें पिसाळलेलेंच होतें अशी धास्ती राहून परिणाम चांगला होणार नाहीं. पण अशा प्रसंगीं, त्या कुत्र्याला अंधाऱ्या खोलींत कोंडून ठेवावें व दररोज त्याला खाऊ पिऊ घालून एकटें तसेंच राहूं द्यावें. जर तें शांत होऊन आपलें खाणें खाऊं लागलें, तर एक दोन दिवसांत चांगलें होईल, व तें पिसाळलेलें नव्हतें असेंहि निश्चयात्मक ठरेल. परंतु जर त्याला कांपरें येऊन तें मेलें, तर तें पिसाळलेलेंच होतें असें खास समजावें. यावरून सशास्त्र असें दिसतें, कीं अलर्काभिभवरोग आणि उन्मत्त व चित्तभ्रम यांत कांहीं फारसा मोठा फेर नाहीं.

(१९९) खाण्यांत नियमीतपणा; स्वाभाविक रीतीनें येईल तेवढी स्वस्थ झोंप-दररोज वाटेल तेव्हां तास दोन तास मोकळ्या हवेंत फिरणें; आपल्या इच्छेनुरूप आप; त्यास प्रिय असेल असें काम करण्यास उत्तेजन मिळेल असें कृत्य करण्यांत वेळ घालविणें; प्रत्येकानें या प्रमाणें वर्तन ठेवलेंच पाहिजे. ह्मणजे मग तो कोणत्याहि जातीचा अगर वर्णाचा असला, तरी त्याला उत्तम सुख मिळून, त्याची शरीरसंपत्तीहि चांगली राहते.

(२००) खोकला येत असला ह्मणजे तो बंद करण्यासाठीं सुकविण्याचा इलाज करणें रास्त नाहीं. कारण, जो पदार्थ शरीरांत नसला पाहिजे तो काढून टाकण्यासाठीं खोकला होणें हा एक स्वाभाविक मार्ग आहे. वाढलेला कफ शरीरांत राहणें अत्यन्त मारक आहे; ह्मणून कफास वाढवून स्वाभाविक मार्गाला मदत करणें हें विशेष शहाणपणाचें कृत्य आहे.

(२०१) रात्रीची वेळ ही शरीर व मन यांना विश्रान्ती देण्याची आहे. मुख्यत्वेंकरून विद्यार्थ्यांस जेवढी झोंप मिळेल तेवढी अत्यवश्य आहे. कोणासहि सकाळीं मुद्दाम उठवूं नये, त्याची झोंप संपूर्ण झाली नाहीं ह्मणजे आयुष्य कमी करण्याप्रमाणें आहे.

(२०२) वर्तमानपत्राचा प्रकाशक एक पाद्री माझा स्नेही होता, त्यानें ख स प्रसिद्ध

केलें, कीं तीव्र चहाचा एक प्याला घेतल्यानें, उपदेश करण्याचे कामीं मला अत्यन्त हितावह वाटतें. कांहीं दिवसांनीं मी त्याचे भेटीस गेलों व पाहिलें तर तो वेडा झालेला दिसला.

(२०३) मुख्यत्वेंकरून वादविवादांत ज्या गोष्टीचा आधार, फक्त तुमचेच सांगण्यावर अवलंबून आहे, ती गोष्ट सत्य ह्मणून तुह्मी कधींहि प्रतिपादन करूं नका.

(२०४) गरीबी, उन्हातान्हांत व थंडीवाऱ्यांत फिरणें व अनेक प्रकारचे शरीरक्लेश सहन करणें, यामुळें आयुष्य वाढत नाहींच; पण त्याऐवजी पुष्कळ कमी होतें.

[२०५] जीवित्वाची किंमत सधन मनुष्यास जेवढी असते, तेवढी गरिबांनाही नसते.

[२०६] कानावर थप्पड मारणें [कानफाडांत मारणें] हें मोठें निर्दयपणाचें कृत्य आहे, व याबद्दल कोणासहि क्षमा करूं नये. कानावर मारल्यानें पुष्कळ मुलें आजन्म बहिरी राहतात. कर्णदुंदुभी [कर्णोदर] (Drum of the ear) ही एक पातळ कागदाप्रमाणें त्वचा असते, व तिच्या मागें हवेशिवाय कांहीं एक नसतें; ह्मणून तिला धक्का बसला ह्मणजे ती त्वचा फाटते व श्रवणशक्ति कायमची नाहींशी होते.

(२०७) सकाळीं न्याहारीचे वेळीं आनंदांत असावें व कपडेलत्ते योग्य रीतीनें घालावेत, ह्मणजे दिवसास चांगला आरंभ झाल्याप्रमाणें होईल.

(२०८) आपल्या घराबाहेरील जागा, स्वच्छ व सुशोभित ठेऊन शेजाऱ्यास दाखविणें हें आपलें कर्तव्य होय. ज्याप्रमाणें घरांतील भाग स्वच्छ व सुशोभित असा आपण काळजीपूर्वक ठेवतों, त्याप्रमाणें घराबाहेरील भागहि तसाच ठेवणें हें आपलेंच कर्तव्य होय.

(२०९) मनुष्याचें वजन सामान्य रीतीनें एकशें चौपन्न पौन्ड असतें. पैकीं चौऱ्यायशीं पौन्ड पाण्याचं व बाकी जें राहिलें त्याची धूर व राख होते.

(२१०) परमेश्वरानें मनुष्यास कांहीं भटकण्यासाठीं उत्पन्न केलें नाहीं. पशु, पक्षी वगैरे सर्व आपापल्या निर्वाहाचीं साधनें मोठ्या उद्योगानें पाहून काढतात. सूर्य, तारे व प्रत्येक ग्रह सुध्दां कायमचे फिरत असतात. तर मग मनुष्यानें तरी या जगांत कां ह्मणून निरुद्योगी राहावें ?

(२११) जे सदाचरणी व सकर्मी असतात तेच उत्तम व गाढ झोंप घेतात.

(२१२) "हे प्रापंचिक सर्व उद्योग सोडून केवळ पारमार्थिक सुखांत स्वस्थपणें काळ घालविण्याची संधी केव्हां येईल" असें बहुतेक ह्मणतात, त्याकडे सर्वांचें सारखें लक्ष लागलेलें असतें; परंतु खरा व उत्तम परमार्थ तर असा आहे कीं, मनुष्यजातीची उन्नति करण्याकडे आपलें तन, मन व धन खर्च करण्यांत वेळ घालवावा.

(२१३) जो अतिशय श्रम करतो, त्याची शरीरसंपत्ति चांगली राहील असें समजूं नये. परंतु जो विचारपूर्वक सतत श्रम करतो तोच फार दिवस वांचतो.

(२१४) दुपारीं अथवा मध्यरात्रीं, ज्या वेळीं तुह्मास उत्साह व उमेद असेल, तीच वेळ उत्तम काम करण्याची असते. कारण, त्या वेळीं आपण खुषीनें विषय हातीं घेतों व आपलें संपूर्ण लक्ष त्यांत गढून जातें.

( २१५ ) एकाच वाक्याच्या वाचनानें मनावर जो परिणाम होतो, त्यामुळें पुष्कळांचें दैव अनंतकालासाठीं कायम होत असतें. फक्त मनावर एक पळाच्या परिणामानें, आपल्या उत्तर काळच्या अस्तित्वाचें वर्णन मुकरर होत असतें. याच प्रमाणें शरीरावर सुध्धां लहान वस्तूंचा कायमचा परिणाम होत असतो. एकाच वेळीं जास्त आहार सेवन केल्यानें अथवा जास्त पाणी प्याल्यानें पुष्कळांचे प्राण गेले आहेत. ( अर्थात् अशी वेळ कधीं येईल त्याचा नियम नाहीं; ह्मणून प्रत्येक क्षणीं सावधान रीतीनें वागलें पाहिजे. )

( २१६ ) शरीरसंपत्ति चांगली राहून आयुष्याची वृद्धी होत जावी याला सर्वोत्तम साधन हें आहे कीं, प्रत्येकानें पूर्व वयांत सर्व प्रकारचीं सुखें संपादन करून व आपले घरीं राहून त्यांचा चांगला उपभोग घ्यावा.

[ २१७ ] ज्या क्षयी मनुष्याच्या तोंडांतून वारंवार रक्त पडतें, तो, ज्याला तसें होत नसेल त्यापेक्षां, जास्त दिवस वांचेल व त्याचा कफही कमी होईल.

( २१८ ) पिसाळलेलीं कुत्रीं भोकत नाहींत, जेव्हां त्यांनां पाणी मिळूं शकेल तेव्हां तीं पितात, व आपला मार्ग सोडून तीं कोणास चावण्यास जात नाहींत. पिसाळल्याचें खास मुख्य चिन्ह, त्यांचें हें आहे कीं, तीं आपल्या तोंडाभोवतालची बाजू चाटूं लागतात, व आपली लाळ व विष्टा वगैरे खाऊन टाकतात. चांगलीं कुत्रीं याप्रमाणें कधींच करीत नाहींत.

( २१९ ) एक शय्या अशी आहे, कीं तिची किंमत २००० डालर अथवा त्याहीपेक्षां जास्त आहे. इतकें असूनही, ही किंमत फार स्वस्त आहे. याचा अर्थ असा, कीं एवढी रकम जर तुह्मीं औषधालय बांधण्याचे कामीं खर्च कराल, तर त्याचे व्याजांतून एक रोगी बरा होईल इतका खर्च निघूं शकेल; व एक रोगी बरा झाला, कीं त्याचे जागीं दुसरा येतो; असें सतत चालतें.

( २२० ) गळ्याशीं खवखव सुटून खोकला येतो तेव्हां, मूळ अवश्य विचार करण्याचा प्रश्न असा आहे कीं, तो खोकला गळ्यापासून, पोटापासून किंवा फुफ्फुसांतून उद्भवतो ? यापैकीं जेथून उद्भवला असेल, त्यावरच उपाय योजिले पाहिजेत. [ कासनिदान पहा. ]

( २२१ ) सातांपासून एकवीस वर्षांच्या वयापावेतों कायमचे दांत संपूर्ण येतात. जुने दांत काढवूं नयेत; परंतु नव्या उगवणाऱ्या दातास ते लागून असून निघूं दिले असतां, नवे दांत मजबूत राहतात.

( २२२ ) मोठ्या उत्साहानें लिहिण्याची सर्वोत्तम वेळ सकाळची न्याहारी झाल्यानंतरची समजावी. या वेळीं, रात्रीच्या गाढ झोपेनें डोकें तरतरीत असतें, व दिवसा कामाकाजांत गुंतल्यानें त्याची शक्ति कमी झालेली नसते.

( २२३ ) प्रख्यात वाशिंग्टन यास आपल्या प्राणोत्क्रमणाच्या वेळीं अशी धास्ती पडली कीं, कदाचित् आपणास जिवंत तर पुरणार नाहींत ना ! ‘ म्युनिच ’ येथें

असा कायदा आहे, कीं प्रेतास ४८ तास, दिवा असलेल्या एका खोलींत ठेवावें. गेल्या ३०० वर्षांत, मेलेलें मनुष्य जिवंत झालें आहे असें एक सुद्धां उदाहरण घडलेलें नाहीं. कित्येक वेळीं, प्रेतास पुरण्याची पेटी उघडून पहातां, प्रेतांनीं आपलें अंग बदललें आहे असें दिसलें; परंतु घराहून स्मशानभूमी पावेतों आणण्याचे गडबडीतच त्याची अशी हालचाल झाली असली पाहिजे.

( २२४ ) आपली नाडी दर मिनिटास किती चालते याची माहिती प्रत्येक मनुष्यानें आपल्या वैद्याकडून घेऊन ठेवावी. कारण, घराचे बाहेर पडल्यानंतर अपरिचित मुलुखांत कदाचित् प्रकृति बिघडली, तर तेथील वैद्यास ती माहिती सांगण्यास फार उपयोगीं पडते.

( २२५ ) चांगल्या प्रकृतीच्या इसमाच्या काखेंत जर थरमॉमिटर [ उष्णमापक यंत्र] ठेवलें, तर पारा शंभर फॅरिनहीट अंशापावेतों चढलेला दिसेल; व जर पांच सहा अंश जास्त चढलेला दिसला, तर मृत्यु जवळ येत आहे असें समजावें.

( २२६ ) आलिव्हर वेन्डल होम्स यांनीं एकदा असें सांगितलें, कीं संसाराचीं [जीविताचीं] कित्येक सर्वोत्तम फळें, आत्माभिमानवृक्षाच्या अति नाजूक फांद्यापावेतों चढल्याशिवाय मिळूं शकत नाहींत; याचा अर्थ असा कीं, कोणी एखादे वेळीं असें खात्रीनें ह्मणूं शकेल कीं "मी तें पाहिलें" तर तें त्याचें ह्मणणें कित्येक प्रसंगीं मोठ्या किंमतीचें व वजनदार ह्मणतलें जातें; यावरून असें सिद्ध होतें, कीं आत्माभिमानानें बोलणें हें कांहीं अगदीं अयोग्यच आहे असें समजूं नये.

( २२७ ) दांतांमध्यें रेशमाचा दोरा (अथवा दुसरें कांहीं घालणें) ही मोठी चूक आहे; कारण, अशानें दांतांत इतर वस्तूंचा शिरकाव होण्यास जागा मिळते.

( २२८ ) एखाद्या व्यवहाराचे आधीन राहून केवळ त्याचे दास बनून कोणी कधींही राहूं नये; वेळेला अनुसरून वर्तन ठेवतां यावें अशाच रीतीनें मनुष्यास ईश्वरानें निर्मिलें आहे. चालू रूढींत योग्य प्रसंगीं योग्य फेरफार करणें अत्यन्त हितावह आहे. व त्याचा शरीरसंपत्तीवरही चांगला परिणाम घडतो.

( २२९ ) स्वयंपाकास थोडा उशीर झाला तर एकदम संतापून लाल होऊन जाऊं नये. वेळेला अनुसरून वर्तन ठेवण्याची जर प्रत्येकांनीं सवय लावली, तर पुष्कळ प्रकारचे फायदे खात्रीनें होतील.

( २३० ) वयाच्या ४० व्या वर्षी धारायंत्रगृहांत ( थंड पाण्याचे कारंजाखालीं ) स्नान केलें तर हितावह आहे; परंतु ८० वर्षांच्या वयांत त्यांत स्नान केलें तर मात्र मारक आहे.

( २३१ ) वैद्याचे अनुमोदनाशिवाय कानांस अगर डोळ्यांस मंदोष्ण [कोमट] पाण्याशिवाय कांहीं एक लावूं नये. कारण, एकदां हीं इंद्रियें बिघडलीं ह्मणजे पुनः सुधरणें कठिण.

( २३२ ) पहिला दांत सहाव्या मासांत दिसूं लागतो; तीन वर्षांत पहिल्या वेळचे सर्व दांत निघतात व दुसऱ्या वेळचे दांत, सात व एकविस वर्षांच्या दरम्यान निघतात.

( २३३ ) हाताच्या बोटाच्या टोकाशिवाय इतर बारीक हत्यारें वगैरे घालून कान कोरणें हें अत्यन्त जोखमीचें काम आहे; कारण, दुर्दैवानें जर ते खोल भागांत शिरलें अथवा आंत धक्का लागला, तर श्रवणेंद्रियाची पातळ त्वचा फाटून जाते.

( २३४ ) चांगले बळकट व सुशोभित असे दांत होण्यास लहान मुलास तीन वर्षांच्या वयापासून न्याहारीचे वेळीं व रात्रीं जेवतांनां "ओट"चें पीठ अगर कणीक दुधांत भिजऊन त्यांत थोडी साखर घालून केलेला पदार्थ खाऊं घालावा; या पदार्थांत, इतर पदार्थांपेक्षां हाडें व दांत बळकट करणारे भाग असतात.

[ २३५ ] जो मनुष्य दररोज आहार तोलून नियमानें खातो, त्याचें खाणें पिणें दीर्घकाल पावेतों चालणार नाहीं. दररोज आहार खाणें तो सहाजीक ज्ञानानेंच मुकरर करून खावा हें उत्तम. कारण, उष्ण अथवा शीत यामुळें अगर कमजास्त व्यायाम झाल्यामुळें आहारांत फेरफार होतो.

( २३६ ) कितीही हुषार व सशक्त मनुष्य असला, तरी चोवीस तासांत सतत व एका बैठकीला चार अगर पांच तासांपेक्षां जास्त वेळ चांगले लेख लिहूं शकणार नाहीं. काम करतांनां, चाळीस मिनिटांच्या अंतरानें खोलींत हिकडे तिकडे फिरून थोडा वेळ विसावा घेतल्यानें काम चांगलें करतां येतें.

( २३७ ) दररोज रात्रीं अभ्यास करण्याची सवय असणें हें वेळेचा वास्तविक बचाव केल्याप्रमाणें होत नाहीं.

( २३८ ) "वेळ फुकट दवडणें हें पातक आहे ह्मणून प्रत्येक पळ काम करण्यांत घालवावें" असें पुष्कळांनीं लिहून ठेवलें आहे; परंतु परमेश्वरानें सुध्धां जग निर्माण करून विश्रांति घेतली, त्याप्रमाणें मनुष्यानींहि घेतली पाहिजे.

( २३९ ) मनुष्यानें लग्न करणें हें स्वाभाविक आहे; लग्न केल्याशिवाय स्त्री अगर पुरुष कोणीही संसारांत स्वस्थ वसत नाहींत.

[ २४० ] जर स्त्रियांनीं वीस वर्षांचे आंत लग्नावांचून राहिलें पाहिजे, तर पुरुषांनीं पंचवीस वर्षेपर्यंत वाट पाहिली पाहिजे.

[ २४१ ] मनुष्य आजारी असतांनां नैसर्गिक [निसर्गाला] कोणती मदत अवश्य पाहिजे, हें जो वैद्य शोधून काढील, तोच निष्णात व यशस्वी समजावा; कारण, निसर्गाला जी मदत पाहिजे ती तो त्वरित देऊं शकतो.

( २४२ ) अयोग्य खाण्याच्या संबंधानें अथवा लिव्हर अव्यवस्थित झाल्यामुळें पुष्कळ वेळीं असें होतें, कीं फक्त दिवसा गळ्याशीं खवखव सुटते व खोकला येत नाहीं पण येईल असें वाटतें; तर त्याचें कारण अजीर्णच व ह्मणून त्यावरच उपाय योजावेत. जेव्हां रोगाचें कारण दोन फूट अंतरावर असतें, ह्मणजे पोटांतल्या अगर लिव्हरच्या कारणानें खोकला व्हावा व तेव्हां तो नाहीसा होण्यास्तव गळ्यावर जर औषधें लाविलीं, तर त्यापासून कांहींएक उपयोग होणार नाहीं.

( २४३ ) भूक लागली असेल त्या वेळीं, आहारानंतर लागलींच, कांहीं निशा केली

असेल तेव्हां, अथवा रागाचा आवेश असेल तेव्हां कोणी कांहींही लिहूं नये; कारण कीं जर लिहिलेंच तर तो लेख अप्रयोजक लिहिला जाऊन त्याला मूर्खांत मात्र काढतील.

(२४४) मी कालेजांत असतांना एक मनुष्य बोध करीत होता, कीं गाडीची वाट पाहत असतांना, कोणास भेटण्यास जावयाचें असेल तेव्हां अथवा जेवते वेळीं पुस्तक हातांत घेऊन तें वाचावें. कारण, तेवढा सुध्दां फुरसुदीचा वेळ फुकट घालऊं नये; या प्रमाणें त्या मनुष्यानें क्रम चालू ठेवला, परंतु तो तारुण्यांतच वेडा होऊन मरण पावला.

[२४५] जीं मनुष्यें रात्रीं फार वेळ लिहीत बसतात व अतिशय अभ्यास करतात त्यांची शरीर संपत्ति चांगली राहणार नाहीं व ते तारुण्याच्या ऐन भरांत मृत्युमुखीं पडतील. रात्रीची स्वाभाविक वेळ ही, स्वस्थ झोंप व विश्रांति घेण्याची आहे.

[२४६] न्युयॉर्क येथील धर्मादाय शाळेंतील मुलें, श्रीमंतांसाठीं स्थापन झालेल्या शाळेंतील मुलांपेक्षां हिवाळ्यांत कपडे घालण्याची फारच काळजी घेतात. गरीबांच्या स्त्रिया, आपल्या मुलास उष्ण कपडे घालून शाळेंत पाठवितात; त्या, मुलांच्या बाह्य भपक्याकडे विशेष लक्ष देत नाहींत, परंतु त्यांचें लक्ष मुलांच्या सुखाकडे विशेष असतें.

[२४७] पाण्याच्या निकालासाठीं जर गटाराची उत्तम रीत योजिली असेल, तर त्या जागेंत ताप, खोकला वगैरे रोग कधींच होणार नाहींत.

[२४८] न्युयॉर्क शहरांतील पुष्कळ मोठमोठाल्या इमारती, भुयारांतील दुर्गंधामुळें मनुष्यास राहण्यास अगदीं अयोग्य आहेत. अशा दुर्गंधीपासून मनुष्यास इजा होऊं नये यास एक उपाय असा आहे, कीं इमारतीला लागून जमीनींपासून इमारतीच्या वर पोहचेल इतकी लोखंडाची नळी ठेवावी, व तिच्या [नळीच्या] वरल्या टोंकावर एक धूमनिर्गम [धुराडें] ठेवावें. ह्मणजे जमिनींतून निघणारे सर्व प्रकारचे दुर्गंध त्या नळीवाटे धुराड्याच्या मार्गानें निघून जातात व मनुष्यास त्यापासून कांहींएक इजा होत नाहीं.

[२४९] जगांतील प्रत्येक मनुष्याचें वजन करून, त्या सर्वांची सरासरी काढली तर ती शंभर पौंड होते !!

[२५०] जमिनीच्या सपाटीवरील पाण्याचा निकाल वाहत्या पाण्यांत काढण्याची सर्वोत्तम रीत जर योजण्यांत आली तर मुक्तानुबंधीं [उडणारे] व सांसर्गिक रोग कधींही त्या ठिकाणीं येणार नाहींत.

[२५१] मनुष्याहारी ह्मणतात, कीं गोऱ्या मनुष्याचें, मांस कडु व खारट असतें व तें फार दिवस टिकत नाहीं. काळ्या मनुष्याचें, त्याचे उलट ह्मणजे स्वादिष्ट असून तें वाळवून ठेविलें असतां पुष्कळ दिवस टिकतें. यावरून स्पष्ट दिसतें, कीं त्वचेच्या रंगांत फरक असल्यानें, मनुष्याच्या सबंद रचनेंत फरक पडतो; व पुष्कळ अंशीं मनाचे प्रवृत्तींत व वर्तणुकींतही फरक पडतो. गोऱ्या मनुष्यास थंडी मानवते व त्यांतच ते उत्तम रीतीनें वाढतात; व काळ्या लोकांस उष्ण मानवतें व त्यांची स्वाभाविक बुद्धि व त्यांचा अत्यानंद हे धर्मसंबंधीं विषयांत असतात.

## उतारा.

श्रीसयाजीविजय, बडोदें. [ ता. ३०-३-१९०३. ]

### स्तुत्य प्रयत्न.—श्रीसयाजी—औषधशाला.

आमच्या वाचकांच्या स्मरणांत असेलच, कीं गेल्या जूनमध्यें ही औषधशाला, प्रख्यात वैद्यराज आ. म. शंकर दाजी शास्त्री पदे यांनीं मुंबईस स्थापन केली आहे. आमच्या वैद्यकांत-ग्रंथ, खात्रीच्या वनस्पती व प्रमाणशुद्ध औषधें यांची न्यूनता उद्भवल्यामुळें, त्यापासून त्याचा जितका प्रभाव पडावा तितका पडत नाहीं ही गोष्ट ध्यानांत आणून, वै. शंकर शास्त्री पदे यांचा निःसीम प्रयत्न, पंधरासोळा वर्षे चालू असून, त्यांनीं महत्वाचे ग्रंथ-सुमारें पन्नासपर्यंत प्रसिद्ध केले आहेत; अनेक वनस्पतींचा निःसंदेह शोध लावला आहे; वनस्पतींचा संग्रह करण्याची व्यवस्था दीर्घ परिश्रमानें केली आहे; कित्येक शास्त्रशुद्ध औषधें अनेक रीतींनीं तपासून तयार केलीं आहेत; आणि या सर्वांचा, सरसकट सर्व लोकांनां मोकळ्या रीतीनें लाभ करून देण्याची सवड केली आहे. त्यांनीं आपल्या आयुष्यांतील सर्व, तनु-मन-धन या शक्तित्रयाचा विनियोग, सार्वजनिक कार्यार्थच लावला आहे; याचा विचार करून पहातां, अशांना जर वेळींच चांगला आश्रय मिळेल, तर खर्चांत कांहीं नांव घेण्यासारखी गोष्ट घडून येईल अशी आह्मांस आशा आहे. औषधांच्या कामीं व त्यांतही प्राचीन विद्यांचा उपयोग, प्रस्तुतच्या समयीं निर्विवादरीतीनें करून घेण्याच्या कामीं, अगोदर किती परिश्रम घ्यावा लागतो, व अडचणी पदोपदीं उत्पन्न होतात, त्या दूर करतांना किती शक्तिऱ्हास होतो, याचें अनुमान करतां येण्यास, विचारी पुरुषच योग्य आहेत. श्रीमंत महाराज साहेबांचा आश्रय या प्रयत्नास आरंभापासून आहे, व तो पुढेंही वृद्धिंगत होऊन, या औषधशालेचा विस्तार, हिंदुस्थानभर होईल अशी आह्मी आशा करून आहों.

---

## आर्यभिषकाच्या वर्गणीदारांस प्रासंगिक सूचना.

(१) चरकसंहितेच्या सूत्रस्थानाचा उत्तरार्ध—भाग १ ला गतांकीं समाप्त झाला आहे. आणि दुसरा भाग स्वतंत्र छापून विक्रीस तयार आहे. किंमत २ रुपये. वर्गणीदारांस निम्मे किंमतीस मिळतो. ज्यांनीं घेतला नसेल त्यांनीं मागवावा.

(२) चरकाचे एकंदर भाग किति तयार झाले आहेत, त्याची यादी, शेवटच्या पृष्ठावर आहे ती पहा.

(३) गतवर्षाच्या अंकांत अधुरा राहिलेला विषय, 'दीर्घायु कसें व्हावें ?' हा आजच्या अंकापासून पुनः देण्याचें सुरू केलें आहे. **जे यंदा नवीनच वर्गणीदार झाले आहेत**, त्यांना याचीं मागचीं पृष्ठें मिळालीं नाहींत; तीं २४ आहेत. त्यांस पाहिजे असल्यास, ६ आणे किंमतीस देण्यांत येतील. टपाल शिवाय.

(४) वनौषधीगुणादर्शाचा सातवा भाग, चरक-शारीरस्थान (देखाव्यांसह) आणि मार्थ हारीत संहिता भाग २ रा हे विषय लौकरच सुरू **करण्यांत येतील.**

# श्रीसयाजी-औषधशाळा.

मुंबई, माधवबागेजवळ. (पोस्ट गिरगांव.)

प्रवर्तक व नियोजक-वैद्यराज

**आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.**

(१) **रोगपरीक्षा करून औषधें** देण्यांत येतात. केवळ गरीबांनां सकाळीं ८ ते ९ पर्यंत **धर्मार्थ** औषधें मिळतात.

(२.) **सप्रमाण- शास्त्रशुद्ध औषधें** तयार केलेली विकत मिळतात. यादी मागवा.

(३.) वैद्यकविषयाची भरपूर माहिती देणारें सुप्रसिद्ध '**आर्यभिषक्**' **मासिकपुस्तक १४** वर्षे एकसारखें निघत असतें. सर्व भारतीयांनां अत्यंत उपयुक्त अशा '**भारतधर्म**' मासिकपुस्तकासह मिळतें. टपालसहित वार्षिक वर्गणी १ रु. १० आणे. **फक्त आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **फक्त भारतधर्म** घेतल्यास १ रु०

(४.) आर्यभिषक्-पुस्तकावलींतील-**वैद्यकाच्या भिन्न भिन्न विषयांच्या संपूर्ण माहितीचीं निरनिराळीं पुस्तकें** विक्रीस तयार आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे वर्गणीदार होतील त्यांस—

## निम्मे किंमतीस

मिळतात. **सार्थ श्रीचरकसंहिता** हा ऋषिप्रणीत जगन्मान्य वैद्यकग्रंथ, **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या उदाराश्रयानें**, भागशः छापत असून, तोही सदरप्रमाणेंच मिळतो. सर्व माहिती, यादी व नमुना मागवा.

(५.) काढे, चूर्णें वगैऱ्यांसाठीं खात्रीच्या **वनस्पतीही येथें मिळतात.**

**विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.** किंमतीशिवाय टपालखर्च.

| | | |
|---|---|---|
| वनौषधीगुणा० १ला १२आ | औ० मानपरिभाषा. १॥आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, |
| ,, भा. २ रा. १ रु. | गोवैद्यक.... ... २ आ. | सूत्रस्थान, पूर्वा. २ रु. |
| ,, भा. ३ रा. १। रु. | प्राणिज औषधी. २ आ. | ,,सूत्र.उत्त.-भा.१ ला १॥रु |
| ,, भा. ४था. १॥रु. | अश्वरोगपरिज्ञान. पाऊणआ। | ,, ,, भा. २ रा २ रु. |
| ,, भा. ५ वा. १। रु. | त्रिदोषविचार, भा.१;४आ. | ,, निदानस्थान १४ आ. |
| ,, भा. ६वा १२आ. | ग्रंथिकसन्निपात... ६ आ. | ,, विमानस्थान १॥ रु. |
| सुबोध वैद्यक.... १॥ रु. | सा.हारीतसंहि.भा१ला१।रु | ,, इंद्रियस्थान १२ आ. |
| रसवैद्य. ... ... १२आ. | सार्थयोगशतक... ४ आ. | सा च. कल्पस्थान १४आ. |
| बृहन्निघंटु... ... १॥ रु. | सार्थ वैद्यवल्लभ... ४ आ. | ,, सिद्धिस्थान १॥ रु. |
| औषधिगुणदोष १॥ रु. | बृहत्पाकसंग्रह ... १॥ रु. | ,,चिकित्सा.भा.१ला.१।॥रु |
| गर्भारपण-बाळंतपण १ रु. | नाडीपरीक्षेचें महत्त्व ३ आ. | नपुंसकमी. व कामस.१॥रु. |
| वीर्यनाश व उपाय. ३ आ. | औषधीबाद ... २ रु. | निघंटशिरोमणि, २। रु. |
| औषधीक्रिया. ... ८ आ. | सार्थ ज्वरपराजय २ रु. | आयुर्वेदरहस्य भा१ला१ रु. |
| राजवैद्य.... ... १२आ. | | |

## योगशास्त्राची उत्तम माहिती देणारें पुस्तक.


कि. ४ आणे. **योगविज्ञान.** टपाल ८॥ आ

पुढील नांवानें सर्व व्यवहार करावा—**वैद्यराज आयुर्वेदमहोपाध्याय** शंकर दाजी शास्त्री पदे, श्रीसयाजी-औषधशाळा व आर्यभिषक्कार्यालय, माधवबागेजवळ **मुंबई**



मुंबई नेटिव्ह ओपिनियन छा० त छापविलें.

वै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १४. 

# आर्यभिषक्

अंक १२.



संपादक [illegible] हरि [illegible] दाजी [illegible] पदे.

आयुर्वेदमतोपासनाय.

मुंबई. [illegible] गिरगांव, आर्यभिषक्कार्यालय.

[illegible]

[illegible]

वृषभ संक्रांति. शके १८२५ वैशाख [illegible] ३ गुरुवार. ता. [illegible] मे, सन [illegible]

विषयानुक्रम.–आर्यभिषकांत घारलेले नवीन फेरफार; त्रिदोषविचार; र[illegible]चित्र) वनौषधिगुणादर्श, भाग ७ वा–पृष्ठ १–४

# [illegible]दार.स विशेष अगत्याची सूचना.

नवीन (म्हणजे १५ व्या) वर्षाची वर्गणी, बक्षिसाबरोबर आकार-ण्यास ज्यांस सांगणें असेल, त्यांनीं तशी सूचना लौकर करावी.

ज्यांस पुढच्या वर्षी घेणें नसेल, त्यांनीं ता. ५ जूनपर्यंत आम्हांस तसें कळवावें. ज्यांच्याकडून तसें कळविण्यांत येणार नाहीं किंवा ज्यांची बक्षीसाबरोबरही वर्गणी येणार नाहीं, त्यांस—

**चालू वर्षाचा १२ वा अंक, ता. १४ जून रोजीं**
**[illegible] व्या वर्षाची अगाऊ वर्गणी आकारून व्ही. पी. केला जाईल.**

## विनंति

इतकीच आहे, कीं या वर्षी आम्हीं फार खर्चाचे फेरफार केले आहेत; [illegible] आश्रयदात्यांनीं वर्गणी लौकर पाठवावी; आणि निदान एक[illegible] ग्राहक तरी जास्त मिळवून देण्याची कृपा करावी. [illegible]–आम्हीं तूर्त जें काम करण्याची छाती केली आहे, तें किती कठीण [illegible] वाचकांना समजतें आहे[illegible]. [illegible] आपापली वर्गणी, [illegible] आणि आणखी ग्राहक मिळवून देणें [illegible] [illegible] करावेंच पाहिजे.

## [illegible]क्षिसां[illegible] सवलत.

[illegible] पाठविणा[illegible] (१) [illegible] (२) [illegible] देण्या[illegible]

[illegible] आहे [illegible] सचित्र संस्कृत आणि [illegible] देण्यांत येईल [illegible] वर्गणी पाठ[illegible] [illegible] देण्यांत येई[illegible].

[illegible] मासिकपुस्तकांत–त्याचे ग्राहकांस नवीन [illegible]

[illegible]

[illegible]

व्यवस्थापक आर्यभिषक्.

[illegible]

कै० ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.

वर्ष १४ वें.] **आर्यभिषक्.** [ अंक ११वा.

ARYABHISHAK OR DOCTOR OF ARYANS.
A Monthly Journal Containing Medical news and articles.

वृषभ संक्रांति. शके १८२५ वैशाख वद्य ३ गुरुवार. ता० १४।५।१९०३

# आर्यभिषकांस धारलेले नवीन फेरफार.

आपल्या वैद्यकाची माहिती जितकी खुलासेवार देतां येईल तितकी देण्यासाठींच आर्यभिषकाचें जनन आहे. पण त्याचें कर्तव्य, साधनसम्पत्तेनुरूप चालणार हें उघडच आहे. तितक्यांतून तूर्त सात वर्षे जी एकसारखी संकटपरंपरा येत आहे, तीमुळें आर्यभिषकास मोठ्याच नुकसानींत उतरावें लागलें. केवळ श्रीशंकराच्या कृपादृष्टीनें आर्यभिषक् अशाही संकटांतून आपली कामगिरी बजावीत आहे इतकेंच. आज विशेष आनंद मानण्यासारखी गोष्ट कळविण्याची आहे ती ही कीं, पुष्कळ वर्षे आमचा विचार, वनस्पतींचीं हुबेहुब चित्रें देण्याचा होता, तो हेतु आज पूर्ण होत आहे. या हेतूस प्रोत्साहन देण्याचें मुख्य श्रेय, आमचे आश्रयदाते व सहयोगी वैद्य **पं० प्रयागराज तिवारी** ( बार्शी-टाकळी, जि० अकोला ) यांसच आहे. यांनीं तनु-मन-धनांनीं सहाय्य करण्याचें आश्वासन दिलें इतकेंच नव्हे, तर त्याप्रमाणें आरंभही केला ही सामान्य गोष्ट नव्हे. पुन्हा, कोणाच्या आग्रहावरून त्यांनीं हें केलें नसून, केवळ विद्याव्यासंगाविषयीं उत्कट इच्छेनेंच त्यांच्या मनांत ही प्रेरणा झाली आहे. त्यांच्या विशेष मदतीनेंच, या अंकापासून आह्मीं वनस्पतींचे देखावे देण्याची सुरुवात केली आहे. परमेश्वर अशी सुबुद्धि, प्रत्येकाच्या शक्त्यनुरूप देईल तर हिंदुस्थानची भरभराट प्रत्येक विधानांत होण्यास अवकाश लागणार नाहीं.

पण आमच्या लोकांना उपयुक्त कार्यास मदत करण्याची किंवा स्वतः तशीं कामं करण्याची बुद्धीच होत नाहीं. कित्येक राजेरजवाडे, उपयुक्त ह्मणून कांहीं कामें करतात; पण तिचें पर्यवसान देशस्थितीला हितावह असें झालेलें दिसत नाहीं. प्राचीन विद्या, प्राचीन कला, एतद्देशीय लोक किंवा एतद्देशीय कल्पना-यांची उन्नति करण्याची बुद्धि, मोठमोठयांनाही होत नाहीं. देशहितकारी बुद्धि किंवा विद्योत्तेजनाविषयीं उदारत्व जें कांहीं चांगलेसें दिसून येतें, त्यांत-परकीयांच्या अनुकरणापेक्षां आणि अर्थात् परिणामीं त्यांनाच त्याची मदत होण्यापेक्षां दुसरा कांहीं उपयोग होत नाहीं!

विद्या-कलाप्रसारांविषयीं ज्यांनीं हातीं कंकण बांधलें आहे अशांचीही हीच स्थिती दिसून यावी, व प्रसंगीं योग्य मदत देण्याच्या कामीं त्यांची उदासीनता दिसावी यासारखें दुसरें लाजीरवाणें काय आहे?

असो. ईशेच्छेप्रमाणें सर्व होणारें आहे. त्याबद्दल खेद मानण्याचें कारण नाहीं. ओघास आली ह्मणून ही गोष्ट येथें कळविली आहे इतकेंच. याचा परिणाम काय होणें तो ईश्वराच्या सत्तेनेंच होईल.

## नवीन व्यवस्था.

**चरकाचें मराठी भाषांतर**-बहुतेक पूर्ण होत आलें आहे. शारीरस्थान. **प्रत्यक्ष देखाव्यासहित देण्याचें**, १५ व्या वर्षांत सुरू करणार आहों. आज वनस्पतींचे देखावे दिले आहेत. त्यापेक्षांही उत्कृष्ट देखाव, यापुढें क्रमाक्रमानें येत जातील. शिवाय शारीराचे देखावे येऊन, एक रसायनसंबंधी मोठया ग्रंथाचें भाषांतर, येत्या वर्षापासून सुरू करणार असून, **त्यांतही कित्येक देखावे देणार आहों.**

**हारीतसंहितेचें** भाषांतर अद्याप पुरें व्हावयाचें आहे; तें पुरें करावें आणि सुश्रुताचेंही भाषांतर सुरू करावें अशी सूचना पुष्कळांकडून आली आहे. आह्मी तें सर्व करण्यास सिद्ध आहों. परंतु या कामीं लागणारी द्रव्याची मदत, जशी पाहिजे तशी नसल्यानें, जें काम आह्मी एक वर्षांत करूं शकूं त्याला दहा वर्षें लागत आहेत. द्रव्यसहाय्य करण्याचें ज्यांचे हातीं आहे, त्यांना बुद्धि होत नाहीं त्यास आमचा नाइलाज आहे. ज्यांना इच्छा आहे आणि एकेक प्रत खरेदी घेऊनही जे एक प्रकारें द्रव्यसहाय्यच करीत आहेत, अशापैकीं बहुतेकांची स्थिति, तूर्त पांच सात वर्षें, प्लग व दुष्काळामुळें फारच भयानक झाली आहे.

त्यामुळें तूर्त त्यांनाच जास्त सवलती देऊन, ग्रंथसंग्रह करण्याची रुचि करून द्यावी लागते. फार तर काय, पण चार वर्षांपूर्वी आर्यभिषक्‌ची वर्गणी २ रु० ६ आणे होती, तीही लोकस्थितीमुळें जवळजवळ निम्यानें कमी करावी लागली आहे.

आमचा खर्च मात्र पुष्कळ अंशीं जास्त वाढला आहे. तसेंच पुस्तकें निम्मे किंमतीनें द्यावीं लागत आहेत.

कित्येक खमंग आश्रयदाते, या सर्व करण्यावरून असें ह्मणतात कीं, इतकें स्वस्त देण्यास परवडतें त्या अर्थीं आणखीही जास्त सवलत देतां येणें शक्य आहे. यापेक्षां आतां आणखी आमच्या लोकांची दानशूरता कोणती वर्णन करावी ? असो. असें आहे तरी कांहीं सद्गृहस्थ, आह्मांस उलट असेंही सांगणारे आहेत, कीं **तुह्मी किंमत थोडी जास्त ठेवा, परंतु पुस्तकें सुरेख होतील असेंच करा."** ही सूचना करणारांचे आह्मीं आभारी आहों; तरी आह्मांस किंमत जास्त ठेवतां येत नाहीं व त्याचें कारण, एकंदर लोकस्थिति होय. असो.

परमेश्वरकृपेनें अशाही स्थितींत कोणी तरी हातभार लावणारे भेटतात व आणखीही भेटतील अशा समजुतीवर आह्मीं आपल्या तनु-मन-धनाचा व्यय, पूर्ववत् या कामीं करीत राहूंच: मात्र यांतून ज्या कित्येक सुधारणा करण्याची आमची तयारी आहे, त्या सुधारणा हळुहळु व आश्रयानुरूप अमलांत येतील.

## तूर्त सुरुवात व पुढची व्यवस्था.

(१) **वनस्पतींचे देखावे**—सुरू केले आहेतच; त्यांत कित्येक जास्त जास्त रंगाचे आहेत, तेही येत्या वर्षापासून येत जातील.

(२) तसेंच **शारिराचेही देखावे** येतील. आणि आंग्ल व आर्यशास्त्रानुसार माहिती येईल.

(३) रसायनसंबंधीं भरपूर माहितीचा एक मोठा ग्रंथ '**रससारशंकर**' या नांवाचा, भाषांतरासह व जरूर त्या देखाव्यासह देण्यांत येईल. त्यांत—योगरत्नाकर, रसरत्नसमुचय इत्यादि मोठमोठया रसायनग्रंथांचा निवडक संग्रह केलेला आहे.

(४) **सार्थ हारीत संहिता,** भाग २ ाही सुरू करण्याचा विचार आहे. आणि वरील विषयांतून सवड मिळेल त्याप्रमाणें तो सुरू करण्यांत येईल जर कोणाकडून द्रव्याचा आश्रय मिळेल, तर **हारीतसंहिता व सुश्रुत** हे दोन्ही ग्रंथ, स्वतंत्रपणें छापून काढण्याची आमची तयारी आहे.

(५) '**दीर्घायु कसें व्हावें**' हा विषयही हळु हळु पुरा करण्यांत येईल. त्याचप्रमाणें '**त्रिदोषविचार**' ही चालू राहील.

मजकुरासंबंधीं ही व्यवस्था झाली. आतां आमच्या **आश्रदात्यांना एक सूचना** करावयाची आहे, कीं हें सर्व कार्य आह्मीं करण्यास सिद्ध झालों आहों: या कामीं सर्वांनीं यथाशक्ति मदत केली पाहिजे. ज्यांना शक्य असेल त्यांनीं द्रव्यद्वारा, किंव

पुस्तकें खरेदी करून, अथवा लोकांत पुस्तकप्रसार करून सहाय्य करावें. आह्मी त्याबद्दल जास्त लिहीत नाहीं. सुज्ञांनींच त्याचा विचार करावा.

## विक्रीस तयार औषधांचें, मोठें यादी-पुस्तक.

कित्येक लोकांची कित्येक वर्षांपासून, आपलीं देशी औषधें शास्त्रसिद्ध व अनुभविक अशीं तयार करून, त्यांची मोठी यादी, सविस्तर माहितीची तयार करण्याविषयीं-सूचना होत होत्या. परंतु प्लेगच्या अडचणीमुळें व कित्येक सहाय्यकांचा स्वर्गवास झाल्यामुळें, त्याप्रमाणें व्यवस्था होऊं शकली नाहीं. हल्लीं दोन वर्षांपासून त्या तजविजीस आरंभ करून, व त्या बाबतींत सर्व योजना यथायोग्य करून, यथाशास्त्र व अनुभविक औषधांचा संग्रह तयार केला आहे. त्याची यादी छापून तयार झाली आहे. ज्यांस मागविणें असेल त्यांनीं कळवावें, ह्मणजे पाठविण्यांत येईल.

**शुभं भवतु.**

---

## प्लेगवर उपाय.

उमरावतीच्या सरस्वतीप्रकाश मासिक पुस्तकांत, प्लेगवर पुढील उपाय प्रसिद्ध झाले आहेत; ते आह्मी येथें आमच्या वाचकांकरितां देत आहों.

१ शेतांतील निर्मळ माती ( काळी असल्यास उत्तम ) घेऊन तिच्यावर **थंड** पाणी ओतून पातळ चिखलासारखी करावी व स्वच्छ कपड्यावर तिचा एक किंवा दीड अंगुल जाडीचा थर करावा व तें कापड **ओटीपोटावर** कातडीकडेस मातीचें अंग करून बांधावें. गांठ आली असल्यास गांठीवरही अशीच लहान पट्टी बांधावी. नतर वाळण्याच्या आधींच ती काढून दुसरी पट्टी बांधीत जावी याप्रमाणें पट्ट्या लावण्याचा क्रम ठेविल्यानें मनुष्य **सहसा दगावत** नाहीं; व हा क्रम, काळजीपूर्वक चालविल्यानें रोगी **औषधावांचून** बरा होतो.

२ दुसरा उपाय लखनौचे डॉक्टर सय्यद मन्सूर अली यांनी अनुभवलेला आहे. ते लिहितात कीं, " मीं, ताप पाहून तापाच्या मानानें तापाचेंच औषध देत असतों. परंतु जेव्हां **गांठ** उठते तेव्हां तीवर **नागफणि** ( जिच्या पानांवर कांटे असतात, व फळें लाल येतात व फळांवरही कांटे असतात, तिच्या पानाच्या आंतील गर, विस्तवावर थोडा गरम करून बांधीत असतों: त्यामुळें कशीही लहान मोठी गांठ बसून किंवा विरघळून जाते व तीबरोबरच तापही कमी होत जातो. किंवा सहा मासे काळा बोळ व सहा मासे अफू यांचें मिश्रण करून तें गरम करून त्याचा लेप गांठीवर चढ. विरघळून गांठ विरघळून जाते.

# त्रिदोषविचार.

[ रा. रा. अवधूत वासुदेव वैद्य यांजकडून—गताकांवरून पुढें चालू. ]

आतां हे तिन्ही द्रव दृष्ट आहेत तेव्हां पाचकाचा दृष्ट असा जो भाग, त्याची आधुनिक पद्धतीनें माहिती कळली. पाचक द्रवांचा उगम रक्तांतून आहे. व हृदय रक्ताचा खजिना आहे. तेव्हां पाचक द्रव्यांची उत्पत्ति जशी रक्तांतील पदार्थघटनेवर अवलंबून आहे, तद्वत् हृद्गति वा हृत्प्रेरणा यांवरही पुष्कळ अवलंबून* आहे असें ह्मणण्यास प्रत्यवाय येईलसें वाटत नाहीं.

आतांपर्यंत सांगितलेलें एकंदर पचनकार्य व तत्साधनीभूत रसमय द्रव्यें वगैरेविषयीं ज्यांत विवरण झालें आहे अशा आपल्या मान्य ग्रंथांतील कांहीं महदुक्ति आहेत त्या पुढें देतों. ह्मणजे त्यांवरून आर्यग्रंथांतून जी रंजक-पाचकांची दृष्ट माहिती आहे ती पुढें मांडिल्यासारखें होईल.

"अथ या एता वक्ष्यमाणा हृदयस्य पुण्डरीकाकारस्य ब्रह्मोपासनस्थानस्य संबंधिनो नाड्यो हृदयमांसपिण्डात्सर्वतो विनिःसृताः । आदित्यमण्डलादिव रश्मयस्ताश्चैताः पिंगलस्य वर्णविशेषविशिष्टस्या निम्नः सूक्ष्मरसस्य रसेन पूर्णा-स्तदाकारा एव तिष्ठन्ति वर्तन्तइत्यर्थः । तथा शुक्लस्य नीलस्य पीतस्य च रसस्य पूर्णा इति सर्वत्राध्याहार्यं । सौरेण तेजसा पित्ताख्येन पाकाभिर्निवृत्तेन । कफे-नाल्पेन संपर्कात्पिंगलं भवति सौरं तेजः । पित्ताख्यं तदेव च वातभूयस्त्वान्नीलं भवति । तदेव च कफभूयस्त्वाच्छुक्लम् । कफेन समतां पीतं । शोणितबाहुल्येन लोहितम् । वैद्यकाद्वा वर्णविशेषा अन्वेष्टव्याः । कथं भवतीति । श्रुतिस्त्वाहाऽऽ-दित्यसंबंधादेव तत्तेजसो नाडीष्वनुगतस्यैतेवर्णविशेषाइति । कथमसौ वा आदि-त्यः पिंगलो वर्ण एष आदित्यः शुक्लोप्येष नील एष लोहित एष आदित्य एव।।१।।

आतां या आधारांतून वरील विचारांशीं जुळता असा खुलासा मी आपल्या

---

* साधक-विभागांत हृदयासंबंधीं चरकांतील वाक्य दिलें आहे त्यावरूनही वरील विचार खरा वाटतो.

मताप्रमाणें अगदीं संक्षिप्त असा केवळ गोलार्थानें कारितों.÷

ब्रह्मोपासनस्थान जें त्दत्कमल, तत्संबंधी नाड्या त्याच्या सभोंवार अशा त्याच्या बाह्य प्रदेशांतून पसरल्या आहेत. हा त्यांचा अन्योन्य संबंध रविरश्मि यांसारखा आहे. या नाड्या पुढें पुढें आपणांतील व्याप्त रसानें पिंगलादि वर्णाच्या आहेत.

( १ ) आतां पित्ताचा जो विभाग ( पाचकांतील असा रक्तांतून आमाशयांत उतरतो ) पुष्कळ कफानें युक्त होतो, तो नितळ व शुक्लवर्ण असतो. ( २ ) पचनकार्यानंतर शेप राहिलेला पित्तविभाग रक्तांत मिळाल्यावर त्यांत थोड्या व समप्रमाणानें कफ मिळून, त्या मिश्रणास पिंवळट रंग येतो व त्या वेळीं तें, पित्त ही संज्ञा पावतें. ( हें आमचें रंजक. ) पुढें अन्नांत त्या त्या मिश्ररसांचें मिश्रणकार्य घडून उष्णता वाढते. पुढें अन्नांतील अणु विलग होऊन, त्यांतून गुप्त असलेला वातांश प्रकट होतो. अर्थात् पुढें वात वाढतो व अशा वेळीं वरील रस कोठें संचित झाल्यास तो नीलवर्ण होतो. आतां कधीं अंतरिंद्रियांचीं कफोत्पादक कार्यें मंदावतात व अंतरिंद्रियांतून ( आंतडीं, जठर वगैरेंतून ) रक्त स्रवूं लागतें तेव्हां त्याच्याशीं पित्त ( सौरवि० ) संमिश्र झाल्यास एकंदर मिश्रण तांबडें होतें. ( यास दुसरें उदाहरण रक्तपित्त नामक रोग होय. ) हा एकंदर प्रकार वैद्यकांतून शोधितां येतो. फार काय, श्रुतींत देखील असेंच सांगितलें आहे. कसें तर—मूळ हृदयस्थानीं तेजोमय ज्योति, तिजमुळेंच निरनिराळ्या नाड्यांतून ( पित्तवाहिन्यांतून वा तत्संबंधीं इतर आशयांतून ) हे वर्णविशेप होतात.—एवंच ही जी साधक तेजोज्योति हीच पुढें शुक्ल, पिंगल, तांबडसर, निळा असे वर्ण बनविणारी ह्मणजे त्या सर्व वर्णांनीं युक्त आहे.

झालें. वरील शांकरभाष्यांतील उताऱ्यासंबंधीं संक्षिप्त माहिती दिली. आतां

---

× कदाचित् सांगतों असा नसून निराळा वा विस्तृत असेल. तरी तो तसा पुढें कोणी केल्यास, माझा हा खुलासा चुकीचा वा संकुचित आहे हें उघड आहे.

याच अर्थाचा व यापेक्षां विशेष खुलाशाचा असा एक महत्वाचा उतारा देतों:

" रसेनान्नेनेतिशेष: । तदाकारा इति तच्छब्दोऽन्नरसविषय: । कथं पुनरन्नस्य पिंगलादिविचित्रो वर्णविशेष: सिद्ध्यतीत्याशंक्याह । सौरेणेति । यत्पित्ताख्यं सौरं तेजस्तेन पाकोऽशितस्य पीतस्यच जायते । तेनाभिनिर्वृत्तेनाल्पेन कफेन संपर्कात्तदेव पित्ताख्यं सौरं तेजो भवति पिंगलं तेन संपर्काद्रसस्य नाडीनांच जायते पिंगलमित्यर्थ: । तदेवच पित्ताख्यं सौरं तेजो यथोक्तपाकाभिनिवृत्तेन प्रभूतेन वातेन संबन्धात्तद्भूयस्त्वाद्भवति नीलं । तेनच संपर्कादन्नरसस्य नाडीनांच जायते नैल्यमित्याह । तदेवेति । प्रकृतमेव पित्ताख्यं सौरं तेजो यथोक्तपाकवशादभिनिर्वृत्तकफस्य स्वसम्बन्धिनो भूयस्त्वाद्भवति शुक्लं । तेन च संपर्कादन्नरसस्य नाडीनांच पीतत्वं भवतीत्याह । तदेवचेति । उक्तपाकाभिनिर्वृत्तस्यैव वातस्य समतायां तदेव तेजस्तत्संबन्धी पीतं जायते । तत्सम्बन्धाच्चान्नरसस्यच नाडीनां पीतत्वं भवतीत्याह । कफेनेति । यदातु यथोक्तं पाकाभिनिष्पन्नं शोणितं बहुलं भवति तदा तस्य नाडीनांच लौहित्यं भवतीत्याह । शोणितेति पक्षान्तरमाह वैद्यकाद्वेति । अन्वेषण प्रकारमाह । कथामिति । नाभेरूर्ध्वं हृदयादधस्तादा माशयमाचक्षते । तद्गतं तेज: सौरं पित्तमित्युच्यते । तच्चान्नरसस्य धात्वन्नरस सहकारिवशाद्वर्ण–विशेषकारणमामाशयगतं पित्तं रंजकं रसं रंजनादित्यादि वचनादित्यर्थ: । कथं तर्हि पिंगलस्यैत्याद्या श्रुतिरित्याशंकयाह । श्रुतिस्त्विति । उक्तमर्थमाकाङ्क्षाद्वारा (?) स्फोरयति । कथामित्यादिना । आदित्यस्य पिंगलादयो वर्णविशेषा: शास्त्रप्रामाण्यादेव प्रत्येतव्य: ।

( आ० गी० टी० )

आतां याच्या अर्थाचा संक्षेपत: उल्लेख करून पाहतों:—

अन्न हें रसमय बनतें. आणि त्या रसापासून शरीरस्थ नाना वर्ण बनतात. हें कसें घडतें तें सांगतात. देहांत रूप व तेज या दोन्ही गुणांनीं युक्त असल्यामुळें सौर संज्ञा पावलेलें पित्त ( व्यापक असें ) आहे. त्याच्या योगानें हें घडतें. कसें तर—अन्न पाणी वगैरे जे पदार्थ पोटांत जातात त्यांचा

त्यायोगें पाक होतो, व रस रक्तादि बनतात. आणि अशा समयीं पाकका-र्यांतून बचावलेलें तें त्या पाकमय द्रव्यांतून सांठविलें जातें. पुढें फिरून अशा त्या द्रव्यांतून अंतरिंद्रियद्वारा परत वळलेला (पृथक्करणानें निराळा केला गेलेला) जो सौरभाग तो अल्प कफयुक्त झाल्यास जें मिश्रण बनतें तें त्यांतील वाताच्या समावस्थेंत पिंवळा रंग धारण करितें. आणि त्यामुळें कांहीं नाड्या वा आशय यांना पिंवळा वर्ण येतो. पण जर पुष्कळशा कफांत ती सौरतेजोविशिष्ट वस्तु मुरली असली तर मिश्राचा वर्ण शुक्ल होतो. बरें, पूर्वोक्त पद्धतीनें जो सौरभाग रक्तद्वारा द्रवावस्थेंत पचनेंद्रियांत गोळा होतो त्याशीं तत्रस्थ बराच वात मिसळला गेल्यास तें पित्तसंज्ञक द्रव्य निळा रंग धारण करितें. अर्थात् त्यायोगें तद्विशिष्ट अन्नपरिपाक व तो ज्यांतून जातो त्या नाड्या वा आशय हीं सगळीं नीळसर बनतात. आतां पित्ताख्य द्रव्य पाक-मय पदार्थाशीं मिळून गेल्यावर जर शरीरस्थ फाजील अथवा अमार्गगत+ रक्तांत मिश्रण पावलें तर त्यांनीं बनणारा मिश्र पदार्थही तांबडा होतो व बहु-तेक पित्तवाहिनीही तशाच तांबड्या बनतात. (अशा वेळीं रक्तपित्ताचे व्याधि उद्भवतात.)

हें वैद्यकांतूनही कळतें. मग शोधावें कसें तें सांगतात—उदाहरणार्थ—नाभीच्या वरील प्रदेशीं हृदयाखालीं असा आमाशय आहे. आतां जें पित्त सदराखालीं मोडतें व जें अन्नापासून रसादि धातूंची घटना होतांना त्यांत मिसळलें गेल्यामुळें त्या मिश्रणास येणाऱ्या रंगास कारण बनतें असें हें आ-माशयगत पित्त रंजक संज्ञा पावतें. ह्याप्रमाणेंच वर जें निरनिराळ्या रंगांवि-षयीं ह्मटलें आहे तेंही समजावें. आतां हें कसें? असें कोणी ह्मणेल तर त्यानें पिंगलस्य....इ० श्रुति वाक्यांकडे जास्त लक्ष्य पुरवावें. खेरीज देहांत जी ज्योति आहे ती या पिंगलादि वर्णांनीं युक्त असल्यामुळेंच हे निरनिराळे वर्ण येतात असें शास्त्राधारानेंही अनुभवग्राह्य आहे.

---

× रक्त अमार्गगत होण्याचीं कारणें बरींच आहेत. उ० रक्तांतील घन पदार्थ कमी होणें किंवा त्यांत बिघाड होणें हें आहे. तसेंच स्रोतसांतून दोषवैषम्यानें मार्ग खुला होणें हें इ०.

पाचकपित्तविवरणास आरंभ केल्यापासून एव्हांपर्यंत जुन्या नव्या पद्धतीनें जें विवरण झालें त्यावरून मननानें जें ध्यानीं येतें त्याचा येथें उल्लेख करणें भाग आहे तो करितों. ह्मटलें आहे कीं:—

**यदन्नं देहधात्वोजोबलवर्णादिपोषणम् ।**
**तत्राग्निर्हेतुराहारात् नह्यपक्काद्रसादयः ॥**

आतां अग्नीच्या साह्यानें हा अन्नपरिपाकरस होतो. तो कसा तर.—

**अन्नंकालेऽभ्यवहृतं कोष्ठं प्राणानिलाहृतम् ।**
**द्रवैर्विभिन्नसंघातं नीतं स्नेहेन मार्दवम् ॥**
**संधुक्षितः समानेन पचत्यामाशयस्थितम् ।**
**औदर्योग्निर्यथाबाह्यः स्थालिस्थं तोयतंडुलम् ॥**

यथाकालीं पोटांत जाणारें अन्न प्राणवायूच्या साहाय्यानें पोटांत उतरतें. तेथें त्याच्यावर पित्तमिश्रित कफाची क्रिया सुरू होते. पुढें तें मऊ ( पुलपुलित ) होतें व त्याबरोबर ते अन्नकण विलग होतात. नंतर अशा त्या पित्तमिश्रित–कफाक्रियेनें पुलपुलित झालेल्या अन्नावर आमाशय व पक्काशय यांतून समान× कार्य प्रकट होऊं लागतें. ह्मणजे त्या मिश्रणांत उष्णता उत्पन्न होते. अर्थात् त्यांत तैजसगुणविशिष्ट पाचकपित्ताचा अंमल सुरू होतो, अन्नपचनक्रिया सुरू होते, पुढें या रीतीनें पचनक्रियेंतील उष्णता व अन्नांतून प्रविभक्त वातांश या दोहोंच्या वृद्धीनें समानाचें शेवटचें जें रसधातुविभाजन व किट्टविभागाचें निःसारणकार्य हेंही हलकें हलकें होऊं लागतें. ह्मणजे अन्न पोटांत गेल्यावर प्रथम पित्तमिश्रित कफक्रिया, नंतर उष्णता वाढवून तैजस पित्तक्रिया व पुढें तिच्याच सहाय्यानें ( योगवाहीधर्मामुळें ) वातवृद्धि घडून वातक्रिया सुरू होते.

---

× समान वायु कार्यें करितो तीं पुढील वाक्यांत आहेत. भक्ष्यभोज्यपेयलेह्याना-मशितपीतलीढखादितानामभिवोढा समानः । यापेक्षां स्पष्ट.—

समानोऽग्निसमीपस्थः कोष्ठे चरति सर्वथा । अन्नं गृण्हाति पचति विवेचयति मुञ्चति ॥

आतां या सांगण्यावरून या तिन्ही क्रिया घडण्यास पाचक पित्त साधन आहे असेंही त्यांच्यांतील परिणामक्रियेनें दिसून येतें. तरी त्यांतल्यात्यांत आमचें खरें पाचक ह्मणजे जी मधली क्रिया ( तैजसगुणविशिष्ट अर्थात् उष्णतोत्पादक अशी ) ती करणारें होय असें त्याच्या गुणमाहात्म्यानें ठरतें. व वाग्भटांतूनही पाचकाविषयीं उल्लेख करितांना असेंच ह्मटलेलें आहे.

**पित्तं पंचात्मकं तत्र पक्वामाशयमध्यगं ।**
**पंचभूतात्मकत्वेऽपियत्तैजस गुणोदयात् ।**
**त्यक्तद्रवत्वं पाकादि कर्मणाऽनलशब्दितम् ।।**
**पंचत्यन्नं विभजते सारकिट्टौ पृथक् तथा ।**
**तत्रस्थमेव पित्तानां शेषाणामप्यनुग्रहम् ।।**

पंचविध पित्तांपैकीं हें पाचकनामें पित्त पक्वाशय व आमाशय यांतून आहे. हें पंचभूतघटित असल्यामुळें त्यांच्या पांचही+ गुणांनीं युक्त आहे. पण त्यांतल्या त्यांत विशेषत: तेजतत्व घटित आहे. अर्थात् द्रवरूप सोडून देतें. ( प्रगट झालेल्या उष्णतेनें वायुरूप बनतें. ) व पाककार्य करितें; आणि या एकंदर गुणधर्मामुळें अग्नि ( जठराग्नि ) ही संज्ञा याला लागते. ह्याप्रमाणेंच याच्या सान्निध्यानें असलेल्या समानांत उष्णता उत्पन्न होते. व अशा रीतीनें समानाचें कार्य अप्रतिहत चालल्यानें अन्नांतील सार व किट्टभाग निराळे आपापल्या मार्गानें जातात. असो. तरी अशा त्या एकंदर पाकक्रिया-कर्त्या पित्ताला " पाचक " ही संज्ञा दिली जाते.

पाचकाच्या ह्या अप्रतिम कायाग्नित्वगुणामुळें× त्याच्या अनुरोधानें इतर पांचही पित्तें आहेत. ह्मणजे कांहीं कारणानें× हें प्रकुपित झाल्यास इतर चारही प्रकोप पावतात. उलट याचें कार्य मंदावल्यास इतरांचें कार्यही मंदावतें.

---

\+ महाभूत आपल्या गुणासह देतों.:—

( १ ) पृथ्वी-धारणे ( २ ) आपःक्लेदने ( ३ ) तेजः पाचने ( ४ ) वायुः-व्यूहने ( ५ ) आकाशमवकाशदाने.

× ह्याचें स्पष्टीकरण पूर्वी पित्तसदराखालीं झालेलें आहे.

× पित्तप्रकोपाचीं दोन कारणें तीं बहुतेक याच्या प्रकोपास लागू आहेत.

आतां विकृत झाल्यावर इतर पित्तांतही विकृति घडते तेव्हां जरापित्ताचे विकार होतात व येथून तेथवर धातु बिघडतात. पण जर कुपित झालें तर:—

**पाचकः कुपितः कुर्यात् अर्शोमांद्यं तथा तमः ।**
**अपाकः कुक्षिशूलंच अनुत्साहमरोचकं ॥**

पुढें क्रमप्राप्त या रोगांचा जो पाचकाशीं संबंध त्याचें विवेचन करणें भाग आहे. पण येथपर्यंत झालेला पाचक विषयाचा साधार खुलासा बराच वाढला आहे. तेव्हां आणखी त्या प्रत्येकाचा पाचकाशीं असलेला संबंध जुळविण्याचा यत्न केल्यास या विवरणांत उगाच× भर टाकिल्याचाही आरोप येण्याचा संभव आहे. करितां या रोगांचा पाचकांशीं असलेला संबंधदर्शनप्रकार सूचनेवर अवलंबून ठेवितों व लांबलेलें हें मुख्य पित्तविवरण येथेंच आटोपितों.

एव्हां पर्यंत कोष्ठगत ३ पित्तांचा कांहीं अंशानें खुलासा झाला. त्यांत हीं ३ निरनिराळीं असून निरनिराळ्या गुणधर्मांचीं आहेत असेंहीं झालें पण कांहीं तात्विक आधारावरून व इतर विचारजुळणीवरून या तिहींचीं बहुतेक सांगड असून तीं अगदीं एक असेंच कळतें. ह्मणजे एकांतील विकृति ती इतरांसही विकृति घडण्यास कारण होते. बरें या तिहींतील एकाचा क्षय झाल्यास इतरांचाही क्षय होतो. अथवा एकाची वाढ झाल्यास तिजमुळें इतरांचीही वाढ होते इ० गोष्टी कळतात. मात्र हें प्रस्तुत पाचक (कायाग्निखनि) सर्वांत श्रेष्ठ होय. आतां यासंबंधी सम्यक् आधार खुलाशासह संक्षेपानें पित्तप्रकरणात आहेत. त्यांकडे लक्ष्य गेल्यास हें माझें ह्मणणें प्रत्येकाच्या ध्यानीं येणार आहे. ह्मणून येथें त्यासंबंधी विवरण गाळून टाकितों. द्विरुक्ति करीत नाहीं.

झालें, कोष्ठगत—पित्तविवरण येथपर्यंत संपलें. आतां शाखागत पित्तां-

---

× कारण मजकूर पाठविणें तो संक्षिप्त असावा अशी सूचना आहे.

पैकीं जें मस्तकांत असून नेत्रांत व्याप्त आहे त्या (आलोचका) विषयीं पुढें विचार करूं.

## आलोचक.

ह्मणतात कीं टाळी दोन हातांनीं वाजते. एका हातानें वाजत नाहीं. तद्वत् आमच्या ज्ञानेंद्रियांचे जेजे विषय आह्मांस अनुभूत होतात त्यांसही २ साधनें लागतात. पैकीं एक बाह्यसृष्टींतून असतें व दुसरें अंत:सृष्टींतून ह्मणजे शरीरस्थ ज्ञानेंद्रियांत योजिलेल्या शक्तींतून असतें. या दोहोंपैकीं एका साधनानेंच कधींही विषयज्ञान होणार नाहीं. याच विचारांची सांगड ध्यानीं येण्यासारखी ह्मण ' पिंडीं तें ब्रह्मांडीं अशी ' आहे. तेव्हां आह्मांस कोणत्याही विषयाचें ज्ञान होण्यास जशी बाह्यसृष्टी व तिचे धर्म कारण आहेत, तद्वत् अंत:सृष्टी व तिचे धर्म हेही कारण आहेत. आतां हें कसें तें स्पष्ट करून पाहूं.

पहा ध्वनीचें श्रवण होण्यास हवेंतील कंप हें बाह्यसृष्टींतील कारण होय; तद्वत् आमच्या शरीरांत तद्ग्राहक ज्ञानतंतूंतून त्या शब्दविषयाचें ग्रहण होण्याकरितां कंप उत्पन्न करण्याची योजना केलेली आहे; हें अंत:सृष्टींतील कारण आहे. ह्या ह्मणण्याचा खुलासा कानाच्या रचनेवरून समजणार आहे. का-कानाचे मुख्यत: बाह्य ( एक्सटर्नल ) मध्य ( मिड्ल् ) व अंतर ( इंटर्नल ) असे तीन भाग आहेत. त्यांतील अंतर श्रवणांत काक्रिया अस्थींत तीन नळ्या आहेत व त्यांशीं जिचा संबंध ती नागमोडी नळी आहे. या नळ्यांतून निरनिराळे रस नियमित प्रमाणानें ठेविलेले आहेत. व त्या नागमोडीनळींतून ज्ञानतंतूंची योजना केली आहे. आतां या सर्व साहित्यांच्या कारणाचा व त्यांपासून घडणाऱ्या कार्याचा विचार केल्यास स्पष्ट होतें कीं बाहेरच्या कंपांचें ग्रहण करण्यास आंत देखील तत्सदृश कंप झाले पाहिजेत. ह्मणजे शरीराबाहेरील हवेंत जसे कंप होतात तसेच ते आमच्या शरिरांतील कर्णस्थ ज्ञानतंतु (वातवाहिनी) त्यांतही होत असले पाहिजेत. एकूणध्वनिबोधनास बाह्यांत:सृष्टींत कंपसादृश्याची जरूरी आहे; असें स्पष्ट होतें. अर्थात् जें द्रव्य व जी योजना बाहेर, तें द्रव्य व तीच योजना आंतही आहे. असें या इंद्रियजन्य ज्ञानावरून कळतें.

श्रीशंकर.

# वनौषधि-गुणादर्श.

## भाग ७ वा.

### १ काळादाणा.

**संस्कृत नांवें.**--नीलपुष्पी, कृष्णबीज, श्यामबीज, श्यामलबीज, **हिंदी**-कालादाना. **बंगाली**-नीलकलमी. *English*-Pale Blue Ipomia. *Latin*-Pharbitis Nil.

**वर्णन**-काळ्या दाण्याची वेल असते. ही हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं होते. हिचें कांडें व शाखा यांचा झाडांस वाटोळा विळखा पडलेला असतो. कांडें व शाखा हीं वाटोळीं असून त्यांवर लोम ( कुसें ) असतात. याचीं पानें कापशीच्या पानांसारखीं, तीन पाकळ्यांत विभागलेलीं असतात. हीं पानें वेलीस एकाआड येतात. ह्मणजे वेलीच्या कांड्याच्या दोन्ही बाजूस समोरासमोर पानें येत नाहींत; तर एका बाजूस एक पान व दुसऱ्या बाजूस त्याच्या वरच्या भागीं दुसरें पान अशीं पानें असतात. यास फिकट निळ्या रंगाचीं घंटेच्यां आकाराचीं मोठीं फुलें येतात. याचीं फळें नरम असून त्यांत तीन घरें अथवा विभाग असतात. त्यांतून लहानकाळ्या रंगाचें बीं असतें. त्यास काळा दाणा Blackseed असें ह्मणतात. औषधांत यांचाच उपयोग होतो.

**गुण**-काळादाणा रेचक, स्निग्ध, सूज व उदररोगनाशक, ताप काढणारा आणि अवष्टंभ-मस्तकरोग-उदावर्त-कफ व मलमूत्रावरोध यांस नाहींसा करणारा आहे. हे सर्व गुण याच्या मुख्य रेचकगुणाच्या अंगभूत आहेत. याचें रेचन फार लवकर लागू पडून त्यापासून कोणत्याही प्रकारचा अपाय होण्याची धास्ती नसते. ह्मणजे याची जयपाळ किंवा इंग्रजी जालप यांच्या सारखी क्रिया घडते. मात्र त्यांतील दोष यांत नसतात. हें उत्तम रेचक असल्यामुळें हल्लीं सरकारी दवाखान्यांतून डॉक्टरलोक याचा बराच उपयोग

करितात. काळ्यादाण्याचें बीं तुपांत तळून चूर्ण करून तीन माशांपासून ६ मासे पर्यंत ऊन्ह पाण्याबरोबर घ्यावें. ह्मणजे दोन जुलाब चांगले होतात. तुपांत न तळलें तरी चालेल.

## २ गुळवेल.

**संस्कृत नांवें.**—गुडूची, अमृतवल्ली, ज्वरारि, अमृता, श्यामाम्बरा, सुरकृता, मधुपर्णिका, छिन्नोद्भवा, अमृतलता, छिन्ना, रसायनी, सोमलतिका, वरा, निर्जरा, छिन्निका, अमृतसम्भवा, वत्सादनी, छिन्नरुहा, विशल्या, भिपक्प्रिया, कुंडलिनी, वयस्था, जीवंतिका, चन्द्रहासा, छन्निका, नागकुमारिका, नागकन्यका, धारा, कुंडली, छिन्नांगा, चक्रलक्षणिका, तन्त्रिका, ज्वरनाशी, मंडली, देवनिर्मिता, सौम्या, सोमा, बहुछिन्ना, तिक्ता, चक्रिका, याप्रमाणें एकंदर ४० आहेत. **कोंकणांत**—गरुडवेल, गरोल. **गुजराथी**—गळो. **हिंदी**—गिलोय, गुर्चे. **कान्यकुब्ज**--गुरूची. **बंगाली**—गुलंच. **कर्णाटकी**—अमरदवल्ली. **तेलंगी**—तिप्पतिगा. **तामीळ**—शिन्दी, लकोदी. **फारशी**—गिलाई. **अरबी**--गिलोई. तुळु अमृतबुरु. **मलबारी**—चितामृतम्, *English.*-Heart leaved moon seed. *Latin.*—Tinospora Cordifolia.

**वर्णन**—ही एक बहुतेक सर्व रोगांत उपयोगी पडणारी वनस्पति आहे. हिची उत्पत्ति हिंदुस्थानांत सर्वत्र होते. ही दुसऱ्या झाडांवर चढणारी वेल आहे. ही फार मोठी असून हिचें कांडें जाड असतें. कडूलिंबावरची गुळवेल सर्वोत्कृष्ट असते. कोंवळ्या वेलीची साल मृदु असते व ती ३,४ वर्षांची झाली ह्मणजे खडबडीत होते. कोंवळ्या वेलीच्या त्वचेचा रंग हिरवा असतो व जून वेलीच्या त्वचेचा मळकट—पांढुरका असतो आणि त्वचा काढल्यावर आंत रंग हिरवा असतो. वेल एकसारखी सरळ नसते. तीस कांड्यासारखी एका बाजूस गांठ असते व त्वचेवर लहान लहान ठिपक्यांप्रमाणें पुष्कळ खडबडीत गांठी असतात. या वेलीस पानें एकांत्राड येतात व त्यांचा आकार पिंपळाच्या पानांसारखा लांबट—वर्तुळ असा असतो. पण हीं पिंपळापेक्षां मोठीं असून लांब देठांवर राहतात व यांचा शेंडा पिंपळाच्या पानाइतका लांब नसतो,

पानांस दुसरी उपमा देणें झाल्यास हृदयाची देतां येईल. यावरूनच यास यांचें इंग्लिश नांव पडलें आहे. हीं पानें पिंपळाच्या पानांसारखीं निबर नसून मृदु असतात. त्यांच्यावर लोम किंवा कोणत्याही प्रकारचा खडबडीतपणा नसतो. तीं सारखीं असतात. पानांची लांबी शेंड्यापासून देंठापर्यंत ६-६॥ अंगुळें असून रुंदीही बहुतेक तितकीच असते. लहान पानांची लांबी रुंदी २-२॥ अंगुळें असते. कोंवळीं पानें तर ब्राह्मीच्या मोठ्या पाना एवढींच असतात. हीस आंब्याच्या मोहरासारखीं पांढरक-पिंगट रंगाचीं फुलें पानाच्या कुशींतून येतात. हीं लहान असून त्यांत नर व मादी अशा दोन जाति आहेत. नर जातीच्या फुलांचे घोंस असतात व मादी जातीचीं फुलें नेहमीं एकेकटीं असतात. गुळवेलीस हिरव्या रंगाचीं चारा एवढीं फळें येतात. तीं पिकलीं म्हणजे त्यांचा रंग तांबडा होतो. चारावरील त्वचा काढल्यावर जशी आंत बी असते तशीच गुळवेलींतही असते. परंतु हिचें कवच चाराइतकें कठिण नसून पातळ असतें. याच्या आंत बी निघते. ती द्विदल अर्धचंद्राकार असते. सर्वत्र फळें येतात असें नाहीं. याचें मूळ जाड व गड्ड्याप्रमाणें असतें. बुंधाची त्वचा सुकली म्हणजे तिला सुरकुत्या पडून ती आंतील काष्ठमय भागापासून वेगळी होते. बुंध आडवें चिरलें असतां त्या तुकड्याच्या पृष्ठभागावर पाचरीच्या आकाराचे तंतु दिसतात. गुळवेलीचीं पानें पिकल्यावर पिवळीं होतात. लोक याच्या कांड्याचाच विशेष उपयोग करितात. परंतु पानांचाही अनेक प्रकारांनीं चांगला उपयोग होऊं शकतो. याच्या उत्पत्तीविषयीं पौराणिक कथा अशी आहे कीं, राम-रावण युद्धांत रावणाचा वध झाल्यानंतर असुरांच्या हातून रामचंद्राची जी वानरसेना मारली गेली होती ती इंद्रानें अमृतवृष्टि करून पुन्हां सजीव केली. त्यावेळीं अमृताचे बिंदु त्या वानरांच्या अंगावरून उडून ज्या ज्या ठिकाणीं पडले त्या त्या ठिकाणीं ही वेल उत्पन्न झाली. म्हणून हीस अमृता हें नांव पडलें आहे. गुळवेलीचे गुणदोष व औषधि-उपयोग वनौषधि-गुणादर्शाच्या दुसऱ्या भागांत वर्णन केले आहेत ते पाहावे.

## ३ डुकरकंद

**संस्कृत नांवें.**–वा[व]राही, सूकरी, क्रोडकन्या, गृष्टि ( का ), कन्या, विष्वक्सेनकान्ता, ब्रह्मपुत्रिका, क्रौडी, त्रिनेत्रा, कौमारी, माधवेष्टा, महौषधि, क्रोड, सूकरकन्द, कुष्ठनाशन, वनवासी, महावीर्य, शबरकंद, वीर, ब्राह्मकंद, मुकंदक, वृद्धिद, व्याधिहंता, अमृत, वनमालिनी, वक्रालु, श्वासकंद, किटि, कांक्षी, बदरा, चर्मकारालु. **मराठी**–डुकरकंद, भिर्वोलीकंद. **गुजराथी**–वाराहीकंद. **हिंदी**–गेंठी, भिर्वोलीकंद, **बंगाली**–चांमालु, चुवरिआलु. **कर्णाटकी**––हंदिगेड्डे ( गड्डे ) **तैलंगी**––ब्राह्मदंडिचेट्टु, तेलताडिचेट्टु. *Latin.* Dioscorea Sativa.

**वर्णन.**—डुकरकंदाची वेल असते. ही जमिनीवर पसरते. हिची उत्पत्ति बहुतेक सर्व मोठमोठ्या पर्वतांवर आपोआप होते. पाणथळ देशांतही ही होते. हिच्या कंदांकरितां बगीच्यांतूनही लोक ही वेल लावितात. हिचीं पानें नागवेलीच्या पानासारखीं असून त्यांचे देंठ लांब असतात. पानें वेलीच्या कांड्यास समोरासमोर येतात व त्यांवर जाळ्याप्रमाणें शिरा असतात. या वेलीस फुलांचे घोंस येतात. याचा उपयोगी भाग कंद आहे. कंदाचा आकार कांहींसा वृषणासारखा असून त्याच्यावर डुकराप्रमाणें रांठ केंस असतात. यावरूनच यास डुकरकंद हें नांव पडलें आहे. हे कंद हात हात खोल जमिनींत सांपडतात,

**गुण.**–याचे गुणदोषवगैरे विवेचन वनौषधि–गुणादर्शाच्या तिसऱ्या भागांत केलें आहे. त्याशिवाय हा मूळव्याधीवरही चांगलाच गुणकारी आहे. यांत, रसायनगुण असल्यामुळें आर्यवैद्यकांत हा कंद फार महत्वाचा मानला आहे. हल्लीं लोकांच्या अज्ञान व अनास्थेमुळें हा दुर्मिळसारखाच झालेला आहे. बहुतेक लोक डुकरकंद ह्मणून कडवा कारिंदा वापरतात,

## ४ रानभाल, पिठवण.

**संस्कृत नांवें.**–पृश्निपर्णी, पृथक्पर्णी कलशी, महागुहा, शृगालविन्ना, धमनी, मेखला, लांगुली, गुहा, क्रोष्टपुच्छी, शृंगाली, सिंहपुच्छी ( च्छी ), दीर्घपर्णी, दीर्घा, क्रोष्टुकमेखला, चित्रपर्णी, उपचित्रा, श्वपुच्छा, अंघ्री, बलापर्णी, क्रोष्टुका, कपित्थका, धावनी, शीतनी, शृगालवृक्षा, जटिला, अंघ्रिपर्णी, क्रोष्टुविन्ना,

## आर्यभिषक्कार्यालयांतील प्रसिद्ध झालेल्या वैद्यक पुस्तकांतील औषधांचा अनुभव.

जळंबचे ब्रँच पोष्टमास्तर रा० रा० चिंतामण गणेश बर्वे हे लिहून कळवितात कीं, "सार्थ वैद्यवल्लभ पुस्तकांतील १८२ श्लोकांतील पोटांत घेण्याचें औषध व २१२ यांतील वर चोळण्याचें तेल यांचा, आम्रांस, गुडघे धरल्यानें चालतां वगैरे येत नव्हतें, त्यावर उपचार केल्यानें पंधरा दिवसांत बरा गुण आला आहे व आणखी कांहीं दिवस उपचार केल्यास बहुतकरून चांगलाच गुण येईल असें वाटतें. तसेंच [illegible] तापाची साथ आली होती; त्या वेळीं पुष्कळ लोक औषध मागण्याकरितां आले [illegible] त्यांस सुबोधवैद्यक भाग १ यांतील "सर्वतापावरील औषध ( [illegible] )" तयार करून पुष्कळांस दिलें; त्यापासून चांगला गुण आला. तसेंच [illegible] आपल्या [illegible]पासूनही चांगला गुण येतो असें अनुभवास आलें [illegible] मी महिना दीड महिना [illegible]ल्यानें आजारी होतो. परंतु हल्लीं मीं आपल्या [illegible] औषधानें बरा होत [illegible] आहे."

---

## आर्यभिषक्काच्या वर्गणीदारांस सूचना.

( १ ) चरकसंहितेच्या सूत्रस्थानाचा उत्तरार्ध [illegible] ला [illegible]
[illegible] दुसरा [illegible] तयार आहे. किंमत २ रुपये. वर्गणीदारांस [illegible] नसेल त्यांनी मागवावा.

( २ ) [illegible] आहे [illegible]

( ३ ) गतवर्षी [illegible] झाले आहेत. त्यांना [illegible] मिळाली [illegible] असतील [illegible] आणि किंमत [illegible] देण्यात [illegible]

---

# [illegible] किंमतीस!

### [illegible]औषधि–गुणादर्श.

[illegible] वनस्पती [illegible] पुस्तक [illegible] औषधांत [illegible] पदार्थां [illegible] सारखी [illegible] नरगिरा [illegible] प्रमाण [illegible] प्रका[illegible] [illegible] सहाशेंवर [illegible] आहेत. भाग [illegible] १२ [illegible] सहावा [illegible] (मन पट्टे [illegible]) [illegible] गिरगांव, [illegible]

## वैद्यकाचें ज्ञान पायाशुद्ध व सविस्तर होण्यासाठीं

## अत्यंत सुलभ ग्रंथसंग्रह.

निरनिराळ्या विषयांकरितां मुद्दाम स्वतंत्र ग्रंथ तयार केले आहेत. 'आर्यभिषक्' [illegible]सिकपुस्तकाचे वर्गणीदार होणारांस निम्मे किंमत !

**आर्यभिषक्** [illegible] पुस्तकांत वैद्यकाचे स्वतंत्र ग्रंथ व तत्संबंधीं [illegible] [illegible] प्रसिद्ध [illegible]मते. सन १८८९ च्या जुलैपासून हें एकसारखें २४ वर्षे चालू ) **तैलंगी**-संबंधी विषयाचें सचित्र '**भारतधर्म**' मासिकपुस्तक [illegible] [illegible] अर्ते: त्याची वर्गणी मिळून **टपालखर्चा फक्त** १ रु १० आणे. [illegible]षक्' घेणारांस १॥ रु [illegible] फक्त 'भारतधर्म' घेणारांस १ रु. [illegible]

**विक्रीस [illegible] असलेल्या पुस्तकांची यादी.** किंमतीशिवाय टपालखर्च

| | | |
|---|---|---|
| [illegible] भाग १ ला | १२ [illegible] | सार्थ श्रीचरकसंहिता सूत्रस्थान, [illegible] |
| भाग २ रा | १ रु. | ,, सूत्रस्थान उत्तरार्ध-भा. १ ला. १॥ |
| भाग ३ रा | १। ,, | ,, ,, भा. २ रा. २ |
| भाग ४ था | १॥ ,, | ,, निदानस्थान ... १४ आ. |
| भाग ५ वा | १। ,, | ,, [illegible]मानस्थान ... १॥ रु. |
| भाग ६ वा | १२ आ. | ,, इंद्रियस्थान ... १२ आ. |
| [illegible] पूर्वार्ध [illegible] उत्तरार्ध | १॥ रु | [illegible] ... १८ ,, |
| रसवैद्य [illegible] | १२ [illegible] | [illegible]स्थान ... १॥ रु. |
| [illegible] | १॥ रु | [illegible]स्थान भाग १ ला १॥। रु |
| [illegible] | १॥ | नपुंसकमीमांसा व कामसंजीवन १॥ रु. |
| [illegible] | १ रु. | निघंटशिरोमणि, भा. १ [illegible] २ रा [illegible] |
| [illegible] | ३ आ | [illegible] भा. [illegible] ... १ रु |
| [illegible] | ८ [illegible] | सा[illegible]हारीतसंहिता, भा. १ ला [illegible] रु |
| [illegible] | १२ [illegible] | [illegible] ... [illegible] आ. |
| [illegible] | १॥ [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] ... [illegible]॥ रु. |
| [illegible] | २ ,, | [illegible] ... ३ आ. |
| [illegible] | पाऊण ,, | [illegible] ... २ रु. |
| [illegible] | अर्धा ,, | [illegible] ... २ ,, |
| [illegible] ( [illegible] ) | ६ [illegible] | [illegible] १ ला ४ आ. [illegible] २ रा [illegible] |

[illegible] **यो[illegible] उत्तम [illegible] पुस्तक.**

[illegible] आ [illegible] **योग[illegible]** टपाल ०॥ आ.

[illegible] [illegible] गिरगांव,

**मुंबई,** [illegible] [illegible] रावा.

ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचे स्मारक



वर्ष १४. **आर्यभिषक्** अंक १२.



सम्पादक ... शं ... पदे.

आयुर्वेद ... ध्याय.

मु० पोस्ट गिरगांव ... 

... 

... गीवाग्भटः।

मिथुनसंक्रांत. शके ...

**विषयानुक्रम**—मासिकचर्चा, आयुर्वेदोक्त औषधें वापरण्याची पद्धति, शेट गंगाविष्णु श्रीकृष्णदास यांचें संक्षिप्त चरित्र, त्रिदोषविचार–भाग २ रा पूर्ण; वनौषधी-गुणादर्श भाग ७ वा, पृष्ठें ५–१२ ( सचित्र. )

---

## वर्गणीदारांस अगत्याची सूचना.

गतांकीं सूचना दिल्याप्रमाणें आजचा अंक **व्ही. पी. नें जात आहे.** ( २ ) ज्यांनीं "**व्ही. पी. नें हा अंक पाठवूं नये**" अशी सूचना दिली आहे, त्यांचें वर्ष पुरें करण्यासाठीं, हा अंक त्यांजकडे बुकपोस्टनें पाठविला आहे. **मात्र नवीन वर्षाचे अंक** त्यांच्याकडे पाठविले जाणार नाहींत !

### वर्गणी अगाऊच घेण्याचा

आमचा नियम आहे. त्याप्रमाणें ज्यांचेकडून वर्गणी आली नाहीं, त्यांस येता अंक पाठविला जाणार नाहीं. थोड्याशा वर्गणीसाठीं जमाखर्चाची भानगड ठेवणें योग्य नसून, त्यासाठीं निष्कारण पत्रव्यवहार वाढतो; म्हणून प्रथमपासून आमचा नियम आहे, कीं वर्गणी येईल त्यांचेकडेच अंक सुरू ठेवायाचा.

ही पद्धति बहुतेक सर्वांनीं पसंत केली आहे फार तर–दहा पांच वर्गणीदारांनीं– "अंक पाठवा, वर्गणी पुढें पाठऊं" असें कळविलें आहे. परंतु त्यांस आमची विनंति आहे, कीं थोड्यासाठीं आम्हांस त्यांनीं भीड घालूं नये. नियम सर्वांना सारखाच पाहिजे, आणि तेवढ्यासाठीं व्यर्थ अव्यवस्था होते, म्हणून ज्यांनीं अशी सवड मागितली आहे, त्यांना ती देतां येत नाहीं याबद्दल त्यांनीं क्षमा करावी. वर्गणी पाठवावी म्हणजे अंक पाठविण्यांत येईल; त्याशिवाय त्यांजकडे अंक जाणार नाहीं.

मुंबई, पोस्ट गिरगांव. **व्यवस्थापक—आर्यभिषक्.**

---

## नवीन वर्गणीदार होणारांस सूचना.

वनस्पतींचे देखावे ११ व्या अंकापासून येत आहेत. ज्यांना १५ व्या वर्षारंभापासून वर्गणीदार होणें असेल व देखाव्यांसाठीं १४ व्या वर्षाचे अंक ११।१२ पाहिजे असतील, त्यांस ते फक्त ६ आणे घेऊन देण्यांत येतील. वास्तविक रीत म्हटली म्हणजे फुटकळ प्रत्येक अंकाची किंमत ४ आणे टपालखर्च शिवाय.

---

**वनौषधि-गुणादर्श.** याचे सहा भाग विक्रीस तयार आहेत. त्याची किंमत ६॥ रु. आहे. परंतु आर्यभिषक्‌चे वर्गणीदारांस ते ३। रुपयांस मिळतील. टपाल शिवाय.

---

श्रीशंकर.

कै० ज्योतिर्विद् दाजी हरी भट्ट पदे यांचें स्मारक.

वर्ष १४ वें ] **आर्यभिषक्.** [ अंक १२ वा.

*ARYABHISHAK or DOCTOR OF ARYANS.*

A Monthly Journal Containing Medical news and articles.

मिथुनसंक्रांति. शके १८२५ ज्येष्ठ व. ४ रविवार. ता. १४।६।१९०३.

## मासिक—चर्चा.

वनस्पतींचे देखावे देण्याचें आह्मीं गतांकीं सुरू केलें, त्यावर आमच्याकडे पुष्कळ अभिनंदनपत्रें आलीं आहेत. लोकस्थिति गरीबीची होत चालल्यानें—जितका आश्रय पाहिजे तितका लोकांना देतां येत नाहीं—त्यास इलाज नाहीं. उलट कित्येक जिज्ञासूंना—असलीं मोठ्या खर्चाचीं पुस्तकें—फुकट देण्याची देखील सोय जास्त करावी लागत आहे. तथापि आह्मीं आशा करतों, कीं

### मर्मज्ञांकडून अवश्य आश्रय मिळेल.

आह्मीं गतांकीं कळविल्याप्रमाणें—या कामीं आमचे मित्र, **वैद्य प्रयागराज तिवारी** यांजकडून वृद्धिंगत सहाय्य मिळत आहेच. शिवाय आमचे सहयोगी मित्र **डा. पांडुरंग गोपाळ मंत्री**—ज्यांनीं आपलें सर्व तनु-मन-धन याच विषयास अर्पण केलें आहे—त्यांची वृद्धावस्था व त्यांतही भयंकर रुग्णस्थिति असतां, त्यांनीं मोठ्या उत्सुकतेनें आह्मांस शोध—सहाय्य केलें आहे; व अशाही प्रसंगीं तसदी घेऊन, आपले अनुभव आह्मांस कळवीत आहेत याबद्दल ते स्तुतिपात्र आहेत. आमचे मित्र डा. लेफ्टनंट कर्नल **कान्होबा रणछोडदास कीर्तिकर**—सिविल् सर्जन—रत्नागिरी यांनी वनस्पतींच्या बाबतींत पुष्कळ शोध केले आहेत, व त्यांजकडूनही आह्मांस पूर्ण सहाय्य मिळण्याची आशा आहे. तसेंच आमचे इतर मित्र व सहाय्यक, यथासंभव अवश्य मदत करतील अशी खात्री आहे.

### श्री. गायकवाड सरकार यांनीं

आमच्या प्रयत्नास प्रथमपासून सहाय्य केलें असून, प्रस्तुत चालविलेल्या या महत्प्रयत्नास त्यांजकडून उत्तेजन मिळेल अशी खात्री आहे. सार्थ श्रीचरकाच्या शारीरस्थानांत शारीराचे देखावे देण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे; त्यामुळेंही खर्चाची बाजू फार वाढली आहे. परंतु आह्मीं आशा करतों, कीं महाराजांकडून याबद्दल जरूर विचार होईल.

ज्याप्रमाणें मराठींत हे देखावे देण्यांत येतात, त्याचप्रमाणें—

**गुजराथी व हिन्दी भाषेंत**

हे देखावे देऊन पुस्तकें छापून काढावीं, अशाबद्दल अनेक लोकांकडून आह्मांस आग्रहपूर्वक सूचना झाल्या आहेत; आणि आह्मांस आशा आहे कीं—

**श्री० गोंडलचे महाराज व श्री० दर्भंगाचे महाराज**

यांच्याकडून या कामीं मदत मिळेल तर, अनुक्रमें गुजराथी व हिन्दीभाषेंतही सोय करतां येईल. आह्मीं आपल्याकडून जितका प्रयत्न करावयाचा तितका करीत आहों, व गुजराथी आणि हिन्दी वाचकांना आह्मीं आश्वासन देतों, कीं उभय महाराजांच्या आश्रयानें-आह्मी ही उपयुक्त व्यवस्था, दोन्ही भाषाभिज्ञांसाठीं लौकरच अमलांत आणूं शकूं.

---

## आयुर्वेदोक्त औषधें वापरण्याची पद्धति.

अमुक रोगावर अमुक औषध द्यावें इतकें ज्ञान झालें ह्मणजे वैद्यशास्त्रज्ञता आली असें नाहीं. कोणत्याही देशांत रोग घालविण्याच्या विद्येस जें शास्त्रीय स्वरूप आलें आहे, तेथें 'वैद्यशास्त्र' ह्मणजे फक्त-अमुक रोगावर अमुक औषध— एवढ्याच परिमित ज्ञानानें समजलें जात नाहीं. तर त्याच्या आसपास पुष्कळ बाजू असून, त्या सर्व बाजूंच्या विचारांनीं औषध देणें, त्यासच **शास्त्र** ह्मणतात. प्रस्तुत पृथ्वीवर जीं वैद्यशास्त्रें आहेत, त्यांत युनानी व युरोपीय अशीं दोन वैद्यशास्त्रें, आपल्याला, आपल्या देशाच्या बाहेरचीं-शास्त्र या स्वरूपानें बाहेर पडलेलीं दिसत आहेत. आपल्या देशाचें वैद्यशास्त्र, आपल्या पूज्य ऋषींनीं अतिशय नियमबद्ध व त्रिकालाबाधित असें करून ठेवलें आहे, व त्याचा आजपर्यंत तसा अनुभवही आला आहे. युनानी व युरोपीय हीं वैद्यशास्त्रें, शास्त्राच्या सरणीस कितपत जुळतीं आहेत त्याविषयीं आपल्याला खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं; तथापि इतकी गोष्ट खरी आहे, कीं—ते देखील—फक्त औषध जाणणें एवढेंच वैद्यशास्त्र असें मानीत नाहींत, आणि ह्मणून 'शास्त्र' या कसोटीवर तीं वैद्यकें घासण्यायोग्य असावींत.

कित्येक वेळां असें पहाण्यांत येतें, कीं एका प्रकारचा शास्त्रज्ञ दुसऱ्या शास्त्राची क्रिया करून रोगी बरा करतो, आणि कधीं कधीं रोग्याचा विघाडही करतो. ज्या शास्त्राची परिभाषा, औषधींचें स्वरूपज्ञान किंवा उपचारपद्धति हीं—ज्या मनुष्याला माहीत नाहींत; किंवा जो तीं निदान जरूरीपुरतीं तरी माहीत करून घेण्याचा प्रयत्न न करितां, भिन्न शास्त्राचीं औषधें वापरतो किंवा पद्धति स्वीकारतो, त्याला काय ह्मणावें तें आमच्याच्यानें लिहववत नाहीं. एवढें मात्र सांगतों, कीं अशा मनुष्याला, कोणतेंही वैद्यशास्त्र 'वैद्य' असें समजणार नाहीं. 'वैद्य' शब्दाचा रूढार्थ—रोगप्रतीकारज्ञानविषयक सर्व बाजूंची माहिती असलेला—असा घेतला ह्मणजे—तो डा-

क्टर, हकीम किंवा 'वैद्य' यांना सारखाच लागू पडतो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. युरोपीय वैद्यशास्त्र प्रस्तुत राजाश्रित असून, सम्पन्नांच्या स्वाधीन आहे, तेव्हां त्याचा बोलबाला चालावा हें उघडच आहे. "स एव वक्ता स च दर्शनीयः । सर्वे गुणाः काञ्चनमाश्रियन्ति ॥" हें तत्व ज्याला ठाऊक आहे, त्याला ही गोष्ट वेगळी समजून देण्याचें कारण नाहीं ! तेव्हां युरोपीय वैद्यशास्त्र, निर्विवाद उपयुक्त आहे असें ह्मणतां येणार नाहीं. विचार करतांना, युरोपीय वैद्यशास्त्रावरील **अलंकार** बाजूस ठेऊन विचार केला पाहिजे. त्यांच्यांत मोठे मान्य वैद्य आहेत; त्यांनीं हजारों रुपये खर्चले आहेत; त्यांच्या इमारती एवढाल्या मोठ्या आहेत–असले विचार बाजूस ठेवून, **कालाच्या कसोटीवर** कोणीं आपली योग्यता कितपत दाखविली आहे एवढेच निःपक्षपातानें पाहिलें पाहिजे. तसें पहावयाचें ह्मणजे—औषधें वापरण्याची पद्धति, यूरोपीय वैद्यशास्त्राची कितीही बारकाईनें बांधलेली असली, तरी त्याहून आर्यवैद्यशास्त्राची पद्धति भिन्न असून, आर्यवैद्यशास्त्राचीं औषधें वापरणारांनीं, आर्यवैद्यशास्त्राचीच पद्धति स्वीकारली पाहिजे हें अगदीं निर्विवाद आहे.

**ज्याचें शास्त्र त्याची पद्धति** हा विचार ठीकच आहे असें कोणीं ह्मणेल; पण तसेंच आह्मीं ह्मणतों असें समजूं नये. कारण, यूरोपीय वैद्यशास्त्राची विचार करण्याची, शोध करण्याची आणि हरएक शास्त्रीय पद्धति इतकी भिन्न आहे, कीं त्या पद्धतीनें आर्यवैद्यशास्त्र पहाणारांस खरा लाभ होणार नाहीं. उलट नुकसान होण्याचा संभव आहे. ह्मणून आर्यवैद्यकानें विचाराची जी कांहीं पद्धति बसविली आहे, ती पद्धतीच स्वीकारून आर्यवैद्यकाचा विचार केला तर त्यांतील मर्म कळणार आहे. ती पद्धति स्वीकारल्याशिवाय आर्यवैद्यकाचीं औषधें वापरणारांनां, वाग्भटांनीं **'वैद्यब्रुव'** ह्मटलें आहे.

दुसरें असें आहे, कीं कोणत्याही एका प्रकारची विचारपद्धति एखाद्याला लागली, ह्मणजे त्याच्या डोक्यांत दुसरी पद्धति शिरतच नाहीं; आणि त्यामुळें उगीच नस्ते आक्षेप मात्र उत्पन्न होतात. फार कशाला, प्राचीन व अर्वाचीन व्यवहारपद्धतींतील वादच याला साक्ष देऊं शकतील. एकाच देशांत एकाच जातींत आणि फार तर काय, पण एकाच मातेच्या उदरीं जन्म घेणारे दोन बंधु, निरनिराळ्या परिस्थितींत राहिल्यानें भिन्न भिन्न मताचे होतात व उगीच तंटे करतात हें आपल्याला ठाऊक नाहीं काय ? प्राचीन समाजस्थिति–धर्म व व्यवहार या दोहींवर अवलंबून असल्यानें, त्या समाजस्थितींत जी चांगली गोष्ट ह्मटली जात असे, तिला हल्लीं क्रूर ह्मटलें जात आहे; आणि धर्माला गुंडाळून ठेऊन, केवळ ऐहिक उपभोगांतच ज्यांना कृतकृत्यता वाटत आहे, ते लोक, सुधारणेच्या नांवावर—प्राचीन दृष्टीनें भ्रष्ट दिसणारे असे आचार–चांगले ह्मणून करीत आहेत. यांतील मर्म हेंच आहे, कीं गृहीत तत्वें आणि ज्याचें शोधन करावयाचें त्याचीं तत्वें—हीं दोन्ही भिन्न आहेत !

ह्मणून हें ध्यानांत ठेऊन आर्यवैद्यकाची पद्धती पाहिली पाहिजे. आर्यवैद्यकाचा पाया–त्रिदोषावर अवलंबून आहे. रोगविषयक प्रत्येक बाबतीत त्याचा विचार केला पाहिजे

पण ही त्रिदोषव्यवस्था जशी-आंग्लानुयायांना नवी ह्मणून अगम्य आहे, तशीच ती पुष्कळ वैद्यांना-ज्यांना वैद्यकपरिभाषेचें ज्ञान नसून, ज्यांनीं फक्त चिकित्साच पाहिली आहे त्यांनाही-ती स्पष्टपणें कळत नाहीं. ज्यांना परिभाषेमुळें तिचें ज्ञान आहे त्यांच्या जवळून ती समजून घेणारांत वरप्रमाणें भानगड पडते, व समजून सांगणारास-त्यामुळेंच मोठी अडचण येते.

अशा स्थितींत देशी औषधें वापरून, तच्छास्त्रज्ञांशिवाय-इतरांना कसें यश येणार याविषयीं पुष्कळ विचारी माणसांना शंका आहे, व त्याविषयीं आमची, पुष्कळ वेळां चांगल्या विद्वानांबरोबर या बाबतींत चर्चाही झाली आहे त्यामुळें हा विषय विशेष लक्ष्य देण्याजोगा आहे असें सर्वांच्या विचारें ठरलें आहे; आणि ह्मणून आज या विषयाची ही थोडीशी प्रस्तावना केलीं आहे. पुढें जास्त विचार करूं.

---

## स्वर्गवासी परम धार्मिक शेट गंगाविष्णु श्रीकृष्णदास.

आर्यवैद्यकास उत्तेजन देण्यास आमचा धार्मिक प्रतिबंध फार उपयोगी होता. कारण, निषिद्ध पदार्थांचा औषधी उपयोग देखील न करण्याविषयीं धार्मिक लोकांचा निश्चय असल्यामुळें, धर्मानुकूल आर्यवैद्यक बलिष्ट राहूं शकलें. आपल्या वैद्यकांत-आचार प्रधान असून, वर्णाश्रमविचाराप्रमाणें भिन्न भिन्न औषधी सांगितल्या असल्यामुळें, या निश्चयी लोकांकडून वैद्यकास चांगलें उत्तेजन मिळत असे. किंबहुना असें ह्मणण्यास हरकत वाटत नाहीं, कीं अशा धार्मिक लोकांमुळेंच आर्षवैद्यकांत कित्येक महत्वाचे शोध लागूं शकले. आजकाल अशीं धार्मिक व निश्चयी माणसें थोडीं तरी आहेत ह्मणून उपयोग आहे. अशांपैकींच स्व. शेट गंगाविष्णु श्रीकृष्णदास हे होते.

यांचा जन्म, संवत् १९०८ त, बिकानेर राज्यांतील चुरू गांवीं झाला. यांचे वडील मोठे धार्मिक व नेकीचे व्यापारी, या गांवचेच रहाणारे असत. वडीलांचा सदाचार, सत्यता, सरलपणा, धार्मिकता इत्यादि गुण यांच्यांत—"बापसे बेटा सवाई" या न्यायानें आले होते. यांनीं 'संसार साधून परमार्थाचा लाभ' अति उत्तम रीतीनें घेतला. यांनीं निरनिराळे व्यापार केले, आणि शेवटीं पुस्तकें छापणें व त्यासाठीं छापखान्याचा व्यवसाय करून, "सत्यतेनें देखील पैसा कसा मिळवितां येतो. याचें प्रत्यक्ष उदाहरण जगापुढें ठेवलें आहे. यांचे बंधु स्वधर्मधु० शेठ खेमराज श्रीकृष्णदासजी यांसही त्यांनीं आपल्या योग्यतेचें करून ठेवलें असून, शेट खेमराज यांची बंधुप्रीति व तत्सदृशगुणानुसरणही वर्णनीय आहे, आज मित्तीला शेट गंगाविष्णु यांचा छापखाना, कल्याणास 'श्रीलक्ष्मीव्यंकटेश्वर' या नांवानें देशविख्यात आहे. शेंकडों धर्मग्रंथ यांनीं छापून प्रसिद्ध केले आहेत. असे पुरुष, या भारतभूमीला सोडून जातात याबद्दल कोणासही वाईट वाटल्याशिवाय रहाणार नाहीं. यांची आर्यवैद्यकावर मोठी श्रद्धा होती, व धर्मसंरक्षणार्थ त्यांनीं आमरण विदेशी औषध-मोठ्या आणीबाणीच्या प्रसंगींही सेवन केलें नाहीं! यावरून धार्मिक दृष्टीनें शास्त्रोत्तेजनास किति सहाय्य होतें हें स्पष्ट दिसून येणार आहे. विशेष, आजच्या भारतधर्मांत पहा.

---

हाच प्रकार घ्राणेंद्रियासंबंधानें आहे. व कांहीं आधुनिक विवेकानंदासारखे संयमी घ्राणाच्या अग्राशीं संयम करून सुगंधविशेषाचा अनुभव घेते झाले. तसेंच त्यांनीं तसा अनुभव आपल्या राजयोग पुस्तकांतून व्यक्त केलाही आहे.

रसनेचा प्रकारही असाच आहे. जोंवर तिच्यांत सर्व रस अविकृतपणें वास करितात तोंपर्यंत पदार्थांची चव कळते. ह्मणजे तेथील ज्ञानकार्य अनुभविलें जातें. ज्यावेळेस तिच्यांतील ते रस नाहींसे होतात, तेव्हां बाहेरील रसभरित पदार्थ बेचव किंवा मातळ लागतात. बरें एकादा रस विपुल झाल्यास सर्व पदार्थही तसेच लागतात. उदाहरणार्थ जेव्हां विकृत पित्ताचा भर असतो व तोंड कडू होतें तेव्हां निरनिराळे ( गोड, मधुरादि ) पदार्थही कडू लागतात.

स्पर्शेंद्रियाचें देखील असेंच आहे. अगोदर स्पर्शज्ञान याचा अर्थ पाहूं— त्वचेस कोणाताही पदार्थ लागला कीं पदार्थ व त्वचा यांच्यांत जी हवा असते तिचें संकोचन होतें. व तिच्या अंगीं जो विलक्षण दाब उत्पन्न होतो त्यायोगें त्वगंतर्गत जी हवा तिला तो दाब पोंचतो. व त्यायोगें तेथें सुटलेलें जें ज्ञानतंतुजाल त्यास तो दाबाचा बोध होतो. त्यास आपण स्पर्शज्ञान ह्मणतों. आतां याचाच अर्थ हा कीं, स्पर्श कळण्यास अंतर्बाह्य वातच कारण आहे. व त्या वाताचे वाहक ज्ञानतंतु केवळ साधन होत.

ह्या सर्व ज्ञानेंद्रियांच्या संक्षिप्त खुलाशावरून दिसून येईल कीं:—ज्ञानेंद्रियास जो विषयग्रहण करावयाचा त्या विषयाचें त्यास ज्ञान होण्याकरितां त्या त्या विषयाचा संचय किंवा क्रियासाम्य त्या त्या इंद्रियांतून ठेविलेलें आहे. व्यवहारांतून कोणत्याही गुणाचा पारखी हा त्या त्या गुणाचा निधि असावा लागतो. एरव्हीं पारख घडत नाहीं. हाच प्रकार ह्या इंद्रियांसंबंधानें वाटतो.

अर्थात् इंद्रियांस विषयज्ञान व्हावें ह्मणूनच त्यांच्या ठायीं आपापल्या विषयांचा संचय ठेविला आहेसें वाटतें.

आतां हें जें एवढाविळ सांगितलें तें सगळें आपलें प्रमुख ज्ञानेंद्रिय—नेत्र यासही लागू असलें पाहिजे, असें वरील विचार सरणीनें ठाम ठरतें. ह्मणजे तेजाचें वा प्रकाशाचें बोधन जर नेत्रांकडून होत आहे तर त्याचा कांहीं तरी संचय आमच्या नेत्रेंद्रियांत पाहिजे.

आतां ह्या अर्थाचें स्पष्टीकरण घडण्यास पदार्थ दिसणें ह्मणजे काय तेंही स्पष्ट केलें पाहिजे. तरी तें सांगतों.—कोणत्याही पदार्थाचें आपणास दाट अंधारांत रंगरूप ज्ञान मुळींच होत नाहीं. तर प्रकाशांत होतें. कारण तशावेळीं पदार्थावर प्रकाशकिरण पडतात. त्यांचें त्या पदार्थापासून परावर्तन घडतें. व ते परावृत्त किरण फिरून आपल्या नेत्रांत येतात. आणि त्यांतून निरनिराळे रस, ज्ञानतंतु इ० अनेक साधनें आहेत त्यांच्या साह्यानें त्या पदार्थाचें ज्ञान होतें. तेव्हां पदार्थाचें ( परप्रकाशित ) ज्ञान ह्मटलें कीं परावृत्तप्रकाशकिरणग्रहण असें होतें. तसेंच नक्षत्रें, दिवा, चंद्रादि पदार्थांचें ज्ञान ह्मणजे त्यांच्या प्राप्तप्रकाशकिरणांचें ग्रहण असें आहे. एकूण प्राप्त वा परावृत्त प्रकाशकिरणांचें ग्रहण घडलें ह्मणजे पदार्थदर्शन होतें.

वर ज्ञानेंद्रियांसंबंधीं जे त्रोटक विचार झाले आहेत त्यांवरून प्रकाशग्राही ज्ञानेंद्रिय—नेत्र, तेजोविशिष्ट पाहिजे असें लक्ष्यांत येतें. आतां ही प्रकाशशक्ति त्यांतील निरनिराळ्या अवयवांत ज्या रसविशेषानें ( द्रव्यानें ) आहे तें आमचें **आलोचक** पित्त होय. आतां हें असें द्रव्य कोणतें ? त्याचे घटक पदार्थ कोणते ? त्यांचें प्रमाण काय ? इ० इ० माहिती मात्र देववत नाहीं. निदान नेत्रेंद्रियांतील साहित्यांत× अमका रस वा द्रव्यच विशेष कारणीभूत आहे. ( असा कीं त्याच्याच अस्तित्वावर दर्शनकार्य अवलंबून. ) तसेच

---

+ ऐरिस ( कनिनिकापटल ) याचा रंजक पित्ताशीं संबंध आहे ह्मणतात. तरी तेवढ्यानें सदर पित्तविभागांची स्पष्टता होत नाहीं.

त्याचे सजीव शरीरांत रूप—गुण अमुक इ० शोध (आधुनिक) बाहेर येईपर्यंत " आलोचक " अमकेंच असें दाखविणें अशक्यच आहे.

डोळ्यांत ही तेजविशिष्ट वस्तु आहे (१) हा अनुभव ज्या लोकांचा डोळा अगदीं दाट अंधारांत एकाएकीं फटका लागून जाया झाला आहे त्यांस विचारावा. ते कबूल करितात कीं, जोराचा फटका बसल्या बरोबर डोळ्यापुढें कांहीं तेज चमदिशी *चमकलें. व पुढें कांहीं वेळानें त्यास गळती लागून त्यांतली दर्शनशक्ति गेली. (२) कित्येक योग्यांविषयीं ऐकण्यांत आहे कीं, त्यांनीं धरिलेलें भ्रूमध्यावरील ध्यान त्यांस तत्रस्थ दिव्य तेजाची× (संचित) प्राप्ति करून देतें. (३) आपण डोळे झांकावे व डोळ्यांच्या कोंपऱ्यावर बोटानें दाबावें, ह्मणजे तेथें कांहीं निरनिराळ्या रंगविशिष्ट तेजाचा भास होतो. उलट असा भास न झाल्यास त्याचा काळ जवळ आला असें मानिलें जातें. ०

**कोणपक्ष्मांगुलिभ्यांतु किंचित्पीड्य निरीक्ष्यते ।**
**यदा न दृश्यते बिंदुर्दशाहं न स जीवति ॥**

(४) पित्त+ कासांत डोळ्यापुढें काजवे येतात किंवा उजेडांतही अंधारी येते. इत्यादि गोष्टी डोळ्यांतून तेजव्याप्ति दाखवितात.

असो. तरी " दृक्स्थमालोचकं " याचा कांहीं अंशानें खुलासा झाला; कीं, डोळ्यांतून जें तेजविशिष्ट प्रकाशग्राही द्रव्य ठेविलेलें आहे, तें आमचें आलोचक होय. आतां जर या आलोचकाची व्याप्ति नेत्रांतून आहे तर

---

* ही चमक कोणी विद्युज्जनित मानितात. तशी मानिली तरी कांहीं कारणानें या आलोचकांतच घालितां येईल

+ हें तेज ह्मणजे आलोचकांतील शक्ति.

× पित्त कासांत पित्त (मुख्यशरीरस्थ) कुपित असतें वा विकृत असतें यामुळें आलोचक देखील विकृत असतेंच. ह्मणून त्यांतील तेज धारकता कमी होत असावी. अर्थात् तेजाविशिष्टतेत बदल होत असावा.

त्यांत कांहीं विकृति वगैरे झाल्यास नेत्रांत देखील ती अनुभवास येणार ह्मणून .

**आलोचको नेत्ररोगान् ॥ ( करोति )**

**( वाग्भट )**

ह्मटलें आहे. आतां हे रोग कोणते ते नेत्ररोगनिदानांत आहेत त्यांचा मुळांत ( वाग्भटांत ) इतर पित्तभेदाप्रमाणें उल्लेख नसल्यामुळें मीहि तद्विषयक स्पष्टीकरण सोडितों. आतां क्रमप्राप्त जो पित्तविभाग—

## भ्राजक.

त्या विषयीं विचार करूं—मागें जें रंजक व पाचक या पित्तविभागांचें वर्णन केलें आहे त्यावरून हें कळून येईल कीं, आह्मांस जीवनाधार जें रक्त त्यांतून त्या रंजक व कायाग्नि संज्ञा पावणाऱ्या पाचकाचे अंश असतात. आतां रक्तांतून संचित जे हे रंजकपाचकादि पित्तांश ते अंतस्त्वचेजवळ आल्यास त्यांच्या योगें तेथें त्या त्वचेस रंगप्राप्ति व उष्मा हीं मिळतात. या खेरीज त्वचेंत स्नेहपिंड—व घर्मनळ आणि घर्मवाहक रंध्रें हीं असतात. पैकीं स्नेहपिंडांतून वेळोवेळीं बाहेर पडलेल्या द्रव्यामुळें त्वचेवर तकाकी ( तजेला ) असते. व घर्मनळांतून रक्तप्राप्त टाकाऊ द्रव रोमरंध्रद्वारा बाहेर पडतो. तो तसा बाहेर आल्यावर त्याची हवेंतील उष्णतेनें वाफ घडते ही क्रिया बेताची घडत असल्यास त्वचेची उष्णता समप्रमाणांत असते. हा एक घर्मामुळें फायदा घडतो. दुसरा फायदा असा कीं घर्मांतून टाकाऊ विषमय द्रव्यें शरीराबाहेर जातात.

एकूण त्वचेंतून जी रूप व गुणविशिष्टता असते तिचा विचार करूं लागल्यास समजतें कीं, त्वचेस रंग असतो, तिच्यांत उष्मा असतो, तिला कांति ह्मणजे तेजी असते, व तिच्यांत घर्मवाहकत्वही आहे. आतां या निरनिराळ्या गोष्टी घडण्यास जरी परंपरेनें निरनिराळे पित्तविभाग कारण आहेत; तरी एतद्गुणविशिष्ट असें तेथेंच संचित जें द्रव्य मुख्यत्वें आहे, तें आमचें **भ्राजक** होय.

ज्या मानानें बाह्यत्वचेजवळून व अंतस्त्वचेंतून शुद्धरक्तवहन जोराचें व पूर्ण होईल त्यामानानें त्वचेला खुलावटी येते व रंग चढतो. आतां नित्य हें

रक्तवहन बाह्यत्वचेजवळून होण्याला केवळ हृद्गतिच कारण आहे असें घेतां येत नाहीं. कारण त्वचेजवळील केशवाहिन्यांचा व्यापार अव्याहत चालण्यास केशवाहिन्यांतून असणारा अवकाश खुला असण्याची जरूरी आहे. तसेंच त्यांच्या टोंकांनीं अंतस्त्वचेंत बनणाऱ्या जाळ्याचीही सुव्यवस्था पाहिजे. याप्रमाणेंच तेथून शिरागत होणारें जें रक्त तेंही लवकर सरकलें पाहिजे. या सूक्ष्म क्रिया केवळ हृदयांतून मिळणाऱ्या धक्क्याच्या गतीनें व्यवस्थित होणार नाहींत. तेव्हां या क्रिया करणारी अशी त्वगंतर्गत शक्ति ती मिळण्यास कारण भ्राजक आहे. याचीं कार्यें लेप वगैरे लाविल्यास तो सुकविणें, त्वचेंत गरमाई ठेवणें, तिला कांति देणें इ० आहेत.

असो. " त्वक्स्थं भ्राजकं " याचा थोडक्यांत खुलासा झाला. आतां हें विकृत झाल्यास होणाऱ्या त्वग्रोगविभागांचें वर्णन देणें योग्य आहे. पण एव्हां देववत नाहीं. कारण झालेलें पित्तविषयक विवरण बरेंच लांबलें असें मनानें घेतलें आहे.

## उपसंहार

अशा तऱ्हेच्या कोणत्याही लेखाचा उपसंहार करावयाचा ह्मणजे त्या लेखांतून आलेल्या मुद्यांची सिंहावलोकनानें मांडणी दाखवावी असें असतें. पण तसें करूं गेल्यास विस्ताराचा आरोप येणार अशी भीति वाटते ह्मणून तसें करीत नाहीं.

आतां दुसरें—हे एकंदर पित्तविभाग अन्योन्याश्रयी आहेत ह्मणजे एका विभागाची वाढ वा कुपितपणा झाल्यास त्याबरोबर इतरांची वाढ होते, अथवा तीं कुपित होतात. या गोष्टींचा चिकित्सकांसही वेळोवेळीं निरनिराळ्या रूपानें अनुभव येतो. खेरीज इतरही निदानांतून प्रमाणें दाखवितां येतील. यावरून ह्या पांच विभागांच्या जमावाचा कारणसादृश्यावरून एकसाहा **पित्त** सदराखालीं समावेश होतो. सांगावयाचें तें कसें तरी आटोपलें. याचा हंसक्षीरन्यायानें उपयोग घडेल अशी आशा आहे.

# श्रीसयाजी--औषधशाला.

---*×*---

मुंबई, माधवबागेजवळ. ( पोस्ट गिरगांव. )

**अधिपति व नियोजक–वैद्यराज**

**आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.**

( १ ) **रोगपरीक्षा करून औषधें** देण्यांत येतात. केवळ गरीबांना सकाळीं ८ ते ९ पर्यंत **धर्मार्थ** औषधें मिळतात.

( २ ) **सप्रमाण-शास्त्रशुद्ध औषधें** तयार केलेलीं विकत मिळतात. यादी मागवा.

( ३ ) वैद्यकविषयाची सचित्र भरपूर माहिती देणारें सुप्रसिद्ध **'आर्यभिषक्' मासिकपुस्तक** १९ वर्षें एकसारखें निघत असतें. सर्व भारतीयांना अत्यंत उपयुक्त अशा सचित्र **'भारतधर्म'** मासिकपुस्तकासह मिळतें. टपालसहित वार्षिक वर्गणी १ रु. १० आणे. **फक्त आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **फक्त भारतधर्म** घेतल्यास १ रु.

( ४ ) आर्यभिषक्-पुस्तकावलींतील–**वैद्यकाच्या भिन्न भिन्न विषयाच्या संपूर्ण माहितीचीं निरनिराळीं पुस्तकें** विक्रीस तयार आहेत. 'आर्यभिषक्' मासिकपुस्तकाचे **वर्गणीदार** होतील त्यांस मात्र

**निम्मे किंमतीस**

मिळतात. **सार्थ श्रीचरकसंहिता हा** ऋषिप्रणित जगन्मान्य वैद्यकग्रंथ, **श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या उदाराश्रयानें** भागशः छापत असून, तोही सदरप्रमाणेंच मिळतो. सर्व माहिती, यादी व नमूना मागवा.

( ५ ) काढे, चूर्णें वगैरेंसाठीं खात्रीच्या **वनस्पतीही येथें मिळतात.**

श्रीशंकर.

आर्यभिषक्, पुस्तकावलि. अंक ३९.

# त्रिदोषविचार.

## भाग २ रा.

**सूचना.**—या विषयासंबंधीं बरीच चर्चा चालू असलेली एकत्र पहाण्यास सांपडावी ह्मणून स्वतंत्र पुस्तक काढण्याची व्यवस्था केली आहे. 'आर्यभिषक्' मासिक पुस्तकांतून हा विषय जेवढा आला आहे तेवढ्याचें हें पुस्तक आहे. पुढील भाग, अवकाशानुसार प्रसिद्ध होईल.

**सम्पादक**—आयुर्वेदमहोपाध्याय
**शंकर दाजी शास्त्री पदे.**

सर्व हक्क राखले आहेत.

मुंबई—" नेटिव ओपिनियन " छा० छापविलें.

शके १८२५—सन १९०३.

किंमत चार आणे.



सं. रास्ना म. रास्ना



सं. त्वक् म. दालचिनी.

चित्रोत्तेजक प्रे. मुंबई

क्रोष्टुपुष्पिका, अहिपर्णी, पूर्णपर्णी, तन्वी, घष्टिला, कदला, कंकशत्रु, चक्रकुल्या, शीर्णमाला, ब्रह्मपर्णी, विष्णुपर्णी, त्रिपर्णी. **गुजराथी**–नानेः समेरवो. **हिंदी**–पिठवन, पिठौनी, डावडा. **बंगाली**–चाकुले, चाकुलिया. **कर्णाटकी**–नरियलवोने, नरिहोन्ने. **तैलंगी**–कोलाकुमन्ना. **ओरिया**–कृष्टपर्णी. *Latin*. Uraria Lagopodioides. उरेरिया लेगोपोडायाइडिस.

**वर्णन**–या वनस्पतिविषयीं लोकांस कांहीं शंका आहे. या ठिकाणीं आह्मीं जें चित्र दिलें आहे तें बंगाल्यांत पृश्निपर्णी या नांवानें प्रसिद्ध असलेल्या वनस्पतीचें आहे. हें झुडुपच असून याचीं पानें वाटोळीं वेलदार असून तीं बेलाप्रमाणें त्रिदल असतात. बाजूच्या दोन पानांपेक्षां मधलें पान मोठें असतें. फुलें पांढरीं व किंचित् निळसर असून जटायुक्त असतात. मराठींत पृश्निपर्णीस रानभाल, पिठवण, किंवा डवला ह्मणतात. कोंकण प्रांतीं रानभाल नांवानें जी वनस्पति वापरली जाते तिचें वर्णन आह्मीं वनौषधिगुणादर्शाच्या चवथ्या भागांत केलेंच आहे. हिचीं पानें थेट भाल्याच्या आकाराचीं दुहेरीं असतात. ह्मणजे देंठाजवळ बारीक असून त्यासच पुढें मोटें पान झालेलें असतें. कोंकणांत हीं पडसर जमिनींत फार होतात. हीं झाळकट असतात. यांची उंची दोन अडीच हात असते. मोठ्या पानाची लांबी रुंदी सुमारें चार अंगुळें असतें. ह्मणजे आमची चित्रांतील पृश्निपर्णी कोंकणांतील रानभालेहून निराळी आहे. मि. मोतीलाल शाह यांनीं आपल्या ' विद्याहुन्नर ' नांवाच्या गुजराथी मासिक पुस्तकांत या वनस्पतीचें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें केलें आहे. हें झुडुप नदी किनाऱ्यावर सावलीच्या जागीं उगवतें. याचें कांडें ३।४ फुट उंच असतें. याचीं पानें एकात्रांड, देंठदार, व दोनपासून तीन इंच लांब आणि एकदीड इंच रुंदीचीं असतात. तीं वरच्या बाजूनें दिसण्यांत सुंदर असून गुळगुळीत असतात आणि खालच्या बाजूस त्यावर बारीक लव असते. यांस पात्रसाळ्याच्या अखेरीस लहान लहान तांबड्या रंगाच्या फुलांचे घोंस येतात. याच्या शेंगा पांढऱ्या व सांधे असलेल्या दितात. त्यांतील बीं फिकट पित-

ळ्या रंगाचें चवळीसारखें असतें. आतां हीं तीन प्रकारचीं वर्णनें दिलीं आहेत. त्यांपैकीं कोणत्याही दोहोंचें वर्णन सर्वांशीं सारखें जुळत नाहीं. त्यांतल्या त्यांत तारतम्य दृष्टीनें पाहिलें असतां कोंकणी व गुजराथी रानभाल यांत पुष्कळ अंशीं सादृश्य आहे. परंतु बंगाली पृश्निपर्णी अगदीं निराळी दिसते. अशा स्थितींत पृश्निपर्णी खरी कोणती हा निर्णय ठरविणें आहे. कोंकणांत रानभाल ह्मणून जी वनस्पती वापरतात ती रानभाल बरोबर आहे. परंतु ती पृश्निपर्णी आहे किंवा नाहीं या प्रश्नाचा निर्णय आपल्यास करणें आहे. रानभाल हें नांव त्या वनस्पतीच्या पानांच्या भाल्यासारख्या आकृतीवरून दिलेलें आहे. परंतु पृश्निपर्णी हें नांव देणारा मनुष्य व रानभाल संज्ञा ठरविणारा मनुष्य हे दोघे निरनिराळे होते. परंतु आपणांस त्या दोघांचा मेळ घालून पहावयाचा आहे. आतां संस्कृतांत पृश्निपर्णी नामक वनस्पतीचीं जीं पर्यायनांवें आहेत त्यांच्या यौगिक अर्थावरून या विषयाचा कांहीं निर्णय करतां येत असेल तर पाहूं. वस्तुतः वनस्पतीचीं नांवें निवळ यौगिक नसून तीं योगरूढ आहेत. परंतु यौगिक अर्थ बरोबर असेल तरच पुढें तो रूढ होणार. उदाहरणार्थ—पृश्निपर्णीच्या नांवांत दीर्घपर्णी हें एक आहे. आतां दीर्घ पानांच्या वनस्पती अनेक आहेत. परंतु पृश्निपर्णीचीच ही विशेष रूढ संज्ञा ठरविली आहे. कोंकणांतल्या पृश्निपर्णीचीं पानें लांब असतात. बंगाल बंगरेकडील त्याच वनस्पतीचीं पानें वाटोळीं असतात. त्या अर्थीं दीर्घपर्णी हें नांव बंगाल्यांतील पृश्निपर्णीस लागू होत नाहीं. मुख्य प्रसिद्ध नांव पृश्निपर्णी आहे. याचा शब्दार्थ पातळ पानांची, मृदु पानांची किंवा किरणासारख्या पानांची असा होईल. पहिलीं दोन लक्षणें वरील दोन्ही प्रकारच्या पृश्निपर्णीशीं जुळवितां येतील. आतां किरणाकृति याचा अर्थ असा करितां येईल कीं, सूर्यकिरण जसें मुळाशीं बारीक असून पुढें फाकतें, तसें देंठाशीं बारीक असून पुढें रुंद होणारें असें याचें पान असतें. हें वर्णन कोंकणी पृश्निपर्णीस लागू पडतें. पृथक्पर्णी वंगदेशीय पृश्निपर्णीकडे झुकतें. कारण त्याचीं तीन निरनिराळीं पानें असतात. जटिल हें एक

नांव आहे. हें कोंकणी रानभालेकडे लागतें. तीं झुडें झाळकट असतात हें वर सांगितलेंच आहे. परंतु बंगाली पृश्निपर्णीचीं फुलें जटायुक्त असतात. ह्मणून त्यासही आवश्यक दिसल्यास हें लावतां येण्यासारखें आहे. त्रिपर्णी हें नांव मात्र स्पष्टतया बंगाली पृश्निपर्णीचाच बोध करितें. त्रिपर्णी शब्दाचे रानभाल व रानगांजा असे दोन्ही अर्थ आहेत. त्रिपर्णी ह्मणजे मात्र रानगांजाच. येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून दोहोंपैकीं अमुकच पृश्निपर्णी खरी व बाकीच्या खोट्या असें ह्मणतां येणार नाहीं. कारण इच्या नांवांत सर्व जातींचा समावेश होतो. याचा खरा सिद्धान्त हाच आहे कीं पृश्निपर्णीच्या निरनिराळ्या जाती आहेत. व त्यांपैकीं आह्मीं जिचें चित्र दिलें आहे ती एक आहे. बंगाली ग्रंथकार ज्यांनीं आह्मीं दिलेल्या चित्रास पृश्निपर्णी ठरविलें आहे ते असें लिहितात कीं ही बंगाल व पश्चिम देशांत फार होते. दक्षिणेंत ही फारशी होत नाहीं. यावरूनही वरील सिद्धांतास पुष्टि मिळते. भारतवर्षीय वनौषधि संग्रहकार डॉ. मंत्री यांचेंही मत असेंच आहे. एतावता दोन्ही जाती खऱ्या रानभालीच्याच असून दोहोंचे गुणधर्मही सारखेच आहेत हें सिद्ध होतें. कोंकणांतील रानभालेचें चित्र आवश्यकता वाटल्यास पुढें देऊं.

हिचे **गुणदोष** व **औषधिउपयोग** वनौषधीच्या चवथ्या भागांत दिले आहेत. त्याहून जास्त इतकेंच कीं, फुरशाच्या विषारावरही हिच्या पानांचा रस गुणकारी आहे. हिचा मुख्य उपयोगी भाग मूळ आहे. परंतु पानांचाही उपयोग होतो.

## ९. रास्ना.

**संस्कृतनांवें.**—रास्ना, युक्तरसा, रस्या, श्रेयसी, रसना, रसा, सुगंधिमला, सुरसा, रसाढ्या, अतिरसा, एकपर्णी, सुवहा, सुगंधा, गंधनाकुली, सुरभी, गंधमूला, रसनी, अतिसारस्या, एलापर्णी, सर्पगन्धा, पलंकषा, द्रोणगान्धिका, नकुलेष्टा, भुजंगाक्षी, छत्राकी, **मराठी, गुजराथी**—रास्ना **हिंदी**—रासन, रायसन, रहसनी, रास्ना. **बंगाली, कर्णाटकी**—रास्ना, **तै.** रास्ना, पुडूका. **फारसी**—रासून. **अरबी** जंजबीलशामी. *Latin*—Vanda Roxburghii. वेंडा रॉक्सबर्घीआई.

**वर्णन.**—रास्नेच्या तीन जाति आहेत. मूळरास्ना, पत्ररास्ना व तृणरास्ना. या तिहींत मूळरास्ना गुणांनीं श्रेष्ठ आहे. हीस खडकीरास्ना ह्मणतात. ही विशेषतः गुजराथेंत व महाराष्ट्रांत महाबळेश्वर, माथेरान वगैरे पर्वतांवर क्वचित् क्वचित् सांपडते. हिच्या दाभणाएवढ्या बारीक मुळ्या असतात. पत्ररास्ना पंजाब प्रांतांत व अयोध्या प्रांतांत उत्पन्न होते. इतर स्थलीं पाहण्यांत येत नाहीं. ईस ' कडवी सेना ' असेंही नांव आहे. सिंधी भाषेंत हीस ' रासन्ना ' व पंजाबींत ' रिषमीसन्नें किंवा ' कड्डू बुट्टी ' अशीं नावें आहेत. हें वर्षायु झुडूप आहे. याचीं झाडें पेशावरांत सांपडतात. तीं ४।५ फुट उंचीचीं होतात. हें ताराकृतिफुलांच्या वर्गांतलें आहे. ( ज्यास इंग्रजींत ' कंपाझिटी ' वर्ग ह्मणतात. ) याचीं पानें पीलूच्या पानासारखीं असतात. रॉयल साहेबांनीं हिमालयावरील वनस्पतींविषयीं जो ग्रंथ लिहिला आहे त्यांत ते लिहितात कीं, त्यांनीं या पत्ररास्न्याचीं पानें चुकीनें पीलूचीं पानें समजून फॉकनर साहेबांकडे पाठविलीं होतीं. पत्ररास्न्यांत सारक गुण आहे. परंतु सोनामुखीपेक्षां कमी आहे. व्यापारीलोक या सारकगुणांमुळें सोनामुखीच्या पानांबरोबर याच्या पानांची भेळ करितात. सिंध प्रांतांतील पसारीलोक हा विक्रीस ठेवितात. या पत्ररास्न्याच्या अथवा कडव्या सेनाच्या पानांची अलीकडे वाईन साहेबानें रासायनिक परीक्षा केली आहे. तीं रुचीनें खारट व सुगंधी आहेत. त्यांत क्षार व कौचुक ( Caoutchouk रबरसदृश पदार्थ ) व एकसेंद्रिय आम्ल हीं सांपडतात. त्या अम्लास अद्यापि रसायनज्ञांनीं नांव दिलें नाहीं व त्याच्या रासायनिक घटनेचा शोधही कोणीं लावलेला नाहीं. उदयचंद्र दत्तांचा असा तर्क आहे कीं रास्नामूळ दोन निरनिराळ्या वनस्पतींपासून उत्पन्न होतें. त्या दोन्हीं बादांगुळासारख्या वृक्षरोह अथवा इतर झाडांवर वाढणाऱ्या आहेत. या ठिकाणीं आह्मीं जें चित्र दिलें आहे तें मूळरास्न्याचें आहे. बंगाल्यांत जुन्या आंब्यावगैऱ्यांच्या झाडांवर हें बादांगुळासारखें होतें. याचीं पानें तरवारीच्या म्यानेसारखीं वांकलेलीं, रेघादार, व टोंकाकडे अणीदार असतात. याचीं पांढरक रंगाचीं बारीक मुळें झाडाच्या सालीवर बिलगलेलीं असतात,

यांवर पिंवळट जांभळट ( वैंगणी ) रंगाचीं व ठिपकेदार फुलें येतात. कित्येक ठिकाणीं यावर जरद गुलाबी रंगाच्या देंठांवर गुलाबी फुलें आलेलीं पाहण्यांत येतात. गुजराथेंतील मूळरास्न्याहून हा कांहींसा निराळा असावा असें वाटतें. राजनिघंटकारांनीं रास्नापंचकाचा उल्लेख केलेला आहे. परंतु दुसऱ्या कोणत्याही निघंटांत त्याचा नामनिर्देश आढळत नाहीं. वरील मूळ—पत्र—तृण हे तीन भेद मात्र प्रसिद्ध आहेत. परंतु एका प्रकारानें रास्नापंचकही होऊं शकतें. तो प्रकार हा कीं, दोन प्रकारच्या नाकुली ह्मणजे मुंगुसवेलींचा या तिहींत समावेश करावा. एक मूळ मुंगुसवेल व दुसरी कंद मुंगुसवेल असे दोन भेद पहाण्यांत येतात. डॉ० मंत्री यांनीं उत्तर कानडा प्रांतांत देवमणिघाटावर मूळ मुंगुसवेलीचा लहान रोपा पाहिला आहे. त्यास सन्मुख येणारीं पातळ पानें ४।५ इंच लांबीचीं व दीर्घगोल आकाराचीं असतात. त्याचे देंठ आंखूड व लवेनें भरलेले, फुलांचे घोंस शेवटीं अनियमित मंजरीवर आलेले पांढऱ्या रंगाचे असतात. फुलाचा बाह्यकोश विभागलेला नसतो. नरकेसर पाकळ्याच्या आंतल्या अंगास चिकटलेलें रजःकणाचे पिंड आच्छादित असतें. या वनस्पतीचें मूळ कडू व तिखट आहे. त्यावर झालेल्या रासायनिक प्रयोगांवरून तें जीर्णज्वर व आमवायू या दोन विकारांत रोग्यास देण्यास प्रशस्त ठरलें आहे. याच्या मुळास लहान रास्ना ह्मणण्याचा प्रघात आहे. हें रोचक व अग्निदीपक आहे असा डॉक्टरांचाही अभिप्राय आहे. कंद मुंगुसवेलीचीं पानें नागवेलीच्या पानांसारखीं असतात. सोलापूर जिल्ह्याच्या आसपासच्या मोंगलाई इलाख्यांत एक कंद मुंगुसवेल सांपडते, तिची वेल अगदीं बारीक दाभणासारखी असून तिजवर पानें मुळींच नसतात. एका वेलीस दुसऱ्या आडव्या वेली पुष्कळ फुटून वेलीचें एक मोठें जाळेंच होतें. कंद नारळाच्या आकारापासून मोठ्या कोहळ्याच्या आकारापर्यंतचे असतात. एकाबाजूनें त्यांचा आकार सर्पाच्या फणेप्रमाणें असतो. कंदाचा रंग पांढरा असून तो हातास खडबडीत लागतो. त्याच्यावर लहान लहान खडबडीत गांठी असतात. कंद घरांत आणून ठेविला असतां तेथेंच त्यास वेल फुट-

तात. या कंदास त्या प्रांतांत 'विषमुंगरी' ह्मणतात. व याचा उपयोग विशेषेंकरून सर्पवगैरे विषारी जनावर चावलें असतां त्याचा विषार उतरण्याकरितां करितात. गुरांस सर्प चावला असतां हा कंद ठेंचून भाकरी वरोवर खाऊं घालतात. त्यायोगानें त्यास रेच होऊन विषार उतरतो. मनुष्यास सर्प, विंचू वगैऱ्यांचा दंश झाला असतां चावलेल्या ठिकाणीं हा कांदा ठेंचून बांधतात. खेड्यांतील लोक तर हा मनुष्यास देखील विषार उतरण्याकरितां सुमारें ६ मासे देतात. याच्या योगानें उलटी होऊन विष उतरतें. या कंदास उग्र वास येतो. याप्रमाणें या दोन्ही मुंगुसवेली रास्नेच्या जाती मानल्या असतां रास्ना पंचक सिद्ध होतें. असें मानण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यवाय दिसत नाहीं. उलट असें करण्यास पोषक सामग्री बरीच आहे. नाकुली, गंधनाकुली, नकुलेष्टा, सुगंधा, सुवह इत्यादि रास्नेचीं नांवें आहेत. तीं मुंगुसवेलीचींही आहेत. शिवाय मुंगुसवेलीच्या मुळांस रास्ना असें ह्मणण्याचा परिपाठही आहे.

याचे **गुणदोष** व **औषधि उपयोग** वनौषधिगुणादर्शाच्या पांचव्या भागांत दिले आहेत ते पहावे. त्याशिवाय उपदंशजन्य विकारांत रक्तशुद्धीकरितांही याचा चांगला उपयोग होतो.

## ८ दालचिनी. ( मराठी )

**संस्कृत नांवें**—त्वक्, त्वग्वल्कल, भंग, वरांग, मुखशोधन, शकल, सैंहल, वन्य, सुरस, रामवल्लभ, उत्कट, बहुगंध, विज्जुल, वनप्रिय, लाटपर्ण, गंधवल्क, वर, शीत, गुडत्वक्, हृद्य, तनुक, स्वर्णभूमिका, चोच, रामाप्रिय, मनःप्रिय, स्वाद्वी, दारुसिता, तनुत्वक्, द्योल, सुरभिवल्कल **गुजराथी**—तज. **हिंदी**—त्वज, दालचीनी. **बंगाली**—दारुचिनी, **कर्णाटकी**—तज, दालचिनी. **तैलंगी**—सनलिंगु, डालचीनी. **तामिल**—करुवापत्ते, **तु. इजिनमल**—करुवा. **फारसी**—दारचिनी. **अरबी**—सालीखा. **ब्रह्मदेशभाषा**—मिट्ल्यावो. **लुशाई**—थ्याकं, थ्विन. **इंग्लिश** Cinnamon Bark सिनॅमन-

बार्क **लॅटिन**—Cinnamomum Zeylanicum सिनामोमम् झिला निकम्.

**वर्णन**—सिंहलद्वीप, कोचीन, चीन, सुमात्रा, जावा वगैरे देशांत दालचिनीची लागवड फार मोठ्या प्रमाणावर केली जाते. हें साधारण उंचीचें व सदार्द्र झाड आहे. हा वृक्ष मलबारी तजेच्या अथवा तमाल वृक्षाच्या झाडापेक्षां मोठा असतो. याचें फळही मोठें असतें परंतु विशेषें करून याची साल तमालाच्या सालीपेक्षां पिवळी, लवचीक व जास्त सुगंधी असते याचीं पानें अंडगोल किंवा कांहींशीं अंड गोल असून दीर्घाकार असतात. आणि त्यावर तीन रेषा असतात. पानें कांहींशीं समोरासमोर असतात. पानें तमालपत्रासारखीं परंतु त्याच्या दिढीनें मोठीं असतात. पानें सुकल्यावर त्यांतून लवंगासारखा वास येतो. झाडाच्या दांडीवर पंढऱ्या रंगाची फुलें येतात. त्यांस गुलाबाच्या फुलांसारखा वास येतो. फळें करवंदांसारखीं येतात. त्यांचें तेल काढितात. फुलांचा अर्क व अत्तर बनवितात. या वृक्षाच्या सालीस दालचिनी ह्मणतात. दालचिनीच्या बऱ्याच जाति आहेत असें आढळतें. ' चोच, गंधवल्क, हाध्यामकत्वक्, त्यांपैकीं एक जातीचा वृक्ष फक्त सिंहलद्वीपांत युरोपियन उद्भिज्ज वर्णन करांनीं पाहिला आहे व यास निघंटकारांनीं सिंहली हें नांव दिलें आहे. यावरून सिंहलद्वीपांतला हा वृक्ष गुणानें व जातीनें निराळा असावा. याच्या सालीस इंग्रजीभाषेत क्याशियाबार्क ( साल ) ह्मणतात. डॉक्टर बर्डवूड ह्मणतात कीं ही जाति हिंदुस्थानांतही सांपडते. क्याशियाचीं झाडें पश्चिम चिनांत व जपानांतही आहेत. त्यांची साल मलबारी दालचिनीपेक्षां जाड असते. मलबारी दालचिनीस तज ह्मणतात व व्यापाऱ्यांकडे जी मिळते तिचे चापट व वळलेले सहा सहा इंच जाडीचे तुकडे असतात. क्याशियाची साल दालचिनीपेक्षां अम्मळ गोड असते. दालचिनीचें व क्याशियाचे सालींतून चिनांत तेल काढितात तें इकडे टिनाच्या डब्यांतून येतें. परंतु या दोहोंच्या

किंमतींत जमीन अस्मानाचें अंतर असतें, दालचिनीचें तेल फार महाग असतें. दालचिनीसारख्या परंतु गुणानें निराळ्या अशा दुसऱ्या तीन चार जाति जावा व आंबोयना बेटांत सांपडतात. तेजपत्र व तमालध्वज, नीलध्वज हे त्यांपैकींच आहेत. हे जावाबेटाकडून व्यापाऱ्यांनीं सिंहलद्वीपाकडे नेले असें लिनीयस साहेबांचें ह्मणणें आहे. परंतु राजनिघंटकारांनीं याचा उल्लेख केला आहे. त्याअर्थीं या प्राचीन असून त्यांचा शोध डचलोकांपूर्वींच प्रसिद्ध झालेला होता. सुश्रुतांनीं हें शिरोविरेचनांत घेतलें आहे. राजनिघंटकारांनीं सिंहल, रामवल्लभ, बहुगंध या नांवाचा वृक्ष निराळा देऊन तमालपत्र हीं त्याचीं पानें असें लिहिलें आहे. कडू लवंग अथवा बोजवार ही एक दालचिनीच्या झाडाचीच जात आहे; व ती उत्तर कानडा प्रांतांत, खंडाळ्याच्या घाटावर व त्रावणकोरच्या जंगलांतही आहे. असा डॉ० मंत्री यांचा शोध आहे. सिंहलद्वीपांतील दालचिनी उत्कृष्ट असते. तिचा रंग फिकट पिवळा जवळ जवळ 'वेनीशन' सोन्यासारखा असून ती पातळ, गुळगुळीत व चमकदार असते. याचे **गुणदोष व औषधि उपयोग** वनौषधि गुणादर्शाच्या चवथ्या भागांत सांगितले आहेत. त्याशिवाय दालचिनीचें तेल उत्तेजक असून दंतशूळ पोटशूळ, जीभ आखडणें या विकारांवर ही चांगली गुणकारी आहे. हें पाण्यांत टाकलें असतां बुडतें. "जले क्षिप्तं निमज्जति" असें आत्रेय संहितेचेंही वचन आहे.

### ७ **वायवरणा**, हाडवर्णी, भाटवर्णी. (मराठी).

**संस्कृत**—वरुण, श्वेतवृक्ष, तिक्तशाक, कुमारक, श्वेतद्रुम, साधुवृक्ष, तमाल, मारुतापह, श्वेतपुष्प, मधुवृक्ष, उरुमाण, शाकवृक्ष, जलापह, सेतु, शाकश्रेष्ठ, तिक्तशाकद्रुम, बर्हपुष्प, अश्मरीघ्न, शिखिमण्डल. **गुजराथी**—वरणो, वायवरणुं. **हिंदी**—बरना (बिली). **बंगाली**—बरुणगाछ. **कर्णाटकी**—मदवसले. **तैलंगी**—उरुमट्टि, जाजिचेट्टु. **तामिल**—मरलिंगम्. **लॅटिन**—Crataeva religiosa क्रॅटिवा रिलिजियोसा.

## ग्रहविहारभवन व ज्योतिषादर्श मंदिर.

या नांवाची संस्था आह्मीं स्थापन केली आहे. व यांत सात वर्षांपासून शक्य इतका ज्योतिष-पुस्तकांचा संग्रह द्रव्यबोज स्वतः उचलून केला आहे. अनुभवासाठीं येथें नामांकित स्त्रीपुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्यांची आवश्यकता आहे. व अशा कुंडल्या ज्याच्या त्याच्यावाचून मिळणें शक्य नाहीं. यासाठीं देशबांधवांनीं, राजे-रजवाडे, थोर, श्रीमान्, कुशल, कलाभिज्ञ, विद्वान्, वक्ते वगैरे, तशाच संस्था, विद्यालय, मोठमोठ्या इमारतींच्या, मिळतील तितक्या कुंडल्या संपादन करून पाठविल्यास, या मागें पडलेल्या शास्त्रास पुढें आणण्याचें मोठें श्रेय मिळणार आहे. व यापासून देशबांधवांचा आज नाहीं कधींतरी उपयोग होणार आहे. जाहलेले, सध्या आहे ते व पुढें होणाऱ्या कुंडल्या पाठवाव्या; तसेंच आह्मांला ज्योतिष पुस्तकांची आवश्यकता आहे, तरी अप्रसिद्ध ग्रंथ कोणाजवळ असल्यास कळवावें.

**भगवंत गोविंद तोडेवाले. चालक.**

---

### फुकट ! फुकट ! ! फुकट ! ! !

आमचें 'चन्द्रकला' नांवाचें तापावरील रामबाण औषध, वाटेल त्यास विन किंमतीनें, टपालहंशीलसुद्धां न पाठवितां मिळेल. या औषधापासून रोज येणारा ताप, दिवताप, एकांत्राड येणारा, अथवा तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशीं येणारा पाळीचा ताप, क्विनाईन वगैरेंच्या योगानें अडकलेला ताप, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा कसाही ताप असला तरी तो जाईल. याच्या योगानें शरीरांत उष्णता किंवा रूक्षता होणार नाहीं. या ठिकाणीं, फार प्रशंसा न करितां इतकेंच लिहितां कीं, जे नानाप्रकारचीं औषधें करून थकले असतील त्यांनींही एक वेळ या फुकटच्या औषधाचा अनुभव घेऊन पहावा. सर्व लोकांस आमच्या या औषधाचा लाभ मिळावा एवढ्याकरितांच फक्त आह्मी हें फुकट देत आहों. एका कार्डावर आपलें नांव व पत्ता स्पष्ट लिहून कळविला असतां आपल्या पदरचा टपालखर्च करून आह्मी औषध पाठवूं. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा

काशीपुरतराई (व्हाया मुरादाबाद )
जिल्हा नैनीताल.

**मुकुंदराम जोशी,**
आयुर्वेदीय औषधालय.

---

# सौभाग्यावलेह.


### स्त्रिया, पुरुष व मुलें यांनां सर्वकाल उपयोगी.

### सर्व रोगांवर चालतो. घेण्यास रुचिकर.

१२ तोळ्याच्या डब्यास १ रु.. ४० तोळ्याच्या डब्यास २॥ रु. प्याकिंग २ आणे. टपाल सुमारें, रुपयास ४ आणे प्रमाणें. आगाऊ पैसा किंवा मानआर्डर आल्यास पाठवूं. व्ही. पी. नाहीं

श्रीसयाजी-औषधशाला.
मुंबई, पोस्ट गिरगांव, माधवबागेजवळ.

**शंकर दाजी शास्त्री पदे.**
संपादक, आर्यभिषक्.




# नवीन सोय ! स्वदेशी वस्तूंस उत्तेजन !

'आर्यभिषक्कार्या' लयांतील वैद्यकविषयांचीं पुस्तकें किंवा शास्त्रशुद्ध औषधें घेणारास

## प्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा

यांच्या छापखान्यांतील

# हरएक सुंदर चित्रें

दर रुपयास दोन आणेप्रमाणें सूट देऊन विकत मिळतील. पुस्तकें, औषधें व चित्रें यांची यादी आणि 'आरोग्याचा मार्ग' हें पुस्तक,

## सर्वांस फुकट मिळेल.

**निरनिराळ्या**— वनस्पतींचे, शरीराचे वगैरे हुबेहुब देखावे देऊन, वैद्यकाची माहिती देण्यांत प्रख्यात झालेलें

**आर्यभिषक्**— मासिकपुस्तक सन १८८५ जुलैपासून निघतें. मागील गजकुरांचीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत. याचे बरोबर—

**भारतधर्म**— नांवाचें धार्मिक विषयांचें सचित्र मासिकपुस्तक असतें. दोन्ही घेणारांस वर्षाची वर्गणी टपालखर्च १ रु. १० आणे. फक्त **आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **भारतधर्म** घेतल्यास १ रु. इतर पुस्तकांची यादी पाहा. श्री० गायकवाड सरकारांच्या उदार आश्रयानें हीं वैद्यकाचीं सर्व पुस्तकें—

## निम्मे किंमतीस देण्यांत येतात.

आर्यभिषक् औषधशाला.
मुंबई, पो० गिरगांव माधवबाग

शंकर दाजी शास्त्री पदे.
(आयुर्वेदमहोपाध्याय.)

मुंबई नेटिवओपिनियन छा० त छापलें